# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

## • समग्र वाङ्मय •

खंड-१३

## पत्रसंग्रह

**संपादक**

डॉ. सुनीलकुमार लवटे

साहित्य आणि संस्कृती मंडळ
महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय

खंड - १३

# पत्रसंग्रह

संपादक

**डॉ. सुनीलकुमार लवटे**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
सन २०२४

वाय १८५-१

**पुस्तकाचे नाव :** तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय
खंड - १३ पत्रसंग्रह

**संपादक :** डॉ. सुनीलकुमार लवटे

**आयएसबीएन :** ९७८-८१-९६८२६८-०-२

**प्रथमावृत्ती -** २०२४

**प्रकाशक :**
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्य मंदीर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी मार्ग,
प्रभादेवी, मुंबई-४०० ०२५.

**© प्रकाशकाधीन :**

**मुद्रक :**
व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३.

**मुखपृष्ठ :** गौरीश सोनार

**किंमत :** रुपये २४६/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः संपादकाची व लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# अध्यक्षीय मनोगत

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबईचे संस्थापक अध्यक्ष होते. त्यांच्या कार्यकाळात (१९६० ते १९८०) मराठीत विविध विषयांचे ग्रंथ तयार करून प्रकाशित करण्यात आले. तसेच वैश्विक अभिजात साहित्य ग्रंथ भाषांतरित करून घेऊन ते प्रकाशित करण्यात आले. महत्त्वाच्या नियतकालिकांना प्रकाशन सातत्यार्थ अनुदान देण्यात आले. शिवाय समग्र वाङ्मय प्रकाशनाचा प्रारंभ झाला. आज मंडळ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय प्रकाशित करत आहे, याचा आनंद होत आहे. हा मंडळाचा महत्त्वपूर्ण व महत्त्वाकांक्षी प्रकल्प होय. तो सिद्ध केल्याबद्दल या प्रकल्पाचे संपादक डॉ. सुनीलकुमार लवटे यांचे मंडळ ऋणी आहे, आणि त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करते.

प्रकल्प संपादक डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय १८ खंडात संपादित करून प्रकाशनार्थ सादर केले आहे. सुमारे अकरा हजार पृष्ठांचे हे वाङ्मय वैविध्यपूर्ण आहे. यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित मराठी विश्वकोश नोंदी, भाषणे, लेख, मुलाखती, प्रबंध व चरित्रे (मराठी आणि संस्कृत), ग्रंथ प्रस्तावना, पुस्तक परीक्षण, पत्रे, संस्कृत हस्तलिखित ग्रंथ विवरण सूची, भारतीय राज्यघटनेचे संस्कृत भाषांतर यांचा समावेश आहे. शिवाय या प्रकल्पात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या जीवनावर आधारित स्मृती व गौरव लेख आणि यांच्या साहित्यावरील समीक्षात्मक लेख अंतर्भूत करण्यात आले आहेत. प्रकल्पाच्या अंतिम खंडात तर्कतीर्थांच्या अप्राप्त साहित्याची सूची देण्यात आली आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या साहित्याची सूची नसताना संपादकांनी हे वाङ्मय संकलित करून त्यांचे साहित्य प्रकार, स्वरूप, विषयाधारित वर्गीकरण करून सादर केले आहे. प्रत्येक खंडास स्वतंत्र व विस्तृत प्रस्तावना असल्याने तर्कतीर्थ वाङ्मयाची पीठिका प्रारंभीच वाचकास कळते. सर्व साहित्याचे पूर्वसंदर्भ देण्यात येऊन त्यांची क्रमागत प्रकाशन सूची प्रत्येक खंडाच्या शेवटी

देण्यात आली आहे. परिशिष्टात ऋणनिर्देशांतर्गत साहित्य संकलनास साहाय्यभूत ठरणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करण्यात आला आहे. शिवाय तर्कतीर्थ जीवन परिचय, तर्कतीर्थ साहित्य व संदर्भग्रंथसूची, संपादक परिचय प्रत्येक खंडाच्या शेवटी देण्यात आला आहे. या अर्थाने व अंगांनी हा प्रकल्प परिपूर्ण व उपयुक्त बनविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे प्रकाशित, संपादित व भाषांतरित ग्रंथ, आणि चरित्रे यापूर्वी वेळोवेळी प्रकाशित झाली होती. पण यात त्यांचे समग्र वाङ्मय संकलित नव्हते. या प्रकल्पात त्याची भरपाई करण्याचा प्रयत्न संपादकांनी केला आहे. यामुळे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे समग्र जीवन, कार्य, विचार जिज्ञासू वाचक, अभ्यासक, संशोधकांना एकत्र उपलब्ध झाले आहे. तो या प्रकल्पाचा उद्देश होता. तो पूर्णत्वास गेल्याचा मंडळास आनंद आहे. प्रकल्पाच्या अठराव्या खंडाच्या शेवटी प्रकल्प परिचय पुस्तिका अंतर्भूत असून त्यामुळे समग्र प्रकल्प एका दृष्टिक्षेपात समजणे सुलभ झाले आहे. हा प्रकल्प जिज्ञासूंना उपयुक्त होईल अशी अपेक्षा आहे.

दि. ८ मार्च, २०२४
जागतिक महिला दिन

**डॉ. सदानंद मोरे**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# संपादकीय

'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय' प्रकल्पातील हा तेरावा खंड. तो पत्रसंग्रह आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी सार्वजनिक चरित्र होते. जगभराच्या विविध व्यक्ती, संस्था, संघटना, आस्थापना, उपक्रम इत्यादींशी त्यांचा निकटचा संबंध, संपर्क होता, तसा पत्रव्यवहारही. महाराष्ट्रीय संस्कृतीत जतन साक्षरतेचा अभाव असल्याने यापैकी एक दशांशही हाती आला नाही. आपल्या समाजात पत्रे, छायाचित्रे, दृक्-श्राव्य साधने इ. द्वारे व्यक्ती, व्यवस्था नि काळाच्या स्मृती जपण्याचा संस्कार नाही व त्याचे संवर्धन करण्याचे भान आपल्या शिक्षणाने दिले नाही. रद्दी, कागदपत्रे, छायाचित्रे, चित्र व ध्वनिफिती, दृक्-श्राव्य साधने, पुरातन वस्तू, व्यवस्था आपणास अडगळ वाटणे यातूनच आपण प्रगल्भ, सजग नागरिक नसल्याचे स्पष्ट होते. अडगळ हा संस्कृतीचा समृद्ध आणि अनमोल ठेवा आहे, तो जपला पाहिजे. त्याचे शतक, सहस्रक उलटले तरी प्राणपणाने जतन केले पाहिजे, अशी भावना आपल्या समाजात ज्या दिवशी रुजेल त्या दिवशी आपण सुशिक्षित, सुबुद्ध, सुसंस्कृत समाजाचे सुजाण नागरीक झालो असे होईल.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जीवनकाळ २७ जानेवारी, १९०१ ते २७ मे, १९९४ असा सुमारे त्र्याण्णव वर्षांचा आहे. त्या अर्थाने ते विसाव्या शतकाचे साक्षीदार व शिलेदार होते. या काळात त्यांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळ, धर्मसुधारणा आंदोलन, धर्म व तत्त्वज्ञान परिषद, चर्चासत्रे, रॉयवादी विचारधारा, राष्ट्रीय काँग्रेस, प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई, 'नवभारत' मासिक, 'धर्मकोश मंडळ', 'मीमांसाकोश', महात्मा गांधीप्रणीत अस्पृश्यता निवारण कार्य, आंतरजातीय विवाह विचार व व्यवहार, अस्पृश्यांना मंदिर प्रवेशार्थ मंदिर प्राणप्रतिष्ठा (सोमनाथ मंदिर, गुजरात), संयुक्त महाराष्ट्र आंदोलन, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई (महाराष्ट्र शासन अंगीकृत), मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई;

सेंटर फॉर द स्टडी ऑफ सोशल चेंज, वांद्रे (बांद्रा) पूर्व, मुंबई (मानवेंद्रनाथ रॉय केंद्र), विविध नियतकालिके नि वृत्तपत्रे, इंडियन रॅडिकल ह्युमॅनिस्ट असोसिएशन, माटुंगा, मुंबई, जनता शिक्षण संस्था, वाई (किसनवीर महाविद्यालय, वाई) लोकहितवादी मंडळ, नाशिक, विविध शिक्षण संस्था, व्याख्यानमाला इ. शी त्यांचा शतकभरच्या कालावधीचा पत्रव्यवहार लक्षात घेता तर्कतीर्थांच्या केवळ पत्रव्यवहाराचे 'The Collected Works of Mahatma Gandhi' सारखे शंभर खंड व्हायला हवे होते; पण आपल्या अज्ञान, अनास्था, दुर्लक्ष इ. पोटी आपल्या पूर्वसुरींनी व तर्कतीर्थांच्या उपरोक्त वारसदार व्यक्ती, व्यवस्था, संस्था, संघटनांच्या तत्कालीन पदाधिकारी मंडळ, कार्यकारी मंडळाने दक्षता न घेतल्याने तो सर्व ठेवा, वारसा काळाच्या उदरात गडप झाला, गिळंकृत केला गेला याचे शल्य माझ्यासारख्या जतनप्रेमी संशोधकांच्या मनात कायमस्वरूपी सलत राहणार हे निश्चित, असो.

असे असले तरी प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई; महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई; सेंटर फॉर दि स्टडी ऑफ सोशल चेंज, वांद्रे, मुंबई; यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्याकडून जो अपवाद पत्रव्यवहार हाती आला, तो म्हणजे हा पत्रसंग्रह. विशेषतः यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे अध्यक्ष मान. शरद पवार, मान. शरद काळे, मान. डॉ. रमेश पोतदार (अध्यक्ष, सेंटर फॉर दि स्टडी ऑफ सोशल चेंज, वांद्रे, मुंबई), अनिल जोशी, कार्यवाह, प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई आणि संजय कृष्णा पाटील, तत्कालीन प्रभारी सचिव महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई यांचा मी शतशः ऋणी आहे. केवळ नि केवळ या व्यक्तींच्या उदारमना सहकार्यामुळेच हा खंड साकारला, हे नमूद करण्यास मला अभिमान नि आनंद वाटतो.

२७ मे, २०२२ **- डॉ. सुनीलकुमार लवटे**
तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी संपादक
२८ वा स्मृतिदिन.

# अनुक्रमणिका


● प्रस्तावना : **पत्रप्रतिबिंत तर्कतीर्थ** **अकरा**

**१) सन्मानपत्रे** **१-२०**

१) पद्मविभूषण

२) साहित्य अकादमी महदत्तर सदस्यत्व (फेलोशिप)

३) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

४) श्री दीपलक्ष्मी मासिक अनावृत्त मानपत्र

५) श्री देवदेवेश्वर संस्थान, पुणे

**२) मानपत्र** **२१-२२**

मान. भवानराव श्रीनिवासराव उर्फ बाळासाहेब पंडित पंत प्रतिनिधी, संस्थानाधिपती, औंध यांच्या रौप्य महोत्सवी कारकिर्दीप्रीत्यर्थ प्रदान तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित संस्कृत मानपत्र

**३) विविध मान्यवरांची स्वहस्ताक्षरातील पत्रे** **२३-३६**

१) महात्मा गांधी २) साहित्य सम्राट न. चिं. केळकर.

३) श्री. शंकरराव देव ४) प्रा. मे. पुं. रेगे ५) साहित्यिक पु. ल. देशपांडे

६) कुलगुरु देवदत्त दाभोळकर ७) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

८) मा. बाबा आढाव

**४) प्राज्ञपाठशाळा पत्रव्यवहार** **३७-४०**

**५) 'धर्मकोश' पत्रव्यवहार** **४१-४८**

**६) 'नवभारत' पत्रव्यवहार** **४९-६६**

**७) पत्राद्वारे तर्कतीर्थ - साहित्यसमीक्षा व चर्चा** **६७-८४**

**८) अनावृत पत्र : भाई माधवराव बागल** ८५-९०

**९) महात्मा गांधीप्रणीत अस्पृश्यता निर्मूलन निवेदन - पत्र** ९१-९३

**१०) महात्मा गांधी-पुत्र देवदास आणि चक्रवर्ती राजगोपालाची कन्या लक्ष्मी आंतरजातीय विवाहसंबंधी महात्मा गांधी - पत्रे** ९४-१०२

**११) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई : पत्रव्यवहार** १०३-११८

**१२) महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई :** ११९-२४२

१) पत्रव्यवहार २) लेख-प्रतिलेख ३) विविध मान्यवरांशी पत्रव्यवहार

**१३) मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई : पत्रव्यवहार** २४३-२५०

**१४) किसन वीर महाविद्यालय, वाई : पत्रव्यवहार** २५१-२५६

**१५) नामदार यशवंतराव चव्हाण पत्रव्यवहार** २५७-३३६

**१६) विविध मान्यवरांशी पत्रव्यवहार** ३३७-३६२

१) प्रकाशक रा. ज. देशमुख २) साहित्यिक पु.ल. देशपांडे
३) नामदार वसंतदादा पाटील ४) समाजसेवक पन्नालाल सुराणा
५) अभ्यासक रत्नाकर गणवीर ६) नामदार बाळासाहेब देसाई
७) प्राचार्य राम शेवाळकर ८) समाजसेवक बाबा आमटे तथा साधनाताई आमटे ९) चरित्रकोशकार श्रीराम कामत १०) डॉ. हरिकृष्ण मोहनी
११) सौ. सुनीता देशपांडे

**१७) संकीर्ण पत्रव्यवहार** ३६३-३८०

**१८) कौटुंबिक पत्रव्यवहार** ३८१-३८८

**१९) तर्कतीर्थ निधन : श्रद्धांजली पत्रे** ३८९-४०६

● **समारोप** ४०७-४१२

● **परिशिष्टे** ४१३-४३५

१) ऋणनिर्देश
२) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी परिचय
३) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी साहित्य संपदा व संदर्भग्रंथसूची
४) संपादक परिचय

# प्रस्तावना
# पत्रप्रतिबिंबित तर्कतीर्थ

मनुष्य हा वृत्तीने संवादीच राहिला आहे. त्याची समाजशीलता त्याच्या समूह जीवनाची परिणती होय. जेव्हा त्याच्याकडे भाषेसारखे संपर्क, संवाद नि संप्रेषणाचे साधन नव्हते, तेव्हाही तो हावभाव, हातवारे, खाणाखुणांद्वारे आपल्याला जे दुसऱ्याला सांगायचे आहे, ते तो व्यक्त करत होताच. भाषा आली तेव्हा देहबोलीऐवजी बोलीच त्याची संवाद साधन नि माध्यम बनली. दूरवर संवाद पोहोचविण्यासाठी जासूद, घोडेस्वार, निरोपे इतिहास काळात आपणास भेटतात. वस्तू, खुणांच्या अदलाबदलीने होणारा संवाद व्यवहार पुढे निरोप, संदेश, सांगावा इ.द्वारे होऊ लागला. बोलीस भाषा रूप आले ते चित्र, संकेत, चिन्हे रेखाटण्याची कला माणसाने विकसित केल्यावरच. मग संदेश प्रेषण लिखित झालं ते खलिते, निरोप, करारपत्रे, हुंड्या वचननामे, तह इत्यादींमुळे. व्यक्तिगत जीवनातही चिन्हे, खुणांनी होणारा संवाद पत्र, प्रमाण, संदेशाने होऊ लागला.

भारताच्या प्राचीन इतिहासात त्याची प्रमाणे विविध माध्यमांतील लिखितात (कागदपत्रे, दस्त, खलिते, सनदा, सरनामे, शिलालेख, नाणी, मुद्रा इ.) आढळतात नि त्याद्वारे इतिहासावर प्रकाश पाडण्याचे कार्य इतिहासकार करत आले आहेत. पूर्वीच्या दरबारी व्यवहारात ही साधने म्हणजे संवादी पत्राचार नि देवाणघेवाणच होती, तशीच ती व्यक्तिगत जीवनात पाठवल्या जाणाऱ्या पत्र, चिठ्ठी, संदेश यातूनही औपचारिक, अनौपचारिक विचार, वार्ता, घटना, ख्यालीखुशालीद्वारे एकमेकांस कळत राहायची. पत्रव्यवहाराची यंत्रणा एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात सुरू झाली, ती ब्रिटिश व्यापार व राज्यकारभारातून; पण शिवकाल, मध्यकालात ही व्यवस्था पक्षी, प्राणी यांच्या साहाय्याने गतिमान झाल्याचे लक्षात येते. वीज, वाफ, तारा, यंत्रे, बिनतारी संदेश, टेलिफोन, रेडिओ लहरीतून संदेश वहन गतिमान झालं. आजच्या संगणक, आंतरजालीय प्रणालीत तर दूरपत्र (ई-मेल)

पाठवण्याच्या क्षणीच मिळत. या प्रणालीने काळ, काम, वेग, स्थळ या संकल्पनाच बदलून टाकल्या. तत्क्षणी संवाद प्रेषण ही आजची कमालच होय. व्हॉट्सॲप, फेसबुक, ब्लॉग, लघुसंवाद हे सारे आजचे पत्र व संदेशच होत. ट्वीट म्हणजे उच्चारायचा अवकाश की ऐकू येणं, वाचणं !

पत्र हा संवाद आहे, तसं साहित्य ही! प्रेमपत्र हे काव्य, नाटकापेक्षा कमी का रोमांचक असतं? ते असतं प्रेमकाव्यच, फक्त गद्यात लिहिलेलं! हृदयीच्या रमलखुणा रेखाटाव्यात पत्रांनीच! अनौपचारिक पत्रांना निबंध रूप येत गेलं नि पत्र साहित्यरूप झालं. साहित्यात पत्रसंग्रह इतका व्यापक अवकाश घेऊन अवतरतं की एकाच वेळी त्यात भाव, भावना, भाषा, लिपी, संस्कृती, समाज सर्व प्रतिबिंबित होतं. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे भाषण नि लेखसंग्रह प्रकाशित आहेत; पण पत्रसंग्रह नाही. पत्रात माणसाचं व्यक्तिमत्त्व, चरित्र, विचार, दृष्टिकोन असतो. तर्कतीर्थांच्या पत्रातही तो दिसतो. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी पत्रव्यवहार व्यक्तिगत आहे, तसाच तो सार्वजनिकही. तर्कतीर्थ यांचं जीवन संस्थात्मक, संघटनात्मक, सार्वजनिक असल्याने त्यांचा मोठा पत्रव्यवहार हा समाज, राजकारण, साहित्य, संस्कृती, भाषा इ. विषयांवर झाला आहे. प्रत्यक्षात मोठा पत्रव्यवहार झाला असतानाही हाती अपवाद पत्रे येणे हे आपल्या जनत निरक्षरतेची जशी खूण आहे, तशी ती व्यक्तीबद्दलच्या प्रासंगिक आदर-आस्थेचीही. आपण काळ हा पत्र, वस्तू, छायाचित्रे, ध्वनिमुद्रणे, चित्रफिती इ. रूपात जपत नसल्याने तो पकडून ठेवू शकत नाही, जतन आणि संरक्षण तर फार दूरची गोष्ट होय.

तर्कतीर्थांची जी पत्रसाधने हाती आली त्यातून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे मनुष्यसंग्रही गृहस्थ होते हे लक्षात येते. पत्रव्यवहारातून व्यक्त होणारं त्यांचं जीवनविश्व सार्वजनिक अधिक होतं हे स्पष्ट होतं. त्यांचा राजकारण, समाजकारण, साहित्य, संस्कृती क्षेत्रातील थोरामोठ्यांशी संबंध होता. त्यामुळे त्यांचा पत्रव्यवहार महात्मा गांधी, मानवेंद्रनाथ रॉय, द्वा. भ. कर्णिक, साहित्यसम्राट न. चिं. केळकर, बाबा आमटे, यशवंतराव चव्हाण, इंदिरा गांधी, पु. ल. देशपांडे यांच्यासह विविध संपादक, मंत्री, सचिव, संस्था- संघटनांचे पदाधिकारी यांच्याशी होता, तितकाच जनसामान्य, कार्यकर्ते, मित्र, स्नेही, परिवारजनांशीही होता. जो पत्रव्यवहार हाती आला, तो हिमनगाचे दर्शनी टोक होय. त्याच्या आधारे आज शितावरून भाताची परीक्षा करता येणेच शक्य आहे. त्यांची पत्रे दीर्घ, संक्षिप्त असतात; पण मुद्देसूद असत, हे ती वाचताना जाणवेल.

साहित्यात पत्र नि कविता यांचं नातं भावा-बहिणींचं आहे. दोन्हीची निर्मिती व्यक्त होण्याच्या अनिवार ओढीतून होते. पत्रलेखन अन्य साहित्य प्रकारांप्रमाणे अगोदर मौखिक आणि नंतर लिखित असा त्याचा रूपव्यवहार आहे. निरोप, म्हणणं, सांगणं, गाऱ्हाणं, प्रार्थना ही आरंभीची पत्ररूपंच होत. मग लिखिताच्या म्हणजे लिपीच्या निर्मितीनंतर त्याला पत्र, खलिता, करार, सनद, इनाम असं रूप आलं. इसवी सन पूर्व ५०० वर्षांपासून पत्रपरंपरा

आढळते. लिखित पत्राचं रूपांतर टंकित पत्रात होणं ही यंत्रयुगाची किमया. लेखन सार्वत्रिक होण्याच्या काळात पत्रे हस्तलिखित असत. फार कमी लोक पत्रं लिहितात. म्हणजे एक तृतीयांशच. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात पत्र सर्रास हस्तलिखित असत. व्यक्तिगत पत्रांना सार्वजनिक रूप आलं ते दरबार काळात. राज्य कारभार, व्यापार, देवाणघेवाण, खरेदी-विक्री इ.ने लिखित पत्रव्यवहार वाढला. साम्राज्यशाहीत त्याला राज्यव्यवहाराचं रूप आलं.

आज पत्रांचे अनेक प्रकार दिसतात - पत्रे, प्रेमपत्रे, इसारा पत्रे, खरेदी पत्र, शासकीय पत्र, आदेश पत्र, निवेदन पत्र, प्रशस्ती पत्र, मानपत्र, गौरव पत्र, पदवीपत्र, दानपत्र, बक्षीस पत्र, निषेध पत्र, वार्तापत्र, श्रद्धांजली पत्र, इ. पत्रांचा मूळ उगम वैयक्तिक. ती पत्रं अनौपचारिक, हृद्य, जिव्हाळ्याने भरलेली असायची. पत्रव्यवहाराचा पायाच मुळी होता आत्मीयता, अंतरंग संबंध, प्रेम, आपुलकी इ. नी जशी सार्वजनिक होत गेली, तशी औपचारिक झाली. इतिहास, राज्यशास्त्र, साहित्यशास्त्र, अशा विकास काळात म्हणजे अव्वल इंग्रजी काळात पत्रे साहित्याचा भाग बनली नि ऐतिहासिक साधने म्हणून पत्रांचे महत्त्व अधोरेखित झाले. पत्र व्यक्ती, व्यवस्था, काळ प्रतिबिंबित असतात, म्हणून कालौघात त्यांना ऐतिहासिक, सांस्कृतिक महत्त्व प्राप्त होतं. खासगी पत्रेही त्यातील आत्माविष्कार, काव्यसौंदर्य घटना-प्रसंग वर्णन, मनाची उलघाल इ.मुळे सार्वजनिक महत्त्वाची होऊन जातात. अशी पत्रे संग्रहित करून प्रकाशित करण्याची परंपरा मध्यकाळापासून दिसते. गद्यपूर्व काळातही पत्र होतं. ज्ञानेश्वराला चांगदेवाने लिहिलेलं पत्र कोरं होतं. मुक्ताबाईंनी चांगदेवाला 'कोरा' म्हटलं होत. त्या कोऱ्या कागदावरच 'चांगदेवपासष्टी' लिहिली गेली. हिंदी कवी तुलसीदासांची 'विनयपत्रिका' म्हणजे काव्यात्मक दीर्घपत्रच ! साहित्य आणि इतिहासाच्या पूर्वरूप रूपावर प्रकाश टाकतात पत्रेच.

पत्रलेखन हे पत्रलेखकाचे आत्मनिवेदन असते, तसे ते आत्मकथन, आत्मचरित्राचा एखादा संक्षिप्तांशही ! खासगी, सार्वजनिक, काल्पनिक अशी अनेक प्रकारची पत्रे आपणास पाहावयास मिळतात. पत्राद्वारे आत्मचरित्र, प्रवासवर्णने लिहिल्याचे दिसते. सेंट इमर्सनची पत्रे पाच खंडांत आहेत. त्यांची पृष्ठे ३२,००० च्या घरात आहेत. आपल्याकडे महात्मा गांधींचा पत्रव्यवहार 'The Collected Works of Mahatma Gandhi' शंभर खंडांत आहे. पृष्ठ संख्या ५०,००० च्या घरात सांगितली जाते. त्यांच्या संपादनासच ३८ वर्षे लागली होती. मराठी साहित्यातील अलीकडचे दीर्घ वा बृहत् पत्रसंग्रह म्हणजे 'विश्रब्ध शारदा' (खंड १ व २) आणि जी. ए. कुलकर्णींच्या पत्रांचे मूळ चार खंड (जी.एं.ची निवडक पत्रे) शिवाय ग्रेस नि सुनीताबाई देशपांडेचे दोन पत्र संग्रह - 'जी.एं. ची पत्रवेळा' आणि 'प्रिय जी. ए.' होय. अव्वल इंग्रजी काळात लोकहितवादींनी 'प्रभाकर' पत्रात लिहिलेली 'शतपत्रे', साने गुरुजींची 'सुंदरपत्रे' पंडित नेहरूंची 'इंदिरेस पत्रे', 'निवडक पत्रे' - नरहर कुरुंदकर, 'दीपगृह' - वि. स. खांडेकर, 'प्रकाशन-प्रतिभा' - ह. वि. मोटे, 'टॉलस्टॉय यांच्या पत्रसंवाद' - ग. प्र.

प्रधान, 'रिल्केची दहा पत्रे' - अनिल कुसुरकर 'लेटर्स टू अ यं सायन्टिस्टस्' - डॉ. एडवर्ड विल्सन, 'अमृताची प्रेमपत्रे-अमृताप्रीती शिवाय' 'विश्व प्रसिद्ध व्यक्तींची प्रेमपत्रे' आहेतच.

या पार्श्वभूमीवर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी पत्रसंग्रहाचा विचार करता ते विविधरूपी दिसते. त्याचा पाया सार्वजनिक, राजकीय, सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक कार्य हाच दिसतो. पत्रे वैयक्तिक असली तरी त्यांचे विषय सार्वजनिक हित हेच दिसते. यातील कौटुंबिक पत्रांचा अपवाद वगळता शेष पत्रे ही व्यापक समाजहितार्थ लिहिलेली दिसतात. त्यात अधिकतर कोश कार्य, साहित्य कार्यास वाहिलेली आहेत. त्यातून तर्कतीर्थ एक प्रगल्भ ज्ञान समाज निर्मू पाहतात. ही धडपड मराठी लेखन व्यवहार शिस्तीचा नि शास्त्रोक्त करण्याची तळमळ अनुकरणीय ठरते. आपण शिक्षित झालो खरे; पण प्रगल्भ झालो का ? त्याची कसोटी जर बुद्धिवाद, विवेकवाद, जडवाद, आनंदवाद, समाजवाद असेल तर आपण कुठे उभे आहोत? परंपरागततेतून मुक्ती हीच जर आपल्या प्रागतिकतेची कसोटी ठरणार असेल तर मग ही पत्रे त्यासाठीचा मार्गदर्शक ऐवज, दस्तावेज म्हणून पुढे येतात.

## १) सन्मानपत्रे

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपल्या जीवनात साहित्य, संस्कृती, भाषा, कोशवाङ्मय , प्राच्यविद्या इ. क्षेत्रात अपूर्व असे कार्य केले. निरलस नि निरपेक्ष वृत्तीने केलेल्या त्यांच्या या समाजहितवर्धक कार्याची नोंद घेऊन राष्ट्र, राज्य, समाज, संस्था यांनी त्यांना वेळोवेळी सन्मानपदे, गौरवपदे, पुरस्कार, सन्मानपत्रे, मानद पदव्या इ.ने सन्मानित केले. ती सर्वच उपलब्ध झाली असे नाही; पण जे हाती लागले तेही अपूर्व, अमूल्य होय.

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना मिळालेले पुरस्कार / सन्मान**

- अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन : अध्यक्षपद (१९५४);
- अमेरिकन सरकारचे पाहुणे म्हणून निमंत्रण (१९६४);
- विश्वधर्म संमेलनासाठी सोव्हिएत रशियात उपस्थिती (१९६९);
- राष्ट्रीय संस्कृत पंडित पुरस्कार (१९७३);
- मुंबई विद्यापीठाची एल.एल.डी. पदवी (१९७५);
- पद्मभूषण (१९७६);
- राष्ट्रभाषा प्रचार समिती, पुणे : कार्यकारी अध्यक्षपद;
- प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई : अध्यक्षपद (१९५५-१९९४);
- वैदिक संशोधन मंडळ, पुणे : अध्यक्षपद;
- भांडारकर इन्स्टिट्यूट, पुणे : अध्यक्षपद;
- महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई : अध्यक्षपद;
- महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई : अध्यक्षपद;
- राष्ट्रीय संस्कृत संस्थान (भारत सरकार) : सदस्यत्व;

- फाय फौंडेशनचा 'राष्ट्रभूषण' पुरस्कार (इचलकरंजी, १९८९);
- साहित्य अकादमी फेलोशिप (१९८९);
- संस्कृतमध्ये केलेल्या कार्याबद्दल राजस्थान सरकार व आय.सी.पी.आर., दिल्ली यांच्यातर्फे सन्मान (जयपूर, १९९०);
- महाराष्ट्र शासनाचा 'महाराष्ट्र गौरव' सन्मान (१९९०);
- रामशास्त्री प्रभुणे सामाजिक न्याय प्रथम पुरस्कार;
- रशिया साहित्य सोसायटी फेलोशिप (१९९१);
- छत्रपती शाहू पुरस्कार (कोल्हापूर, १९९२);
- सातारा भूषण पुरस्कार (सातारा, १९९२);
- पद्मविभूषण (१९९२).

या पैकी उपलब्ध गौरवपत्रे, सन्मानपत्रे, या खंडात संग्रहित असून ती या खंडाचे संदर्भ मूल्य वाढवणारी आहेत. पद्मविभूषण, साहित्य अकादमी महदत्तर सदस्यत्व (फेलोशिप), श्री. दीपलक्ष्मी मासिक अनावृत्त मानपत्र (षष्ठ्यब्दिपूर्ती), श्री. देवदेवेश्वर संस्थान, कोथरूड, पुणे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मानपत्र यांचा यात समावेश आहे.

## २) विविध मान्यवरांची स्वहस्ताक्षरातील पत्रे

एखादं पत्र स्वहस्ताक्षरात असणं, मिळणं त्याची रंगतच काही औरच ! त्यात आत्मीयता असते नि सौहार्दही. कितीतरी मोठी माणसं सर्रास टंकलिखित पत्र पाठवत असतात. पण त्यांना एखादं पत्र स्वहस्ताक्षरात पाठवावं असं वाटणं यात आपलेपणाचा ओलावा व्यक्त करण्याची भावना असते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनीही अनेक पत्रे टंकित करून पाठवली; पण विशेष प्रसंगी स्वहस्ताक्षरात. तीच गोष्ट त्यांना आलेल्या पत्रांचीपण. अनेक पत्रे टंकित आली पण काही स्वहस्ताक्षरात. 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय' प्रकल्पाच्या या १३ व्या खंडात अनेक स्वरूपांच्या पत्रांचा संग्रह आहे. त्यात केलेल्या वर्गवारीत स्वहस्ताक्षरात लिहिलेल्या पत्रांचा विशेष विभाग करून ती इथे प्रस्तुत करण्यात आली आहेत. त्यात स्वतः तर्कतीर्थांच्या हस्ताक्षरातील पत्राशिवाय महात्मा गांधी, न. चिं. केळकर, शंकरराव देव, डॉ. हरिकृष्ण मोहनी, प्रा. मे. पुं. रेगे, पु. ल. देशपांडे, सौ. सुनीता देशपांडे, द्वा. भ. कर्णिक, भा. रा. भागवत, सुहास बहूळकर, प्रा. संभाजी कदम, प्राचार्य देवदत्त दाभोळकर यांची पत्रे समाविष्ट आहेत.

स्वहस्ताक्षरित पत्रे माणसाचे आपलेपण घेऊन येतात, तसेच लिहिणाऱ्याच्या व्यक्तिमत्त्वाचे सर्वस्व त्यात प्रतिबिंबित असते. त्यात विचारांपेक्षा भाव-भावनांचा पाझर मोठा असतो. अशा पत्रात नात्यातील निकटता भरलेली असते. अशी पत्रे छोटी असो वा मोठी स्वहस्ताक्षरित म्हणून ती अपवाद ठरतात नि कालौघात त्यांना ऐतिहासिक वारशाचे मोठेपण प्राप्त होते. स्वहस्ताक्षरातील ही पत्रे वरवर औपचारिक वाटली तरी ती

महत्त्वाची आहेत. तर्कतीर्थांना महात्मा गांधी भेटायला बोलवतात; पण ते महात्मा गांधींच्या जीवनातील धर्मसंकट प्रश्नी. न. चिं. केळकर पत्राद्वारे पुस्तक परीक्षण करतात; पण त्यातून पुस्तक ऐतिहासिक बनतं. पु. लं. मराठी विश्वकोश नोंदीसंदर्भात पत्र लिहितात; पण ती नोंद असाधारण असते. कुलगुरू देवदत्त दाभोळकरांचं पत्र शोक प्रस्ताव आहे; पण त्यात सार्वजनिक सद्भाव भरलेला आहे. असे यातील प्रत्येक पत्रांचं आगळंपण हेच त्याचे ऐतिहासिकपण ठरते.

### ३) प्राज्ञपाठशाळा मंडळ पत्रव्यवहार

सन १९१४ साली तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी वयाच्या १३ व्या वर्षी एक विद्यार्थी म्हणून नारायणशास्त्री मराठे यांच्याकडे वेद-वेदान्त अध्ययन करून संस्कृत पंडित होण्याच्या इराद्याने प्राज्ञपाठशाळेत बटू म्हणून दाखल झाले. सन १९२० च्या दरम्यान ते न्यायवेदांताच्या अध्ययनार्थ काशीस गेले. सन १९२३ ला ते 'तर्कतीर्थ' पदवी कलकत्त्याच्या शासकीय संस्कृत महाविद्यालयातून (आता संस्कृत विद्यापीठ.) संपादून परत आले व प्राज्ञपाठशाळेत शिक्षक व नारायणशास्त्री मराठे या आपल्या गुरूंचे सहकारी म्हणून सक्रिय झाले. सन १९२३ ते १९३० हा तर्कतीर्थांचा काळ धर्म व पंडित सभा, परिषदातील धर्मसुधारणांसंबंधी वादविवादांचा राहिला. याच काळात प्राज्ञपाठशाळेत सुरू झालेल्या माध्यमिक शाळेसंदर्भात शिक्षक व चालकात मतभेद होऊन नारायणशास्त्री मराठे यांनी राजीनामा देऊन संन्यास घेणे पसंत केले. (१९३१) त्यांनी आतुर संन्यास धारण करून ते स्वामी केवलानंद सरस्वती बनले. या काळात स्वामी केवलानंद सरस्वती, प्राज्ञपाठशाळा मंडळ, शाळेतील शिक्षक, संचालक, विद्यार्थी यांचे एकमेकांशी पत्रव्यवहार, वैचारिक देवाणघेवाण झाल्याचे उल्लेख, विविध लेख, ग्रंथ, भाषणे, आत्मकथा, दैनंदिनी, पत्रे यातून सापडतात. यात प्रत्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची पत्रे हाती आली नसली तरी समकालीनांच्या लेखनातील संदर्भांवरून त्यातील एक पक्षकार तर्कतीर्थ आहेत, हे स्पष्ट होते. उदाहरणार्थ स्वामी केवलानंद सरस्वती यांनी दिलेला प्राज्ञपाठशाळा मंडळाचा राजीनामा नि त्यानंतर त्या मंडळाची सर्व सूत्रे तर्कतीर्थांच्या हाती येणे. (काही लोकांचे म्हणणे ती सूत्रे तर्कतीर्थांनी घेतली असे आहे.)

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री आणि स्वामी केवलानंद सरस्वती यांच्यात मतभेद झाले असले तरी दोघांच्या वाटा वेगळ्या झाल्या नाहीत. याचे कारण गुरूची उदारवृत्ती व शिष्याची प्रज्ञा व प्रतिभा ! माझे स्नेही व सन्मित्र वि. प्र. दिवाणांनी लिहिलेलं 'स्वामी केवलानंद सरस्वती'[१] नामक जे चरित्र आहे, ते छोटेखानी असलं तरी ते बृहदचरित्राची बीजे व संदर्भ यांनी भरलेले आहे. त्यात स्वामी केवलानंद सरस्वतींचं एक बोलकं पत्र[२] आहे. ते या संग्राहात आहे. त्यातून 'धर्मकोश' (२५ खंड) कार्य भविष्यात का विकसित होऊ शकले, 'मीमांसाकोश' (७ खंड) का पूर्ण झाला, हे स्पष्ट होते.

नारायणशास्त्रींनी १९०४ साली देशकालास अनुरूप विचार करणारे, व्यवहार तज्ज्ञशास्त्री आणि धर्मोपदेशक तयार करण्याकरता 'प्राज्ञमठ' सुरू केला. पुढे नारायणशास्त्रींच्या नेतृत्वाखाली पं. दिनकरशास्त्री कानडे, पं. महादेवशास्त्री दिवेकर, सोहनीशास्त्री व नेनेशास्त्री इत्यादी मंडळींनी ६ ऑक्टोबर, १९१६ ला विजयादशमीच्या दिवशी 'प्राज्ञमठा'चे रूपांतर 'प्राज्ञपाठशाळा' या शिक्षण संस्थेत केले व २१ जुलै, १९२० साली 'प्राज्ञपाठशाळा मंडळ' म्हणून संस्था रजि. करून त्यातर्फे 'प्राज्ञपाठशाळे'चे कार्य सुरू झाले.

माध्यमिक शिक्षणाची शाखा बंद करावी, ही शाखा संस्थांच्या मुख्य ध्येयाला म्हणजे उच्च संस्कृत शिक्षणाला बाधक ठरत आहे आणि ती शाखा राष्ट्रीय शिक्षण या दृष्टीने यशस्वी होत नसून इंग्रजांनी चालविलेल्या शाळांप्रमाणे बनते आहे, म्हणून हा व्यर्थ खटाटोप बंद केला पाहिजे, असे नारायणशास्त्रींचे मत बनत चालले होते.

शाळेचे नित्याचे कामकाज चालू होते; पण स्थिरसेवकांशी नारायणशास्त्रींचे जमत नव्हते. ऑक्टोबरच्या आरंभी त्यांनी परिस्थितीचे मूल्यमापन पुढीलप्रमाणे केले आहे -

"१. नित्य स्थिरसेवकांशी भांडण, २. अध्यापनाचे काम स्वत: करावयास वेळ नाही, ३. कोणीही, एकही सहाय्यक नाही, ४. भांडत बसणे आपल्या शीलास अनुसरुन नाही, ५. शक्ती, वय भांडण्याचे नाही, ६. यशाचे दृष्टीने ३-४ वर्षे उत्साहजन नाहीत, ७. यापुढील वय गुंतण्याचे नाही. सुटण्याचे आहे, म्हणून आपण शास्त्रवर्ग सर्वस्वी अंगीकारून चालवण्यास कबूल नाही. राजीनामा कायम करावयाचा असे मनाने ठरले आहे."

पुढे काही दिवसांनी नारायणशास्त्रींनी पुनश्च लिहून ठेवले आहे -

"प्राज्ञपाठशाळेच्या भानगडीत पडू नये हेच ठरवले, फार उद्वेग होतो; पण काय इलाज? यात माझीच चूक म्हटली पाहिजे. एकमुखी होते ते सोडून बहुमुखी संस्था काढली ही पहिली चूक. रजिस्टर करून मंडळ तयार केले ही दुसरी चूक. घोटाळा होऊ लागला तरी स्थिरसेवक करून घेतले ही तिसरी चूक. हे सगळे झाले तरी १० वर्षांपुढे अध्यक्ष राहिलो ही चौथी चूक. मंडळींच्या स्वभावाचा अनुभव असून तो योग्य वेळी विसरलो ही आणखी एक चूक. सगळया चुकाच चुका. मला वाटते जग हे चुका करण्याचा कारखानाच आहे. चुका करून, अनुभव घेऊन शहाणे व्हावे अशी ईश्वरेच्छा दिसते. पण आम्हाला चुका करीतच बसावेसे वाटते. शहाणपणा येतच नाही. इतरांच्या संबंधाने बोलताना शहाणपणाचा थोडासा डौल मिरवता येतो पण त्यातच चुकाही असतात."

श्री. वि. प्र. दिवाणलिखित 'स्वामी केवलानंद सरस्वती' चरित्रातील वरील नोंदी[३] लक्षात घेतल्या की स्वामी केवलानंद सरस्वतींचे संदर्भित बोलके पत्र स्वयंस्पष्ट होते.

प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाईच्या जबाबदारीतून मुक्त होताच नारायणशास्त्री मराठे आपले स्नेही बाबा आठल्ये यांच्याकडे टेंबू (ता. कऱ्हाड, जि. सातारा) येथे गेले. तिथे त्यांनी संन्यास ग्रहण करून (२३ ऑक्टोबर, १९३१) स्वामी केवलानंद सरस्वती नाव धारण

केले. श्वेत वस्त्रे त्यागून त्यांनी भगवी वस्त्रे परिधान केली. दोन-तीन महिने टेंबूस राहिल्यावर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री प्राज्ञपाठशाळा मंडळाच्या दोन-तीन सहकार्यांस भेटले. त्यांना वाईस परतण्याची विनंती केली. माध्यमिक विभाग बंद करण्याच्या व उर्वरित आयुष्य 'धर्मकोश', 'मीमांसाकोश' परिपूर्तीसाठी समर्पित करण्याच्या अटीवर ते वाईस परतले. दरम्यानच्या काळात ऑक्टोबर, १९३१ ते जून, १९३४ पर्यंत त्यांनी भ्रमंती केली. वाई सोडल्यावर त्यांनी २१ नोव्हेंबर, १९३१ रोजी 'प्राज्ञपाठशाळा का सोडावी लागली?'[४] शीर्षक लेख लिहिला. तो 'केसरी' च्या १९ डिसेंबर, १९३१ च्या अंकात प्रसिद्ध झाला आहे. त्यात त्यांनी लिहिले आहे की,

"संन्यासाश्रमानंतर मी टेंबू (पो. ओगलेवाडी) येथे आहे. चौकशी करणाऱ्यांना एकच उत्तर देतो आहे. शके १८२२-२३ (सन १९००-१९०१) मध्ये मी अध्यापनास आरंभ केला. शके १८३४ (सन १९१२) पर्यंत माझे स्वत:चे अध्ययनही चालू होते. नंतर मात्र केवळ अध्यापन चालू होते. शके १८२६ (सन १९०४) मध्ये आश्विन महिन्यात प्रज्ञानंदस्वामी समाधिस्थ झाले. शके १८२७ (सन १९०५) पासून मी भाटे-रिसबुडांनी बांधलेल्या मारुती मंदिरावर राहू लागलो. त्याकाळी शंभूकाका करंदीकरांच्या मठात विद्यार्थी राहू लागले. गुरूवर्यांच्या स्मरणार्थ प्राज्ञमठ हे नाव शाळेस देण्यात आले. संस्था रीतसर शके १८३८ (सन १९१६) मध्ये नोंदवली गेली व तेव्हापासून संस्थेस प्राज्ञपाठशाळा नाव देण्यात आले. त्यावेळी कानडेशास्त्री, भालचंद्रशास्त्री नेने इ. मंडळी स्थापनेच्या विचारात बरोबर होती. बहुश्रुत शास्त्रसंरक्षक व धर्मोपदेशक तयार करावयाचे हे मुख्य ध्येय असल्याने इंग्रजी, इतिहास इ. विषयही शिकवू लागलो. त्यासाठी श्री. सोहोनी, कानडे, मराठे हे शिक्षक होते. दिवेकरशास्त्री प्रचारक होते.

"बहुश्रुतपणाचे तीन- साडेतीन वर्षांचे शिक्षण होते; पण संस्थेत दोन पक्ष होऊन माध्यमिक शिक्षणाचे वर्ग स्थिर होऊ लागले. यास माझा विरोध होता, तरी मी तुटेपर्यंत ताणले मात्र नाही. तोडायला हवे होते. अस्तु. शके १८५३ (सन १९३१) मध्ये मी त्यागपत्र दिले. दोन वर्षे ही गोष्ट मी बोलत होतो.

"धर्मकोशकार्य मात्र ५/६ वर्षे चालू आहे. रोज ९/१० तास हे मी करत आलो. माध्यमिक बंद केल्यास परत येण्याचे ठरवले आहे; पण मी धर्मकोशकार्य मात्र करेन असे तर्कतीर्थांना सांगितले आहे. मी ५४ वर्षांचा आहे. आजवर माझ्याकडून जनसेवा झाली नसल्याचे वाईट वाटते. आता संन्यास घेतला आहे; पण तो शास्त्रीय पद्धतीने घेतलेला नाही. आतुर पद्धतीने स्वीकारला आहे एवढेच."

टेंबू, कार्तिक १२ श. १८५३ **स्वामी केवलानंद सरस्वती**

(शनिवार, २१ नोव्हेंबर १९३१)

## ४) धर्मकोश पत्रव्यवहार

'स्वामी केवलानंद सरस्वती यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना घेऊन हिंदुधर्म सुधारणेचे प्रयत्न सन १९२० नंतरच्या काळात सुरू केले होते. तेव्हा त्यांच्या एक गोष्ट लक्षात आली की हिंदुधर्म नि संस्कृतीचा संगतवार इतिहास अद्याप लिहिला गेला नाही. त्याच्या परिपूर्तीसाठी म्हणून स्वामी केवलानंद सरस्वती यांनी सन १९२५ मध्ये 'धर्मकोश' निर्मितीचा संकल्प सोडला. त्यासाठी सन १९३४ ला 'धर्मकोश मंडळ' स्थापण्यात आले. 'धर्मकोश' या योजनेनुसार व्यवहार, वैदिक आध्यात्मविद्या, विवाहादि संस्कार, राजनीती, वर्णाश्रम धर्म, शुद्धी व श्राद्ध, प्रायश्चित, शांतिकर्म, पुराणागम धर्म, कालतत्त्व आणि मोक्ष अशा विषयांवर एकूण ११ कांडे विविध भागात प्रकाशित करण्याची योजना होती. त्यानुसार सन १९३७ ला 'व्यवहारकाण्ड'चा पहिला भाग प्रकाशित झाला. "गेल्या नव्वद वर्षांत पाच कांडांतील २६ भाग प्रकाशित झालेले आहेत. सहाव्या कांडातील एक भाग आणि उरलेल्या सहा कांडांतील २० भाग असे २१ भाग अद्याप प्रकाशित व्हायचे आहेत."[१५]

"धर्मामध्ये राजनीती, शासन, कायदा या सर्वांचा समावेश होत असल्यामुळे 'धर्मकोश' हा गेल्या तीन हजार वर्षांतील भारतातील जीवनविषयक चिंतनाचा ऐतिहासिक दस्तावेज आहे."[१६] या संस्कृततज्ज्ञ डॉ. सरोजा भाटे यांच्या म्हणण्यात तथ्य आहे. कारण या कोशाचे जे भाग आजवर प्रकाशित झाले आहेत, त्याची देशी-विदेशी वृत्तपत्रे, नियतकालिके, संशोधन पत्रिका, संशोधक, प्राच्यविद्या पंडित इ. नी दखल घेतली आहे.

'धर्मकोश'चा संकल्प जरी स्वामी केवलानंद सरस्वती यांनी सोडला असला तरी तो सिद्धीस नेला मात्र तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी. त्यामुळे सन १९८८ पर्यंत प्रकाशित भागांचे तर्कतीर्थच संपादक राहिले आहेत. या काळात गतीने खंड प्रकाशित झाले. मान. नामदार यशवंतराव चव्हाण, डॉ. जे. पी. नाईक, पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी, डॉ. करण सिंह यांना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी जी विविध पत्रे लिहिली त्यातून अनुदान, देणगी, प्रकाशन समारंभ, विविध समीक्षा प्रकाशने यातून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी घेतलेल्या कष्टांची काही एक प्रचीती येत राहते. 'धर्मकोश'च्या 'राजनितिकाण्डम'चे पहिले चार भाग प्रकाशित झाल्यावर ते वाचून अमेरिकन प्राच्यविद्या समीक्षक लुडविक स्ट्रेनबाच यांनी खंडाच्या भागांची समीक्षा 'जर्नल ऑफ दि अमेरिकन ओरिएंटल सोसायटी' मध्ये लिहून प्रकाशित केली होती. त्यात ते म्हणतात की, "This reviewer considers that the material on 'rajaniti', so far a available was used by the author / collectors in a methodical, sound and faultless manner; that the editor did not spare any pains to make of it an incomparable instrument of works for the students on 'rajaniti'; and that it is difficult to imagine any present day scholar who could work on any aspect of 'rajaniti' without

the reviewed fourth volume of the Dharmkosa."[17]

या पत्रसंग्रहात 'धर्मकोश'संबंधी तर्कतीर्थांची जी दोन पत्रे उपलब्ध झाली आहेत. त्यातून स्पष्ट होते की, आपल्या जीवन काळात संकल्पाप्रमाणे २६ खंड प्रकाशित व्हावेत अशी अपेक्षा त्यांना होती. हे पत्र मान. यशवंतराव चव्हाण यांना लिहिले असून त्यात थोर शिक्षणतज्ज्ञ डॉ. जे. पी. नाईक यांनी 'धर्मकोश' साठी 'फोर्ड फौंडेशन, अमेरिका'कडून साठ हजार डॉलर्सची देणगी मिळवून दिली असून मॅचिंग ग्रँट म्हणून ४०% रक्कम संस्थेस उभारायची आहे. त्याकामी भारत सरकारने साहाय्य करावे, अशी विनंती करणारे ते आहे. भारत सरकारचे तत्कालीन शिक्षणमंत्री डॉ. करण सिंह यांनाही या अनुषंगाने पाठवलेले इंग्रजी पत्र आहे. तसेच स्वामी केवलानंद सरस्वती जन्मशताब्दी समारंभास उपस्थित राहण्याचा आग्रहही त्या पत्रात आहे. हा पत्रव्यवहार पुढे पाठपुरावा करत चालू राहिल्याचे अन्य पत्रव्यवहारातून लक्षात येते. 'धर्मकोश'संबंधी अन्य पत्रव्यवहार यथाशक्य सर्व प्रयत्न, संपर्क करूनही अपेक्षित निधी उपलब्ध होऊ न शकल्याचे शल्य या संशोधक, संपादकास आहेच; पण त्यापेक्षा अधिक खंत आपल्या सामाजिक, शासकीय, शैक्षणिक, संस्थात जतन साक्षरता नसल्याची !

### ५) 'नवभारत' मासिक पत्रव्यवहार

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर एतद्देशीय विचारकांना अभिव्यक्त होण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या इराद्याने स्वातंत्र्य लढ्यातील सेनानी आणि तत्कालीन राष्ट्रीय काँग्रेसचे धुरीण शंकरराव देव यांच्या नेतृत्वाखाली ऑक्टोबर, १९४७ मध्ये 'नवभारत' मासिकाचा प्रारंभ झाला. नवभारताची उभारणी याचे लक्ष्य होते. आचार्य शं. द. जावडेकर, आचार्य स. ज. भागवत, हरी कृष्ण मोहनी, प्रो. वि. म. दांडेकर या नियतकालिकाचे प्रारंभिक सहकारी होते. मुद्रक, प्रकाशक चिं. य. मराठे होते. मासिकाची छपाई विश्वास प्रेस, २९१, शनिवार पेठ, पुणे इथे होत असे. "व्यक्तीचा विकास, समाजाची धारणा व उत्कर्ष यांचा समन्वय घालून जीवनातील जे सत्य, शिव व सुंदर त्यांचा साक्षात्कार करून घेण्याचा मार्ग कोणता ते दाखविण्याचा यथामती, यथाशक्ती प्रयत्न करणे हे 'नवभारत'चे नियोजित कार्य आहे. 'नवभारत' हे पवित्र कार्य 'सर्वेषाम् अविरोधेन' करीत राहील. सर्व सत्पुरुषांच्या शुभाशीर्वादाची कामना आहे. कर्मयज्ञ होईल तर तो मिळेल अशी श्रद्धा आहे." हे प्रारंभी स्पष्ट करण्यात आले होते.

सन १९४९ पासून 'सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुणे' 'नवभारत'चे प्रकाशन करू लागली. प्रारंभीपासूनच हे नियतकालिक आर्थिक ओढाताणीत प्रकाशित होत राहिले. सन १९५५-५६ हा काळ या नियतकालिकाचा अधिक आर्थिक ओढाताणीचा राहिला. चार वर्षे सतत प्रयत्न करूनही अवघे ५८८५ रुपये ३ आणे ६ पैसे इतकाच निधी जमू शकला. या निधी संकलन समितीचे अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशीच होते. त्यांनी डिसेंबर,

१९५४ पासून एकीकडे निधी संकलन व दुसरीकडे 'नवभारत' मासिकाचे प्रकाशन नियमित होईल असे पाहिले. सरतेशेवटी सन १९५७ मध्ये त्यांनी सदर मासिकाची जबाबदारी प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाईकडे घेतली. आजपर्यंत गेली ६५ वर्षे हे नियतकालिक अव्याहत प्रकाशित होत असून महाराष्ट्राच्या विचारविश्वात त्याची गणना 'समाजप्रबोधन पत्रिका' (१९५९), 'साप्ताहिक साधना'(१९४८) बरोबरीने केली जाते. 'नवभारत' मासिकाच्या स्थापना व प्रकाशनाचे चालू वर्ष (२०२२) हे 'अमृतमहोत्सवी वर्ष' आहे. गेल्या ६५ वर्षांतील पत्रव्यवहारातील निवडक पत्रे हाती आली असून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या संबंधातील पत्रेच या संग्रहात संग्रहित करण्यात आली आहेत.

या पत्रसंग्रहात अंतर्भूत पत्रे व कागदपत्रे यांचा अभ्यास करता लक्षात येते की, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा 'नवभारत' मासिकाशी स्थापनेपासूनचा संबंध होता. 'नवभारत' मासिकच्या मे, १९४८ च्या अंकात त्यांचा 'भारतीय तत्त्वज्ञान : उदय व विकास' शीर्षक लेख प्रकाशित झाला होता. तो या 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय' प्रकल्पातील खंड - ७, लेखसंग्रह (तात्त्विक व राजकीय) मध्ये समाविष्ट आहे. तेव्हापासून ते 'विज्ञान व संस्कृती' शीर्षक लेख प्रकाशनापर्यंत म्हणजे जानेवारी, १९९१ पर्यंत ते निरंतर 'नवभारत'मध्ये लिहीत राहिले. संपादकीय, श्रद्धांजली, लेख, परीक्षणे, पत्रे, मुलाखती, चरित्र, भाषांतर, असं विपुल व वैविध्यपूर्ण लेखन करून 'नवभारत' ची वैचारिक परंपरा जपली आणि वर्धिष्णू केली. 'नवभारत'चे अनेक विशेषांक योजले नि संपादन, प्रकाशनास साहाय्य केले. प्रा. गोवर्धन पारीख, प्रा. मे. पुं. रेगे हे त्यांच्या विश्वस्त व अध्यक्षीय कारकिर्दीतील समर्थ संपादक. महाराष्ट्रातील विचारवंताचा लेख 'नवभारत'मध्ये नाही असे झाले नाही. विचारवंतांची भक्कम फौज/'नवभारत' मागे उभे असणे हे या संचालक, संपादक मंडळाचे कौशल्य व कर्तृत्व होय.

स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबईनी आर्थिक अनुदान सातत्य चढत्या भाजणीने ठेवून 'नवभारत'चे प्रकाशन सातत्य जपले, जोपासले. न्यायमूर्ती वि.म. तारकुंडे, संपादक द्वा.भ. कर्णिक, श्री. शं. नवरे, प्रा. मे. पुं. रेगे, प्रा. गोवर्धन पारीख, प्रा. अ. भि. शहा, प्रा. ग. प्र. प्रधान, वसंत पळशीकर, वि.म. बेडेकर, सुमंत मुरंजन, मा.पं. मंगुडकर, द्रविड शास्त्री, ना.गो. चाफेकर, वा. वि. मिराशी, द. वा. पोतदार, प्रा. रा. ग. जाधव यांनी आपल्या लेखनाने तर्कतीर्थकालीन 'नवभारत' समृद्ध केला. समकालीन प्रश्न, समस्यांसंदर्भात 'नवभारत' साहित्य, विचाराने मराठी भाषा, साहित्य, संस्कृती, समाज, तत्त्वज्ञान इ.त मोलाचे मार्गदर्शन करून हा महाराष्ट्र आधुनिक व पुरोगामी बनवला. 'नवभारत'चे भूदान चळवळ, मानवेंद्रनाथ रॉय, स्वामी केवलानंद सरस्वती जन्मशताब्दी, काँग्रेस शताब्दी, मराठी राज भाषा व्यवहार इ.सारखे विशेषांक वाचनीय व संग्राह्य ठरले. तर्कतीर्थ विशेषांकांची 'नवभारत' निर्मिती म्हणजे त्यांच्या

योगदानाचे कृतज्ञ स्मरण होय. हे सर्व या प्रातिनिधिक पत्रव्यवहारातून पुरेशा संकेताने स्पष्ट होते. या खंडातील तर्कतीर्थांना श्रद्धांजली वाहणारी मान्यवरांची पत्रे यास दुजोरा देणारी आहेत.

'नवभारत' मासिकाचा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्रींनी जोशी यांच्या संदर्भातील जो पत्रव्यवहार आहे, त्यातून तर्कतीर्थांनी प्राणपणाने 'नवभारत' मासिक जगवले हे स्पष्ट होते. शंकरराव देव यांनी जरी हे मासिक सुरु केले असले तरी ते सातत्याने प्रकाशित व्हावे म्हणून जी आर्थिक व वैचारिक घडी घालून दिली ती तर्कतीर्थांनी. या पत्रव्यवहारात शंकरराव देव, सी. गं. शेंडे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, हरी कृष्ण मोहनी, प्रा. मे. पुं. रेगे, प्रभृतींची जी पत्रे आहेत, त्यावरून 'नवभारत' मासिक सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुणे यांच्याकडून प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई यांच्याकडे कसे, का नि कोणत्या अटी, ठरावाने आले ते स्पष्ट होते. यातील तर्कतीर्थांचे प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाईच्या चालक मंडळाला लिहिलेले जे दि. ६ ऑगस्ट, १९५७ चे पत्र आहे, त्यात तर्कतीर्थांनी म्हटले आहे की, "प्राज्ञपाठशाळा मंडळाने मासिक स्वत:च्या हक्काने चालवावे. मी आपणास आश्वासन देतो की, मी प्राज्ञपाठशाळा मंडळाच्या इतर कोणत्याही निधीस किंवा उत्पन्नास धक्का न लावता म्हणजे त्यातील अंश न उचलता हे मासिक चालविता येईल." या मजकुरातील तळमळ व बांधिलकी वाखाणण्याजोगी असून ती अनुकरणीय ठरते. 'नवभारत'ची घडी बसवल्यावर तर्कतीर्थांनी आपला मोर्चा 'धर्मकोश'ची घडी बसवण्याकडे वळवल्याचे हरि कृष्ण मोहनींच्या दि. ३१ जानेवारी, १९६८ च्या पत्रान्वये स्पष्ट होते. एकामागून एक गड घ्यायचे; पण प्रत्येक गड स्थिर व सुरक्षित राहील, असे पाहण्याचे योजकत्व तर्कतीर्थकांनी हेतुत: अंगीकारल्याचे या पत्रावरून लक्षात येते. शास्त्रीजी 'नवभारत'च्या जडणघडणीत सक्रिय होते ते प्रा. मे. पुं. रेगे यांच्या १२ डिसेंबर १९७८ च्या पत्रातून दिसते. 'नवभारत'चा डिसेंबर, ७८ व जानेवारी १९७९ अंक हा 'स्वामी केवलानंद सरस्वती विशेषांक' म्हणून प्रकाशित होणार होता. त्यासाठी स्वामींवर तर्कतीर्थांनी रचलेला श्लोक वापरावा अशी सूचना दिसते. संपादक किती बारकाईने 'नवभारत'वर लक्ष ठेवून होते यावर यातून प्रकाश पडतो. लेख वेळेवर पोहोचावा म्हणून संपादक 'प्रवासी' कुरिअरकडे दिलेला लेख परत आणतात व शहांबरोबर हाती धाडतात. 'नवभारत' मासिक लोकादरास पात्र ठरले ते अशा छोट्या-मोठ्या धडपडीतून.

## वाचक पत्रव्यवहारात तर्कतीर्थ

'नवभारत' मासिक ज्या प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाईतर्फे चालविले जायचे त्या मंडळाचे खरेतर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी सर्वेसर्वा. विश्वस्त आणि अध्यक्ष ही. या मासिकात ते प्रसंगी संपादकीय, लेख, परीक्षणे लिहीत. मुलाखती देत; पण मासिकातील एखाद्या प्रश्नासंदर्भात जिज्ञासा कुतूहल वाटले तर समर्थक वा असहमतीची पत्रे, मत व्यक्त करीत. 'नवभारत' मासिकाच्या जून, १९५७ च्या अंकात श्री. पांडुरंग देसाई यांचा 'पांडुरंग म्हणजे

शिव' शीर्षक लेख प्रकाशित झाला. विषय नवा. पूर्वी यासंदर्भात वाचलेले आठवले. छोटेखानी मजकूर पुढच्याच अंकात लिहून लेखातील विषयाचे समर्थन करत आणखी पुरावे देत लिहिले. कृती छोटी पण त्यातून ज्ञानलालसा व ज्ञानसाधन सातत्य स्पष्ट झाल्याशिवाय राहत नाही. हे पत्रही या खंडात अंतर्भूत करण्यात आले आहे.

## ६) साहित्य समीक्षा आणि चर्चा

### (अ) 'आनंदमीमांसा : न. चिं. केळकर अभिप्राय पत्र (१९२८)'

'आनंदमीमांसा' हा मराठी प्रबंध तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सन १९२८ साली लिहिला. तो प्राज्ञपाठशाळेने प्रकाशित केला होता. त्याची एक प्रत लेखकाने साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांच्याकडे अभिप्रायार्थ धाडली होती. तो अभिप्राय न. चिं. केळकर यांनी लेखकास कळवला होता. हे सारे पत्र अभिप्राय पत्रच आहे. यात त्यांनी तर्कतीर्थांच्या या प्रबंधाची तुलना लोकमान्य टिळकांच्या 'गीतारहस्य'बरोबर केली आहे. लोकमान्यांनी 'गीतारहस्य'द्वारे निवृत्तीऐवजी प्रवृत्तीचे समर्थन केले होते. तर्कतीर्थांचा 'आनंदमीमांसा' प्रबंधही निवृत्ती, दु:खवाद, निराशावादाऐवजी प्रवृत्ती, आनंद, कर्म इ. चे महत्त्व विशद करतो. भारतीय दर्शने दु:खवाद, निवृत्ती समर्थक होत. पाश्चात्त्य दर्शने जीवनवादी आहेत. ती सुख, भोग, आनंद सांगतात. आज त्याची गरज असल्याचे द्वैसाप्ताहिक 'केसरी'चे संपादक न. चिं. केळकर अधोरेखित करतात. हा अभिप्राय 'केसरी' त प्रकाशित झाला होता. या अभिप्राय पत्रात न. चिं. केळकर त्यांनी एका गोष्टीकडे लक्ष वेधले आहे. निवृत्ती व्यक्तिहितकारक असते; पण प्रवृत्ती समाजहितकारक राहते. जीवनात दोहोंची सांधमोड हवी. निवृत्तीतही एक प्रकारचा आनंद असतो, तो त्यागातून लाभतो.

हे अभिप्राय पत्र न. चिं. केळकर यांनी स्व:हस्ताक्षरात शिमल्याहून २६-९-२८ रोजी पाठवले होते. स्वास्थ्याने वाचून लिहिलेल्या या आस्वादक समीक्षेत लेखकाला त्यांनी काही सूचनाही केल्या आहेत. निवृत्तीपर आनंद (त्याग) उत्कर्षाकडे नेतो (सामाजिक दृष्ट्या) याचे विवेचन आवश्यक होते. शिवाय खोलात (सूक्ष्मात) जाऊन मीमांसा करणारे आणखी लेखन आपणाकडून व्हावे. यात सद्भाव दिसतो. हा काळ तर्कतीर्थ धर्मसुधारक म्हणून समाजापुढे येण्याचा होता. न. चिं. केळकरांना त्याविषयी आस्था होती. या अभिप्रायातील सद्भावाचे कारण तर्कतीर्थांची समाजशील कर्तव्यबुद्धीची जाण असावी हे स्पष्ट होते. तर्कतीर्थांना केळकर 'सहोदर' (भाऊ) मानतात, यात सर्व आले. तो काळ एकमेकांच्या गुणग्राहकतेचा होता खरा!

### (ब) 'हिंदुधर्माची समीक्षा : डॉ. के. ल. दप्तरी व तर्कतीर्थ पत्रव्यवहार (१९४१)

विद्वद्रत्न डॉ. के. ल. दप्तरी हे धर्मशास्त्र, सामाजित तत्त्वज्ञान, भारताचा प्राचीन इतिहास, वैद्यकशास्त्र, वेदान्त, गणित ज्योतिष, ज्योतिषशास्त्र, इतिहास अशा विविध ज्ञान-विज्ञान

शाखांचे पारंगत पंडित व व्यासंगी विद्वान होते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ज्येष्ठत्व नि श्रेष्ठत्व दोहोंमुळे त्यांचा आदर करीत. डॉ. के. ल. दप्तरी भारतीय विचारधारेचे कट्टर समर्थक तर तर्कतीर्थ धर्म सुधारणावादी, बुद्धिवादी, पुरोगामी, भौतिकवादी. दोघांत असलेली मतभेदयुक्त मैत्री महात्मा गांधी अस्पृश्यता निर्मूलन चर्चा, धर्मकोश कार्य, धर्मनिर्णय मंडळ कार्यातील सहयोग नि सहकार्यात्मक भागीदारीतून स्पष्ट होते. उभयतांच्या विचारधारा व मार्ग भिन्न असले तरी मानवकल्याण व विकासाचे ध्येय एक असल्यामुळे मतभेद राहूनही मनभेद झाला नाही. सन १९४० साली नागपूर विद्यापीठ आयोजित रा. ब. परांजपे व्याख्यानमालेत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी तीन व्याख्याने दिली. 'धर्मसमीक्षेची भूमिका', 'धर्मलक्षण व धर्मप्रमाण', 'हिंदुधर्माचे स्वरूप' हे त्यांच्या व्याख्यानांचे विषय होते. ही तीनही भाषणे संकलित करून सन १९४१ मध्ये नागपूर विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू ॲड. नानासाहेब केदार यांच्या पुढाकाराने विद्यापीठामार्फत 'हिंदुधर्माची समीक्षा' हा भाषणसंग्रह प्रकाशित झाला. तर्कतीर्थांनी या भाषणांमधून हिंदुधर्माची ऐतिहासिक पद्धतीने व ऐतिहासिक समाजशास्त्राच्या दृष्टीने समीक्षा केल्याने स्वातंत्र्यपूर्व काळात हा ग्रंथ बहुचर्चित झाला. ना. गो. चाफेकर, गो.रा. राजोपाध्ये, वि. वि. दीक्षित प्रभृती मान्यवर समीक्षकांनी 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', 'समाजजीवन', 'समर्थ', 'वाङ्मय -शोभा'सारख्या नियतकालिकांमधून समीक्षा लिहिल्या. त्याचे एकमेव कारण होते तर्कतीर्थांच्या धर्मविषयक मार्क्सवादी दृष्टिकोन. कार्ल मार्क्सच्या 'The criticism of religion is a begining of all criticism' सूत्रास शीरोधार्य मानून केले. केलेल्या या टीकेमुळे डॉ. के. ल. दप्तरी नि तर्कतीर्थ यांच्यात जाहीर पत्रव्यवहार झाला. उभयतांनी पत्रांमधून आपापल्या भूमिकांचे समर्थन केले तरी त्यांच्या एकमेकांविषयी असलेल्या प्रेमादरात खल पडली नाही, हे विशेष.

ही मतभेदपूर्ण मीमांसा समजून घेणे आवश्यक आहे. डॉ. के. ल. दप्तरींच्या मते तर्कतीर्थांची धर्माची व्याख्याही पाश्चात्त्य विचार प्रभावित आहे. ती व्याख्या धर्म हद्दपार करण्यासाठी करण्यात आली आहे. ती व्याख्या हिंदुधर्मास लागू होत नाही. संस्कृती म्हणजे विज्ञानशास्त्राची वाढ मग युरोपात युद्ध का? परस्परांमधील भांडणे मिटवायची युक्ती ज्या विज्ञानात सापडत नाही त्याला पूर्ण कसे म्हणावे? जागृतीतील वासनाभाव म्हणजे सुख ते अभावात्मक ठरवून तुम्ही टीका कशी करता? तुम्ही परलोक मानत नाही. जोवर मृत्यू अटळ तोवर परलोक कल्पना राहणारच ! जादूला (यातुविद्या) तुम्ही भ्रम मानता; पण अलीकडे विज्ञानात psychotherapy, Mesmirism, Hypnotism चा विचार होतो आहे. जादू ही वास्तविक गोष्ट होय.

तर्कतीर्थांनी आपल्या दि. १५ मार्च, १९४१ च्या पत्रान्वये डॉ. के. ल. दप्तरींच्या वरील मतांचे खंडन केले आहे. धर्माची व्याख्या पाश्चात्त्य आहे. म्हणून नाकारता कशी येईल? विज्ञानाची वाढ नि मनाची उन्नती दोन स्वतंत्र गोष्टी होत. भारतीय संस्कृती व दर्शनांनी युद्ध व

कलह नाहीसा केलेला नाही. सुखाचे स्वरूप अभावात्मक नसून ती भावरूप संवेदना आहे, असे मी स्पष्ट म्हटले आहे. यातुविद्येस कोणताही भौतिक वा वैज्ञानिक आधार नसल्याने मला पूर्ण अमान्य आहे. तुम्ही "भारतीयांच्या परंपरेतील अत्यंत हीन, अवनत, भ्रांतिग्रस्त, थोतांडी, अजागळपणाच्या रूढींचे मेस्मेरिझम, सायकोथेरपी, हिप्नाटिझम इत्यादिकांच्या साहाय्याने भोंदूंनी माजविलेल्या ढोंगधत्तुरांच्या नादी लागून त्यांचे समर्थन करण्यात वेळ घालविणार असल्यास ते मोठे दुर्दैव म्हणावे लागेल."

तर्कतीर्थांच्या या खरमरीत उत्तरानंतर प्रत्युत्तर देत डॉ. के. ल. दप्तरी यांनी त्यांना दि. १८ मार्च, १९४१ ला पत्र लिहिले आहे, जे पुढे 'भवितव्य' (२४ ऑक्टोबर, १९४१) मासिका मध्ये प्रकाशित झाले होते. त्यात धर्ममीमांसा बुद्धिवादी मानत मानसिक उन्नती व विज्ञानाची वाढ मिळून संस्कृती होते असा समन्वयी व सामंजस्यपूर्ण दृष्टिकोन स्पष्ट होतो. वादावर पडदा टाकत पूर्व मैत्रीची ग्वाही या उत्तराचे बलस्थान आहे. 'वादे वादे जायते तत्त्व बोध:' ची प्रचीती देणारा हा पत्रव्यवहार आपापल्या मतांचे समर्थन करत मानवी संबंधांचा आदर करणारा असल्याने विचारणीय ठरतो.

**(क) ब्राह्मणत्व म्हणजे साधुत्व काय? (१९४९)**

मिरजेचे प्रसिद्ध छंदशास्त्री वि. ज. सहस्रबुद्धे यांना भगवद्गीतेवरील श्री शंकराचार्यांचे भाष्य वाचताना काही शंका आल्या. आपल्या शंकेच्या निरसनार्थ त्यांनी आचार्य काकासाहेब कालेलकर आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना पत्र लिहून पृच्छा केली. उभयतांनी दिलेली उत्तरे संलग्न खंडात प्रकाशित आहेत. हा पत्रव्यवहार साप्ताहिक मौज, मुंबईच्या १४ सप्टेंबर, १९४९ च्या अंकात एकत्र प्रकाशित करण्यात आला होता.

'श्रीमद्भगवद्गीता' आणि 'श्रीमद्भागवद्गीता शांकरभाष्य' स्वतंत्र ग्रंथ होत. शंकराचार्यांच्या मतानुसार गीता निवृत्ती प्रतिपादक ग्रंथ होय. ईश्वर अवतारी असून त्याच्या अवताराचा उद्देश वैदिक धर्म रक्षण होय. गीतेत मात्र अवताराचा उद्देश दुष्टकर्म निर्दालन सांगितला आहे. दोहोत भिन्नता आहे. एक ब्राह्मणत्वाचे समर्थन करतो, तर दुसरा साधुत्वाचे. 'ब्राह्मणत्व' आणि 'साधुत्व' यात फरक आहे का ही वि. ज. सहस्रबुद्धेची मूळ शंका आहे. आचार्य काका कालेलकरांच्या मतानुसार ब्राह्मण शब्द वर्णाची असून साधुत्व वृत्तीवाचक होय. 'इदं ब्रह्म, इदं सर्व' नुसार वर्ण, वृत्ती भेद नको, एकत्व हवे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मतानुसार ब्राह्मणरक्षणाला आधार नाही. ब्राह्मण्य व साधुत्व एक दुसऱ्याचे पर्याय होऊ शकतात. कारण शम, दम, तप, शौच, शांती, आर्जव, ज्ञान, विज्ञान, आस्तिक्य यांचा समुच्चय दोहोत अपेक्षित असतो. ब्राह्मणत्व पूर्वी वृत्तीच होती. गेल्या पाच-सहाशे वर्षांत त्याला वर्ण्यरूप आले व ब्राह्मणत्व मलिन झाले. ब्राह्मणत्व व साधुत्व मूलत: गुण नि कर्म सूचक होत. दोहोंकडे जबाबदार वृत्तीच्या अंगाने पाहण्याची गरज आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी वर्ण्यभेद मुक्त समाजाचे करत असलेले सूचन अधिक महत्त्वाचे.

प्राचीन ग्रंथांचा व त्यातील तत्त्वांचा अभ्यास करताना ती मते ज्या काळात सांगितली गेली तो काळ नि उद्देश महत्त्वाचा. मध्यंतरीच्या काळातील स्थित्यंतराने आलेले वैगुण्य वजा करूनच पूर्व सूरींच्या विचारांचा अन्वय लावणे समाज हिताचे ठरते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींचे वेगळेपण हेच आहे की, 'बाबा वाक्यं प्रमाणम्' त्यांची वृत्ती नाही. अलौकिकता, शब्द प्रमाणता नाकारून विज्ञान, विवेक, बुद्धिवाद, भौतिकवाद यांच्या आधारेच ते धर्म इत्यादीकडे पहातात.

## ७) भाई माधवराव बागल यांना तर्कतीर्थांचे अनावृत्त पत्र (१९५६)

ही गोष्ट आहे कोल्हापूरची. प्रसंग आहे टिळक पुण्यतिथीचा. तो कार्यक्रम योजला होता कोल्हापूर जिल्हा कॉंग्रेस कमिटीने. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी भाई माधवराव बागल यांना लिहिलेले अनावृत्त पत्र सूचक आहे; पण ते कळायचे तर मूळ प्रसंग समजून घ्यायला हवा. सुविख्यात संपादक माधव गडकरी यांनी आपल्या 'साहित्यातील हिरे आणि मोती'[१२] या ग्रंथातील 'तर्कतीर्थांच्या सहवासात' शीर्षक लेखात झाला प्रसंग वर्णिला आहे. तोही शास्त्रीजींच्याच शब्दात -

"श्री. मोरारजी देसाई महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. दि. १ ऑगस्टचा दिवस. १९५६ साल. लोकमान्य टिळकांवर माझं भाषण. कोल्हापूरच्या कॉमर्स कॉलेजात ही घटना घडली. मी भाषणाला उभा राहिलो तर पुढे बसलेल्या एकाने मेलेला साप काठीने माझ्या गळयात अडकविला; पण तो आपोआप खाली पडला. नंतर एक जण पुढे आला व त्याने जुना जोडा काढून माझ्या गालात लगावला. तिसऱ्याने जोड्यांची माळ गळयात घातली. पोलिसांना कुणकुण होतीच. त्यांनी मला आधी सूचनाही दिली होती; परंतु हे सर्व झटक्यात झालं. पोलिसांनी त्यांना पकडून नेलं."

मिरजेचे श्री. घोरपडे शेजारी बसले होते. ते म्हणाले, "शास्त्रीजी, घाबरलात काय?" "मन त्रस्त आहे." शास्त्रीजी उत्तरले. त्यानंतर खटला उभा राहिला. श्री. मोरारजी देसाईंच्या तेथील पोलिसांना सूचना होत्या की आरोपींना शिक्षा होतील असे पाहा.

श्री. पुंडलिक कातगडे भेटायला आले. खटल्यासाठी शास्त्रीजी कोल्हापूरला गेले. कातगडेंची इच्छा होती की, त्या चळवळयांना शिक्षा होता कामा नये.

शास्त्रीजी त्यांना म्हणाले, "तुम्ही काळजी करू नका. त्यांना शिक्षा होणार नाही याची उत्तम तऱ्हेने मी काळजी घेईन."

आणि शास्त्रीजींनी आपल्या साक्षीत कुणालाही ओळखले नाही. ते म्हणाले, "चेहरे माझ्या लक्षात नाहीत बुवा !" आणि चळवळीतील बंडखोर सुटले.

ज्यांचे आयुष्य चळवळीत गेले, त्यांच्यामुळे चळवळ करणाऱ्यांना शिक्षा होणे शक्य नव्हते.

वरील प्रसंगानंतर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी भाई माधवराव बागल यांच्या

नावे साप्ताहिक मौज, मुंबईच्या अनावृत्त पत्र[१३] लिहिले. त्यास भाई माधवराव बागल यांनी साप्ताहिक मौजच्या पुढील अंकात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना उत्तर[१४] लिहिले. ही दोन्ही पत्रे या पत्रसंग्रहात आहेत. भाई माधवराव बागल संयुक्त महाराष्ट्र समितीचे कार्यकर्ते तर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी महाराष्ट्र काँग्रेसचे. संयुक्त महाराष्ट्र समिती मराठी भाषी महाराष्ट्राची आग्रही तर काँग्रेस द्वैभाषिक महाराष्ट्र समर्थक. हे दोघे एकमेकांचे मित्र. मतभिन्नता असली तरी मैत्र अतूट ! भाई माधवराव बागल यांच्या पत्राचा शेवट हृदय पिळवटून टाकणारा. ते लिहितात, ''एवढीच इच्छा होती की मी आणि तर्कतीर्थ हातात हात घालून संयुक्त महाराष्ट्राचा प्रचार करावा, सारे रान उठवावे आणि सत्तेच्या जबड्यांतून महाराष्ट्राला बाहेर काढावे ! पण तो सहकार्याचा हात तुटला ! आता थोट्या हातानेच मी लढणार ! पण सत्तेच्या, संपत्तीच्या किंवा मोहाच्या आहारी नाही जाणार-मित्राच्या भिडेस नाही बळी पडणार !''

या उभयतांनी एकमेकांचा आदर करत एकमेकांवर गौरव लेख लिहिलेत, एकमेकांच्या पुस्तकांना प्रस्तावना ग्रंथांची परीक्षणे लिहून एकमेकांविषयीचा सद्भाव आयुष्यभर जपला. ते सर्व या खंडात संग्रहीत आहे.

## ८) महात्मा गांधी व तर्कतीर्थ पत्रव्यवहार (१९३२-३३)

### अस्पृश्यता निवारण कार्य (१९३२)

स्वामी केवलानंद सरस्वती धर्म, जाती, वर्ण्यव्यवस्था इत्यादींसंदर्भात पुरोगामी वृत्तीचे राहिले आहेत. त्याचे अनेक पुरावे त्यांच्या जीवन प्रसंगातून दिसून येतात. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी शिष्य, सहकारी व व्यक्ती म्हणूनही प्रागतिकच राहिले आहेत. सन १९२३ ची वाईतील ब्राह्मण परिषद. इथे या गुरू-शिष्य जोडीने पोटजातीच्या एकीकरणाचे समर्थन केलेले दिसते. सोनगीर (जि. धुळे) च्या सन १९२६ च्या धर्म परिषदेत धर्म सुधारणांचे समर्थन केले. त्यानंतर १९२७ च्या हैदराबाद व अकोले येथील धर्म परिषदांत त्यांनी आपल्या वरील भूमिकांचाच पुनरुच्चार केला. त्यानंतर सन १९२८ च्या दशदिवसीय 'अखिल भारतवर्षीय ब्राह्मण महासंमेलन, काशी'मध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी संमती वय, विवाह वय, पोटजाती, जातिद्वेषमूलक ग्रंथांचे ('मनुस्मृती') अप्रामाण्यत्व, पोटजाती विवाह इ. प्रश्नी सुधारणावादी मते मांडून सनातनी विचारांचा विरोध केला. एक विरुद्ध सर्व महासंमेलन अशी स्थिती असताना त्यांनी अनेक समर्थक या परिषदेत आपल्या तार्किक प्रतिवादाने संघटित केले. याबद्दलची सविस्तर चर्चा सदर प्रकल्पातील खंड- २ (भाषणसंग्रह- व्यक्ती आणि विचार) च्या प्रस्तावनेत करण्यात आली आहे. ती जिज्ञासूंनी मुळातून वाचावी. शिवाय या प्रकल्पाच्या ९व्या खंडात उपरोक्त परिषदेचा 'वृत्तांत' देण्यात आला आहे, तो पहावा.

प्राज्ञपाठशाळेतील स्वामी केवलानंदांचे शिष्य आचार्य विनोबा भावे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, संस्कृत पंडित डी. व्ही. परचुरे शास्त्री (ते कुष्ठपीडित झाल्यावर ज्यांची सेवा-शुश्रूषा महात्मा गांधींनी सेवाग्राम आश्रमात केली होती.) सारखी मंडळी प्रारंभीपासूनच जातिअंताचे व अस्पृश्यता निवारणाचे समर्थक होते. सन १९१७ साली विनोबा भावे शांकरभाष्य शिकण्यासाठी वाईच्या प्राज्ञपाठशाळेत प्रवेश घेण्यास आले असता त्यांनी आपले गुरू होणाऱ्या नारायणशास्त्री मराठे यांना प्रश्न केला होता की, 'आपण अस्पृश्यांना वेद शिकवणार का?' त्यांनी होकार दर्शविल्यावरच विनोबांनी प्रवेश घेतला. वाईसारख्या सनातनी व कर्मठ प्रवृत्तीच्या ब्रह्मवृंदांची बहुसंख्या असलेल्या गावात भिंगारदेव या अस्पृश्य समाजातील विद्यार्थ्यास प्रवेश द्यायला १९३४ सालापर्यंत नारायणशास्त्रींना प्रयत्न करावे लागले होते.

या पार्श्वभूमीवर सन १९३० च्या महात्मा गांधींच्या कायदेभंगाच्या चळवळीत अनेक विद्यार्थी सामील झाले. काही शिक्षकही प्राज्ञपाठशाळेचा राजीनामा देऊन स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय झाले त्यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी पण होते. संगमनेरमध्ये आयोजित कार्यकर्ता प्रबोधन शिबिर, गावकामगार पाटील यांचे ब्रिटिशांच्या जुलमी प्रशासनाचा निषेध करत दिलेले राजीनामे, बागलाण-कळवण येथील कोळी-आदिवासींचे करबंदी विरोधी जंगल सत्याग्रह यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री नुसते सक्रिय नव्हते तर नेते होते. या कायदेभंग चळवळीची जी राज्यव्यापी 'वॉर काउंसिल' होती, त्यात तर्कतीर्थ सक्रिय असल्याच्या नोंदी ब्रिटिश पोलीस इंटेलिजन्स रिपोर्टमध्ये आढळतात.[५] तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे येरवडा व धुळे कारागृहात सहा-सहा महिन्यांच्या तुरुंगवासात असल्याच्या नोंदी त्यांच्या आत्मपर लेखांमधून, सहकारी तुरुंगवासींच्या आठवणीतून तसेच या कारागृहांच्या नोंदवह्यांतून (रजिस्टर्स) दिसून येतात. धुळे येथील सन १९३२ च्या कारावासात तर्कतीर्थांसोबत आचार्य विनोबा भावे, साने गुरुजी, सेठ जमनालाल बजाज, गुलजारीलाल नंदा, प्यारेलाल, पुरुषोत्तम त्रिकम, मणिलाल कोठारी प्रभृती मान्यवर होते. या काळात तर्कतीर्थ वैदिक वाङ्मय आधुनिक व प्रागतिकदृष्टीने जिज्ञासूंना शिकवत. त्याचा फार मोठा प्रभाव जमनालाल बजाज यांच्यावर झाला होता व ही गोष्ट त्यांनी तुरुंगातून सुटल्यावर महात्मा गांधींच्या कानावर घातली होती.

सन १९३२ मध्ये राखीव मतदार संघप्रश्नी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशी झालेल्या मतभेदाचे पर्यवसान महात्मा गांधींच्या आमरण उपोषणात झाले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामंजस्याची भूमिका स्वीकारून 'पुणे करार'द्वारे महात्मा गांधीशी समझोता केला हे जरी खरे असले तरी या प्रसंगातून महात्मा गांधींचे सनातनी मन पुरोगामी दृष्टीने विकसित झाले. त्यांनी राजकीय संन्यास ग्रहण करून समाज सेवेला वाहून घेण्याचा निश्चय केला नि त्याची सुरुवात महात्मा गांधींनी आपल्या अस्पृश्यता निवारण कार्याने केली.

महात्मा गांधींना अस्पृश्यता निवारण करायचे होते; पण त्यास त्यांना धार्मिक आधार हवा होता. म्हणून त्यांनी पुणे करारानंतर लगेचच यासंबंधी धर्मसुधारक व धर्मकर्मठ अशा दोन्ही प्रकारांच्या धर्मपंडितांशी चर्चा सुरू केली होती. त्याचा सविस्तर वृत्तांत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपल्या 'येरवड्यातील धर्मपरिषद'[६] शीर्षक लेखात केली असून सदर लेख या प्रकल्पाच्या खंड-८, लेखसंग्रह (सांस्कृतिक) मध्ये धार्मिक लेखांत अंतर्भूत आहे. जिज्ञासूंनी तो पाहावा. अस्पृश्यता निवारण या चर्चेनंतर महात्मा गांधी यांनी 'हरिजन' या आपल्या इंग्रजी साप्ताहिकाच्या पहिल्या अंकात[७] पुरोगामी धर्मपंडितांचे अस्पृश्यता निवारणसंबंधी निवेदन प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार हिंदुधर्माधारित अस्पृश्यता तीन प्रकाराने मानली जाते हे स्पष्ट करून ती आजच्या अस्पृश्यांना लागू होत नसल्याने ती धर्मसंमत ठरत नसल्याचे स्पष्ट करून मंदिर, पाठशाळा व सार्वजनिक ठिकाणी प्रवेश आणि विहीर, तलावांच्या उपयोगाचे / वापराचे अधिकार चारही वर्णांच्या नागरिकांना समानपणे असल्याचे स्पष्ट केले आहे. या निवेदनावर अन्य पुरोगामी धर्मपंडितांबरोबर स्वामी केवलानंद सरस्वतींनंतर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची स्वाक्षरी असून ते तर्कतीर्थांचे स्वातंत्र्य लढ्यातील अनेक निवेदनांपैकी एक पत्र होय.

### ९) आंतरजातीय विवाह (१९३३) (देवदास गांधी आणि लक्ष्मी राजगोपालाचारी)

महात्मा गांधींचा शेवटचा मुलगा (शेंडेफळ) देवदास गांधी आणि चक्रवर्ती राजगोपालाचारी यांची कन्या लक्ष्मी यांचे प्रेम होते. दोघांच्या लग्नास उभय कुटुंबात विरोध होता. एक तर वयाचे अंतर. देवदासचे वय २८ तर लक्ष्मीचे अवघे १५ वर्षे. दुसरे असे की गांधी कुटुंब वैश्य तर राजगोपालाचारी कुटुंब ब्राह्मण. भिन्न वर्णीय विवाह धर्म संमत आहे का, याबाबत महात्मा गांधी साशंक होते. त्यांना समजून घ्यायचे होते म्हणून त्यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्याशी सल्लामसलत केली. तर्कतीर्थांनी महात्मा गांधींना समजावले की, हा प्रतिलोम विवाह आहे. प्रायश्चित घेऊन तो करता येतो. या विवाहाची सविस्तर चर्चा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची प्रा. मे. पुं. रेगे यांनी घेतलेल्या 'अध्ययन आणि वैचारिक वाटचाल' शीर्षक प्रदीर्घ मुलाखतीत असून ती मुलाखत या प्रकल्पाच्या खंड-६ (मुलाखतसंग्रह) मध्ये समाविष्ट आहे.[८] शिवाय या विवाहाची चर्चा, संदर्भ, भाषणे इत्यादींची संदर्भसूत्रे महात्मा गांधींच्या निवडक पत्रसंग्रहात खंड क्र. ६१[९] मध्ये आढळते. महात्मा गांधींनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना लिहिलेले दि. ७ मार्च, १९३३ चे पत्र या संग्रहात आहे. त्यावरूनही उभयतांमध्ये पत्रव्यवहार होत असल्याचे स्पष्ट होते. महात्मा गांधींच्या मनात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्याबद्दल मोठा आदर दिसून येतो. "who knew that a man of great learning and spotlees character like Laxman Shastri would be found to act as priest ?"[१०] तो या वाक्यातून स्पष्ट होतो. तसाच

तो काँग्रेस कार्यकर्त्यांना उद्देशून लिहिलेल्या 'हरिजन बंधू' या गुजराती साप्ताहिकातील आवाहनातूनही लक्षात येते. त्यात महात्मा गांधी म्हणतात, "Workers should be like Malaviyaji, like Narayanshastri, Laxmanshastri; or Shridharshastri Pathak. They should be men whose character is as pure as gold."[11]

देवदास-लक्ष्मी विवाहाच्या संदर्भात लक्षात घेण्याची गोष्ट अशी की, प्रथम हा विवाह विधी आचार्य काकासाहेब कालेलकर यांनी करावा अशी महात्मा गांधीजींची इच्छा होती; पण हे विधी माझ्यापेक्षा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी अधिक शास्त्रोक्त पद्धतीने करू शकतील, असे सांगितल्यावर महात्मा गांधींनी तर्कतीर्थांशी संपर्क साधला. विवाह झाल्यावर वधू-वरांना उपदेश करण्याची विनंती तर्कतीर्थांना केली. हे कार्य पित्यानेच करायचे असते म्हटल्यावर महात्मा गांधींनी केलेले भाषण त्यांच्या दि. १६ जून, १९३३ च्या पत्रात अंतर्भूत आहे. ते या संग्रहात आहे. त्यात महात्मा गांधी पुत्र देवदासला गुजरातीत उपदेश करतात, तर लक्ष्मीस हिंदीत. वधू-वरांना आपण काय बोलतो ते सरळ कळावं ही भावना. या सर्व प्रसंगातून महात्मा गांधींची धर्मपरायण वृत्ती दिसून येते. ते अंधश्रद्ध नव्हते. जे करायचं ते जाणून घेऊन करायचं असा त्यांचा भाव होता. ते बदलास नेहमी तयार असत. धर्म, जात, रूढी, परंपरा इ. संबंधी महात्मा गांधींचा प्रवास, विकास हा सनातनतेकडून प्रागतिकतेकडे झालेला दिसतो. चरित्र विकास म्हणून या सर्व वैचारिक संघर्षाकडे पाहणे महत्त्वाचे आहे.

### १०) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई : पत्रव्यवहार (१९६० ते १९८०)

मराठी भाषिकांचे स्वतंत्र राज्य 'महाराष्ट्र' ची स्थापना भारत सरकारने आपल्या भाषावार प्रांतरचनेच्या धोरणानुसार १ मे, १९६० रोजी केली. त्यावेळी तत्कालीन द्वैभाषिक मुंबई राज्य हे मराठी-गुजरातीचे होते. त्याची स्थापना १ नोव्हेंबर, १९५६ मध्ये करण्यात आली होती; पण तत्पूर्वी स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सन १९४९ ला जे मुंबई राज्य स्थापन झाले त्याचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर होते. सन १९५२ पर्यंत त्यांनी मुंबई राज्याचे मुख्यमंत्री म्हणून कार्य केले. सन १९५२ ला त्यांचे उत्तराधिकारी म्हणून आलेल्या मुख्यमंत्री मोरारजीभाई देसाई यांच्या कार्यकाळात स्वतंत्र महाराष्ट्र निर्मितीचे आंदोलन प्रखर नि उग्र झाले. ते शमविण्यासाठी गोळीबार झाला. त्यात १०५ हुतात्मे झाले. सन १९५६ ला मोरारजीभाई देसाई भारत सरकारच्या मंत्रिमंडळात व्यापारमंत्री म्हणून गेले नि इकडे यशवंतराव चव्हाण द्वैभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले.

स्वतंत्र महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतरच्या विधानसभेच्या पहिल्याच अधिवेशनात पहिल्या दिवशी सरकारचे धोरण जाहीर करताना राज्यपाल श्रीप्रकाश यांनी दि. ६ जुलै, १९६० रोजी भाषण करून पटलावर असे म्हटले होते की, "सरकारने मराठी भाषेच्या विकासासाठी आणि समृद्धीसाठी, महाराष्ट्राची भाषा, संस्कृती आणि इतिहास यांच्यासंबंधीच्या

संशोधनाकडे तातडीने लक्ष देण्याचे ठरविले आहे. अशा प्रकारच्या संशोधनास उपयुक्त होईल असे साहित्य निरनिराळ्या भारतीय व पाश्चात्त्य भाषांत भरपूर प्रमाणात उपलब्ध आहे. म्हणून या बाबतीतील संशोधनाचे काम हाती घेण्यासाठी व त्यावर देखरेख ठेवण्यासाठी, या क्षेत्रातील तज्ज्ञांची व विद्वानांची एक उच्चाधिकार यंत्रणा लवकरच निर्माण करण्याचा महाराष्ट्र सरकारचा विचार आहे."[१८] त्यानुसार महाराष्ट्र सरकारने दि. १९ नोव्हेंबर, १९६० रोजी एका शासन आदेशानुसार 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई'ची स्थापना केली व या मंडळाचे अध्यक्ष म्हणून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची नियुक्ती केली. पहिल्या मंडळात सर्वश्री महामहोपाध्याय वा. वि. मिराशी, डॉ. ए. एम. घाटगे, प्राचार्य दिनकर धों. कर्वे, प्रा. गोवर्धन पारीख, प्रा. न. र. फाटक, प्रा. वा. ल. कुलकर्णी प्रभृती साहित्य, संस्कृती क्षेत्रातील मान्यवर मंडळी सदस्य होती.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबईचे नोव्हेंबर, १९६० ते डिसेंबर, १९८० पर्यंत अध्यक्ष होते. महाराष्ट्र शासनाने या मंडळामार्फत सन १९६२ मध्ये हाती घेतलेल्या मराठी विश्वकोश निर्मितीसाठी डिसेंबर, १९८० मध्ये स्वतंत्र 'महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई' ची स्थापना केली. त्या मंडळाचे अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींना केले व विभाजित महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ अध्यक्षपदी डॉ. सुरेंद्र बारलिंगे यांची नियुक्ती केली.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या सन १९६० ते १९८० अशा दोन दशकांच्या काळात त्यांनी विज्ञान, वैद्यक, धर्म, इतिहास, सामाजिकशास्त्रे, ललितकलासारख्या विषयांवर शंभरहून अधिक ग्रंथ प्रकाशित केले. यात कोश, भाषांतरे, मौलिक साहित्य यांचा समावेश आहे. अनेक भाषांतरित ग्रंथांचे प्रकाशन करून तर्कतीर्थांनी कीर्तिमान स्थापन केला. महामहोपाध्याय पां. वा. काणे, निकोलाय मनुची, बर्ट्रांड रसेल, सर जदुनाथ सरकार, एम.एन.रॉय, इझाडोरा डंकन, भरतमुनी इ. चे सुमारे पाऊणशे ग्रंथ मराठीत भाषांतरित करून घेऊन प्रकाशित केले. अभिजात ग्रंथ निर्मितीवर त्यांनी भर दिला. तद्वतच विज्ञान, तंत्रज्ञान क्षेत्रात मौलिक ग्रंथ मराठीत तयार करून घेऊन प्रकाशित केले आणि मराठीस ज्ञानभाषा बनवले.

याशिवाय आंतरभारती माला, विज्ञानमालान्तर्गत अनेक भारतीय भाषांचे इतिहास व परिचय ग्रंथ निर्माण केले. मराठा इतिहासावरील फ्रेंच, पोर्तुगीज, इंग्रजी ग्रंथांची भाषांतरे करून घेऊन ती प्रकाशित केली. मराठीच्या विविध बोलींवर पुस्तकांची निर्मिती केली. ललित कला विकासास गती दिली. अनेक भाषी शब्दकोश तयार केले. नवलेखक प्रकाशन अनुदान, प्राचीन दुर्मीळ ग्रंथांचे पुनर्मुद्रण, विविध नियतकालिकांना अनुदान, उत्कृष्ट ग्रंथांना पुरस्कार, राज्य नाटक स्पर्धा प्रारंभ, साहित्यिक संस्थांना अनुदान असे अनेक उपक्रम व योजना आखून त्या क्रियान्वित केल्या. या दोन दशकांच्या काळात विविध समित्यांची

निर्मिती करून साहित्य आणि संस्कृतीच्या सर्व अंगांचा विकास होईल असे पाहिले. मराठी विश्वकोश निर्मिती हे या मंडळाचे कार्य अन्य कार्याइतकेच महत्त्वाकांक्षी व अजरामर ठरणारे झाले. त्याचा 'विश्वकोश परिचय ग्रंथ' सन १९६५ ला प्रकाशित झाला. तो तर्कतीर्थांनी यशवंतराव चव्हाण यांना पाठविला. तेव्हा ते भारताचे संरक्षणमंत्री होते. ग्रंथ पोहोचल्यावर ग्रंथ पाहून तर्कतीर्थांना दि. २५ एप्रिल, १९६५ रोजी लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात, "हा ग्रंथ पाहून किती महत्त्वाचे, गुंतागुंतीचे व जबाबदारीचे कार्य आपण स्वीकारले आहे याची जाणीव झाली. शेकडो लोकांचे परिश्रम व सहकार्य यांचे संयोजन करण्यावरच या योजनेचे यश अवलंबून आहे याची जाणीव अधिक तीव्रतेने झाली."[१९] म. रा. साहित्य आणि संस्कृती मंडळामार्फत प्रकाशित झालेलं पहिलं पुस्तक म्हणजे 'रायगडची जीवनकथा.' लेखक शांताराम विष्णू आवळसकर.[२०] मंडळाचे पहिले सचिव गॅझेटियर संपादक सेतुमाधवराव पगडी होते. मंडळ शिक्षण विभागाच्या अखत्यारित कार्यरत होते. त्याचे सचिव श्री. पां.ज. चिन्मुळगुंद होते.[२०] याच मंडळामार्फत सन १९६२ ला 'मराठी विश्वकोश' निर्मितीचा संकल्प सोडण्यात आला. त्याचा परिचय ग्रंथ सन १९६५ मध्ये प्रकाशित झाला. त्याची चर्चा, विविध वृत्तपत्रे, नियतकालिकांमधून झाली. त्यासंबंधी मोठा पत्रव्यवहार घडून आला. पैकी काही पत्रे, टीका, प्रतिटीका (उत्तरे) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लिहिल्याचे दिसून येते. ती मूळ संदर्भित पत्रांसह या खंडात संग्रहित करण्यात आली आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या अखत्यारितच मराठी विश्वकोशांच्या प्रारंभिक चार खंडांचे प्रकाशन सन १९७६ साली करण्याचे घाटत होते. तसा पत्रव्यवहार तर्कतीर्थांनी केला होता. तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी याव्यात म्हणून प्रयत्न व पत्रव्यवहार झाला होता; पण प्रत्यक्षात तो आणीबाणीनंतर आलेल्या जनता पक्षाच्या सरकारातील प्रधानमंत्री नामदार मोरारजी देसाई यांच्या हस्ते २४ जुलै, १९७७ रोजी सकाळी १० वाजता टिळक स्मारक मंदिर, टिळक पथ, पुणे येथे संपन्न झाला. पहिल्या ५ खंडांचे प्रकाशन त्यांच्या हस्ते संपन्न झाले. त्या वेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री नामदार वसंतदादा पाटील होते. ते समारंभास उपस्थित होते. 'महाराष्ट्राने केलेल्या या कार्याचे अनुकरण अन्य राज्यांनी करावे' असे आवाहन पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी केले.[२२] समारंभाचे अध्यक्ष पद, महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल सादिक अली यांनी भूषविले होते.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे प्रकाशित ग्रंथांची अद्यतन (update) सूची उपलब्ध झाली नाही. या मंडळाने वेळोवेळी प्रकाशित केलेल्या सूची नि अंतरजालावर प्रकाशित ४४४ ग्रंथ यांची रुजवात घेता लक्षात येते की, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या सदर मंडळाच्या अध्यक्षीय कारकिर्दीत (१९६० ते १९८०) शंभरहून अधिक ग्रंथ प्रकाशित झाले. त्याला त्यांची अध्यक्षीय प्रस्तावनापर निवेदने आहेत. अशा ग्रंथांची सूची या प्रकल्पातील खंड क्र. १० व ११ मध्ये (प्रस्तावना व पुस्तक परीक्षणे संग्रह) परिशिष्ट

क्र. २ मध्ये उपलब्ध आहे. त्यावर नजर फिरविली तरी आपल्या लक्षात येईल की, या प्रकाशनांच्या निमित्ताने मंडळ व तर्कतीर्थांशी विद्वद्रत्न डॉ. के. ल. दप्तरी, भारतरत्न डॉ. पां. वा. काणे, डॉ. धनंजय कीर, डॉ. म. वि. आपटे, व भ. कर्णिक, डॉ. के. एम. मसानी, सेतुमाधव पगडी, धर्मानंद कोसंबी, शं. गो. तुळपुळे, डॉ. वी. वि. मिराशी, सौ. शैलजा ग्रब, सौ. चंद्रकला हाटे, 'दीनमित्र' या मुकुंदराव पाटील, डॉ. श. रं. फाटक, प्रा. निजामुद्दीन गोरेकर, प्रभृती मान्यवरांशी संबंध आला होता. यांच्यात पत्रव्यवहार झाला असणार कारण त्यावेळी पत्रव्यवहार हेच संपर्काचे प्रमुख साधन व माध्यम होते; पण तो मिळाला नाही. साने गुरुजींनी 'श्यामची आई'मध्ये आशयाने म्हटल्याप्रमाणे 'पुष्कळ फुले उमलण्यापूर्वी त्यांच्या कळ्या किडीच खाऊन, कुरडून टाकत असतात' तसे या पत्रव्यवहाराचे झाले आहे. एन्सा हटमेंटस्, 'डी' ब्लॉक, आझाद मैदान, मुंबई- १०० ००१ येथे जिथे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या कार्यकाळात मंडळाचे कार्य चालायचे तिथेही शोध घेऊन हाती काहीच आले नाही. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा ज्या व्यक्तींशी सौहाद्रपूर्ण संबंध होता उदाहरणार्थ नामदार यशवंतराव चव्हाण (मुख्यमंत्री), सुविख्यात साहित्यिक पु. ल. देशपांडे, प्रा. गोवर्धन पारीख, अशा व्यक्तींशी संबंधित यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई; सेंटर फॉर दि स्टडी ऑफ सोशल चेंज, वांद्रे (पूर्व), मुंबई, यातून उपलब्ध संदर्भ साधने, प्रकाशने इ. तून उपलब्ध पत्रे जी हाती लागली ती येथे दिली आहेत. त्यावरूनही महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचा लोकसंग्रह, लोक संपर्क किती मोठा होता, याची कल्पना येते. तो सर्व पत्रव्यवहार उपलब्ध झाला असता तर स्वतंत्र महाराष्ट्र स्थापनेनंतर या राज्याच्या साहित्य, संस्कृती व्यवहारात ज्या महनीय व्यक्तींचे योगदान लाभले त्यांच्या ज्ञानसक्ती व ज्ञानविस्तार व्यवहारावर प्रकाश पडला असता. इथे दुधाची तहान ताकावर भागवावी लागली. क्षमस्व !

## ११) महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती पत्रव्यवहार (१९६० ते १९९४)

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबईच्या स्थापनेचा इंग्रजी शासन आदेश दि. १९ नोव्हेंबर, १९६० रोजी प्रसृत करण्यात आला. त्यात मंडळाची कार्ये निर्देशित करण्यात आली होती. त्यात चौथ्या क्रमांकाचे कार्य नमूद करत म्हटले होते की, "To initiate, assist or undertake scheme for preparation and publication in Marathi of reference literature such as bibliographies, encyeclopaedia, dictionaries etc."[23]

यानुसार सदर मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी नियोजनपूर्वक कार्यास प्रारंभ केला. निरनिराळ्या क्षेत्रातील तज्ज्ञांच्या समित्या स्थापन करणे, त्यांच्यातर्फे कार्यक्रम आखणे सुरू झाले. आधुनिक तंत्रज्ञान व विज्ञानाचा आढावा घेण्यात आला. तो घेत असताना लक्षात आले की, मराठी भाषी उच्चशिक्षित इंग्रजीत

विपुल लिहितात; पण मराठीत नाही. अशांकडून मराठी लिहून घेण्यास प्रारंभ केला. हेतू हा की भविष्यकाळात मराठी कामगार कुशल तंत्रज्ञ व्हावेत, विज्ञान आणि तंत्रज्ञानसंबंधी सामान्यज्ञान सर्वसाधारण मराठी समाजास व्हावे. माध्यमिक आणि उच्च शिक्षणात उपयुक्त माहिती मराठीत उपलब्ध व्हावी. या बरोबरीनेच विविध ज्ञान-विज्ञान क्षेत्रातील विविध विषय स्पर्शी व सर्वविषयसंग्राहक असा मराठी विश्वकोश तयार करण्याचा संकल्प सन १९६२ ला सोडण्यात आला. सतत तीन वर्षे तयारी करण्याचा संकल्प सन १९६२ ला सोडण्यात आला. सतत तीन वर्षे तयारी करून या महत्त्वाकांक्षी मराठी विश्वकोश प्रकल्पाची, रचना, कार्य, लेखन पद्धतीची माहिती सर्वांना व्हावी म्हणून २ एप्रिल, १९६५ ला 'मराठी विश्वकोश परिचय ग्रंथ' प्रकाशित करण्यात आला. त्याचे स्वागत चर्चा, चिकित्सा, टीका करणारी पत्रे, लेख, परीक्षणे मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध झाली. ती इतक्या मोठ्या संख्येने होती की, तत्कालीन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबईस त्यावर आधारित सुमारे १०० पानी पुस्तिका प्रकाशित करणे भाग पडले. तिचे शीर्षक होते, 'मराठी विश्वकोश परिचय ग्रंथ (अभिप्राय, टीका आणि प्रतिटीका)'. ती १९ डिसेंबर, १९६५ ला म्हणजे उपरोक्त ग्रंथ प्रकाशित झाल्यावर सहा-आठ महिन्यांत प्रकाशित करणे मंडळास भाग पडले. ही पुस्तिका म्हणजे मराठी विश्वकोश निर्मिती संबंधी प्रारंभिक पत्रव्यवहारच होय.

'मराठी विश्वकोश परिचय ग्रंथ' सन १९६५ ला प्रकाशित झाला नि लोकांना मराठी विश्वकोशाचे बृहत्स्वरूप लक्षात आले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना मंडळ अध्यक्ष आणि मराठी विश्वकोश संपादक म्हणून अभिनंदन, स्वागत, कौतुक करणारी अनेक पत्रे आली. अशा पत्रात नामदार यशवंतराव चव्हाण, लेफ्टनंट जनरल एस.पी.पी. थोरात, कुलगुरू न. वि. ऊर्फ काकासाहेब गाडगीळ (तत्कालीन पुणे विद्यापीठ), सुविख्यात भाषातज्ज्ञ सुनीतिकुमार चतर्जी, साहित्यकार वि. द. घाटे, सुविख्यात समाजशास्त्री सुमंत मुरंजन श्री. पं. ह. प्रभू (गुजरात विद्यापीठ, अहमदाबाद), प्रा. मो. ल. चंद्रात्रेय (ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणे), शं. रं. देशपांडे, वि. गो. पानसे, (इन्स्टिट्यूट ऑफ ॲग्रिकल्चर रिसर्च स्टॅटॅस्टिक, नवी दिल्ली), सौ. चंद्रकला हाटे, ना. शं. देवधर, प्रा. मं. अ. मेहंदळे (डेक्कन कॉलेज, पुणे), श्रीमती सुशीला घन, प्रा. आर. डी. गुप्ते (रामनारायण रुईया कॉलेज, मुंबई), डी. डी. वाडेकर, प्रभृती मान्यवरांची स्वागतशील पत्रे आली. पैकी प्रातिनिधिक इथे संग्रहित केली आहेत, ती लोकभावना कळावी म्हणून.

उपरोक्त स्वागतशील पत्रांशिवाय तत्कालीन वृत्तपत्रे आणि नियतकालिकांमधून अभ्यासू, समीक्षकादींनी लेख, परीक्षणे लिहिली. अभ्यासू, सुधाकर, अरविंद मंगरूळकर, वैद्य ना. ह. जोशी, सदाशिव आठवले, दि. के. जोशी, शंभूराव धोपाडे ज. नि. कर्वे. प्रभृती मान्यवरांनी व विविध वृत्तपत्रे, नियतकालिके यांच्यावतीने (संपादकीय विभाग) लिहिलेले लेख, परीक्षणे दैनिक महाराष्ट्र टाइम्स, (२७ जून, १९६५) साप्ताहिक साधना (१० जुलै,

१९६५), दैनिक सकाळ व (११ जुलै, १९६५), दैनिक तरुण भारत, पुणे (१८ जुलै, १९६५), दैनिक तरुण भारत, नागपूर (८ ऑगस्ट, १९६५, संपादकीय), महाराष्ट्र साहित्य पत्रिका (त्रैमासिक) (एप्रिल-जुलै, १९६५) दैनिक नवशक्ती (५ व ६ ऑक्टोबर, १९६५), 'चित्रमय जगत, १९६५', दैनिक केसरी (५ जुलै, १९६५), दैनिक केसरी (१२ जुलै, १९६५), दै. विशाल सह्याद्री (१ ऑगस्ट, १९६५), नवभारत (सप्टेंबर, १९६५), दैनिक केसरी, (२८ जुलै, १९६५), दैनिक केसरी (१० ऑगस्ट, १९६५), इ. मधून प्रसिद्ध झाली होती. पैकी लेख प्रतिलेख स्वरूपात झालेला वादविमर्श तेवढाच येथे या संग्रहात समाविष्ट केला आहे. त्यातही तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या प्रतिवादास इथे आवर्जून स्थान देण्यात आले आहे. या सर्व प्रदीर्घ काळात झालेला विचार-विमर्श हा तत्कालीन समाजाची ज्ञानजिज्ञासा व ज्ञान असोशी व्यक्ती करणारा आहे. तो वाचताना लक्षात येते की, पन्नास-साठ वर्षांपूर्वीच्या समाजात ज्ञानसाधकांबद्दल आदर जरूर होता; पण मुकाट कुणाची मतं ग्राह्य मानली जात नसत. लेखक कितीही मोठा असो, सर्वसामान्य माणूस मोठ्या आत्मविश्वासाने प्रतिवाद करायचा. त्यात विरोधासाठी विरोध, वादास विवाद अशी प्रतिकाराची भावना नव्हती. तो होता प्रतिसाद !

स्वागतशील पत्रे वाचत असताना लक्षात येते की, लेफ्टनंट जनरल एस.पी.पी. थोरात यांच्यासारख्या लष्करी पेशातील उच्चाधिकाऱ्यासही ज्ञानविज्ञान शाखांचं आकर्षण होतं, जिज्ञासा होती; पण त्याशिवाय महत्त्वाचं असं की आपण इंग्रजी भाषेत उच्चविद्याविभूषित झालो असलो तरी मातृभाषा मराठीशी असलेली नाळ त्यांनी तुटू दिली नव्हती. उच्च ज्ञान मराठीत उपलब्ध होण्याचा आनंद नि अभिमान त्यांच्या इंग्रजी पत्रातून सर्वत्र झरताना, पाझरताना अनुभवास मिळतो. विश्वकोशाद्वारे मराठीस ज्ञानभाषा करण्याचं स्वप्नं स्वतंत्र मराठी राज्याचे पहिले मुख्यमंत्री व मंडळ संस्थापक नामदार यशवंतराव चव्हाण यांचं प्रारंभिक पत्र म्हणजे एका पहाट स्वप्नाच्या पूर्तीचा त्याचबरोबर येणाऱ्या जबाबदारीचं भान व्यक्त करणारं त्यांचं प्रगल्भ पत्र. या पत्राबद्दल यापूर्वीच महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या पत्रव्यवहार चर्चेत लिहिलं आहे. यात भारतीय भाषाशास्त्रज्ञ प्रा. सुनीती कुमार चतर्जींचं (१८९०-१९७७) दि. ४ सप्टेंबर, १९६५ चं एक पत्र आहे. ते 'मराठी विश्वकोश परिचय ग्रंथ वाचून इतके प्रभावित झाले होते की, पत्रात ते लिहितात, "I have been very fovourably impressed by the general get up as well as by the evidently high quality of the articles. When the entire Encyclopaedia is brought out in this style, it will bring great Kudos to both Indian Scholorship and book production."[२४] पत्रात ते प्रशंसा (Kudos) करून थांबत नाहीत तर मराठी विश्वकोश परिपूर्ण व श्रेष्ठ दर्जाचा व्हावा म्हणून देवनागरी लिपीशिवाय रोमन लिपी पूरक म्हणून वापरल्यास कोशाची उपयुक्तता आंतरराष्ट्रीय दर्जाची होईल व जगभर तो संदर्भ ग्रंथ

म्हणून उपयोगी ठरेल, अशी नम्र सूचनाही करतात. मराठी विश्वकोश रचनेत (नोंदीत) ही सूचना अंमलात आल्याचे कोश अभ्यासताना लक्षात येते.

'मराठी विश्वकोश परिचय ग्रंथ' तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी संपादन करत असताना जो उद्देश मनी बाळगला होता, तो स्पष्ट करत 'संपादकीय निवेदन'मध्ये म्हटले होते की, "निरनिराळ्या क्षेत्रातील विद्वान व इतर वाचकवर्ग यांची मते व अभिप्राय मिळवून त्या मतांवरून व अभिप्रायांवरून, यथोचित सुधारणा करण्यास मार्गदर्शन व्हावे असा हा 'परिचय ग्रंथ' प्रकाशित करण्याचा मुख्य हेतू आहे. त्यामुळे विश्वकोशाच्या लेखकांना व समीक्षक संपादकांना आपल्या कार्याची निश्चित कल्पना येईल व विशेषत: कार्यालयीन कार्यकर्त्यांना प्रशिक्षण मिळेल."[२५] यानुसार आलेली पत्रे, लेख, प्रतिक्रिया यांची गंभीरपणे नोंद घेऊन काहींना विश्वकोश संपादकांनी, समीक्षकांनी तर काहींना स्वत: तर्कतीर्थांनी पत्रे, लेख लिहून शंका निरसन केले. जिथे अज्ञानाने टीका करण्यात आली होती तिथे शास्त्रोक्त रचनेच्या आधारे उत्तरे देऊन टीकाकारांचे अज्ञान दूर करणारे लेख, समीक्षा प्रसिद्ध केल्या. त्यांचे येथे उद्धृत लेख, प्रतिलेख वाचून स्वरूप स्पष्ट होईल. हा सर्व उद्योग तर्कतीर्थांनी केला तो ज्ञानजागरणार्थ ! फ्रान्समध्ये मध्यकाळात जे पुनरुज्जीवन व पुनर्जागरण (Renaissance and Enlightenment) झाले त्यातून एक विश्वकोशीय चळवळ (Encyclopaedic Movement) जन्माला आल्याचे सांगितले गेले आहे नि दिसूनही आले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यापुढे मराठी विश्वकोश निर्मितीमागे तो आदर्श होता. 'मराठी विश्वकोश परिचय ग्रंथ' अशा मराठी ज्ञानसमाज निर्मितीच्या ध्यासातून साकारलेला रीतिग्रंथ (Style Book) होता. तो मराठी विश्वकोशाचा रचनाकल्प (Blue Print) असा होता, तसा लेखक, संपादक, कार्यकर्ते (कर्मचारी नव्हे !) यांच्यासाठी मार्गदर्शक पुस्तकही होते. हा ग्रंथ मराठी विश्वकोशाच्या आज साकारलेल्या व परिपूर्ती झालेल्या एकूण २० खंडांचा आकृतिबंध नि आराखडा होता, हे आजचा समग्र २० खंडीय मराठी विश्वकोश संदर्भार्थ वारंवार अभ्यासताना माझ्यासारख्या जिज्ञासूला पदोपदी लक्षात येते. माझ्या दृष्टीने हीच मराठी विश्वकोश प्रकल्पाची खरी यशस्विता नि फलश्रुती होय. त्यासाठी तर्कतीर्थ व सर्व संपादक, लेखक, समीक्षक, कार्यकर्ते यांना धन्यवाद द्यावेत तितके कमीच म्हणावे लागेल.

याशिवाय 'मराठी विश्वकोश'संबंधी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी विविध मंत्री महोदय, नोंद लेखक, पत्रलेखक यांना लिहिलेली अनेक पत्रे विविध संस्था, व्यक्ती, वृत्तपत्रे, नियतकालिके इ. संपर्क, संदर्भ, शोधातून हाती आली आहेत. त्यातीलही निवडक व आशय, संदर्भ इ. अनुषंगाने महत्त्वाची ठरणारी, संदर्भमूल्य असलेली पत्रेच या पत्रसंग्रहात अंतर्भूत करण्यात आली आहेत. अशा पत्रात मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, मुख्यमंत्री वसंतदादा पाटील, नामदार बॅ. रामराव आदिक, नामदार सुशीलकुमार शिंदे, नामदार अनंतराव थोपटे, साहित्यिक पु. ल. देशपांडे, सौ. सुनीताबाई देशपांडे, अनेक संपादक, लेखक, वाचकांचा हा

पत्रव्यवहार तसा विशालच होता. हाती अल्पच लागला. त्यातीलही निवडक, संदर्भमूल्य असलेली, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी मराठी विश्वकोश प्रकल्प पूर्ण व्हावा म्हणून करत असलेले प्रयत्न लक्षात यावे म्हणून येथे देण्यात आली आहेत. शासकीय पातळीवर अनुदान मिळावे, विविध प्रकाशन समारंभाला पाहुणे मिळावेत, मान्यवरांची अभिरुची पाहून त्यांना आपल्या उपक्रम, समारंभात सहभागी होण्याची निमंत्रणे, विश्वकोश नोंदीसंबंधी नोंद लेखक पत्रव्यवहार (पु. ल. आणि सुनीताबाई), संपादक, नवशक्तीशिवाय नोंदीतील मजकुरांना आक्षेप घेणाऱ्या पत्रांना खुलासेवार उत्तर नि त्यांचे कोशीय लेखन पद्धतीसंबंधीचे प्रबोधन व प्रशिक्षण असे या पत्रव्यवहाराचे स्वरूप आहे. त्यात आत्मीयता आहे, तत्त्वनिष्ठा आहे व ज्ञानाच्या शिस्तीशी तडजोड न करण्याचा बाणाही प्रतिबिंबित होतो. मान. दादासाहेब रूपवते यांच्या नेमणुकीसंदर्भात नामदार भारदे यांचे मत आणि "एखादा सुशिक्षित मनुष्य विद्वान होऊ इच्छित असेल, त्याला तात्त्विक चिंतन मननाची हौस असेल तर अशा सुशिक्षित व्यक्तींना विश्वकोशात करण्यासारखे पुष्कळ काम आहे." असा तर्कतीर्थांचा दृष्टिकोन. दुसरीकडे पु. ल. देशपांडे यांना 'दि. के. बेडेकरांसंबंधी माझा अनुभव वाईट आहे. त्यामुळे मला तडजोडीचा मार्ग दिसत नाही व कोणी काढू शकेल असे वाटत नाही." अशी स्पष्टोक्ती पु. ल. नि सुनीताबाईंच्या पत्रातील खानदानी नम्रता, विश्वकोश कार्यक्रमासाठी साहित्य अकादमी अध्यक्ष डॉ. उमाशंकर जोशी यावे म्हणून प्रयत्न, कुमार गंधर्वांच्या गाण्याच्या मैफलीसाठी सुशीलकुमार शिंदे यांना येण्याचा आग्रह या सर्वांतून तर्कतीर्थांचे सुसंस्कृत, प्रांजळ व्यक्तिमत्त्व अनुभवास येत राहते.

## १२) मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय पत्रव्यवहार

मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई, सेंटर फॉर दि स्टडी ऑफ सोशल चेंज, मुंबई, इंडियन रॅडिकल ह्युमॅनिस्ट असोसिएशन मुंबई अशा अनेक संस्थांशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा निकटचा संबंध होता. यापैकी काही संस्थांचे ते स्थापना काळापासून संबंधित होते, तर काही संस्था ऊर्जितावस्थेत आणण्यात तर्कतीर्थांचा सिंहाचा वाटा होता. अशा ऊर्जितावस्थेत आणलेल्या संस्थांपैकी एक संस्था म्हणजे मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय होय. इथे काही काळ साहित्य संस्कृती मंडळाचे कार्य चालत असे. सन १९८८ ते १९९४ या काळात तर्कतीर्थ या संस्थेचे अध्यक्ष होते. तत्पूर्वी ते अनेक वर्षे उपाध्यक्ष म्हणूनही कार्यरत होते. या संस्थेच्या गावसकर सभागृहात तर्कतीर्थांची अनेक भाषणे, चर्चासत्रे, प्रकाशन समारंभ झाले आहेत. तर्कतीर्थांची अनेक भाषणे, चर्चासत्रे, प्रकाशन समारंभ झाले आहेत. तर्कतीर्थ अध्यक्ष असल्याच्या काळात मान. नामदार शरदराव पवार उपाध्यक्ष म्हणून सक्रिय होते. या काळातले एक स्वयंस्पष्ट पत्र या खंडात आहे. ७ सप्टेंबर, १९९३ च्या या पत्रानुसार लक्षात येते की, तर्कतीर्थांच्या विनंतीनुसार नामदार शरद पवार यांनी मुख्यमंत्री निधीतून २५ लक्ष रुपयांचे साहाय्य देऊ केले होते. पैकी दहा लक्ष रुपये प्राप्त झाले असून उर्वरित निधी

मिळण्याची यात विनंती आहे.

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय हे महाराष्ट्रातील एकमेव मराठी महाग्रंथालय असून ते दुर्मीळ संदर्भांचे मुख्य स्रोत म्हणून वर्षानवर्षे सक्रिय आहे. संशोधकांना वरदान ठरलेल्या या केंद्राने केवळ संदर्भ पुरवले नाहीत तर निर्माणही केले आहेत. 'संग्रहालय' नावाचे नियतकालिक मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाने अनेक वर्षे चालवले. यात पूर्वीच्या महिन्यातील सर्व नियतकालिक लेखांची वर्गवार सूची प्रकाशित होत असे. ती 'वाचनालय' मासिकात ही असायची. दाते ग्रंथसूचीचे काही खंड मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाने प्रकाशित केले. पुढील काही खंड तयार असून निधीअभावी ते अप्रकाशित आहेत. नियतकालिक सूची खंड निर्मितीसही या ग्रंथसंग्रहालयाचा मोठा हातभार लागला आहे. या मागची विकास दृष्टी होती ती तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचीच. आजही हे ग्रंथसंग्रहालय 'मराठी महासंदर्भ केंद्र' म्हणून कार्यरत आहे.

## १३) किसन वीर महाविद्यालय, वाई : पत्रव्यवहार

वाई, जि. सातारा येथे बहुजन समाजातील विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक डॉ. बापूजी साळुंखे अनेक वर्षे प्रयत्न करत होते; पण त्यांना त्यावेळी अपेक्षित यश आले नाही. म्हणून मग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरची स्थापना झाल्यावर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, आमदार किसन वीर यांनी जनता शिक्षण संस्थेची स्थापना करून प्रयत्न केले नि त्यास यश आले. सन १९६२ मध्ये आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज, वाई सुरू झाले. त्याकाळात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या संपर्क व प्रयत्नांतून अनेक मान्यवरांनी महाविद्यालय स्थापना व विकास काळात भेटी दिल्या. पत्राद्वारे, अभिप्रायांद्वारे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यापर्यंत आपल्या भावना पोहोचवल्या. वेळोवेळी पाठवलेली पत्रे, अभिप्राय महाविद्यालयाच्या 'कृष्णाई' नियतकालिकाच्या सन १९६४ च्या अंकात प्रसिद्ध झाले होते. ते येथे संकलित करण्यात आले आहे. हेतू हा की तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची शिक्षणविषयीची समाजदृष्टी लक्षात यावी. या अभिप्राय पत्रांत महामहोपाध्याय प्रा. दत्तो वामन पोतदार (कुलगुरू, पुणे विद्यापीठ), न. वि. तथा काकासाहेब गाडगीळ (काँग्रेस कार्यकर्ते व माजी कुलगुरू, पुणे विद्यापीठ) महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व संरक्षणमंत्री भारत सरकार नामदार यशवंतराव चव्हाण यांची ही अभिप्राय पत्रे म्हणजे तर्कतीर्थांच्या शिक्षण कार्याची प्रशंसा. आज हे महाविद्यालय किसन वीर महाविद्यालय म्हणून नामांतर होऊन लोकादरास पात्र ठरले आहे.

न. वि. तथा काकासाहेब गाडगीळ यांनी आपल्या पत्रात लिहिले आहे, "आधुनिक युगास अनुसरून आता इष्ट ते बदल होत आहेत व त्याचाच एक भाग म्हणजे हे महाविद्यालय आहे. आजच्या जगात विज्ञानशिवाय समृद्धी नाही व ज्ञानाशिवाय मानसिक समाधान नाही. म्हणून ज्ञान आणि विज्ञान या दोन्ही क्षेत्रांत या विद्यालयाने काम करावे व श्रद्धायुक्त प्रयत्नांनी करावे

आणि आज तशा प्रयत्नांची देशाला जरूरी आहे.” ही अपेक्षा फलद्रुप करत एकेकाळी प्राचीन वाङ्मय साहित्य नि संस्कृतीचे ऊर्जा व अध्ययन केंद्र असलेले हे वाई गाव या महाविद्यालयामुळे आधुनिक शिक्षणाचे महाद्वार झाले आहे.

## १४) नामदार यशवंतराव चव्हाण पत्रव्यवहार

नामदार यशवंतराव चव्हाण, साहित्यिक पु. ल. देशपांडे, समाजसेवक बाबा आमटे, नामदार बाळासाहेब देसाई, मुख्यमंत्री वसंतदादा पाटील, न. वि. तथा काकासाहेब गाडगीळ, आचार्य विनोबा भावे, महात्मा गांधी, पंतप्रधान इंदिरा गांधी, डॉ. करण सिंह, पन्नालाल सुराणा, प्रा. मे. पुं. रेगे, महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार, विद्वद्रत्न डॉ. के. ल. दप्तरी, डॉ. सुमंत मुरंजन असा विस्तृत पत्रव्यवहार तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा होता. ते सार्वजनिक चरित्र होते. त्यांचा नित्य सर्वदूर संचार असे. महिन्यात तीन-तीन आठवडे फिरती व्हायची. व्यक्तींसह संस्था, संघटना, ग्रंथालये, शिक्षण संस्था, विद्यापीठे, व्याख्यानमाला, साहित्य संमेलनात त्यांची उपस्थिती अटळ असायची. अशांचा विस्तृत पत्रव्यवहार विविध स्रोतांतून शोधकार्यात हाती आला. पैकी काही इथे या खंडात संग्रहित आहेत.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे अध्यक्ष मान. शरद पवार आणि प्रतिष्ठानचे सरचिटणीस मान. शरद काळे (निवृत्त भाप्रसे) यांनी उदारपणे नि तत्परतेने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आणि नामदार यशवंतराव चव्हाण यांच्यामधील सन १९५९ ते १९८४ अशा सुमारे २५ वर्षांतील प्रदीर्घ पत्रव्यवहार उपलबध करून दिल्याबद्दल मी पुन्हा एकदा कृतज्ञ ऋण व्यक्त करतो.

यशवंतराव चव्हाण आणि तर्कतीर्थ यांच्या निकट साहचर्य व संबंधांबद्दल अनेक वदंता नि प्रवाह ऐकण्यास मिळतात. पैकी प्रमुख म्हणजे तर्कतीर्थ हे यशवंतरावांचे राजकीय गुरू होत. हे आपण समजून घेतले पाहिजे की, यशवंतराव चव्हाण हे उपजत एक प्रगल्भ, सुजाण नि सुसंस्कृत व्यक्ती होते. ते ऐन तारुण्यात असताना, खरंतर शाळकरी विद्यार्थी असतानाच्या काळात कृष्णाकाठी, प्रीतिसंगमावर त्यांनी पंडित लक्ष्मणशास्त्री यांची स्वातंत्र्य चळवळीवरील प्रेरक व्याख्याने सलग आठवडाभर ऐकली. काकासाहेब गाडगीळांची अशी भाषणे ऐकली व स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय झाले. याच सार्थ वर्णन यशवंतराव चव्हाण यांच्या ‘कृष्णाकाठ’ आत्मचरित्रात व त्यांनी लिहिलेल्या तर्कतीर्थांसंबंधी लेखनातून पुरेसे स्पष्ट होते.

तर्कतीर्थांचा राजकीय प्रवास आणि यशवंतराव चव्हाण यांची राजकीय कारकीर्द ही सहयात्री, सहप्रवासी अशीच राहिली आहे. यशवंतराव चव्हाण आजीवन काँग्रेसी राहिले तर तर्कतीर्थांमध्ये कालानुरूप मतांतरे, वेषांतरे आणि स्थित्यंतरे होत राहिली तरी उभयतांमध्ये स्नेहसंबंध अतूट राहिले. वाटा भिन्न तरी ध्येय एक असे त्यांच्या संबंधांचे रूप राहिले आहे. यशवंतराव चव्हाणांच्या मनात तर्कतीर्थांच्या विद्वत्तेबद्दल आदर होता, हे मात्र खरे.

पत्रव्यवहारातून हे पुरेसे स्पष्ट होते की, तर्कतीर्थ हे यशवंतरावांचे सन १९५० पासून कट्टर समर्थक, सहकारी राहिले आहेत. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आत्मचरित्र असे स्वतंत्र लेखन केले नसले तरी त्यांचे आत्मपर लेखन पत्र, मुलाखती, लेख, भाषणे इ. रूपात उपलब्ध आहे. 'राजकीय सहयात्री'[२६] शीर्षक एक लेख तर्कतीर्थांनी यशवंतराव चव्हाण यांच्यावर लिहिला आहे. त्यात त्यांनी स्पष्ट केले आहे की, रॉयवादी असलेल्या तर्कतीर्थांनी सन १९४८ मध्ये रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टीच्या विसर्जनानंतर पुन्हा काँग्रेसशी सलगी करत मित्रांच्या आग्रहावरून काँग्रेसमध्ये प्रवेश केला. (१९५०) सन १९५२ महाराष्ट्र काँग्रेस प्रांतिक समितीवर सातारा जिल्ह्यातून निवडून गेले. सन १९५२ ला पुण्यात काँग्रेस भवनमध्ये बैठक होती. बैठकीत तर्कतीर्थ यशवंतराव चव्हाण यांच्या मागे बसले होते. ते यशवंतराव चव्हाण यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी त्यांना पुढे येऊन बसण्याचा आग्रह केला. तेव्हा तर्कतीर्थ त्यांना म्हणाले, 'मी पाठीशी राहण्याकरताच आलो आहे.' हा शब्द तर्कतीर्थांनी आयुष्यभर जपला. संयुक्त महाराष्ट्र लढ्यात यशवंतरावांचे समर्थक म्हणून त्यांना मोठी मानहानी सहन करावी लागली. तर्कतीर्थांनी ती काँग्रेस व मित्र प्रेमापोटी सोसली. बराचसा उभयतांमधील पत्रव्यवहार सन १९६० नंतरचा असला तरी अगोदरही तो होत असणार, पण उपलब्ध पत्रव्यवहाराच्या व संदर्भांच्या आधारे हे म्हणता येते की, वयात १३ वर्षांचे अंतर असले तरी सहभाव होता दोघे एकमेकांस 'प्रिय' संबोधून पत्रव्यवहार करताना दिसतात. दोघे पत्राची समाप्ती 'आपला स्नेहांकित' असा करताना लक्षात येते. पत्रांतून तर्कतीर्थ वडीलकीच्या नात्याने सल्ले, मार्गदर्शन, विनंती करीत राहतात. यशवंतराव चव्हाण ते सर्व ऐकून स्वप्रज्ञेने व स्वतंत्रपणे निर्णय घेतात. सर्वच ऐकतात असे नाही. तरी दोघात अंतर पडत नाही. उलटपक्षी एकमेकाच्या आदर, सहकार्याचीच भावना दिसते.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी यशवंतराव चव्हाण यांना जी पत्रे लिहिली आहेत त्यापैकी १ जानेवारी, १९५९ च्या पत्रात मुंबई सरकारचे मुख्यमंत्री म्हणून शिक्षण खात्यातर्फे तर्कतीर्थांच्या विनंतीवरून आपले गुरू श्री ब्रह्मीभूत केवलानंद सरस्वती स्मारकासाठी एक लाख एकोणऐंशी हजार रुपयांचा निधी मंजूर झाल्याबद्दल आनंद व कृतज्ञता भाव आहे. सदरचे पत्र तर्कतीर्थ स्वत:च्या हस्ताक्षरात लिहून आत्मभाव व्यक्त करताना दिसतात. यात तर्कतीर्थ म्हणतात, ''आपल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त कशी करावी हेच मला समजत नाही; शब्द अपुरे पडतात. कारण माझ्यावर गुरूंचे जे न फिटणारे ऋण आहे. त्यासंबंधी प्राप्त होणारे एक कर्तव्य पार पाडण्यास आपले संपूर्ण साहाय्य झाले आहे. आपणाशिवाय एवढे अनुदान प्राप्त झाले नसते.'' म्हणत सर्व श्रेय यशवंतराव चव्हाण यांना देतात.

काही व्यक्तिगत पत्रेही तर्कतीर्थ यशवंतरावांना लिहीत राहतात. तीही अशी स्वहस्ताक्षरातच असतात. काही पत्रात निवडणूक प्रचार, राजकीय जनमताचा कौल, बदलते वातावरण यांची माहितीही ते आपल्या स्नेह्यास देणे आपले कर्तव्य मानतात.

आपला मित्र मुख्यमंत्री झाल्याने त्याचा आपल्याइतका जनतेशी प्रत्यक्ष संपर्क कमी झाला तरी त्यास परिस्थितीचे भान करून देणे तर्कतीर्थ आपल्या मित्र कर्तव्याचा भाग मानतात. २ फेब्रुवारी, १९६२ चे एक पत्र आहे. शिक्षण सचिव असलेले पां. ज. चिन्मुळगुंद हे स्वत: लिहिणारे-वाचणारे गृहस्थ होते. तर्कतीर्थांचे साहित्य-संस्कृती मंडळ त्यांच्याच अखत्यारित. यांच्या स्नेहसंबंधाचे अकृत्रिम वर्णन साहित्य संस्कृती मंडळाचे कार्यालयीन मुख्य असलेल्या साहित्यिक रवींद्र पिंगे यांनी आपल्या 'देवाघरचा पाऊस'[२७] आठवण संग्रहात 'तर्कतीर्थ' शीर्षक लेखात मार्मिकपणे केले आहे. त्यात तर्कतीर्थांच्या अंगात साहित्य आणि संस्कृती मंडळ कसे संचारले असायचे ते लक्षात येते. त्यावेळी काँग्रेसतर्फे तर्कतीर्थांना राज्यसभेवर पाठवायचे घाटत असल्याचा उल्लेख आहे. त्यासंदर्भात तर्कतीर्थ रवींद्र पिंगे यांना म्हणतात, "विश्वकोशाची योजना मंजूर होणार नं? कारण मला पार्लमेंटात पाठवायचं म्हणताहेत; पण मला त्यात इंटरेस्ट नाही. विश्वकोशाची जुळणी होत असेल तर मला पार्लमेंटातली सीट नको. राज्यसभेवर जाऊन काय करू? विश्वकोश हे भाषेचे काम आहे. आता मी साठ वर्षांचा झालो आहे. प्रकृती उत्तम आहे. तेव्हा जी काही पुढची दहा-पंधरा वर्षे मिळायची असतील ती मला हे थोर काम तडीला नेण्यासाठी घालवायची आहेत. विश्वकोश हे आयुष्याचं काम होणार आहे, त्या दृष्टीने काय ते ठरवा." राजकारणापेक्षा ज्ञानसाधना, साहित्यसेवा, भाषाव्यासंग हेच तर्कतीर्थांचं खरं जीवन होतं. यशवंतराव चव्हाण तर्कतीर्थांचा आदर करीत ते या त्यांच्या बलस्थानामुळे. तो यशवंतराव चव्हाण यांनी शास्त्रीजींना लिहिलेल्या पत्रांमधून लक्षात येतो. तर्कतीर्थांच्या या प्रकृतीवर अधिक प्रकाश पाडणारं एक वक्तव्य/विधान माझ्या वाचनात आहे. ते यासंदर्भात लक्षात घ्यायलाच हवे. श्रीदीपलक्ष्मी मासिकाने आपल्या मार्च, १९६१ च्या अंकात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना त्यांच्या षष्ट्यब्दीपूर्तीनिमित्त एक अनावृत्त मानपत्र बहाल केलं आहे. ते या पत्रसंग्रहात 'सन्मानपत्रं' मध्ये अंतर्भूत आहे. त्याची रचना, संदर्भ, वाक्यावली पाहता ते तर्कतीर्थांचे सहाध्यायी असलेल्या श्री. शं. नवरे यांनी लिहिलं असावं. कारण ते त्यावेळी 'श्री दीपलक्ष्मी' मासिकाशी संबद्ध होते. त्यात एके ठिकाणी म्हटलं आहे, "आपल्याला राजकारणाचे आकर्षण नसले तरी तो आपला धर्म नसून आपद्धर्म आहे. आपण राजकारणातही वावरत असल्यामुळे केवळ 'तप: स्वाध्याय निरत' असे आपले वर्णन करणे बरोबर होणार नाही; पण तप आणि स्वाध्याय यांच्यापासून आपण कधीही विन्मुख असत नाही. अध्ययन हाच आपला धर्म आहे, त्यामुळे आकाशात भरारी मारली तरी पक्षी जसा घरट्यातच येऊन विसावतो, तसे आपण राजकीय आकाशात भरारी मारली तरी अखेर प्राज्ञपाठशाळेतच येऊन बसता. इतकेच नव्हे तर आपले राजकीय व सामाजिक चळवळीतले उद्योग कितीही झाले तरी आपण प्राज्ञपाठशाळेशी असलेला आपला संबंध कधीच सोडला नाही. राजकीय धमालीपेक्षा धर्मकोशाच्या संवादातच आपल्याला तुष्टी प्राप्त होते. यशवंतराव चव्हाण हे सर्व जाणून होते.''

सन १९६२ च्या प्रारंभीचा काळ हा सार्वत्रिक निवडणुकीचा होता. तर्कतीर्थ राज्यभर प्रचार दौऱ्यात भाषणे देत फिरत. त्याचा अहवाल ते पत्रांद्वारे यशवंतराव चव्हाण यांना वेळोवेळी देत असत, असे अनेक पत्रांतून लक्षात येते. अशा पत्रांमधून आगामी पक्ष नियोजन, कार्यपद्धती, धोरण, मंत्रिमंडळ रचना याबाबत तर्कतीर्थ मोकळेपणाने लिहिताना दिसतात. त्यातून या उभयतांची Wave Lenth एकच असल्याचाचे प्रत्ययास येते. दि. २७ फेब्रुवारी, १९६२ चे तर्कतीर्थांचे यशवंतराव चव्हाण यांना लिहिलेले पत्र वाचले की याची प्रचीती येईल.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी यशवंतराव चव्हाण यांना १३ मार्च, १९६२ ला लिहिलेलं एक पत्र या खंडात आहे. त्यात महाराष्ट्र काँग्रेसचे तत्कालीन भारतीय काँग्रेसमधील स्थान बालेकिल्ल्यासारखे असल्याचा उल्लेख करत एक दृष्टान्त देण्यात आला आहे. त्यानुसार "शिखरावर वस्तू फार वेळ टिकाव धरू शकत नाही असे म्हणतात; परंतु एका शिखरावरून अधिक वरच्या शिखरावर जाण्याचा प्रयत्न सुरू झाला तर मात्र वस्तू पहिल्या शिखरावरून खाली घसरत नाही." या पत्रास यशवंतराव चव्हाण उत्तर देत 'शिखरावरील वस्तूचा दृष्टांत हृद्य वाटला; असे कळवतात.

या काळात शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरची स्थापना प्रक्रिया सुरू होती. तर्कतीर्थ या संदर्भात वेळोवेळी पत्रे लिहून विविध नावे सुचवत आपले तर्क देतात. अशा नावात मेजर जनरल एस.पी.पी. थोरात, डॉ. सुमंत मुरंजन, डॉ. जयंत नारळीकर, प्रा. दि. धों. कर्वे प्रभृतींचा समावेश असतो. यशवंतराव चव्हाण आपल्या उत्तरात अत्यंत संयतपणे लिहितात, "होऊ घातलेल्या कोल्हापूर विद्यापीठाबाबतचे आपले विचार व तत्संबंधी दक्षता घेण्याबाबतची आपली सूचना कळली." तर्कतीर्थांची योग्य ती गोष्टच यशवंतराव चव्हाण स्वीकारित हे यातून पुरेसे स्पष्ट होते. आपणाला कुणी गृहीत धरू नये अशी दक्षता यशवंतराव चव्हाण बाळगत असत. त्यांची उत्तरे म्हणजे 'समझने वाले को इशारा काफी' अशी असत.

काही पत्रांमधून तर्कतीर्थ विशुद्ध राजकीय दृष्टीने आपले विचार व्यक्त करत. ४ मे, १९६२ चे असेच एक पत्र आहे. पत्राचा विषय 'आर्थिक स्वयंपूर्णता' आहे. त्याला २२ मे, १९६२ ला उत्तर दिले आहे. मूळ पत्रात तर्कतीर्थांनी महात्मा गांधींच्या 'आर्थिक स्वयंपूर्णता' संबंधी विवेचन आहे. संदर्भ स्थानिक स्वयंपूर्णतेचा आहे. पंचायत राज्य व्यवस्थेत नियोजन व समालोचनाचे महत्त्व अधोरेखित केलेले आहे. त्यात म्हटले होते की, "प्रत्यक्ष कार्याचा उठाव हेच कर्तबगारीचे मोजमाप देणारे. या मंडळींना व्यावहारिक (PRACTICAL) आणि तात्त्विक (THEORETICAL) असे ज्ञान देण्याची कायमस्वरूपाची व्यवस्था होणे आवश्यक आहे. कर्म व ज्ञान यांची जोडी ('गीतारहस्य'च्या परिभाषेप्रमाणे 'ज्ञानकर्मसमुच्चय') पक्षाच्या दोन पंखांप्रमाणे उपयोगी पडते." उत्तरादाखल पत्रात (२२ मे, १९६२) यशवंतराव चव्हाण म्हणतात, 'कर्म व ज्ञान यांना पक्षाच्या दोन पंखांची जी उपमा आपण दिली ती सुंदर व समर्पक वाटली.' हे उत्तर पूर्ण सहमतीचे आहे.

गोवा स्वतंत्र झाल्यानंतरच्या परिस्थितीची जाणीव करून देणारी तर्कतीर्थांची दि. २५ ऑगस्ट, १९६२, १२ डिसेंबर, १९६३, २० ऑक्टोबर, १९६२ आणि १५ नोव्हेंबर, १९६२ ची पत्रे तर्कतीर्थांच्या प्रगल्भ राजकीय जाणेची द्योतक होत.

यशवंतराव चव्हाण आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी केवळ राजकीय सहयात्री नव्हते तर जीवन सुहृद्य होते. यशवंतराव चव्हाण यांच्या मातोश्रींचे निधन, पुत्रवत सांभाळलेल्या मानसपुत्राचे निधन, पत्नी वेणुताईचं जाणं अशा प्रसंगात तर्कतीर्थांनी जी हृद्य पत्र लिहिली, यशवंतराव चव्हाण यांनी त्या पत्रांना दिलेली उत्तरेही तितकीच आत्मीय होती. यशवंतराव चव्हाण यांच्यावर राजकीय विजनवासातल्या काळात लिहिलेली पत्रे ही उभयतांमधील अनुबंध अधोरेखित करतात.

राष्ट्रीय काँग्रेसचे विभाजन होऊन दोन काँग्रेस पक्ष झाले. सिंडिकेट आणि इंडिकेट. यशवंतराव चव्हाण यांनी सिंडिकेटची वाट धरली. आणीबाणीनंतरच्या काळात जनता पक्षाचा विजय होऊन आलेल्या मंत्रिमंडळात चौधरी चरणसिंगाच्या औटघटकेच्या सरकारात ते उपपंतप्रधान होते. १९८० च्या सार्वत्रिक निवडणुकीत इंदिरा गांधींच्या काँग्रेसला बहुमत मिळालं. यशवंतराव चव्हाण यांनी राजकारणाच्या मध्य प्रवाहात येण्यासाठी इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश करायचं ठरवलं. इंदिरा गांधींनी त्यांना ताटकळत ठेवलं. अशा काळातली तर्कतीर्थांची अनेक पत्रे मित्राच्या विजनवासात भागीदारी करणारी असली तरी राजकीय निर्णयाच्या विषयी चिकित्सा करणारी म्हणून महत्त्वाची ठरतात. दि. ३ ऑगस्ट, १९८१ चे पत्र महत्त्वपूर्ण खरे ! त्यात इंदिरा काँग्रेस प्रवेश लांबल्याबद्दल चिंता आहे. त्यात तर्कतीर्थांनी म्हटले होते की, "यश आणि अपयश, मान आणि अपमान या द्वंद्वांना विशेष महत्त्व नाही. त्यांना महत्त्व आहे ते केवळ आपल्या स्वतःच्या आचरणाचे व कृतीचे मूल्यमापन करण्याकरिता. हा दृष्टिकोन मला भगवद्गीतेपासून मिळाला आहे. कारण भगवद्गीताही राजनीतीशास्त्रातून निघालेली परमार्थ नीती होय. राजनीतीशास्त्राचे अधिष्ठान असलेली परमार्थ नीती त्यात सांगितली आहे. ख्रिस्ताने म्हटले आहे, 'दार ठोठवा म्हणजे उघडेल.' यावर माझे म्हणणे असे की, 'दारापर्यंत जावे. दार ठोठवावे. नाही उघडले तर उघड्यावर बसावे.' महाराष्ट्राची हवा समशीतोष्ण असल्यामुळे उघड्यावर बसले तरी हरकत नाही." या पत्रास यशवंतराव चव्हाण यांनी २ सप्टेंबर, १९८१ ला उत्तर दिले आहे. त्यात ते म्हणतात, "तुमची दोन्ही पत्रे मिळाली. ती मी आनंदाने वाचली. राजकीय निर्णयांचे परिणाम दूरगामी असतात. मला कसलीही घाई झालेली नाही. आजच्या पक्ष राजकारणाच्या विश्लेषणाने मी घेतलेला निर्णय बरोबर आहे, असे मला वाटते आणि तुम्ही म्हणता ते बरोबर आहे की, दार उघडत नाही तोवर उघड्यावर बसावे. माझ्या मनाची ही तयारी करूनच मी हा निर्णय घेतलेला आहे." यासंदर्भात आपण एक गोष्ट लक्षात घेतली

पाहिजे की, एकाच परिस्थितीची आकलने भिन्न असतात. प्रत्येकाचे आकलन हा ज्याचा त्याचा वकुब व दृष्टिकोन यावर अवलंबून असतो. काळ हे प्रश्नाचे खरे उत्तर असते.

या खंडात तर्कतीर्थांच्या पत्रांच्या संदर्भातील यशवंतराव चव्हाण यांची काही पत्रे अंतर्भूत केलेली आहेत. त्यातून यशवंतराव चव्हाण यांची तर्कतीर्थांप्रती असलेली प्रीती स्पष्ट होते. शिवाय मराठी प्रेम, सहकार्यास सदैव तत्परतेची वृत्ती, व्यक्तींबद्दलची त्यांची स्वतःची निरीक्षणे, स्वमतावर ठाम राहण्याची वृत्ती, स्वतंत्र मत, निर्णयाची क्षमता याबरोबरीने इतरांचा आदर करण्याची भावना प्रकर्षाने पुढे येते. सत्ता हे लोकसेवेचे माध्यम मानून यशवंतराव चव्हाण यांनी कार्य केले. तर्कतीर्थांनी आपल्या जीवनात राजकारणास आपल्या जीवन ध्येयाच्या पूर्ततेचे साधन मानून स्वीकार केला. तो करत असताना स्वार्थापेक्षा व्यापक हितभावना जपली. व्यक्तिगत संबंध भिडेने जपले. बऱ्याचदा माणूस सार्वजनिक झाला की त्याच्या व्यक्तिगत मतास फारशी किंमत राहत नाही. लोकभावना प्रमाण मानून न पटलेले प्रश्न हाती घेऊन तडीस न्यावे लागतात. सत्तेच्या वळचणीत राहण्याचे फायदे असतात, तसे तोटे ही. अशा प्रश्नी नैतिकता, तत्त्व यापेक्षा व्यवहार वरचढ ठरत जातो. राजकीय गरज म्हणून व्यक्तिगत मतास मुरड घालत जगावे, वागावे लागते, हा या सर्व पत्रव्यवहाराचा निष्कर्ष होय.

## १५) विविध मान्यवरांशी तर्कतीर्थांचा पत्रव्यवहार

### रा. ज. देशमुख (मराठी प्रकाशक)

'प्रकाशक रा. ज. देशमुख' शीर्षक ग्रंथ रा. ज. देशमुख निवर्तल्यानंतर सुमारे दशकभराने प्रकाशित झाला. साधारणपणे १९९५-९६ ला ते मूळचे मराठवाड्यातील. त्यांचा हैदराबाद मुक्ती संग्रामाशी संबंध होता. रझाकारांची जुलमी राजवट उलथवून टाकण्यासाठी सशस्त्र लढ्याचे जे प्रयत्न सुरू होते त्यात बाबासाहेब परांजपे व रा. ज. देशमुख सक्रिय होते. त्यांनी पुण्यात हात बॉम्ब तयार करण्याचा कारखाना चालवला होता. तयार बॉम्बची वाहतूक करणे व ते इच्छित स्थळी पोहोचवण्याचे कार्य देशमुख करत. ३० जानेवारी, १९४८ ला महात्मा गांधींची हत्या झाली. त्या हत्येच्या शोधात बडगे नावाचा इसम पोलिसांच्या हाती लागला. त्याच्या जबानीवरून पोलिसांनी बाबासाहेब परांजपे, कॉंटिनेंटल प्रकाशनचे अनंतराव कुलकर्णी व देशमुख आणि कंपनीचे रा. ज. देशमुख यांना अटक करून त्यांची रवानगी येरवडा तुरुंगात केली. या उभय प्रकाशकांचा व्यवसाय त्यांच्या गैरहजेरीत श्रीविद्या प्रकाशनचे मधुकाका कुलकर्णी सांभाळू लागले. देशमुख तुरुंगातून पत्रव्यवहार करीत व्यवसाय बघत. अशात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे दि. ७ मे, १९४८ चे पत्र देशमुखांना मिळाले. ते या खंडात आहे. ते वाचले की लक्षात येते, तर्कतीर्थ स्वतः पूर्वी अशा लढ्यात सामील असल्याने त्यांना याची कल्पना होती. तर्कतीर्थ आपली 'ज्योतिनिबंध', 'महात्मा गांधी', 'धर्म आणि समाज', 'हिंदुधर्माची समीक्षा'सारखी पुस्तके देशमुख आणि कंपनीने काढावीत

म्हणून प्रयत्नशील होते. देशमुख आणि कंपनीने तशी जाहिरातही केली होती. पण तो योग काही जुळून आला नाही. या पत्रात सत्यशोधक समाज, वाईचे रा. ना. चव्हाण, ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर चळवळ व राजकीय पक्षाचे केशवराव जेधे, शंकरराव मोरे यांचे उल्लेख व संदर्भ महात्मा फुले यांच्या अनुषंगाने आहे. ब्राह्मणेत्तर पक्ष स्थापनेचे सुतोवाच आहे. सर्वांत महत्त्वाचे आहे ते तर्कतीर्थांचे निरीक्षण व चिंतन. तसेच परिस्थितीचे आकलनही. या पत्रात तर्कतीर्थ म्हणतात, "जेधे यांचा उद्देश ब्राह्मणेत्तर पक्ष काढायचा दिसतो. नाव तेवढे निराळे राहील. त्यांच्या बऱ्याच तक्रारी महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील ब्राह्मणीवृत्तीचे डोळे उघडण्यास मदतच होईल. जाळपोळीनेही डोळे फारसे उघडले आहेत, असे नाही; परंतु डोळे लवकर उघडल्यास महाराष्ट्रातील यादवी टाळता येईल. फुले चरित्राचा उद्देश यादवी टाळण्याचा आहे."

उपरोक्त विधानातील अध्याहृत [अनुमानित अर्थ, सूचकार्थ (Inferred or unsaid)] समजून घेणे आवश्यक आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सत्यशोधक समाज, वाईच्या रौप्य महोत्सवानिमित्त तीन व्याख्याने दिली होती ती १८, १९ व २० जून, १९४६ रोजी संपन्न झाली. त्याचे अनुक्रमे विषय होते. १) सत्यशोधक समाज व महात्मा फुले, २) सत्यशोधक समाज व ब्राह्म समाज, ३) शेतकरी व कामकरी जनतेचे स्वराज्य. पैकी पहिले व्याख्यान प्रभावी झाल्याने नोव्हेंबर, १९४७ मध्ये प्राज्ञपाठशाळा मंडळ, 'वाईने ज्योति-निबंध नावाने प्रकाशित केले. त्याला सत्यशोधक समाज, वाईचे सत्यशोधक कार्यकर्ते रा. ना. चव्हाण यांची छोटीशी प्रस्तावना आहे. याचा विस्तार करून चरित्र लिहिण्याची तर्कतीर्थांची त्यावेळी कल्पना होती. त्या दृष्टीने ते संदर्भ गोळा करत होते; पण त्यावेळी अपूर्ण राहिलेले हे चरित्र पुढे तर्कतीर्थांनी महात्मा फुले स्मृतिशताब्दी (१९९०) आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी (१९९१) चे संयुक्त औचित्य साधून पूर्ण केले व ते नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, नवी दिल्लीने मराठी, हिंदी, इंग्रजीत प्रकाशित केले.

यातील दुसरे व्याख्यान 'सत्यशोधक समाज व ब्राह्म समाज' नवभारत मासिकाच्या फेब्रुवारी, १९५४ च्या अंकात पुढे प्रकाशित झाले. ते तर्कतीर्थांच्या नियोजित 'ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर चळवळीचा इतिहास' ग्रंथाचे प्राप्त एकमेव प्रकरण होय. शिवाय तर्कतीर्थांनी 'ब्राह्मणेत्तर चळवळ' शीर्षक एक लेख 'भारतीय प्रबोधन' या शंकरराव देव गौरव ग्रंथासाठी लिहिला होता. संदर्भित दोन्ही लेख आपणास या प्रकल्पाच्या आठव्या खंडात वाचण्यास मिळतील. मुद्दा असा की संदर्भित पत्रातील विचार हा तर्कतीर्थांच्या जीवन चिंतन व व्यवहाराचा अभिन्न भाग आहे. जातीअंताचा लढा जोवर यशस्वी होत नाही, तोवर भेदातील समाजाची निर्मिती अशक्य हे आपण समजून घेतले पाहिजे. सत्यशोधक चळवळ पुढे विकसित न होण्याचे मूळ जातीय संकीर्ण अहंकारातच दिसून येईल. ब्राह्मण समाज

आणि ब्राह्मणेत्तर समाज दोन्ही आत सोडायला असे तयार नाहीत तसेच एकमेकाविरुद्धचा वैरभावही ते सोडू इच्छित नाहीत हे वास्तव आज तर अधिक गडद होताना दिसते. पुरोगामी, प्रतिगामी अशा फळयांना आज अर्थ राहिला नाही, तो आपल्या संकीर्ण वृत्तीमुळेच ना?

**नामदार वसंतदादा पाटील**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी दि. ९ एप्रिल, १९६९ ला नामदार वसंतदादा पाटील यांना लिहिलेले हे पत्र खाजगी आहे. याच संदर्भात नामदार यशवंतराव चव्हाण यांना लिहिलेले पत्रही खाजगी आहे. त्याचा संदर्भ कराडचे कार्यकर्ते रघुनाथराव पाटील यांच्याशी झालेल्या संवादाशी आहे. बोलण्याचा संदर्भ एक असतो. ऐकणारा दुसरा संदर्भ लावतो. परिणामी गैरसमज होतो, पसरतो. असे प्रसंग समाज जीवनात नित्य होत राहतात. त्याचे हे पत्र उदाहरण होय; पण तर्कतीर्थ या पत्रातून जी पारदर्शिता दाखवितात ती अधिक महत्त्वाची वाटते.

**पन्नालाल सुराणा**

पन्नालाल सुराणा हे समाजवादी पक्षाचे कार्यकर्ते. त्यांना तर्कतीर्थांनी लिहिलेले दि. ९ फेब्रुवारी, १९७८ चे पत्र विविध विषयांना स्पर्श करणारे आहे. निमित्त आहे, पन्नालाल सुराणा बार्शी मतदार संघातील निवडणूक हरण्याचे पत्रात सांत्वन आहे नि चिकित्सापण. त्याशिवाय अनेक राजकीय, सामाजिक प्रश्न, समस्यांची चर्चापण एक कार्यकर्ता दुसऱ्या कार्यकर्त्यास लिहितो; पण त्यात आपल्या अनुभवाधारित मार्गदर्शनाचा भाग महत्त्वाचा आहे. क्रांतीची चिकित्सा अधिक मार्मिक असल्याने पत्र वाचकास अंतर्मुख करते.

**रत्नाकर गणवीर**

पन्नालाल सुराणांप्रमाणेच रत्नाकर गणवीर सामाजिक कार्यकर्ते होत. ते मनुस्मृती दहनसंबंधी प्रा. नरहर कुरुंदकर कथित डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तर्कतीर्थ यात झालेल्या संवाद नि प्रत्यक्ष प्रसंगाची खातरजमा करून घेण्यासाठी पत्र लिहितात. तर्कतीर्थ पत्र लिहून वास्तवता स्पष्ट करतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यातील अनुबंध हा दीर्घ कालावधीचा आहे. तो सुरू होतो पुणे कराराच्या निमित्ताने. विस्तारतो महात्मा गांधीप्रणीत अस्पृश्यता निर्मूलन चळवळीच्या अनुषंगाने. त्यामुळे तो खरंतर सविस्तर समजून घ्यायचा भाग आहे. या अनुबंधाचे प्रत्येक पक्षाचे आपले म्हणणे व आकलन आहे. तो संशोधन विषय आहे खरा!

**पु. ल. देशपांडे**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आणि पु. ल. देशपांडे यांच्यात मैत्रीचे दीर्घकालीन संबंध असल्याने पत्रव्यवहार मोठा होता. पैकी अपवाद पत्रे हाती लागलील. विषय विविध

आहेत. कधी कुणाची रदबदली, कधी मराठी विश्वकोश नोंद लेखन, कधी वाचलेलं पुस्तक एकमेकास सुचवणं, कधी एखादी घटना कळाल्यावर त्यावरची प्रतिक्रिया, प्रतिसाद. कधी मुलाखत देणे-घेणे तर कधी कार्यक्रमातील भाषणे एकमेकाचा गौरव करणारी. यातून आस्वादक मैत्र उलगडत राहते. संदर्भित पत्र आहे ६ नोव्हेंबर, १९७९ चे. प्रसंग आहे, पु.लं. च्या षष्ट्यब्दीपूर्तीचा. दैनिक महाराष्ट्र टाइम्सने या निमित्ताने पु. ल. देशपांडे यांना आत्मपर काही लिहायची विनंती केलेली. पु. ल. त्यास नम्रपणे नकार देतात. या प्रसंगाने तर्कतीर्थांना कालिदास आठवतो. त्याची एक काव्य पंक्ती आठवते -

**'बलवदपि शिक्षितानात्मन्यप्रत्ययं चेत:।'**

अर्थात् 'कलाकारास स्वतःचे बळ (बलस्थान) नीट कळत नसते; पण रसिकांना मात्र ते उमजते. आपण अशा रसिकांपैकी एक आहोत, अशी नम्रता धारण करून लिहिलेले हे पत्र गौरव पत्रही आणि प्रशंसा पत्रही ! यात स्नेहभाव आहे नि निकटताही !!

### नामदार बाळासाहेब देसाई

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींनी दि. २४ फेब्रुवारी, १९६२ ला नामदार बाळासाहेब देसाईंना पत्र लिहिलेले. तेव्हा ते शिक्षणमंत्री होते. त्यांच्या खात्यातील काही गोष्टींविषयी चर्चा करत काही सुचवू पाहणारे, काही सांगणारे तर काही शिफारस करणारे. तर्कतीर्थ पत्रव्यवहारातून लक्षात येणारी गोष्ट अशी की, तत्कालीन मंत्रिमंडळ (१९६०-६२) आणि तर्कतीर्थ यांच्यामध्ये असलेले ऋणानुबंध हे सहकारी नात्याचे. सर्वच मंत्री तर्कतीर्थांचा आदर करतात हे विविध पत्रांवरून लक्षात येते. कारण वयोज्येष्ठता, स्वातंत्र्य चळवळीतील योगदान, विद्वत्ता, पांडित्य इ. तर्कतीर्थही निरपेक्ष भावनेने मोकळेपणाने सर्वांना लिहिताना दिसतात. यात हितसंबंध नसतात. असतो समस्या, संकट मोचनाचा प्रयत्न ! म्हणून सर्वजण त्यांची पत्रे शीरोधार्य मानत.

### प्राचार्य राम शेवाळकर

प्राचार्य राम शेवाळकर यांचा पत्रव्यवहारावर आधारित एक ग्रंथ आहे 'पत्रसंवाद.'[२८] सौ. शोभा उबगडे यांनी तो संपादित केलाय. त्यात तर्कतीर्थांनी प्राचार्य राम शेवाळकरांना लिहिलेली दोन पत्रे संग्रहित आहेत. ती या खंडात समाविष्ट केली आहेत. पत्रानुसार प्राचार्य राम शेवाळकरांच्या वणी येथील महाविद्यालय भेटीचा वृत्तांत आहे. दुसरे पत्र अभिनंदन पत्र आहे. प्राचार्य राम शेवाळकर विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष होतात. पत्रात कार्यकालात कार्यक्रम कसे असावेत याचे मार्गदर्शन आहे. प्राचार्य राम शेवाळकर संपादित ग्रंथास ('अक्षर माधव') तर्कतीर्थांची प्रस्तावना आहे. प्राचार्य राम शेवाळकर विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष असण्याच्या काळात तर्कतीर्थांनी दोन भाषणे दिली होती. 'दोन आचार्य' - १) शंकराचार्य, २) रामानुजाचार्य. ही पुस्तिकारूपात प्रकाशित झाली होती. या सर्वांतून उभयतांमधील

सख्यभाव प्रगट होते.

**बाबा आमटे व साधनाताई आमटे**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी ऑक्टोबर, १९८३ मध्ये 'आनंदवन'ला भेट दिली होती. परत आल्यावर तर्कतीर्थ २९ ऑक्टोबर, १९८३ ला उभयतांना बाबा आमटे नि साधनाताई आमटेंना कृतज्ञतापर पत्र लिहितात. त्यात त्यांच्या समाज सेवा नि समर्पणाचा गौरव करत तर्कतीर्थांना म्हटले आहे की, "आपण अपंग मनुष्याला अव्यंग मनुष्याइतकेच मानसिक आणि आर्थिक सामर्थ्य येते ही गोष्ट सप्रयोग सिद्ध केली आहे; त्याचप्रमाणे आर्थिकदृष्ट्या ढासळलेली खेडी आणि गावे पुनः ऊर्जितावस्थेत कशी आणता येतील याचाही उत्कृष्ट नमुना (मॉडेल) 'आनंदवन'च्या रूपाने उभा केला आहे. एकप्रकारे अनपेक्षित व कल्पनेनेही अभावित असे सामान्य जनांचे नवे सुदृढ व निरामय विश्व कसे असावे याचेही दर्शन मनःचक्षुला आपल्या या 'आनंदवन'च्या उदाहरणाने होते." सदर पत्र तर्कतीर्थांच्या सामाजिक संवेदनशीलतेची अनुभूती देणारे जसे आहे तसेच समाजाप्रती कर्तव्य जाणून करत असलेल्या कार्याचा गुणगौरवही आहे. तर्कतीर्थ स्वतः कर्ते सुधारक असल्याने अशा ठिकाणी ते नतमस्तक होतात, यात सहभाव असतो नि स्वानुभवही !

## १६) कौटुंबिक पत्रव्यवहार

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी प्राज्ञपाठशाळेत शिकून संस्कृत पंडित झाले. त्यावेळी प्राज्ञमठात ब्रह्मचर्य पाळण्याचा रिवाज होता; पण गुरू नारायणशास्त्री मराठे यांनी लक्ष्मणशास्त्रींना विवाह करण्याचा सल्ला दिला. तो त्यांनी क्षणभर विचार न करता मानला. त्यांचा विवाह मुल्हेर निवासी वासुदेव पंडित यांची कन्या कावेरीशी जून, १९२६ ला झाला. तर्कतीर्थांनी विवाहोत्तर आपल्या पत्नीचे नाव सत्यवती ठेवले. या दान्पत्यास चार अपत्ये झाली. ती म्हणजे मधुकर, वासुदेव, मालती व सुमन तर्कतीर्थ कुटुंबवत्सल गृहस्थ होते.

त्यांनी आपल्या पत्नीस २४ जुलै, १९४५ ला लिहिलेले पत्र या खंडात आहे. पत्राचा विषय पती-पत्नीमधील समज-गैरसमजातून उद्भवलेल्या अविश्वासाचा आहे. ज्यांच्या वैवाहिक जीवनात समज-गैरसमजातून वादळ उठले नाही असे दांपत्य अपवाद. जे पती-पत्नी अशा वेळी सामंजस्य दाखवता त्यांचीच नाव पार होते. तशी ती या उभयतांची झाली होती. तर्कतीर्थांनी पत्नी सत्यवतीस १२ ऑगस्ट, १९७८ ला देवाज्ञा प्राप्त झाल्यानंतर तिला श्रद्धांजली वाहत एक संस्मरणीय लेख लिहिला आहे. तो या प्रकल्पाच्या नवव्या खंडात (लेखसंग्रह (संकीर्ण) ) मधील आत्मपर लेखांत अंतर्भूत आहे. तो वाचला की तर्कतीर्थांचे पत्नी प्रेम लक्षात येते. शिवाय सतीकाकू किती सुग्रण नि सुगृहिणी होत्या याची वर्णने अनेक मान्यवरांनी आपल्या स्मृतिलेखांमधून केली आहेत.

त्यांचा सर्वांत मोठा मुलगा मधुकर. तो अमेरिकेत आयबीएम या संगणक कंपनीत

मोठ्या हुद्यावर होता. त्यांचे निधन ३० सप्टेंबर, २०१८ मध्ये अमेरिकेत वयाच्या ८८ व्या वर्षी झाले. त्यांचा वडिलांप्रमाणेच व्यासंग होता, हे या खंडातील त्यांच्या पत्रावरून स्पष्ट होते. लक्ष्मणशास्त्री जोशी आपल्या मुलांच्या शंकांचे निरसन करण्यात तत्पर असत हे या पत्रावरून लक्षात येते. डॉ. मधुकर जोशी यांनी वसंत पळशीकर संपादित 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : व्यक्तित्व कार्य आणि विचार' शीर्षक ग्रंथात (फेब्रुवारी, १९९६) 'आबा व मी' शीर्षक हृद्य लेख लिहिला आहे. त्यातून पिता-पुत्र संबंधावर प्रकाश पडतो. येथील संग्रहित पत्र त्याचीच प्रतीती देणारे. बापाच्या वाहाणा मुलाच्या पायी बसू लागल्या की बापाने मुलाचा मित्र व्हावे यात शहाणपण असते याचा अनुभव देणारे हे तर्कतीर्थांचे पत्र.

सध्या हयात असलेले तर्कतीर्थांचे चिरंजीव वासुदेवशास्त्री जोशी यांना तर्कतीर्थांनी हे अमेरिकेत मधुकरकडे गेले असताना लिहिले आहे. त्यात 'मन भारतात, देह अमेरिकेत अशी स्थिती स्पष्ट आहे. ते भारतातली खबरबात जाणण्यास उत्सुक आहेत. भारतातल्या हकीकती गोळा करून पाठवायच्या सूचनेतून ते लक्षात येते. ते अमेरिकेत गेल्यावर प्रा. मे. पुं. रेगे प्राज्ञपाठशाळ, नवभारत, मराठी विश्वकोश हा तर्कतीर्थांचा 'खरा संसार' सांभाळत होते. त्यांची काळजी घेण्याची वासुदेवला पत्रातून केलेली सूचना कर्तव्यपरायणतेची तशीच कृतज्ञतेचीही सर्व नातेवाइकांशी सहभाव नि सद्भाव ठेवण्याची या पत्रातील सूचना म्हणजे पितृसंस्कारच !

सौ. मालती जोशी धाकटी कन्या. अमेरिकेत दिलेली. तिला तर्कतीर्थांनी आपल्या ९१ व्या वर्षी लिहिलेले पत्र. यात मुलीस काळजी राहू नये म्हणून आपण ठणठणीत असल्याचा दाखला दिला आहे. दिनक्रम वर्णिला आहे. ख्याली-खुशाली आहे. आपले कुटुंब (मुले, मुली, सुना, नातवंडे, जावई इ.) अमेरिकी झाले तरी आपण 'भारतीय' राहिल्याचा तर्कतीर्थांना वाटणारा आनंद व अभिमान हे या पत्राचं ब्रीद नि बलस्थान ! आपलं कार्यक्षेत्र भारतच याची ग्वाही देणारं हे पत्र.

या पत्रांना जोडून सौ. सत्यवती जोशी (तर्कतीर्थ पत्नी) यांचं सौ. वेणूताई चव्हाण (यशवंतराव चव्हाण पत्नी) यांना लिहिलेलं पत्र आवर्जून दिले आहे. जोशी-चव्हाण कुटुंबातील स्नेहसंबंध ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर वादास मूठमाती दिल्याची खूणगाठ नि काळीजखूण! नि म्हणून आजच्या काळात अनुकरणीय ठरावी अशीच. पडत्या काळात एकमेकास सावरत या दोन्ही कुटुंबांची महाराष्ट्र समाज, संस्कृतीपुढे आदर्श प्रस्तुत केला आहे.

'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय प्रकल्पातील हा पत्रसंग्रह खंड नुसता पत्रसंग्रह नाही. तो तर्कतीर्थांच्या व्यापक समाजशील संसाराचा परिचय देणारा नि व्यक्ती, व्यवस्था, संस्थाजीवन प्रतिबिंबित करणारा. 'मी नि माझं' असं संकीर्ण जीवन तर्कतीर्थ कळायला लागल्यापासून कधीच जगू शकले नाहीत. 'खादाडसे माझी भूक, चतकोराने

मला न सुख' अशी ही विश्वव्यापकता नि 'जिकडे-तिकडे मला, माझी भावंडे दिसताहेत'ची उदारता, संवेदनशीलता ! ती सर्वांनी अंगी बाणावी, आचरावी म्हणून केलेला हा खटाटोप.

## १७) तर्कतीर्थांना श्रद्धांजली वाहणारी हृद्यपत्रे

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे २७ मे, १९९४ रोजी महाबळेश्वर मुक्कामी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनानंतर विविध वृत्तपत्रे नि नियतकालिकांनी रकाने भरभरून लिहिले. तसेच तर्कतीर्थ संबंधी संस्था, व्यक्ती, व्यवस्थांकडे श्रद्धांजलीपर हृद्य पत्रांचा पाऊस पडला. त्यातील निवडक पत्रे या संग्रहात आहेत. नवभारत मासिक, मराठी विश्वकोश, साहित्य संस्कृती मंडळ इ.कडे आलेली ही पत्रे यात संपादक द्वाभ. कर्णिक, बालसाहित्यिक भा. रा. भागवत व श्रीमती लीलावती भागवत, प्रा. संभाजी कदम (अधिष्ठाता, जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्), डॉ. सरोजनी वैद्य, नाम. प्रभा राव, नाम. मधुकरराव चौधरी, चित्रकार सुहास बहुळकर, कुलगुरू देवदत्त दाभोळकर, श्रीमती इंदुमती तारकुंडे प्रभृती मान्यवरांशिवाय जनता शिक्षण संस्था, इंडियन रॅडिकल ह्युमॅनिस्ट असोसिएशन, लोकहितवादी मंडळ, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, राज्य मराठी विकास संस्था, यांचा समावेश आहे. 'आणखी एक प्रियजन लुप्त झाला. अश्रूसुद्धा गोठून गेले', 'क्षणभर गलबलल्यासारखे झाले'. 'माझा आधारवड गेला', 'प्राचीन ज्ञानातून आधुनिक ज्ञानापर्यंतचा सर्वांगीण अभ्यास करत असतानाच ज्या जटील साहित्याला त्यांनी सामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले, ते विरळा आहे', 'माझी चित्रे बघण्याच्या निमित्ताने झालेली भेट व चर्चा हा तर मला माझ्या आयुष्यातला एक अविस्मरणीय अनुभव वाटतो' सारखी हृद्य वाक्ये म्हणजे मानवी संवेदनशीलतेचे भावुक उद्गारच !

नाशिकच्या लोकहितवादी मंडळाची शोकसभा झाली. तिचा शोक प्रस्ताव कवी कुसुमाग्रजांनी लिहिला होता. त्यास त्यांनी शीर्षक दिले होते 'संवेदना'. त्यात ते म्हणतात,

### संवेदना

"तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी गेले म्हणजे महाराष्ट्रातील पांडित्याचा आणि विद्वतेचा सूर्य मावळला. गेली ५०-६० वर्षे महाराष्ट्राच्या वैचारिक आणि सांस्कृतिक विचारांवर त्यांनी जबरदस्त ठसा उमटविला होता. पौर्वात्य आणि पाश्चिमात्य तत्त्वज्ञान यांचा सुंदर संगम त्यांच्या विचारात झालेला आहे. पारंपरिक पद्धतीने धर्मशास्त्रांचे सर्वांगीण शिक्षण घेऊन सुद्धा ते वृत्तीने आणि विचाराने अतिशय प्रागतिक किंबहुना क्रांतिकारक होते. महाराष्ट्रातील सर्व विचारवंतांना तर्कतीर्थांचा फार मोठा आधार होता. विश्वकोशासारखे प्रचंड काम त्यांनी हाती घेतले व तडीला नेले. ज्ञानविज्ञान अखंड साधना हे त्यांच्या जीवनाचे उद्दिष्ट होते. सर्वार्थाने ज्ञानक्षेत्रातील महर्षी हे पद त्यांना शोभण्यासारखे असून, त्यांच्या बाबतीत सार्थ होते. त्यांच्या वैचारिक ऋणातून महाराष्ट्र कधीही मुक्त होणार नाही. त्यांच्या स्मृतींना आम्ही नम्रपणाने अभिवादन करतो."

‘नवभारत’ मासिक आणि प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाईच्या शोकसभेसाठीचा शोक प्रस्ताव कुलगुरू देवदत्त दाभोळकर यांनी शब्दबद्ध केला होता. त्यात त्यांनी म्हटलं आहे की,

“शास्त्रीजींचे व्यक्तिमत्त्व जितके आदरणीय तितकेच विलोभनीयही होते. त्यांची वृत्ती अनेक परस्परविरोधी वाटणाऱ्या गोष्टींतील सद्प्रवृत्ती शोधून काढून त्यांचा समन्वय साधणारी होती व तो तसा साध्य करण्याची कार्यकुशलताही त्यांच्या ठिकाणी होती विद्वत्तेचे तर ते अतुलनीय मानदंड होते. ‘पूर्वापरौज्ञाननिधी व ग्राह्य स्थित: शारदाया शिव मानदण्ड:’ असे त्यांचे अद्वितीय स्थान होते व ते दीर्घकाल - कदाचित सदैवच तसेच राहील. पौर्वात्य व पाश्चिमात्य विद्याशास्त्रांत ते समरसतेने व सहजतेने संसार करीत. कालिदासाचा हिमालय हा केवळ मोजमापाचा प्रचंड मानदंड होता. शास्त्रीजींचे कर्तृत्व याही पलीकडचे ज्ञानसागराचे मंथन करणाऱ्या मेरूदंडाचे होते. त्यांनी ज्ञान केवळ आत्मसात केले नाही तर या मंथनातून मानवतेच्या अगतीला पोषक अशी विचाररत्ने प्रकट केली. पूर्व आणि पश्चिम, प्राचीन आणि अर्वाचीन, परंपरा आणि परिवर्तन, विद्वत्ता आणि समाजाभिमुखता, तटस्थता आणि कृतिशीलता, गांभीर्य आणि निर्व्याज्यता यांचा एक अनन्यसाधारण समन्वय त्यांच्या व्यक्तिमत्त्वात साकार झालेला होता.”

## पत्रप्रतिबिंबित तर्कतीर्थ

‘तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय प्रकल्पातील या १२ व्या खंडातील पत्रसंग्रह बहुआयामी आहे. त्यातील विभिन्न पत्रांमधून उठून दिसणारे व्यक्तिमत्त्व एखाद्या प्रज्ञावंतास शोभून दिसेल असेच आहे. ते भारत सरकारच्या पदमभूषण (१९७६) आणि ‘पद्मविभूषण (१९९२) ने सन्मानित आहेत. ‘राष्ट्रीय संस्कृत पंडित’ (१९७३) म्हणून त्यांना गौरवान्वित करण्यात आलेले आहे. मुंबई विद्यापीठाने त्यांना एल.एल.डी. (१९७५) पदवी बहाल करून त्यांची विद्वत्ता बहुमानित केली आहे. फाय फाउंडेशनने त्यांना ‘राष्ट्रभूषण’ (१९८९) पुरस्काराने त्यांचा सन्मान केला आहे. साहित्य अकादमी पुरस्कार (१९५५) आणि साहित्य अकादमीचे ‘महदत्तर सदस्यत्व (फेलोशिप) (१९८९) त्यांना बहाल करण्यात आली होती. अनेक पदे, पदव्या, सन्मानपत्रे, मानपत्रे, पुरस्कारांनी बहुमानित त्यांचे व्यक्तित्व त्यांना असाधारण बनवते.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी स्व-हस्ताक्षरात जी पत्र लिहिली व जी उपलब्ध झाली त्यात त्यांचे आत्मीयस्नेही प्रा. गोवर्धन पारीख यांना लिहिलेले पत्र आहे. प्रा. पारीख नि त्यांचा अकृत्रिम स्नेह होता. ‘नवभारत’ मासिकाचे संपादन आणि ‘सेंटर फॉर द स्टडी ऑफ सोशल चेंज’, वांद्रे (पूर्व), मुंबईचे संचालन यातून हे ऋणानुबंध अधोरेखित होतात. उभयतांच्या जीवनात अनेक मतभेद व संघर्षाचे प्रसंग येऊनही मैत्री अतूट राहिली. अशी

पत्रे तर्कतीर्थांना अनेक मान्यवरांनी लिहिली. तर्कतीर्थांनी स्वहस्ताक्षर नामदार यशवंतराव चव्हाण, पत्नी सत्यवती जोशी, अन्य कुटुंबीय यांना पण लिहिली. त्यात नात्याच्या घट्ट विणीची आस आहे नि संबंधांची प्रतिबद्धताही दिसून येते. तर्कतीर्थ निवर्तल्यानंतर त्यांच्या आप्तस्वकीयांना समाजाच्या सर्व थरांतून श्रद्धांजली वाहणारी जी पत्रे आली, ती अधिकतः स्वहस्ताक्षरातील होती. त्यातून प्रतिबिंबित तर्कतीर्थ हे प्रत्येकाच्या हृदयात असलेले आश्वासक आधार वाटतात. ती पत्रे त्यांच्या सामाजिक, साहित्यिक, राजकीय, सांस्कृतिक, संस्थात्मक योगदान चित्रित करतात. त्या पत्रांतून तर्कतीर्थ किती उच्चकोटीचे संस्थात्मक व सार्वजनिक जीवन जगत होते याचा हृदयग्राही प्रत्यय येतो.

प्राज्ञपाठशाळा, प्राज्ञपाठशाळा मंडळ, धर्मकोश धर्मनिर्णय मंडळ, प्राज्ञप्रेस, प्राज्ञ प्रकाशन, नवभारत मासिक संचालन व प्रकाशन कार्य हे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या प्रारंभिक कार्यांचे रूप होय. नारायणशास्त्री मराठे तथा स्वामी केवलानंद सरस्वती यांच्या मार्गदर्शन व नेतृत्वाखाली तर्कतीर्थांनी आपले प्रारंभिक संस्थात्मक कार्य आरंभिले व पुढे त्यांच्या पश्चात ते नेटाने चालवले. संस्थात्मक वा सार्वजनिक कार्य करणारा तर्कतीर्थांसारखा जो योजक, संचालक असतो त्याची एक कार्यदृष्टी व ध्येय क्षितिज असते. या नव्या-जुन्यांचा पिढीगत मतभेद, संघर्ष सर्वत्र असतो. जो निभावून नेऊ शकतो, नेतृत्व त्याच्या हाती येते. स्वामी केवलानंद सरस्वती, शंकरराव देव, प्रा. गोवर्धन पारीख, प्रा. मे. पुं. रेगे यांच्या पत्रव्यवहारातून ते स्पष्ट होते. एक मात्र खरे की ज्या संस्थांचे नेतृत्व तर्कतीर्थांनी स्वीकारले, मिळवले, पटकावले कुणी काहीही म्हणावे; पण त्यांनी सर्व संस्था ऊर्जितावस्थेत आणल्या. त्या स्थायी व स्थिर केल्या. पत्रव्यवहार वाचत असताना तर्कतीर्थांनी त्यासाठी घेतलेले कष्ट, प्रयत्न यांवर पत्रांमधून पुरेसा प्रकाश पडतो.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी वरील कार्य करण्यापूर्वी ते प्राज्ञ पाठशाळा सोडून महात्मा गांधींच्या आवाहनानुसार राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीत सामील झाले; पण त्याची प्रेरणा त्यांना प्राज्ञपाठशाळेत दाखल झालेल्या वा सामील झालेल्या तळेगाव दाभाडे येथील ब्रिटिशांनी बंद पाडलेल्या शाळेतील राष्ट्रवादी विद्यार्थी व शिक्षकांमधून मिळाली होती. ही सर्व मंडळी त्या काळात प्राज्ञपाठशाळेच्या आश्रयाला आली होती. प्रभात फेऱ्या, समूह गीते, प्रचार सभा, भाषणे, बुलेटिन, संगठन, मोर्चे, निवेदने, शिबिरे यातून हे कार्य चाले. त्यांचा प्रत्यक्ष पत्रव्यवहार हाती नसला तरी तत्काली न नोंदी, पुरावे, पत्रव्यवहार, संशोधन, इतिहास, साहित्यांतून ते पुरेशा प्रमाणात स्पष्ट होते, (१९२० ते १९३५) यात प्रकाशक रा. ज. देशमुख यांना लिहिलेले पत्र, ब्रिटिश पोलीस अहवाल, वृत्तपत्र बातमी पत्रे, यातून तर्कतीर्थ या आंदोलनात राज्यस्तरीय नेते होते, हे अधोरेखित होते. अनेक सहयोगी, सहकाऱ्यांचे लेख, आत्मचरित्रे यामध्ये स्वातंत्र्य चळवळीतील तर्कतीर्थ कार्य व योगदान प्रतिबिंबित आहे.

यानंतरचा कालखंड येतो मानवेंद्रनाथ रॉय यांच्या रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टीमधील सक्रिय सहभागाचा. इथे ते पक्षाचे राज्य सचिव होते. पक्ष संघटना, शिबिरे, मेळावे, मोर्चे, निवडणूक सशस्त्र क्रांती प्रयत्न, लोकसमित्या इ. द्वारे ते काँग्रेस, गांधीवाद विरोधी भूमिका घेऊन सन १९३६ ते १९४८ असा तपभराच्या काळात सक्रिय होते. या काळातला पत्रव्यवहार उपलब्ध नसला तरी परिस्थितीजन्य पुरावे, नोंदी विपुल आहेत. स्वतः तर्कतीर्थांनी यासंबंधी विपुले लेखन, भाषांतरे, मुलाखती इ. तून ते प्रत्ययास आणले आहे. कुशल संघटक, वक्ते, संयोजक तर्कतीर्थ अनेक प्रकारच्या अन्यांच्या समकालीन स्मृतीतूनही वाचावयास मिळते. द्वा. भ. कर्णिक, वसंतराव कर्णिक, प्रा. गोवर्धन पारीख, श्री. शं. नवरे, गोविंद तळवलकर, यशवंतराव चव्हाण या रॉयवाद्यांचे लेखन व 'इंडिपेन्डंट इंडिया', 'क्वेस्ट', 'फ्रीडम फर्स्ट'मधील तर्कतीर्थांचे लेखन, निवेदने, भाषणे, अनुभव कथन, मुलाखती पुरेशा बोलक्या आहेत.

कायदेभंगाच्या चळवळीत ते दोन-तीनदा तुरुंगात गेले. ते येरवडा नि धुळे तुरुंगात होते. त्याकाळातल्या अधिकृत तुरुंग नोंदी, पत्रे, अहवाल, वृत्ते, छायाचित्रे, मुलाखती उपलब्ध आहेत. महात्मा गांधींच्या पत्रव्यवहारात अनेक नोंदी आहेत. यातून स्वातंत्र्य चळवळ, अस्पृश्यता निर्मूलन कार्य, आंतरजातीय विवाह, मंदिर प्राणप्रतिष्ठा पौरोहित्य (मंदिरे हरिजनांना खुली व्हावीत म्हणून केलेले) तर्कतीर्थांनी केले होते, हे स्पष्ट होते.

नंतरच्या काळात विशेषतः सन १९४८ मध्ये रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टी विसर्जनानंतर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी पुनःश्च काँग्रेसमध्ये आले व प्रांतिक समितीचे सदस्य म्हणून सातारा जिल्ह्यातून निवडले गेले. संयुक्त महाराष्ट्र आंदोलन काळात ते काँग्रेस समर्थक असल्याने स्वाभाविकच द्विभाषिक राज्य समर्थक म्हणून ते कार्यरत होते. या काळात भाई माधवराव बागल यांना त्यांनी साप्ताहिक मौजमधून लिहिलेले अनावृत्त पत्र व त्याला भाई माधवराव बागल यांचे उत्तर तसेच या काळातील अन्य पत्रव्यवहार यातून तर्कतीर्थांना जो संघर्ष करावा लागला त्याची काही एक प्रचीती येते.

उर्वरित पत्रव्यवहारातील अनेक पत्रे या खंडात अंतर्भूत आहेत. त्यात महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय मुंबई, किसन वीर महाविद्यालय, वाई इ. संस्थांचा समावेश आहे. ही पत्रे तर्कतीर्थांच्या कार्य, कर्तृत्वाचा लेखाजोखा आहे आणि चालता-बोलता इतिहासही! मान. नामदार यशवंतराव चव्हाण आणि अन्य अनेक मान्यवरांना तर्कतीर्थांनी लिहिलेली पत्रे व त्यांनी तर्कतीर्थांना दिलेली उत्तरे यात आहेत.

पत्रलेखक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी अनेक भूमिकेतून पत्रव्यवहार करताना दिसतात. शिष्य, सहकारी, पिता, पती, मित्र, संपादक, साहित्यिक, कार्यकर्ता, पदाधिकारी, संचालक, पंडित, संशोधक, समीक्षक, वक्ता, क्रांतिकारी, गुणग्राहक, आस्वादक, अभ्यासक, जिज्ञासू

वाचक, लेखक, भाषांतरकार अशी या पत्रलेखक तर्कतीर्थांची अनेकविध रूपे आहेत. भूमिकेनुसार पत्रलेखन पद्धती भाषा, शैली, वाक्यरचना बदलते. पत्रव्यवहारात प्रसंग, संबंधानुरूप औपचारिकता, अनौपचारिकता येते. पत्रलेखनात सर्वत्र पत्रलेखन शिष्टाचाराचे पालन आढळते. त्यामुळे पत्र केव्हा, का, कोणास, कसे, कोणत्या भूमिकेतून, विषयानुषंगे पत्र लिहिले, ते पुरेसे स्पष्ट करणारे असते. अधिकतर पत्रे प्राज्ञपाठशाळा मंडळाच्या शीर्षपत्रावर लिहिलेली आढळतात. त्यातून ती संस्था तर्कतीर्थांची 'प्राण' असल्याचे लक्षात येते नि 'प्राज्ञ', 'प्राज्ञता' हाच त्यांच्या जीवनाचा मुख्य स्वर निःश्वास होता, हे अनुभवास येते. पत्रात आटोप असतो. मुद्देसुदता असते. वाक्ये आशयघन असतात. अवांतरास तर्कतीर्थांच्या पत्रात वाव असत नाही. पत्रातील संदर्भ अचूक ठेवण्यावर तर्कतीर्थांचा कटाक्ष असतो. पत्रातील विचारात स्पष्टता व पारदर्शिता असते. प्रसंगानुरूप अपवादाने तर्कतीर्थ दृष्टान्त, म्हणी, वाक्प्रचार, काव्यपंक्ती वापरतात पण आवश्यक तेव्हाच पत्रात निमंत्रण असेल तर कार्यक्रम तपशील, क्रम, पुरेशी माहिती देण्यास तर्कतीर्थ विसरत नाहीत. पत्रव्यवहारातून तर्कतीर्थ पाठपुराव्याची चिकाटी ठेवत असल्याचे दिसून येते. त्यांच्या जीवनातील कार्य यशाचे रहस्य म्हणून या गुणांकडे पाहावे लागते. यश यावे म्हणून ते अन्यांना पण भरीस घालतात, हेही लक्षात येते.

तर्कतीर्थांचा अधिकांश पत्रव्यवहार मराठीत दिसतो. अपवाद, गरज म्हणून इंग्रजी पत्रे लिहिलेली आढळतात. टीका, समीक्षकांना लिहिलेली खुलासावजा पत्रे प्रायः दीर्घ असतात. त्यात ते मग टीकाकाराचा कसलाही मुलाहिजा ठेवत नाही. स्वतःला विद्वान समजणारे पत्रलेखक किती अज्ञानी आहेत ते सप्रमाण वस्त्राहरण करून दाखवतात. आपण केलेले कार्य (कोश नोंदी, लेखन, भाषण, मतप्रदर्शन इ.) कसे तार्किक, योग्य, समर्पक आहे, हे पुरेसा जोर देत ते सांगतात; पण त्यात उपमर्द, टिंगलटवाळी, अवमान असा भाग नसतो. क्रोधही नसतो; पण 'अज्ञान अक्षम्य' असा पत्रलेखक तर्कतीर्थांचा बाणा प्रत्येकवेळी असतोच असतो. 'विश्वकोश परिचय'संबंधी विस्तृत पत्रव्यवहार व उत्तरे, खुलासे यासंदर्भात लक्षात घेण्यासारखे आहेत.

शासकीय पत्रव्यवहारात अन्यांना मदत करण्याची त्यांची धडपड स्पष्ट होते; पण यात हितसंबंध असत नाही, हे विशेष ! नामदार यशवंतराव चव्हाण यांनी लिहिलेली पत्रे आत्मीयतेतून लिहिलेली, मार्गदर्शक, अपेक्षा व्यक्त करणारी असतात. आस्वादक पत्रे भावुक, काव्यात्मक, आत्मीयतेने ओतप्रत असतात. उदाहरणार्थ बाबा आमटे हे पु. ल. देशपांडे, यशवंतराव चव्हाण यांना लिहिलेली काही पत्रे. अशीच गोष्ट कौटुंबिक पत्रात दिसते. पत्नी सौ. सत्यवती जोशींना लिहिलेले पत्र म्हणजे तर्कतीर्थांच्या मनाचा पारदर्शी आरसा नि भावनाशीलतेचा न आटणारा झरा ! गृहस्थी विश्वास व आस्थेवर उभी असते याचा प्रत्यय !!

ही सारी पत्रे म्हणजे एकाच माणसाची अनेक रूपे ! माणसास या जगात संबंध

विविधतेमुळे बहुरूप्याची भूमिका वठवावी लागते. एकाच वेळी तो व्यष्टी असतो नि समष्टीही. कधी औपचारिक तर कधी अनौपचारिक होणे त्याची व्यावहारिक गरज असते. पण पत्रांतून माणसाचं समग्र चरित्र प्रसंगा-प्रसंगांतून व्यक्त होत राहते. एक पत्र जीवनाचा एक क्षण खरा; पण समग्र पत्रांतून संपूर्ण मनुष्य साकारतो. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री समग्रतेने समजून घ्यायचे असतील तर हा पत्रव्यवहार त्यासाठी पुरेसा आहे. आतून, बाहेरून तर्कतीर्थ एकच होते याची साक्ष ही पत्रे देतात.

दि. १५ जून, २०२२

**- डॉ. सुनीलकुमार लवटे**
संपादक

## संदर्भ सूची


१) दिवाण वि. प्र. : **स्वामी केवलानंद सरस्वती (चरित्र)** - श्री कोटेश्वरदेव ट्रस्ट, १०३८/३, ब्राह्मणशाही, वाई (जि. सातारा), प्रथमावृत्ती, १५ ऑक्टोबर, २०१८ / मूल्य ८०/- रु. / पृष्ठे. ९४.

२) तत्रैव पृ. ४०-४१.

३) तत्रैव पृ. ३५, ३६, ३९.

४) **प्राज्ञपाठशाळा का सोडावी लागली?** - स्वामी केवलानंद सरस्वती, द्विसाप्ताहिक केसरी, पुणे; दि. १९ डिसेंबर, १९३१ (मंगळवार, शुक्रवार)

5) **Bombay Presidency Police Abstracts of Intelligance, Part II, (PDF)** - Cultural.maharashtra.gov.in

६) जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री : **अस्पृश्यता निवारणाच्या चळवळीतील एक पर्वः येरवड्यातील धर्मपरिषद**, साप्ताहिक मौज, मुंबई, दि. ३० जानेवारी, १९४९, पृ. ११, १२, २३ ते २६.

7) Shastri R. V. : **HARIJAN** - Editor - The Servants of Untouchables Society, Poona; Vol-I, No. 1, Saturday, February, 1933, Page No. 6.

८) **अध्ययन आणि वैचारिक वाटचाल** - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी - मुलाखतकार - प्रा. मे. पुं. रेगे (संपादक), नवभारत, फेब्रुवारी-मार्च, 1981; पृ. 1 ते 33.

9) **The Collected Works of Mahatma Gandhi** - Govt. of India, Ministry of Culture, Room No. 501, 'C' Wing, Shastri Bhavan, New Delhi - 110015., Vol-61, Itom No. 204, 214, 503., Page No. 159-60, 167-68, 407.

10) Gandhi, Mahatma : **Speech At Devdas - Laxmi Wedding** - The Collected Works of Mahatma Gandhi; Vol - 61, Itom No. 214,

Page No. 167.

11) Gandhi Mahatma : **Advice To Worker**; The Collected Works of Mahatam Gandhi, Vol-61, Itom No. 503, Page No. 407.

१२) माधव गडकरी : **साहित्यातील हिरे आणि मोती** - उत्कर्ष प्रकाशन, रेणुका अपार्टमेंटस्, एरंडवणा, पुणे - ४११००४, प्रथमावृत्ती - १ मे, १९८४ / किंमत २५ रुपये / पृ. ११ व १२.

१३) जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री : **माधवराव बागल यांस अनावृत्त पत्र** - साप्ताहिक मौज, खटाववाडी, मुंबई; दि. १६ सप्टेंबर, १९५६, पृ. २.

१४) बागल भाई माधवराव : **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना उत्तर** - साप्ताहिक मौज, खटाववाडी, मुंबई, दि. २३ सप्टेंबर, १९५६, पृ. ३.

१५) कवठेकर अविनाश (सर्व कार्येषु सर्वदा) : **सांस्कृतिक संचित** - दैनिक लोकसत्ता, मुंबई; शनिवार, दि. २२ ऑगस्ट, २०२२, पृ. ६.

१६) भाटे डॉ. सरोजा : **कृष्णाकाठचं ज्ञानपीठ** - दैनिक लोकसत्ता, लोकरंग, रविवार, दि. ९ डिसेंबर, २०१८, पृ. ८.

17) **Journal of the American Oriental Society** - Vol-99, No. 2, (Apr-Jun, 1979), Pages - 351-352. (https://www.jstor.org/stable/602688)

१८) चव्हाण यशवंतराव : **सह्याद्रीचे वारे (भाषणसंग्रह)** - रोहन प्रकाशन, ४३०, शनिवार पेठ, पुणे- ४११ ०३० जनआवृत्ती - २६ जून, २०१४, किंमत - १९५ रु. पृ. २७९. ('साहित्य आणि संस्कृती' शीर्षक भाषण)

१९) प्रमुख संपादक - जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री : **मराठी विश्वकोश परिचय ग्रंथ (अभिप्राय, टीका आणि प्रतिटीका)** - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, खोली क्र. ५६६, पाचवा मजला, मंत्रालय, मुख्य इमारत, मुंबई - ३२. प्रकाशन - १९ डिसेंबर, १९६५ / पृ. १.

२०) पिंगे रवींद्र : **देवाघरचा पाऊस** - ब.मो. पुरंदरे, राजहंस प्रकाशन, १०२५, सदाशिव पेठ, पुणे- ४११ ०३०; द्वितीय आवृत्ती - १५ नोव्हेंबर, १९७८, किंमत - १० रुपये | पृ. ६५ (तर्कतीर्थ)

२१) आवळसर शांताराम विष्णू : **रायगडची जीवनकथा** - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाट्यमंदिर इमारत, २ रा मजला, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५; पाचवी आवृत्ती - २००८ / किंमत ६१ रुपये प्रस्तावना | पृ.२.

२२) **दैनिक केसरी**, दि. २५ जुलै, १९७७

23) **Government Resolution** No BLC 1060 - K; State Board for Literature and Culture; Govt. of Maharashtra, Sachivalaya,

Bombay. Dated - 19th November, 1960.
२४) जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, प्रमुख संपा. : **मराठी विश्वकोश परिचय ग्रंथ (अभिप्राय, टीका आणि प्रतिटीका)** - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, खोली क्र. ५६६, पाचवा मजला, मंत्रालय, मुख्य इमारत, मुंबई - ३२. / प्रकाशन - १९ डिसेंबर, १९६५ / पृ. ३२४.
२५) जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री (प्रमुख संपादक) : **संपादकीय निवेदन** - मराठी विश्वकोश परिचय ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, पाचवा मजला, सचिवालय, मुंबई - ३२; प्रकाशन - २ एप्रिल, १९६५ (गुढी पाडवा)
२६) जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री : **राजकीय सहयात्री** - यशवंतराव चव्हाण अभिनंदन ग्रंथ, प्रकाशक - श्री. यशवंतराव चव्हाण जन्मदिन सत्कार समिती, -महाल, नागपूर; प्रकाशन - १२ मार्च, १९६१, पृ. ९.
२७) पिंगे रवींद्र, **देवाघरचा पाऊस**- राजहंस प्रकाशन, पुणे, १५ नोव्हेंबर, १९७८ / पृ. ६३ ते ७०.
२८) उबगडे सौ. शोभा संपादक : **पत्रसंवाद** - साहित्य प्रसार केंद्र, सीताबर्डी, नागपूर - ४४०/०१२, प्रथमावृत्ती - १९ नोव्हेंबर, २००५ / किंमत १०० रुपये, पृष्ठ क्र. ७७-७८, ७८-७९.

ooo

# सन्मानपत्रे

सत्यमेव जयते

**लक्ष्मणशास्त्री बालाजी जोशी**

**मैं, भारत का राष्ट्रपति,
आर० वेंकटरामन, व्यक्तिगत
गुणों के लिए आपके सम्मानार्थ,
पद्म विभूषण प्रदान करता हूँ।**

आर वेंकटरामन
राष्ट्रपति

नई दिल्ली
दिनांक 25 मार्च, 1991
8 चैत्र, 1914



श्री तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, जिन्हें साहित्य अकादेमी आज अपना सर्वोच्च सम्मान, महत्तर सदस्यता, प्रदान कर रही है, एक जाने-माने मराठी और संस्कृत विद्वान, समालोचक और दार्शनिक हैं।

श्री जोशी का जन्म 27 जनवरी 1901 को महाराष्ट्र के पिम्पलनेर नामक स्थान में हुआ। स्कूल में प्रारंभिक शिक्षा प्राप्त करने के पश्चात् आपने अपने पिता से संस्कृत का अध्ययन किया जो स्वयं संस्कृत के प्रकाण्ड पण्डित थे। चौदह वर्ष की आयु में आपने वाई के प्रज्ञा पाठशाला मण्डल में प्रवेश लिया जहाँ विद्या की विभिन्न शाखाओं में विस्तृत पाठ्यक्रम संचालित किये जाते थे। आपने श्री नारायण मराठे से दर्शन और नव्य न्याय का अध्ययन किया।

सत्रह वर्ष की आयु में उच्च अध्ययन के लिए आप वाराणसी गये और बाद में संस्कृत कालेज, कलकत्ता से 1922 में तर्कतीर्थ की उपाधि विशेष योग्यता सहित प्राप्त की। उसी वर्ष आपने प्रज्ञा पाठशाला के संकाय में प्राध्यापक रूप में कार्यभार ग्रहण किया और धीरे-धीरे उन्नति करते हुए 1955 में इसके अध्यक्ष हुए।

राष्ट्रीयता की भावना से अनुप्रमाणित होकर श्री जोशी ने स्वतंत्रता आंदोलन में सक्रिय रूप से भाग लिया और 1930 तथा 1932 में दो बार जेल भी गये। आप दर्शन और राजनीति शास्त्र के सजग पाठक रहे। बाद में एम.एन. राय के प्रभाव में आये और नये मानववाद के सिद्धांत को विकसित करने के लिए उनके साथ कार्यरत रहे।

आपका प्रथम ग्रंथ **शुद्धिसर्वस्वम्** (1934) धार्मिक शुद्धीकरण के दार्शनिक आधार और अवधारणाओं के विषय में संस्कृत में लिखा गया प्रबंध है। उसी वर्ष आपने **धर्मकोश** के सम्पादन की महत्तर योजना प्रारम्भ की। यह छब्बीस खण्डों के 18000 पृष्ठों में फैला हुआ सच्चे अर्थों में एक चिरस्थायी कार्य है। इसमें 1500 ई.पू. से लेकर 18 वीं शताब्दी तक के धर्म तथा धर्मशास्त्रों के विभिन्न पक्षों के आकर ग्रंथ और उन पर लिखी गई टीकाएँ समाहित हैं। इसके बीस खण्ड प्रकाशित हो चुके हैं।

श्री जोशी ने अपने को मात्र धर्मशास्त्र के अध्ययन तक ही सीमित नहीं रखा है। साहित्यिक समालोचना पर आपकी दो मराठी पुस्तकें- **आनंद मीमांसा** (1938), जो रस और सौंदर्यशास्त्र के सिद्धांतों की समालोचनात्मक टीका है तथा **आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा** (1973), जो आधुनिक मराठी साहित्यिक समालोचना के सिद्धांतों का अध्ययन है - विशिष्ट कृतियाँ मानी गयी हैं। आपकी अन्य दो कृतियाँ हैं: एक **हिन्दू धर्माची समीक्षा** (1940) जो हिन्दूधर्म की अवधारणाओं और संस्थाओं का समालोचनात्मक परीक्षण है, और दूसरी **जड़वाद** (1941) जो भारतीय और पाश्चात्य परम्पराओं में भौतिकवाद के इतिहास और विकास का एक विस्तृत सर्वेक्षण हैं। इन कृतियों से आपकी विद्वता के विस्तार और गहराई का पता चलता है।

श्री जोशी ने, जिन्हें गांधीजी ने अपने अस्पृश्यता विरोधी अभियान में हिन्दू धर्मशास्त्र के लिए मुख्य सलाहकार चुना था, सामाजिक-धार्मिक इतिहास में एक हलचल पैदा कर दी। आपने 1951 में पुनर्निर्मित सोमनाथ मंदिर में सांगोपांग पूजा- अनुष्ठान के लिए 150 पुजारियों के दल का नेतृत्व किया-और इसके बाद उपासना के लिए मंदिर के द्वार पिछड़े वर्गों सहित सारे समाज के लिए खोल दिये।


आपको **वैदिक संस्कृतिचा इतिहास** (1952) पर मराठी के लिए प्रथम साहित्य अकादेमी पुरस्कार प्रदान किया गया, जो 1947-54 के मध्य प्रकाशित कृतियों में श्रेष्ठ मानी गयी। यह कृति वैज्ञानिक मानववाद को नयी विश्व संस्कृति के अग्रदूत के रूप में स्थापित करते हुए वैदिक संस्कृति के विकास को प्रस्तुत करती है।

श्री जोशी का एक अन्य विशिष्ट विद्वतापूर्ण योगदान **उपनिषदांचे मराठी भाषांतर** है जो अठारह प्रमुख उपनिषदों का अनुवाद है। आपने राजवाड़े की चुनी हुई रचनाओं को **राजवाड़े लेख संग्रह** नाम से और लोकमान्य तिलक की रचनाओं को **लोकमान्य तिलक लेख संग्रह** नाम से सम्पादित किया है।

श्री जोशी में पारम्परिक विद्वता और वैज्ञानिक दृष्टि का दुर्लभ समन्वय है। आपने देश और विदेश में दूर-दूर तक यात्राएँ की हैं। आपने अमरीका सरकार के निमंत्रण पर 1964 में अमरीका की यात्रा की और 1969 में विश्वधर्म सम्मेलन में भाग लेने आप मॉस्को गये।

आपको 'राष्ट्रीय संस्कृत पण्डित' (1973) की उपाधि से विभूषित किया गया। बम्बई विश्वविद्यालय ने 1975 में आपको एल.एल.डी. की मानद उपाधि प्रदान की और भारत के राष्ट्रपति ने 1976 में आपको 'पद्मभूषण' से अलंकृत किया।

एक विद्वान और साहित्यिक समालोचक के रूप में उत्कर्ष के लिए साहित्य अकादेमी अपना सर्वोच्च सम्मान, महत्तर सदस्यता, श्री तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी को प्रदान करती है।



Sri Tarkateertha Laxmanshastri Joshi, on whom the Sahitya Akademi is conferring its highest honour of Fellowship today is a distinguished Marathi and Sanskrit scholar, literary critic and philosopher.

Born on 27 January 1901 at Pimpalner in Maharashtra, Sri Joshi, after a formal preliminary education at school, studied Sanskrit under his father, himself a renowned scholar. At the age of fourteen he was admitted to Prajna Pathashala Mandal at Wai, which offered extensive courses in different branches of learning. He studied philosophy and 'Navya Nyaya' under the guidance of Sri Narayanshastri Marathe.

At seventeen he proceeded to Varanasi for higher studies, and later obtained, with distinction, the degree of Tarkateertha in 1922 from Sanskrit College, Calcutta. The same year he joined the faculty of Prajna Pathashala, and subsequently rose to be its President in 1955.

Imbued with the spirit of nationalism, Sri Joshi participated actively in the Independence Movement and suffered imprisonment twice, in 1930 and 1932. An avid reader of both philosophy and political science, he came under the influence of M. N. Roy and they worked together to evolve the concept of new humanism.

His first book *Shuddhisarvasvam* (1934) is a treatise in Sanskrit on the philosophical basis and concepts of religious conversion. The same year he took up the ambitious project of editing *Dharmakosha*, a work in twenty-six volumes spread over 18000 pages, out of which twenty volumes have been published so far. A truly monumental work, Dharmakosha consists of all the basic texts and commentaries thereupon, on the different aspects of Dharma and Dharmashastras, covering the period 1500 B C to the 18th century.

Sri Joshi has not confined himself to the study of *Dharmashastras* only. His two books in Marathi on literary criticism, namely *Ananda Mimamsa* (1938), a critical commentary on the theories of *Ras* and aesthetics, and *Adhunik* Marathi *Sahityachi Samiksha* (1973), a study of the tenets of modern Marathi literary criticism have been hailed as outstanding works. His other two books, *Hindu Dharmachi*

*Samiksha* (1940), a critical examination of the concepts and institutions of Hinduism, and *Jadawad* (1941) a comprehensive survey of the history and development of materialism in Indian and western traditions, show the range and depth of his scholarship.

Sri Joshi, whom Gandhiji chose as his principal adviser on Hindu Dharmashastra in his campaign against untouchability, created a stir in socio-religious history. He led a panel of 150 priests to conduct highly complex and elaborate rituals at the shrine of the re-constructed Somnath Temple in 1951, and then threw it open for worship for all, including the less privileged sections of the society.

*Vaidik Samskriticha Vikas* (1952) won him the Sahitya Akademi Award, the first ever for the best published work in Marathi during 1947-54. The book traces the evolution of Vaidik culture, postulating scientific humanism as harbinger of a new world culture.

The Government of Maharashtra nominated him Chairman of its newly constituted Board for Literature and Culture (1960), and under its aegis he took up a massive project of editing *Marathi Vishwakosha* in twenty-six volumes, of which thirteen have so far been published.

Sri Joshi has another scholarly distinction to his credit. *Upanishadanche Marathi Bhashantar* is his translation of eighteen principal Upanishads into Marathi. He has also edited *Rajwade Lekh Sangraha*, the selected writings of Rajwade, and *Lokmanya Tilak Lekh Sangraha*, selections from Lokmanya Tilak.

A rare combination of traditional scholarship and scientific temper, Sri Joshi has travelled widely in India and abroad. He visited the USA in 1964 at the invitation of the U.S. Government, and the USSR in 1969 to participate in the World Religious Conference at Moscow.

He was honoured with the title of 'National Pandit' in Sanskrit (1973). The University of Bombay conferred on him the degree of LLD. (*honoris causa*) in 1975, and the President of India honoured him with 'Padmabhushan' in 1976.

For his eminence as a scholar and literary critic the Sahitya Akademi confers its highest honour, the Fellowship, on Sri Tarkateertha Laxmanshastri Joshi.

# साहित्य अकादेमी महत्तर सदस्यता
# 1989
# वक्तव्य
# श्री तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

## भारतीय साहित्य का भविष्य

कवि तथा काव्यशास्त्रज्ञ दण्डी ने कहा है कि अगर शब्द-संज्ञक ज्योति न होती तो विश्व अंधकारयुक्त रह जाता। 'शब्द अर्थात् भाषा; साहित्य भाषा का विकसित रूप है। भाषा का अर्थ मानवता है। इसीलिए साहित्य मानवता के विकास का एक महान अंग है। अन्य प्राणी भाषा बोलते नहीं। भाषा और मानवता समव्याप्त तत्त्व हैं। अन्य प्राणियों के पास भावों का अनुभव प्रेम, क्रोध, भूख, प्यास, अन्न, संभोग और अन्य भावनाओं की व्यंजक ध्वनि है; लेकिन प्रज्ञा का संचय करने वाला ध्वनि का आविष्कार अर्थात् भाषा नहीं है। इसे अब भाषा-विज्ञानवेत्ताओं ने सिद्ध किया है। प्राणिसृष्टि का अंतिम विकसित आविष्कार मनुष्य है। मनुष्य का जीवन भाषा के अधीन है। मनुष्य की सामाजिकता भाषा के कारण अधिक समर्थ बनी है। विकासक्रम में मनुष्य प्राणी के अस्तित्व में आने पर वह जिस प्रज्ञा को लेकर आया अर्थात् अन्य प्राणियों की अपेक्षा बड़ा भारी मस्तिष्क लेकर आया, उस मस्तिष्क से जो ज्ञान प्राप्त किया जाता है और जो कल्पनाविश्व निर्माण होता है उसके लिए भाषा की आवश्यकता हुई और उस अपरिहार्य प्रयोजन से मनुष्य शब्द निर्माण करने लगा, प्राप्त ज्ञान को शब्द के रूप में संचित करने लगा। भावनाओं का आविष्कार, वास्तव विश्व का ज्ञान और कल्पित विश्व की निर्मिति प्रधान रूप में निरंतर चलने वाले भाषा के कार्य हैं। इन कार्यों के योग से मनुष्य समाज जी सकता है। यह कार्य उसके हित की रक्षा करता है और हित का विस्तार भी।

'सहित' शब्द से साहित्य शब्द का निर्माण हुआ है। जिसमें हित भरा हुआ है वह सहित। अथवा वक्ता और श्रोता का सहभाव जिसके योग से निरंतर रहता है वह साहित्य है। अरस्तू ने मनुष्य की परिभाषा करते समय उसे राजनैतिक प्राणी कहा है; राजनैतिक जीवन अर्थात् अत्यंत उत्कट परस्परावलंबी सहजीवन है। इधर चार्ल्स डार्विन के विकासवाद के सिद्धांत को प्रस्तुत करने पर मनुष्य की एक नयी व्याख्या सिद्ध हुई है। वह है "मॅन इज ए टेक्नॉलॉजिकल ॲनिमल।" मनुष्य विविध साधन निर्मिति के तंत्रज्ञान से युक्त प्राणी है; पक्षी, मधुमक्षिका आदि प्राणी साधन निर्माण करते हैं परंतु 'साधनों में परिवर्तन नहीं कर सकते या साधनों का परिवर्धन नहीं कर सकते। मनुष्य साधनों में परिवर्तन करता है, उनके गुणों को विकसित करता है उनकी शक्ति को बढ़ाता है और उनमें वैविध्य निर्माण करता है। अन्य किसी भी प्राणी में विविध साधनों का विस्तार करने की प्रज्ञा नहीं होती। इस तंत्रविस्तारकारक प्रज्ञा से मनुष्य ने भाषा का निर्माण किया। यह मात्र अब तक रहस्य ही रहा है कि मनुष्य भाषा का निर्माण कब करने लगा।

पिछले दो सौ वर्षों में मानव-शास्त्रज्ञों ने विश्व की साहित्यिक और असाहित्यिक सभी भाषाओं का अध्ययन किया। इस पृथ्वी पर जितने मानव समुदाय रहते हैं, उनकी भाषा और बोलियों का समग्र अभ्यास कर लेने पर सिद्ध हुआ है कि तिरसठ-चौसठ स्वर-व्यंजनों के अलावा अधिक घटक मानवी भाषा में मिलते नहीं। इन भाषाओं में से कुछ ही भाषाएँ सुसंस्कृत समाज की साहित्य भाषा या ग्रंथ भाषा बनी हैं। हर भाषा निरंतर परिवर्तित होती है। बोली या उपभाषा सुसंस्कृत मुख्य भाषा के प्रभाव में शनैः शनैः अस्तप्राय होती है। मुख्य भाषाएँ लेखर्खानविष्ट होकर व्यावहारिक, मानवी विचारपरामर्श और विचार निवेदन की भाषा बनने पर वे अधिक टिकाऊ बनती हैं। ज्ञान-विज्ञान की और कलात्मक आविष्कार की जो साहित्यिक भाषाएँ रहती हैं उनका संरक्षण. करने की प्रवृत्ति मनुष्य में रहती है जैसे संस्कृत।

ऐसी संरक्षित साहित्यनिष्ठ जनभाषा एक विशिष्ट भौगोलिक प्रदेश के समाज में आर्थिक और राजनैतिक जीवन में संचार का साधन बनती है, तब वह राजनैतिक शक्ति बनती है और विशिष्ट प्रदेश के सुसंस्कृत भाषिक समाज में एक सामूहिक श्रेष्ठ अहंता उत्पन्न होती है, जिसे राष्ट्रीयत्व कहा जाता है। विशिष्ट भूप्रदेश में निवास करने वाला भाषिक समाज राष्ट्रीय अधिष्ठान बनता है। राष्ट्रवाद के इतिहास में इसी अधिष्ठान पर अठारहवीं और उन्नीसवीं शताब्दियों में यूरोप और अमेरिका में धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद का निर्माण हुआ।

इधर बीसवीं शताब्दी में आधुनिक यातायात के गतिशील साधनों के निर्माण होने के बाद भिन्न भाषा के सुसंस्कृत समाज दैनंदिन भाषांतर के तंत्रज्ञान से मन से निकट आये हैं। भाषांतर पद्धति विश्वव्यापी मानव संस्कृति की एकात्मता की अभिवृद्धि करने लगी है। भारतीय राष्ट्रीयता भाषानिष्ठ न रहकर बहुभाषिक और मानव-संस्कृतिनिष्ठ हो रही है। यह सांस्कृतिक यात्रा मानवी समाज की एकात्मक संस्कृति की ओर हो रही है। यह नया इतिहास निर्माण हो रहा है।

साहित्य अकादेमी भारत के गत हज़ार वर्षों में विकसित हुई साहित्य सम्पन्न जनभाषाओं का नित्य समालोचन करती है और भारतीय साहित्यिक भाषाओं के विकास की जानकारी लेती है। भारत की प्रादेशिक भाषाओं का विकास हो रहा है; लेकिन इन प्रादेशिक भारतीय भाषाओं के विकास को महत्त्वपूर्ण दो धोखे उत्पन्न हुए हैं। पहला धोखा यह कि प्रत्येक प्रदेश राज्य के उच्च ज्ञानविज्ञान के विद्यापीठ की शिक्षा का माध्यम मुख्यतः अंग्रेज़ी ही रहा है। इसका कारण आधुनिक विज्ञान और तंत्रज्ञान विस्तृत, गाढ़ा, अद्यतन स्वरूप में प्रादेशिक भाषाओं में- मराठी, गुजराती, हिन्दी, बंगाली, तमिल, कन्नड आदि भाषाओं में निर्माण नहीं हुआ। इसलिए अंग्रेज़ी का आश्रय लेना अनिवार्य हुआ है। केवल उच्च शिक्षा में ही नहीं तो माध्यमिक शिक्षा में भी अंग्रेज़ी माध्यम का आकर्षण सुशिक्षित वर्ग में विशेष रूप से मिलता है। अंग्रेज़ी माध्यम के विद्यालय में अपने पुत्र या पुत्री को प्रवेश मिले इसके लिए मध्यम-वर्गीय माँ- बाप उत्सुक रहते हैं, उसके लिए प्रयत्नशील रहते हैं। यह अंग्रेज़ी का संकट अपनी प्रादेशिक भाषाओं के लिए बाधक न बने इसके लिए उपाय योजना करना आवश्यक है। अंग्रेज़ी आवश्यक है ही और इसके साथ प्रादेशिक भारतीय भाषाओं का ज्ञान- विज्ञान सतत सम्पन्न होते रहना भी ज़रूरी है। आधुनिक विज्ञान और तंत्रज्ञान प्रादेशिक भाषाओं में भी पढ़ाने की व्यवस्था अनिवार्य और अपरिहार्य विषय के रूप में शिक्षा मंत्रालय को करनी चाहिए। विद्यार्थी को उपाधि प्राप्त करने के लिए जिस तंत्रज्ञान और विज्ञान के लिए अंग्रेज़ी में सौ गुण रखे जाते हैं, उसी तंत्रज्ञान और विज्ञान के लिए प्रादेशिक भाषा में उतने ही गुण रखने चाहिए। इस प्रकार का बंधन होना चाहिए कि अंग्रेज़ी और प्रादेशिक भाषा में विशिष्ट संख्या में गुण प्राप्त करने पर ही उत्तीर्ण माना जाय।

दूसरा संकट प्रादेशिक भाषाओं के और साहित्य के क्षेत्र में उत्पन्न हुआ है और वह है संस्कृत भाषा की उपेक्षा। अपनी सभी भारतीय भाषाओं को शब्द विस्तार की सामर्थ्य संस्कृत भाषा ने दी है। विज्ञान और तंत्रज्ञान में प्रादेशिक भाषाओं का विकास और विस्तार होना है तो संस्कृत भाषा का माहात्म्य बढ़ाना चाहिए। उसके साहित्य का इतिहास विश्व की किसी भी भाषा की अपेक्षा अधिक प्राचीन है। ऋग्वेद की साहित्यशैली विश्वात्मक दिव्यजीवन दर्शन, अंतः प्रज्ञा और आनंद को जन्म देती है।

---

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

## मा न प त्र

आदरणीय शास्त्रीजी,

आपल्या आयुष्याची चौऱ्याऐंशी वर्षे पूर्ण करून आज आपण पंचाऐंशीमध्ये पदार्पण करीत आहात. या घटनेचा आनंद इतर सर्व मराठी माणसांप्रमाणे महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या सर्व सदस्यांना होत आहे.

शास्त्रीजी, राष्ट्राच्या पुनरुज्जीवनाच्या हेतूने आपल्या प्राचीन शास्त्रांना नवीन विज्ञानाच्या उजेडात पाहणाऱ्या आणि ज्ञानाचा वैयक्तिक व सामाजिक जीवनात उपयोग करणाऱ्या आधुनिक पंडितांत आपण अग्रेसर आहात. पारंपरिक भारतीय शास्त्रे व दर्शने यांचा आपले गुरुजी श्री. नारायणशास्त्री मराठे (ब्रह्मीभूत केवलानंद सरस्वती) यांच्या पायाशी बसून आपण कसून अभ्यास केला, कारण अतिशय कडक अशा तार्किक शिस्तीने बांधलेली ही शास्त्रे गुरुमुखानेच प्रकाशतात हे सत्य लहानपणीच तुम्ही जाणले होते. त्यांच्याबरोबरच ज्या भौतिक शास्त्रांच्या उपासनेने आणि सामाजिक शिस्तीच्या पालनाने सारा युरोप सगळ्या जगाच्या अग्रभागी राहिला. त्याची जोड पराभूत आणि परतंत्र झालेल्या भारतीय मनाला दिल्याखेरीज हा समाज त्याला जखडलेल्या अनेकविध व्याधींपासून मुक्त होणार नाही, हे जाणून तुम्ही पाश्चात्त्य भौतिक विचारांचाही समग्र मागोवा घेत आलात. त्याला गांधीजींच्या प्रभावाखाली तुम्ही एक वेगळे वळणपण दिलेत. त्यामुळे भौतिक आणि मानवतावादी तत्त्वज्ञानाचे प्रवक्ते म्हणून तुम्हाला सारा महाराष्ट्र ओळखतो.

वैदिक, दार्शनिक साहित्याच्या परिशीलनामध्ये आणि प्राज्ञपाठशाळेने प्रसिद्ध केलेल्या प्रचंड ग्रंथसिद्धीमध्ये आपल्या बुद्धीचा व व्यासंगाचा अप्रतिहित विलास आढळतो. आधुनिक विचाराच्या अध्ययनातून आपण ज्या विचारधारेने महाराष्ट्राला संपन्न केले आहे, त्यातून आपल्या सर्वंकष प्रज्ञेचे दर्शन घडते.

आपल्या या वैचारिक जडणघडणीमध्ये आपल्या कृतिशील राजकीय कार्याचा मोठा वाटा आहे. भारतीय स्वातंत्र्ययुद्धामध्ये आपण भाग घेतला, स्वातंत्र्याच्या काळात आपल्या

प्रबोधनपर विचाराने महाराष्ट्राच्या नेत्यांना आपण वेळोवेळी मार्गदर्शन केले. मार्क्सवादी सिद्धांतातून आपल्या व्यासंगाने त्यातील सामर्थ्य व उणिवा हेरून, नवमार्क्सवादी विचारांची जी मूलगामी मानवतावादी मांडणी प्रसिद्ध क्रांतिकारक मानवेंद्रनाथ रॉय यांच्या सहकार्याने आपण केली, त्यामुळे आपल्या विचाराला एक स्वतंत्रच बैठक लाभली.

लोकप्रबोधनाच्या प्रेरणांचा शोध घेण्यासाठी आणि सांस्कृतिक जीवनाला वैचारिक अधिष्ठान देण्यासाठी आपण इतिहासाचार्य राजवाडे यांच्या सांगण्यानुसार युरोपियन 'न्याया'चा अभ्यास केला. देवदास गांधींच्या मिश्रविवाहाचे पौरोहित्य करण्याची कामगिरी गांधीजींनी तुमच्यावर सोपविली. 'A Man of Learning and Spotless Character' या शब्दांत गांधीजींनी तुमचा गौरव केला. सोरटी सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धाराचे पौरोहित्य तुम्हीच केले. गांधींनी अस्पृश्यता निवारणासाठी शास्त्राधाराची कास धरली ती तुमच्या विश्वासावर. 'ज्योतिनिबंध', 'हिंदुधर्माची समीक्षा', 'वैदिक संस्कृतीचा विकास', 'लेखसंग्रह (भाग-१)' इत्यादी आपल्या ग्रंथांचे वैचारिक मोल फार मोठे आहे. त्यामुळे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या दिल्ली अधिवेशनाचे अध्यक्षपद देऊन मराठी रसिकांनी आपला गौरव केला आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाची आपण दीर्घकाळ धुरा वाहून त्याला एक वैशिष्ट्यपूर्ण रूप प्राप्त करून दिले आहे. विश्वकोशाची उभारणी करून तुम्ही आम्हाला कायमचे ऋणी केले आहे.

वास्तविक तुमचा सत्कार म्हणजे पर्यायाने आमचाच सत्कार याची जाणीव असूनही, तुम्हीच लावलेले हे सरस्वतीचे झाड तुमच्या आशीर्वादाने गगनाना भिडावे, असा तुमच्यासारख्या तेजस्वी वैदिक व अत्याधुनिक ब्राह्मणाच्या मुखातून आशीर्वाद मिळावा या भावनेने आम्ही हे मानपत्र आपणांस अर्पण करीत आहोत. त्याचा स्वीकार व्हावा, ही विनंती.

जीवेत शरदः शतम् ।

आपला,

**सुरेंद्र बारलिंगे**

अध्यक्ष

पुणे, दिनांक २७ जानेवारी १९८५ — महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ

---

(संदर्भ : 'पुरोगामी सत्यशोधक', जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, १९८५, पृ. ६३ व ६४).

श्री दीपलक्ष्मीचे मानपत्र

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांस,

महाराष्ट्र सरकारने साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या अध्यक्षपदी आपली नेमणूक केली. या निमित्ताने हे मानपत्र यावेळी आपणास सादर करताना 'श्रीदीपलक्ष्मी'ला विशेष समाधान वाटत आहे. विशेष समाधान अशासाठी की यावेळी आपल्या षष्ट्यब्दीपूर्तीचा मुहूर्त साधता आला आहे. साहित्य संस्कृती मंडळाचे आपण अध्यक्ष झालात ही गोष्ट जाहीर आहे; पण गेल्या रथसप्तमीला आपण एकसष्ठाव्या वर्षात पदार्पण केले, या गोष्टीची कुठे वाच्यता झालेली नाही आपणाला एकसष्ठावे वर्ष लागले हे कुणाला कळाले नाही. याचे कारण आपण हे माहीत होईल अशा तऱ्हेने कोणाला सांगितले नाही. आपण यावेळी शान्ती केली; पण ती संस्कार म्हणून आणि अत्यंत खासगी रीतीने. आपली प्रकृती आता पूर्वीइतकी निकोप नाही. तरीही आपल्याकडे पाहून आपण साठी गाठली असा संशय येणार नाही.

आपले नाव निघताच वाईच्या आपल्या प्राज्ञपाठशाळेचे स्मरण होणे अपरिहार्य आहे. आज आपण पाठशाळेशी एकरूप होऊन राहिला आहात आणि प्राज्ञपाठशाळेचे आजचे तर्कतीर्थ घडविण्याचे कार्य प्रामुख्याने केले आहे, असे म्हटले तर त्यात काही अतिशयोक्ती होणार नाही. ब्रह्मीभूत स्वामी केवलानंद सरस्वतींनी स्थापन केलेल्या आधुनिक गुरुकुलाचे कार्य हे भारताच्या स्वातंत्र्येतिहासातील एक तेजस्वी पान आहे. पूर्वाश्रमीचे नारायणशास्त्री मराठे म्हणजे ज्ञान आणि वैराग्य यांची धगधगीत मूर्तीच होती. बुद्धिमान आणि तरुणमित्र गोळा करायचे आणि त्यांना विद्येबरोबर राष्ट्र आणि समाज यांच्या सेवेची दीक्षा द्यायची हा नारायणशास्त्र्यांचा उद्योग होता. त्या केवलानंदांचे आपण शिष्योत्तम आहात. पांडित्याची आणि राष्ट्रसेवेची जी परंपरा नारायणशास्त्र्यांनी सुरू केली, ती आपण वाढविली आहे.

मौजीबंधन झाल्यापासून ब्रह्मचर्य व्रत पाळून वेदाध्ययन करायचे असा आपला बालहट्ट होता; म्हणून आपण वाईस नारायणशास्त्र्यांकडे आलांत आणि आलात ते कायमचे तेथलेच झालात. आश्रमीय जीवनावरची आपली प्रखर निष्ठा आणि अत्यंत कुशाग्र बुद्धिमत्ता यांची ओळख पडताच नारायणशास्त्र्यांनी शिष्याग्रणी म्हणून आपणास जवळ केले आणि पौर्वात्य आणि पाश्चात्त्य विद्येत पारंगत होऊन आपणही आपल्या गुरूंना संतुष्ट केले. गुरुजींशी आपले मतभेद नाहीत असे नाही; पण त्यामुळे गुरू-शिष्य संबंधात कधी मनोमालिन्य आले नाही. आपली गुरूभक्ती, आपल्या विद्वत्तेप्रमाणेच असामान्य आहे.

प्राज्ञपाठशाळेत आल्यानंतर वेदाध्ययनाबरोबर राष्ट्रीय आणि राजकीय चळवळीचे वारे आपल्याला लागले. यावेळी लोकमान्य टिळकांच्या वाङ्मयाप्रमाणेच

आगरकरांच्या वाङ्मयाचाही आपल्यावर परिणाम झाला आणि केवळ वेदविद्येचे अध्ययन पुरेसे आहे काय, अशी शंका येऊन आपण गुपचूप आश्रम सोडला; पण आश्रमाशी झालेली ही ताटातूट कायमची नव्हती. थोड्याच महिन्यात पुन्हा आपण वाईला आलात; पण या मध्यंतरीच्या काळात आपण बडोद्याला विनोबा भावे यांच्याकडे इंग्रजी शिकलात. त्यावेळी विनोबा आपल्याकडून दररोज पन्नास अवघड शब्द पाठ करून घेत होते. विनोबांसारखा गुरू आणि आपल्यासारखा शिष्य एकत्र आल्यानंतर पाच- सहा महिन्यांतच आपण इंग्रजी भाषेवर प्रभुत्व संपादन केले असले तरी त्यात काही आश्चर्य नाही. इंग्रजी भाषेच्या शिक्षणाप्रमाणे विनोबांच्या सहवासात वेदविद्येबद्दलच्या आपल्या शंकाही दूर झाल्या असल्या पाहिजेत. कारण त्यानंतर आपण शास्त्राच्या अध्ययनाला दुप्पट जोमाने प्रारंभ केला.

नव न्यायाचे अध्ययन करून आपण तर्कतीर्थ झालात. त्यानंतर काशीच्या पंडितांकडे आपण शास्त्राध्ययन केले. वेदोपनिषदांप्रमाणे आपण षड्दर्शनांचेही अध्ययन केलेले आहे. आपण हिंदुधर्मशास्त्राचे प्रकांड पंडित आहात. या भारतभूमीत वेदशास्त्राचे अध्ययन केलेले राजेश्वरशास्त्री द्रविड यांच्यासारखे दिग्गज पंडितही आहेत; पण जुन्या पठडीतून वेदशास्त्राचे अध्ययन करून मानवेंद्रनाथ रॉय यांच्याकडे पाश्चात्त्य विद्याशाखातही पारंगतता प्राप्त करून घेतलेला आपल्यासारखा साम्यवादी महापंडित विरळाच आहे. सनातनी दिग्गज पंडितांशी आपण शास्त्रार्थ करून परिवर्तनवादाचे मंडन केल्यामुळे त्यांनी आपल्याला 'चार्वाक' ठरवले, तर मार्क्सवादी पोथी पंडितांशी शास्त्रार्थ केल्यामुळे त्यांनी आपल्याला 'बुर्ज्वा' बुद्धिवादी ठरविले ! तथापि भारतीय पुनरुज्जीवनाची उभारणी करण्याचे आपले कार्य अमोल आहे.

प्राज्ञपाठशाळेच्या संगतीत आपले जीवन राष्ट्रीय चळवळीशी नेहमीच सुसंवाद राखून आहे. आपण हाडाचे पंडित असले तरी आपणाला राजकारणाचे आकर्षण कधी टाळता आले नाही. १९२० सालच्या सत्याग्रहात आपण वाईला राष्ट्रीय शिक्षणाचेच कार्य करीत होता. १९३० सालच्या चळवळीत आपण सत्याग्रह करून तुरुंगात गेलात. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या आगमनानंतर आपण मार्क्सवादी झालात. त्यानंतर निष्ठावंत रॉयवादी म्हणून आपण १९४२ च्या चळवळीत समरस होऊ शकला नाही; पण स्वातंत्र्य प्राप्तीनंतर रॉय यांच्या नवमानवता वादाचा प्रचार करता-करता आपण पुन्हा काँग्रेसमध्ये दाखल झालात. आपल्या या राजकीय पृथ्वीपर्यटनाने 'पृथ्वी वाटोळी आहे' हे सिद्ध झाले; पण राजकीय मतांतरे स्वीकारताना आपल्या बुद्धीशी प्रामाणिक राहिलात; राजकीय स्वार्थाने प्रेरित होऊन आपण पक्षेपालट केलेला नाही. असे आपल्यावतीने सांगता येईल. राजकारणात आपल्याला बौद्धिक आणि मानसिक समाधान लाभले असले तरी त्याच्या तोलाने आपल्याला शिव्याशापही स्वीकारावे लागले.

गांधीवाद, मार्क्सवाद, रॉय यांचा नवमानवतावाद आणि आता काँग्रेसचा समाजवाद इतकी स्थित्यंतरे आपल्या राजकीय भूमिकेत झाली आणि या प्रत्येकवेळी आपल्याला विरोधकांच्या प्रखर टीकेलाच नव्हे तर निंदेलाही तोंड द्यावे लागले आहे. या टीका आणि निंदा आपण शांतपणे सहन केलेल्या नाहीत; कारण आपण

टीकाकारांना आणि निंदकांना तितक्याच त्वेषाने उत्तर दिले आहे. ही उत्तरे देताना आपण आपली उच्च भूमिका सोडली नाही; पण आपल्या उत्तरात ठामपणाबरोबरच भावनावेगही होता. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नांत आपण श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या भूमिकेचा पाठपुरावा केला आणि तो करताना यशवंतरावांची तुलना शिवाजी महाराजांशी करण्याइतका आपल्या भावनेला आवेग आलेला होता.

आपल्याला राजकारणाचे आकर्षण नसले तरी तो आपला धर्म नसून आपद्धर्मच आहे. आपण राजकारणातही वावरत असल्यामुळे केवळ 'तपः स्वाध्याय निरत' असे आपले वर्णन करणे बरोबर होणार नाही; पण तप आणि स्वाध्याय यांच्यापासून आपण कधीही विन्मुख असत नाही. अध्ययन हाच आपला धर्म आहे, त्यामुळे आकाशात भरारी मारली तरी पक्षी जसा आपल्या घरट्यातच येऊन विसावतो तसे आपण राजकीय आकाशात भरारी मारली तरी अखेर प्राज्ञपाठशाळेतच येऊन बसता. इतकेच नव्हे तर आपले राजकीय व सामाजिक चळवळीतले उद्योग कितीही झाले तरी आपण प्राज्ञपाठशाळेशी असलेला आपला संबंध कधीच सोडला नाही. राजकीय धमालीपेक्षा धर्मकोशाच्या संवादातच आपल्याला तुष्टी प्राप्त होते. त्यामुळे आर्थिक पुष्टीच्या मागे जाण्याचा विचारही आपल्या मनात येत नाही. महाराष्ट्र काँग्रेसमधील आपले स्थान आणि मुख्यमंत्री श्री. यशवंतरावांशी असलेले आपले संबंध ध्यानी आणून मुंबईला एका बड्या वृत्तपत्र संस्थेतर्फे निघणाऱ्या मराठी दैनिकाचे संपादकत्व आपल्याकडे येणार अशी अफवा उडाली होती. त्यासंबंधी विचारता आपण दिलेले उत्तर लक्षणीय होते. 'आम्ही गरीब माणसांना चार आकड्याच्या पगाराचा मोह पडेल असे लोकांना वाटते. पण कोणतेही प्रलोभन आले तरी मी वाई सोडणार नाही.' असे आपण म्हणाला होता; चार आकड्यांच्या पगारापेक्षा प्राच्यविद्येचे क्षेत्र आपल्याला अधिक महत्त्वाचे वाटते आणि या क्षेत्रातील आपली कामगिरी तशीच मोठी आहे.

प्राज्ञपाठशाळेतर्फे निघत असलेल्या धर्मकोशाचे आपण संपादक आहात. या धर्मकोशाचे व्यवहार काव्य; उपनिषदादी आणि संस्कार कांडाचा पूर्वार्ध एवढे खंड प्रसिद्ध झालेले आहेत.धर्मकोशाचे हे प्रचंड कार्य म्हणजे भारतातील अद्वितीय असा विद्येचा एक उद्योग आहे. भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविणारा हा उद्योग पाहून पाश्चात्त्यांचेही डोळे दिपले आहेत. या कोश कार्याचे आपण विशेषतः प्रत्येक कांडाला लिहिलेल्या विवेचक प्रस्तावनेमुळे आपल्या बुद्धिमत्तेची आणि पांडित्याची कीर्ती पंचखंडात पसरलेली आहे. या धर्मकोशाचे अठराही खंड ज्यावेळी पूर्ण होतील त्यावेळी आपल्याला कृतकृत्यतेचे समाधान लाभणार आहे. हे कार्य आपल्या हातून होण्यासाठी आपल्याला दीर्घायुष्य आणि आरोग्य लाभो अशीच सदिच्छा कोणीही व्यक्त करील.

आपण नवमानवतावादी पंडित असला तरी संस्कारांवर आपली पूर्ण श्रद्धा आहे. महात्मा गांधींच्या पुत्राचा राजाजींच्या कन्येशी विवाह झाला. त्याचे पौरोहित्य जसे आपण केले होते तसेच सोमनाथच्या पुनःप्रतिष्ठेचे पौरोहित्यही आपणच पार पाडले. महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या वेळी केलेल्या वैदिक विधीचे पौरोहित्य हे आपण केलेले तिसरे ऐतिहासिक पौरोहित्य होय. संस्कारांवर आपली श्रद्धा आहे याचे आणखी एक उदाहरण म्हणजे साठ वर्षे पूर्ण झाली त्यावेळी आपण स्वतः केलेली उग्र शांती होय.

संस्कार म्हणजे समारंभ नव्हे. संस्कार हे भारतीय संस्कृतीचे एक वैशिष्ट्य आहे असे आपण मानता.

धर्मकोश मंडळाचे आपले कार्य आणि त्यातून प्रकट झालेले पांडित्य हे गीर्वाण भाषेतील आहे. त्यामुळे अखिल भारतीय आणि जागतिक कीर्ती आपल्याला मिळाली. पण मराठी वाङ्मयाकडे आपले दुर्लक्ष झालेले नाही. 'हिंदुधर्म समीक्षा' आणि 'वैदिक संस्कृतीचा विकास' हे आपले ग्रंथ आपल्या पांडित्याची आणि परिणत प्रज्ञेची ओळख मराठी भाषिकांनाहि करून देत आहेत. आपल्या ग्रंथांनी मराठी भाषेतील शास्त्रीय ग्रंथात महत्त्वाची भर घातलेली आहे. प्राज्ञपाठशाळेतून आणखीही संशोधन ग्रंथांची निर्मिती करण्याची आपली मनीषा आहे आणि त्यापैकी महाभारताच्या समग्र मराठी भाषांतराच्या योजनेची वाच्यता यापूर्वीच झालेली आहे.

आपल्या लेखनाप्रमाणेच आपले वक्तृत्वही प्रभावी आहे. आपली भाषाशैली साधी आणि सोपी आहे असे नाही. ती आपल्या पांडित्याला शोभेशी घनगंभीर आहे; पण त्यातील शब्द गांभीर्याप्रमाणेच अर्थगंभीरही आहे. मराठी बाण्याचे आणि भव्यतेमुळे सौहार्द प्राप्त झालेले असे असते. आपले वक्तृत्व ठसठशीत आणि आवेशामुळे प्रभावी आहे. संस्कृतात घोटलेली आपली वाणी समीर गंभीर आहे. अन्यथा अर्थोपार्जनेकडे आपले लक्ष नसले तरी शब्द व्यापारात आपण अर्थाकडेच लक्ष ठेवीत असता. मराठी भाषेच्या आपण केलेल्या सेवेबद्दलची कृतज्ञता १९५४ साली महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या दिल्ली येथील अधिवेशनाचे अध्यक्षपद आपल्याला देऊन मराठी लोकांनी उघड केली.

आता आपल्याला महाराष्ट्र सरकारचे साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्षपद दिले आहे. महाराष्ट्रात आदर्श झालेले साहित्य आणि संस्कृतीविषयक कार्य कोणालाही अभिमानास्पद वाटेल असेच आहे. इतिहास संशोधनाच्या आणि कोश निर्मितीच्या क्षेत्रातील मराठी भाषेचे कार्य भारतीय भाषांत मराठीला आघाडीवर ठेवणारे आणि इतरांना आदर्श ठरणारे असेच आहे. महाराष्ट्रात विद्वानांची जशी परंपरा आहे, तशीच सामाजिक आणि राष्ट्रीय दृष्टीचे निरलस कार्य करण्याचीही परंपरा आहे आणि ही परंपरा विद्येच्या क्षेत्रात उमटलेली आहे. आतापर्यंतचे कार्य स्वयंप्रेरणेने झालेले आहे. महाराष्ट्र राज्य निर्मितीमुळे महाराष्ट्रातील संस्कृती पुनरुज्जीवनाची प्रेरणा निर्माण झालेली आहे. ही प्रेरणा भाग्यतेशी सुसंगत अशा तऱ्हेने क्रियान्वित करण्याची जबाबदारी आपल्यावर आलेली आहे. सरकारी मदतीमुळे लोकप्रयत्नाला स्वयंप्रेरणेच्या कार्याला उठाव मिळेल आणि महाराष्ट्राच्या साहित्याच्या आणि संस्कृतीच्या सर्वांगीण विकासाचे प्रयत्न होतील. हे पाहण्याची जबाबदारी अध्यक्ष या नात्याने आपल्यावर पडलेली आहे. ही जबाबदारी पार पाडण्याचे सामर्थ्य आपल्याला लाभो अशीच महाराष्ट्राची इच्छा आहे.

श्रीदीपलक्ष्मी, मार्च,
१९६१

# गौरवपत्र

**श्रीदेवदेवेश्वर संस्थान**
पर्वती व कोथरुड
पुणे ३०

गणेश जयंती माघ शुद्ध चतुर्थी शके १९०७

माननीय तर्कतीर्थ डॉक्टर लक्ष्मणशास्त्री जोशी
यांचे सेवेसी कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार. विनंती विशेष

आपण वेदविद्येचे महान पंडित, निस्सीम देशभक्त, सामाजिक सुधारणेला वाहून घेतलेले थोर विचारवंत आहात. आपला कृतज्ञतापूर्वक गौरव करताना श्रीदेवदेवेश्वर संस्थानास आनंद व अभिमान वाटत आहे.

आपण ब्रह्मीभूत स्वामी केवलानंद सरस्वती यानी वेदविद्येला लोकाभिमुख व सामर्थ्यवान करण्याच्या उद्देशाने स्थापन केलेल्या प्राज्ञ पाठशाळेत व्याकरण, न्याय मीमांसा आणि अद्वैत या वैदिक विषयाचा अभ्यास केलात. पुढे वाराणसीस जाऊन आपले वैदिक अध्ययन पूर्ण केले व सन १९२२ मध्ये कलकत्त्याच्या शासकीय महाविद्यालयाची 'तर्कतीर्थ' ही पदवी बहुमानासह संपादन केली.


आपण १९२२ साली प्राज्ञपाठशाळेत व्याख्याते म्हणून प्रवेश केलात. व तेथे अधिकाधिक जबाबदाऱ्या स्वीकारीत आपल्या पूज्य गुरुजींच्या निर्याणानंतर पाठशाळेचे अध्यक्षपद आज - तागायत भूषविले आहे. तसेच शाळेच्या धर्मकोश या प्रचंड प्रकल्पाच्या संपादनाची जबाबदारीही स्वीकारली आहे.

वाईत अध्यापन करीत असताच आपण इंग्रजी भाषेचे अध्ययन करून त्या भाषेवर प्रभुत्व मिळविले. त्यामुळे आपणास पाश्चात्य तत्वज्ञान, धर्मसंकल्पना, मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, तात्विक विचार पध्दती इत्यादीवरही गहन ग्रंथांचे आधुनिक दृष्टिकोनातून समाजहिताभिमुख असे विशदीकरणही करता आले. १९३० आणि १९३२ च्या स्वातंत्र्य लढ्यात आपण भाग घेतलात आणि दोनदा कारावासही पत्करलात तात्विक राजकारणात मानवेंद्र रॉय यांच्या नवमानवतावादी विचारसरणीचा जरी आपणावर प्रभाव असला तरी भारतातील सर्वसाधारण राजकीय प्रवाहाशी आपले घनिष्ठ संबंध आहेत. आपल्या विशाल मानवतावादी दृष्टिकोनामुळे सामाजिक परिवर्तन घडून आले. महात्माजींनी आपल्या हरिजनोध्दार चळवळीच्या संदर्भात आपली नियुक्ती हिंदुधर्मविषयक सल्लागार म्हणून केली होती. त्यावेळी अस्पृश्यतेला हिंदुधर्मात स्थान नाही अशी आपण ग्वाही दिली. त्यामुळे त्या चळवळीला धार्मिक अधिष्ठान लाभले. सोरटी सोमनाथ मंदिराच्या प्राणप्रतिष्ठेच्या वेळी हे मंदिर अस्पृश्यांसह सर्वांना खुले होण्याच्या अटीवरच आपण तेथील याज्ञिकात पौरोहित्य स्वीकारले यातच आपली सामाजिक समतेची निष्ठा स्पष्ट झाली.

आपली ग्रंथसंपदाही मोठी आहे, ती बहुतेक वैचारिक आणि समीक्षात्मक स्वरूपाची आहे. हिंदुधर्माची समीक्षा, वैदिक संस्कृतीचा विकास, म. ज्योतिराव फुले यांच्यावरील प्रबंध, आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा व रससिध्दांत, व उपनिषदांचे मराठी भाषांतर, व अनेक लेखसंग्रह त्यातील वर्ण्य - विषय व साहित्यगुणांमुळे मराठी भाषेत आदराचे स्थान पावले आहेत. यापेक्षाही आपले धर्मकोशाचे व विश्वकोशाचे संपादन ही कार्यव्याप, व्यासंग व बौध्दिक श्रम याबाबतीत प्रचंड व अतुलनीय अशीच आहेत.

आपण प्राज्ञपाठशाळेचे प्राचार्यपद भूषवून शाळेची उद्दिष्टे व्याप व विस्तार वाढविला. वाई येथे महाविद्यालय, दलितांसाठी वसतीगृह स्थापन करून आपल्या शैक्षणिक कल्पनांना मूर्तस्वरूप दिले. हातकागदाचा कारखाना व छापखाना स्थापन करून सामाजिक आर्थिक विकासालाही हातभार लावला.

आपल्या प्रगाढ पांडित्याला साजेसे बहुमानही आपणांस लाभले आहेत. कित्येक वर्षे महाराष्ट्र शासनाने आपणांस साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्षपद देऊन मराठी विचारप्रवर्तक ग्रंथ प्रकाशनाची जबाबदारी आपणांवर सोपवली होती. १९५४ मध्ये महाराष्ट्र साहित्य परिषदेने आपणास अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष निवडून आपल्या साहित्यसेवेचा यथोचित गौरव केला. राष्ट्रपतींनी 'राष्ट्रीय पंडित' व मुंबई विद्यापीठाने सन्माननीय एल.एल.डी. पदवी देऊन आपला बहुमान केला आहे. १९७६ मध्ये आपणांस 'पद्मभूषण' सन्मानही मिळाला आहे. राष्ट्रभाषा प्रचार समिती व वैदिक संशोधन मंडळ या पुण्यातील संस्थांचे अध्यक्षपदही आपण भूषविले आहे. आपणास देशोदेशींची व्याख्यानासाठी निमंत्रणे येऊन जवळ जवळ सर्व जगभर प्रवास करून मराठी भाषेचा प्रचारही करण्याचा मान आपण मिळविला आहे.



आपली वेदविद्या, वाङ्मयव्यासंग, राष्ट्रभक्ती आणि सामाजिक कार्य यामुळे भारतीयांपुढे आपण एक आदर्श व्यक्तिमत्व निर्माण केले आहे. आपल्या सारख्या व्यक्ती सर्व भारतालाच ललामभूत आहेत. श्रीदेवदेवेश्वर संस्थान पर्वती व कोथरूड, पुणे यांस आपणाबद्दल कृतज्ञता, आदर व अभिमान वाटत आहे. या भावनांचे प्रतिक म्हणून या वर्षीचा

## श्रीमंत नानासाहेब पेशवे धार्मिक आणि अध्यात्मिक पुरस्कार

आपणास आज रोजी आजचे अध्यक्ष महाराष्ट्राचे राज्यपाल श्री कोना प्रभाकर राव यांचे शुभहस्ते अर्पण करण्यात येत आहे.
आपणास दीर्घायुरारोग्य लाभो व आपले पुढील आयुष्यही सुखाचे व कार्यप्रवणतेचे जावो अशा शुभेच्छाही श्री देवदेवेश्वर संस्थान या प्रसंगी व्यक्त करीत आहे.

कळावे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

आजच्या समारंभाचे अध्यक्ष — आपला नम्र

K. Prabhakar Rao

(कोना प्रभाकर राव)
राज्यपाल, महाराष्ट्र राज्य

(म.ग. वाटे)
सरपंच


विश्वस्त मंडळ

मा. जिल्हाधिकारी पुणे
पदसिद्ध विश्वस्त
श्री. प.वि. पटवर्धन
श्री. वि.म. साठे.
सौ. चंपूताई गोखले.

श्री. म.ग. वाटे
सरपंच
श्री. वि.वि. पेशवा.
श्री. मनोहर य. जोशी.

**राजर्षी शाहू छत्रपती स्मारक विश्वस्त मंडळ, कोल्हापूर**



**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना १९८९-९० चा**
**'शाहू पुरस्कार' अर्पण करताना वाचलेले**

# गौ र व प त्र

राजर्षी शाहू स्मारक विश्वस्त मंडळाचा १९८९-९० चा शाहू पुरस्कार महाराष्ट्रातील एक थोर विचारवंत, वयोवृद्ध, तपोवृद्ध व ज्ञानवृद्ध तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना देऊन, शाहू स्मारक विश्वस्त मंडळ त्यांना आदराने अभिवादन करीत आहे. हे वर्ष म. जोतीराव फुले यांच्या निर्वाण शताब्दीचे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मशताब्दीचे, म्हणून या वर्षी महाराष्ट्राची सामाजिक जडणघडण करण्यात महत्त्वाचा वाटा उचलणाऱ्या तर्कतीर्थांना हा पुरस्कार प्रदान करताना मंडळाला विशेष आनंद होत आहे.

नव्वदीच्या घरात असलेल्या तर्कतीर्थांचं सारं आयुष्य ज्ञानोपासनेत गेलेले आहे.

शास्त्रीजींचा जन्म धुळे जिल्ह्यातील पिंपळनेर येथे २७ जानेवारी १९०१ रोजी झाला. वडिलांच्या हाताखाली प्राथमिक संस्कृत अध्ययन केल्यानंतर १९१४ साली केवलानंद सरस्वती यांनी स्थापन केलेल्या वाईच्या प्रख्यात प्राज्ञ पाठशाळेत त्यांनी प्रवेश केला व १९१८ साली न्यायशास्त्राच्या पुढील अभ्यासासाठी ते वाराणशीला गेले. १९२२ साली त्यांनी कलकत्त्याच्या शासकीय संस्कृत महाविद्यालयाची तर्कतीर्थ ही पदवी सन्मानासह संपादन केली.

१९२२ साली शास्त्रीजी वाईत परतले व प्राज्ञ पाठशाळेत शिक्षक म्हणून त्यांनी आपल्या कामाला सुरुवात केली. तेव्हापासून आजतागायत प्राज्ञ पाठशाळा हे शास्त्रीजींचे कायमचे निवासस्थान व कार्यक्षेत्र बनले आहे. १९५५ सालापासून ते या मंडळाचे तहहयात अध्यक्ष आहेत.

१९३० च्या सुमारास प्राज्ञ पाठशाळेने स्वामी केवलानंद सरस्वती यांच्या नेतृत्वाखाली धर्मसुधारणेचे आंदोलन सुरू केले. धर्मशास्त्राची ऐतिहासिक दृष्टिकोनातून चिकित्सा करून मानवी मूल्यांना पोषक व आजच्या परिस्थितीला साजेल असा धर्मशास्त्राचा अर्थ लावण्याच्या या आंदोलनात शास्त्रीजींनी मोलाचा वाटा उचलला होता. नवीन विद्येच्या प्रकाशात आपली प्राचीन विद्या तपासून घेतली पाहिजे, अशी शास्त्रीजींची धारणा होती. नव्या व जुन्याचा सुंदर संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो. शास्त्रीजींच्या विचारांना प्राचीन भारतीय परंपरेच्या खोलीचे व पवित्रतेचे आणि आधुनिक विद्येच्या सामाजिकतेचे व कालसापेक्षतेचे परिमाण प्राप्त झाले आहे.

१९३४ साली प्राज्ञ पाठशाळेत चिरंतन स्मारक ठरेल अशा 'धर्मकोशा'च्या प्रचंड प्रकल्पास शास्त्रीजींनी सुरुवात केली. २६ खंड असलेल्या या कोशाचे १६ खंड प्रसिद्ध झाले आहेत.

शास्त्रीजींचे चिरंतन स्मारक ठरेल अशी आणखी एक ग्रंथप्रकाशनाची योजना त्यांनी कार्यान्वित केली आहे. इंग्रजीतील 'एन्साइक्लोपीडिआ ब्रिटानिका'च्या धर्तीवर मराठी विश्वकोशाची योजना आखण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष म्हणून शास्त्रीजींच्यावर शासनाने सोपविली. या विश्वकोशाचे २६ खंड योजिलेले असून त्यातील १४ खंड आजमितीस प्रकाशित झाले आहेत.

शास्त्रीजींचे लिखाण हे प्राचीन भारतीय परंपरा व धर्मशास्त्र या क्षेत्रांपुरते मर्यादित नाही. मराठी साहित्य समीक्षेलाही त्यांनी 'आनंद मीमांसा' व 'आधुनिक मराठी साहित्य समीक्षा' हे ग्रंथ लिहून समृद्ध केले आहे. उपनिषदांचे मराठी भाषांतर, राजवाडे लेखसंग्रह व लोकमान्य टिळक लेखसंग्रह यांचे संपादन साहित्य ॲकॅडेमी पुरस्कारप्राप्त 'वैदिक संस्कृतीचा इतिहास' ही आणखी काही शास्त्रीजींची विशेष ग्रंथसंपदा.

राष्ट्रीय वातावरणाने ओतप्रोत भरलेल्या प्राज्ञ पाठशाळेत वास्तव्य असलेल्या शास्त्रीजींनी गांधीजींच्या स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय भाग घेतला. १९३० व १९३२ मध्ये त्यांनी कारावासही भोगला. १९३६ साली ते मानवेंद्रनाथ रॉय या मार्क्सवादी नेत्याच्या प्रभावाखाली आले. मार्क्सवादाचे आमूलाग्र पुनर्मूल्यांकन करून नवमतवादी तत्त्वज्ञानाची स्थापना करण्यात तर्कतीर्थांचा वैचारिक सहभाग मोठा होता. 'भारतीय प्रबोधनाचे प्रसादचिन्ह' असे रॉय यांनी तर्कतीर्थांचे वर्णन केले आहे. तर्कतीर्थांच्या आयुष्यातील एक अभिमानाची गोष्ट म्हणजे ते महात्मा गांधींचे धर्मशास्त्रविषयक बाबींचे प्रमुख सल्लागार होते. अस्पृश्यतेला हिंदूधर्मशास्त्रात कुठेही आधार नाही, हे आपले मत त्यांनी गांधीजींच्या निदर्शनास आणून दिले होते. शास्त्रीजींनी १९५१ साली सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धाराच्या कार्यक्रमात प्रमुख अध्वर्यू म्हणून काम केले. पण या जीर्णोद्धारात भाग घेण्यापूर्वी मंदिराच्या विश्वस्तांकडून मंदिर हरिजनांसहित सर्वांना खुले राहील असे आश्वासन शास्त्रीजींनी घेतले होते.

शास्त्रीजींनी आपल्या सामाजिक व संशोधनात्मक कार्याच्या अनुरोधाने भारतभर व परदेशात अनेकदा प्रवास केला आहे. अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिसंवादांत व चर्चासत्रांत त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. त्यांना अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सन्मानही मिळाले आहेत. भारताच्या राष्ट्रपतींनी १९७३ साली दिलेली 'राष्ट्रीय संस्कृत पंडित' ही पदवी, १९७५ साली मुंबई विद्यापीठाची एलएल. डी. ही सन्माननीय पदवी, १९७६ साली राष्ट्रपतींकडून 'पद्मभूषण' हा किताब, १९५४ साली साहित्य अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्षपद, १९८९ साली साहित्य ॲकॅडेमीची फेलोशिप, फाय फौंडेशनचा 'राष्ट्रभूषण' हा किताब, जागतिक धर्मपरिषदेला हजर राहण्याचे रशियाचे आमंत्रण वगैरे अनेक सन्मान शास्त्रीजींच्या शिरपेचात आज विराजमान आहेत. पण महाराष्ट्रातील प्रबोधन युगाचे एक प्रमुख उद्‌गाते असलेल्या शास्त्रीजींना जागतिक सामाजिक चळवळीच्या इतिहासात मानाचे स्थान असलेल्या राजर्षी शाहूंच्या नावाचा हा पुरस्कार स्वीकारण्यात विशेष आनंद व अभिमान निश्चितच वाटेल.

नव्वदीच्या घरात असलेल्या शास्त्रीजींचे प्रबोधनाचे कार्य आजही अखंडपणे चालू आहे. "People grow old by deserting their ideals" या उक्तीप्रमाणे शास्त्रीजी अद्यापही तरुण आहेत. आणि असेच चिरतरुण शास्त्रीजी आम्हास यापुढे अनेक वर्षे हवे आहेत, म्हणून शास्त्रीजी,

'जीवेत् शरदः शतम्!'

# मानपत्र

ॐ

## ॥ मानपत्रम् ॥

विविधविद्यावैदुषीभूषिताशेषशेमुषीका अनेकललितकलाकलाप-विलासकौशलेनाधिगतरासिकधन्यमूर्धन्यभावाश्चातूर्यौदार्यसहृदयत्वलोकहित-परायणत्वसदसन्निर्णयसामर्थ्याद्यनवद्यहृद्यागण्यगुणवारिधयः महाराष्ट्रपंडित-मंडलीमंडना औंधप्रजेश्वरत्वेऽपि तन्मान्यप्रतिनिधयस्तत्रभवंतो भवानीभक्ति-भावितभावा भवानरावाः!

अद्य खलु सकललोकमंगले काले भवदीयो गुणगणोंऽतःकरणेऽस्मदीये आविर्भूय, भावत्ककमनीयकल्याणचिंतने कार्त्स्न्यप्रदर्शने च प्रचोदयत्यस्मान् मुखरयति च जोषंभावं भजमानानपि। स्वीयराज्ये विनयाधानेन, प्रजा-प्रकर्षोद्यमेन, राज्यविधौ धर्मे आचारे लोकव्यवहारे च देशकालाद्युचितपरि-वर्तनप्रयत्नेन नवीनविज्ञानपरिशोधितयंत्रोद्यमोद्भलने धृतधुरत्वेन च महाराष्ट्र-स्य भारतवर्षस्य च समुचिताऽपचितिर्विरच्यते भवद्भिः। हीनानां दीनानां जघन्यानामंत्यजानां सर्वतोमुखसंततोद्धारप्रयत्नेन पतितपावनस्य भगवतो भवस्यांशभावमेव भजन्ते भवन्तः। विशेषतः रूपलेख्यकलायां प्राप्तप्रागल्भ्यानां भवतां भारतीयचित्रकलेतिहासे परमां स्फीतिमावहति भवदीयं यशः, भारतीय-चेतसः सर्वांगीणविकासस्य पंथानं च प्रकाशयति। नवीनेऽपि वयसि दौर्बल्येन

प्रहीणतेजसां महाराष्ट्रतरुणानां स्वीयादर्शनोपदेशेन च यत्संपत्संपादनेऽ-प्रणीत्वमासादयंति । संप्रति महाराष्ट्रमंडले प्रवर्तमानसंस्कृतिविवर्धककार्येषु भावत्कोऽनुग्रहः प्रदीपायते निबिडांधतमसि । प्राज्ञपाठशालामंडलप्रवर्तित-धर्मकोशकार्ये समाचरितं भवदीयं साहाय्यं न वयं विस्मर्तुं प्रभवामः। भवदीयो गुणसमुदाय एवास्माकं हृदयमानंदसंदोहेन समुल्लासयति ।

भवतां विधेयः

लक्ष्मणशास्त्री जोशी,


अध्यक्षः प्रा. पा. शा. मण्डलम्—वाई

संपादकः धर्मकोशस्य


सर्वे धर्मकोशमंडलसदस्याश्च

बुधवासरे,
ता. १४-११-३४.

# विविध मान्यवरांची स्वहस्ताक्षरातील पत्रे




INDIA
POST CARD
WRITING SPACE
ADDRESS ONLY
POONA CITY
NINE PIES
Superintendent
Yeravda Central Prison.
(Poona).
Sadashiv Peth
Poona




शिमोगा
२५।८।२८

कृ. रा. वि. वि. —

आमच्या सभेचे काम काल संपतांच आज आपले पुस्तक
'आनंद मीमांसा' हे हातात घेतले व समग्र वाचले.
वाचून किती आनंद झाला तो सांगता पुरवत नाही. मी
मनाने प्रवृ. पर व आशावादी आहे. उ. नि. निवृत्तिपर
वेदांताने आमच्या समाजाचे अनहित झाले आहे असें,
अर्थात कांही प्रमाणात, माझे मत असल्याने आपले पुस्तक वाचून
आज मला एक 'सहोदर' भेटल्याचा आनंद झाला. अलीकडे
आपल्या समाजाच्या विचाराची दिशा थोडीथोडी बदलत
चालली आहे हे खरे आहे. न बदलून करणार काय? कारण
प्रवृत्तिपर प्रगमनशील जगाचे धक्के इतके बसू लागले
आहेत की निवृत्तिरूप निद्रा टिकणेच शक्य नाही. पण
नव्या पिढीच्या नेत्यांची शिकवण याच दिशेने आहे. पण
त्यांचे विचार भाषा व तत्त्वज्ञान, प्रायः परकीयांकडून घेतले जात
असल्याने आणि कोणत्याहि परकीय गोष्टी विषयी मन
स्वाभाविकपणेच साशंक होण्यास सारखीच राजकीय
परिस्थिति असल्याने, त्यांच्या उपदेशाचा परिणाम राष्ट्राच्या
मनावर फारसा होत नाही. म्हणून शक्य तितके नवे प्रगति-
पर विचार आपल्या जुन्या ग्रंथांच्या आधारे, जुन्या ग्रंथांच्या
भाषेने आणि जुन्या तत्त्वज्ञानाच्या सरणीने सांगणे फार आव-
श्यक आहे. लो. टिळकांनी गीता प्रवृत्तिपर लावून शास्त्र-
विधानें जो उपकार केला त्यांत आपल्या या पुस्तकानें आणखी
भर घातली असे मला वाटते. कारण टिळकांच्या पुस्तकानें


प्रवृत्ति ही कर्तव्याच्या दृष्टीने ठीक किती. पण केवळ कर्तव्याचा आनंद फारच उच्च कोटीतला असतो. म्हणून प्रवृत्तीच्या आनंदाच्या व्यावहारिक फायद्याचा हि असतो हें दाखविण्याने दुष्यांत सारखा ज्ञानाच्या सारखे आपल्या पुस्तका मुळे झाले आहे. दार्शनिक ग्रंथांपासून दुःख मीमांसेची सुरुवात झाली आणि पुढें गौतम बुद्ध व त्यानंतर साधुसंत यांच्या एकांगी उपदेशाने ती मीमांसा समाजाच्या मनावर अधिक परिणामकारक झाली हा आपला सिद्धांत ऐतिहासिक दृष्ट्या सत्य असून या मीमांसेच्या व उपदेशाच्या विरुद्ध टीकेवर द्यावयाची तर ती उपनिषदें व त्याच्या हि पूर्वी वेद येथपर्यंत जाऊन त्यांच्या आधारे दिली तर ती अधिक उपयुक्त होईल अशी जी दृष्टि आपण अंगिकारिली ती सहृदयताजन्य आहे. माझ्या मते आपण एक गोष्ट अधिक विस्ताराने करावयास पाहिजे, ती ही प्रवृत्तीत जसा एक प्रकारचा आनंद आहे (प्रवृत्तीच्या भावनेचा उगम, प्रवृत्तीची स्थिति, व प्रवृत्तीच्या फलास्वाद या तिन्हींतहि आनंदच आहे) त्याच प्रमाणे निवृत्तीत हि एक प्रकारचा आनंद असतो ही गोष्ट तत्त्वदृष्ट्या मान्य करावी लागते. पण निवृत्तीचा आनंद व त्याचे फल ही व्यक्तीच्या उपयोगी असून प्रवृत्तीचा आनंद व त्याचे फल ही व्यक्तिप्रमाणे समाजाच्या हि धारणाला व उत्कर्षाला (अभ्युदय वा नि:श्रेयस्) उपयोगी पडतात



हा लोकांत त्यांत फरक आहे. शिवाय असेंहि दाख-
विता येईल की खरा आनंद एकांतिक प्रवृत्तींत नाहीं
किंवा एकांतिक निवृत्तींत हि नाहीं, तर दोहोंच्या सांध-
मेळीत आहे. मला स्वतः ला एकांतिक प्रवृत्तींत किंवा
एकांतिक निवृत्तींतहि आनंद मानणारापेक्षां दोहोंच्या
योग्य मिश्रणांत आनंद मानणारा हा अर्थात् श्रेष्ठ.
लोकांनीं प्रवृत्तीचा उपदेश करीत असतां स्वतः मात्र निवृत्त
असणारा हि चांगला; पण लोकांनें निवृत्तीचा उपदेश
कर-करीत असतां स्वतः मात्र स्वार्थबुद्धीनें प्रवृत्तींत गढलेला मनुष्य
हा अधम कोटीतला असून समाजाचा तो घात करितो
असें माझें मत आहे. या अधमपणाचीं उदाहरणें साध्या
व्यवहाराप्रमाणें हल्लींच्या राजकारणांत हि पुष्कळच
आढळतात हें सूक्ष्म अवलोकन केल्यास आपणासहि
दिसून येईल. असो. आपण लिहिलेल्या पुस्तकाच्या
हजारों प्रति निघून त्या नव्या पिढीच्या हातीं पडल्या
पाहिजेत असें मला वाटतें. व याच विषयावर आपण
सूक्ष्मांत शिरून इतर पुस्तकें लिहिलीं तर तीं फार
उपयुक्त होतील. कळावें.

न. चिं. केळकर

*साहित्य सम्राट न. चिं केळकर यांनी पत्राद्वारे केलेले 'आनंदमीमांसा' ग्रंथाचे परीक्षण*



जा. क्रं. ५५६


आश्रम सासवड जि. पुणे

मु. पुणे. ता० [illegible]

सप्रेम नमस्कार

माझ्या पत्राचें तुमचें उत्तर आज मिळाले. पत्रांतील मंजुरीबद्दल धन्यवाद. ऑ० १२ ही तारीख मला सोयीची आहे. त्याप्रमाणें मी श्री. वि. म. बेडेकर यांना कळविलें आहे व श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांना आज पत्रानें कळवीत आहे. तुम्हीहि श्री. लक्ष्मणशास्त्री यांना अेक कार्ड टाकून ता. १२ ला पुण्याला येण्याबद्दल कळवावें मी ९ ता. मद्रासकडे जाणार आहे. १।१० ला येथें परतेन अधिक भेटी तेव्हां कळावे.

[illegible]






नाम श्री. गोवर्धन पारिख

पता 446 Sion Road

डाकख़ाना

ज़िला Bombay 19

*'नवभारत' मासिक सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला पुणे यांचे मार्फत प्रारंभी प्रकाशित होत असे.*
*ते पुढे १९५५-५६ च्या दरम्यान प्राज्ञपाठशाळामंडळ, वाईस हस्तांतरित करण्यात आले.*
*त्या संदर्भातील त्या मासिकांचे मूळ चालक व विख्यात काँग्रेस नेते मान. शंकरराव देव यांचे पत्र*




आनंद प्राज्ञ
वाई, २८
६/१२/७८

स. न. वि. वि.

~~[struck]~~ शास्त्रीजींची स्वामी केवल-सरस्वती आजी प्राज्ञ पाठशालेचे कार्य' ह्यावरी मी घेतलेली मुलाखत आज तुमच्या हातात पडली असेल. वास्तविक मी ती ४ तारखेला प्रवासी मार्फत पुण्याला पाठविली होती व ५ तारखेला ती तुमच्या हाती पडेल अशी कल्पना होती. पण तसे न घडता, मी काल (गुरुवारी) पुण्याला गेलो असताना 'प्रवासी'च्या ऑफिसातून ती घेतली व शहाबरोबर वाईला पोचविली.

आता अंकाच्या छपाईला सुरवात करता येईल. मुलाखत प्रथम, नंतर शास्त्रीजींचे हिंदू, बौद्ध व जैन धर्मावरील लेख, मग शहांच्या इस्लाम व मानवतावाद ह्या लेखाचे रूपांतर हा क्रमाने लेख यावेत. शहांच्या लेखाचे रूपांतर मी वाईला पाठविले आहे. शास्त्रीजी लेख लिहीत आहेत व ते एक दोन दिवसात पुरे होतील. ख्रिश्चन



धर्मावरील माझा लेख मी सोमवारी तुमच्या हाती मिळेल अशी व्यवस्था करीन. Lay-out वगैरे चांदवडकर करतील. ह्या बाबतीत काही अडचणी आल्या तरी कळवणे म्हणजे मला [illegible] फोटो व परिशिष्टावरील नोंदी उद्या पोस्ट करीन. कळावे हे विज्ञापना

आपला
मे. पुं. रेगे



श्री प्रा. ग. म. सुर्वे
विश्वकोश कार्यालय
वाई
४१२८०३

पु. ल. देशपांडे

पुणे
3 ऑगस्ट ७६

प्रिय शास्त्रीजी,


सोबत रवीन्द्रनाथ ठाकूर यांच्यावरील नोंद विश्वकोशासाठी पाठवीत आहे. लेखनांत दुरुस्ती करावीशी वाटल्यास अवश्य करावी. गुरुदेवांच्या आयुष्यांतील महत्त्वाच्या घटनांचा उल्लेख करण्याचा प्रयत्न केला आहे. कोठेहि काही कुठून अनुच्छेदविन गाळणे शक्य आहे. विविध अंगांनी समृद्ध असे त्यांचे जीवन होते.— हस्तलिखित type झाल्यानंतर मला अवलोकनार्थ पाठवणे शक्य होईल का? ते आवश्यक आहे असे मला वाटते.— मुद्रणानंतर पुढचे हस्तलिखित मला परत हवं आहे. सुनीताने माझ्या हस्तलिखितांचा संग्रह केला आहे.

कळावे.

आपला
पु. ल. देशपांडे

तर्कतीर्थ श्री लक्ष्मणशास्त्रीजी जोशी
वाई

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ
मराठी विश्वकोश कार्यालय,
वाई (सातारा)
आवक क्र. 2488
दिनांक 5 AUG 1976



**महाराष्ट्र रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टी**

५३८ नारायण पेठ,
पुणें २.

जा. नं.


तारीख २४ — ७-१९४५

सौ. प्रिय सत्यवतीस —

सप्रेम आशीर्वाद.


माझी प्रकृति ठीक. चि. मधू बद्दल मुंबईस ती आल्याच्या पत्त्यावर पत्र मधूस पाठविण्यास सांग.

तुझी मन:स्थिति चांगली असावी अशी माझी अपेक्षा आहे. माझ्यावर तुझा विश्वास पूर्ण असला तर तुला आयुष्यात खरा आनंद मिळेल व समाधान लाभेल. मी तुझ्याशी खरे बोलतो. तेव्हां तूं माझ्या बद्दल अधिक वाईट ग्रह करून घेतेस, हें चांगलें नाही. तुला जें आवडेल, तेंच मी करावें हें मला मान्य आहे. तुझ्या शब्दाचा मी गुलाम आहे, हें तुला माहीत नाही.



तूं जर माझ्यावर विश्वास ठेवला नाहीस, तर तुझें आयुष्य दुःखांत जाईल, व त्यामुळे माझें जगणें फुकट जाईल.

प्रिय मधुकरसाठे हाही माझ्याबद्दल गैरसमज करून घेऊं लागला आहे. खरा स्नेह, विश्वास असेल तर च राहतो. विश्वास नसेल तर स्नेहाचा पाया कच्चा राहतो. तो स्नेह आंतून पोखरून शेवटी नष्ट होतो. मी त्याच्याशी स्वार्थीपणाने कधी वागलो नाही; तशी भावनाही माझ्या मनांत आली नाही. या पुढे काय होईल? ते त्याच्या मनावर अवलंबून राहील.



महाराष्ट्र रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टी

५३८ नारायण पेठ,
पुणें २.


जा. नं.

तारीख [illegible] १९५४

परंतु मला भीति वाटते. तो आणि आपण एक आहोत, हे सांगणे मला कधी ही आवडलें नव्हतें. हे मला मात्र माहीत होतें. या पुढे निराळेपणा वाढत जाईल. कारण आधीपासूनच साशंकता होती; त्यांत नव्या परिस्थितीची भर पडली. अंतर वाढत जाईल. थोडी कशी टिकेल याचीच मला काळजी आहे. देखावा न ठेवता, पूर्ण विचार करून, सर्व निश्चित केलें तर बरें.

तूं आनंदांत राहतीस तरच मला यश येईल.

तुझा
लक्ष्मणशास्त्री
[मागे पहा]



ता. क. प्रकृति चांगली ठेव. रात्रीं कमी खा. करंजाचें दातवण वापर. त्रिफळा एकदिवसा आड घे. फिरावयास जातो आहेस तर फारच छान. काही त्रास वाटत असल्यास स्पष्टपणे पाकीटांत पत्रांतून लिहावें. मी मुंबईस ३१ तारखे पर्यंत आहे.

43, गुरुकृपा कॉलनी
गोडोली
सातारा 415001
16.6.95

प्रा. अविनाद नामजवळे यांसी – सप्रेम नमस्कार.

आपले 15.6. चे पत्र मिळाले. त्याप्रमाणे तात्काळ परिच्छेद लिहीत आहे. प्रा. रेगे यांनी अंतिम निर्णय घ्यावा.

"शास्त्रीजींचे व्यक्तिमत्त्व जितके आदरणीय तितकेच विलोभनीयही होते. त्यांची वृत्ती अनेक परस्परविरोधांची सामान्य लोकांतील सत्प्रवृत्ती शोधून काढून त्यांचा समन्वय साधण्याची होती व तो तसा साध्य करण्याची कार्यकुशलताही त्यांच्या ठिकाणी होती. विद्वत्तेचे तर ते अतुलनीय मानदंड होते. 'पूर्वापरौ ज्ञाननिधी वगाह्य स्थितः शारदाया इव मानदण्डः।' असे त्यांचे अद्वितीय स्थान होते व ते दीर्घकाळ – कदाचित सदैव – तसेच राहील. पौर्वात्य व पाश्चिमात्य विद्याशाखांत ते समरसतेने व सहजतेने संचार करीत. कालिदासाचा हिमालय हा केवळ भूमापनाचा मानदंड होता. शास्त्रीजींचे कर्तृत्व याहीपलीकडे ज्ञानसागराचे मंथन करणाऱ्या मेरुदंडाचे होते. त्यांनी ज्ञान केवळ आत्मसात केले नाही तर या मंथनातून मानवतेच्या जगातील पोषक अशी विचाररत्ने सादर केली. पूर्व आणि पश्चिम, प्राचीन आणि अर्वाचीन, परंपरा आणि परिवर्तन, विद्वत्ता आणि समाजाभिमुखता, तटस्थता आणि क्रांतिशीलता, गांभीर्य आणि [illegible] यांचा एक अनन्यसाधारण समन्वय त्यांच्या व्यक्तिमत्त्वात साकार झालेला होता."

असो.

कार्यक्रमपत्रिकेवरील सर्व विषयांबाबत माझे मत प्रा. रेगे यांच्या मताप्रमाणेच असेल.

आपला
देवदत्त दाभोळकर

मा. [illegible]
१६।६।९५

५३ नानापेठ
पुणे ४११००२
दि. १४/८/८२

आदरणीय शास्त्रीजी

सप्रेम नमस्कार

शनिवार दि० २१/८/८२ रोजी पुण्यातील शिवाजीमंदिरात भरणाऱ्या नामांतर परिषदेचे उद्घाटन करण्याचे निमंत्रण आपण स्वीकारलेत याबद्दल हार्दिक धन्यवाद. छापील पत्रिका पाठवीनच. कार्यक्रमाची वेळ सायं ६ वाजताची आहे कृपया नोंद घ्यावी

आ० वि०

बाबा आढाव

(मराठवाडा विद्यापीठाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असे नामांतर व्हावे असा प्रस्ताव महाराष्ट्र राज्याच्या विधानभवनांनी एकमताने मान्य केलेला आहे. या प्रस्तावाची अंमलबजावणी व्हावी अशी परिषदेची मागणी आहे.)

*

४.

# प्राज्ञपाठशाळा पत्रव्यवहार

*

चैत्र व २- शके १८५३

श्री. प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

यासी

**नारायणशास्त्री मराठे यांचेकडून**

१८३८ च्या विजयादशमीला प्राज्ञपाठशाळा स्थापना झाल्यापासून १४ वर्षे प्राज्ञपाठशाळेचे व प्राज्ञपाठशाळा मंडळाचे अध्यक्षत्व मजकडे आहे. ही चौदा वर्षे व तत्पूर्वी १४ वर्षे अशी २८/२९ वर्षे मी यथामती यथाशक्ती, पण सर्व शक्ती खर्च करून अध्यापनाचे व शाळेला, संस्थेला हितकार असे इतरही नानाविध कार्य करीत आहे.

यापुढे मला धर्मकोश म्हणजे धर्मसाहित्यसंग्रह या नावाने प्रसिद्ध केलेले कार्यच सर्वतोपरी करावयाचे आहे.

धर्मकोशाचे कार्य वस्तुतः माझे वैयक्तिक म्हणजे एका व्यक्तीचे इच्छेवर, प्रेमावर आरंभिलेले असे आहे. वैयक्तिक असले तरी प्रा. पा. शाळा मंडळाचे म्हणूनच ते गृहीत धरणे अर्थप्राप्त व स्वाभाविक होते व त्याप्रमाणे कार्य प्रा. मंडळाचे म्हणूनच चालू होते व पुढेही चालू राहील. प्रा. पा. मंडळाने २११/३ हजार रु. या कामी खर्च केले आहेत. हे कार्य आजपर्यंत माझ्या सर्वाधिकारत्वाने चालू आहे असे म्हणावयास हरकत नाही. यापुढेही अशाच पद्धतीने म्हणजे सभासदांची मते आणि तज्ज्ञ अशा विद्वानांची मते मला बंधनकारक नसून सल्ला या स्वरूपात उपयोगात आणावयाची व शेवटचा निर्णय माझ्याच मतावर अवलंबून असावयाचा अशा सर्वाधिकारत्वाने हे धर्मकोशाचे कार्य मी करावे असे मंडळास मान्य असल्यास मला ते कार्य स्वीय सर्व शक्ती खर्च करून करावयाचे आहे. इतर कोणत्याही कार्याकडे लक्ष देण्यास मला अवसर नाही. वयाच्या आणि शक्तीच्या मानाने शक्यही नाही. यासाठी प्रा. पा. शा. मंडळाच्या अध्यक्षत्वाचे, कार्यकारी मंडळाच्या अध्यक्षत्वाचे निवृत्ती प्रतिज्ञापत्रक (त्यागपत्र) मंडळापुढे सादर करीत आहे. ही गोष्ट मी आनंदाने स्वेच्छेने व आवश्यक म्हणूनच करीत आहे. आता यापुढे मजकडे संस्थापक व संवर्धक या नात्याने प्रा. पा. शा. मंडळाचे सभासदत्व मात्र राहील. धर्मकोशाच्या संबंधाने ठरलेल्याप्रमाणे त्या कार्याच्या संबंधानेही मंडळाशी संबंध राहील. निधिपत्वाच्या संबंधाने विचार आज न करता सावकाशपणे मागाहून केला तरी चालेल.

असो. गेल्या १४ वर्षांत माझ्या हातून काही कमी- जास्ती, बरे- वाईट झाले असेल त्याबद्दल उदार मनाने मंडळाने मला क्षमा करावी.

कळावे ही विनंती. (स्वाक्षरी)

**नारायणशास्त्री मराठे**

चैत्र व २ शके १८५३, (४।४।१९३१)

OOO

५.

# धर्मकोश पत्रव्यवहार

*

## MAHARASHTRA STATE BOARD FOR LITERATURE AND CULTURE

**LAXMANSHASTRI JOSHI**
Chairman

Ref. No.
BLC.1078/9666-SBD,

Date- 18th December, 1978

**Respected Dr. Karan Singhji,**

You are perhaps aware that the State Board for Literature and Culture started in this State by your esteemed friend, Shri Yeshwantraoji Chavan in November, 1960 (when he happened to be the Chief Minister of this State) for the development and modernisation of Marathi language and literature has undertaken a member of literary activities one of which happens to be the compilation of a Companion Volume to Marathi literature in four volumes. The work is being compiled on the lines of the Oxford Companion to English Literature", "a Dictionary of Literature in the English Language", "Encyclopaedia of Poetry and Poetics etc. in English". Veteran Professors of Marathi language and literature are working on this project and have, by now, completed the first volume thereof entitled "Marathi Authors-- from 1039 to 1837" which is ready for publication.

2. From your previous association with Prajna Pathashala Mandal, Wai, you are also perhaps aware that the institution is compiling an Encyclopaedia of Hindu Religion, based on the various religious and scriptural texts, in Sanskrit. You may perhaps be aware that the Prajna Pathashala Mandal was established in 1912 by the late Swami Kevalanand

Saraswati, my revered guru, with the twin aims of promoting the study of the Indian Shastras in the traditional manner and a critical examination of India's intellectual heritage from the modernist and rational point of view. As a part of this policy, the Prajna Pathashala Mandal has been carrying on a project for the compilation of Encyclopaedia of Hindu Religion, based on various religious and scriptural texts, available in Sanskrit. The P.P.M. has so far brought out 3 Vols. of व्यवहारकाण्ड, 4 Vols. of उपनिषदकाण्ड

१. Vol. of संस्कारकाण्ड and 4 Vols, of राजनीतिकाण्ड 5th Vol. of राजनीतिकाण्ड is now ready for publication. I may mention, in passing, that the work of धर्मकोश all be completed when 3 more Vols. of संस्कारकाण्ड, 4 Vols of वर्णाश्रमधर्मकाण्ड, 3 Vols. of पौराणधर्मकाण्ड , 3 Vols. of तंत्रागम and 1 Volr of मोक्षधर्मकाण्ड are compiled.

3. The Prajna Pathashala Mandal is also conducting "Navbharat", a monthly journal of ideas, in Marathi, which was started by the late Shri Shankarrao Deo and other stalwarts of the freedom movement in Maharashtra on the eve of national independence. Without being committed to any particular ideology, it has always stood firmly committed to the basic humanist values and particularly to the promotion of rational thought both as an essential ingredient in the good life and as a means of achieving it.

4. As a part of the programme for the celebration of Swami Kevalanand Saraswati's birth centenary in January, 1979, the P.P.M. proposes to bring out a special Souvenir Vol. of "Navbharat" devoted to Swami Kevalanandji and also to publish the 5th Vol. of राजनीतिकाण्ड mentioned above.

5. As the Chairman of the Maharashtra State Board for Literature and Culture and the President of P.P.M Wai, I request you kindly to accept my most cordial invitation to release मराठी वाङ्मयकोश Vol.1, राजनीतिकाण्ड Vol.V and the Souvenir Volume of Marathi monthly journal "Navbharat", sometime in the 4th week of January, 1979. The publication function is proposed to be held at Wai in Satara District. Incidentally, I may mention

that I have already spoken about this subject to Shri Yeshwantraoji Chavan, a couple of days back, and he may also speak to you in the matter.

6. Requesting you kindly to accept this invitation and to indicate the date and time suitable to you,

With respects,

I remain,<br>
Yours sincerely,<br>
(Signature)<br>
**(LAXMANSHASTRI JOSHI)**

To

**Dr. Karan Singh, M.P.,**<br>
3, Nyaya Marg,<br>
New Delhi-110 011

❍❍❍

## PRAJNA PATHASHALA MANDAL (Regd.) WAI
(INSTITUTE FOR THE STUDY OF INDIAN TRADITIONS)

LAXMANSHASTRI JOSHI

Ref. No: ४१३/७९- 10/ Date : 1.10.1979

**माननीय प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण,**

यांना- सप्रेम नमस्कार वि.वि.

श्री. जे. पी. नाईक यांनी प्रयत्न करून धर्मकोशाचे उरलेले तेरा खंड येत्या पाच वर्षांत संपादित करून धर्मकोशाचा २६ खंडांचा प्रकल्प माझ्या हातून पुरा व्हावा म्हणून फोर्ड फाउंडेशन या संस्थेकडून साठ हजार डॉलरची देणगी मिळवली. ही देणगी साठ टक्के समजून ठरलेले ४० टक्के रक्कम प्राज्ञपाठशाळा मंडळाने मॅचिंग ग्रँट म्हणून गोळा करावी अशी अट फोर्ड फाउंडेशनने घेतलेली आहे.

२. ही चाळीस टक्के रक्कम केंद्र शासन व महाराष्ट्र शासन यांच्याकडून मिळवता येईल अशी श्री. जे. पी. नाईक यांची अपेक्षा आहे. त्याचप्रमाणे श्री. नाईक यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री डॉ. करणसिंग यांच्याकडे शब्द टाकला व ती स्वतः त्याप्रमाणे डॉ. करणसिंग यांच्याकडे रीतसर अर्जही पाठविला आहे. डॉ. करणसिंग यांनी श्री. नाईक यांना अनुदान मंजूर करीत असल्याचे आश्वासन दिले आहे; परंतु हे आश्वासन डॉ. करणसिंग यांनी लोकसभेच्या मध्यावधी निवासनाच्या पूर्वीचे आदेश काढून संस्थेकडे अनुदानाची रक्कम आल्यास फोर्ड फाउंडेशन आपल्या आश्वासनाची पूर्ती करू शकेल.

तरी कृपया आपण या क्रियासंबंधी डॉ. करणसिंग यांना स्मरण दिल्यास कार्यवाही लवकर होऊ शकेल.

तसदीबद्दल क्षमा असावी.

कळावे.

आपला स्नेहांकित,

(स्वाक्षरी)

**(लक्ष्मणशास्त्री जोशी)**

प्रति:

माननीय श्री. यशवंतराव चव्हाण,

उपपंतप्रधान, भारत सरकार,

(रेसकोर्स रोड,)

नवी दिल्ली- ११.

ooo

**New Delhi- 110001**
**October 18, 1979**

**Dear Dr. Karan Singh**

Shri Lakshman Shastri Joshi, president of Prajna Pathshala Mandal, Wai has written to me about the grant-in-aid to be sanctioned by the Ministry of Education for the project to kosha (Encyclopaedia On Religion). As you give a grand of 60,000 for this project on the understanding that the remaining amount equivalant to nearly 40,000 will be raised by Prajna Pathshala Mandal as a matching grant. I hope that it will be possible for your Ministry to take up early and favourable sanction on the request of Shri Lakshman Shastri Joshi since the project certainly deserves support.

Yours sincerely.
(Signature)
**(Y. B. Chavan)**

**Dr. Karan Singh,**
Minister for Education and Culture,
New Delhi.

❍❍❍

## ६.

# ‘नवभारत’ पत्रव्यवहार

**संपादक, नवभारत, यांस -**

श्री. पांडुरंग देसाई यांच्या गेल्या जूनच्या अंकातील 'पांडुरंग म्हणजे शिव' हा लेख देवतेतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. पुंडलीकसुद्धा शिवभक्त असावा, असे पुंडलिकाच्या मंदिरांतील देवावरून कल्पना करणे भाग आहे. कारण पुंडलिकाच्या पंढरपूर येथील मंदिरात शिवलिंगच आहे. पुंडलिकाचे मंदिर म्हणजे पुंडलिकाचे समाधिस्थान असणार. भक्ताची समाधी जेथे असते तेथे भक्ताचे आराध्य दैवत स्थापण्याची प्रथा सुप्रसिद्ध आहे. रामदास स्वामींच्या काळी विठ्ठलाचे मस्तकावर शिव आहे अशी प्रसिद्धी होती. ''विठोने शिरी वाहिला देवराणा' असे रामदास मनाच्या श्लोकात म्हणतात. तीही देसाई यांच्या विधानास परीक्षत: पोषक आहे.

आपला,

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

**(नवभारत, जुलै, १९५७ पृ. ६४)**

○○○

सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला ट्रस्ट कचेरी
३६१, सदाशिव पेठ, पुणे २.
दिनांक :- ४-६-१९५७.

**प्रिय श्री. गोवर्धन पारीख,**

सादर नमस्कार,

नवभारत मासिकाचा विचार करण्यासाठी आपण पुण्यास ता. १५ व १६ जुलै रोजी जमण्याच्या कामी माझे ता. ३१-५-५७ चे पत्र मिळाले असेलच. आपले अजून उत्तर न आल्याने ते पत्र आपणास मिळाले किंवा नाही याची जरा चिंता वाटते. ता. १५ व १६ जुलै ही श्री. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्रींना सोयीची आहे किंवा नाही हे समजणे जरुरी आहे. सदर बैठक उरुळी कांचन येथे घेतल्यास पू. शंकररावजींच्या व इतर दृष्टीने सोईचे होईल. मी आज श्री. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना पत्र लिहीत आहे. आपणही त्यांना लिहिले असेलच. आपले उत्तर सत्वर यावे, ही विनंती. कळावे.

आपला,
(स्वाक्षरी)
**(सी. गं. शेंडे)**

**प्रा. गोवर्धन पारीख,**
४४६, शीव रोड,
मुंबई नं. १९.

ooo

सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला ट्रस्ट कचेरी
३६१, सदाशिव पेठ, पुणे २०
दिनांक :- १६-७-१९५७

**प्रिय श्री. गोवर्धन पारीख,**
**कार्यकारी संपादक 'नवभारत' मासिक**

विषय : नवभारत मासिकासंबंधी.

सप्रेम नमस्कार वि. वि.,

ता. १४ जुलै १९५७ रोजी उरळी कांचनला 'नवभारत' या मासिकाच्या पुढील व्यवस्थेसंबंधीच्या भवितव्यासंबंधी विचार करण्यासाठी सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला ट्रस्टचे विश्वस्त व नवभारत मासिकाचे व्यवस्थापक व संपादक मंडळ यांची एक बैठक झाली.

नवभारत सुरू होऊन या ऑक्टोबर १ ला दहा वर्षे पूर्ण होतात. नवभारतसारखे पहिल्या प्रतीचे शैक्षणिक व सांस्कृतिक मासिक चालविणे किती अवघड असते याची कल्पना सर्वांना आहेच. सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला ट्रस्टचे हे मासिक दहा वर्षे नियमितपणे व त्याचा दर्जा कायम ठेवून चालविण्यासाठी अनेक अडचणी - विशेषत: आर्थिक सोसल्या. या कामी अनेकांचे अनेक रीतीनी सहाय्य आले म्हणूनच हे शक्य झाले. याची जाणीव कृतज्ञतापूर्वक विश्वस्त मंडळाला आहे. तथापि या पुढे हे मासिक चालविणे विश्वस्त मंडळाची कितीही इच्छा असली तरी आर्थिक बळाच्या अभावी अशक्य झाले आहे. तथापि नवभारताने मराठी मासिकांच्या मानसिक व वैचारिक जीवनांत जे स्थान मिळविले आहे, ते लक्षात घेता हे मासिक बंद न होता शक्यतो पुढेही चालावे अशी विश्वस्त मंडळाची इच्छा असणे साहजिक आहे व नवभारताच्या चाहत्यांपैकी अनेकांचीही तशीच इच्छा आहे. पण ही गोष्ट घडून यावयाची तर कोणीतरी समर्थ व्यक्ती वा संस्था ही जबाबदारी स्वीकारण्यास तयार होणे जरूर आहे.

या दृष्टीने आम्ही आपल्या संस्थेला हे मासिक पुढे चालविण्याची जबाबदारी स्वीकारण्याची विनंती करीत आहोत. अशी आपल्या संस्थेला विनंती करावी असे उरळी कांचनच्या या सभेत ठरले आहे. 'नवभारत' पुढे चालवावयाचे तर त्याचा दर्जा व प्रतिष्ठा कायम रहावी अशी आमची इच्छा असणे स्वाभाविक आहे.

दुसरे, 'नवभारत' निर्विवादपणे निदान दहा वर्षे तरी चालावे यासाठी 'नवभारत'च्या विश्वस्त मंडळाने त्याच्या चाहत्यांच्या सहकार्याने लोकवर्गणीतून १०,०००/- चा निधी



वाय १८५-९

उभारण्याचे १९५५ जानेवारीत ठरविले होते. या निधीचे स्वरूप असे होती की, जे १०० रू. दतील त्याला दहा वर्षे मासिक विनामूल्य मिळत राहिल. गेल्या दोन वर्षात हा निधी १०००/- पर्यंत जमलेला आहे. आणि ही रक्कम येत्या वर्षीचे मासिकाचे नुकसान भरून काढण्यात जवळ जवळ खर्च झाली आहे. साधारणपणे ५०-६० मंडळींनी तो निधी दिलेला आहे. याचा अर्थ या मंडळींचा 'नवभारत' मासिक दहा वर्षे मिळत राहील अशी व्यवस्था झाली तर तो खर्च हा विश्वस्त मंडळाची जबाबदारी आहे.

आपण आपल्या निर्णयाप्रमाणे नवभारत मासिक पुढे चालविण्यास मंडळाने संमती दिली तर वरील दोन गोष्टींची जबाबदारी स्वीकारणे ओघानेच येईल. या बाबतीत प्रत्यक्ष बोलून या गोष्टीचा विचार करावा लागेल. आम्हाला अशी आशा आहे की, आपली संस्था आमच्या या पत्राचा सहानुभूतीपूर्वक विचार करील व नवभारताने गेली १० वर्षे मराठी साहित्याची जी सेवा केली आहे ती पुढेही चालू ठेवण्याचे श्रेय घेईल.

पत्राचे उत्तर शक्य तितक्या लवकर यावे. तसेच विनंती पत्र उरळीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे आम्ही प्राज्ञ शिक्षण मंडळ वाई आणि मौनी विद्यापीठ, गारगोटी यांना पाठविले आहे. तसेच 'नवभारत' मासिकाच्या संपादन मंडळासही विनंती केली आहे.

कळावे.

आपला,
(स्वाक्षरी)
**(सी. गं. शेंडे)**
सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुणे

**प्रा. गोवर्धन पारीख,**
४४६, शीव रोड,
मुंबई नं. १९.

ooo

# प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

अध्यक्ष
**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

वाई, जि. उ. सातारा
ता. ६-८-५७

जा. नं. ७२

**श्री. प्रा. गोवर्धन पारीख**
सभासद चालक मंडळ, प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई यांस,

मी ''नवभारत'' मासिक स्वतःच्या जबाबदारीवर गेली चार वर्षे चालविले. सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला ट्रस्टचे त्यावर केवळ औपचारिक नाव होते. ते आता नाव जात आहे. सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला ट्रस्ट प्राज्ञपाठशाळा मंडळास हे मासिक सर्व हक्कासह देण्यात उत्सुक आहे.

ते प्राज्ञपाठशाळा मंडळाने मासिक स्वतःच्या हक्काने चालवावे. मी आपणास आश्वासन देतो की, मी प्राज्ञपाठशाळा मंडळाच्या इतर कोणत्याही निधीस किंवा उत्पन्नास धक्का न लावता म्हणजे त्यातील अंश न उचलता हे मासिक चालविता येईल.

असे मासिक चालविणे ही गोष्ट प्राज्ञपाठशाळा मंडाळच्या सांस्कृतिक संवर्धनाच्या कार्यात बसेल. संपादक मंडळाची पुन: नवी घडी मंडळाने हे मासिक हाती घेतल्यावर प्रा. पा. शा. मंडळास करता येईलच.

तरी हे मासिक चालविण्यास कृपया संमती द्यावी.

कळावे ही विनंती.

आपला,
(स्वाक्षरी)
**लक्ष्मणशास्त्री जोशी**
अध्यक्ष, प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई.

○○○

सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला ट्रस्ट
३६१, सदाशिव पुणे, २.
तारीख - १६-८-५७

**श्री. प्रा. पारीख यांना,**

स. न. वि. वि.

आज पू. श्री. शंकरराव देवांचे पत्र मिळाले. आपल्या चर्चेनंतर मी त्यांना पाठविलेले कागदपत्र अजून त्यांना मिळाल्याचे दिसत नाही. पूर्वीच्या पत्रांच्या संदर्भाने त्यांना आजच्या पत्रांत जेवढे कळविले आहे की, नवभारत बाबतचा निर्णय ते सप्टेंबरमध्ये तिकडे परत येतील तेव्हा घेता येईल. मासिकाच्या व्यवस्थेबाबत होणाऱ्या हस्तांतरासंबंधी जाहीर सूचना नवभारतच्या सप्टेंबरच्या अंकातच आले पाहिजे असे नाही. ती ऑक्टोबरमध्ये आली तरी चालेल.

माझी त्यानंतरची पत्रे मिळाल्यावर श्री. शंकररावांचेकडून यापुढे आणखी काही उत्तर आल्यास आपणांस कळवीनच. परंतु तसे काही उत्तर न आल्यास श्री. शंकररावांच्या सूचनेनुसार आपण जरा थांबूया.

कळावे ही विनंती.

आपला,
(स्वाक्षरी)
**सी. गं. शेंडे**

ooo

मु. मिची

क्र. ४७७

२४-८-५७

**सप्रेम नमस्कार**

तुमचे १२\८ चे पत्र मिळाले. 'नवभारत' प्राज्ञ मंडळाला पुढे चालविण्यास देण्यासंबंधाच्या सु. रा. ग्रं. मा. च्या ट्रस्टींच्या ठरावाला मी तारेने श्री. बापूरावांना संमती कळविली आहे. सर्व काम याबाबतीतले यथासमय होईल, अशी खात्री आहे. कळावे.

**शंकरराव देव**

**पोस्ट कार्ड**

केवल पत्ता

26. AUG 57

Poof. G. D. Parikh
Mg. Ed.
446, Sion Road,
Matunga,
Bombay -19

ooo

नं. ७/९
सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला ट्रस्ट कचेरी,
१०, बाजीराव रोड, पुणे २.
दिनांक : १७-९-१९५७.

**श्री. गोवर्धन पारीख,**
मुंबई

सा.न.वि.वि.

आपले ता. ९-९-५७ चे पत्र फार दिवस अनुत्तरित राहिले. याबद्दल दिलगीर आहे. मध्यंतरी मी बाहेर फिरतीवर होतो व इतरही अडचणी होत्या, असो.

प्राज्ञपाठशाळा मंडळीकडे नवभारत द्यावयाचा निर्णय झाला. त्यासंबंधी ट्रस्टी मंडळाचा सर्क्युलर मीटिंगने ठरावही मंजूर झाला आहे. सदर ठराव श्री. तर्कतीर्थ यांचेकडे पाठविला आहे. त्या ठरावाची व त्यासोबत पाठविलेल्या पत्राची प्रत या पत्रासोबत आपणाकडे पाठवित आहे. वाईहून स्वीकृती येताच निवेदन प्रसिद्धीसाठी वाईस पाठवीत आहे. त्यासाठी जागा राखून ठेवावी. अर्थात ऑक्टोबरचा अंक नेहमीप्रमाणे प्रसिद्ध व्हावा व त्यादृष्टीने जरूर ते आपण करावे.

पत्रोत्तरास या वेळेस झालेल्या उशिराबद्दल क्षमा करावी.

आपला,
(स्वाक्षरी)
**सी. गं. शेंडे**
सोबत : २. ट्रस्टी सेक्रेटरी

**श्री. गोवर्धन पारीख**
कार्यकारी संपादक,
४४६, सायन रोड, माटुंगा (मुंबई नं.- १९)

○○○

नं. ३-९
सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला ट्रस्ट कचेरी,
१०, बाजीराव रोड, पुणे १.
दिनांक: १७-९-१९५७.

**श्री. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी,**
अध्यक्ष, प्राज्ञपाठशाळा मंडळ,
मु. पो. वाअी जि. सातारा.

विषय : नवभारत मासिकाची व्यवस्था.

सादर नमस्कार वि. वि.

प्राज्ञपाठशाळा मंडळ नवभारत चालविण्याची जबाबदारी स्वीकारण्यास तयार असल्याबाबत आपले पत्र मिळाले होते. त्यावर विचार होऊन सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला विश्वस्त मंडळाचा जो निर्णय झाला त्याची प्रत सोबत आपणाकडे पाठवीत आहे. आपणास तो मान्य असल्याचे कळविण्याची विनंती आहे. आपली स्वीकृती कळताच नवभारताच्या येत्या अंकात योग्य ते निवेदन प्रसिद्धीस देण्यास बरे पडेल.

१ ऑक्टोबरपासून व नवभारत निधी बंद झाला असे समजावयाचे आहे व तसे निवेदनांत प्रसिद्धीही करून टाकावयाचे ठरले आहे. २१ सप्टेंबरपर्यंत जमा झालेल्या निधीतून देणगी देणाऱ्यांचा करारानुसार नवभारत मासिक पुरविण्याची जबाबदारी आपण स्वीकारली आहेच. जमा झालेल्या निधीचा हिशोबही प्रसिद्ध करून टाकता आल्यास बरे. त्यातून मासिकाचा आजपर्यंतचा खर्च वजा जावून जी रक्कम शिल्लक असेल ती आपणाकडे देऊन टाकण्यात येईल. आपलेकडे नवभारताचे शिलकी अंक आहेत. त्यातून आतापर्यंतच्या सर्व वर्षाचे पूर्ण ५ सेट्स बांधून आपण सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला ट्रस्टच्या कचेरीसाठी व ग्रंथालयासाठी द्यावेत. बाकीचे अंक आपणाकडे दिले आहेत असे समजावण्यात येईल. त्याचे कोणतेही मूल्य ट्रस्टने घ्यावयाचे नाही.

यापुढे नवभारताचा एक अंक दरमहा विनामूल्य सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला ट्रस्टकडे आपल्याकडून येत जावा. वरील बाबतीतही आपले स्वीकृतीचे पत्र यावे, ही विनंती.

कळावे.

आपला,
(स्वाक्षरी)
**सी. गं. शेंडे**
ट्रस्टी सेक्रेटरी.

प्रत माहितीसाठी सादर रवाना :

(१) श्री. प्राध्यापक, गोवर्धन पारीख, कार्यकारी संपादक ,
नवभारत, १४६ पाचल रोड, माहिम, मुंबई नं. १९.

(२) श्री. पू. शंकरराव देव, निसर्गोपचार केंद्र, उरळी कांचन, जिल्हा- पुणे.

(३) श्री. वि. न. केळेकर, पुणे-४.

(स्वाक्षरी)

**सी. गं. शेंडे**

ट्रस्टी सेक्रेटरी.

❍❍❍

# सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला विश्वस्त मंडळ

**ठराव :**

ता. १४-७-५७ रोजी उरळी कांचन (जि. पुणे) येथे सु. रा. ग्रं. मालेचे विश्वस्त मंडळ आणि नवभारत मासिकाचे व्यवस्थापक व संपादक मंडळ यांची संयुक्त बैठक नवभारत मासिकाच्या भवितव्यासंबंधी विचार करण्याकरिता आली असतातील पुढीलप्रमाणे सर्वानुमते ठरविण्यात आले होते:-

१. नवभारत मासिक चालू परिस्थितीत यापुढे चालविणे विश्वस्त मंडळाची कितीही इच्छा असली तरी आर्थिक बळाच्या अभावी त्यांना अशक्य आहे. तथापि या मासिकाने मराठी मासिकांच्या माणसांस व वैचारिक जीवनात शैक्षणिक व सांस्कृतिकदृष्ट्या जे शुद्ध स्थान मिळवले आहे ते लक्षात घेता हे मासिक बंद न होता ते पुढं चालावे, अशी विश्वस्त मंडळाची इच्छा असणे स्वाभाविक आहे. नवभारतच्या अनेक चाहत्यांचीही अशीच इच्छा आहे.

२. हे लक्षात घेऊन मासिकाचा दर्जा व प्रतिष्ठा कायम ठेवील आणि मासिकाच्या आर्थिक व संचालनाची जबाबदारी स्वीकारू शकेल अशा कोणा समर्थ व्यक्तीस या संस्थेस हे मासिक पुढे चालविण्याची विनंती करण्यात यावी.

३. या दृष्टीने (अ) प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई (आ) मौनी विद्यापीठ गारगोटी (ई) नवभारतचे संपादक मंडळ यांना विचारण्यात यावे.

४. नवभारत- निधी योजनेनुसार गेल्या दोन वर्षांत सुमारे ५०००\- पर्यंत जो निधी जमा झाला त्याची रक्कम गेल्या दोन वर्षांतील नुकसान भरून काढण्यात जवळ जवळ सर्व खर्च झाली आहे. या निधिदात्यांना मासिक दहा वर्षे मिळत राहील. अशी व्यवस्था करण्याची जबाबदारी सु.रा.ग्रं. विश्वस्त मंडळावर आज आहे. ती हे एक मासिक पुढे चालविण्याचे स्वीकारणाऱ्यावर ओघानेच येते.

उरळी येथे ठरलेल्या या निर्णयाच्या अनुरोधाने वर उल्लेखिलेल्या संस्थेकडे व संपादक मंडळाकडे विचारणा करण्यात आली असता त्यापैकी प्राज्ञपाठशाळा मंडळ वाई यांनी सु.रा.ग्रं. माला विश्वस्त मंडळाच्या अपेक्षा व शर्ती स्वीकारून हे मासिक खर्च आर्थिक जबाबदारी आपल्याकडे घेण्याची व पुढे चालविण्याची तयारी दर्शविली आहे. संपादक मंडळही प्राधान्यता आजचेच पुढे चालू ठेवावे, अशी प्रा. पा. शा. मंडळाची इच्छा आहे व त्या इच्छेला संपादक मंडळाचीही संमती आहे.

वरील सर्व गोष्टी लक्षात घेऊन नवभारत मासिक १ ऑक्टोबरपासून या पुढील सर्व

आर्थिक व नफा- नुकसानीच्या जबाबदारीसह प्रा.पा.शा मंडळ, वाई कडे संपूर्णपणे सुपुर्द करण्यात यावे. यासंबंधी जरूर ते करारपत्र इ. करावयाचे का याबाबत विश्वस्त मंडळातर्फे सेक्रेटरी श्री. सी. गं. शेंडे यांनी पहावे.

मंजूर

सही / देवकीनंदन नारायण

सही / सी. गं. शेंडे

सही / शं. रा. देव

ooo

# धर्मकोश मंडळ, वाई

नवभारत मासिक

वाई, (जि. उ. सातारा)

५७/६८-६९ ता. १७/६/६८.

स.न. वि. वि.

आपलेकडून जुलै अंकाकरिता लेख मजकूर एकूण लेख ७ (सात) आले, ते पोचले. त्या अगोदर येथे १) ''राष्ट्रवाद : विचार आणि विश्लेषण'', २) ''भारतातील प्राचीन लोकराज्ये'', तीन ''भूकंप लेखांक'' असे लेख आले आहेत. ते श्री. शास्त्रीजींना दाखवून या अंकात घेत आहे. तसेच शास्त्रीजींनी ''युगान्त'' या पुस्तकाचे परीक्षण दिले आहे. तेही घेत आहे. शिवाय आज आलेल्या मजकुरापैकी लेख मजकूर घेत आहेच. सारसंकलन ४/६ दिवसांनंतर पाठविण्याचे करावे, कळावे ही विनंती.

आपला

(स्वाक्षरी)

**संपादक**

**डॉ. इंदुमती पारीख,**

गणेश भुवन,

२७६, तेलंग रोड

माटुंगा, मुंबई- १९

BOMBAY - 19

○○○

## प्राज्ञपाठशाळा मंडळ, (रजि.) वाई (सातारा)

संचालित

'नवभारत' मासिक

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** | दूरध्वनी क्र. ६

अध्यक्ष व विश्वस्त | वाई (जि. सातारा)

जा. क्र. ६०८ /७८ - ७९ | तारीख २९-११-७८

प्रति

**डॉ. बी. एम. उदगावकर,**
(उपाध्यक्ष, महाराष्ट्र अकॅडमी ऑफ सायन्सेस),
टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च,
कुलाबा, मुंबई - ४०० ००५.

स. न. वि. वि.

'महाराष्ट्र अकॅडमी ऑफ सायन्सेस'च्या वतीने दि. ७ ऑक्टोबर १९७८ रोजी पुणे येथे 'डेव्हलपमेंट ऑफ सायंटिफिक टेम्पर' या विषयावरील एक चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. डॉ. होमी एन. सेठना यांनी त्यावेळी केलेल्या उद्घाटनाच्या भाषणाचा मराठी अनुवाद आम्ही आमच्या 'नवभारत' मासिकात छापू इच्छितो. तरी त्याला आपली परवानगी मिळावी, ही विनंती. या भाषणाची एक प्रत आमच्याकडे आहे.

कळावे.

आपला,
(स्वाक्षरी)
**भा. ग. सुर्वे**
(निमंत्रक)

०००

कीर्ती कॉलेज,
मुंबई, २८
१२/१२/७८

**स. न. वि.वि.**

येताना नोव्हेंबरच्या अंकाच्या काही प्रती, संभाव्य वर्गणीदारांना नमुन्यासाठी देण्यासाठी म्हणून आणाव्यात, अशी विनंती आहे. सोळा तारखेला मी बहुधा औरंगाबादला असेन. अंकाचे काम आता सुरू झाले असेलच. शास्त्रीजींनी स्वामीजीवर एक श्लोक केला आहे, तो स्वामीजींच्या फोटोखाली छापणे योग्य होईल. कोणते आणि किती फोटो किंवा चित्र अंकात छापावे हे चांदवडकरांना ठरवायला सांगावे.

मी डिसेंबरमध्ये सात दिवसांची रजा मागितली आहे. ती मान्य झाली की वाईला येईन.

कळावे, हे विनंती.

आपला,
(स्वाक्षरी)
**मे.पुं. रेगे**

POST CARD
पोस्ट कार्ड
केवल पत्ता
ADDRESS ONLY

श्री रा. कृ. कोल्हटकर,
विश्वकोश कार्यालय,
वाई (जि.सातारा)
पिन PIN- ४१२ ८०३

ooo

७.

# पत्राद्वारे तर्कतीर्थ : साहित्यसमीक्षा व चर्चा

जांभेकर यांचा वाडा,
भद्र,
अहमदाबाद,
ता. २२ ऑक्टोबर, १९२८

**प्रिय महाशय लक्ष्मणशास्त्री,**

सस्नेह प्रणाम विशेष,

आपली ‘आनंदमीमांसा’ व ‘शुद्धीकरण’ ही दोन्ही पुस्तके मिळाली. यापैकी प्रथम पहिले पुस्तक वाचून काढले. पुस्तकातील मते माझ्या मताशी तंतोतंत जुळत असल्याने पुस्तकाबद्दल आत्मीयता वाटली हे तर खरेच; पण उत्तरार्धातील ओजस्वी भाषेचा सहज चालणारा ओघ, समर्थक पुराव्यांचा भडिमार वगैरेमुळे चित्त प्रसन्न झाले. पूर्वार्ध सामान्य वाचकांना फारसा चित्ताकर्षक वाटणार नाही, अशी भीती वाटते. पुस्तक वाचून होताच ताजा अभिप्राय लिहिण्याची इच्छा झाली; पण दुसऱ्याच दिवसापासून घरात मुलांच्या दुखण्याची परंपरा सुरू झाली व त्याने जर्जर झालो. आपल्या पुस्तकाच्या नूतन नावाने आपल्या सिद्धांतांशी विरोधी असे दुसरे पुस्तक लिहिण्याचा उपक्रम केला असता.

आपले दुसरे पुस्तक सवडीनुसार हातात घेईन.

मधून-मधून पत्रद्वारे भेटीस येत जावे.

गुरुवर्य नारायणशास्त्री मराठे यांस सादर प्रणाम कळवावा.

क.लो.वि.

स्नेहाधीन,
(स्वाक्षरी)
**रा. ब. आठवले**

प्रति,

**लक्ष्मणशास्त्री जोशी**
प्राज्ञपाठशाळा,
वाई
Dist - Satara
Via - Poona
G.I.P.

○○○



वाय १८५-१०

# हिंदुधर्माची समीक्षा

महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध विचारवंत व धर्मशास्त्रज्ञ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी नागपूर विद्यापीठातील १९४० सालची रा. ब. परांजपे - व्याख्यानमाला गुंफली होती. ही व्याख्याने 'हिंदुधर्माची समीक्षा' या नावाने नागपूर विद्यापीठाने पुढे ग्रंथरूपाने प्रसिद्ध केली. या ग्रंथाच्या निमित्ताने विद्वद्रत्न डॉ. दप्तरी व तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यात जो पत्रव्यवहार झाला तो, दप्तरींची धर्मविषयक मते जाणून घेण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्यामुळे पुढे देत आहोत.

**-संपादक**

## साध्य व साधने

श्रीयुत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांस,

केशव लक्ष्मण दप्तरी यांचा सा. न. वि. वि.,

आपणा दोघांमध्ये मतभेद झालेला पाहून माझ्या जिवास फार दुःख होत आहे. या मतभेदामुळे खऱ्या कार्याची हानी होईल अशी कल्पना मनात येते. आपणा दोघांमध्ये मतभेद का व्हावा हेही मला समजत नाही. मतभेद आहेच ही गोष्ट मात्र मला तुमची हिंदुधर्म-समीक्षेवरील व्याख्याने वाचून चांगली समजली. असा हा कार्यघातक मतभेद काढून टाका, अशी कळकळीची विनंती तुम्हास करतो व त्याकरिताच आपणामधील मतभेदाची मीमांसा या पत्रात करतो.

१. निःश्रेयसाचे (आत्यंतिक सुखाचे) साधन तो धर्म अशी व्याख्या मी करतो व अर्थात् तो पाहिजे असे मी म्हणतो. निःश्रेयसाचे अलौकिक म्हणजेच बुद्धीला अगम्य असे साधन तो धर्म, असे तुम्ही म्हणता व अर्थात् त्यास गचांडी द्या असे म्हणता. तुम्ही केलेली धर्माची व्याख्या चूक नाही काय? मनुष्याला आत्यंतिक सुख पाहिजे मग त्याची साधने कशी का असेनात. रानटी मनुष्यांचा स्वभाव भिन्न होता, असे मानण्यास काही कारण नाही. त्यांची चूक, साध्य कोणते याविषयी झाली नसून, साधनाविषयी झाली. त्यांचे धर्माचे साध्य बरोबरच आहे; पण ही त्यांची चूक झाली असे म्हणणे जास्त तर्कशुद्ध नाही काय ? साध्य व साधने यांचा घोटाळा का करावा ? तुम्ही समाजाचे सुख हे साध्य मानले व मी व्यक्तीचे सुख साध्य मानले तरी वरील विचारसरणीत फरक होत नाही हे उघड आहे. धर्मात अलौकिक काही घेऊ नये असे म्हटल्याने तुमचे कार्य साधते. व सुखाच्या लौकिक साधनांनाही धर्मत्व

आणि अर्थात् पावित्र्य येते. तुम्ही जी धर्माची व्याख्या सांगितली ती पाश्चात्त्यांची व्याख्या आहे व धर्माची हकालपट्टी करण्याकरिता त्यांनी ती बुद्ध्याच चुकीची केली आहे. "Give the dog a bad name and then hang it." हे त्यांचे धोरण आहे. हे तर्कशास्त्राशी सुसंगत नाही, धर्माची व्याख्या मनुष्यस्वभावाशी अनुरूप अशीच केली पाहिजे. तुमची व्याख्या तर हिंदुधर्मास लागूच नाही. कारण त्यात तुमच्याच म्हणण्याप्रमाणे लौकिक साधनांचाही अंतर्भाव केला आहेच.

## संस्कृती म्हणजे काय ?

२. संस्कृती म्हणजे विज्ञानशास्त्रांची वाढ असे तुम्ही म्हणता व संस्कृतीची सारखी वाढच होत आहे असेही म्हणता. मी मनाच्या उन्नतीला संस्कृती म्हणतो; जे मन, स्वहित व परहित यामध्ये साधनांच्या दृष्टीने विरोध नाही किंवा कोणताच विरोध नाही असे पाहते व त्याप्रमाणे वागते त्यासच मी संस्कृती म्हणतो. जे मन विषयसनिकर्षनिरपेक्ष सुखाचा रस जाणते त्याला मी संस्कृती म्हणतो, कारण ते असे असल्याशिवाय त्याला परहितापासून किंवा समाजहितापासून आनंद होणार नाही आणि समाजहित तर तुम्हासही पाहिजेच. तुमच्या व्याख्येप्रमाणे युरोपातील लोकांना संस्कृत म्हणावे लागेल. मग त्यांची आपसामध्ये लढाई का व इतर आशियाई राष्ट्रांवर कुरघोडी का ? विज्ञान वाढले तरी मन संस्कृत झाले नाही याचेच हे द्योतक नाही काय ? भारतीयांच्या प्राचीन ग्रंथात, उपनिषदांत, महाभारतात, वायुपुराणात जी मनाची संस्कृती दिसते तिच्यापेक्षा अधिक संस्कृती आज मला कोठेच दिसत नाही. विज्ञान वगैरे सुखाची साधने विज्ञानशास्त्रांनी उत्पन्न केली तरी त्याचा उपयोग जर मनुष्य परस्परांचा नाश करण्याकडे करतो तर त्याला संस्कृती कसे म्हणावे ? व तुम्ही कसे म्हणता? परस्परांमधील भांडणं मिटविण्याची युक्ती ज्यांना सापडत नाही त्यांना विज्ञान तरी पूर्ण झाले असे म्हणता येईल का ? खऱ्या सुखाच्या स्वरूपाचे ज्ञान व त्याच्या खऱ्या साधनांचे ज्ञान ज्याला झाले व जो त्याप्रमाणे वागतो तोच खरा संस्कृत. हे ज्ञानही विज्ञानाइतकेच जरूर आहे व त्याप्रमाणे वागणेही विज्ञानशास्त्रांचा उपयोग करण्याइतकेच जरूर आहे. हे यथार्थ ज्ञान ज्याला नाही तो असंस्कृतच.

## मानवी सुखाचे स्वरूप

३. जागृतीतील वासनाभाव हेच सुखाचे स्वरूप असे मी म्हणतो. हे स्वरूप अभावात्मक आहे म्हणून तुम्ही त्यावर टीका करता. तुमच्या मताने सुखाचे स्वरूप कोणते ते तुम्ही स्पष्ट लिहिले नाही. तरी विषय - स्पर्शापासून जे होते तेच सुख असे तुम्ही मानता असे दिसते. तुमच्या मताने, मैथुन, स्वाद्वन्न भक्षण, सुंदर वस्तूचे दर्शन, सुगंध, मधुर गायन, हेच सुख ठरते. यापैकी काहीच नसले तरी मनुष्यास सुखाचा अनुभव होऊ शकतो. "तुम्ही उत्तम पंडित अहा" असे तुम्हास म्हटले तर तुम्हास आनंद होतो किंवा नाही ? याप्रसंगी माझी लोक स्तुती

करतात या कल्पनेनेही मनुष्य सुखी होतो हे तुम्हांस मान्य करावे लागेल. अर्थात् मी सुखी आहे ही कल्पनादेखील वासनाभाव असेल तर सुखदायकच होऊ शकते. केवळ कल्पनेनेही सुख होते व ते उच्च प्रकारचे आहे हे सांगितल्याशिवाय तुम्ही व्यक्तीला समाजाच्या सुखासाठी कर्म करण्यास कसे सांगाल ?

बरे, केवळ कल्पनेने व वासनाभावाने सुख होते असे म्हटल्याने संन्यास प्रतिपादन होत नाही. वासनाभाव साधण्यास कर्म करणे जरूर आहे हे मी कंठरवाने सांगितले आहे व सिद्ध करून दाखविले आहे. वासनाभाव म्हणजे पूर्णपणे अभावही नाही. कारण जागृतीतील वासनाभावच उच्चतर आहे असेही मी दाखविले आहे व जागृतीत तर अहंकार व कोणती तरी चित्तवृत्ती असतेच. ही चित्तवृत्तीच सुखातील भावात्मक भाग आहे. वासनाभाव हा अभावात्मक भाग असला तरी तो संपादन करण्यास कर्म व ज्ञानही पाहिजे. एकूण, माझ्या सुखाच्या स्वरूपाच्या कल्पनेवरील तुमचे आक्षेप टिकू शकत नाहीत.

४. परलोकावरही तुमचा मोठा कटाक्ष आहे. मी परलोक आहे असे मानले तरी त्यावर बुद्धीचे नियंत्रण घालतो; ज्या साधनांनी इहलोकी अत्यंत सुख होते त्यांनीच परलोकीही सुख होते असे दाखवितो. परिणामतः तुम्ही व मी सारखेच. कारण दोघंही ऐहिक सुखाचेच उपाय सांगणार. जोपर्यंत 'मृत्यू' ही गोष्ट आहे तोपर्यंत परलोक ही कल्पना मनुष्याच्या डोक्यात राहणारच. ती खंडित करण्यापेक्षा म्हणजे ती काढून टाका म्हणण्यापेक्षा तिला बुद्धीचे नियंत्रण घालणे अधिक चांगले नाही काय ? शिवाय ती खंडित करणेही कठीणच आहे.

५. सुख हे मनुष्याचे साध्यच नाही असेही तुमचे म्हणणे आहे असे दिसते. सुख हेच मनुष्याचे साध्य आहे असे मी म्हणतो. समाजाचे हित हे मनुष्याचे साध्य असे तरी तुम्हास मानावेच लागते. व्यक्तीने समाजाच्या हितासाठी का झटावे. याचा उलगडा करण्याची तुम्हास गरज वाटत नाही. मला तो उलगडा करणे जरूर वाटते व मी दाखवितो की समाज सुखी असल्याशिवाय व्यक्ती सुखी होऊ शकत नाही. म्हणून व्यक्तीने स्वतःच्या सुखाकरिताच समाजाच्या हिताकरिता झटावे. मी निराळ्या ठिकाणाहून निघालो तरी तुमच्या ठिकाणी येऊन मिळतोच. व्यक्तीचे हित व समाजाचे हित यामध्ये विरोध नसून ऐक्यच आहे असे मी स्पष्ट म्हणतो. अर्थात् तुमच्याशी माझा विरोध नाही. "लोकयात्रार्थमेवेह धर्मस्य नियमः कृतः" हे आपणा दोघांसही सारखेच मान्य आहे.

६. जादूला (यातु) तुम्ही भ्रांती म्हणता, ते चूक आहे. अलीकडील Psychotherapy, Mesmerism, Hypnotism वगैरे विज्ञानशास्त्रे असे दाखवितात की जादूच्या बुडाशीही मानसिक शक्ती आहे व ती पुष्कळ कार्ये करू शकते, रोगहरण करू शकते, शत्रूस मारू शकते. या मानसिक शक्तीचा योग्य उपयोग करून घेणे अधर्म्य नाही. चिकित्सा- परीक्षणात मी या शास्त्राचे परीक्षण करून, या शक्तीचा Homeopathic पद्धतीने उपयोग केल्यास रोगहरण होऊ शकते असे दाखविले आहे. एकूण, ही चूक तुम्ही काढून टाका. जादू ही

Supernatural नसून, वास्तविक Super-ordinary आहे. Supernatural ही गोष्टच शक्य नाही व तिला खंडित करण्याचीही गरज नाही. कारण ती कोणीच मान्य करणार नाही.

७. समाजाची व जगाची आजची आर्थिक घटना बदलविणे जरूर आहे असे तुमच्याप्रमाणे मीही म्हणतोच. हा बदल कसा घडवून आणावा या विषयी मतभेद झालाच तरी त्याला आज महत्त्व नाही. कारण तो बदल घडवून आणण्याचा प्रत्यक्ष प्रयत्न तुम्ही किंवा मीही सुरू केला नाही. आज त्यासंबंधी प्रचारकार्य (Propaganda Work) फक्त चालू आहे व त्याला माझा विरोध नाही.

(स्वाक्षरी)

**के. ल. दप्तरी**

ooo

## तर्कतीर्थांचे उत्तर

संपादक,

लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई जि. सातारा.

तर्कतीर्थ १५-३-४१

पू. श्री. भाऊजी दप्तरी यांस,

आपले विस्तृत टीकात्मक पत्र वाचले. त्याबद्दल मी आभारी आहे. आपल्या प्रश्नांना व आक्षेपांना संक्षेपाने खालीलप्रमाणे उत्तर आहे असे वाटते. मी आपल्या विचारसरणीची स्तुती करतो. याचे कारण असे आहे की ती विचारसरणी मला मान्य होत नसली तरी त्यात सुव्यवस्था, सुसंबद्धता, मौलिकता आणि बुद्धिप्रामाण्यवाद आहे. एक संभवनीय महत्त्वाची विरुद्ध बाजू या दृष्टीने मी आपल्या विचारसरणीकडे पाहतो. मी टीकात्मक (Critical Outlook ) दृष्टीनेच सर्वत्र पाहतो. त्यामुळे विरुद्ध पक्षाच्या समर्थनातील महत्त्वाचे मुद्दे लक्षात घेऊनच त्या पक्षाचा त्याग करतो. त्याज्य पक्ष म्हणजे संपूर्ण असत्य नव्हे. श्री. हरीभाऊ मोहनी यांच्या मांडणीबद्दल माझे हेच म्हणणे आहे. मी तुमच्या किंवा श्री. मोहनींच्या विचार-पक्षाचा स्वीकार करीत नाही, याचे कारण असे आहे की, समग्ररचना मला मान्य नाही. परंतु त्यातील काही विचार मान्य आहेत व विचार करण्यात स्वीकारलेली मूलगामी दृष्टी (Radical) मान्य आहे.

### धर्माची व्याख्या

१. मी धर्माची जी व्याख्या केली आहे त्यात पाश्चात्यांशी जुळते विचारांश असतील हे मला मान्य आहे, परंतु मी धर्मव्याख्या पाश्चात्यांपासून घेतली नसून ती पौर्वात्य मीमांसकांकडून घेतली आहे. शबरस्वामी, कुमारिल व शंकराचार्य यांच्या लेखनात जे स्पष्टपणे प्रतिपादिले आहे तेच मी घेतले आहे. म्हणून आपण म्हणता की मी धर्मद्रोही पाश्चात्त्यांपासून धर्मलक्षण घेतले आहे. हे म्हणणे पूर्ण खोटे आहे.

धर्म मनुष्यबुद्धिगम्य नाही, तर तो अलौकिक प्रमाणगम्य आहे, धर्मसंबद्ध अनेक अलौकिक वस्तू आहेत. हे शंकराचार्य स्वतः सांगतात (ब्रह्मसूत्र) शास्त्रयोनित्वात्। तर्काप्रतिष्ठानात्। (बृहदारण्यकोपनिषत) - तन्त्वोपनिषदं पृच्छामि। या वचनावरील शांकरभाष्य पाहा.

वेद इ. अलौकिक प्रमाण, आत्मा, ईश्वर, देवता व पापपुण्य हे अलौकिक पदार्थ प्रत्येक धर्मात आहेतच.

### संस्कृतीची मीमांसा

२. मी संस्कृतीचे लक्षण ‘विज्ञानशास्त्राची वाढ’ असे कोठेही केले नाही; परंतु ‘मनाची उन्नती’ हे तुमचे संस्कृती- लक्षणही मला अमान्य आहे. कारण ते एकांगी आहे. भौतिक

बाह्यविश्व व मानसिक शक्ती यांना मानवांच्या जीवनास उपयुक्त बनविण्याची कला म्हणजे संस्कृती होय. उदाहरणार्थ समचिकित्सा घ्या. समचिकित्सा हा एक मानव संस्कृतीचा महत्त्वाचा प्रकार आहे. त्या चिकित्सेचा शोध व उपयोग करणारे अंतःकरण तो शोध व उपयोग न करणाऱ्या अंतःकरणापेक्षा अधिक संस्कृत होय. अंतःकरणाची - मनाची कुशलता म्हणजे कला. या कलेत बाह्यद्रव्यांना उपयुक्त बनविणे व अंतःकरणास बाह्यद्रव्यांचा योग्य तऱ्हेने स्वीकार करण्यास योग्य बनविणे या क्रियांचा अंतर्भाव होतोच. पाश्चात्त्यांच्या विज्ञानाची वाढ एकांगी झाली आहे म्हणून अजून त्यांच्या संस्कृतीत व्यंग व दोष आढळतात; परंतु विज्ञानाची वाढ हा संस्कृतीचा महत्त्वाचा भाग आहे. विज्ञानरहित परिस्थितीत संस्कृती राहूच शकत नाही. मानवास बाह्य विश्वाचा जीवनार्थ उपयोग करावा लागतो. त्या शिवाय मानवाचे अस्तित्वच अशक्य आहे. विश्वाचा जीवनार्थ उपयोग करण्याकरिता जीवन व विश्व यांच्या कार्यकारणभावाचे व स्वभावाचे ज्ञान आणि विश्वात रूपांतर घडवून आणण्याचे ज्ञान मनुष्यास जरूर आहेच. या ज्ञानाशिवाय समाज नावाची वस्तुच अस्तित्वात येणे शक्य नाही.

भारतीयांच्या संस्कृतीस ही समाजातील युद्धे व कलह कधीही नाहीसे करता आले नाहीत. वेदात दाशरथ युद्ध व दस्युवधाची प्रशंसा हा महत्त्वाचा भाग आहे. महाभारत व रामायण हे युद्धवाङ्मयच आहे. संयम व वैराग्य यांची नुसती जपमाळ धर्मग्रंथांनी घेतली आहे. एवढ्यावरून मानसिक संस्कृती पराकाष्ठेला गेली होती, असे म्हणता येणार नाही. भारतीय समाजरचनेत हजारो वर्षे अस्पृश्यता व शूद्रदास्य टिकून राहिले हे कोणत्या मानसिक श्रेष्ठतेचे लक्षण आहे ?

पाश्चात्त्य व पौर्वात्य या दोघांचीही संस्कृती अपूर्ण आहे. कारण त्यांना अजून बाह्य विश्वास सर्व मानवी जीवनास उपयुक्त बनविण्याची कला साधली नाही. ही गोष्ट सामाजिक रचनेत बदल करूनच नीट रीतीने करता येईल. तसा बदल अजून व्हावयाचा आहे.

'विषयनिरपेक्ष सुख' नावाची मानसिक स्थिती आपण खरी संस्कृती मानता. या संस्कृतीचा विचार करून समाजशास्त्रात विशेष फरक करता येतील असे मला वाटत नाही. कारण ती स्थिती केवळ थोड्या लोकांच्या वैयक्तिक अनुभवाचा विषय आहे. तुमच्यासारख्या थोड्या व्यक्तींनी त्या गूढ कल्पनेशी खेळत बसावे. मनुष्यामनुष्यातले संबंध कसे असतात व असावे, मनुष्यांनी स्वतःच्या शरीरेंद्रियमनाचा उपयोग करून बाह्य विश्वाचा उपयोग करण्याचे सामर्थ्य कसे वाढवावे; आणि बाह्य विश्वाचा उपयोग करीत असता सगळ्या मानवांनी आपसात कसे वागावे याचाच विचार मला करावयाचा आहे.

## सुखाचे स्वरूप

(३) सुखाचे स्वरूप अभावात्मक नाही तर भावरूप संवेदना आहे असे मी स्पष्ट म्हटले आहे. सुख हे एक मानसिक कार्य आहे. ते कार्य मनातील विशिष्ट तऱ्हेच्या वृत्तींचा परिणाम आहे. विषयस्पर्श हे एक त्या विशिष्ट वृत्तींचे कारण आहे. विषयानुभव, विषयस्मरण, विषयकल्पना व विषयज्ञान हे सुखाचे कारण आहे. 'अमेरिकेतील दहा लक्ष गुलामांना दास्यातून मुक्त करून स्वतंत्र व्यवसाय करण्यास योग्य संधी तेथील सरकारने दिली' किंवा 'स्पृश्य समाजाने भारतीय

अस्पृश्यता बेकायदेशीर ठरविली' या बातमींनी मला आनंद होतो. यात, बाहेर, माझ्या मनाच्या बाहेर, घडलेल्या परिस्थितीस मी विषय (Objectivity) म्हणतो. त्या विषयाच्या ज्ञानाने मला 'सुख' नावाची भावरूप वृत्ती अनुभवास मिळते. विषयनिरपेक्ष सुख नावाची वस्तू मला माहीत नाही. तुम्हांस माहीत असल्यास तसे कळवावे. विषय म्हणजे मनाच्या बाहेरील घटना.

(४) परलोकाचे स्वरूप तुम्हास सांगता येणार नाही; परलोकाचे अस्तित्व सिद्ध करण्यास तुमच्यापाशी प्रमाण नाही. इहलोकाचे व परलोकाचे स्वरूप सारखे यास प्रमाण काय ? इहलोकीसुद्धा निरनिराळ्या परिस्थितीत निरनिराळ्या समाजस्थितीत, भिन्न भिन्न कर्मे इष्ट ठरतात. मग इहलोकी श्रेयस्कर जे कर्म तेच परलोकी श्रेयस्कर कसे ठरणार ? इहलोकची कर्मे इहलोकच्या शरीरेंद्रियादिकांचे रचनेशी सापेक्ष आहेत. पर लोकच्या शरीरेंद्रियादिकांचे स्वरूप इहलोकासारखेच असेल तर तो परलोक कसा ? हे परलोकाच्या अस्तित्वाचे थोतांड तुम्ही 'धर्ममीमांसेत' कशाला विनाकारण स्वीकारता ? ज्या परिस्थितीची अस्पष्ट कल्पनासुद्धा करणे अशक्य आहे त्या परिस्थितीला लागू करण्याकरिता कायदेकानून निर्माण करण्याचा व्यर्थ खटाटोप कशाला करता ? खरोखर कीव करण्यासारखी बाजू तुम्ही घेतली आहे.

५. समाजाच्या स्वास्थ्याच्या आधीन व्यक्तीचे स्वास्थ्य अवलंबून आहे, यात तुमचे आमचे ऐकमत्य आहे.

## यातु आणि जादुटोणा आता पुरे झाला

६. मी यातूस सर्वस्वी भ्रांती मानीत नाही; त्यातला असत्यांश मी स्पष्टपणे सांगितला आहे. कारीरी इष्टीने पाऊस पडतो व श्येनयागाने शत्रूचा पराभव होतो, असे का आपण यातुसमर्थनात सांगणार आहात ? मनुष्य समजून उमजून ज्या क्रिया करतो त्याचा त्याच्या मनावर बरा-वाईट परिणाम होतो हे खरे आहे; पण त्याकरिता मनुष्यास मुद्दाम भ्रांतीचा अंश अधिक असलेल्या होमहवन-जपप्रार्थनात्मक क्रिया करावयास लावण्याने फायद्यापेक्षा एकंदरीत तोटाच जास्त होतो. त्या ऐवजी अधिक महत्त्वाच्या तपासून पारखून ठरविलेल्या मानसिक क्रियाच माणसास, करावयास लावाव्या. जुन्या परंपरागत श्राद्धहोमहवनादी क्रियांच्या संस्कारांचा, रूढीमुळे मनावर उदात्त परिणाम होतो हे जसे खरे, त्याचबरोबर त्याचे इतर अनिष्ट परिणाम काय होतात व त्यामुळे कितीतरी नुकसान होते याचा अभ्यास करावयास नको काय ? अस्पृश्यतेच्या पालनात मनाची उदात्तता अनुभवास ज्यांच्या येते असे वर्णाश्रमसंघीय तुमच्या भोवताली कमी आहेत काय ?

तुम्ही आजपर्यंत बुद्धिवादाचा आश्रय करून भारतीयांच्या धर्मशास्त्र, ज्योतिष, वैद्यक, इतिहास इत्यादी विद्यांत महत्त्वाचे संशोधन करून भर घातली. यापुढे भारतीयांच्या परंपरेतील अत्यंत हीन, अवनत, भ्रांतिग्रस्त, थोतांडी, अजागळपणाच्या रूढींचे मेस्मेरिझम्, सायकोथेरपी, हिप्नॉटिझम्, इत्यादिकांच्या साहाय्याने भोंदूंनी माजविलेल्या ढोंगधत्तुरांच्या नादी लागून त्यांचे समर्थन करण्यात वेळ घालविणार असल्यास ते मोठे दुर्दैवच म्हणावे लागेल.

७. माझा व तुमचा सामाजिक पुनर्घटनेचा मुद्दा एकच आहे असे आपण म्हणता ही सर्वांत

सुखाची गोष्ट आहे. सामाजिक पुनर्घटनेचे सांगोपांग विवरण करून त्याची समाजापुढे मांडणी करणे हे महत्त्वाचे कार्य आहे.

आपला,

**लक्ष्मणशास्त्री**

❍❍❍

# श्री. दप्तरींचे प्रत्युत्तर

॥ श्री ॥

महाल नागपूर,
१८- ३ - ४१.

**श्रीयुत लक्ष्मणशास्त्री यांस सा. न. वि. वि.,**

तुमच्या दि. १५-३-४१ च्या पत्रास पुढील उत्तर लिहीत आहे. येथील मुद्यांचा क्रमांक मागील आपल्या पत्रात आहे तोच आहे.

## मतभेदांचे निराकरण

१. तुम्ही धर्माची व्याख्या पाश्चात्त्यांपासून घेतली नसून शंकराचार्य वगैरे भारतीयांपासूनच घेतली असे मी मान्य करतो; पण ती व्याख्या चूक आहे हा माझा मुद्दा शिल्लकच आहे. सर्वच भारतीयांनी अशी व्याख्या केली नाही व माझ्यासारखीच व्याख्या केली आहे हे तुम्हांसही मान्य आहे. "महाभारतातील शांतिपर्वात सांगितलेली धर्ममीमांसा ही बुद्धिवादी आहे असे दिसते." असे तुम्हीच म्हटले आहे.

*('हिंदुधर्माची समीक्षा,' पा. ८६ ).*

२. केवळ मनाची उन्नती किंवा केवळ विज्ञानशास्त्रांची वाढ ही संस्कृती नव्हे हे मला मान्य आहे. मनाची उन्नती व विज्ञानशास्त्राची वाढ ही दोन्हीही मिळूनच खरी संस्कृती होते. भारतीय संस्कृतीत प्रत्यक्ष व्यवहारात पुष्कळच दोष आहेत हे मला मान्य आहे. माझे म्हणणे एवढेच आहे की, ग्रंथात वर्णिलेले ध्येय अद्वैतसिद्धांत उत्तम आहे.

३. अमेरिकेतील दहा लक्ष गुलामांना दास्यातून मुक्त केले, या बातमीने तुम्हास आनंद होतो हे मान्य केल्याने आपणामधील वाद मिटला असे मी समजतो. तुम्ही त्याला वैषयिक आनंद म्हणता, मी त्याला आत्मिक आनंद म्हणतो. हा फरक महत्त्वाचा नाही, कारण तो शाब्दिक आहे. मी आनंदाचे वैषयिक आणि आत्मिक असे दोन प्रकार मानतो. तुम्ही एकच प्रकार मानता. मी दोन प्रकार मानतो याचे कारण असे की, वरील प्रकारच्या बातमीने सर्वांसच आनंद होत नाही. उदाहरणार्थ, त्या गुलामांच्या मालकास आनंद होत नाही. या बातमीने काही जणास आनंद होतो व काही जणांस होत नाही याचे कारण काय ? या ठिकाणी विषय प्रत्यक्ष आनंद उत्पन्न करीत नसून विषय मनांत कल्पना उत्पन्न करतो व त्या कल्पना भिन्न असल्यामुळे काही जणांत आनंद; परंतु काही जणांत दुःख उत्पन्न करतात. म्हणून वरील उदाहरणात आनंद किंवा दुःख विषयाने उत्पन्न केले नसून कल्पनेने उत्पन्न केले असे मानणे भाग आहे. विषय कल्पना उत्पन्न न करता

प्रत्यक्षच सुख किंवा दुःख उत्पन्न करतो (जसा गोड पदार्थ) तेव्हा त्यास वैषयिक सुख म्हणावे; विषय कल्पना उत्पन्न करून सुख देतो तेव्हा त्यास आत्मिक सुख म्हाणावे. असे सुखाचे दोन प्रकार मानून मी बोलतो व तुम्ही सुखाचा एकच प्रकार मानून बोलता म्हणून फरक वाटतो; पण तो खरा नाही.

४. परलोकाचे अस्तित्व व संपूर्ण स्वरूप सिद्ध करण्यास प्रमाणे नाहीत हे खरे आहे. तसेच परलोक नाहीच असेही म्हणण्यास प्रमाणे नाहीत म्हणून परलोकाचे अस्तित्व मानणाऱ्यांचे, इहलोक किंचितही न सोडता, समाधान करण्याचा आम्ही प्रयत्न करतो त्यात वावगे काय आहे ? सनातनी लोक धर्मात ग्रंथप्रामाण्य मानण्याचे कारण, परलोकातील सुखाची साधने मनुष्यास समजत नाहीत, हे देतात. त्यांचे खंडन, ग्रंथही मनुष्यतच आहे असे आम्ही करतोच, शिवाय असेही खंडन आम्ही करतो की "ग्रंथातील परलोकाच्या सुखाची साधने बुद्धीने ठरणाऱ्या ऐहिक सुखाच्या साधनाहून भिन्न नाहीत व ऐहिक सुखाच्या साधनांनीच परलोकीही सुख होते असे ग्रंथच सांगतात." कोकजेकृत धर्मस्वरूप निर्णया'तील तुमच्या निबंधात सनातन्यांची समजूत घालण्याचा असाच प्रयत्न तुम्हीही केला आहे.

६. तुम्ही यातूस सर्वस्वी मानीत नाही ही आनंदाची गोष्ट आहे. यातुसंबंधाने बुद्धीच्या कसोटीस उतरेल तेवढेच मी सांगेन, श्राद्धादी क्रियांचा जर अनिष्ट परिणाम होत असेल तर त्याही टाकू. एकूण आपणामध्ये काही मतभेद राहिला आहे असे मला तरी वाटत नाही.

--- **भवितव्य,** २४ ऑक्टोबर, १९४१

(**विद्वद्रत्न डॉ. दप्तरी - लेखसंग्रह** (खंड पहिला), संपादक - प्रा. गणेश महादेव डोळके यादव केशव दप्तरी, प्रकाशक - दप्तरी ग्रंथ प्रकाशन समिति, महाल, नागपूर- २. प्रथमावृत्ती - १९६९ - किंमत - ८ रुपये, पृ. ३५७ ते ३६८)

OOO

# ब्राह्मणत्व म्हणजेच साधुत्व काय ?

मिरजेचे सुप्रसिद्ध छंदःशास्त्री श्री. वि. ज. सहस्रबुद्धे यांनी आचार्य काका कालेलकर व तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना लिहिलेले पत्र व त्यांची उत्तरे येथे छापली आहेत. त्या पत्रांवरूनच त्यांचा विषय व त्यांचे महत्त्व उघड होईल.

मूळपत्र

श्री

पूज्य श्री. आचार्य काकासाहेब कालेलकर यांचे सेवेशी,

**आदरपूर्वक सा. न. विज्ञापना वि.,**

भगवद्गीतेवरील श्री. शंकराचार्यांचे भाष्य वाचीत असतां कांहीं शंका आली असल्याने ती शंका आपल्यापुढे ठेवून त्याबद्दल खुलासा आपल्याकडून समजून घ्यावा या हेतूनें हें पत्र लिहीत आहे.

भाष्याच्या उपोद्घातांत परमेश्वराच्या अवताराचे कारण खालीलप्रमाणे वर्णन केले आहे.

"ब्राह्मणत्वस्य रक्षणार्धम् देवक्यां वसुदेवात् अंशेन संबभूव किल (स: आदिकर्ता नारायणाख्यः विष्णुः) ब्राह्मणत्वस्य रक्षणेन वैदिक : धर्म : रक्षित : स्यात्" याप्रमाणे विधान शंकराचार्यांनीं केलें आहे; परंतु प्रत्यक्ष गीतेत परमेश्वराच्या अवताराचे कारण सांगितलें आहे तें "परित्राणाय साधूनाम् विनाशायच दुष्कृताम्" असे आहे. तेव्हा या दोन वचनांमध्ये एकवाक्यता दिसत नाही. ब्राह्मणत्व व साधुत्व या दोन्ही गोष्टी समानार्थक आहेत असे म्हणता येईल काय ? अशी शंका येते. ब्राह्मणत्वाची व्याख्या गीतेत आहे तशी साधुत्वाची व्याख्या गीतेत नाही. तेव्हा याबद्दल आपल्याकडून खुलासा झाल्यास शंकेचे समाधान होईल. तसदीची क्षमा करावी. सेवेशी श्रुत होय विज्ञापना.

आपला नम्र,

(स्वाक्षरी)

**वि. ज. सहस्रबुद्धे**

**(साप्ताहिक मौज, मुंबई; दि. १४ सप्टेंबर, १९४९, पृ. ४)**

ooo

आगगाडीत १९/८/४९

**प्रिय तात्याबुवा,**

दिल्लीहून कलकत्त्याला जात आहे. तुमचे २७-७ चे पत्र पोहोचले. आगगाडीत बसून जे काही लिहिणे शक्य आहे तेच लिहितो.

उपनिषदांत जो ब्राह्मण नव्हे तो कृपण असा उल्लेख येतो. यावरून तेथे ब्राह्मण शब्द वर्णवाची किंवा जातिवाची नाही. नंतरच्या उपनिषदांतून ब्राह्मण शब्दाचा जातिवाचक अर्थ गौण करून आदर्शवाचक अर्थ घेण्याचा प्रयत्न दिसतो. दर्शनशास्त्रात असेच होणार. धर्मशास्त्रे काय म्हणतात हे मुख्यत्वे पाहिले पाहिजे. बौद्धांच्या धम्मपदांत ब्राह्मणवर्ग आहे तो काळजीपूर्वक पहा. त्यांत उपनिषदांची दृष्टीच आहे. सत्तांची वृत्ती तीच आहे. श्री. शंकराचार्यांच्या काळी वर्ण-विद्वेष नसावा. ब्राह्मण हा धर्माच्या रक्षणासाठी आहे असे मनूने म्हटले आहे. ब्राह्मणाचे दर्शन घडत नाहीसे झाले म्हणजे वर्णाश्रमधर्म क्षीण होऊन लोक धर्मच्युत आणि व्रात्य होतात असे स्मृतींचे म्हणणे आहे. शंकराचार्यांना हे विचार मान्य असावेत.

खऱ्या ब्राह्मण धर्माला क्षत्रियत्वाची जोड मुळीच नको असते. विश्वामित्र मूळचा क्षत्रिय महत्त्वाकांक्षेने ब्राह्मण झाला म्हणून त्याने रामलक्ष्मणाची मदत मागितली. परशुराम क्रोधाने भ्रष्ट झाला म्हणून त्याने क्षात्रधर्म पत्करला. दंभातून कृत्या उत्पन्न करणे, शाप देणे वगैरे सर्व पातित्याचे प्रकार आहेत. खरा ब्राह्मण धर्म सत्याग्रह धर्म आहे. त्यांतच ब्रह्मतेज असते. दक्षिणा घेऊन आणि रक्षण मागून, ब्राह्मण क्षीणतेज झाले व म्हणूनच युगऱ्हासानुरूपतः चातुर्वर्ण्य उत्पन्न करावें लागले. सर्वश्रेष्ठ सत्ययुगी एकच देव आणि एकच वर्ण असावयाचा असे स्मृतिपुराणांतून सांगितले आहे. सर्वम् ब्राह्मम्, इदम् जगत्।

## संपूर्ण मानवाची उपासना करा

आपण आता जुन्या शास्त्रार्थाचा काथ्याकूट सोडून दिला पाहिजे. एकाने शंकराचार्यांचा निर्वाळा दिला म्हणजे दुसरा शंकराचार्यावर हल्ला चढवतो. दोन्ही प्रकार चुकीचे आहेत. धर्म खरोखर ग्रंथ परतंत्र नसावा, धर्मशास्त्र त्या त्या काळच्या महर्षींच्या अंतःकरणात तयार होते. लोकशाहीने मानवधर्म स्वीकारला आहे. या धर्माला जातिभेद आणि वर्णभेदच काय पण धर्म -भेदही मानणे शक्य नाहीं. तेव्हां आपण आता 'संपूर्ण मानवा' ची उपासना करावयाची आहे. यांत दिरंगाई करूं तितका आपला अधःपात होणार. ज्यांनी अनेक देवदेवी उत्पन्न केल्या आणि मानल्या त्यांनी असंख्य जाती उत्पन्न करणें स्वाभाविक आहे. "विविधतेमध्ये एकता" हा हिंदुधर्माचा विशेष आहे असे आपण म्हणत आलो; पण आपण एकतेला गौण करून नष्ट केले आणि आता फक्त विविधतेची बजबजपुरी उरली आहे. विविधतेचे

रक्षण कसें होईल ही काळजी नको; पण एकतेच्या मदतीला सर्वांनीं धावून गेले पाहिजे. हे सर्व समजावयाला भव्य दृष्टी पाहिजे. तिची उपासना कोणीच करीत नाहीं. भव्य म्हणजे भविष्यकालोचित.

**काकाचा सप्रेम जयहिंद**

**(साप्ताहिक मौज, मुंबई, दि. १४ सप्टेंबर, १९४९, पृ. ४)**

○○○

धर्मकोश कार्यालय, वाई
ता. २२|८|४९

**कृ. न. वि. वि.,**

आपले पत्र येऊन बरेच दिवस झाले. परिचय नसला तरी अशा प्रसंगाने परिचय करून घेणे इष्ट असते. त्यांत आनंदही असतो.

## साधुत्व व ब्राह्मणत्व

भगवद्गीतेत ब्राह्मण्यरक्षणाला प्रत्यक्ष आधार नाही, ही गोष्ट खरी आहे; परंतु ब्राह्मणाच्या लक्षणामध्ये ज्ञान, विज्ञान व आस्तिक्य ही कर्म मुख्य असल्यामुळें धर्म त्याच्यावर अवलंबून आहे, गीतेमध्ये साधुत्व व ब्राह्मण्य हे आपण म्हणता त्याप्रमाणे पर्याय होऊ शकतात. कारण शम, दम, तप, शौच शान्ति, आर्जव, ज्ञान, विज्ञान व आस्तिक्य या समुच्चयाने जे सिद्ध होते, त्याशिवाय साधुत्वाची दुसरी पूर्णता ती कोणती राहते? कोणतीच नाही. ब्राह्मण शब्दाने (अलीकडची दोन शतके सोडून) गैरसमज कधीच झालेला नाही. संतांच्या काळात म्हणजे गेल्या पाच सहाशे वर्षांत ब्राह्मण्य मलिन अधिक झाले. परंतु बौद्ध व साधुत्वापेक्षा ब्राह्मण्य शब्द आदरपूर्वक आलेला आहे. भगवद्गीतेतही ब्राह्मण व राजर्षी हे संघ आहेत. भगवद्गीतेत ब्राह्मण लक्षण जातिदर्शक नाही, कर्मदर्शक आहे. शंकराचार्यांची दृष्टी सर्व धर्मशास्त्रांचा समन्वय करणारी असल्यामुळे महाभारत, स्मृती व वेद यांचा समन्वय करून ब्राह्मणत्वाला महत्त्व दिले आहे. भावार्थ, साधुत्व हाच; परंतु सधुत्वापेक्षा ब्राह्मणत्व या शब्दाने सर्व समाजाची जबाबदारी अधिक सूचित होते. साधुत्व समाजांतील कोणतेही कार्य किंवा कर्म करणाऱ्याच्या ठिकाणी अपेक्षित आहे. मराठी भाषेत साधू हा शब्द पराकोटीला पोहोचलेला मनुष्य या अर्थी रूढ झाला आहे. संस्कृतमध्ये साधा सज्जन अशा अर्थी रूढ आहे. सज्जनाच्या रक्षणाची जबाबदारी ईश्वराकडे आहे, पण सज्जनपणाचे धुरिणत्व ब्राह्मणत्वाकडे आहे. कारण ज्ञान व विज्ञान हे सज्जनाच्या ठिकाणी असतेच असे नाहीं. धर्म-नेतृत्वाला त्याची पूर्ण आवश्यकता आहे. म्हणून शंकराचार्य गुणकर्मदृष्ट्या ब्राह्मणत्व रक्षणाची महती सांगतात. कळावे लो. अ. हे वि.

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

**(साप्ता. मौज, मुंबई, १४ सप्टेंबर, १९४९ पृ. ४)**

○○○

## वाचकांचा पत्रव्यवहार

'कलगी तुरा'* वाचला. निबंध अत्यंत महत्त्वाचा आहे. भारतीय लोकजीवनात कलगी-तुरा ही लोकशिक्षणाची एक संस्था आतापर्यंत विद्यमान होती. धार्मिक तत्त्वज्ञानाचे शिक्षण जनमनोरंजन करीत देणारी ही संस्था होती. भारतीय धार्मिक तत्त्वज्ञान बहुमुखी आहे. त्यात द्वैत-अद्वैत, ज्ञान-भक्ती, कर्म-संन्यास, योग-तंत्र, भक्ती-मुक्ती, अशी विरोधी द्वंद्वे प्रसिद्ध आहेत, त्यांचेच प्रत्यंतर 'कलगी-तुरा' हे द्वंद्व. धार्मिक विचाराला सतत अस्वस्थ ठेवून चालना देणे, हे अशा द्वंद्वाचे कार्य आहे. विचार व जाणिवा त्यामुळे तल्लख राहतात.

पाचांपैकी 'हिरवा' ह्या रंगाचे मूळ शोधण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे. आत्म्याचे जे मुख्य स्थान हृदय, त्याच्यातील सहस्त्रनाड्यांचे हे पाच रंग होत. बृहदारण्यक उपनिषदात (४.३;, १९, २०) म्हटले आहे :

आत्म्याचे मुख्य स्थान हृदय, तेच विश्रांतीस्थान; त्याच्या 'हिता' नामक पाच रंगांच्या नाड्या आहेत. (पाच रंगाच्या नाड्यांनी हे हृदय विणलेले आहे, असा अभिप्राय). ते पाच रंग - शुक्ल, नि, पिङ्गल (सोनेरी नि पिवळट), हरित (हिरवा) व लोहित (लाल). आत्मा तेथे अविद्येमुळे भयकारक स्वप्ने पाहतो. परंतु विद्याप्राप्तीनंतर देवाप्रमाणे वा राजाप्रमाणे सर्वात्मभाव अनुभवतो. हे आत्म्याचे परमस्थान.

आपला नम्र,

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

**(* महाराष्ट्र संशोधन पत्रिका, वर्ष २१, अंक - १, एप्रिल-मे-जून, १९७४)**

○○○

८.

# अनावृत्त पत्रव्यवहार

# माधवराव बागल यास अनावृत पत्र

**प्रिय माधवराव बागल यांस,**

टिळकपुण्यतिथीच्या समारंभास मी गेल्या १ ऑगस्टला कोल्हापुरास आलो होतो. आपल्या निमंत्रणावरून तेव्हां मी आपणाकडेही येऊन गेलो. आपली भेट होऊ शकली नाही, माझ्या अध्यक्षतेखाली भरलेल्या पुण्यतिथीच्या सभेत काय प्रकार घडला तो आपणास कळला असेलच. त्या प्रकारावरून मला जे विचार सुचले व जे विचार मी आपणास तेथे सांगितले असते, ते इतरांनाही कळणे मला इष्ट वाटते म्हणून हे अनावृत पत्र मी लिहीत आहे.

प्रादेशिक राज्यरचनेच्या प्रश्नावर आपला व माझा मतभेद मौलिक स्वरूपाचा आहे, ही गोष्ट मशहूर आहे. त्या बाबतीत आपण दोघे एकमेकांस आपले विचार पटवू शकू अशी परिस्थिती अद्याप तरी उत्पन्न झालेली नाही. म्हणून त्या मुद्यावर मला काहीही सांगावयाचे नाहीं.

आपण संयुक्त महाराष्ट्रवादी आघाडीचे एक प्रमुख नेते आहात व मी काँग्रेस पक्षाचा एक सर्वसाधारण सभासद आहे. गेल्या दहा महिन्यांत जी अत्यंत खळबळीची व चिंताक्रांत सार्वजनिक परिस्थिती उत्पन्न झाली तिची चांगली माहिती आपणा दोघांसही आहे. आपण दोघे भिन्न चाकोरीतून चाललो आहोत; परंतु अशाही परिस्थितींत मनाने व विचाराने त्या चाकोरीच्या बाहेर पडून अधिक व्यापक भूमिकेवरून अनेक विरुद्ध प्रवाहांचा विचार करणे ही गोष्ट सत्यसंशोधनाच्या आणि सर्वव्यापी हिताच्या दृष्टीने आवश्यक असते. विशेषतः संघर्षानें व विद्रोहाने भरलेल्या वातावरणात अशी भूमिका घेणे अत्यंत कठीण असले तरी ते अत्यंत महत्त्वाचे सामाजिक कर्तव्य ठरते.

आत्यंतिक विरोध असलेल्या मानवी गटांच्या विरोधी हितसंबंधांच्याही पलीकडे सर्वांचे हित व सर्वांचे सर्वहित ज्या गोष्टींवर अवलंबून असते त्या गोष्टींचा विचार कोणीही विसरता कामा नये. ज्या गोष्टी नष्ट झाल्या असतां सगळेच बुडतील अशा गोष्टी जपणे ही सर्वांची साधारण जबाबदारी व मुख्य कर्तव्य होय. बहुश: विशिष्ट एकाच उद्देशाच्या पाठीमागे लागून भावनाच्या आवेशांत सांपडलेली माणसे व पक्ष आणीबाणीच्या वेळी नेमक्या अशा जबाबदाऱ्या व अशीं कर्तव्ये विसरतात. सर्वांच्या हिताच्या दृष्टीने पालनीय अशा कांही गोष्टी आधुनिक मानवी जीवनांत आहेत की नाहीत ? याचा जर शोध घेतला तर त्यात लोकशाही मूल्यांचा निर्देश करता येईल. संयुक्त महाराष्ट्र इत्यादी प्रश्न सोडवीत असता सर्व पक्षांनी पक्षविषयक भेदभाव विसरावा असं आपण म्हणता; परंतु त्याहीपेक्षा पक्षभेदातीत अशी लोकशाहीची मूल्ये ठरतात. विचारप्रदर्शनाचे स्वातंत्र्य व ध्येयवादी संघटनांचे स्वातंत्र्य

यांची गरज ही सर्व माणसांची गरज आहे. हवापाण्याच्या गरजेइतकीच ती महत्त्वाची आहे.

प्रादेशिक राज्यरचनेचा प्रश्न उद्भवल्यापासून आजतागायत ज्या ज्या पक्षांनी त्यात लक्ष घातले त्या सर्वांच्या हातून कमी- जास्त प्रमाणात चुका होत गेल्या आहेत. त्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे भिन्न हेतुंची खिचडी हे होय. संयुक्त महाराष्ट्र किंवा महागुजरात अथवा द्वैभाषिक यांची मागणी करणाऱ्या पक्षामध्ये, गटांमध्ये व व्यक्तीमध्ये या मागणीपेक्षां अंतस्थ अनेक भिन्न हेतू शिरलेले लक्षांत येऊ शकतात. सत्ताविषयक स्पर्धा, स्वपक्षीय बळाची अभिवृद्धी करण्याची संधी साधणे, वैयक्तिक नेतृत्वाची महत्त्वाकांक्षा, त्याच प्रमाणे नजीकच्या भविष्यकाळात सत्ता प्राप्तीची आशा नसल्यामुळे निर्माण होणारी बेजबाबदार विध्वंसक वृत्ती यांच्या योगाने प्रस्तुत प्रश्न सोडविण्याच्या मार्गात धरसोड, विसंगती व बेबंदशाही उत्पन्न झाली. त्यामुळे सार्वजनिक जीवनांत विशेष आवश्यक असलेला तारतम्य विचारच नष्ट होतो की काय अशी भीती उत्पन्न झाली आहे आणि दुसऱ्याच्या अविचाराच्या आधाराने स्वत:च्या अविवेकाचे समर्थन करण्याची प्रवृत्ती बळावू पाहत आहे. माझी सभा केवळ टिळक पुण्यतिथीची होती. प्रतिपक्षाला लोकशाहीची चाड नाही, तर आम्हीच काय म्हणून लोकशाहीच्या मर्यादा पाळावयाच्या, हे प्रत्यही कानावर येणारे विधान आहे. यामुळेच सभेतील घटनेचा अर्थ होऊ शकतो. सामाजिक जीवनाचा पायाच उखडणारा हा दृष्टिकोन आहे, असे मला वाटते.

आपला,

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

दि. ९-९-५६

**(साप्ता, मौज, मुंबई. दि. १६ सप्टेंबर, १९५६, पृ. २.)**

ooo

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना उत्तर

**मित्रवर्य तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांना-**

स.न.वि.वि.,

आपले ता. १६ सप्टेंबर, १९५६ च्या 'मौजे'तील अनावृत पत्र वाचायला मिळाले. आपण कळकळीने जे विचार मांडले त्याबद्दल आभारी. त्या विचारांची आज सर्वांनाच आवश्यकता आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर आपला तीव्र मतभेद असला तरी अनावृत पत्रात ज्या गोष्टीची आपण अपेक्षा केली आहे त्याबद्दल समंजस माणसात मतभेद होणार नाही. माझ्यात आणि आपल्यात तर नाहीच नाही. आपण ज्या संयमाने लिहिले आहे, तितका मला पाळता येणे फार अवघड आहे. मी जात्या भावनामय कलावंत, आपण तत्त्वज्ञ! म्हणून भाषेत वावगा शब्द गेल्यास क्षमा करा. तुमची व माझी संस्कृती निराळी आहे. संस्कार निराळे आहेत. तथापि ज्या या मूल्यांची आपण अपेक्षा करता ती फार मोलाची आहे. कारण त्यात मानवता आहे ती कशी टाकता येतील?

"आत्यंतिक विरोध असलेल्या मानवी गटांच्या विरोधी हितसंबंधाच्याही पलीकडे सर्वांचे हित व सर्वाचे सर्व हित अवलंबून असते. सर्वांच्या हिताच्या दृष्टीने पालनीय अशा काही गोष्टी आधुनिक मानवी जीवनात आहेत. त्यात लोकशाही मूल्याचा निर्देश करता येईल." (तर्कतीर्थ)

या वर निर्देश केलेल्या अबाधित तत्त्वाबद्दल कोणीही मतभेद व्यक्त करू शकणार नाही.

पण बहुसंख्य समाजाचे आचार विचार आणि विशेषतः भावनेच्या भरांत सापडल्यानंतरचे त्याचे आचार विचारपूर्वक होत नसतात. खालचा समाज हा बालमनाचा असतो. तो 'एका गालात थोबाडी मारली' म्हणजे दुसरा गाल पुढे करणारा नसतो. म्हणून बहुजन समाजाच्या आचारविचारांकडे पाहतांना विचारवंतांनी आपल्या वरच्या पातळींतून पाहणे व त्यांना दोष देत सुटणे चुकीचें आहे. सुज्ञानी त्यांना मार्ग दाखवला पाहिजे. अज्ञानी भावनामय समाजाला एकदम आरोपीच्या पिंजऱ्यांत टाकू नये.

सर्वसामान्य जनतेच्या आकांक्षा अवमानून ज्या शहाण्यांनी त्या चिरडून टाकल्या त्यांनीच आत्मपरीक्षण करायला हवें. या भावना चेतवण्याला आणि जनतेच्या अविचारी कृत्याला तुमचीच बेजबाबदार कृती कारणीभूत झालेली आहे. त्यांचा तोल सुटला तर सर्वसामान्य मनुष्याच्या स्वभावाला तो सोडून नाहीं हे तुम्ही जाणले पाहिजे. ते अपराधी आहेतच; पण तुम्ही शहाणे त्यांच्याहून दसपटीने अपराधी आहांत !

"संयुक्त महाराष्ट्र किंवा महागुजरात अथवा द्वैभाषिक यांची मागणी करणाऱ्या पक्षांमध्ये, गटांमध्ये व व्यक्तींमध्यें सदर मागणीपेक्षा अंतस्थ अनेक भिन्न हेतू शिरलेले लक्षात येऊ शकतात." (तर्कतीर्थ)

तर्कतीर्थ, मनुष्यस्वभावातच हे दुर्गुण आहेत. जगाच्या अंतापर्यंत हे चालायचेच. पण हे सर्व दुर्गुण फार मोठ्या प्रमाणांत काँग्रेस पुढाऱ्यांत असल्याचे निदर्शनास आले आहे. हिरे- चव्हाणांच्यांतील फूट, त्यांची सत्तेची धडपड यामुळे त्यांचे प्रदर्शन भरपूर झाले आहे. स्वार्थासाठी वरिष्ठांच्या तालावर नाचण्यापेक्षा यांनी काय केले आहे? माफ करा तर्कतीर्थ, माझी कलावंताची लेखणी आपल्याइतका संयम येथे राखू शकत नाही, माझ्या मराठी मनाला ही प्रतारणा सहन होत नाही.

बाकी मानवी मूल्ये मी जाणतो. राजकीय क्षेत्रात आज आपण शत्रू असलो तरी व्यक्तिजीवनात तर्कतीर्थ हे माझे जिव्हाळ्याचे मित्रच राहतील. म्हणूनच मी माझ्या घरी चार घास घ्यावेत म्हणून आपणाला आमंत्रण दिले होते. ते संबंध राजकारणामुळे तुटणार नाहीत.

बाकी माझ्या स्वार्थाबद्दल म्हणाल तर या चळवळीत मला कसलाही व्यक्तिविषयक स्वार्थ साधून घ्यावयाचा नाही. मी पुढारी नाही. होण्याची इच्छा नाही. निवडणुकीला मी उभा राहणार नाही. सं. म. समितीचा एक शिपाईगडी एवढीच माझी भूमिका राहील.

एवढीच इच्छा होती की मी आणि तर्कतीर्थ हातांत हात घालून स. महाराष्ट्राचा प्रचार करावा, सारे रान उठवावे आणि सत्तेच्या जबड्यातून महाराष्ट्राला बाहेर काढावे! पण तो सहकार्याचा हात तुटला! आता थोट्या हातानेच मी लढणार! पण सत्तेच्या, संपत्तीच्या किंवा मोहाच्या आहारी नाही जाणार - मित्राच्या भिडेस नाही बळी पडणार !

आपला,

**माधवराव बागल**

**(२३ सप्टेंबर, १९५६ / मौज पृ. ३)**

ooo

९.

## महात्मा गांधीप्रणीत

# अस्पृश्यता निवारण निवेदन पत्र

HARIJAN

(FEBRUARY 11, 1933)

## PUNDITS' OPINION ON UNTOUCHABILITY

THREE kinds of "Untouchables" are mentioned in the Hindu Dharma Shastras -

1. Persons classed as Untouchables by birth, i.e. progeny of the union of a Shudra with a Brahman woman.

2. Persons guilty of any of the Five heinous sins or of certain practices condemned in Hinduism.

3. Persons whilst they are in a polluted state.

There is nothing to show that any of the communities now classed as untouchables come under the first category. Therefore, the rules governing untouchability and excommunication under the first head are inapplicable to them. Assuming that any of these communities can be brought under the first head, they can be free from their untouchability and have all the privileges enjoyed in common by the four varnas, by clean living, initiation into the Shaiva or Vaishnava worship, and the like.

The second kind of untouchability obviously cannot attach exclusively to any class or community as a whole. It may apply to individuals in any and every community. The untouchability of the untouchables so called is not due to their fallen state under the second head; nor can they be shown to be descendants of such fallen parents. Persons guilty of heinous sins referred to under the second head become fully purified by the performance of appropriate purificatory ceremonies. The progeny of such fallen persons as have not become thus purified cannot be classed as untouchables. Some Smritikaras, who regard such progeny as untouchables, prescribe very slight purificatory ceremonial for their restoration. And persons who are guilty of practices rendering them

untouchable can also be free from untouchability by giving up such practices.

The third kind of untouchability due to one's being in a polluted state obtains among all classes, whether regarded as untouchables or not. There is no warrant in the Shastras for considering tanners, bhangis and others as permanent untouchables, merely by reason of their occupation. Their untouchability is due to the external uncleanliness caused by the nature of their work. All untouchability under the third head is cured by a bath and a change of clean clothes at the due time.

Thus it is necessary that rights common to the four varnas, e. g., of entry into temples, educational institutions, of use of public wells, ghats, tanks, rivers &c., should equally accrue to the untouchables so called. and it is wrong to deprive them of such common rights. This is provable from the texts, the fundamental principles and the spirit of the Dharma Shastras.

(Sd.) Swami Kevalanand (Narayan Shastri Marathe)

(Sd.) Laxman Shastri Joshi

(Sd.) Bhagwandas

(Sd) Anandshanker Dhruva

(SA) Indira Raman Sastri

[ Apart from these, valuable opinions have been received in support of temple entry from Mahamahopadhyaya Pramathanath Tarkabhushan, Pandit Shreedhar Shastri Pathak, Sree Krishna Tanasukh Misra, Sjt. C. V. Vaidya, and Shri Narasimhachar of Tirupati.[Ed. Harijan.]

❍❍❍

१०.

# आंतरजातीय विवाह : महात्मा गांधी पत्रे

## 204. LETTER TO NARANDAS GANDHI

POONA,
June 9, 1933

**CHI. NARANDAS,**

In his letter of yesterday, Mahadev did suggest an operation for Ramabehn. 1 learnt about the discussion with Dr. Patel only yesterday. Now get the operation done as soon as possible. I have already written to you about the question of your coming here.

Devdas's marriage is fixed for the 16th. It would perhaps be better if you come on a date later than that. The general rule that nobody need come from there to attend a wedding may as well be observed on this occasion. And so we may deliberately not let the saying 'accomplish two objects in one journey' apply in this case. This does seem a little unnatural, but perhaps it is more desirable.

For myself, I have been dissuading everyone from coming. Supposing Prabhudas's marriage takes place about the same time and in my presence, I would, if I could, stop even Chhaganlal and Kashi from coming to attend it. If we really believe that the marriage ceremony is a religious rite we cannot avoid having performed, there should be no need for anyone to come here. On such occasions, we should be quite content with the company of those in whose midst we happen to be at the time, and the presence of some others who can attend. It is from this point of view that it has been considered desirable to be content with [the services of] Lakshman Shastri [as priest] who is quite near Poona and without those of Panditji Combined with all these considerations, there is of course the desire to save expense. Though enjoying royal facilities myself,[2] I just cannot forget our poverty. Maybe these royal facilities are not unpleasing to me, but they are certainly not pleasing either. My

conscience bears witness to the fact that seen from the point of view of truth, they are more unpleasing than pleasing.

Before fixing the date of your coming here, I have indulged in all this philosophizing. About my health and my experiment regarding milk, either Mathuradas or Mahadev must have written to you.

BAPU

From the Gujarati original: S.N. 33500

❍❍❍

*1.With Lakshmi, daughter of C. Rajagopalachari*

*2. Gandhiji was at this time staying at Lady Premlila Thakersey's residence 'Parnakuti'.THE COLLECTED WORKS OF MAHATMA GANDHI, Vol - 61.*

*159-160*

# 214. SPEECH AT DEVDAS - LAXHAMI WEDDING[1]

June 16, 1933

You have just heard our familiar hymn of "The True Vaishnava". I hope you both will ponder over it, and try to live as the true Vaishnava described by the poet-saint Narasinh Mehta.

Devdas, you know my expectations about you. May you fulfil them, and I assure you that if you do so all the objections raised against the match will melt away. Since I reached the age of discretion, I have tried to understand the meaning of dharma and live up to it as best as I could. I do not think that in celebrating this marriage anything has been done against the dictates of dharma. Had it been so, you should not have had my blessings and presence at the ceremony.

You are taking upon yourself a grave responsibility, which is proportionate to the great good fortune that has fallen to your lot. Who knew that your wedding would take place under the roof of the pure-souled Lady Thackersey? Who knew that a man of great learning and spotless character like Lakshman Shastri would be found to act as priest? Perhaps, at some future and convenient date, the ceremony would have taken place at the Ashram. But the fast has brought this about. Let the fruit of what was an essentially religious act be also religious. Let the memory of it inspire you to take every step with a full sense of dharma. You know dharma is Truth, and if you keep it as your pole star, it is sure to protect you. What a piece of good fortune for you that you should have so many friends and elders to bless you on the occasion! May you prove worthy of all these blessings! You have today robbed Rajagopalachari of a cherished gem. May you be worthy of it! May you treasure it! She is real Lakshmi. Guard her, protect her as you would Lakshmi, the goddess of the good and beautiful. May you both live long and tread the path of dharma! May you live for dharma and have the courage to lay down your

lives, when the occasion comes, for dharma! Let your life from today be a further dedication to service of the country, and may you never give yourselves to idle pleasure. This is my blessing and my cherished hope and desire.

Devdas, you have always looked upon Rajagopalachari as a respected elder. From today, he is as good as your father. Tender to him the same loyalty and obedient devotion that you have been tendering to me.

To you, Lakshmi, I need not say much. I believe that Devdas will prove himself a worthy husband to you. Ever since I have seen and known you, I have felt that you have justified your name. Let your marriage strengthen, if possible, the bond of affection that has ever been growing between Rajagopalachari and me. I need not emphasize the unique auspices under which the wedding is being celebrated. It is essentially a religious thing, and may it prove to you both a means for the better performance of your duty! I should have had nothing to do with the marriage, had I not known it to be in consonance with religion, and the fruit of the pure tapasya undergone by both of you in order to gain our sanction and blessings, which you have now amply deserved[1].

It has been a great effort on my part to say these few words. But I thought it was essential for me to bless you, and warn you of the great responsibility you are taking upon yourselves. May God protect you! Only He protects, for He is the father, mother, and friend, everything rolled into one. Let your life be a dedication to the service of the motherland, and of humanity. May you both ever be humble, and may you both walk in fear of God always!

*The Hindu, 17-6-1933 also The Hindustan Times 17-6-1933*

(1. This appeared as reported by Mahadev Desai, who had stated "Gandhiji addressed a few words to the bride and bridegroom. He took over five minutes to gather sufficient strength to speak. The part addressed to Mr. Devdas was in Gujarati, and that addressed to the bride was in Hindi. I summarize the substance below." )

*(VOL. 61; 27 APRIL, 1933-7 OCTOBER, 1933, 167-168)*

❍❍❍

# 503. ADVICE TO A WORKER

[Before September 17, 1933]

Workers should be like Malaviyaji, like Narayanshastri[2], Lakshmanshastri[3], or Shridharshastri Pathak. They should be men whose character is as pure as gold. How can we find workers by publishing advertisements? Such people would memorize and reel off speeches. What use could they be to us? And, should we carry on with counterfeit coins because we cannot have mohurs? It is like building castles in the air. I do not approve of it all. I have never worked in this manner.

Now, how can I all of a sudden assure you that I am going to produce workers?

[From Gujarati]

*Harijanbandhu, 17-9-1933*

(This appeared under the title "Qualities of a Worker."[4] It had been suggested that some paid workers be sent for fighting untouchability through propaganda. Chandrashankar Shukla prefaced the report with the following. "Gandhiji expects the propagators to have certain qualification, such as religious knowledge and purity of character. He said, 'Propaganda cannot be a business. It should be a religious mission'. He disapproved of the proposal to have paid workers."

2. Narayanshastri Marathe, popularly known as Swami Kevalananda

3. Tarkateertha, Lakshmanshastri Joshi

4. This appeared under the title "Purity, a worker's Capital.")

*(VOL. 61: 27 APRIL, 1933-7 OCTOBER, 1933, PAGE - 407.)*

❍❍❍

११.

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# पत्रव्यवहार

**महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळ,**
सचिवालय, मुंबई १२,
७ एप्रिल १९६७.

*739/86/1

**माननीय श्री. यशवंतराव चव्हाण,**
गृहमंत्री, भारत सरकार,
रेस कोर्स १, नवी दिल्ली.

स. न. वि. वि.,

आपणास प्रत्यक्ष भेटीत विनंती केल्याप्रमाणे हे रीतसर निमंत्रण पत्राद्वारे देत आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या ललितकला समितीच्या वतीने महाराष्ट्रातील ललितकलांच्या क्षेत्रात काम करणाऱ्या खाजगी व सार्वजनिक संशोधक व्यक्ती व संस्था यांच्यामध्ये सहकार्य निर्माण करून या कलांतील संशोधनाला साहाय्य करावे असे ठरविले आहे. ललितकला समितीची निर्मिती नुकतीच सहा महिन्यांपूर्वी झाली आहे. एवढ्या अवधीत, नृत्य, चित्र, नाट्य, संगीत, इत्यादी ललितकलांच्या संशोधनाचे परिशीलन करून संबंधित व्यक्तीची व संस्थेची माहिती गोळा करण्याचे काम नावारूपास आणले आहे. विशेषत: तंजावर येथील भोसल्यांच्या संस्थानाने स्थापलेल्या सरस्वती महाल ग्रंथालयातील नाट्य व नृत्यविषयक ग्रंथाचे मूल्यमापन केले आहे. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीस झालेल्या श्रीमंत सरफोजी भोसले यांनी दक्षिण भारतातील ललितकलेचा पुनरुद्धार कसा केला याची माहिती मिळाली आहे. "भरतनाट्य" नावाने अलीकडे प्रसिद्ध पावलेले नृत्यप्रकार हा सरफोजी भोसल्यांनी भारतीय ललितकलेस दिलेली नृत्याची देणगी आहे असे आढळून आले आहे. महाराष्ट्रातील व भारतातील सुप्रसिद्ध गायकांच्या ध्वनीमुद्रिकांचाही संग्रह करण्याचे काम हाती घेतले आहे.

वरील सर्व प्रकारच्या संशोधनाच्या प्रगतीकरिता एक ललितकला संग्रहालय निर्माण करण्याचे ठरले आहे. त्याकरिता प्राथमिक तयारी म्हणून ललितकलाविषयक पुस्तके, छायाचित्रे, ध्वनिमुद्रिका, याचे संग्रहालय तयार करण्यात येत आहे. सध्या, काही काळ हे

संग्रहालय मुंबई मराठी साहित्य संघाच्या गिरगाव येथील इमारतीतील सुरू करण्याचे ठरले आहे. या संग्रहालयाचे उद्घाटन आपल्या शुभहस्ते व्हावे अशी ललितकला समितीच्या सदस्यांची उत्कट इच्छा आहे. तरी, आपण मे महिन्याच्या दिनांक १५ ते २१ च्या दरम्यान आपल्या सोयीचा दिवस कळवावा व आमच्या विनंतीस मान्यता देऊन उपकृत करावे.

कळावे.

आपला,

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळ

○○○

# GOVERNMENT OF MAHARASHTRA

Laxmanshastri Joshi, D..No. BLC.1076/1942,
Chairman. State Board for Literature & Culture,
Sachivalaya, Bombay-32,

739/64/1 Dated the 30th March, 1976.

**Dear Smt. Indiraji,**

You may be glad to know that the Maharashtra State Board for Literature & Culture, set up by the Government of Maharashtra in November 1960, has undertaken a manirold programme of literary activities for the development and modernisation of the Marathi language and literature. A concurrent objective underlying the programme is to reach the modern developing scientific knowledge to the common man in the regional language of the State. As a result, the Board has, so far, published over 115 books on various subjects and has aided the publication of 600 more, by voluntary agencies.

2. The Board's most important and prestigious literary project, however, is for compilation of a general encyclopaedia (i.e. the Vishwakosha) in Marathi, in 20 Volumes of 1000 pages each. The Vishwakosha has been planned, in general, on the lines of the Encyclopaedia Britannica and is being compiled under my chief Editorship. 1 am enclosing for your perusal and information a brief note, indicating the nature of the Vishwakosha project and its present progress.

3. From the accompanying note it can be seen that the Vishwakosha work is progressing well and that Volumes I to IV of the Vishwakosha will be ready for release by about the middle of May, 76. By my present letter, I invite you very cordially to inaugurate these 4 Vols. of the Vishwakosha and most sincerely hope that it will be possible for you to accept the invitation. I understand that the Chief Minister of the State,

Shri Shankarraoji chavan has also already addressed you separately, on this subject.

4. I wonder if you remember the occasion when the corner-stone of the Kevalanand Saraswati Smarak Mandir at Wai in Satara District---a memorial raised to my Guru---was laid by you on 10th October, 1959 when you were the President of the Indian National Congress.

Significantly enough, the Vishwakosha is being compiled on the premises of the Kevalanand Saraswati Smarak Mandir. Appropriately, it is also now proposed to inaugurate the first 4 vols. of the Vishwakusha at this venue. Kindly accept this invitation and indicate the date and time convenient to you.

with best regards,

Yours sincerely,
(Signature)
**Laxmanshastri Joshi**

To

**Sat. Indira Gandhi,**
Prime Minister of india,
Prime Minister's Secretariat,
NEW DELHI

❍❍❍

**A Brief Note about the nature and the progress of the Vishwakosha project of the Maharashtra State Board for literature and Culture**

The State Board for Literature and Culture has undertaken a manifold programme of literary activities for the development and modernization of Marathi literature. The state Board's most important and prestigious literary project is for the compilation of a general encyclopaedia in Marathi (1.e. the Vishwakosha). The idea in compiling the Vishwakosha was not merely a desire to match the publication performance of the west by attempting to bring out something voluminous and colourful. The plan behind the Vishwakosha compilation is more purposeful and in keeping with the dignity and prestige as also the intellectual and literary needs of a free people in the post-Independence India. The Vishwakosha idea originated in the Board's desire to modernize, develop and enrich the Marathi language and literature and simultaneously to open up new vistas of human knowledge to the Marathi reader, particularly in the context of the fast-developing dimensions and content of human knowledge in the scientific and technical field, during the past twenty years. The work is, no doubt, gigantic and required the willing assistance and co-operation of numerous and eminent writers in the various fields; but, during the process, it is also expected to bell substantially the Board's objective of cultivating the reading habits and broadening the intellectual perspective of the Marathi reader and simultaneously foster the growth of a class of professional writers, In the various fields but, during the process, It is also expected to help substantially the Board's objective of cultivating the reading habits and broadening the intellectual perapeotive or the Marathi reader and simultaneously roster the growth of a class of profensional writers, conscious of their duty to the society and capable and willing to write successfully on serious academic subjects In Marathi, with ease and grace.

2. The Vishwakosha is being compiled on the lines of the Encyclopaedia Britannica, in twenty volumes of 1000 pages each, of which the last three volumes will each comprise (a) maps, (b) two-way glossary of technical terms adopted for the Vishwakosha and (c) complete index of words. Each page of the Vishwakosha will contain an average number of 750 words and all volumes will also be suitably and adequately illustrated with diagrams, pictures, photographs, maps, charts, graphs etc. The total number of pages (i.e. 17,000) in the main volumes has been equally distributed between physical or natural sciences and technology, on the one hand and the humanities and social sciences on the other and the plan of presentation of the whole matter is such as would be most suitable and natural to the needs of an average enlightened Maharashtrian (i.e. with Maharashtra orientation). The Board has already published, in May 1965, a specimen volume of the Vishwakosha which presents, in miniature, the plan of the full-fledged Vishwakosha. The Board has also published, in September 1973, Vishwakosha Volume 18 (i.e. the Terminology Volume) which is basic to the understanding of the scheme of terminology adopted for the entire Vishwakosha.

3. The Vishwakosha compilation is being carried on at the Vishwakosha Unit, wai, under the supervision, guidance and direct control of Tarkateertha Shri Laxmanshastri Joshi, Chairman of the Board and Chief Editor for Vishwakosha Unit, Wai with the help of some editorial and administrative staff. For writing special articles and for other editorial jobs, the assistance of outside scholars, professors etc. is also secured on job-work basis, in the capacity of contributors, scrutiny editors and visiting editors. Thus, Nearly 2000 scholars in various subjects from all over Maharashtra and even outside it, are associated with this work in one way or the other.

4. Thus, by February, 1976 writing works running into 15,216 pages has been entrusted to scholars, written articles amounting to 13,234 pages have been received from them and, of these latter, 9,554 pages have been turned into a press-copy after editorial processing. Actually,

Vols.1,11,111 & IV of the Vishwakosha have been fully printed and will be ready for release by the middle of May, 1976 when the colour plates in Vol.I will have been printed by the Mouje Printing Bureau, Bombay. At present, the printing of Vol.V is also far advanced in the Government press at Wai. The remaining editorial/ printing work will be carried on during the Fifth-Five-Year- Plan period and will probably be over by the end of that period.

❍❍❍

रेसकोर्स रोड,
नवी दिल्ली
११० ०११
२४ एप्रिल, १९८३.

**प्रिय तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांसी**

स. न. वि. वि.,

तुमचे दिनांक २१ एप्रिलचे पत्र मिळाले. पंतप्रधान इंदिराजी यांच्या हस्ते मराठी विश्वकोशाच्या खंड ८ ते ११ चे विमोचन व्हावे ही कल्पना उत्तम आहे. पण अशा कार्यक्रमासाठी त्या बाहेर जातील असे वाटत नाही. हल्ली पुष्कळशा ग्रंथांचे विमोचन त्यांचे हस्ते दिल्लीतच होतात. विश्वकोशाचा हा कार्यक्रम या पद्धतीने करावयास काय हरकत आहे? आपण आपला विचार मला कळविल्यास मी पंतप्रधानांशी बोलेन. आपली ३० एप्रिल रोजी पुण्यास भेट होईलच.

कळावे.

आपला,
(स्वाक्षरी)
**यशवंतराव चव्हाण**

**लक्ष्मणशास्त्री जोशी**
मराठी विश्वकोश कार्यालय
वाई, सातारा.

ooo

739/66/1 12559

# महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ

**स्मरणार्थ**

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**
अध्यक्ष

दूरध्वनी क्र. २६, ५३,
मराठी विश्वकोश कार्यालय,
वाई ( जि. सातारा ).
पि. को. नं. ४१२ ८०३.

संदर्भ ४२४/७७-७८/ दिनांक : २२- ११- १९७७.

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण**

यांस- सप्रेम नमस्कार वि. वि.,

आपले दि. १३- १०- १९७७ चे पत्र पावले. मी १९ तारखेस आपणास मुंबईस भेटू इच्छित होतो; परंतु पुणे येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात कोशकारांचा सत्कार ठरला होता व त्यात माझे उत्तरादाखल भाषण ठरले होते. गेल्या २० वर्षांत मराठीत जेवढे कोशवाङ्मय निर्माण झाले त्यातील एक- दोन वगळता सगळेच साहित्य संस्कृती मंडळाकडून भरपूर अनुदान मिळून प्रकाशित होऊ शकले. कोशवाङ्मयाच्या विषयाची व्याप्ती त्यामुळेच खूप वाढली हे मला साहित्यिक व रसिक यांच्या मोठ्या सभेपुढे सांगणे प्राप्त होते. महाराष्ट्र शासनाचे साहित्य व संस्कृती मंडळ हे मराठी भाषा व साहित्य यांचे व्यापक अधिष्ठान निर्माण करीत आहे याची याप्रसंगी सुशिक्षित समाजास जाण देणे माझे कर्तव्य होते. माझ्या भाषणातील मुद्दे प्रेक्षकांना चांगले पटले असावे असे मला व्यासपीठावरील अनेक श्रोत्यांनी लक्षात आणून दिले. प्रस्तावकांनी प्रारंभी साहित्य संस्कृती मंडळाच्या या कामगिरीचा आवर्जून उल्लेख केला; परंतु तो फार अपुरा होता. साठी ओलांडलेले व ८५ पर्यंत पोहोलेले अनेक नामवंत कोशकार या सत्कारातून वगळले, हेही मी माझ्या भाषणात सौम्य भाषेत विशद करून कोशवाङ्मयाचे साहित्य क्षेत्रातील स्थान स्पष्ट करून सांगितले.

आपणास मी गेल्या महिन्यात पत्र लिहून साहित्य संस्कृती मंडळाच्या मराठी वाङ्मयकोशाच्या चार खडांपैकी पहिल्या खंडाचे प्रकाशन आपल्या हस्ते व्हावे म्हणून

समारंभाचा दिनांक कळवावा अशी विनंती केली होती. या संदर्भात मी आपल्या उत्तराची वाट पाहत आहे. हा समारंभ मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या सभागृहात व्हावयाचा आहे. तरी जरूर सवड काढावी.

राजकारणात आपली पावले धिटाईने व धिम्मेपणाने पडत आहेत हे दिसते; परंतु अंतर्गत संकट टळेल असे वाटत नाही .

कळावे.

आपला स्नेहांकित,

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

**माननीय श्री. यशवंतराव चव्हाण,**
१, रेसकोर्स रोड,
नवी दिल्ली

ooo

# महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** — दूरध्वनी क्र. २६, ५३
अध्यक्ष — मराठी विश्वकोश कार्यालय,
वाई. (जि. सातारा)
पि को नं. ४१२ ८०३

संदर्भ क्र. शासन - १०७८-५६५८ — दिनाक २०.१२.१९७८.

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण,**

यांना - सप्रेम नमस्कार.

मी दिनांक १६.१२.७८ ला दुपारी मुंबईहून आपणाशी फोनवर बोललो. त्यावेळी ब्रह्मीभूत स्वामी केवलानंद सरस्वती यांचा जन्मशताब्दीचा सोहळा, धर्मकोशाच्या एका खंडाचे प्रकाशन व साहित्य संस्कृती मंडळच्या मराठी वाङ्मय कोशाच्या पहिल्या खंडाचे व मंडळाच्या अन्य ग्रंथाचे प्रकाशन जानेवारी, १९७९ च्या शेवटीच्या सप्ताहात माननीय खासदार डॉ. करणसिंग व आपणास जो दिवस वाईस येण्यास सोयीचा असेल तो निश्चित करावा अशी विनंती केली होती. मी फोनवर सांगितल्याप्रमाणे डॉ. करणसिंग यांना माझे रीतसर निमंत्रण पत्र रवाना केले आहे. त्याची प्रत आपल्या अवलोकनासाठी सोबत पाठविली आहे. कृपया आपण यासंबंधी लवकर निर्णय घेऊन मला कळविल्यास फार बरे होईल. मी दिनांक २५ ते ३० डिसेंबर, १९७८ च्या आपल्या महाराष्ट्र भेटीत गाठ घेण्याचा प्रयत्न करीत आहेच.

कळावे.

आपला स्नेहांकित,
(स्वाक्षरी)
**लक्ष्मणशास्त्री जोशी**

प्रति:

**माननीय खा. श्री. यशवंतराव चव्हाण,**
नवी दिल्ली - ११० ०२१.

# महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ

739/70/1

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**
अध्यक्ष

दूरध्वनी क्र. २६, ५३
मराठी विश्वकोश कार्यालय,
वाई. (जि. सातारा).
पि को नं. ४१२ ८०३.

संदर्भ क्र. सासंमं - १०७९-११७४.

दिनांक : ४ मार्च, १९७९.

**माननीय प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण,**

यांना- सप्रेम नमस्कार वि.वि.

प्राज्ञपाठशाळा मंडळाचे आद्य संस्थापक ब्रह्मीभूत स्वामी केवलानंद सरस्वती यांच्या जन्मशताब्दी निमिताने वाई येथे एक समारंभ व्हावा म्हणून मी आपणाशी बोललो होतो. आपल्या चर्चेनुसार प्रथम माननीय खासदार डॉ. करणसिंग व त्यानंतर माननीय उपराष्ट्रपती श्री. जत्ती यांना निमंत्रण केले; परंतु समारंभाकरिता वाईस येण्यास सवड होऊ शकणार नाही अशा आशयाची त्यांची पत्रे आली.

साहित्य अकादमी डॉ. उमाशंकर जोशी यांना मी निमंत्रण पाठविले होते. त्यांनी शनिवार, ३१ मार्च, ही तारीख वाईस येण्यास सोयीची असल्याचे कळविले आहे. म्हणून मी आजच आपण शनिवार, दिनांक ३१ मार्च, १९७९ वाईस समारंभास अवश्य उपस्थित राहावे याकरिता तार केली आहे. ती मिळाली असेलच. तरी हा दिवस वाईकरिता मोकळा ठेवावा, ही विनंती. मी जी कामे करीत आहे त्याचे सर्व श्रेय आपणासच आहे, हे यासंदर्भात ध्यानात असावे.

दिनांक ३१ मार्च, १९७९ चा कार्यक्रम स्थूलमानाने पुढीलप्रमाणे-

१) केवलानंद सरस्वती जन्मशताब्दी समारंभ व 'नवभारत' मासिकेच्या खास विशेषांकाचे प्रकाशन.

२) 'धर्मकोश' राजनीतीकाण्ड भाग ५ चे प्रकाशन.

३) महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या ग्रंथाचे विमोचन त्यात मराठी विश्वकोश खंड ६, ७ व ८ हे अंतर्भूत आहेत.

४) महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या विद्यमाने चालू असलेल्या वाङ्मयकोश खंड १ चे प्रकाशन.

मी माननीय मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनाही तार केली असून शनिवार दिनांक ३१ मार्च, १९७९ हा दिवस वाईस येण्यास मोकळा ठेवावा असे कळविले आहे.

कळावे

आपला स्नेहांकित,

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

प्रति:

**माननीय खा. श्री. यशवंतराव चव्हाण,**

रेसकोर्स रोड,

नवी दिल्ली - ११.

ooo

# महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** दूरध्वनी क्र.२६,५३
अध्यक्ष मराठी विश्वकोश कार्यालय ,
वाई (जि. सातारा).
पि. को. नं. ४१२ ८०३.

संदर्भ क्र. सासभ - १०७९-१४७१ दिनांक: २४ मार्च, ७९.

**माननीय प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण,**

यांना- सप्रेम नमस्कार वि.वि.,

प्राज्ञपाठशाळा मंडळ वाई या संस्थेचे अध्याय संस्थापक ब्रह्मीभूत स्वामी केवलानंद सरस्वती यांच्या जन्मशताब्दी समारंभ शनिवार, दिनांक ३१ मार्च, १९७९ रोजी वाई येथे आयोजित करण्यात आला होता; परंतु लोकनायक श्री. जयप्रकाश नारायण यांच्या गंभीर अस्वस्थ्यामुळे हा समारंभ पुढे ढकलण्यात येत आहे. या समारंभाची तारीख आपल्या सोयीनुसार ठरवली जाईल.

कळावे.

आपला स्नेहांकित,
(स्वाक्षरी)
**(लक्ष्मणशास्त्री जोशी)**

प्रति

**मा. खा. श्री. यशवंतराव चव्हाण,**
१ रेसाकोर्स रोड,
नवी दिल्ली - ११.

ooo

१२.

## महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई

# पत्रव्यवहार

अ.

# मराठी विश्वकोश परिचय ग्रंथ : पत्रव्यवहार (अभिप्राय, टीका, प्रतिटीका इ.)

**प्रति,**

माननीय प्रमुख संपादक, विश्वकोश,

विश्वकोश कार्यालय, वाई.

**सप्रेम नमस्कार,**

आपण मोठ्या प्रेमाने पाठविलेला विश्वकोश परिचयग्रंथ मिळाला. त्याबद्दलची पोच सोबत पाठवत आहे.

खरोखरच आपण एक थोर; पण अतिशय आवश्यक असे सामाजिक कार्य अंगीकारले आहे यात शंका नाही. परिचयग्रंथावरून या विशाल कार्याची व्यापकता लक्षात येते व हे काम किती दुर्घट, जिकिरीचे व चिकाटीचे आहे याची पुरेपूर कल्पना येते. निरनिराळी शास्त्रे व कला एकमेकात मिसळलेली असल्याकारणाने, कोशरचना काटेकोरपणे विषयवार होऊ शकणार नाही हे सत्य आपण सुरूवातीलाच सांगून टाकलेत हे बरे झाले असे वाटते. कोणीही सुविद्य मनुष्य त्याबद्दल आपल्याला दोष देणार नाही. आपण विषयवार मांडणी कौशल्याने केली आहे व नमुन्याच्या नोंदी कोशाच्या अंतरंगाची चांगली कल्पना देतात.

कोशाबद्दल उलटसुलट बरीच चर्चा वर्तमानपत्रामध्ये मी वाचली आहे. मी एवढेच लिहू इच्छितो की हा कोश म्हणजे मराठी भाषेला मिळालेला एक बहुमोल अलंकारच ठरणार आहे व सुविद्य मराठी माणसाचा तो एक जीवश्च- कंठश्च मित्र ठरणार आहे.

पुन्हा एकदा आपले आभार मानून पत्र संपवतो.

आपला,

**अ. शा. देशपांडे**

ooo

# अभिप्राय

नवी दिल्ली
दिनांक २५ एप्रिल १९६५

**स. न. वि. वि.,**

आपले दिनांक १९ एप्रिलचे पत्र मिळाले. माझा कार्यक्रम शेवटच्या क्षणी रद्द झाल्यामुळे आपली मी फारच गैरसोय केली. परंतु माझा उपाय नव्हता. आपण पाठविलेला विश्वकोश परिचयग्रंथ मिळाला. हा ग्रंथ पाहून किती महत्त्वाचे, गुंतागुंतीचे व जबाबदारीचे कार्य आपण स्वीकारले आहे याची जाणीव झाली. शेकडो लोकांचे परिश्रम व सहकार्य यांचे संयोजन करण्यावरच या योजनेचे यश अवलंबून आहे याची जाणीव अधिक तीव्रतेने झाली.

मी आता त्या बाजूला केव्हा येऊ शकेन हे जरूर कळवीन.

कळावे.

आपला,
**यशवंतराव चव्हाण**

ooo

दि. ५-७-१९६५

## विश्वकोश व परिचयग्रंथातील नमुनेदार नोंदी

ले. दि. के. जोशी

महाराष्ट्र राज्याने संकल्पिलेला १९,००० पृष्ठांचा विश्वकोश वाई येथे जानेवारी १९६२ पासून रचिला जात आहे. त्याचे स्वरूप दर्शविणारा १२१ पृष्ठांचा हा परिचय ग्रंथ १५ एप्रिल ६५ रोजी तर्कतीर्थ जोशी यांनी प्रसिद्ध केला आहे. सुंदर डिझानचे वेष्टण, उत्कृष्ट बांधणी आणि 'मौज' मुद्रणालयाने केलेली उत्तम कागदावरील सुंदर छपाई यामुळे या ग्रंथाचे बाह्यांग कोणाचेही मन वेधून घेईल. विश्वकोशाच्या छपाईसाठी वाईस खास मुद्रणालय काढले जाणार आहे. त्यात बाह्यांगाच्या सौंदर्याचा हा दर्जा ठेवता येईल काय ? असाही विचार मनात येतो.

'विश्वकोशाचे स्वरूप' ही २८ पृष्ठांची प्रस्तावना आणि 'नमुन्याच्या नोंदी' हा ६३ पृष्ठांचा मुख्य भाग हे ग्रंथाचे अंतरंग. याकडे लक्ष दिले म्हणजे संपादकीय धोरण व संपादनाचा दर्जा याबद्दल अनेक प्रश्न मनात उभे राहतात. शब्दकोश रचण्याचे तंत्र वेगळे, धर्मकोशासारखा एका क्षेत्रातील संज्ञाचा कोश रचण्याचे कौशल्य वेगळे आणि सर्वविषयसंग्राहक विश्वकोश रचणे वेगळे. या विशिष्ट कोशाच्या रचनेसाठी केवळ द्रव्यबळ भरपूर असून भागत नाही. कोशाच्या कार्यालयात अनुभवी संपादकाचा बराच मोठा संच निष्ठेने काम करीत राहील व बाहेरच्या विद्वत्संस्थांशी व विद्वानांशी त्याचा प्रत्यक्ष संबंध राहील, तरच विश्वकोशाचे संपादन निर्दोष होऊ शकेल. प्रूफे तपासण्यातील काटेकोरपणापासून नोंदीतील बिनचूकपणापर्यंत सर्वच बाबतीत एक किमान दर्जा संभाळला गेला नाही तर विश्वकोशासारखा सदर्भग्रंथ हा उपयुक्त ठरण्याऐवजी घातक ठरेल. हा दर्जा संभाळला जाईल की नाही अशी शंका 'परिचय-ग्रंथ' पाहून येते. ती साधार कशी आहे ते आता पाहू.

### प्रस्तावनेत केतकर यांचा अनुल्लेख :

कक्षावार, विभागवार, विषयवार आणि पोटविषयवार वाटणी करून विविध शास्त्रांची माहिती कशी दिली आहे, याचा तपशील प्रस्तावनेच्या सुमारे १६ पानांत विखरून दिलेला आहे. उरलेली १२ पाने तर्कतीर्थ जोशी यांनी केलेले विवेचन आहे. मानव्यविद्या आणि निसर्ग-विज्ञान यांची कक्षावार, विभागवार व विषयवार वाटणी प्रा. क. वा. केळकर, प्रा. शं. गो. जोशी व प्रा. दि. के. बेडेकर या तिघांनी ऑगस्ट १९६२ मध्येच पुरी केली होती. पोटविषयवार वाटणी त्या वर्षीच्या डिसेंबरपर्यंत तयार झाली. तेव्हाच ती लोकांच्या सूचनांसाठी प्रसिद्ध केली असती तर जास्त उपयुक्त ठरले असते. वाटणीसंबंधीची १६ पाने

एकत्र दिलेली नाहीत. मध्ये मध्ये विवेचन येते व सम्यक व्यूह नीट उमगत नाही. विवेचनातही त्यामुळे पुष्कळच द्विरुक्ती व पाल्हाळ झाला आहे.

प्रस्तावनेत पृष्ठ १ वर आणि ३ वर, पूर्वीच्या मराठी कोशांबद्दल तर्कतीर्थांनी काही म्हटले आहे : 'कित्येक विद्वानांनी' या स्वरूपाची 'काही कामे' केली आहेत असे म्हणताना कटाक्षाने डॉ. केतकर व त्यांचा ज्ञानकोश यांचा उल्लेख त्यांनी टाळला आहे. या अनुल्लेखाने डॉ. केतकरांच्या मोठेपणाला धक्का लागत नाही. विश्वकोशाच्या 'महान् कार्या' ची जबाबदारी पेलणाऱ्याचे मन लहान आहे, एवढेच त्यामुळे दिसते.

प्रस्तावनेत, आधीच्या दीड पानी निवेदनात आणि नंतरच्या नोंदीतून पानापानांवर प्रूफांच्या चुका आहेत, शब्दांच्या व वाक्यरचनेच्या चुका आहेत व अनेक इतर दोष आहेत. काही ठळक उदाहरणे अशी : (१) 'मानव्यविद्या' आणि 'विज्ञान व तंत्रविद्या' अशा दोन कक्षा कोशात आहेत; पण पृ. ५ वर 'तंत्र', पृ. २३ वर 'तंत्रविद्या' असे वेगवेगळे शब्द योजिले आहेत. पृ. ९९ वर 'तंत्र' म्हणजे सिस्टिम व टेकनिक असे दोन अर्थ आहेत. निवेदनात नोंद ( एन्ट्री) या शब्दाऐवजी 'शीर्षक' हा शब्द आहे, तर पृ. ११५ वर 'ज्या संज्ञानी नोंदी झाल्या आहेत' असे विधान आहे. अनुक्रमणिकेत जिला सूची म्हटले आहे तिलाच ११५ वर 'शब्दसूची' म्हटले आहे. शब्दसूची म्हणणे चूकच आहे. पृष्ठ ४३ वर 'ग्लॅडिएटर' ही नोंद घेतली तर पहिल्याच तीन वाक्यात 'ग्लॅडिएटर' हे 'योद्धे' आहेत, 'सामने' आहेत व 'खेळ' ही आहेत. पृ. २५ वर तंत्रविद्या (टेक्नॉलजी) व अभियांत्रिकी (इंजिनिअरिंग) यांचे नेमके विभक्त स्वरूप सांगणे कठीण आहे' हे विधान करून 'तरी कित्येकांनी अभियांत्रिकी व तंत्रविद्या असा स्पष्ट भेद केलेला आढळतो' असे तर्कतीर्थांनी म्हटलेले आहे. येथे शब्दांचा गोंधळ नसून कल्पनांचा गोंधळ व निष्कारण पाल्हाळ आहे. दुसऱ्या काही चुका : फिनलंडवरील नोंद कार्यालयात लिहिली गेली; परंतु निवेदनात तर्कतीर्थ सांगतात, 'फिनलंडसंबंधीची नोंद व नकाशा' याचा संपूर्ण हक्क फिनिश दूतावासाने आम्हाला दिला. तसेच वर्णक्रमाबद्दल पृ. ३० वर सांगताना अक्षरे देऊनच 'औ' नंतर अनुस्वार घातला आहे. हा क्रम मराठी वाचकांना परिचित आहे व ग्रंथसूचिकार दाते यांनी सूचीत तोच स्वीकारला आहे; पण येथे पाहावे तर 'हंगेरीतील उठाव' या नोंदीनंतर 'हिमरू विणकाम' इत्यादी नोंदी येतात व सूचीतही अनुस्वार 'अ' च्या आधी येतो.

## नोंदींचे सदोष संपादन :

नमुन्याच्या नोंदी हा ग्रंथाचा मुख्य भाग. यातील नोंदी महाराष्ट्राला परिचित अशा तज्ज्ञ विद्वानांनी लिहिलेल्या आहेत. कोशरचनेत अनुभव असा येतो की, नोंदी लिहिण्याचे तंत्र तज्ज्ञांना साधतेच असे नाही. त्यांनी लिहिलेल्या मजकुराला नोंदीचा विशिष्ट आकार देणे, पूरक संदर्भाची व संदर्भ ग्रंथांची जोड देणे वगैरे कामे कार्यालयीन संपादकांना लेखकाशी सहकार्य करून करावी लागतात. असे सहकार्य सहज मिळतेही; पण त्यासाठी स्थायी

संपादकामध्ये नि:स्पृहता, नम्रता व साक्षेपीपणा असावा लागतो. काही गोष्टी कार्यालयातच संभाळाव्या लागतात. उदाहरणार्थ, चरित्रनोंदीमध्ये नावानंतर कंसात जन्ममृत्यूचे सन देणे, ही एक शिस्त आहे. एकंदर ८ अशा नोंदीपैकी २ नोंदीत ही शिस्त पाळलेली नाही. पूरक नोंदींचे संदर्भ देण्याबाबत हेच आहे. हूण ही महामहोपाध्याय वा. वी. मिराशी यांची नोंद घ्या. 'शक' व 'कुशाण' या नोंदीचा येथे पूरक नोंदी म्हणून उल्लेख हवाच होता. तो नसण्याचा दोष लेखकापेक्षा संपादकावरच येतो.

'नमुन्याच्या नोंदींपैकी दोन टळक, दीर्घ नोंदी घेऊन त्याचा आता विचार करू. विज्ञानकक्षेतील 'वय:स्थापन' आणि मानव्यविद्येच्या कक्षेतील 'ख्यातिवाद' या नोंदींपैकी पहिलीचे संपादन व दुसरीचे लेखन तर्कतीर्थांनी केलेले आहे. नोंदीच्या योग्य संपादनाबद्दलच्या कल्पना व त्यांची अंमलबजावणी याबाबतीत कशी झालेली आहे, ते पाहिले म्हणजे एकंदर कार्यालयीन संपादनाचे मार्गदर्शन कसे होत आहे, हे कळेल.

### वय:स्थापन :

ही नोंद श्री. वेणीमाधवशास्त्री यांनी लिहिलेली आहे. तिला पुरी ४ पृष्ठे दिलेली आहेत. 'वय: स्थापन' ही आयुर्वेदातील एक संज्ञा आहे व वय म्हणजे तारुण्य व त्याचे वर्धन व रक्षण या अर्थाने ती योजिली जाते. सामान्य वाचकाला ती अपरिचित आहेच; पण वैद्यांनाही ती परिचित असली तरी एक महत्त्वाचा विषय म्हणून वाटणारी नाही. वाग्भटाच्या 'अष्टांगहृदयात' 'रसायनविधी' हा ३९ वा अध्याय आहे. त्यात 'कुटीप्रवेश' आणि 'वातातपसहा' असे दोन 'विधी' सांगितलेले आहेत. दुसऱ्या विधीत 'वयःस्थापकाः शीतोदकादि योगाः' असा भाग असून श्लोक १४५ मध्ये ' स्थापयेत वयः असा उल्लेख आहे. दुसरा उल्लेख 'वाजीकरणाच्या' अध्याय ३० मध्ये 'अग्र्यसंग्रह' या शीर्षकाखाली 'वयसः स्थापने धात्री' (श्लोक ५८) असा आहे. धात्री (आवळकाठी) हे औषध तारुण्यवर्धक आहे एवढाच हा संदर्भ. चरकांनी व सुश्रुतांनी 'वयःस्थापने'ला स्वतंत्र विषयाचे महत्त्व दिलेले नाही. तेव्हा, 'वयःस्थापन' हा नोंदीचा विषय होऊ शकतो काय ? हाच मुळात प्रश्न आहे. या नोंदीत 'रसायन' 'कुटी प्रवेश' आणि 'वाजीकरण' यांचाही समावेश लेखकाने केला आहे. विशिष्ट आयुर्वेदीय संज्ञेला स्वतःचा असा व्यापक अर्थ देणे, स्वतंत्र प्रबंधात बसू शकले तरी ते संदर्भग्रंथाच्या रचना तत्त्वात मुळीच बसणारे नाही; पण लेखकाने ही 'व्यापक' भूमिका घेऊन म्हटले आहे की, 'प्रकृतिस्थापन हे एक प्रकारचे वयःस्थापनच होय.' त्रिदोष पद्धतीप्रमाणे वातकफपित्ताची समानता ही प्रकृती किंवा आरोग्य आणि वैषम्य हीच विकृती किंवा रोगाची अवस्था. 'प्रकृतिस्थापना' याचा अर्थ आरोग्याची स्थापना. आता ही व्यापक कल्पना म्हणजे 'एक प्रकारचे वय: स्थापन कसे ठरेल? हे सारे आयुर्वेदीय सिद्धांताशी विसंगत आहेच आणि 'सस्तन' प्राणी हे 'एकप्रकारचे कुत्रे' आहेत अशा प्रकारचे भ्रामक तर्कशास्त्र आहे.

या नोंदीमध्ये, ‘धातूंच्या परिपोषणाच्या आवर्तना’ चा सिद्धान्त आहे. ‘ मानव हा मुख्यतः बीजे खाणारा आहे. म्हणून त्याची विषयवासना फार उद्दीपित असते’ अशी मौलिक विधाने आहेत आणि ‘प्रकृतिस्थापन ही तृष्णात्यागाची पहिली पायरी तर वय : स्थापन ही तिच्या वरची पायरी’ असे ‘मोक्षदायक’ अध्यात्मही आहे; परंतु एवढ्याने ही नोंद चार पृष्ठाची जागा व्यापू शकली नसती. जागा व्यापणारा मजकूर म्हणजे लेखकाचे प्रवचन, पाल्हाळ व काही आवडत्या ‘कृण्वन्तो विश्वमार्यम्’ यासारख्या घोषवाक्याचा पसारा आहे.

“तारुण्याने मुसमुसलेले पुरुष व स्त्रीशरीर हे दृष्टीच्या आकर्षणाचा विषय होत असतो” असली आकर्षक निरीक्षणे आहेत !

नोंदीतील मजकूर (४० रुपये पृष्ठाप्रमाणे) ‘सार्थ’ असतो. हे लक्षात घेता नोंदीची अनावश्यक दीर्घता गैर ठरते, हे सांगायला नकोच.

नोंदीच्या शेवटी संदर्भाच्या नोंदीत ‘दोषदृष्य’ नावाची नोंद आहे. ही नोंद येणार आहेसे मानायला हवे ! संदर्भग्रंथ म्हणजे तीन वैद्यकग्रंथ आहेत. ‘चरकसंहिता’ वाचकाने पाहावयाची, ‘सुश्रुत’ पाहावयाचा ! यात ‘वयःस्थापने’बद्दल नेमके कोठे आहे याचा पत्ता वाचकाने स्वतःच शोधावयाचा ! आश्चर्य असे वाटते की ही नोंद स्वतः तर्कतीर्थांनी मोठ्या कसोशीने सुधारून दिली व मग मुद्रणाला गेली.

दुसरी नोंद स्वतः तर्कतीर्थांचीच आहे व तिची मीमांसा वाचून कळेल की ‘वयःस्थापना’च्या संपादनाबद्दल आश्चर्य वाटणेच चूक होते.

## ‘ख्यातिवाद’ नोंदीची मीमांसा :

‘ख्यातिवाद’ ही नोंद आता विचारासाठी घेऊ. दुरून शिंपला चकाकतो व पाहणाराला तो चांदीचा तुकडा वाटतो; दोरी समोर पडलेली असता साप आहे असा भास किंवा भ्रम होतो. अशा भ्रमाची कारणे शोधून त्यावरून ज्ञानाबद्दल मीमांसा करण्याची पद्धती भारतीय तत्त्वज्ञांनी स्वीकारलेली आहे. भ्रमाच्या भिन्न उपपत्ती वेगवेगळया दर्शनातून सांगितलेल्या आहेत. या उपपत्तींना ‘ख्यातिवाद’ असे म्हणतात. ज्ञानमीमांसेची ही एक पद्धती आहे, तत्त्वज्ञानाचा हा विषय आहे त्यामुळे सामान्य वाचकाला अपरिचित व अवघड वाटणारा आहे. म्हणून यावरील नोंद लिहिताना चूक विधाने केली तर वाचकांना चूक न उमगण्याने त्यांची दिशाभूल होईल; संदिग्ध विधाने त्यांना गोंधळात पाडतील आणि शब्दपांडित्याने ते भारावून जातील; हे सारे ओळखून लेखकाने सावधपणे लिहिणे जरूर आहे.

अशा महत्त्वाच्या नोंदीचे लेखन तर्कतीर्थ जोशी यांनी स्वतःच केलेले आहे. त्यामुळे तिच्याविषयी ज्या अपेक्षा निर्माण होतात त्या पुऱ्या होतात काय ? हा प्रश्न आहे. खेदाची गोष्ट अशी की, ती नोंद सर्वच दृष्टींनी कसोटीला न उतरणारी आहे. नोंदीचा विषय आटोपशीरपणे मांडावयास पुरेशी, किंबहुना जास्तच जागा तिला देण्यात आली आहे. सदोषपणा आहे तो जागेच्या अभावामुळे नसून भोंगळ मांडणीमुळे आहे. भाषेच्या व इतर किरकोळ चुका

बाजूला ठेवून फक्त तात्त्विक दोषांचाच येथे विचार करू.

नोंदीमध्ये सहा उपपत्तींची चर्चा आहे. ती सुरू करण्यापूर्वीचे प्रास्ताविक वाचून, भ्रमाचे प्रास्ताविक वाचून, भ्रमाचे विश्लेषण, ज्ञानमीमांसेचीच पद्धती म्हणून कसे व का केले जाते हे नीट स्पष्ट होत नाही. भ्रमाचे विश्लेषण करून व ज्ञानाचे स्वरूप सांगून, दृश्य व दृश्यामागील सद्वस्तू यांच्या स्वरूपांचे जे विवेचन आपल्याला अभिप्रेत असते ते विशद करण्याचा दार्शनिकांचा प्रयत्न असतो. तोही येथे ठळकपणे स्पष्ट होत नाही. पातंजल योगसूत्रात 'विवेक ख्याती' ही संज्ञा भेदाचे ज्ञान या अर्थी आली आहे; पण पुढे 'ख्याती' या संज्ञेला 'भ्रमात्मक ज्ञान' असा 'संकुचित अर्थ' दिला गेला, असे लेखक म्हणतात. वस्तुतः असा संकोच झालेला नसून, भ्रमकारक परिस्थितीच्या विश्लेषणाने भ्रम व 'ज्ञान' यांच्यातील विवेकाची मीमांसा करणे यासच 'ख्यातिवाद' म्हटले गेले आहे. ख्यातिवाद ही उद्दिष्टांच्या दृष्टीने ज्ञानमीमांसाच असते व केवळ प्रमाणमीमांसेशी तिचे समीकरण करता येत नाही. तर्कतीर्थांनी समीकरण केले आहे. याचे कारण त्यांच्या मनात याविषयी संदिग्धता दिसते. असे म्हणण्याचे कारण प्रास्ताविकात ते म्हणतात, "यासच ज्ञानमीमांसा किंवा प्रमाणमीमांसा म्हणतात."

'प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, शब्द' इत्यादींना 'प्रमाणे' म्हणतात. कोणती 'प्रमाणे' प्रमेला (किंवा ज्ञानाला) उपयोगी पडतात, त्यांचे तुलनात्मक बलाबल काय, सत्यासत्याच्या निर्णयाला कसोटी म्हणून ती कशी वापरता येतात, यांविषयी दार्शनिकात मतभेद आहेत व चर्चा होते. तिला प्रमाणमीमांसा म्हणतात. ज्ञानमीमांसेच्या व्यापक विषयाचा ही मीमांसा फक्त एक अंश आहे; पण तर्कतीर्थांनी ज्ञानमीमांसा व प्रमाणमीमांसा यांचे समीकरण मांडले आहे. व हे अशास्त्रीय आहे. पारंपारिक पद्धतीने शिकवलेल्या पंडिताकडून तर ही चूक आश्चर्यकारक मानावी लागेल. भ्रमकारक ज्ञानस्थितीचे विश्लेषण करणे हा ख्यातिवाद, तो ज्ञानमीमांसेचा भाग आहे; पण प्रमाणमीमांसेशी त्याचा तसा संबंधही नाही.

ख्यातिवादाची चर्चा 'प्रथम' माध्यमिक नावाच्या बौद्ध दार्शनिकांनी केली, असे तर्कतीर्थांनी म्हटले आहे; पण असे सांगण्यापूर्वी हे मांडणे इष्ट होते की उपनिषदातून 'अविद्या' आणि 'माया' या कल्पना आहेत. दृश्य गोष्टींमुळे झाकलेली सद्वस्तू किंवा परतत्त्व पूर्वीच सांगितलेले आहे. ही प्राचीन पार्श्वभूमी होती व म्हणूनच ज्ञानमीमांसेत भ्रमाच्या विश्लेषणाला नंतरच्या काळात एवढे महत्त्व आले. सामान्य वाचकाला ही पार्श्वभूमी सांगणे आवश्यक होते. कारण त्याशिवाय ख्यातिवादाचे एकंदर भारतीय विचारविकासातील स्थान त्याला उमगणे दुरापास्त होते. भ्रमाची पंडिती चर्चा दार्शनिकांनी उगीच केलेली नाही हे अशा पार्श्वभूमीच्या आधारानेच उमगणारे आहे. तर्कतीर्थांनी या महत्त्वाच्या गोष्टीकडे दुर्लक्ष केले आहे किंवा ती पार्श्वभूमी त्यांनाच नीट जाणवली नसावी.

## असत्ख्यातिवादाची सदोष मांडणी :

प्रथमच माध्यमिक शून्यवादी बौद्धांचा असतख्यातिवाद त्यांनी मांडला आहे. शून्यवादी सर्व विषय शून्य मानतात, क्षणिक मानतात. भ्रम उत्पन्न करणारे तेवढेच विषय असत् व बाकीचे सत् असे त्यांचे मत नाही; पण तर्कतीर्थ म्हणतात, शून्यवाद्यांना भ्रमातील विषय असत् किंवा शून्य असतात. पुढील परिच्छेदात, भ्रम व यथार्थ ज्ञान यांच्यातील फरक दाखविणारी कसोटी तर्कतीर्थांनी सांगितली आहे. चांदी म्हणून शिंपला उचलला तर चांदी घेण्याचा प्रयत्न विफल होतो व चांदीचा भास (भ्रम) झाल्याचे कळते; पण समजा खरा चांदीचाच तुकडा आहे, तर तो चांदी म्हणून उचलणाऱ्याचा प्रयत्न सफल होतो. प्रयत्नाला 'प्रवृत्ती' म्हणतात. सफल प्रवृत्तीमुळे यथार्थ ज्ञान व विफल प्रवृत्तीमुळे भ्रम झाला असे कळते. हे सारे वाचताना वाचकाच्या मनात असत्ख्यातिवादाची जिज्ञासा असते. वाचताना त्याला असे वाटते की, सफल प्रवृत्तीने उमगलेल्या ज्ञानाचा विषय सत् असतो व फक्त भ्रमाचा विषय शून्य असतो, असे शून्यवाद्यांचे म्हणणे आहे. तर्कतीर्थांच्या मांडणीमुळे वाचकाचा असा समज होणारच. तो दुर्दैवाने भ्रामक आहे. "असत्ख्यातिवादाचा विस्तार करून शून्यवादाची उपपत्ती माध्यमिक बौद्धांनी लावली" या तर्कतीर्थांच्या पुढील वाक्याला खरा अर्थच नाही. तर्कतीर्थांनी मांडलेल्या 'असत्ख्यातिवादाचा' कितीही विस्तार केला तरी शून्यवादाचा सिद्धान्त मांडणे अशक्य आहे; पण सामान्य वाचक अशा विधानांनी भांबावून किंवा भारावून जाईल. दुसरे तो काय करणार ?

## योगाचारांवर अत्याचार :

'योगाचार' मताच्या बौद्धांनी 'आत्मख्यातिवाद' मांडलेला आहे. त्यांना शून्यवादी बौद्धांप्रमाणेच ज्ञानाचा आणि भ्रमाचा असे दोन्ही विषय असत् वाटतात; इतकेच नव्हे तर बाह्य असा कोणताही विषय नसून सर्व 'विज्ञान' आहे असे ते मानतात. 'विज्ञान' म्हणजे सायन्स हा आजचा अर्थ झाला. योगाचारांचे 'विज्ञान' म्हणजे 'वृक्षाचे' ज्ञान, 'हत्तीचे' ज्ञान अशी ज्ञाने ही ज्ञाने किंवा वेगवेगळ्या जाणिवा एखाद्या 'आत्म्या' च्या जाणिवा आहेत असे ते मानीत नाहीत, कारण ते 'आत्मा' मानीत नाहीत. 'वृक्ष, 'हत्ती' इत्यादी बाह्य विषयही नाहीत व 'वृक्ष-ज्ञान', 'हत्तीचे ज्ञान' असणारा जीवात्माही नाही; फक्त 'विज्ञानाची' साखळी किंवा प्रवाह आहे, हे विज्ञानवादी योगाचार बौद्धांचे मत पटायला अवघड आहे; पण ते पटण्याचा प्रश्न नसून ते जसे आहे तसेच समजावून घेण्याचा प्रश्न आहे व ते अवघड नाही. तर्कतीर्थांच्या मांडणीमुळे मात्र ते समजावून घेणे अशक्य आहे. कारण, त्यांनी ते अगदी विपर्यस्त मांडले आहे. पृष्ठ ३९ च्या पहिल्या स्तंभाच्या शेवटच्या आठ ओळी व दुसऱ्या स्तंभाच्या प्रारंभीच्या १४ ओळी वाचकांनी पाहाव्या. तर्कतीर्थ म्हणतात, "भ्रमामध्ये दिसणारा विषय असत् नसतो हे अन्यथाख्यातिवाद्यांचे मत मान्य करूनही त्यावर (...) सुधारणा अशी सुचविली आहे की, भ्रमातील विषय सत् असला तरी ते ज्ञानाबाहेरचे सत्य नव्हे". मी केलेल्या कंसातील जागी

मुळात काही शब्द नाही, त्यामुळे वाक्याला कर्ता नाही; पण तेथे 'विज्ञानवाद्यांनी' असा शब्द तर्कतीर्थांना अभिप्रेत आहे. आता हे सारे विधान विज्ञानवादी 'योगाचार' मताच्या बौद्धांवर अत्याचार करणारे आहे. नैयायिकांच्या अन्यथाख्यातिवादाचे मत मान्य करून त्यात फक्त 'सुधारणा सुचविण्याचा' खटाटोप योगाचारांनी केलेला नाही. भ्रमातील विषय सत् असतो हे त्यांनी मान्य करावे कसे ? आणि 'ज्ञानाबाहेरचे सत्य' ही काय चीज आहे ? ज्ञानाबाहेरचे 'सत्य' कोणता पंथ मानतो ?

पुढे आणखी असे विधान तर्कतीर्थ करतात की, ज्ञानात जो विषय भासतो "तो ज्ञानाचाच आकार किंवा भाग असतो. स्वतः ज्ञान म्हणजेच आत्मा." या मांडणीने स्पष्ट काही होत नाही हे जाणवून पुढे तर्कतीर्थ म्हणतात की, शिंपला, हे पुरोवर्ती (समोर असणारे) 'बाह्य' आहे ; 'चांदी आहे हा भास' केवळ 'ज्ञानाकार' आहे आणि 'बाह्य' व 'ज्ञानाकार' यांच्यात भिन्नता आहे ती न कळल्याने शिंपलाच चांदीचा तुकडा भासतो. या स्पष्टीकरणाने एकच गोष्ट स्पष्ट होते की विज्ञानवादी बौद्ध 'बाह्य' असे काही मानीतच नाहीत. हे तर्कतीर्थांना स्पष्ट उमगलेले नाही. वरच्या उताऱ्यातील 'स्वत: ज्ञान' म्हणजेच आत्मा या वाक्यावरून दुसरे एक स्पष्ट होते की विज्ञानवाद्याचा अनात्मवाद (आत्मा न मानणे) तर्कतीर्थांना माहीत नाही. आमच्या 'विज्ञानाला अन्य मताचे लोक 'आत्मा' म्हणतात असे योगाचारी बौद्धांचे स्पष्ट मत आहे. 'स्वतः ज्ञान म्हणजेच आत्मा' हे योगाचारांचे मत नाही; पण त्यांच्यावर ते तर्कतीर्थांनी लादले आहे. ( "बौद्ध धर्माचा अभ्युदय व प्रसार", प्रा. प. ल. वैद्य, पू. १११. तसेच S. N. Dasgupta यांचा "History of Indian Philosophy Vol. 1, p. 147 हे ग्रंथ पाहा ).

### 'अध्यास' कल्पनेचा अनुल्लेख :

'अनिर्वचनीयख्यातिवाद' ही अद्वैत वेदान्ती दार्शनिकांची उपपत्ती देताना 'अध्यास', (म्हणजे एखादी वस्तू पाहताना पूर्वी दुसरीकडे पाहिलेल्या दुसऱ्या वस्तूचा स्मृतीमुळे होणारा भास). या विशिष्ट कल्पनेचा तर्कतीर्थांनी कोठेही उल्लेख केलेला नाही. अद्वैत मताप्रमाणे भ्रमाची उपपत्ती करावयाची तर 'अध्यास' ही संज्ञा व कल्पना यावयास हवीच. समजा, 'अध्यास' ही स्वतंत्र वाद संकल्पित आहे, किंवा अद्वैत वेदान्ताच्या नोंदीत 'अध्यास' यावयाचा आहे. तर मग या नोंदीत तसे सूचित करावयास हवे व नोंदीच्या शेवटी पूरक संदर्भात 'अध्यासा'चा उल्लेख हवा.

### अनावश्यक भाषांतरे व 'चाकचक्य' :

भ्रमाच्या उपपत्तीचे विवेचन करणारी ही नोद तत्त्वज्ञानाच्या अवघड प्रांतात सामान्य वाचकांना उपयुक्त ठरण्याऐवजी भ्रमोत्पादकच ठरेल, ही टीका करीत असताना मला थोडे विस्ताराने लिहावे लागले. प्रत्यक्ष नोंद वाचताना वाचकाला असाही अनुभव येईल की,

काही ठिकाणी प्रथम संस्कृत परिभाषेत चार-पाच मुद्दे देऊन त्यांचे मराठीत पुन्हा कथन केलेले आहे, आणि पुष्कळ ठिकाणी पंडितांच्या मराठी संभाषणात उगाच संस्कृत शब्दांची पेरणी असते तसा प्रकार आहे. दोन्ही प्रकार टाळता येणारे होते, नव्हे टाळावयास हवे होते. उदाहरणार्थ, चांदीच्या तुकड्याचा भास होतो तो स्मृतीतल्या चांदीच्या चकाकीसारखी चकाकी शिंपल्यावर असते म्हणून होतो असे सांगावयाचे आहे. स्मृतीतल्या चांदीची 'तत्ता' म्हणजे तिचे स्मृतिरूप असणे. 'तत्ता' म्हणजे ते- पणा. आता 'तत्ता' या शब्दाचा वापर करून वाचकाला जास्त काय सांगावयाचे होते ? पण तो शब्द आला आहे. त्याहून 'चाकचक्य'चा वापर जास्तच पांडित्यनिदर्शक आहे. साधा मराठी शब्द 'चकचकीतपणा' नीट समजतो. तो शब्द घालावयाचा; पण त्याच्या आधी 'चाकचक्य' घालून उगाच शोभा वाढवावयाची ! अशाने साधत तर काही नाहीच. उलट, या पंडिती लकबा साधण्यात लेखकाचे मूळ विवेचनावरील तात्त्विक अवधान सुटते आणि सामान्य वाचकाला उगीच दडपल्यासारखे होते.

## पूरक संदर्भ आणि संदर्भ-ग्रंथ :

वरील टीका नोंदीच्या मुख्य मजकुराबद्दल झाली; पण विश्वकोशातल्या नोंदीच्या शेवटी 'पाहा' '(पूरक संदर्भ) व संदर्भग्रंथ असतात. त्यांना फार महत्त्वही असते. या नोंदीचे पूरक संदर्भ' म्हणून कोणत्या नोंदी आवश्यक आहेत, तर 'ज्ञानमीमांसा', 'माया' आणि 'अध्यास' यापैकी, फक्त 'माया' या नोंदीच्या शेवटी आहे. 'प्रमाणमीमांसा' म्हणजेच 'ज्ञानमीमांसा' हे चुकीचे समीकरण मानून लेखकाने 'ज्ञानमीमांसा' गाळली असण्याचा संभव दिसतो. पूरक संदर्भात बौद्ध तत्त्वज्ञान उल्लेखिलेले आहे. त्याऐवजी 'माध्यमिक' व 'योगाचार' या बौद्ध-दर्शनांचा संदर्भ देणे युक्त झाले असते; पण मग इतर दर्शनाचा उल्लेख कसा वगळता येईल ? खरे म्हणजे नोंदीत आलेल्या दर्शनांचा येथे उल्लेख घालणे अनावश्यक आहे, कारण पुस्क संदर्भ फक्त अत्यंत निगडित अशा दोन-तीन नोंदींचा असणे पुरेसे ठरते. 'संदर्भ' मध्ये जे ग्रंथ लेखकाने उल्लेखिलेले आहेत त्यात मराठी ग्रंथ नाहीत. मराठी वाचकांच्या दृष्टीने असे पाहिजे की, कोणत्या मराठी ग्रंथामध्ये 'ख्याती ' बद्दल जास्त विवेचन त्याला मिळू शकेल. 'भामती' इत्यादी दुर्बोध संस्कृत ग्रंथांचे संदर्भ देऊन वाचकाला भांबावून टाकण्यापेक्षा 'भारतीय तत्त्वज्ञान' (श्रीनिवास दीक्षित), "वै दिकशांकर-अद्वैतमतानुवाद" (श्री. द. वा. जोग) इत्यादी ग्रंथांचा संदर्भ देणे वाचकांना उपयोगी ठरले असते.

## काही सूचना :

प्रस्तावना व दोन नमुन्यांच्या नोंदीचे वरील विवेचन करताना माझ्या डोळ्यापुढे विश्वकोशाच्या महान् योजनेचे संभाव्य रूप मी ठेवले आहे. एकंदर सव्वीस नोंदींपैकी 'अरिकामेडू', 'दिवाकर', नाट्यछटा', विचारनियम', 'व्हेटो' अशा काही नोंदी चांगल्या

आहेत; पण बहुतेक नोंदीमध्ये कार्यालयीन संपादनाच्या बेशिस्त, विस्कळीत व दिशाशून्य पद्धतीमुळे अनेक दोष राहिले आहेत. 'सरकारी खर्च', 'मृगशंगे व शिंगे' अशा काही नोंदीमध्ये तर तात्त्विक व मांडणीच्या चुका सहज दिसणाऱ्या आहेत; पण जागेच्या अभावी प्रस्तुत लेखात त्या नमूद करणे शक्य नाही.

यावर काही उपाय नाही का ? जरूर आहे. एक तर विश्वकोश-संपादनासाठी मनुष्यबळ बरेच वाढविले पाहिजे. १९००० पृष्ठाऐवजी १०,००० पृष्ठांचाच विश्वकोश रचणेही आज योग्य ठरेल. खर्च कमी होईल. शिवाय पसाराही कमी होईल. संपादकांची संख्या वाढवून, त्यांना विचारविनिमय करून एकसूत्रता आणण्याची संधी देणे, मुंबई-पुण्यासारख्या शहरात कार्यालय नेणे, संदर्भ ग्रंथालयाला अशा ग्रंथाच्या कामात साहाय्यक होईल असा तज्ज्ञ ग्रंथपाल नेमणे, इत्यादी सूचनाही येथे करता येतील; पण गेली तीन वर्षे, कार्यालयीन यंत्रणेबद्दलचे जे ऐकू येत आहे ते जमेस घेता अशा सूचना करणेही व्यर्थ वाटण्यासारखे आहे. डॉ. केतकरांचे जुने कोशकार्य, आणि श्री. दे. द. वरेकर, श्री. ग. रं. भिडे, श्री. महादेवशास्त्री जोशी यांची चालू कोशकार्ये एकीकडे व ६० लक्ष रुपये खर्च होणाऱ्या शासकीय विश्वकोशाची अवस्था दुसरीकडे असा हा विरोधाभास अगतिकपणे पाहत राहणे, एवढेच आज शक्य दिसते.

**(केसरी, ५-७-६५)**

ooo

१२-७-१९६५

## विश्वकोश परिचयग्रंथावरील टीकेसंबंधी स्पष्टीकरण

- लक्ष्मणशास्त्री जोशी

प्रमुख संपादक, विश्वकोश कार्यालय, वाई.

दैनिक केसरीच्या दिनांक ५ जुलैच्या अंकात ''विश्वकोश परिचयग्रंथातील नमुनेदार नोंदी'' ह्या शीर्षकाचा एक प्रदीर्घ लेख आला आहे. त्यात प्रमुख संपादक म्हणून व्यक्तिशः माझ्यावर व मी लिहिलेल्या 'ख्यातिवाद' या नोंदीवर जी टीका आहे त्यासंबंधी मला काहीही म्हणावयाचे नाही. कारण ख्यातिवादावरील ही टीका उघड उघड अनभिज्ञाने लिहिलेली दिसते. तथापि परिचयग्रंथाच्या संपादनातील ज्या चुका म्हणून कुणी श्री. दि. के. जोशी यांनी दाखविलेल्या आहेत त्या संबंधात त्या टीकाकाराचे अज्ञान उजेडात आणणे व टीका कशी विपर्यस्त आहे हे दाखवून देणे मला आवश्यक वाटते. एवढ्या प्रदीर्घ लेखाची तपशीलवार छाननी करणे अनावश्यक, वेळ फुकट घालविणारे असेच होईल म्हणून नमुन्यादाखल श्री. दि. के. जोशी यांच्या लिखाणातील फक्त तीन-चार विपरीत प्रकार दाखवितो.

(१) विश्वकोशात येणारा प्रत्येक लहान-मोठा लेख म्हणजे विश्वकोशातील 'नोंद', त्यालाच 'शीर्षक' असेही म्हणता येईल. हे दोन्ही शब्द समानार्थी आहेत व ते दोन्हीही वापरले तरी त्यात काही चूक होत नाही. इंग्रजीमध्येही कधी Entry व कधी Article असे दोन्ही शब्द वापरलेले आढळतात हे श्री. दि. के. जोशी यांच्या सारख्यांनी दोन-तीन महत्त्वाचे मान्यवर इंग्रजी कोश उघडून पाहिले तर त्यास कळेल.

(२) वर्णक्रमासंबंधीचे आमचे टिप्पण काळजीपूर्वक पाहिले तर 'हंगेरीतील उठाव' ह्यानंतर 'हिमरू विणकाम' हाच क्रम बरोबर आहे हे लक्षात यावे. ते लक्षात येत नसेल तर ह्या कार्यालयात तयार झालेली विश्वकोशातील वर्णक्रम 'ही पत्रिका अवश्य मागवून घेऊन पाहावी.

(३) फिनलंडसंबंधीची नोंद व नकाशा यांचा संपूर्ण हक्क फिनिश दूतावासाने आम्हाला दिला व नोंद प्रत्यक्ष कार्यालयात लिहिली गेली ह्यामध्ये श्री. दि. के. जोशी यांना काय विसंगती दिसली ते समजत नाही. त्या दूतावासाने आम्हाला नकाशा दिला, काही माहिती दिली व ती वापरण्याची परवानगी दिली त्याबद्दल त्यांचे आभार मानले एवढेच. ती माहिती व इतर ग्रंथांतून घेतलेली माहिती ह्यावरून नोंद लिहिली ती विश्वकोश कार्यालयानेच.

(४) ग्लॅडिएटर या नोंदीत योद्धे, सामने व खेळ ह्या सर्व अर्थांनीच 'ग्लॅडिएटर' हा शब्द

वापरला गेला आहे असे ह्या विद्वान टीकाकारास का वाटले ते समजत नाही. त्या नोंदीतील दुसऱ्या वाक्यातील 'हे सामने' हे पहिल्या वाक्यातील द्वंद्वाकडे लागते. 'ग्लॅडिएटर'कडे लागत नाही. तसेच तिसऱ्या वाक्यातील 'हा खेळ' म्हणजे हा द्वंद्वाचा खेळ हेही स्पष्ट आहे. ह्या ठिकाणी श्री. जोशी यांचा गोंधळ होण्याचे काहीही कारण दिसत नाही.

(५) 'हूण' ह्या नोंदीवर टीका करताना श्री. जोशीमहाशय म्हणतात की, 'शक' व 'कुशाण' ह्या नोंदींचा येथे पूरक नोदी म्हणून उल्लेख हवाच होता. तो नसल्याचा दोष लेखकापेक्षा संपादकावरच येतो." आम्हास हे म्हणणे एकदम मान्य आहे. ते पूरकसंदर्भ आम्ही दिले नसते तर अर्थातच तो दोष आमच्यावर येणे योग्य होते, तथापि टीकाकारांनी, त्यांच्या दुर्दैवाने, नोंद नीट न वाचताच हे लिहिले आहे. त्या नोंदीच्या चौथ्या परिच्छेदात उपर्युक्त दोन नोंदींचे पूरक संदर्भ अगदी स्पष्ट असे दिले आहेत.

श्री. दि. के. जोशी यांनी उपस्थित केलेल्या फक्त काही मुद्यांची उत्तरे वर दिली आहेत. तेवढ्यावरून त्यांच्या टीकेचा सूर काय आहे हे वाचकांच्या ध्यानी येईल. म्हणूनच मला अधिक तपशिलात शिरण्याचे कारण आहे असे वाटत नाही. तथापि श्री. दि. के. जोशी यांनी विश्वकोशाच्या कामात एवढा रस घेऊन आम्हास सूचना व सल्ला देण्याचा जो उपक्रम केला आहे त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. विश्वकोशाचे खंड जास्तीत जास्त निर्दोष व्हावेत ह्यासाठी जनतेकडून सूचना मिळाव्यात, सुधारणा सुचविल्या जाव्यात म्हणून तर परिचयग्रंथ काढला आहे. परिचयग्रंथ संपूर्णपणे निर्दोष आहे असा दावा मुळीच केलेला नाही, करावयाचाही नाही. आमचे काम कुठे व कसे सदोष राहते हे सर्व प्रकारच्या वाचकांकडून कळावे ह्यासाठीच तर हा लहानसा परिचयग्रंथ त्यांच्या हाती दिला आहे. त्याची दखल श्री. दि. के. जोशी यांच्यासारख्यांनी घेतली ह्यात आम्हाला आनंद आहेच. केसरी कार्यालयाकडे अजूनही अधिकृतपणे परिचय ग्रंथ परीक्षणासाठी गेलेला नसतानाही त्यांनी अत्यंत आस्थेने व उत्साहाने ही टीका प्रसिद्ध केली ह्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

**(केसरी ता. १२।७।६५)**

○○○

दि. २८-७-६५

# सामान्य वाचकांचा दृष्टिकोन

- शंभूराव धोपाडे

'केसरी' च्या दि. ५ जुलैच्या अंकात 'विश्वकोश-परिचय' ग्रंथाचे श्री. दि. के. जोशी यांनी केलेले परीक्षण वाचले. श्री. जोशी यांच्या अभ्यासपूर्ण परीक्षणाबद्दल त्यांचे कोणीही अभिनंदन करील; पण हे परीक्षण मर्यादित आहे. मर्यादित या अर्थाने की गेली साडेचार वर्षे विश्वकोशाच्या कार्याचा जो डांगोरा पिटला गेला व शास्त्रशुद्धता, प्रमाणबद्धता यांचा ढोल बडवून कोशरचनेचे तंत्र कुणाला आतापर्यंत समजलेच नाही अशा थाटात प्रसिद्धी पत्रके काढून, मुलाखती छापून व पत्रांना उत्तरे देतानाही इतरांची उद्धटपणे अवहेलना केली गेली.

या सर्व पार्श्वभूमीवर 'परिचय-ग्रंथ' पाहिला जावा. श्री. दि. के. जोशी यांचे धार्ष्ट्य तर मोठेच ! त्यांनी सरळसरळ तर्कतीर्थांची व 'वयःस्थापनाकार जोशी' म्हणजे त्यांचे बंधूच, यांची त्यांच्या विद्वत्तेबद्दल व अधिकाराची खातरजमाच केली; पण 'ख्यातिवाद' व 'वयःस्थापन' हे विषय मोठ्या लोकांचे. सर्वसामान्य वाचकांच्या दृष्टिकोनातून मला जे या परिचय-ग्रंथाबद्दल वाटते ते मी लिहीत आहे.

## नोंदीतील न्यूने :

(१) परिचय-ग्रंथाच्या पृष्ठ ३७ वर कामगारांच्या कामाचे तास ही ही नोंद आहे. या संबंधात संपादक फारच अपुरे पडले आहेत. फक्त भारतातील कामगारांच्या तासांची १९६२ ची माहिती आहे. परिचय-ग्रंथ जर १९६५ मध्ये होतो व तो जर सरकारतर्फेच प्रसिद्ध होत आहे तर मग यामध्ये अद्ययावतपणा का नाही ? यांच नोंदीच्या शेवटी शेतमजुरांच्या कामाच्या तासांचे कोष्टक दिले आहे ते कोणत्या वर्षाचे याचा पत्ता लागत नाही.

(२) पृष्ठ ४१ वर 'गनिमी युद्ध' ही नोंद आहे. 'गनिमी युद्ध' म्हटले की महाराष्ट्रात तरी मराठ्यांच्या गनिमीयुद्धाची आठवण होते. मराठीतल्या विश्वकोशात या मराठ्यांच्या युद्धपद्धतीबद्दल तरी अधिक माहिती मिळेल अशी अपेक्षा असते ती फलद्रूप होत नाही. शेवटी प्रख्यात गनिमी युद्धांची माहिती दिली असती तर तेवढ्यापुरती तरी ती नोंद पूर्ण झाली असती.

( ३ ) पृष्ठ ४४ वर 'चित्रसंरक्षण' - तैलचित्रासाठी वापरण्यात येणाऱ्या कॅन्व्हसचा 'कापड जळते' हा दोष म्हणून सांगितला आहे. चित्रसंरक्षणासाठी करावयाच्या उपायांची माहिती तुटक व असंबद्ध आहे.

(४) 'पीटर द ग्रेट' ही नोंद भाषाप्रभुत्वाची व शास्त्रीय दृष्टीची, संपादनकौशल्याची पताकाच आहे ! पीटरच्या आई-वडिलांची नावे नाहीत. त्याच्या शिक्षणाचा उल्लेख नाही, तो गादीवर आला त्या वेळच्या परिस्थितीचे दिग्दर्शन नाही. पीटर १० व्या वर्षी ठार झाल्याचे 'वेचक' शब्दांमुळे लक्षातच येत नाही. तंत्र आणि मंत्र म्हणतात ते हेच की काय ?

(५) पृष्ठ ८९ वर दिलेल्या हंबोल्ट अलेक्झाडर फॉन याच्या चरित्रटिपणीत त्याच्या जन्ममृत्यूच्या तारखा का नाहीत? त्या उपलब्ध आहेत. कदाचित् एका चरित्रात जन्ममृत्यूची तारीख देणे व दुसऱ्यात न देणे हेही एक संपादन- कौशल्याचे लक्षण असेल !

(६) प्रत्येक पृष्ठावर पहिल्या कॉलममध्ये चालू असलेला विषय व दुसऱ्या कॉलमच्या अखेरीस चालू असणाऱ्या नोदींची पृष्ठांच्या शिरोभागी संदर्भसुलभतेसाठी नोंद करण्याचे सर्वमान्य धोरण ठेवलेले असावे असे वाटते; पण येथेही रचनेतील गलथानपणा दिसून येतो. पृष्ठ ८४ व ९३ वरील डाव्या कॉलम्सच्या खाली नव्या नोंदीच्या नऊ नऊ ओळीच आहेत. पण ८४ पृष्ठावर शिरोभागी एकाच विषयाची नोंद व ९३ पृष्ठावर हूण - हेरोडोटस् अशा दोन नोंदी का ?

(७) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचा आद्य हेतू 'एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका' प्रमाणे मराठी विश्वकोश तयार करणे असा असल्याचे पहिल्या निवेदनावरून कळून येते. फिनलंड या देशाची माहिती पृष्ठ ६१ वर दिली आहे. ती देताना ब्रिटानिकाच्या रचनापद्धतीची नक्कल आहे; पण रचनेत तारतम्य हवे हे लक्षात आल्याचे दिसत नाही.

(८) श्री. दि. के. जोशी यांनी 'वयःस्थापनेची' भंबेरी उडविली आहेच; पण आणखी एक गोष्ट या बाबतीत लक्षात घ्यावयास हवी. ती अशी की, वयःस्थापन या शब्दाची नोंदच चुकीची आहे. 'देहधारणा' , हा शब्द या संबंधात अधिक चांगला; पण त्यासाठी आयुर्वेदीय रसशास्त्राची माहिती हवी.

## खर्चाचा प्रश्न :

परिचयग्रंथाला ज्या जाडीचा कागद वापरला आहे, त्या जाडीचा ! १००० पृष्ठांच्या एका भागाची व अशा १९ भागांची होणारी रुंदी लक्षात घेतल्यास एवढ्या जाडीचा (थिकनेस) कागद वापरणे योग्य होणार नाही. ऑफसेट पेपर पांढरा शुभ्र दिसला तरी त्यावर फोटो चांगल्या तऱ्हेने येत नाहीत. हाफटोनची कितीतरी ड्रॉइंग्ज करावी लागतील व त्या दृष्टीने ऑफसेट प्रिंटिंग केल्याशिवाय काम भागणार नाही. याचा अंती होणारा खर्च किती ?

प्रत्येक शब्दाला १०-१५ पैशांचा होणारा खर्च फार वाटतो. शब्दांच्या काटकसरीचे व खर्चाच्या प्रमाणाचे ज्ञान कमीच दिसते. काही उदाहरणे दिलीच आहेत. "आता 'सरकारचा पैसा' तुमचे काय ?" असा उलटा प्रश्न केला तर त्याला उत्तर नाही.

सरकारच्या थैल्यावर बसून पैसे उधळणाऱ्या या लोकांना पैशासाठी निम्मे रक्त आटवीत काम केलेल्या डॉ. केतकरांची निंदा, गर्व, प्रशंसा करण्यात फुशारकी वाटली तरी परिचय-ग्रंथावरून तरी सर्वांना डाफरत आलेल्या संपादकांना त्या जागेवर बसावयाचा नैतिक अधिकार राहिलेला नाही, असे स्पष्टपणे दिसून येते.

**(केसरी, २८-७-६५)**

०००

गुजरात युनिव्हर्सिटी
अहमदाबाद
जुलै २५, १९६५

श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी,
प्रमुख संपादक, विश्वकोश,
महाराष्ट्र राज्य, वाई.

**स. न.**

आपण पाठविलेला मराठी विश्वकोशाचा परिचयग्रंथ मिळाला. फार आभारी आहे. कागद, छपाई, बांधणी, मजकुराची रचना वगैरे सर्व बाबतीत इकडील एकंदर परिस्थिती लक्षात घेता हा परिचयग्रंथ बराच वरच्या दर्जाचा वाटला व मुख्य ग्रंथ अशाच प्रकारे निघणार ही समाधानाची गोष्ट आहे. पुढील सूचना आपणास करावी असे वाटते.

संदर्भग्रंथांच्या यादीत प्रथम ग्रंथाचे नाव, नंतर लेखकाचे व त्यानंतर प्रकाशन स्थळ व सन अशी आपण दिली आहेत. अलीकडे प्रत्येक ग्रंथात हा क्रम पुढीलप्रमाणे असतो. लेखकाचे आडनाव, नंतर नावाची आद्याक्षरे, ग्रंथाचे नाव ( Italics मध्ये ), प्रकाशनस्थळ, प्रकाशकाचे नाव ( बहुधा संक्षिप्त स्वरूपात, म्हणजे "John Wiley & Sons, Inc." ऐवजी "Wiley" वगैरे), व शेवटी सन.

Encyclopaedia Britannica व काही क्वचित ब्रिटिश लेखक प्रकाशकाचे नाव न देता फक्त स्थळाच्या नावावरच भागवतात; पण वाचकाच्या दृष्टीने ते अगदी गैरसोयीचे होते. अलीकडे बहुतेक ब्रिटिश व सर्व युरोपीय व अमेरिकन लेखक - रशियनसुद्धा - मी वर लिहिल्याप्रमाणे क्रमाने माहिती देतात. संदर्भग्रंथाच्या यादीकरिता आहे त्यापेक्षाही लहान टाइप वापरल्यास कदाचित् अधिक बरे होईल. कारण केव्हा केव्हा ही यादी फार मोठी असते.

कळावे.

आपला,
**पं. ह. प्रभू**

ооо

१-८-१९६५

## भावी कोशाचा नमुना

आज तालुक्याच्या गावातूनही कॉलेजे निघाली आहेत आणि वृत्तपत्रे वाचून आपली जिज्ञासा भागविणारा साक्षर वाचक खेड्यापाड्यातून दिसत आहे. ग्रंथालयांची संख्याही सतत वाढत आहे. अशा वेळी ज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्रातली माहिती अचूकपणे, प्रमाणशीर रीतीने व सुलभ मराठीत देणारा विश्वकोश मराठी वाचकाला हवा आहे ही गरज ओळखून ना. यशवंतरावजी चव्हाण यांनी मराठी विश्वकोशनिर्मितीचे कार्य महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाच्या हाती सुपूर्त केले याबद्दल त्यांना वाचकवर्ग धन्यवाद देत राहील. या कार्याला जानेवारी १९६२ मध्ये प्रारंभ झाला व आता भावी कोशाचा परिचय करून देणारा हा १२१ पृष्ठांचा ग्रंथ प्रसिद्ध होत आहे.

### ग्रंथाची नमुनेदार सजावट :

या ग्रंथाचे वेष्टण सुंदर डिझाइनने सुशोभित आहे. कागद उत्तम आहे व मौज मुद्रणालयाने आपल्या कीर्तीला साजेशी उत्कृष्ट छपाई केलेली आहे. आतील रंगीत चित्रांची छपाईही उत्तम साधली आहे. बांधणीही मजबूत आहे. एकंदरीत, अशा नमुन्याचे १००० पृष्ठांचे १९ खंड तयार होतील, तेव्हा कोणत्याही ग्रंथालयाचे ते भूषण ठरतील यात शंका नाही.

### अचूकपणावर भर हवा :

बाह्यांगाचे निरीक्षण करून आतील मजकुराकडे वळले पाहिजे. कारण विश्वकोशाची उपयुक्तता त्यातील नोंदींच्या अचूकपणावर अवलंबून आहे. केवळ बाह्य सौंदर्यावर नाही. संदर्भ पाहणाऱ्या वाचकाची अपेक्षा लक्षात घेऊन प्रस्तुत ग्रंथातील नमुन्याच्या २६ नोंदी वाचून पाहिल्यावर मात्र असे वाटते की, बाह्यांगाकडे संपादकांनी जेवढे लक्ष दिले आहे तेवढे प्रत्यक्ष संपादनाकडे दिलेले नाही. अगदी साध्या गोष्टीकडे संपादकीय दुर्लक्ष झाल्यामुळे मुद्रणदोष व भाषेचा अव्यवस्थितपणा सर्वदूर दिसतो. पारिभाषिक शब्दांच्या मराठी-इंग्रजी व इंग्रजी- मराठी सूची, शेवटची सूची यातूनही असे दोष आढळतात. 'काही चुका राहणारच,' 'इंग्रजी विश्वकोशातूनही प्रमाद आढळतात,' अशा तऱ्हेचे समर्थन समग्र विश्वकोशाच्या बाबतीत करता येईल व तेही चुकांचे प्रमाण अत्यल्प असेल तरच; पण येथे प्रश्न अवघ्या १२१ पृष्ठांचा आहे, म्हणून वरील समर्थन येथे गैरलागू ठरेल. सध्याचे प्रमाद-प्रमाण पुढेही कायम राहिले तर शुद्धिपत्राचे दोन खंड जोडून खंडांची संख्या २१ करावी लागेल.

## गोंधळात टाकणारी नोंद :

उदाहरणादाखल, पृष्ठे ६८-६९ वरची 'मृगशृंगे आणि शिंगे' ही नोंद पाहा. मराठी वाचकाला सहज जिज्ञासा उत्पन्न होईल की शिंगांबद्दलची माहिती विश्वकोशात पाहावी : तो कोणता शब्द पाहील ? अर्थातच, 'शिंग' हा शब्द; पण त्याची निराशा होईल. कारण सूचीमध्ये शिंग हा शब्दच नाही. शिंगाबद्दलची माहिती देणारी नोंद 'मृगशृंगे आणि शिंगे' अशी घेतली गेली आहे. गायीबैलांची शिंगे कायमची असतात आणि हरणाच्या जातीला हंगामात गळून पडणारी व पुन्हा नव्याने येणारी शिंगे असतात, त्यांना मृगशिंगे म्हणतात. त्यांना 'हरणशिंग' असा साधा मराठी शब्द वापरता आला नसता का ? 'सांबरशिंग' हा शब्द तसा रूढ आहेच.

आता या नोंदीची भाषा पाहा. पहिलेच वाक्य आहे : 'कित्येक प्राण्यांना शिंगे किंवा मृगशृंगे असतात व ती डोक्यावर असून सामान्यतः त्यांची एकच जोडी असते.' डोक्यावर शिंगे असतात हे सांगण्याची गरज होती का ? गेंड्याचे शिंग त्याच्या नाकावर असते असे आपण समजतो; पण ते खरे शिंगच नसते. नोंदीच्या शेवटी लेखकाने गेंड्याच्या शिंगाचे वर्णन दिले आहे, तेथे ते 'निराळ्या प्रकारचे शिंग' असते असे म्हटले आहे. ते विधान शास्त्रीय दृष्टीने चूक आहे. कारण गेंड्याचे तथाकथित शिंग केवळ अधिचर्मीय वाढ असते ही गोष्ट लेखकानेच सांगितली आहे; पण ती वाचकाला स्पष्ट सांगावयास हवी. ती या विधानाने अस्पष्ट होते.

पुढेही तिसऱ्या परिच्छेदात पाहावे तर प्रथम सांगितले आहे की, 'मृग कुलात फक्त नरांना मृगशृंगे असतात, मादीला नसतात'. लगेच 'रेनडियरचा अपवाद सांगितला आहे. कारण त्यात मादीलाही शिंगे असतात आणि पुढे पुन्हा अपवाद आहेच की कस्तुरीमृगामध्ये नरालाही शृंगे नसतात. पहिल्या वाक्यातच 'असा साधारण नियम आहे' असे म्हटले असते तर बरे झाले नसते का ? पण अशा तऱ्हेने मांडणीमध्ये साक्षेप ठेवण्याचा प्रयत्न संपादकांनी केलेला दिसत नाही.

## संदर्भग्रंथात मतप्रदर्शन :

वाचकांच्या दृष्टीने उपयुक्तता पाहणे हा दृष्टिकोन संदर्भग्रंथात कटाक्षाने ठेवावा लागतो व तो तेथे दिसत नाही. उदाहरणार्थ, 'हंगेरीतील उठाव' ही पृ. ८८ वरील नोंद पाहा. हंगेरीतील उठावासंबंधीची माहिती हंगेरी या देशाच्या नोंदीत वाचकाला अपेक्षित असणार. यासाठी वेगळी नोंद केली जाईल, अशी अपेक्षा वाचकाने का करावी ? प्रत्यक्षात ही नोंद वाचून पाहता, ती सामान्य वाचकाला वृत्तपत्रीय अग्रलेखासारखी वाटेल. ''भारत सरकारने हंगेरी प्रश्नात यापेक्षा स्पष्टपणे रशियाविरोधी भूमिका घ्यावयास हवी होती, हे मतप्रदर्शन विश्वकोशासारख्या संदर्भग्रंथात अपेक्षित नसते.

## काही संदिग्ध शब्दप्रयोग :

संदिग्ध शब्दप्रयोगांची उदाहरणे एका 'फिनलंड' च्या नोंदीतीलच आपण घेऊ. पृ. ६२ वर मताधिकाराबद्दल विधान आहे की, '२१ वर्षे वयाच्या सर्व नागरिकांना' तो अधिकार आहे. वाचकांनी समजून घ्यावयाचे आहे की, २१ वर्षांवरील व्यक्तींना तो अधिकार आहे ! पुढे दुसऱ्या स्तंभात दैनंदिन कारभार 'कौन्सिल'कडे सध्या आहे असे म्हटले आहे. हे 'कौन्सिल' कोण व कसे निवडते याचा वाचकांना अंदाज करावा लागतो. पृ. ६३ वर विनिमय दर दिलेला आहे. हा दर सतत बदलणारा असल्याने, दिलेला दर अमूक तारखेचा आहे, असे स्पष्ट सांगण्याची पद्धती येथे पाळलेली नाही. तसेच फिनलंडचे अंदाजपत्रक तुटीचे आहे, असे विधान आहे. याचा अर्थ काय घ्यावयाचा ? तुटीचे अंदाजपत्रक असणे हा फिनलंडच्या अर्थव्यवस्थेचा स्थायी अंगभूत गुण आहे की काय ? याहीपेक्षा संदिग्धपणा अंदाजपत्रकातील समाजकल्याणावरील खर्चाबद्दलच्या विधानात आहे. समाजकल्याणावरील खर्चापैकी वृद्धअपंगांना मदत, बालसंगोपनाची तरतूद इत्यादी बाबींवरील खर्चाचे शेकडा प्रमाण देण्यात आले आहे ते केवळ समाजकल्याणावरील एकंदर खर्चाशी संबंधित आहे. एकंदर अंदाजपत्रकातील खर्चाशी ते शेकडा प्रमाण नाही; पण मांडणी मात्र तसा भास करून देणारी झाली आहे. पृ. ६४ वर विशेष चित्रांची सूचना देताना पृ. ६२ ऐवजी पृ. ६१ दिले आहे. अशा चुका किरकोळ वाटल्या तरी त्या संदर्भ पाहणाऱ्याला गोंधळात पाडणाऱ्या आहेत.

## तारखांची गफलत :

'पीटर द ग्रेट' ह्या साध्या वर्णनपर चरित्रनोंदीतील काही उणिवा लक्षात घेण्यासारख्या आहेत. १६८२ मध्ये पीटरचा सावत्र भाऊ झार फिडोर वारला आणि पीटरला गादीवर बसविण्यात आले. पुढील सात वर्षे पीटरची सावत्र बहीण सोफिया हीच त्याच्या नावाने राज्य करीत होती. १६८९ मध्ये पीटरने आपल्या खासगी सैनिकांच्या मदतीने सोफियाला कैद करून सत्ता हाती घेतली. या गोष्टी प्रस्तुत नोंदीत आलेल्या नसून १६९५ मध्ये पीटर खरा सत्ताधीश झाला, अशी चुकीची माहिती दिली आहे. काही काळ 'आईच्या जरबेखाली' राहावे लागले, हेही बरोबर नाही. स्वीडनबरोबर झालेल्या लढ्यात १७०९ मध्ये बाराव्या चार्लस्‌ला पोल्टोव्हा येथे पीटरने पराभूत केले व तेव्हापासून बाल्टिक प्रदेशातून स्वीडनची सत्ता नाहीशी करण्यात पीटरला सारखे यश येत गेले. 'सर्व गमाविण्याच्या अवस्थेला' तो आला होता, हे विधान बरोबर नाही. १७२१ च्या तहाने त्याची बाल्टिकवरील सत्ता फक्त दृढ झाली. 'इराणशी त्याने बखेडा' मांडला असे वर्णन लेखक करतात. वस्तुतः १७२३ मध्ये इराणमधील परिस्थितीचा फायदा घेऊन त्याने उरबेट, बाकू हा भाग मिळविला.

पीटरने आपल्या मुलाला ठार मारले असा तो क्रूरकर्मा होता" असा उल्लेख नोंदीत आहे. वस्तुतः अलेक्सी ह्या राजपुत्राने बंड केले व ते फसल्यावर आस्ट्रियाला प्रयाण केले. तेथून त्याला परत आणून त्याच्यावर एका खास न्यायालयामार्फत खटला चालविण्यात

आला. त्याला राजद्रोहाबद्दल देहान्ताची शिक्षा दिली गेली व तो तुरुंगातच मरण पावला.

जुन्या सरदारांच्या ड्यूमाला निष्प्रभ करण्यासाठी पीटरने मंत्र्यांचे सीनेट निर्माण केले, इत्यादी महत्त्वाच्या बाबी या नोंदीत वगळल्या गेल्या आहेतच. त्यांचा समावेश करणे व चुकीची माहिती टाळणे, आहे त्या जागेत शक्य होते.

या सर्व तपशिलांच्या बाबी आहेत खऱ्या; पण वर्णनपर नोंदींच्या बाबतीत नोंद-लेखकाने आणि संपादकांनी काळजी घ्यावयास हवी. येथे नोंदलेखक प्रा. सदाशिव आठवले स्वतःच संपादक आहेत हे वेगळे !

## संपादकांनी तपासून घ्यावे :

नोंदीची उपयुक्तता केवळ सामान्य जिज्ञासूंच्या पातळीवरून ठरवावयाची असते असे मात्र नाही. ज्ञानक्षेत्रातील पुष्कळच भाग सामान्य वाचकाला सहज समजणारा नसणे साहजिकच आहे. त्यामुळे काही नोंदी ह्या अवघड होणे अटळ आहे. अशा नोंदीच्या संपादनात नोंदीच्या विषयाचा व्याप लेखकाने संभाळला आहे का ? काही आवश्यक विवेचन किंवा ऐतिहासिक संदर्भ सुटले आहेत काय ? हे संपादकांनी तपासून घ्यावे लागते.

## शासकीय आणि सार्वजनिक :

यासंदर्भात 'सरकारी खर्च' ही नोंद उदाहरणादाखल घेता येईल. 'सरकारी खर्च' हा शब्दप्रयोग 'पब्लिक एक्स्पेंडिचर' या इंग्रजी संज्ञेसाठी वापरला आहे असे सूचीवरून कळते. आता यात प्रथमच चूक अशी आहे की 'पब्लिक म्हणजे सार्वजनिक' असे न धरता लेखकाने केवळ शासकीय (स्टेट) खर्चाचा विचार केला आहे व 'सरकारी खर्चा'ची व्याप्ती स्पष्ट दिलेली नाही. 'पब्लिक' खर्चामध्ये नगरपालिका, जिल्हा परिषदांसारख्या संस्था इत्यादींच्या खर्चाचा समावेश हवा.

दुसरे असे की, शासकीय खर्चाचे प्रमाण व विशिष्ट तंत्र यामुळे आर्थिक मंदीचे अरिष्ट, बेकारी इत्यादी आर्थिक आपत्तींचा परिहार करता येईल, असे केन्स या अर्थशास्त्रज्ञाने मांडले या गोष्टीला लेखकाने महत्त्व दिलेले नाही. केन्सवर स्वतंत्र चरित्र-नोंद नाही हे येथे लक्षात घेतले पाहिजे. केन्सनी जो सिद्धान्त मांडला व व्यवहार सांगितला त्याची तात्त्विक ओळख करून देणे शक्य होते आणि आवश्यक होते. या नोंदीमध्ये, भारतासारख्या आर्थिकदृष्ट्या अर्धविकसित देशात नियोजनाचे महत्त्व काय आणि नियोजनात शासकीय खर्चाचे निर्णायक स्थान कसे असते यासंबंधी चर्चाही हवी होती. नियोजनाचे महत्त्व लोकमानसावर बिंबविण्याची गरज असताना तो विषय येथे संबंधित असून चर्चिलेला नाही हे आश्चर्य आहे. नोंदीला खर्ची पडलेल्या जागेतच वर उल्लेखिलेले मुद्दे, काही अनावश्यक भाग गाळून मांडता आले असते. वरील काही उदाहरणांवरून असे वाटते की, नोंदीच्या मजकुराबद्दल संपादकांमध्ये विचारविनिमय झालेला नसावा.

**वर्णक्रमातील विसंगती :**

सामान्य वाचकांचा दृष्टिकोन समजावून घेऊन त्यांची सोय पाहणे, हे संदर्भग्रंथ रचिताना अगदी आवश्यक असते. त्याबाबतीत संपादकाची दृष्टी हवी तेवढी जागरूक नाही असे कष्टाने म्हणणे भाग आहे. वर्णक्रमाची साधी बाब घ्या. ग्रंथसूचिकार श्री. शं. ग. दाते यांनी वर्णक्रमाबाबत विचार करून एक क्रमपद्धती स्वीकारली व तिचे स्पष्टीकरण प्रस्तावनेत दिले तसे या परिचयग्रंथातील क्रमाबद्दल नाही. पृ. ३० वर वर्णक्रम दिला आहे; पण स्पष्टीकरण नाही. त्यामुळे सूचीच्या प्रारंभीच अं चे ५ शब्द येतात व मग अ चे शब्द येतात याचे कारण कळत नाही. श्री. दाते यांची पद्धती स्वीकारून त्यांचे स्पष्टीकरणही प्रस्तावनेत द्यावे, अशी आमची याबाबत सूचना आहे.

परिचयग्रंथाच्या बाह्यांगाची गुणवत्ता कोणालाही दिसणारी आहे; परंतु आतील संपादनाबाबतच मुख्य प्रश्न आहे. नमुना म्हणून तीन वर्षांनंतर पुढे ठेवलेला ग्रंथ असा सदोष संपादनाची साक्ष देणारा पाहिल्यामुळे कष्टी मनाने वरील टीका करावी लागत आहे. प्रत्यक्ष विश्वकोशाची मुद्रणप्रत तयार होण्यास अजून काही वर्षांचा काळ जावयाचा आहे. म्हणून अनुभवी संपादकांनी परस्पर विचारविनिमयाने हे कार्य केले पाहिजे, असे वाटते.

तरच ६० लक्षावर सार्वजनिक खर्च होऊन निर्माण होणारा विश्वकोश माहितीच्या, विश्वसनीयतेच्या दृष्टीने पुरेसा निर्दोष होऊ शकेल. ज्ञानकोशकार डॉ. केतकरांनी ज्या प्रचंड अडचणींना तोंड दिले त्या प्रस्तुत विश्वकोश निर्मात्यांपुढे नाहीत. त्यांच्या तळमळीने व ज्ञाननिष्ठेने प्रस्तुत विश्वकोश तयार करण्याची संधी व जबाबदारी मात्र आजच्या संपादकांवर आहे. म्हणूनच परिचयग्रंथामुळे उघड होणाऱ्या संपादनातील उणिवा आम्ही स्पष्टपणे येथे मांडल्या आहेत.

**(दैनिक विशाल सह्याद्री, १/८/६५)**

ooo

# विश्वकोश परिचयग्रंथ आणि सामान्यवाचक

**-लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई**

'दै. केसरी' च्या दिनांक २८ जुलै ६५ च्या अंकात 'सामान्य वाचकाचा दृष्टिकोन' ह्या मथळ्याने विश्वकोश परिचयग्रंथावर व त्यातील नोदीतील मजकुरावर काही भाष्य आहे. भाष्यकार वाचक 'सामान्य' असल्यामुळे जितके शक्य होईल तितक्या सामान्य प्रकारे त्या संबंधी खुलासा करीत आहे.

(१) 'गनिमी-युद्ध' ह्या नोंदीवर लिहिताना श्री. शंभूराव धोपाडे लिहितात की, "मराठीतल्या विश्वकोशात मराठ्यांच्या युद्धपद्धतीबद्दल तरी अधिक माहिती मिळेल अशी अपेक्षा असते ती फलद्रूप होत नाही." ह्याबाबत श्री. धोपाडे ह्यांना सांगावेसे वाटते की, त्यांनी ती नोंद पुनः काळजीपूर्वक पाहावी. 'मराठ्यांची युद्धपद्धती' हे, शब्द प्रथम जेथे आले आहेत तेथे तिरके छापून त्याच्यापुढे खूण केली आहे. ह्याचा अर्ध ह्या विषयावर योग्य जागी विश्वकोशात नोंद येईल असा होतो. हा अर्थ प्रास्ताविकात स्पष्ट केलेला आहे. ज्यांच्या विद्वत्तेबद्दल व धार्ष्ट्याबद्दल श्री. शंभूरावांना बहुत कौतुक वाटते त्या श्री. दि. के. जोशी यांनी विश्वकोश- परिचय ग्रंथावर केसरीत टीका करताना 'हूण' ह्या नोंदीसंबंधात 'शक' व 'कुशाण' ह्या पूरक नोंदी का नाहीत असा सवाल टाकला होता. श्री. जोशी ह्यांना पुढे केसरीतच आम्ही उत्तर दिले. त्यात हा पूरक संदर्भांचा व खुणांचा मुद्दा स्पष्ट केला होता. श्री. शंभूराव धोपाटे यांनी ते सर्व नीट समजून घ्यावे. न समजल्यास श्री. दि. के. जोशी यांना विचारावे व त्यांनाही सांगता आले नाही तर दोघांनीही वाई कार्यालयात यावे व समजून घेण्याचा यत्न करावा.

(२) 'चित्रसंरक्षण' ह्या नोंदीमध्ये फक्त तैलचित्र आणि त्यांचे संरक्षण याबद्दलच विवरण आहे, असे नाही. नोंदीच्या सुरुवातीच्या वाक्यातच - चित्रांच्या (फक्त तैलचित्रांच्या नव्हे) स्वरूपात किंवा रचनेत अनेक कारणांनी निर्माण होणाऱ्या दोषांचे व विकृतीचे योग्य निदान करून त्याचे योग्य त्या उपायांनी निराकरण करून चित्रे त्यांच्या मूळच्या निकोप स्थितीला आणणे हा चित्रसंरक्षणाचा हेतू आहे हे स्पष्ट केलेले आहे. दोष व विकृती हे शब्द संदर्भानुसारे समानार्थीसुद्धा वापरता येतात. चित्रांच्या रचनेचे स्वरूप सांगितल्यावर त्यात होणाऱ्या विकृती किंवा दोष सांगताना (आधार या घटकातील दोष सांगताना तैलचित्रातील नव्हे- कापडावर तैलरंगाशिवाय इतर माध्यमांच्या साहाय्यानेही चित्रे तयार करता येतात.) चित्रातील कापड आगीने जळते असे म्हटले आहे. चित्र संपूर्ण जळले गेले असा अर्थ यातून मागील संदर्भ वाचल्यावर तरी निघू शकणार नाही. कारण आगीसारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे

असे अगोदरच लिहिलेले आहे. तेव्हा त्या कारणाने चित्रात व्यंग किंवा दोष उद्भवतो असे म्हटले म्हणजे चित्र नष्ट झाले असा अर्थ कसा निघतो ? नष्ट झालेल्या चित्राच्या संरक्षणाचा प्रश्नच उरणार नाही. जळण्यामुळे विकृत झालेला चित्रभाग हाच अर्थ समजावा. ज्या क्रमाने दोषस्थळे सांगितली त्याच अनुक्रमाने त्यावरील केल्या जाणाऱ्या उपायांचेही स्थूल निर्देशन केले आहे. विश्वकोशातील या विषयावरील नोंद म्हणजे त्या विषयावरील माहितीपूर्ण ग्रंथ नाही. पृष्ठसंख्येच्या मर्यादेत बसविण्यासाठी स्थूलभाव मुद्दामच अंगीकारिला आहे. श्री. शंभूरावांना स्थूल म्हणजे तुटक व अनुक्रमबद्ध म्हणजे असंबद्ध असा अर्थ लागत असेल तर त्याला आम्ही काय करणार ?

पुढे 'खर्चाचा प्रश्न' अशा उपशीर्षकाखाली परिचयग्रंथासाठी वापरलेल्या पांढऱ्या ऑफसेट कागदाचा उल्लेख आहे. यात हाच कागद पुढे वापरला जाणार, असे गृहीत धरलेले दिसते. असे आम्ही कुठे म्हटले आहे काय ? या कागदावर हाफटोन पद्धतीने केलेले छायाचित्राचे ठसे नीट उठणार नाहीत, हे खरे आहे; पण त्याप्रमाणे हाफटोन पद्धतीची हातांनी काढलेली चित्रे, म्हणजे ज्यात काळ्या-पांढऱ्याच्या छटा दाखविल्या जातात, तीही सध्याच्या पद्धतीने छापणे शक्य होणार नाही, तेव्हा 'अशी हाफटोनची किती तरी ड्रॉइंग्ज करावी लागतील' या शब्दप्रयोगातून 'सामान्याचे' स्वाभाविक असे अज्ञानच व्यक्त होत आहे. या कागदावर रेखाचित्रे नीट छापली जातील आणि म्हणून त्या रेखाटन पद्धतीचा उपयोग केलेला आहे. ऑफसेटमध्ये छपाई करण्याबद्दल उल्लेखही कोठे केलेला नाही, कारण या विश्वकोशाच्या प्रतींची संख्या त्या पद्धतीने छापण्याइतकी मोठी नाही. ऑफसेट छपाई जास्त संख्येच्या छपाईसाठीच परवडते.

(३) 'पीटर द ग्रेट' ह्या नोंदीसंबंधी लिहिताना श्री. शंभूराव धोपाडे म्हणतात की, ह्या नोंदीत पीटरच्या आई- वडिलांची नावे नाहीत, तो गादीवर आला त्यावेळच्या परिस्थितीचे दर्शन नाही. पीटरसारख्या ऐतिहासिक व्यक्तीच्या चरित्रात्मक नोंदीत त्या व्यक्तीच्या आईबापांची दोघांचीही नावे देणे, फक्त बापाचे नाव देणे व कोणाचेही नाव न देणे असे तिन्ही प्रकार असू शकतात. आम्ही (Colliers Encyclopaedia) प्रमाणे तिसरा प्रकार घेतला आहे. सामान्य वाचकाच्या दृष्टीने पीटरच्या आईबापांचा शोध घेण्यापेक्षा त्याचे कर्तृत्व सांगणेच आम्हाला महत्त्वाचे वाटते. तो गादीवर आला त्यावेळच्या परिस्थितीचे वर्णन येथे नाही, हे खरेच; पण तेही येथे द्यायचे नाही. वाचकास ते 'रशिया : इतिहास' ह्या नोंदीत मिळेल. त्या नोंदीचा पूरक संदर्भ दिला आहे.

"पीटर १० व्या वर्षी ठार झाल्याचे वेचक शब्दामुळे लक्षातच येत नाही." ह्या शंभूरावी लेखनाचा अर्थ तरी काय ? तो दहाव्या वर्षी ठार झाला नाही व असे कोठे म्हटलेही नाही हा कदाचित मुद्रणदोष असावा. 'झार' ऐवजी 'ठार' पडले असावे. लेखकाला 'झार झाल्याचे' असे म्हणावयाचे असेल तर पीटर दहाव्या वर्षी झार झाला हे त्याच्या लक्षात का बरे येऊ

नये ? १६७२ साली पीटर जन्मला हे सांगितले आहे व १६८२ साली तो झार झाला हेही सांगितले आहे. श्री. शंभूराव यांना १६८२ तून १६७२ वजा करता येत नाहीत का ? साधे बेरीज- वजाबाकीचे ज्ञान नाही इतके जर शंभूराव सामान्य असतील तर त्यांचेसाठी विश्वकोश नाही हे स्पष्ट करणे भाग आहे.

(४) 'हंबोल्ट' च्या जन्ममृत्यूचे सन दिले, जन्माची तारीख दिली नाही हे खरेच आहे. इतिहासामध्ये प्रसिद्ध पुरुषांच्या जन्ममृत्यूविषयी जितकी तपशीलवार माहिती आली पाहिजे तितकी संशोधक, प्रवासी वगैरेंचे बाबतीत येण्याचे कारण नाही असा संपादकीय निर्णय आहे. याला संपादनकौशल्य म्हणा किंवा म्हणू नका.

(५) प्रत्येक पृष्ठावर ज्या नोंदीचा आरंभ त्या पृष्ठावर झाला आहे त्या नोंदी शिरोभागी द्यावयाच्या आणि कुठल्याही नोंदीचा आरंभ नसेल व मागील पृष्ठांवरील नोंद पुढे चालू असेल तर त्याच नोंदीचा मथळा शिरोभागी द्यावयाचा अशी आमची पद्धत आहे. ह्यात पृष्ठ ६९ व ९३ ह्या दोन ठिकाणी मुद्रणदोष झाला आहे; परंतु ६३ पैकी ६१ पृष्ठांवर जर एक पद्धत दिसत असेल व दोनच ठिकाणी ती दिसत नसेल तर अशा वेळी मुद्रणदोष किंवा नजरचूक म्हणतात. धोरणाचा अभाव किंवा रचनेतील गलथानपणा म्हणत नाही. ही संस्कृती 'सामान्य वाचकालाही समजावी. 'कामाचे तास ह्या नोंदीतील मजकुरातही अशाच मुद्रणदोषांमुळे घोटाळा झाला आहे, हे आम्हाला मान्य आहे. ह्या दोषांच्या बाबतीत आम्ही दिलगीर आहोत.

(६) 'फिनलंड' नोंदीवर टीका करताना शंभूराव म्हणतात की, "ह्या नोंदीच्या रचनेत तारतम्य हवे', म्हणजे काय ? शंभूरावांना तारतम्य कोठे सुटलेले दिसते ? काही तपशिलांनी त्यांनी टीका केली असती तर उत्तर देणे शक्य झाले असते; परंतु 'तारतम्य नाही' अशा 'सामान्य' टीकेला तारतम्य आहे' असे उत्तरच संभवते.

(७) 'वयःस्थापन' ह्या शब्दाऐवजी 'देहधारणा' हा शब्द श्री. शंभूराव धोपाडे सुचवितात. आयुर्वेद म्हणजे काय व त्यातील विविध पारिभाषिक शब्द कोणत्या अर्थाने कसे वापरले आहेत, ह्याचे संपूर्ण अज्ञान असलेला आणि विनय नसलेला माणूसच अशा सूचनेचे धाडस करू शकतो.

(८) डॉ. केतकरांविषयी आम्हाला श्री. शंभूराव धोपाडे, श्री. दि. के. जोशी व त्यांच्यासारखे आणखी जे कोणी असतील त्यांच्याइतकाच आदर आहे; परंतु परिचयग्रंथात असलेल्या व नसलेल्याही चार उणिवांविषयी लिहून, आमचा संपादकाच्या जागेवर राहण्याचा नैतिक अधिकार संपतो, हे कसे म्हणता येते ते आम्हाला समजत नाही. वेळ आली आहे म्हणून विचारतो कीं डॉ. केतकरांच्या ज्ञानकोशातील मुद्रणदोष, भाषादोष वगैरे तर सोडाच; पण रचनाशैथिल्याचे व चुकीच्या मजकुरांचे गंभीर स्वरूपाचे कितीतरी दोष दाखविता येतील; पण त्यामुळे त्यांचे सर्व कार्य फुकट गेले व ज्ञानकोशकार म्हणून महाराष्ट्रात अजरामर

राहण्याचा त्यांचा अधिकार संपला असे आम्हास मुळीच वाटत नाही. त्यांच्या नावाचे भांडवल करून, विघातकी विध्वंसक टीका करण्याचाच धंदा, ज्यांना करावयाचा आहे, त्यांनी तो खुशाल करावा. महाराष्ट्राचे हे महत्कार्य पुढे चालणारच.

**(केसरी, १०।८।६५)**

**टीप** :- वरील लेखातील अधोरेखित मजकूर प्रमुख संपादकांच्या मूळ लेखात असून तो केसरीने वगळलेला असा आहे.

(मराठी विश्वकोश परिचय ग्रंथ : अभिप्राय, टीका आणि प्रतिटिका,
संपा. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई; १९६५, पृ. ६३ ते ६७)

○○○

# मृगशृंगे आणि शिंगे

- ज. नी. कर्वे, वाई.

विश्वकोशाच्या परिचय - ग्रंथाचे परीक्षणात 'मृगशृंगे आणि शिंगे' या नोंदीविषयी परीक्षण करणाऱ्याने 'विशाल सह्याद्री'त जी टीका केलेली आहे तिच्याबद्दल माझा खुलासा पुढीलप्रमाणे आहे.

(१) मराठी वाचकाला शिंगाबद्दल माहिती मिळविण्याविषयी जिज्ञासा उत्पन्न होऊन तो सूचीमध्ये शिंग हा शब्द पाहील; पण त्याची निराशा होईल असे परीक्षकाने म्हटलेले आहे. कारण सूचीमध्ये शिंग हा शब्दच नाही. हे लिहिताना परीक्षकाने, आपल्या सोईसाठी, आपण 'परिचयग्रंथांचे' परीक्षण करीत आहोत ही गोष्ट दृष्टिआड केलेली आहे. परिचय-ग्रंथ हा केवळ विश्वकोशाचे स्वरूप ध्यानात यावे म्हणूनच प्रसिद्ध केलेला आहे. त्यात सगळ्या नोंदी येणे शक्य नाही हे परीक्षकालाही माहीत असेलच. शिंग ही निराळी नोंद येईलच; पण ती योग्य ठिकाणी येईल व ती आली म्हणजे तो शब्दही सूचीत जाईल.

## मृगशृंग आणि हरणशिंग :

(२) मृगशृंग या शब्दाऐवजी हरणशिंग हा शब्द का वापरला नाही असा एक प्रश्न परीक्षकाने उपस्थित केला आहे. हरण हा शब्द मराठी भाषेत अतिशय ढिलेपणाने वापरलेला आहे. त्यात हरणांचा आणि मृगांचाही समावेश होतो. प्राणिशास्त्राच्या दृष्टीने हे बरोबर नाही. मृग आणि हरिण भिन्न आहेत. म्हणून हरणशिंग हा शब्दप्रयोग योग्य होणार नाही. 'सांबरशिंग' हा शब्द एका विवक्षित प्राण्याच्या शिंगाला अनुलक्षून असल्यामुळे तो तसा वापरणे चूक नाही.

## शिंगे-डोके आणि प्राणी :

(३) शिंगे डोक्यावर असतात हे सांगण्याची काय गरज होती असे परीक्षकाने विचारले आहे. परीक्षकाने प्राणिशास्त्राचा अभ्यास केलेला आहे किंवा नाही हे मला माहीत नाही; पण तो केलेला असल्यास त्याचा हा प्रश्न हास्यास्पद आहे असे म्हणणे भाग पडते. प्राणिशास्त्रामध्ये एखाद्या रचनेची किंवा अवयवाची माहिती देताना त्याच्या निश्चित स्थानाबद्दल माहिती देण्याचा परिपाठ आहे. त्या दृष्टीने शिंगे डोक्यावर असतात असे सांगितले तर त्यात हसण्यासारखे काय आहे ? शिवाय काही प्राण्यांमध्ये शिंगे वेगवेगळ्या ठिकाणी असतात. काही सरड्यांच्या मुस्कटांवर शिंग असते, धानेश या पक्ष्याच्या चोचीवर शिंग असते, तर. एका जातीच्या सरड्याच्या डोक्यावर आणि अंगावर देखील शिंगे असतात.

अशा परिस्थितीत मृगांच्या शिंगाचे निश्चित स्थान सांगितले तर त्यात वावगे काय आहे ?

(४) गेंड्याच्या शिंगाबद्दल परीक्षकाने उपस्थित केलेला प्रश्न योग्य नाही असे मला वाटते. वाचकांची दिशाभूल करण्याकरिताच तो उत्पन्न केलेला आहे. गेंड्याचे शिंग रचनेच्या दृष्टीने कितीही वेगळे असले तरी ज्याला गेंड्याची माहिती आहे असा सामान्य मनुष्य त्याला शिंगच म्हणतो. सगळ्या जगातील लोक त्याला शिंगच म्हणतात. त्याचे स्थान वेगळे असते, त्याची उत्पत्ती निराळ्या तऱ्हेने झालेली असते व त्याची रचनाही मृगशृंगे आणि शिंगे यांच्यापेक्षा भिन्न असते हे सांगण्याकरिता 'गेंड्याचे शिंग अगदी निराळ्या प्रकारचे असते। असे म्हणणे मुळीच चूक नाही. गेंड्याच्या नाकावरील पुढे खासगी प्रयत्न चालू आहेत. केतकरांचा ज्ञानकोश निघाल्यापासून गेल्या पन्नास वर्षांत ज्ञानविज्ञानाच्या कक्षा खूपच विस्तारल्या आहेत. समाजातील सर्व थरांतील व्यक्तींची भूक वाढत आहे. या गोष्टी लक्षात घेऊन अद्ययावत मराठी विश्वकोशाची रचना करणे ही आज निकडीची गरज आहे. महाराष्ट्र राज्याने ही समाजाची गरज लक्षात घेऊन याविषयी उत्पन्न होणारे संघटनात्मक व आर्थिक प्रश्न सोडवून हे काम हाती घेतले आहे हे निःसंशय अभिनंदनीय होय. आगामी विश्वकोशाचे स्वरूप कोणत्या प्रकारचे राहणार, विश्वकोश कार्यालयाच्याद्वारे सर्व क्षेत्रातील विद्वान माणसे एकत्र आणून जे कार्य शासनसंस्थेने आरंभिले आहे, ते कोणत्या पद्धतीने व दिशेने चालू आहे याबद्दल शिक्षित जनतेत साहजिकच कुतूहल व औत्सुक्य आहे. ते बऱ्याच अंशी प्रस्तुत 'मराठी विश्वकोश : परिचयग्रंथा' ने तृप्त होईल, यात शंका नाही.

प्रस्तुत 'परिचय-ग्रंथ' बहिरंग व अंतरंगदृष्ट्या आगामी विराट् विश्वकोशाची एक छोटीशी प्रातिनिधिक प्रतिकृती वाटावी अशी या ग्रंथाची आखणी केली आहे. आकार मोठा एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिकाचा घेतला असून कागद, छपाई, विषयोपात्त साधी व रंगीत चित्रे आणि सजावट आकर्षक आहे. मात्र या ग्रंथाच्या वेष्टणावरील प्रतीकात्मक चित्राच्या आकर्षकतेविषयी मतभेद होणे शक्य आहे, कलात्मक दृष्टीच्या काही प्रौढांना या प्रतीकात्मक चित्रातील रंगसंगती (की रंगविसंगती) अति भडक, बटबटीत व विश्वकोशासारख्या परिपक्व ज्ञानाचे सार प्रौढांकरिता ग्रंथित करणाऱ्या ग्रंथाच्या दृष्टीने अनुचित वाटण्याचा संभव आहे. अशा ग्रंथाला जर वेष्टनावर चित्र द्यावयाचेच असेल तर ते सौम्य, शांत, संयत आणि अधिक अर्थपूर्ण- प्रतीकमय असावे असे वाटते.

प्रस्तुत ग्रंथाच्या पहिल्या १ ते २८ पृष्ठात आगामी विश्वकोशाच्या स्वरूपाचे वर्णन केले आहे. अशासारख्या सर्वविषयसंग्राहक मराठी विश्वकोशाची आवश्यकता, त्यातील विषयांची रचना, त्यातील लेखांच्या प्रतिपादनाचे व शैलीचे स्वरूप, पारिभाषिक शब्दयोजनेबद्दलचे धोरण इत्यादींचे संक्षिप्त विवेचन वाचले असता, संपादक मंडळाचे ध्येय आणि व्यवहार यांचा समन्वय साधणारे औचित्यपूर्ण व उदार धोरण विशेष नजरेत भरल्याशिवाय राहत नाही. कोशात प्रमाणबद्धता राखण्याच्या दृष्टीने विश्वकोशात यावयाचे विषय आणि त्यांची

पृष्ठसंख्या याबाबतचे तपशील एकंदर पृष्ठांची कक्षावार किंवा विभागवार वाटणी देऊन मांडून दाखवले आहेत. विश्वकोशात मुख्यतः दोन कक्षांमधील विषयांवर लेख येणार आहेत, एक, मानव्यविद्या कक्षा व दुसरी विज्ञान व तंत्र कक्षा. यांपैकी प्रत्येक कक्षेला ८५०० पृष्ठे दिली जाणार असून, दोन्ही कक्षांची एकंदर १७००० पृष्ठे होणार आहेत. विश्वकोशाचा प्रत्येक खंड सुमारे एक हजार पानांचा, असे सतरा खंड या दोन कक्षा - मानव्यविद्या व विज्ञान व तंत्र-व्यापतील. विश्वकोशाचे एकंदर एकोणीस खंड होणार आहेत. वरील सतरा खंडांनंतरचा अठरावा खंड पारिभाषिक शब्दसंग्रहाकरिता आहे. त्यात विश्वकोशात आलेल्या पारिभाषिक शब्दांच्या मराठी-इंग्रजी व इंग्रजी-मराठी या दोन अकारविल्हे रचलेल्या सूची दिल्या जातील. त्यानंतरचा अखेरचा एकोणिसावा खंड सूची व नकाशे खंड म्हणून राहील. या सूचिखंडात विश्वकोशातील नोंदींची शीर्षके, नोंदीच्या मजकुरात येणारी व्यक्तिनामे व स्थलनामे, विषय, पोटविषय व तदन्तर्गत महत्त्वाच्या कल्पना इत्यादींची अकारानुक्रमाने माहिती मिळेल. याशिवाय या सूचिखंडात सुमारे दोनशे मोठे नकाशे देण्यात येणार आहेत.

'विश्वकोशाच्या स्वरूपा'च्या वर्णनात मानव्यविद्या कक्षा या भागातील मुख्य विषय व त्याचे पोट विषय यांची तपशीलवार फोड (Break-Up) दिली असून, त्या तपशिलातील प्रत्येक विषयाला व पोटविषयाला देऊ केलेली पृष्ठे यांचा निर्देश केला आहे. मानव्यविद्याकक्षेतील विषयांच्या या तपशीलवार फोडीला १६ पृष्ठे (७ ते २२) दिलेली आहेत. इतक्या बारकाव्याने केलेले विषयांचे व पोटविषयांचे विभाजन विश्वकोशाचे स्वरूप लेखकांच्या दृष्टीने शक्यतो काटेकोरपणे निश्चित करण्यास व त्या त्या विषयाची प्रमाणबद्धता विश्वकोशाच्या प्रचंड संदर्भात अजमावण्यास खात्रीने साहायाभूत होईल. विज्ञान व तंत्रविद्या या कक्षेत इतकी बारीक तपशीलवार विषयानुरूप पृष्ठसंख्येची फोड झालेली दिसून येत नाही. या कक्षेतील मुख्य विषयांची केवळ पृष्ठसंख्या दिली आहे. त्यातील पोटविषयांची पृष्ठतः तपशीलवार फोड दिलेली नाही. या कक्षेच्या विवरणाला सुमारे पाचच पाने दिलेली आढळतात.

यानंतर या 'परिचय -ग्रंथा'त पृष्ठे ३१ ते ९३ 'नमुन्याच्या नोंदी' दिल्या आहेत. या 'नमुन्याच्या नोंदी' म्हणजे विश्वकोशात पहिल्या सतरा खंडातून विविध विषय कोणत्या पद्धतीने व शैलीने विवेचिले जाणार आहेत व त्याचा 'नमुना' म्हणून दिल्या आहेत. त्यानंतर पृष्ठे ९७-११२ यातून पारिभाषिक शब्दसंग्रहाच्या मराठी-इंग्रजी व इंग्रजी-मराठी अशा दोन सूची दिल्या आहेत. त्यापुढे पृष्ठे ११५ - १२१ यामधून शब्दसूची दिली आहे. अर्थात् पारिभाषिक शब्दसंग्रहांच्या दोन सूची व शेवटची शब्दसूची या परिचयग्रंथातील 'नमुन्याच्या नोंदी' तील शब्दांवरच आधारलेल्या आहेत. तात्पर्य, 'नमुन्याच्या नोंदी', पारिभाषिक शब्दसंग्रह - सूची आणि शब्दसूची या अनुक्रमे विश्वकोशाचे आगामी १-१७ खंड, १८ वा खंड व १९ वा खंड यांचे ईषत् - दर्शन करून देणाऱ्या आहेत. १९ व्या खंडात शब्दसूचीशिवाय नकाशेही येणार आहेत. प्रस्तुत 'परिचयग्रंथा'त १९ व्या

खंडाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या शब्दसूची या भागात नकाशाचा अन्तर्भाव केलेला नाही 'नमुन्याच्या नोंदी'त फिनलंड या नोंदीसमोर फिनलंडचा रंगीत नकाशा दिला आहे. अशा नकाशांसारखे नकाशे शेवटच्या १९ व्या खंडात कदाचित येणार असतील.

'नमुन्याच्या नोंदी' हाच भाग विश्वकोशाच्या अंतरंगाचा खरा प्रतिनिधिभूत असून त्यासंबंधी अधिक ऊहापोह करणे उचित होईल. 'नमुन्याच्या नोंदी' एकंदर ५४ आहेत. (शेवटच्या 'शब्दसूची' विभागात या नोंदीचे शब्दही दिले आहेत व ते जाड टाइपात दाखविले आहेत. त्यात मार्क्स हा शब्द नोंदीच्या शब्दात नसूनही जाड टाइपात दाखविला आहे ! )

या ५४ नोंदींचे मानव्यविद्या आणि विज्ञान व तंत्र या दोन कक्षांखाली वर्गीकरण करावयाचे झाल्यास ते स्थूलमानाने असे होईल :

| **मानव्यविद्या कक्षा (३२)** | | **विज्ञान व तंत्रकक्षा (२२)** | |
|---|---|---|---|
| अर्थशास्त्र | ४ | गणित | २ |
| इतिहास | ७ | प्राणिविज्ञान | २ |
| कायदा | १ | भूविज्ञान | ३ |
| तत्त्वज्ञान | २ | भौतिकी | ४ |
| भूगोल | १ | रसायनशास्त्र | २ |
| युद्धशास्त्र | १ | वनस्पतिविज्ञान | ४ |
| राज्यशास्त्र | ३ | अभियांत्रिकी | २ |
| शिक्षण | ३ | वैद्यक | ३ |
| भाषा व साहित्य | ७ | | ----- |
| | | | **२२** |
| कला | २ | | |
| खेळ | १ | | |
| | ------ | | |
| | **३२** | | |

काही नोंदीच्या अनुषंगाने, त्यातील विषय दृक्प्रत्ययाने स्पष्ट करणारी अनेक रेखाचित्रे व तीन रंगीत चित्रांच्या आर्ट प्लेटस् दिल्या आहेत. 'माया वरण', 'ध्रुवीय प्रकाश', 'हिमरू-विणकाम', 'हूण व त्यांची धाड' यांची रंगीत चित्रे फार सुंदर उतरली आहेत. 'हूण व त्यांची धाड' हे चित्र एखाद्या ऐतिहासिक चित्रावर आधारित आहे की लेखातील माहितीच्या आधारावर चित्रकाराने बनविले आहे त्याचा उलगडा होत नाही. विषय ऐतिहासिक असल्याने शक्यतर एखाद्या जुन्या एतद्विषयक चित्रावर आधारलेले चित्र विश्वकोशात यावे,

अशी वाचकांची अपेक्षा असते.

'नमुन्याच्या नोंदी' मधील सर्वच नोंदी त्या त्या विषयातील तज्ज्ञांनी लिहिल्या आहेत. त्यामुळे त्यातील माहिती त्या विषयाच्या ज्ञानाच्या दृष्टीने अधिकृत व बिनचूक असणार यात शंकाच नाही. लेखांच्या स्वरूपात थोडाफार फरक दिसून येतो तो काही लेखातील प्रतिपादन शैलीमुळे व पारिभाषिक शब्द हाताळण्याच्या पद्धतीमुळे आणि तसा फरक पडणे अपरिहार्यही आहे; पण अशा फरकामुळे कित्येक वेळा विषयाचे ग्रहण व्हावयास वाचकांस त्रास पडण्याचा संभव असतो, ही गोष्ट लक्षात घेऊन सर्वच लेखांची मांडणी होणे इष्ट आहे.

प्रस्तुत 'नमुन्याच्या नोंदी' त काही लेख पारिभाषिक शब्दांनी भरलेले असूनही, त्यांच्या प्रतिपादनात एक प्रकारची सहजता व सफाई दिसून येते. पारिभाषिक शब्द प्रतिपादनाशी एकरूप झालेसे वाटतात. उदाहरणार्थ : पारिभाषिकशब्दप्रचुर अशा पुढील काही लेखांकडे अंगुलिनिर्देश करता येईल, आर्किऑप्टेरिक्स, ख्यातिवाद, जंतुशास्त्र, ध्रुवीय प्रकाश, पुष्पबंध, विश्वस्थितिशास्त्र.

इतर काही नोंदीखालील लेखांतून अपुरी माहिती, शिथिल शब्दरचना व वाक्यरचना, पारिभाषिक शब्दांच्या पेरणीमुळे प्रतिपादनाला आलेली क्लिष्टता इत्यादी दोषांमुळे त्या त्या स्थळी वाचकाचा विरस होऊन खटकल्यासारखे होते. अशा स्थळांपैकी उदाहरणादाखल काही खाली निर्दिष्ट केली आहेत :

पान ३१ (अ) अतिवास्तववाद, ललितकलेतील-

'दृक्प्रत्ययवादानंतर'

'दृक्प्रत्ययवाद' हा कोणत्या इंग्रजी पारिभाषिक शब्दाचा प्रतिशब्द आहे ? शेवटी दिलेल्या पारिभाषिक शब्दसंग्रहात हा शब्द आलेला नाही.

'वस्तूच्या विरूपीकरणातील...'

'विरूपीकरण म्हणजे काय ?' 'विद्रूप करणे' हा अर्थ सामान्यतः या शब्दाचा आढळून येतो; परंतु तो अर्थ प्रस्तुत संदर्भात कसा लागू होतो ते कळत नाही.

'गतिमानतेमुळे'

'गतिमानता' हा शब्द बरोबर असू शकेल का ? मूळ शब्द 'गतिमत्' (dynamic) असून त्यापासून 'गतिमान्' शब्द झाला. 'गतिमत्' या विशेषणापासून 'गतिमत्ता' हे भाववाचक नाम तयार व्हावे.

'मानवी मनात आपापतः उठणाऱ्या तरंगांचा'

आपापतः ह्या शब्दाचा अर्थ काय ? का मूळ शब्द 'आपाततः' असून त्यात हा मुद्रणदोष झाला आहे ? परंतु 'आपातत:' याचा नेहमीचा अर्थ येथे वाक्यात जमू शकेल असे वाटत नाही.

'कार्यकारणभावी दृष्टी'

'कार्यकारणभावनिष्ठ' हा शब्द अधिक समर्पक होऊ शकेल.

पान ३१ (आ)

'उत्स्फूर्तता किंबहुना आपापता' (Automatism ).

'आपापता' ही शब्दसिद्धी लेखकाने कशी काय साधली ? या 'आपापते'चा कदाचित् वर आलेल्या 'आपापतः' शी संबंध असावा. लेखकाने ज्या इंग्रजी शब्दाला हा प्रतिशब्द दिला आहे त्याचा विचार करून लेखकाचा या शब्दामागील अभिप्राय हेरायचा प्रयत्न केल्यास या 'आपाप' चा संबंध 'आपोआप' या मराठी शब्दाशी तर नाही ना असे वाटू लागते. जर हा शब्द अभिप्रेत असेल तर 'आपोआपतः', 'आपोआपता' हे धेडगुजरी शब्द तयार होतील - शेवटी दिलेल्या पारिभाषिक शब्दसंग्रहात 'आपापता' किंवा 'Automatism' या शब्दाचा अंतर्भाव आढळून येत नाही.

'अतिवास्तववाद' हा लेख वाचून झाल्यावर वाचकाच्या मनात साहजिकच , अपेक्षा उत्पन्न होते की, या वादाचा भारतीय व महाराष्ट्रीय ललित-कलेवर काय परिणाम झाला आहे हे संक्षिप्तपणे कळून यावे; परंतु ही अपेक्षा या लेखाने पुरी होत नाही.

'अवेस्ता, भाषा'

पान ३२ (अ)

'दोन्ही भाषांतील शब्दसंपदा, शुद्धलेखनपद्धती व वर्णोच्चारदृष्ट्या जवळजवळ सारखी आहेत.'

वरील वाक्यात शिथिल शब्दयोजना व वाक्यरचना वा काही मुद्रणदोष झालेला दिसतो.

'अस्कॉर्बिक अम्ल' पान ३४ (अ)

वरील नोंदीमागे इंग्रजी अक्षर 'एल्' हे घातले आहे. त्याचा अर्थ काय ?

लेखात तो कोठेही स्पष्ट केलेला आढळून येत नाही.

'कामाचे तास' (कामगारांचे) पान ३७ (अ)

'१९३६ मध्ये वेगवेगळ्या देशात... कामाच्या तासांची संख्या..'

'१९३६' मधील दिलेले आकडे आज १९६५ साली दिलेल्या नोंदीत माहितीच्या दृष्टीने मागासलेले व शिळे वाटतात. आजचे व अलीकडचे आकडे लेखकास उपलब्ध होऊ शकले नाहीत का ? तसा खुलासा करणे आवश्यक होते.

'गनिमी युद्ध' पान ४१ (अ)

"अशा युद्धप्रकाराबद्दल माहिती अथर्ववेदात, महाभारत, रामायण--- व नंतर कौटिल्याच्या अर्थशास्त्रात सापडते."

या उल्लेखिलेल्या ग्रंथांत अमुक निश्चित ठिकाणी अचूक माहिती सापडावी याकरिता त्या त्या ग्रंथापुढे कंसातून त्या ग्रंथातील ठराविक, विशिष्टी भागाचा निश्चित उल्लेख असावा अशी जिज्ञासू वाचकाची अपेक्षा असते.

पान ४२ (आ)

'गनिमी युद्धपटाचा ( Strategy) उद्देश'

Strategy या इंग्रजी शब्दाला 'युद्धपट' हा येथे योजलेला प्रतिशब्द बुचकळ्यात पाडणारा आहे. (Strategy) या शब्दाचा मराठीमध्ये डावपेच, व्यूहरचना, सैन्याच्या डावपेची हालचाली' असा अर्थ मुळाला धरून होऊ शकतो. लेखकाचा 'युद्धपट' हा प्रतिशब्द वापरण्यामागे काही अधिक अर्थपूर्ण व्यापक हेतू असावा. तो स्पष्ट व्हावयास पाहिजे होता.

'चित्रसंरक्षण' पान ४४ (आ)

'चित्रांच्या नित्याच्या स्वास्थ्यासाठी'

'स्वास्थ्यासाठी' ह्या शब्दाचा उपयोग येथील एकंदर संदर्भात खटकल्याशिवाय रहात नाही. चित्रांचे मानवीकरण कल्पिल्यास हा शब्द कदाचित् उचित वाटेल. परंतु त्याकरिता प्रतिपादनशैलीच निराळी असायला पाहिजे होती. अर्थात् अशी शैली 'विश्वकोशा'ला योग्य होईल की नाही हा प्रश्न वेगळा.

'भारतीय चित्रे मूलतः निकोपी असत'

'निकोपी' हा शब्द बरोबर वाटत नाही. 'निकोप' असा शब्द उचित होईल. 'भारतीय चित्रे मूलतः निकोप असत' या मराठी वाचकाच्या आत्मगौरवाला पोषक अशा विधानाचे अधिक वस्तुनिष्ठ स्पष्टीकरण होणे आवश्यक वाटते.

"भिंतीचित्रांच्या संरक्षणाचे येथील संशोधन बाबी उल्लेखनीय आहेत."

'बाकी' शब्दाचा उपयोग कशाकरिता ते स्पष्ट होत नाही.

शेवटी दिलेल्या संदर्भसाहित्यात - "Manual on the Conservative and Restoration of Paintings" या पुस्तकाचा उल्लेख आहे. यातील 'Conservative' या शब्दाऐवजी 'Conservation' हा शब्द अभिप्रेत असावा असे वाटते.

'जंतुशास्त्र'

पान ४६ (अ) 2

जंतूंच्या संख्येची वाढ... अलिंग पद्धतीने...

'अलिंग पद्धती' म्हणजे काय ? या पारिभाषिक शब्दाचा शब्दसंग्रहात समावेश आढळत नाही.

'फिनलंड (सुआमी)' पान ६१ (अ)

फिनलंड शब्दापुढे (सुआमी) असे कंसात मुद्दाम का म्हटले आहे याचे लेखात कोठेही स्पष्टीकरण आढळून येत नाही.

'ली पो'

पान ७३ (आ)

'सेच्वानच्या निसर्गरम्य प्रदेशात'

सेच्वान हा प्रदेश चीनच्या कोणत्या भागात आहे ?

'वनस्पतिसंग्रह' पान ७४ (आ)

'नेचे हे पुस्तक'

'नेचे' हे नाव बरोबर वाटत नाही. मूळ इंग्रजी नाव काय आहे ?

'वय: स्थापन'

या लेखात पान ७५ (अ) वर 'प्रकृतिस्थापन हे एक प्रकारचे वयःस्थापनच होय' असे म्हटले आहे. पुढे ७६ (अ) वर 'प्रकृतिस्थापनानंतर वयःस्थापन चिकित्सा करावयाची असते' असे विधान केले आहे. या दोन विधानांचा मेळ घालण्याकरिता लेखात अधिक स्पष्टीकरणाची आवश्यकता वाटते.

पान ७६ (अ)

'परिपोषक स्रोतसांचा अवरोध'

मूळ संस्कृत शब्द 'स्रोतस्' आहे हे खरे; पण हा शब्द मराठीत वापरावयाचा तर तो 'स्रोत' व्हावा असे वाटते. उदाहरणार्थ, 'तपस्' चे तप असे मराठीत होते.

याच लेखात पान ७७ (अ) वर 'आमलकी' बरोबर 'सोम' या वनस्पतीचाही उल्लेख केला आहे. 'सोम' म्हणजे हल्लीची कोणती वनस्पती ? पुढे याच पानावर 'अनुरूपद्रव्ययुक्त पंचकर्मांनी शरीरशुद्धी करावी' असे विधान आहे. ही पंचकर्मे कोणती ? याच लेखात जे पोटमथळे दिले आहेत त्यात पान ७७ (अ) वर 'उपसंहार' असा पोटमथळा तीन ओळींच्या परिच्छेदाकरिता दिला आहे. 'उपसंहार' या पोटमथळ्यावरून असा समज होतो की वयःस्थापन या विषयाची चर्चा संपली; परंतु यापुढेही दोन-अडीच स्तंभ लेख चालूच आहे. 'उपसंहार' ह्या पोटमथळ्यानंतरच लगेच 'वाजीकरण' या पोटमथळ्याखाली पुढील वाक्य आहे : 'वयःस्थापन करताना... जे उपचार करावयाचे असतात त्यास वाजीकरण असे म्हणतात.' या वाक्यावरून 'वाजीकरण' हा वयःस्थापनाच्या प्रक्रियेपैकीच एक भाग आहे. असा ग्रह होतो. तो जर खरा असेल तर वर 'उपसंहार' आलेला पोटमथळा व्यर्थ आहे.

पान ७७ (आ)

सर्व योगांचे कार्य

हे योग कोणते ? या पारिभाषिक शब्दाचे स्पष्टीकरण लेखात आढळत नाही.

'दूध, तूप, मसारस, ऊस'

मसारस म्हणजे कशाचा रस ?

'संभोगाच्या वेळी स्त्रीने तेल आणि उडीद ही अधिक असलेला आहार घेण्यास व पुरुषाने दूध, तूप, यांशी भात खावयास सांगितला आहे.'

या वाक्यातील 'संभोगाच्या वेळी' या ऐवजी 'संभोगाच्या आधी वा नंतर' अशासारखा

शब्दप्रयोग अधिक अर्थपूर्ण होईल.

पान ७८ (अ)

'आनंद हा शुक्रधातुचा स्थायी भाग आहे' भाग की भाव ?

'वयःस्थापनचिकित्सा... ह्या नैष्ठिकी चिकित्सेची भूमिका तयार करतात'-

-यातील नैष्ठिकी चिकित्सा म्हणजे काय ? या पारिभाषिक शब्दाचे स्पष्टीकरण लेखात आढळत नाही.

'वयःस्थापन' हा लेख रचनेच्या, प्रतिपादनाच्या दृष्टीने एकदरीत शिथिल व पारिभाषिक शब्दयोजनेच्या दृष्टीने बोजड वाटतो. या लेखाला सुमारे तीन पाने किंवा सहा स्तंभ दिले आहेत. या लेखातील वर्णन आयुर्वेदातल्या विवेचनाला धरून असेल; परंतु त्याचे सत्यत्व आधुनिक शास्त्रीय कसोटीला उतरते की नाही याचा ऊहापोह लेखात केलेला नाही. विश्वकोशात 'वैद्यक' या विभागाला ९०० पाने योजलेली आहेत. त्यात आयुर्वेदाला किती पाने देणार याची फोड 'विश्वकोशाच्या स्वरूपवर्णना'त दिलेली नाही. आयुर्वेद या विभागात येणारे अधिक महत्त्वाचे व शास्त्रीय कसोटीस उतरणारे अनेक विषय येणार त्यांचा विचार करता 'वयःस्थापन' या विषयास दिलेली तीन पाने विश्वकोशाच्या प्रमाणबद्ध पृष्ठयोजनेत बसण्यासारखी आहेत की काय, अशी शंका उत्पन्न झाल्याशिवाय राहत नाही.

'विचारनियम' पान ७९ (अ)

'हा नियम... आशयात्मक आहे, रूपात्मक नाही हे उघड आहे.'

या वाक्यातील 'रूपात्मक' याचा निश्चित अर्थ काय हे स्पष्ट होत नाही. 'पारिभाषिक शब्दसंग्रहातही 'रूपात्मक' या शब्दाचा समावेश आढळत नाही.

'व्हेटो' पान ८३ (अ)

'निलंबी रोधाधिकाराची उदाहरणे...,

निलंबी रोधाधिकार याला पारिभाषिक शब्दसंग्रहात 'Delaying Veto' असा मूळ इंग्रजी शब्द आहे. 'Delaying' करिता 'विलंबी' या प्रघातातील सुलभ शब्दाऐवजी 'निलंबी' हा शब्द का बनविला ते कळत नाही.

'सहशिक्षण' पान ८६ (अ)

'अमेरिकेत पूर्व भागातील जुन्या संस्थानांतून मुला- मुलींचे शिक्षण स्वतंत्र आहे; परंतु पश्चिमेकडील बहुसंख्य संस्थानांत संपूर्ण सहशिक्षण आहे. जपाननेही महायुद्धानंतर अमेरिकेचे धोरण स्वीकारलेले आहे.'

आता प्रश्न असा की, जपानने कोणत्या भागातील अमेरिकेचे धोरण स्वीकारले आहे ? पूर्वभागातील की पश्चिमेकडील अमेरिकेचे ? स्वतंत्र शिक्षण की सहशिक्षण ?

स्थापत्य अभियांत्रिकी पान ८६ (अ)

'जलनिष्कासव्यवस्था'

या शब्दाचा पारिभाषिक शब्दसंग्रहात समावेश आढळत नाही.

'हंबोल्ट' - पान ८९ (अ)

'प्रकृति- वैज्ञानिक'

या शब्दाचा पारिभाषिक शब्दसंग्रहात समावेश झालेला नाही.

पान ८९ (आ)

'जलविभाजक,' 'चुंबकीय दिग्पात' (---दिक्पात) यांचाही पारिभाषिक शब्दसंग्रहात समावेश नाही.

'चिंबोराझो हे त्यावेळपर्यंतचे मानवाने जिंकलेल्यापैकी सर्वांत उंच शिखर त्यांनी जिंकले.'

या वाक्यात काय अभिप्रेत आहे ? मानवाने जिंकलेल्यांपैकी की न जिंकलेल्यांपैकी ?

प्रत्येक लेखाच्या शेवटी जरूर तेथे संदर्भसाहित्य विश्वकोशाच्या एतद्विषयक धोरणानुसार या परिचयग्रंथात दिले आहे; परंतु त्या धोरणाप्रमाणेच 'ध्रुवीय प्रकाश' या लेखाच्या शेवटी संदर्भसाहित्य द्यावयास पाहिजे होते. ते का दिले नाही हे कळत नाही. शिवाय हंबोल्ट व हेरोडोटस यांच्या स्वतःच्या सुप्रसिद्ध ग्रंथांच्या (शक्य तर नवीन) आवृत्तींचा उल्लेख त्यांच्यावरील लेखांच्या संदर्भसाहित्यात असावयास पाहिजे असे अभ्यासू वाचकाच्या दृष्टीने सुचवावेसे वाटते.

'नमुन्याच्या नोंदी' मधील प्रत्येक पानावर त्या पानात कोणते लेख आले आहेत त्यांचा मथळा दिलेला आहे; पण हे मथळे देण्याबाबतचे धोरण एकसारखे दिसून येत नाही. उदाहरणार्थ ६९ व्या पानावर 'मृगशृंगे आणि शिंगे', 'मेट्रिक पद्धती' असा मथळा दिला आहे. त्या पानावर 'मृगशृंगे' या लेखाचा शेवटचा उर्वरित भाग आणि 'मेट्रिक पद्धती' या लेखाचा प्रारंभ होऊन तो चालू झाला आहे. याउलट ७५ व्या पानावर 'वयःस्थापन' एवढाच मथळा आहे; पण वास्तविकपणे त्या पानावर 'वनस्पतीसंग्रह' या लेखाचा शेवटचा उर्वरित भाग आला असून 'वयःस्थापन' या लेखास प्रारंभ होऊन तो लेख चालू झाला आहे. म्हणून पानावरील मथळे देण्याबाबत एक समान धोरण ठेवणे उचित होईल.

'नमुन्याच्या नोंदी' च्या आरंभी प्रास्ताविकात (पान ३०) असे धोरण जाहीर केले आहे की, "नोंदी लावण्यासाठी मराठी विश्वकोशात पुढील वर्णक्रम स्वीकारलेला आहे : अ, ओ, औ, इत्यादी," परंतु या धोरणाची अंमलबजावणी प्रस्तुत परिचयग्रंथात आढळून येत नाही. उदाहरणार्थ, 'हंगेरीतील उठाव' व 'हंबोल्ट' या नोंदी 'हिमरू' यो नोंदीच्या आधी आल्या आहेत. वर नमूद केलेल्या धोरणाप्रमाणे 'हिमरू'... 'हेरोडोटस' या नोंदीनंतर 'हंगेरी,' 'हंबोल्ट' या नोंदी येणे उचित झाले असते.

**(नवभारत, सप्टेंबर १९६५)**

ooo

# लेखक-संपादकांच्या दृष्टीने स्पष्टीकरण

सदाशिव आठवले, वाई

## गैरसमज दूर करणे हेतू :

तारीख १-८-६५ च्या ‘विशाल सह्याद्री’ त मराठी विश्वकोश-परिचयग्रंथाचे परीक्षण आले आहे. तज्ज्ञांनी व सामान्य वाचकांनी मोकळेपणाने मतप्रदर्शन करून ह्या मोठ्या कामात संबंधितांना मार्गदर्शन करावे हा मुळी परिचयग्रंथ काढण्यातील एक हेतूच आहे. त्यामुळे विश्वकोश कार्यालय अभिप्रायाचे व टीकांचे स्वागतच करते. मात्र समीक्षकांचे काही गैरसमज दिसून आले किंवा त्यांच्या लिहिण्यामुळे जनतेत गैरसमज पसरण्याचा संभव दिसला तर त्यासंबंधी जागरूकतेने योग्य ते खुलासे देणे हेही आमचे कामच आहे. आणि म्हणूनच ‘विशाल सह्याद्री’ तील परीक्षणावर खालीलप्रमाणे चार गोष्टी लिहाव्या लागत आहेत.

## हंगेरीतील उठावाची नोंद :

(१) परीक्षणात ‘संदर्भग्रंथात मतप्रदर्शन’ अशा उपशीर्षकाखाली पहिला प्रश्न विचारला आहे की, ‘हंगेरीतील उठाव’ ही वेगळी नोंद कशाला ? त्या उठावासंबंधीची माहिती ‘हंगेरी’ देशावरील नोंदीत वाचकांना अपेक्षित असणार, असेही पुढे म्हटले आहे. विश्वकोश अधिकाधिक संदर्भसाहाय्य देण्यासाठी असतो. जे वाचक ‘हंगेरीतील उठाव’ हा विषय त्याच शीर्षकाखाली काढून पाहतील त्यांनाही तो चटकन् मिळावा हाच हेतू अशी स्वतंत्र नोंद करण्यात असतो. ‘हंगेरी’ काढून पाहणाराला वरील उठावावरील नोंद वेगळी आहे हे तेथे दर्शविले जाईलच. ‘फ्रेंच राज्यक्रांती’ ही नोंद कोणताही मान्यवर कोश वेगळीच देतो. फ्रान्सच्या इतिहासाखाली गुंडाळीत नाही. ती मोठी घटना सोडली तरी ‘अँग्लोजॅपनीज अलायन्स’ असा एक लहानसा विषय, की जो इंग्लंडच्या इतिहासात घालता येईल, त्यासाठी एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका व एन्सायक्लोपीडिया अमेरिकाना ह्या दोन कोशांनी वेगळी नोंद केली आहे; पण ह्याबाबत मतभेद होऊ शकतात. उदाहरणार्थ, वरील ‘अँग्लोजॅपनीज अलायन्स’ ही नोंद कोलियर्स व चेंबर्स ह्या कोशातून दिलेली नाही. हा विश्वकोशाचा परिचयग्रंथ आहे. विश्वकोशाचा ‘ह’ चा खंड प्रसिद्ध होण्याचे वेळी ‘हंगेरीतील उठाव’ ही सध्या बोलबाला असलेली घटना विस्मृतीत गेली तर कदाचित् त्यावेळी वेगळ्या नोंदीत घातली जाणारही नाही किंवा कदाचित् महत्त्वाची ऐतिहासिक घटना म्हणून घेतली जाईल.

संदर्भसौकर्यासाठी नोंदीची निवड करावयाची असते. ती नोंद स्वतंत्र देणे किंवा हंगेरीच्या इतिहासाखाली तो मजकूर जाणे ह्या दोहोंपैकी काहीही चूक नाही, हे वरील 'अँग्लोजॅपनीज अलायन्स' च्या उदाहरणावरून लक्षात यावे.

## देशातील मत व्यक्त केले :

ह्याच नोंदीवर टीका करताना टीकाकार कोशात मतप्रदर्शन झाले आहे असा शोध लावतात. हा शोध अप्रामाणिकपणाचे पोटी जन्मलेला आहे. भारताची भूमिका स्पष्ट सांगितली आहे आणि नंतर भारताने यापेक्षा अधिक स्पष्टपणे रशियाविरोधी भूमिका घ्यावयास हवी होती असेही देशात तीव्रपणे व्यक्त झाले असे म्हटले आहे. लेखकाने आपले मत दिले नसून देशात काय मत व्यक्त झाले ते सांगितले आहे; पण समीक्षकाने खुशाल वाक्याचा अर्धाच भाग उद्धृत करून लेखक-संपादकांवर मतप्रदर्शनाचा आरोप केला आहे. कोशातील मजकुराबाबत प्रामाणिक मतभेद आम्ही समजून घेऊ; पण जिथे मूळ विधान आहे तसे उद्धृत करण्याची सुद्धा नीती नाही तेथे कशाला काय समजून घ्यायचे ?

(२) मृगशृगे आणि शिंगे ' ह्या नोंदीवरील टीकेला त्या नोंदीचे लेखक प्रा. ज. नी. कर्वे स्वतंत्रपणे उत्तर देत आहेत.

## पीटर द ग्रेट :

(३) 'पीटर द ग्रेट' ह्या साध्या वर्णनपर चरित्रनोंदीतील काही उणिवा लक्षात घेण्यासारख्या आहेत अशी सुरूवात करून टीकाकार पहिली उणीव दाखवितात ती अशी की, पीटर १६९५ मध्ये खरा सत्ताधीश झाला ही म्हणे आम्ही चुकीची माहिती दिली आहे. टीकाकारमहाशय, (१) एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका, (२) एन्सायक्लोपीडिया अमेरिकाना (३) चेंबर्स एन्सायक्लोपीडिया आणि (४) कोलियर्स एन्सायक्लोपीडिया उघडून पाहा ना! पाहा काही निराळे मिळते की काय ते. आणखी किती कोशांची नावे देऊ ? कोशांखेरीज रशियाच्या इतिहासावरील एखादे लहानसे पण प्रमाणभूत असे पुस्तक सांगू का ? Lionel Kochan यांचे The Making of Modern Russia हे १९६२ चे एक पेंग्विन प्रकाशन पाहावे. त्यातील पृष्ठ ९५ वरील तिसरा परिच्छेद वाचावा. आम्ही कोशात दिली आहे तीच माहिती मिळेल. आणखी पुष्कळ संदर्भग्रंथ आहेत; पण सांगून काय उपयोग? आमच्या विधानाची सत्यता पटविणारे असे एक सोपेसे वाक्यच उद्धृत करतो. "He was proclaimed tsar in 1682, but did not begin rule until 1695" (कोलियर्स एन्सायक्लोपीडिया १९६०) आणि पीटरला काही काळ आईच्या जरबेखाली राहावे लागले हेही समीक्षकांना खरे वाटत नाही. ह्याला आता आम्ही काय करणार ? आधी म्हणजे मूळ नोंदीतील संबंध विधान प्रामाणिकपणे आहे तसे घेतलेले नाही. मुळात असे आहे "काही काळ बहिणीच्या व काही काळ आईच्या जरबेखाली किंवा निदान त्यांच्या संमतीने त्याला कारभार पाहावा लागला"

असे झाले की नाही हे वर उल्लेखिलेले संदर्भसाहित्य वाचूनच वाचकांनी स्वतः ठरवावे. १७०९ मध्ये पीटरने बाराव्या चार्लसला पराभूत केले ही समीक्षकांची पांडित्यपूर्ण अशी माहिती आम्हीही दिली आहे; पण त्यावेळेस तो मिळालेले सर्व गमावण्याच्या अवस्थेला आला होता की नाही हे समीक्षकांनी पुन्हा एकदा सर्व संदर्भसाहित्य नीट परिशीलन करून पाहावे. मात्र पीटर सर्व गमावण्याच्या अवस्थेला आला होता' म्हणजे 'त्याने सर्व गमावले होते' असा अर्थ होत नाही हे लक्षात असू द्यावे. पुढे 'इराणशी त्याने बखेडा मांडला' ह्या वाक्यात समीक्षकांना काय चूक आढळली? समीक्षकांनी पीटरच्या मुलाच्या मृत्यूची जी हकीकत दिली आहे त्या घटनांची छाननी करण्यासाठी एक मोठा निबंधच लिहावा लागेल; पण त्याची येथे आवश्यकता नाही. 'स्वतःच्या मुलाला ठार करण्याइतका तो क्रूरकर्मा होता.' हे आमचे विधान एन्सायक्लोपीडिया अमेरिकानातील "(He) tortured his rebellious son to death" ह्या वाक्याशी किंवा वर्ल्ड बुक एन्सायक्लोपीडियातील "When his son Alexis opposed his When reform. work Peter had him executed." ह्या मजकुराशी ताडून पाहावे.

## 'पब्लिक एक्सपेंडिचर' :

(३) 'सरकारी खर्च' ह्या नोंदीवरील टीकेत तर समीक्षकांनी आपल्या डोंगराएवढ्या अज्ञानाचे प्रदर्शन मांडले आहे. त्यांना वाटते Public Expenditure म्हणजे 'सरकारी खर्च' कसे होते, 'सार्वजनिक खर्च व्हायला पाहिजे ! ह्या नोंदीच्या संदर्भात Public म्हणजे सरकारीच; समीक्षक समजतात त्या अर्थाने सार्वजनिक नव्हे हे अर्थशास्त्र शिकणाऱ्या कॉलेजमधील पी. डी. च्या वर्गातील कोणत्याही विद्यार्थ्याकडून समीक्षकांनी समजून घ्यावे. भारत सरकारचा पारिभाषिक शब्दसंग्रह किंवा रानड्यांचा इंग्रजी-मराठी शब्दकोश काढून पाहावा. तरीही नाही कळले तर आम्हाला लिहावे. खाजगीरीत्या किंवा वृत्तपत्रातून जसे वाटेल तसे-ज्या पद्धतीने विचारले जाईल त्याच पद्धतीने उत्तर मिळेल. आता मुळात शब्दार्थाबाबतच जिथे अशी तयारी आहे तिथे त्या नोंदीच्या संबंधातील समीक्षकांच्या इतर मुद्द्यांवर वाद करावयाच्या भानगडीत आम्ही न पडणेच शहाणपणाचे !

(४) कोशात काही शब्दयोजना अस्पष्ट किंवा अवघड राहते हे आम्हास मान्य आहे. आमच्या परिचयग्रंथातही असा काही भाग राहिला आहे हे आम्ही कबूल करू; पण तरीही समीक्षकांनी 'संदिग्ध शब्दप्रयोगा'ची म्हणून जी उदाहरणे दिली आहेत ती वाचून आश्चर्यच वाटते. "२१ वर्षे वयाच्या सर्व नागरिकांना मताधिकार आहे" म्हणजे २१ वर्षांवरील व्यक्तींनाही तो आहे हे म्हणे कळत नाही. 'एक वर्षाचा मुलगा स्वतःच्या हाताने खातो, जेवतो असे म्हणणे ही एक मराठी भाषेची मोडणी आहे. अशासारख्या कोणत्याही वाक्याचा अर्थ मराठी जाणकाराला नीट समजतो. 'एक वर्षाचा मुलगा स्वतः हाताने खातो, जेवतो' म्हणजे तो एक वर्षाचा असेपर्यंतच खातो, जेवतो आणि मुलगा स्वतः दोन वर्षांचा झाला

की आई त्याला पुन्हा भरवू लागते असा अर्थ कुणी करतात काय ? प्रस्तुत समीक्षक सोडून आणखी कोणाही मराठी माणसाचा असा गैरसमज होणार नाही असा आमचा विश्वास आहे. तेव्हा चुकीच्या शब्दप्रयोगांची टीकाकारांनी दिलेली सर्व उदाहरणे काय जातीची आहेत हे वाचकांनी स्वतःच पाहावे.

(५) आमच्या वर्णक्रमात विसंगती नाही, हा वर्णक्रम इतर वर्णक्रम पद्धतीहून निराळा आहे हे खरे. तो काय आहे ते नोंदीपूर्वी प्रास्ताविकात दिलेले आहे.

कार्याची महती कमी होत नाही :

(६) समीक्षकांनी उपस्थित केलेल्या काही अनावश्यक आणि हास्यास्पद मुद्यांचीही दखल घेणे आवश्यक आहे. ह्या कामासाठी ६० लक्ष खर्च होणार आहे. हा गैरलागू मुद्दा परीक्षणात कशाला? हा आकडा कोठे मिळाला? 'परिचयग्रंथात' तर त्याचा कुठेही उल्लेख नाही, तसेच ज्ञानकोशकार डॉ. केतकर ह्यांचा संबंध तरी या परीक्षणात कसा येतो? आमच्या नसलेल्या चुका समीक्षकांना सापडतात; पण ज्या डॉ. केतकरांचा समीक्षक आवर्जून उल्लेख करतात त्यांच्या ज्ञानकोशात अशा मुद्रणदोषांच्या आणि शब्दांच्या चुका तर आहेतच; पण गंभीर स्वरूपाच्या संपादनाच्या चुकाही कितीतरी आहेत; पण तरीही ते काम मातीमोल झाले असे आम्ही मानीत नाही. तसेच नवीन मराठी विश्वकोशातही चार- दोन गोष्टी राहून गेल्या किंवा संदिग्ध राहिल्या (खरोखरीच्या, समीक्षक दाखवितात तसल्या नव्हेत !) तर तेवढ्याने त्या कार्याची महती मुळीच कमी होत नाही.

**टीकेला उत्तर का देत आहोत :**

'फिनलंड'चा नकाशा आहे तेथून एक पान अलीकडे बांधायला हवा होता ही एकच काय ती समीक्षकांनी दाखविल्यापैकी खरी चूक आहे. ही चूक संपादनाची नाही. साधी बांधणीची चूक आहे. एवढी एक अगदीच किरकोळ अशी बाब सोडली तर उरलेल्या सर्व टीकेत टीकाकारांनी स्वतःचे अज्ञान, उथळपणा, अप्रामाणिकपणा आणि दूषित दृष्टिकोन जगजाहीर केला आहे. ह्यापलीकडे काही नाही. वास्तविक अशा टीकांना उत्तरेही देऊ नयेत. पण भ्याडपणे किंवा सुरक्षितपणे, बिननावाने किंवा टोपणनावाने लिहीत राहून जनतेमध्ये एखाद्या चांगल्या कार्याबद्दल गैरसमज पसरविण्याचे जे काम पद्धतशीरपणे चाललेले असते, ते लक्षात घेऊन केव्हातरी कार्यकर्त्यांनी आपली भूमिका स्पष्ट करणेही आवश्यक असते आणि म्हणूनच चांगल्या विधायक कामी लागू शकणारी वेळ व शक्ती भलत्याच कामी अगदी अनिच्छेने व नाइलाजाने खर्ची घालावी लागते; पण आवश्यकच असेल तर न दमता तेही आनंदाने करू. टीकाकार आपापल्या खऱ्याखुऱ्या नावानिशी पुढे येऊन लिहू लागतील तर उत्तरे देण्यात विशेषच आनंद होईल.

**(नवभारत, ऑगस्ट, १९६५)**

○○○

## Lt Gen. S. P P. Thorat (Retd.) A. C. D. S. O.

No. 2/ General

Maharashtra Public Service Commission
Bank of India Building, Mahatma Gandhi Road,
Bombay-1,
18th Aug, 1965

**Dear Laxman Shastriji,**

I write this to thank you for your kind letter of the 6th inst. forwarding the introductory volume of the Vishwa-Kosha.

I have read the volume with much interest and am confident that in its full and final shape, it will be a notable addition to Marathi literature. It will certainly fulfil a long felt want and will be an invaluable reference book for the old and young alike.

May I offer you and through you to your colleagues, my very sincere congratulations on this volume and on the great work which you have undertaken.

With kindest regards,

Yours Sincerely
**S. P. P. THORAT**

ooo

इन्स्टिट्यूट ऑफ ॲग्रिकल्चर रीसर्च स्टॅटिस्टिक्स,
नवी दिल्ली.
तारीख २३ ऑगस्ट, १९६५.

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी,**
प्रमुख संपादक, विश्वकोश, यांस,
स. नमस्कार,

आपण पाठविलेला विश्वकोशाचा परिचयग्रंथ मिळाला. त्याबद्दल आभारी आहे. ग्रंथ वाचला. त्यावरून मराठी भाषा व संस्कृती यांना समृद्ध करण्यात व मराठी वाचकाला नवयुगीन ज्ञानाचे भांडार उघडे करून देण्यात विश्वकोश किती महत्त्वाचे काम करणार आहे याची चांगली कल्पना येते. आपण हाती घेतलेल्या कामाचा व्याप किती मोठा आहे व तो किती कसोशीने पार पाडण्याची आपण तयारी करत आहात हेही उत्तमपणे ध्यानात येते. दोन तीन गोष्टींबाबत काही विचार आपणापुढे ठेवीत आहे.

परिभाषेसंबंधात आपण प्रस्तावनेत मांडलेले विचार अत्यंत योग्य आहेत. शास्त्रीय ज्ञानाचे माध्यम म्हणून परिभाषा यथातथ्य असणे फार जरूरीचे आहे. त्याकरिता दार्शनिक सोपेपणाला बळी न पडता व प्रारंभिक बोजडपणाचा दोष पत्करूनही परिभाषेच्या मूलभूत रूपात विकृती आणता कामा नये, कारण त्यामुळे अर्थाचा घोटाळा होऊन परिभाषा वापरण्याचा मुख्य उद्देश विफल होतो. फार मोठ्या प्रमाणावर शास्त्रीय ज्ञान मराठीतून उपलब्ध करून देण्यात विश्वकोश पुढाकार घेणार आहे. तेव्हा विश्वकोशातील मजकूर समजण्याकरिता १८ व्या खंडातील पारिभाषिक शब्दकोश शक्य तितका संपूर्ण असणे आवश्यक आहे. त्या कोशात जे शब्द घालावयाचे ते जरूरीपेक्षा कमी असण्यापेक्षा जरूरीपेक्षा अधिक असलेले बरे. हा शब्दकोश विश्वकोश समजण्याचे साधन तर आहेच; पण मराठीत शास्त्रीय लिखाण करणारांना मोठी मदत देणार आहे व १८ व्या खंडाला पारिभाषिक शब्दांच्या डिक्शनरीचे रूप देण्याने त्या खंडाला स्वतंत्र महत्त्व येणार आहे. शिवाय मराठीत यापुढे होणाऱ्या शास्त्रीय लिखाणातील परिभाषेला एकरूपता येण्याकरिता या शब्दकोशाचा उपयोग होणार आहे. म्हणून त्याचे स्वरूप संकुचित न ठेवता विस्तृत असावे असे वाटते. हा विचार सुचण्याचे कारण पान २८ वरील सांख्यिकीमधील प्रतिदर्श व गुणनियंत्रण हे शब्द कोशात सापडले नाहीत.

ऑयलरसंबंधी पान ३६ वर असलेल्या माहितीत एका महत्त्वाच्या गोष्टीचा समावेश होणे आवश्यक वाटते. ऑयलरने Orthogonal latin Squares वर विशेष काम केले होते व असे Orthogonal Squares ज्या Latin Square ची बाजू Prime नंबर किंवा

Prime नंबरची Power आहे अशा सर्व Latin Squares ना असतात असे त्याने दाखविले आहे. आणखी, ज्या Latin square ची बाजू 4n + 2 आहे ( n हा कोणताही नंबर असू शकतो ) त्या Square ला Orthogonal Squares नसावेत असा त्याचा तर्क होता; पण नुकतेच बोस व श्रीखंडे या हिंदी सांख्यिकी शास्त्रज्ञांनी 6x6 Latin Square सोडला तर बाकीच्या बाबतीत निदान दोन तरी Orthogonal Squares असू शकतात असे सिद्ध करून ऑयलरचा अंदाज बरोबर नव्हता असे दाखविले आहे.

परिचयग्रंथ परीक्षण

एक लहान गोष्ट आपल्या नजरेस आणावयाची ती पान ४७ वर टापिओका खाली जे रेखाचित्र आहे त्यातील पानाचा आकार व रूप टापिओकाच्या पानासारखे नाही. सोबत जी पुस्तिका पाठविली आहे तीमधील पान ३ व विशेषतः पान ७ वरील फोटोवरून टापिओकाच्या पानाची योग्य कल्पना येईल.

कळावे, हे विनंती.

आपला,

**वि. गो. पानसे**

OOO

Ram Narayan Ruia College,
Physics Dept.
Bombay-19,
1st September, 1965.

The General Editor,
Marathi Vishvakosh,
Vishwakosh Unit Office,
WAI (Dist. Satara).

**Dear Sir,**

I thank you very much for the copy of the "Marathi Vishvakosh Parichaya ".

I liked the size, the type and reproduction of figures. I have gone through the articles on topics in Physics. In such a type of work, whatever little information one gets, one wants it to be up to date.

While going through the article on Metric System (Page 70) there is a reference to the Standard Metre. The red line of cadmium in the cadmium are was accepted as standard in 1927 in the Seventh General Conference on weights and Measures. As this line was not very sharp (because of isopic and Doppler effect) attempts were made in 1950 to replace it by the green line of mercury 198. This was not a very satisfactory replacement. Therefore, in 1960 at the eleventh General Conference, it was accepted to use orange-red line in the spectrum of Krypton 86. The number of waves of this line in the standard metre was found to be 1650763-73.

I do not know whether I am competent enough to critise this. I felt that we should have an upto date information as far as possible.

Thanking you again for the copy,

Yours sincerely,
**R. D. GUPTE**

ooo

September 4, 1955

To

The Chief Editor,

Marathi Encyclopaedia,

Marathi "Vishwa-Kosh" Office

Wai, (Maharashtra State.)

**Dear Sir,**

I have to acknowledge with thanks your letter of the 16th August 1965, No. 4040, together with the specimen volume for the Marathi Encyclopaedia.

I have been very favourably impressed by the general get up as well as by the evidently high quality of the articles. When the entire Encyclopaedia is brought out in this style, it will bring great kudos to both Indian scholarship and book production.

I have however one suggestion to make. In your article on Logarithm you have brought in formulae and tables employing the letters of the Nagari script in place of the international Roman, retaining occasionally a character or other symbol which had no Roman equivalent. In a matter like this, since science is of an international value, a better plan, according to my lights, would be to keep to the international symbols, formulae and tables with the Roman letters, exactly as it is done in books not only in European languages using the Roman script but also in languages like Arabic, Japanese, Chinese, Siamese etc. which use different scripts. The same sort of thing, using the Nagari letters in place of international Roman, was attempted in the Hindi Encyclopaedia in its first volume. But in subsequent volumes, as far as I remember the international Roman symbols were restored. In another scientific article in this specimen

volume, e. g. that on a chemical subject (pages 33 ff.), the international Roman symbols have been used.

Thank you very much for having sent me this specimen, and I hope you will be able to complete the work without any delay.

Yours sincerely,

**Suniti Kumar Chatterji**

❍❍❍

दि. १ सप्टेंबर, १९६५

## मराठी विश्वकोश : परिचय-ग्रंथ : समीक्षण

प्रा. वि. म. बेडेकर

मराठी विश्वकोश : परिचय-ग्रंथ : समीक्षण

प्रमुख संपादक : लक्ष्मणशास्त्री जोशी

प्रकाशक : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृतीमंडळ,

मुंबई - ३२, (एप्रिल १९६५), पृष्ठे- १२१

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ १९६० साली स्थापन झाले. या मंडळाने जे कार्यक्रम हाती घेतले त्यात अग्रगण्य म्हणजे मराठीमध्ये एनसायक्लोपीडिया ब्रिटानिकाच्या धर्तीवर एक सर्वविषयसंग्राहक विश्वकोश प्रकाशित करणे हा होय. मराठीमध्ये राज्यसंस्थेने आर्थिक व संघटनात्मकदृष्ट्या पुरस्कारिलेला, एवढ्या व्यापक प्रमाणावर विश्वकोशनिर्मितीचा सुसंघटित व योजनाबद्ध असा हा पहिलाच प्रयत्न आहे. सुमारे ४०-४५ वर्षांपूर्वी मराठीतील पहिले ज्ञानकोशकार कै. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी आपला मराठी ज्ञानकोश प्रसिद्ध करून भारतीय भाषांच्या क्षेत्रात एक अभूतपूर्व कार्य करून दाखविले. एका असामान्य कर्तृत्वशाली थोर विभूतीने प्रामुख्याने आपल्या वैयक्तिक जबाबदारीवर, खासगी प्रयत्नांच्या आधारावर, अनेक आर्थिक व व्यावहारिक अडचणींशी झुंजत एक महान् कामगिरी पार पाडली. त्यानंतर मध्यंतरीच्या काळात सर्वविषयसंग्राहक ज्ञानकोश काढण्याचे खाजगी प्रयत्न चालू आहेत. केतकरांचा ज्ञानकोश निघाल्यापासून गेल्या पन्नास वर्षांत ज्ञानविज्ञानांच्या कक्षा खूपच विस्तारल्या आहेत. समाजातील सर्व थरातील व्यक्तींची भूक वाढत आहे. या गोष्टी लक्षात घेऊन अद्ययावत् मराठी विश्वकोशाची रचना करणे ही आज निकडीची गरज आहे. महाराष्ट्र राज्याने ही समाजाची गरज लक्षात घेऊन, याविषयी उत्पन्न होणारे संघटनात्मक व आर्थिक प्रश्न सोडवून हे काम हाती घेतले आहे हे निःसंशय अभिनंदनीय होय. आगामी विश्वकोशाचे स्वरूप कोणत्या प्रकारचे राहणार, विश्वकोश कार्यालयाच्या द्वारे सर्व क्षेत्रातील विद्वान माणसे एकत्र आणून जे कार्य शासनसंस्थेने आरंभिले आहे, ते कोणत्या पद्धतीने व दिशेने चालू आहे याबद्दल शिक्षित जनतेत साहजिकच कुतूहल व औत्सुक्य आहे. ते बऱ्याच अंशी प्रस्तुत 'मराठी विश्वकोश : परिचय-ग्रंथा'ने तृप्त होईल, यात शंका नाही.

प्रस्तुत 'परिचय-ग्रंथ' बहिरंग व अंतरंगदृष्ट्या आगामी विराट् विश्वकोशाची एक छोटीशी

प्रातिनिधिक प्रतिकृती वाटावी अशी या ग्रंथाची आखणी केली आहे. आकार मोठा एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिकाचा घेतला असून कागद, छपाई, विषयोपात्त साधी व रंगीत चित्रे आणि सजावट आकर्षक आहे. मात्र, या ग्रंथाच्या वेष्टणावरील प्रतीकात्मक चित्राच्या आकर्षकतेविषयी मतभेद होणे शक्य आहे, कलात्मक दृष्टीच्या काही प्रौढांना या प्रतीकात्मक चित्रातील, रंगसंगती (की रंगविसंगती). अतिभडक,बटबटीत व विश्वकोशासारख्या परिपक्व ज्ञानाचे सार प्रौढांकरिता ग्रंथित करणाऱ्या ग्रंथाच्या दृष्टीने अनुचित वाटण्याचा संभव आहे. अशा ग्रंथाला जर वेष्टणावर चित्र द्यावयाचेच असेल तर ते सौम्य, शांत, संयत आणि अधिक अर्थपूर्ण-प्रतीकमय असावे असे वाटते.

प्रस्तुत ग्रंथाच्या पहिल्या १ ते २८ पृष्ठात आगामी विश्वकोशाच्या स्वरूपाचे वर्णन केले आहे. अशासारख्या सर्वविषयसंग्राहक मराठी विश्वकोशाची आवश्यकता, त्यातील विषयांची रचना, त्यातील लेखांच्या प्रतिपादनाचे व शैलीचे स्वरूप, पारिभाषिक शब्दयोजनेबद्दलचे धोरण इत्यादींचे संक्षिप्त विवेचन वाचले असता, संपादकमंडळाचे ध्येय आणि व्यवहार यांचा समन्वय साधणारे औचित्यपूर्ण व उदार धोरण विशेष नजरेत भरल्याशिवाय राहत नाही. कोशात प्रमाणबद्धता राखण्याच्या दृष्टीने विश्वकोशात यावयाचे विषय आणि त्यांची पृष्ठसंख्या याबाबतचे तपशील एकंदर पृष्ठांची कक्षावार किंवा विभागवार वाटणी देऊन मांडून दाखविले आहेत. विश्वकोशात मुख्यतः दोन कक्षांमधील विषयांवर लेख येणार आहेत, एक, मानव्यविद्या कक्षा व दुसरी विज्ञान व तंत्र कक्षा. यांपैकी प्रत्येक कक्षेला ८५०० पृष्ठे दिली जाणार असून, दोन्ही कक्षांची एकंदर १७००० पृष्ठे होणार आहेत. विश्वकोशाचा प्रत्येक खंड सुमारे एक हजार पानांचा, असे सतरा खंड या दोन कक्षा - मानव्यविद्या व विज्ञान व तंत्र - व्यापतील. विश्वकोशाचे एकंदर एकोणीस खंड होणार आहेत. वरील सतरा खंडांनंतरचा अठरावा खंड पारिभाषिक शब्दसंग्रहाकरिता आहे. त्यात विश्वकोशात आलेल्या पारिभाषिक शब्दांच्या मराठी-इंग्रजी व इंग्रजी-मराठी या दोन अकारविल्हे रचलेल्या सूची दिल्या जातील. त्यानंतरचा अखेरचा एकोणिसावा खंड सूची व नकाशे खंड म्हणून राहील. या सूचिखंडात विश्वकोशातील नोंदींची शीर्षके, नोंदीच्या मजकुरात येणारी व्यक्तिनामे व स्थलनामे, विषय, पोटविषय तदन्तर्गत कल्पना इत्यादींची अकारानुक्रमाने माहिती मिळेल. याशिवाय या सूचिखंडात सुमारे दोनशे मोठे नकाशे देण्यात येणार आहेत.

"विश्वकोशाच्या स्वरूपा'च्या वर्णनात मानव्यविद्या कक्षा या भागातील मुख्य विषय व त्याचे पोटविषय यांची तपशीलवार फोड (Break-Up) दिली असून, त्या तपशिलातील प्रत्येक विषयाला व पोटविषयाला देऊ केलेली पृष्ठे यांचा निर्देश केला आहे. मानव्यविद्याकक्षेतील विषयांच्या या तपशीलवार फोडीला १६ पृष्ठे (७ ते २२) दिलेली आहेत. इतक्या बारकाव्याने केलेले विषयांचे व पोटविषयांचे विभाजन विश्वकोशाचे स्वरूप लेखकांच्या दृष्टीने शक्यतो काटेकोरपणे निश्चित करण्यास व त्या त्या विषयाची प्रमाणबद्धता

विश्वकोशाच्या प्रचंड संदर्भात अजमावण्यास खात्रीने सहायभूत होईल. विज्ञान व तंत्र विद्या या कक्षेत इतकी बारीक तपशीलवार विषयानुरूप पृष्ठसंख्येची फोड झालेली दिसून येत नाही, या कक्षेतील मुख्य विषयांची केवळ पृष्ठसंख्या दिली आहे. त्यातील पोटविषयांची पृष्ठतः तपशीलवार फोड दिलेली नाही. या कक्षेच्या विवरणाला सुमारे पाचच पाने दिलेली आढळतात.

यानंतर या 'परिचय-ग्रंथा'त पृष्ठे ३१ ते ९३ 'नमुन्याच्या नोंदी' दिल्या आहेत. या 'नमुन्याच्या नोंदी' म्हणजे विश्वकोशात पहिल्या सतरा खंडातून विविध विषय कोणत्या पद्धतीने व शैलीने विवेचिले जाणार आहेत त्याचा नमुना म्हणून दिल्या आहेत. त्यानंतर पृष्ठे ९७-११२ यातून पारिभाषिक शब्दसंग्रहाच्या मराठी-इंग्रजी व इंग्रजी-मराठी अशा दोन सूची दिल्या आहेत. त्यापुढे पृष्ठे ११५-१२१ यामधून शब्दसूची दिली आहे. अर्थात् पारिभाषिक शब्दसंग्रहांच्या दोन सूची व शेवटची शब्दसूची या परिचयग्रंथामधील 'नमुन्याच्या नोंदी' तील शब्दांवरच आधारलेल्या आहेत. तात्पर्य, 'नमुन्याच्या नोंदी' पारिभाषिक शब्दसंग्रह - सूची आणि शब्दसूची या अनुक्रमे विश्वकोशाचे आगामी १-१७ खंड, १८ वा खंड व १९ वा खंड यांचे ईपत्-दर्शन करून देणाऱ्या आहेत. १९ व्या खंडात शब्दसूचीशिवाय नकाशेही येणार आहेत. प्रस्तुत 'परिचयग्रंथा'त १९ व्या खंडाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या शब्दसूची या भागात नकाशाचा अंतर्भाव केलेला नाही. 'नमुन्याच्या नोंदी'त फिनलंड या नोंदीसमोर फिनलंडचा रंगीत नकाशा दिला आहे. अशा नकाशांसारखे नकाशे शेवटच्या १९ व्या खंडात कदाचित् येणार असतील.

"नमुन्याच्या नोंदी" हाच भाग विश्वकोशाच्या अंतरंगाचा खरा प्रतिनिधिभूत असून त्यासंबंधी अधिक ऊहापोह करणे उचित होईल. 'नमुन्याच्या नोंदी' एकंदर ५४ आहेत. (शेवटच्या 'शब्दसूची' विभागात या नोंदीचे शब्दही दिले आहेत व ते जाड टाइपात दाखविले आहेत. त्यात मार्क्स हा शब्द नोंदीच्या शब्दात नसूनही जाड टाइपात दाखविला आहे !)

या ५४ नोंदींचे मानव्यविद्या आणि विज्ञान व तंत्र या दोन कक्षांखाली वर्गीकरण करावयाचे झाल्यास ते स्थूल मानाने असे होईल :

| **मानव्यविद्या कक्षा (३२)** | | **विज्ञान व तंत्र कक्षा (२२ )** | |
|---|---|---|---|
| अर्थशास्त्र | ४ | गणित | २ |
| इतिहास | ७ | प्राणिविज्ञान | २ |
| कायदा | १ | भूविज्ञान | ३ |
| तत्त्वज्ञान | २ | भौतिकी | ४ |
| भूगोल | १ | रसायनशास्त्र | २ |
| युद्धशास्त्र | १ | वनस्पतिविज्ञान | ४ |

| | | | |
|---|---|---|---|
| राज्यशास्त्र | ३ | अभियांत्रिकी | २ |
| शिक्षण | ३ | वैद्यक | ३ |
| भाषा व साहित्य | ७ | | —--- |
| कला | २ | | **२२** |
| खेळ | १ | | |
| | ----— | | |
| | **३२** | | |

काही नोंदीच्या अनुषंगाने, त्यातील विषय पुन:प्रत्ययाने स्पष्ट करणारी अनेक रेखाचित्रे व तीन रंगीत चित्रांच्या आर्टप्लेटस् दिल्या आहेत. 'मायावरण', 'ध्रुवीय प्रकाश', 'हिमरू-विणकाम,' हूण व त्यांची धाड' यांची रंगीत चित्रे फार सुंदर उतरली आहेत. 'हूण व त्यांची धाड' हे चित्र एखाद्या ऐतिहासिक चित्रावर आधारित आहे की लेखातील माहितीच्या आधारावर चित्रकाराने बनविले आहे. याचा उलगडा होत नाही. विषय ऐतिहासिक असल्याने शक्यतर एखाद्या जुन्या एतद्विषयक चित्रावर आधारलेले चित्र विश्वकोशात यावे, अशी वाचकांची अपेक्षा असते.

'नमुन्याच्या नोंदी' मधील सर्वच नोंदी त्या त्या विषयातील तज्ज्ञांनी लिहिल्या आहेत. त्यामुळे त्यातील माहिती त्या विषयाच्या ज्ञानाच्या दृष्टीने अधिकृत व बिनचूक असणार यात शंकाच नाही. लेखांच्या स्वरूपात थोडाफार फरक दिसून येतो तो काही लेखांतील प्रतिपादन शैलीमुळे व पारिभाषिक शब्द हाताळण्याच्या पद्धतीमुळे. आणि तसा फरक पडणे अपरिहार्यही आहे; पण अशा फरकामुळे कित्येक विषयांचे ग्रहण व्हावयास वाचकांस त्रास पडण्याचा संभव असतो, ही गोष्ट लक्षात घेऊन सर्वच लेखांची मांडणी होणे इष्ट आहे.

प्रस्तुत 'नमुन्याच्या नोंदी'त काही लेख पारिभाषिक शब्दांनी भरलेले असूनही, त्यांच्या प्रतिपादनात एक प्रकारची सहजता व सफाई दिसून येते. पारिभाषिक शब्द प्रतिपादनाशी एकरूप झालेसे वाटतात. उदाहरणार्थ, पारिभाषिक शब्दप्रचुर अशा पुढील काही लेखांकडे अंगुलिनिर्देश करता येईल : आर्किऑप्टेरिक्स, ख्यातिवाद, जंतुशास्त्र, ध्रुवीय प्रकाश, पुष्पबंध, विश्वस्थितिशास्त्र.

इतर काही नोंदीखालील लेखांतून अपुरी माहिती, शिथिल शब्दरचना व वाक्यरचना, पारिभाषिक शब्दांच्या पेरणीमुळे प्रतिपादनाला आलेली क्लिष्टता इत्यादी दोषांमुळे त्या त्या स्थळी वाचकाचा विरस होऊन ख़टकल्यासारखे होते. अशा स्थळांपैकी उदाहरणादाखल काही खाली निर्दिष्ट केली आहेत :

अतिवास्तववाद, ललित कलेतील

पान ३१ (अ)

'दृक्प्रत्ययवादानंतर'

‘दृक्प्रत्ययवाद’ हा कोणत्या इंग्रजी पारिभाषिक शब्दाचा प्रतिशब्द आहे ? शेवटी दिलेल्या पारिभाषिक शब्दसंग्रहात हा शब्द दिलेला नाही. ‘वस्तूच्या विरूपीकरणातील....’

‘विरूपीकरण’ म्हणजे काय ? ‘विद्रूप करणे’ हा अर्थ सामान्यतः या शब्दाचा आढळून येतो; परंतु तो अर्थ प्रस्तुत संदर्भात कसा लागू होतो ते कळत नाही. ‘गतिमानतेमुळे-’

‘गतिमानता’ हा शब्द बरोबर असू शकेल का ? मूळ शब्द ‘गतिमत्’ (dynamic) असून त्यापासून ‘गतिमान्’ शब्द झाला. ‘गतिमत्‘ या विशेषणापासून ‘गतिमत्ता’ हे भाववाचक नाम तयार व्हावे.

‘मानवी मनात आपापतः उठणाऱ्या तरंगांचा’

‘आपापतः’ ह्या शब्दाचा अर्थ काय ? का मूळ शब्द ‘आपाततः’ असून त्यात हा मुद्रणदोष झाला आहे ? परंतु ‘आपाततः’ याचा नेहमीचा अर्थ येथे वाक्यात जमू शकेल असे वाटत नाही.

‘कार्यकारणभावी दृष्टी’

‘कार्यकारणभावनिष्ठ’ हा शब्द अधिक समर्पक होऊ शकेल.

पान ३१ (आ)

‘उत्स्फूर्तता किंबहुना आपापता’ (Automatism)

‘आपापता’ ही शब्दसिद्धी लेखकाने कशी काय साधली ? या ‘आपापते’ चा कदाचित वर आलेल्या ‘आपापतः’ शी संबंध असावा. लेखकाने ज्या इंग्रजी शब्दाला हा प्रतिशब्द दिला आहे विचार करून लेखकाचा या शब्दामागील अभिप्राय हेरायचा प्रयत्न केल्यास या ‘आपाप’ चा संबंध ‘आपोआप’ या मराठी शब्दाशी तर नाही ना असे वाटू लागते. जर हा शब्द अभिप्रेत असेल तर ‘आपोआपतः’, ‘आपोआपता’ हे धेडगुजरी शब्द तयार होतील. -शेवटी दिलेल्या पारिभाषिक शब्दसंग्रहात ‘आपापता’ किंवा ‘Automatism’ या शब्दाचा अंतर्भाव आढळून येत नाही.

‘अतिवास्तववाद’ हा लेख वाचून झाल्यावर वाचकाच्या मनात साहजिकच अपेक्षा उत्पन्न होते की, या वादाचा भारतीय व महाराष्ट्रीय ललित ‘विचारनियम-’

पान ७९ (अ)

‘हा नियम... आशयात्मक आहे, रूपात्मक नाही हे उघड आहे’...

या वाक्यातील ‘रूपात्मक’ याचा निश्चित अर्थ काय हे स्पष्ट होत नाही. ‘पारिभाषिक शब्दसंग्रहातही ‘रूपात्मक’ या शब्दाचा समावेश आढळत नाही.

‘व्हेटो’

पान ८३ (अ)

‘निलंबी रोधाधिकाराची उदाहरणे.....’

‘निलंबी रोधाधिकार’ याला पारिभाषिक शब्दसंग्रहात ‘Delaying Veto’ असा मूळ

इंग्रजी शब्द आहे. 'Delaying' करिता 'विलंबी' या प्रघातातील सुलभ शब्दाऐवजी 'निलंबी' हा शब्द का बनविला ते कळत नाही.

'सहशिक्षण'

पान ८६ (अ)

'अमेरिकेत पूर्व भागातील जुन्या संस्थानातून मुला- मुलींचे शिक्षण स्वतंत्र आहे; परंतु पश्चिमेकडील बहुसंख्य संस्थानात संपूर्ण सहशिक्षण आहे. जपाननेही महायुद्धानंतर अमेरिकेचे धोरण स्वीकारले आहे.'

आता प्रश्न असा की, जपानने कोणत्या भागातील अमेरिकेचे धोरण स्वीकारले आहे ? पूर्वभागातील की पश्चिमेकडील अमेरिकेचे ? स्वतंत्र शिक्षण की सहशिक्षण ?

स्थापत्य अभियांत्रिकी

पान ८६ (अ)

'जलनिष्कासव्यवस्था'

या शब्दाचा पारिभाषिक शब्दसंग्रहात समावेश आढळत नाही.

हंबोल्ट-

पान- ८९ (अ)

'प्रकृति-वैज्ञानिक,

या शब्दाचा पारिभाषिक शब्दसंग्रहात समावेश झालेला नाही.

पान ८९ (आ)

'जलविभाजक', 'चुंबकीय दिग्पात' (= दिक्पात) यांचाही पारिभाषिक शब्दसंग्रहात समावेश नाही.

'चिंबोराझो हे त्यावेळपर्यंतचे मानवाने जिंकलेल्यापैकी सर्वांत उंच शिखर त्यांनी जिंकले.'

या वाक्यात काय अभिप्रेत आहे ? 'मानवाने जिंकलेल्यांपैकी की न जिंकलेल्यापैकी ?'

प्रत्येक लेखाच्या शेवटी जरूर तेथे संदर्भसाहित्य विश्वकोशाच्या एतद्विषयक धोरणानुसार या परिचयग्रंथात दिले आहे; परंतु त्या धोरणाप्रमाणेच 'ध्रुवीय प्रकाश' या लेखाच्या शेवटी संदर्भसाहित्य द्यावयास पाहिजे होते. ते का दिले नाही हे कळत नाही. शिवाय हंबोल्ट व हेरोडोटस यांच्या स्वतःच्या सुप्रसिद्धग्रंथांच्या (शक्य तर नवीन) आवृत्तींचा उल्लेख त्यांच्यावरील लेखांच्या संदर्भसाहित्यात असावयास पाहिजे असे अभ्यासू वाचकाच्या दृष्टीने सुचवावेसे वाटते.

'नमुन्याच्या नोंदी'मधील प्रत्येक पानावर त्या पानात कोणते लेख आले आहेत त्यांचा मथळा दिलेला आहे. पण हे मथळे देण्याबाबतचे धोरण एकसारखे दिसून येत नाही. उदाहरणार्थ ६९ व्या पानावर 'मृगशृंगे आणि शिंगे' 'मेट्रिक पद्धती' असा मथळा दिला

आहे. त्या पानावर 'मृगशृंगे....' या लेखाचा शेवटचा उर्वरित भाग आणि 'मेट्रिक पद्धती' या लेखाचा प्रारंभ होऊन तो चालू झाला आहे. याउलट ७५ व्या पानावर 'वयःस्थापन' एवढाच मथळा आहे; पण वास्तविकपणे त्या पानावर 'वनस्पतिसंग्रह' या लेखाचा शेवटचा उर्वरित भाग आला असून 'वयःस्थापन' या लेखास प्रारंभ होऊन तो लेख चालू झाला आहे. म्हणून पानावरील मथळे देण्याबाबत एक समान धोरण ठेवणे उचित होईल.

'नमुन्याच्या नोंदी'च्या आरंभी प्रास्ताविकात (पान ३०) असे धोरण जाहीर केले आहे की "नोंदी लावण्यासाठी मराठी विश्वकोशात पुढील वर्णक्रम स्वीकारलेला आहे : अ, ओ, औ.. इत्यादी," परंतु या धोरणाची अंमलबजावणी प्रस्तुत परिचयग्रंथात आढळून येत नाही. उदाहरणार्थ, 'हंगेरीतील उठाव' व 'हंबोल्ट' या नोंदी 'हिमरू' या नोंदीच्या आधी आल्या आहेत. वर नमूद केलेल्या धोरणाप्रमाणे 'हिमरू...' 'हेरोडोटस' या नोंदीनंतर, 'हंगेरी' 'हंबोल्ट' या नोंदी येणे झाले असते.

**(नवभारत, सप्टेंबर, १९६५, पृ. २५ ते ३०)**

ООО

# बेडेकरकृत समीक्षणास उत्तर

**ले. लक्ष्मणशास्त्री जोशी**

मराठी विश्वकोशाचा परिचयग्रंथ प्रसिद्ध होऊन फक्त तीन- चार महिनेच झाले आहेत. एवढ्या अल्पावधीत परिचयग्रंथ काळजीपूर्वक वाचून अनेक लेखकांनी वृत्तपत्रातून किंवा खाजगीरीत्या त्यावर विस्तृत अभिप्राय लिहिले, त्या सर्वांचा मी आभारी आहे. मुखपृष्ठापासून सूचीच्या शेवटच्या शब्दापर्यंत ग्रंथाचे परिशीलन होऊन इतक्या बारकाईने समीक्षा होण्याचे असे भाग्य इतर कुठल्या मराठी प्रकाशनाला लाभले नसावे.

ह्या 'नवभारत' च्या अंकात आलेल्या प्रा. वि. म. बेडेकर ह्यांच्या परीक्षणातही त्यांची चिकित्साबुद्धी जशी जागोजाग दिसते तशीच ह्या कार्याबद्दलची त्यांची आस्थाही स्पष्ट प्रतीत होते. तथापि श्री. बेडेकर ह्यांनी परीक्षणात उपस्थित केलेल्या काही मुद्यांबाबत व दाखविलेल्या काही उणिवांबाबत आमची स्पष्टीकरणे वाचकांसमोर असली पाहिजेत म्हणून ह्याच अंकात मी त्यासंबंधी काही लिहीत आहे. वेष्टणावरील चित्र आणि एकामागून एक नोंदी ह्यांवर टीका करायला सुरूवात करण्यापूर्वी आपल्या लेखाच्या प्रास्ताविक भागात प्रा. बेडेकर म्हणतात, "कै. श्रीधर व्यंकटेश केतकर ह्यांनी आपला मराठी ज्ञानकोश प्रसिद्ध करून भारतीय भाषांच्या क्षेत्रात एक अभूतपूर्व कार्य करून दाखविले." डॉ. केतकरांविषयी आदर कायम ठेवूनही प्रा. बेडेकरांना सांगावेसे वाटते की हे विधान अतिशयोक्त आहे. २२ विभागांचा 'बंगाली विश्वकोश' मराठी ज्ञानकोशाचे आधी झाला. तो तयार व्हायला २७ वर्षे लागली; ह्यावरून ते कार्य बंगालमध्ये किती आधी सुरू झाले असेल ह्याची कल्पना येते. मराठी ज्ञानकोश प्रसिद्ध झाला त्यावेळी बंगाली विश्वकोशाच्या हिंदी रूपांतराचेही १२ खंड प्रसिद्ध झाले होते. 'आंध्रविज्ञानसर्वस्वम्' हा तेलगू ज्ञानकोशही मराठी ज्ञानकोशाच्या पूर्वीचाच आहे. तेव्हा डॉ. केतकरांची ही कामगिरी 'भारतीय भाषांच्या क्षेत्रात अभूतपूर्व' ठरत नाही. जाता जाता ह्या एका गैरसमजाचे निराकरण करून आमच्या परिचयग्रंथाकडे वळतो. मुद्रणदोषामुळे, नजरचुकीने किंवा संपादनातील शैथिल्यामुळेही ज्या उणिवा राहिल्या असतील त्या मान्य केल्याच पाहिजेत. त्या दृष्टीने खाली दिल्याप्रमाणे काही गोष्टी राहिल्या आहेत.

(१) मानव्यविद्या कक्षेच्या विषयांची व पोटविषयांची पृष्ठसंख्या दर्शवून जशी तपशीलवार, व विस्तृत योजना दिली आहे तशी विज्ञान व तंत्र कक्षेतील विषय-पोट-विषयांची दिलेली नाही ही श्री. बेडेकर ह्यांनी दाखवून दिलेली उणीव खरी आहे. ह्या संबंधात मी हेही सांगू इच्छितो की विश्वकोशाच्या पहिल्या खंडात आम्ही संबंध मानवी ज्ञानविज्ञानाचे स्वरूप

स्पष्ट करणारा व त्याची विश्वकोशातील व्यवस्था सांगणारा ५०-७५ पृष्ठांचा एक प्रबंधच देणार आहोत. त्यावेळी दोन कक्षांच्या व्याप्तींचे असे विसंगत चित्र दिसणार नाही. अर्थात् ही गोष्ट प्रसंगोपात्त म्हणून सांगितली. परिचयग्रंथात जे राहिले आहे त्याचे हे समर्थन नव्हे.

(२) 'सूची' व 'नकाशे' खंडाच्या नमुन्यात नकाशा नाही हे खरेच. मात्र "फिनलंड या नोंदीसमोर फिनलंडचा रंगीत नकाशा दिलेला आहे. अशा नकाशासारखे नकाशे शेवटच्या १९ व्या खंडात कदाचित येणार असतील". ही प्रा. बेडेकरांची समजूत मात्र बरोबर नाही. प्रस्तुत नकाशा नुसता त्या देशाच्या चतुःसीमा वगैरे दाखविणारा, आराखडेवजा आहे. नकाशाखंडात येणारे नकाशे मोठे, अनेक तपशील देणारे व स्थळे, अंतरे इत्यादी गोष्टी अगदी बिनचूक दाखविणारे असे असतील. असा एक नकाशा आम्ही परिचयग्रंथांसाठी तयारही केला होता; परंतु आम्हाला संपूर्ण समाधानकारक असे तांत्रिक साहाय्य वेळेवर उपलब्ध न झाल्यामुळे, आम्हाला पाहिजे त्या दर्जाचा नकाशा मिळणे शक्य नव्हते. सदोष नकाशा देण्यापेक्षा तो न देणे बरे ह्या विचारानेच तो गाळला.

(३) काही मुद्रणदोष राहिले आहेत. उदाहरणार्थ, सूचीमध्ये 'मार्क्स' हा शब्द जाड टाइपात येणे, 'कामाचे तास' ह्या नोंदीत १९६३ ऐवजी १९३६ पडणे, अशा चुका राहायला नको होत्या. तसेच काही शब्द पारिभाषिक शब्दसंग्रहात यायला हवे होते, ते आलेले नाहीत; हेही श्री. बेडेकरांचे म्हणणे आम्हाला मान्य आहे.

(४) याशिवाय या टीकेतील आणखी दोन तपशील आम्ही मान्य करतो. फिनलंडनंतर कंसात दिलेल्या 'सुऑमीचे' स्पष्टीकरण हवे होते, तसेच 'सहशिक्षण' मधील अमेरिकेचा कोणता भाग हा संदर्भाने लागणारा पण लेखकाने स्पष्ट न केलेला भाग नजरेतून सुटावयास नको होता.

परंतु वरील सोडून बाकीची प्रा. वि. म. बेडेकरांची टीका मान्य करता येण्यासारखी नाही.

(१) वेष्टणावरील चित्र 'कलात्मक दृष्टीच्या काही प्रौढांना' अनुचित वाटण्याचा संभव आहे असे श्री. बेडेकर म्हणतात. ग्रंथाचे वेष्टण हे मुख्यतः वाचकांना पुस्तकाचे दुकानात ग्रंथाकडे आकर्षित करण्यासाठी असते. ग्रंथविषय किंवा ग्रंथकारण सरळ किंवा प्रतीकाने सांगण्याचाही त्यात एक उद्देश असतोच. ज्ञानपिपासूमधुमक्षिका थेंबाथेंबाने विद्या जमा करून एका कोशरूपी पोळ्यात साठवीत आहेत अशा आशयाचे हे षट्कोनांचे प्रतीक आहे. त्यातील रंग कुणाला भडक वाटतील, कुणाला वाटणार नाहीत. अत्यंत गंभीर आणि विद्वज्जड अशा कोशांना व ग्रंथांनाही पाश्चिमात्य देशांत जी वेष्टणे असतात ती ज्याने पाहिली आहेत अशा कोणत्याही वाचकाला आमचे वेष्टण भडक वाटणार नाही, एवढे मात्र निश्चित म्हणता येईल.

(२) 'हूणां' च्या चित्रावरील प्रा. बेडेकर ह्यांचे भाष्यही अनावश्यक वाटते. 'हूण' हा विषय ऐतिहासिक खरा; पण 'हूणांचे' विश्वसनीय, तत्कालीन चित्र उपलब्धच नाही.

जुनी काल्पनिक चित्रे आहेत; पण एकदा काल्पनिक चित्रच म्हटल्यावर एखादे सोळाव्या किंवा अठराव्या शतकातील काल्पनिक चित्र काय किंवा विसाव्या शतकातील आमच्या चित्रकाराचे काल्पनिक चित्र काय ? हूणांचे क्रौर्य आणि विध्वंसन डोळयासमोर उभे राहणे हा चित्राचा हेतू आहे; तो साध्य झाला म्हणजे झाले.

(३) 'अतिवास्तववाद, ललितकलेतील' ही परिचयग्रंथातली पहिली नोंद त्यात दर्शविलेल्या आणखी सात- आठ पूरक नोंदी वाचल्याशिवाय उलगडणार नाही. वर्णक्रमाने रचलेल्या कोणत्याही कोशात अशा असंख्य नोंदी अपरिहार्यपणे येत असतात; त्या स्वयंपूर्ण नसतातच. अधिकाधिक संदर्भसाहाय्य देणे हेच त्या नोंदीचे प्रयोजन असते. म्हणूनच ह्या नोंदीत जे जे हवे होते असे प्रा. बेडेकरांना वाटते ते सर्व तेथे दर्शविलेल्या पूरक नोंदीत येईल असा आम्ही हवाला देतो. म्हणूनच ह्या नोंदीत आलेले सर्वच्या सर्व शब्द पारिभाषिक शब्दसंग्रहातही घेतलेले नाहीत. आणखी या नोंदीच्या संदर्भात ही गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, या वादाच्या व या कलाप्रकाराच्या पिकासोसारख्या साक्षात् प्रणेत्यांनाही तो वाद वारंवार संदेहात टाकतो, तेथे इतरांची काय कथा ?

ह्याच नोंदीत वापरलेल्या 'आपापतः' आणि 'आपापता' ह्या शब्दांवरील श्री. बेडेकर ह्यांच्या टीकेसंबंधीही दोन शब्द सांगितले पाहिजेत. मूळ इंग्रजी शब्दांना नवनवे लेखक, नवनवे प्रतिशब्द वापरीत आहेत. नवीन शब्द संस्कृतोद्भव असू शकतात तसेच ते बोलण्याच्या किंवा ललित साहित्याच्या भाषेतूनही येऊ शकतील. 'आपोआप' ह्या मराठी शब्दाचे बोली भाषेतील एक रूप 'आपाप'. त्यापासून लेखक 'आपापता' 'आपापतः' हे शब्द बनवितो. हे शब्द आम्हाला मान्य असतीलच असे नाही; पण लेखकाचे स्वातंत्र्य आम्ही घालवू इच्छित नाही. कदाचित असेच शब्द पुढे भाषेत चांगले रूढ होऊन घट्ट बसतील अशीही शक्यता आहे. परिभाषेसंबंधीचे आमचे उदार धोरण आम्ही कोशात स्पष्ट केलेलेच आहे ( पृ. ४ ). तथापि वाचकांचा घोटाळा होऊ नये म्हणून लेखकाच्या आपापता शब्दाचा त्याला अभिप्रेत असलेला अर्थ तेथेच कंसात देऊन टाकला आहे. दुसरे असे की जो प्रयोग संस्कृतमध्ये अशुद्ध ठरेल तो मराठीत अशुद्ध मानण्याचे कारण नाही. मराठीत संस्कृत-प्राकृतांचे मिश्रण झाल्याने मराठी अशुद्ध होऊ शकत नाही. संस्कृतचा मागोवा घेत जाण्याने मराठीची प्रकृती बिघडण्याचाच संभव अधिक.

तसेच ह्याच नोंदीच्या संदर्भातील गतिमानता शब्दाचे बाबतीत गतिमानपासून 'गतिमत्ता' हेच रूप झाले पाहिजे; 'गतिमानता' होऊ नये हे संस्कृत पांडित्यही अस्थानी वाटते. मराठीत असे रूप व्हायला काहीच हरकत नाही. पुढे वयःस्थापन नोंदीविषयी लिहिताना 'स्रोतस्', शब्दाच्या निमित्ताने स्वतः प्रा. बेडेकरांनीच ही संस्कृत आणि मराठीतील भिन्नता दाखविली आहे व स्वतःच संस्कृतपेक्षा मराठी शब्द वापरावा असा आग्रह धरला आहे. म्हणून तर त्यांच्या येथील 'गतिमानते' वरील आक्षेपाचे विशेष आश्चर्य वाटते. प्रा. बेडेकरांनी कोणते

तरी एक योग्य व एक अयोग्य म्हटले असते तर निदान त्यांची भूमिका काय, हे तरी स्पष्ट झाले असते. दोन ठिकाणी दोन निराळे न्याय लावणाऱ्याला आम्ही कोणता न्याय द्यायचा ? 'कार्यकारणभावी दृष्टी' ह्याऐवजी 'कार्यकारणभावनिष्ठ दृष्टी' असा बदल प्रा. बेडेकर सुचवितात तोही आम्हाला वर सांगितलेल्या कारणासाठीच स्वीकारता येत नाही. लेखकाने मराठीच्या मोडणीप्रमाणे नामापासून विशेषण केले आहे. त्यात काहीच वावगे दिसत नाही.

(४) 'अवेस्ता, भाषा' ह्या नोंदीतील श्री. बेडेकरांनी उद्धृत केलेल्या वाक्यात काहीही मुद्रणदोष नाही. मूळ वाक्य उद्धृत करताना त्यातील 'आहे' ऐवजी 'आहेत' असे लिहून श्री. बेडेकरांनीच वाचनदोष किंवा लेखनदोष केला आहे हे त्यांच्या नजरेस आणणे आवश्यक वाटते.

(५) 'गनिमी युद्ध' ह्या नोंदीतील हा युद्धप्रकार वर्णन करणारे अथर्ववेदातील, महाभारतातील वगैरे नेमके विशिष्ट उल्लेख आवश्यक आहेत असे प्रा. बेडेकरांना वाटते; परंतु विश्वकोश हा गनिमी युद्धावरील संशोधनग्रंथ नसल्यामुळे तशी जरूरी आहे असे आम्हास वाटत नाही. ह्याच नोंदीवरील टीकेत प्रा. बेडेकर म्हणतात की युद्धपट हा शब्द वापरण्यात लेखकाचा काही अर्थपूर्ण व्यापक हेतू असावा तो स्पष्ट व्हावयास पाहिजे होता. आमच्या मते व्यापक अर्थ आहे, केवळ व्यूहरचना, डावपेची हालचाली, याहून अधिक अर्थ आहे आणि तो त्या परिच्छेदात स्पष्टही झालेला आहे.

(६) 'चित्रसंरक्षण' नोंदीतील शब्दयोजनेबद्दलचे आक्षेपही आम्हाला अमान्य आहेत. ह्याबाबत आम्ही वर अतिवास्तववादा वर लिहिताना', लेखकाच्या स्वातंत्र्याविषयी जे म्हटले आहे ते येथेही लागू आहेच. शिवाय 'निकोप', 'निकोपी' हे दोन्ही मराठी शब्द बरोबर असून समानार्थी आहेत हे दाते-कर्वे यांचा महाराष्ट्र शब्दकोश उघडून पाहिल्यावर कळून येईल.

(७) 'ली पो' 'नोंदीत' 'सेच्वानच्या निसर्गरम्य प्रदेशात' ह्या ठिकाणी सेच्वान चीनच्या कोणत्या भागात आहे हे दिले पाहिजे असे प्रा. बेडेकर सुचवितात. आम्हाला त्याची काय आवश्यकता आहे हे समजू शकत नाही. अधिक जिज्ञासू त्यासाठी जरूर ते स्थळकोश पाहतीलच.

(८) 'व्हेटो' नोंदीत 'विलंबी रोधाधिकार' असा शब्द न वापरता 'निलंबी रोधाधिकार' असा वापरला आहे ह्याचे कारण सामान्यतः 'विलंब' ह्याने जो अर्थ अभिप्रेत होतो त्याहून 'व्हेटो' मधील 'विलंब' वेगळा आहे हे सूचित व्हावे. कायदेमंडळाने केलेला एखादा कायदा जेव्हा कार्यकारी प्रमुख काही काळापुरता अडवून धरतो तेव्हा त्याचा हेतू केवळ विलंबासाठी विलंब लावणे हा नसून त्या कायद्याचा पुनर्विचार व्हावा ह्या दृष्टीने कायदेमंडळाकडे परत पाठविणे असा असतो. म्हणूनच ह्या ठिकाणी 'निलंबी' असा शब्द घ्यावा असे वाटते.

(९) 'हंबोल्ट' ह्या नोंदीतील एका वाक्याबाबत "मानवाने जिंकलेल्यापैकी की न

जिंकलेल्यापैकी?" अशी प्रा. बेडेकरांची शंका आहे. ह्या ठिकाणी काहीही मुद्रणदोष नाही, जिंकलेल्यापैकीच 'न' नव्हे. आणि आहे तसे वाचून काही गोंधळही होत नाही.

(१०) 'हंबोल्ट' व 'हेरोडोटस' ह्या नोंदींसंबंधी लिहिताना समीक्षक म्हणतात की त्यांच्यावरील लेखांच्या संदर्भसाहित्यात त्यांच्या स्वतःच्या सुप्रसिद्ध ग्रंथांच्या आवृत्तीचा उल्लेख अभ्यासू वाचकाच्या दृष्टीने असावयास पाहिजे. हे म्हणणे रास्तच आहे. या दोन्ही नोंदीखाली जे संदर्भसाहित्य दिले आहे ते चाळले तर अभ्यासू वाचकास आवश्यक ती सर्व माहिती तेथे मिळेल. प्रत्येक नोंदीखाली संपूर्ण संदर्भ साहित्याची यादी देणे, अशा प्रकारच्या कोशाचे दृष्टीने, अनावश्यक तसेच अव्यवहार्यही आहे. संदर्भसाहित्य देण्यासंबंधीचे आमचे धोरण आम्ही पृ. ८ वर स्पष्ट केलेलेच आहे. 'ध्रुवीय प्रकाश' ह्या नोंदीसंबंधी लिहितानाही प्रा. बेडेकरांनी त्या नोंदीखाली संदर्भग्रंथ का नाहीत असे विचारले आहे. 'ध्रुवीय प्रकाश' ही एक साधी, एक निसर्गचमत्कार वर्णन करणारी नोंद आहे. त्याला संदर्भसाहित्य देण्याची आवश्यकता वाटली नाही. आमच्याप्रमाणेच ती 'ब्रिटानिका', 'अमेरिकाना' व कोलियर्स '़च्या संपादकांनाही वाटलेली नाही.

(११) 'ॲस्कार्बिक अम्ल' ह्या नोंदीच्या शीर्षकामागे इंग्रजी अक्षर L हे घातले आहे. त्याचा अर्थ लेखात स्पष्ट केलेला नाही हे खरेच आहे; पण तो करण्याचे कारण नाही. सर्वसामान्य जिज्ञासू माणसाला तो कळावा अशी अपेक्षाच नाही; पण त्या रासायनिक द्रव्याचे निर्देशन त्या शास्त्राच्या पद्धतीप्रमाणे बिनचूक व्हावे ह्या दृष्टीने त्या विषयातील तज्ज्ञांच्या सूचनेनुसार ते अक्षर ठाकले आहे.

(१२) 'वनस्पतिसंग्रह' नोंदीत उल्लेखिलेल्या एका पुस्तकाचे 'नेचे' हे नाव बरोबर कळत नाही असे प्रा. बेडेकर म्हणतात. ठीकच आहे. 'मुंबई प्रांतातील नेचे' असे ते पुस्तक आहे आणि कोशात लेखकाने ते ह्याच सबंध नावाने दिले आहे. समीक्षकांनी ते फक्त 'नेचे' असेच धरले तर त्याच्या मागील मंबई प्रांतातील ह्या शब्दांचा अर्थच लागायचा नाही.

(१३) "प्रत्येक पानावर त्या पानात कोणते लेख आले आहेत त्यांचा मथळा दिलेला आहे." असे सांगून टीकाकार पुढे म्हणतात की, "हे मथळे देण्याबाबतचे धोरण एकसारखे दिसून येत नाही." पृ. ३१ ते ९३ ह्या ६३ पानांपैकी फक्त ६९ व ९३ ह्या दोन पानांवर मथळा देण्याची पद्धत चुकली आहे. उरलेल्या ६१ पानात एक ठरावीक पद्धत दिसेल. ६१ ठिकाणी एक पद्धत दिसली व फक्त २ ठिकाणी ती नसली तर तो मुद्रणदोष म्हणावा, धोरणाचा अभाव म्हणू नये असे सांगणे आवश्यक झाले आहे.

(१४) 'वयःस्थापन' या नोंदीवरील समीक्षणात 'अनेक आयुर्वेदीय पारिभाषिक शब्दांची- उदाहरणार्थ, पंचकर्मे, योग, नैष्ठिकी, चिकित्सा इत्यादी शब्दांची-स्पष्टीकरणे लेखकाने दिली नाहीत अशी तक्रार केली आहे आणि अखेरीस पारिभाषिक शब्दयोजनेच्या दृष्टीने लेख बोजड वाटतो, असा शेरा मारला आहे. विश्वकोशासारख्या संदर्भग्रंथात त्या त्या

शास्त्रावरील अनेक विविध नोंदी येतात. शब्दसूचीच्या आधारे अशा विखुरलेल्या नोंदींकडे वळून वाचक पारिभाषिक शब्दांच्या स्पष्टीकरणाबद्दलची आपली जिज्ञासा तृप्त करून घेतो. पारिभाषिक शब्दांचे विवरण तेथल्या तेथे करीत गेल्यास ती नोंद मारुतीच्या शेपटीप्रमाणे लांबत राहणार नाही काय ? शास्त्रीय विषयावरील पुष्कळशा नोंदी सामान्य वाचकास बोजड वाटतील किवा काही ठिकाणी अनाकलनीयही होतील; अशा संदर्भात बोजडपणा हा दोष नव्हे. वयःस्थापन नोंदीतील सोम वनस्पतीचा खुलासा समीक्षकांनी अपेक्षिला आहे. प्रस्तुत वेदज्ञ समीक्षकांनी तरी सोमवल्ली ही अज्ञात व विस्मृत वल्ली आहे, हे ध्यानात ठेवावयास पाहिजे होते.

वयःस्थापन विषयाला दिलेली जागा जास्त आहे, विश्वकोशाच्या पृष्ठयोजनेशी ती विसंगत आहे की काय अशी शंका समीक्षकास उत्पन्न झाली आहे. ही शंका समीक्षकमहाशयांनी मांडावयास नको होती. आयुर्वेद हा त्यांचा व्यासंगाचा विषय नाही. हा विषय श्री. वेणीमाधवशास्त्री जोशी व आयुर्वेदज्ञ संपादक उपसमिती यांना मी स्वतः सुचविला व त्या उपसमितीने ग्राह्य ठरविला. आयुर्वेद हा अष्टांग होय. आठ अंगांपैकी सप्तम अंग रसायन होय. या अंगाची व्याख्या सुश्रुत संहितेत प्रथमाध्यायात ''रसायनतंत्रन्नाम वयःस्थापनम्'' अशी केली आहे. वयःस्थापन हे रसायनाचे किंबहुना सर्व आयुर्वेदाचे प्रधान कार्य आहे. त्या प्रधान कार्याच्या विवरणास विश्वकोशात तीन पाने दिली याबद्दल आयुर्वेदज्ञांची तक्रार राहणार नाही. आयुर्वेदाला विश्वकोश पृष्ठ योजनेत २०० पृष्ठे दिली आहेत.

---

*(दैनिक 'मराठा' च्या दिनांक ३० ऑगस्ट १९६५ च्या अग्रलेखात व दिनांक १६ ऑगस्ट १९६५ च्या 'वाईकर भटजी' च्या लेखात आणि दैनिक लोकसत्तेच्या 'एक माहितगार' च्या लेखात मराठी विश्वकोशासंबंधी जो मजकूर आहे त्यांपैकी बहुतेक सर्व भाग परिचयग्रंथाचे संदर्भात पूर्णपणे गैरलागू आहे. परिचयग्रंथावर या तिन्ही ठिकाणी जे आक्षेप घेण्यात आलेले आहेत, ते सर्व दैनिक केसरी व दैनिक विशाल सह्याद्रीच्या अंकांतून पूर्वीच येऊन गेलेले होते व त्यांना त्याच ठिकाणी उत्तरेही दिली गेली होती तरीही त्या उत्तरांची दखल न घेता मूळ आक्षेपच पुनः घेतले गेले असल्यामुळे यांना पुनः उत्तरे देण्याची गरज उरलेली नाही.*

*- प्रमुख संपादक)*

**(मराठी विश्वकोश परिचय पुस्तिका (अभिप्राय, टीका आणि प्रतिटीका) संपादक : लक्ष्मणशास्त्री जोशी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रकाशन - १९ डिसेंबर, १९६५; पृ. ९२ ते ९९)**

ooo

डेक्कन कॉलेज,
पुणे-६.
ता. २८-१०-१९६५.

श्री. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी,
प्रमुख संपादक, 'विश्वकोश',
विश्वकोश कार्यालय, वाई.

**कृ. स. न. वि. वि.,**

आपण पाठविलेली मराठी विश्वकोशाच्या परिचय - ग्रंथाची प्रत मला मिळाली.

विश्वकोशाच्या रचनेविषयी आपली कल्पना उत्तम वाटते. प्रसिद्ध झालेल्या परिचय ग्रंथावरून कल्पना करावयाची झाल्यास हा विश्वकोश तयार होईल तेव्हा मराठी भाषकांना एक बहुमोल देणगी दिल्यासारखे होईल.

विश्वकोशाचे कार्य मोठे, त्यासाठी लेख लिहिणारी माणसे निरनिराळी, तेव्हा प्रसिद्ध झालेल्या नोंदीत फरक आढळल्यास आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

अवेस्ता, भाषाविषयक पृष्ठ ३२ वर असलेली नोंद निराळ्या प्रकारे लिहिली गेली असती तर बरे झाले असते. संदर्भग्रंथात भाषाविषयक अगदी आवश्यक आणि महत्त्वाच्या ग्रंथांचा उल्लेख नाही.

पृष्ठ सोळा- लिपींच्या यादीत 'खरोष्टी' छापले आहे ते 'खरोष्ठी' असे हवे.

पारिभाषिक शब्दसंग्रहात 'वयःस्थापन' हा शब्द राहून गेला आहे. अन्यही असण्याची शक्यता आहे.

अभारतीय लेखकांची नावे देवनागरीत दिली आहेत त्यापुढे कंसात तो रोमन लिपीत दिल्यास थोडा खर्च वाढेल; पण वाचकांच्या दृष्टीने सोईचे होईल असे वाटते.

एखाद्या विषयाची कोशात अन्यत्र नोंद आहे हे सुचविण्यासाठी ते नाव Italics मध्ये छापले आहे आणि शेजारी चिन्हही आहे. मला वाटते नुसते Italics मध्ये छापले तरी ते पुरेल.

या सूचना सामान्य आहेत. आपल्या ध्यानात त्या पूर्वी आल्याही असतील.

आपल्या दूरदर्शी आणि मूलग्राही कार्यपद्धतीबद्दल मी आपले मनःपूर्वक अभिनंदन करतो आणि हे महाकार्य आपल्या हातून यशस्वीपणे पार पडो असे चिंतितो.

क. लो. अ. ही विनंती.

आपला,
**म. अ. मेहेंदळे**

○○○



वाय १८५-१७

# परिचयग्रंथ परीक्षण

पुणे विद्यापीठ
मार्गशीर्ष ४, १८८७
दिनांक- २५-११-६५

**॥ श्री ॥**

**विनंती विशेष,**

मराठी विश्वकोश परिचयग्रंथ चाळून पाहिला. माझ्या मते पुढील ग्रंथ समृद्ध व सुंदर होईल याची हा लहानसा ग्रंथ एक प्रस्तावना आहे, आणि शितावरून भाताची परीक्षा करावयाची झाल्यास पुढील ग्रंथ चांगला होईल याबद्दल मला खात्री आहे. शक्य तितक्या लवकर तो व्हावा, ही जनतेची इच्छा आहे व त्याप्रमाणे प्रयत्न केले जातील असा भरवसा वाटतो.

कळावे.

आपला,
**न. वि. गाडगीळ**

ooo

ब.

# अन्य पत्रव्यवहार

## प्राज्ञपाठशाळामंडळ वाई

जि. सातारा

फो, ६ व २६

मुंबई,

सं. क्र. तारीख: २४-५-१९६२

**श्री. प्रिय यशवंतराव चव्हाण**

यांस-

स.न.वि.वि.

आपण वाईस या खेपेस सभेस सौ. वेणूताईंना बरोबर आणिले. यामुळे आमचा आनंद द्विगुणित झाला.

(१) वाईस विश्वकोशकार्यालयासारखी कार्यालये चालविण्यास अनेक अडचणी आहेत हे खरे. गेली ४७ वर्षे वाई हे माझं मुख्य निवासस्थान असल्यामुळे मी वाई हे स्थान विश्वकोश कार्यालयासाठी निवडले, हे खरे असले तरी वाई या स्थानाला ऐतिहासिक महत्त्वही आहे. त्याप्रमाणेच आधुनिक व्यापारी व औद्योगिक शहरापेक्षा निवांत व एकांतमय असे वाईसारखे स्थळ विद्याव्यासंगास व तत्वचिंतनास अधिक पोषक असते; हेही वाई हे स्थान निवडण्याचे कारण आहे.

भारतातील उन्हाळा निरूत्साह उत्पन्न करतो. पंचगणी व महाबळेश्वर ही थंड हवेची स्थाने वाईस जवळ असल्यामुळें जरूर पडल्यास उन्हाळ्यात कार्यालय तेथे नेणे अधिक सोयीचे आहे. वाईची हवा एप्रिल व मे महिने सोडल्यास समशीतोष्ण व जोमदार असते. तसेच वाईला पुणे पुष्कळ जवळ असल्यामुळे वाईचा पुण्याशी संबंध कायम ठेवता येतो.

मराठीतला नवविद्याचे सर्वांगीण साधन बनविण्याचा कार्यक्रमाचा पहिला भाग विश्वकोश होय. या कार्यक्रमाचे पुढील भागही अमलात आणण्याकरिता विद्यासेवकांची पहिली वसाहत वाईस वसवावी. विश्वकोशकार्याची जसजशी परिणती होत जाईल तसतसा त्यातूनच अशा विद्यासेवकांचा गाभा तयार होईल. देशभक्त. श्री. किसनवीरांच्या आग्रहावरून वाईस महाविद्यालय (कॉलेज) काढण्याचे मी ठरविलें. भोवतालच्या बहुजन समाजातील हुशार विद्यार्थ्यांना वाईस तयार होत असलेल्या विद्याविषयक वैचारिक वातावरणाचा चांगला उपयोग होईल.

(२) श्री. हरिभाऊ पाटसकरांच्या मनात राज्यसभेचे सदस्य बनवण्याची आशा अधिक बळावली आहे, व त्यांच्या मित्रांनी मला आपल्या कानावर ही गोष्ट घालण्याचा पुन:

आग्रह केला आहे. त्यांना वाटते की पंडित जवाहरलाल नेहरूंना पाटसकर पाहिजे आहेत. त्याचप्रमाणें असेंही त्यांना वाटते की, नव्या दिल्लीत श्री. पाटसकर असणें महाराष्ट्राचे प्रश्न सोडविण्याचे दृष्टीने फार उपयुक्त ठरेल.

कळावे. ही विनंती,

आपला

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

❍❍❍

# प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

विश्वत्व व अध्यक्ष

फोन नं. ६,

वाई, जि. सातारा,

ता. ९-९-६२,

जा. क्र. ७०\६२.६३\५९

रविवार.

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण**

यांस -

स.न.वि.वि.

श्री. रूपवते यांची नेमणूक विश्वकोश कार्यालयात ऑक्टोबर १ पासून होईल. मी त्यांची दोनदा मुलाखत घेतली. मुलाखतीवरून माझ्या मनात त्यांच्याबद्दल अनुकूल भावना निर्माण झाली. श्री रूपवते यांची नेमणूक होणार हे सगळीकडे लवकर पसरले. आपण मला त्यांचे नाव सुचविल्यानंतर १५ दिवसांत श्री. त्र्यं. शि. भारदे यांनी निरोप पाठविला की, "चर्चा झाल्याशिवाय नेमणुकीची घाई करू नका." गेल्या ५ तारखेस मी श्री. भारदे यांच्या निवासस्थानी त्यांची गाठ घेतली. त्यांचा आक्षेप असा की, "विद्वानांची नेमणूक ज्या स्थानी करावयाची त्या स्थानी तशी ख्याती नसलेल्या माणसाची तुम्ही नेमणूक करणार यामुळे ही गोष्ट सार्वजनिक टीकेचा विषय होईल." मी त्याचे समाधान करण्याचा प्रयत्न केला. तो असा की, "एखादा सुशिक्षित मनुष्य विद्वान होऊ इच्छित असेल तर म्हणजे त्याला तात्त्विक चिंतन मननाची हौस असेल तर अशा सुशिक्षित व्यक्तींना विश्वकोशांत करण्यासारखे पुष्कळ काम आहे. असेच काम मी श्री. रूपवते यांस देऊ इच्छितो. विश्वकोशात सतत विद्याव्यासंग करू इच्छिणाऱ्या व्यक्तींना स्थान आहे. श्री. रूपवते सुशिक्षित, समंजस व तत्त्वजिज्ञासू गृहस्थ आहेत. त्यामुळे त्यांना विश्वकोशात स्थान आहे. दुसरे असे की श्री. रूपवते यास राजकारणातून निवृत व्हावयाचे आहे व प्रकृतीच्या कारणास्तव त्यांना स्वस्थ एकत्र असूनच बौद्धिक कार्य करावयाचे आहे. मला एवढीच शंका आहे की, वाईचे हवामान नदीकाठामुळे सर्द राहते. हे दमेकरी मनुष्यास सोसेल की नाही? परंतु या गोष्टीचा खुलासा श्री. रूपवते यांच्याशी करून त्यांना ही अडचण भासत नसल्यास मी नेमणूक करून टाकीन." श्री. भारदे यांचे समाधान झाल्याचे दिसले नाही. ते आपणास लवकर भेटून असे सुचविणार आहेत की, "एखाद्या खात्यात सल्लागाराचे पद निर्माण करून श्री. रूपवते यांस द्यावे." मी श्री. रूपवते यांची नेमणूक ऑक्टोबर १ पासून मूळ वेतन ५७५ रुपये अधिक सरकारी नियमानुसार

महागाईभत्ता ७० रुपये या वेतनश्रेणीवर करणार आहे. या वेतनश्रेणीचे पद उपसंपादक (ASSOCIATE EDITOR) हे आहे.

विश्वकोश कार्यालयातील संपादकवर्गात खालील प्रमाणे वेतनश्रेणी आहेत.

| अ.नं. | हुद्दा. | वेतनश्रेणीचे प्रमाण |
|---|---|---|
| (१) | कार्यकारी संपादक. (१)<br>(Managing Editor ) | रु. ९००-५०-११५०. |
| (२) | विभाग संपादक, (५)<br>(Section Editor) | रु. ७००-५०-९५० |
| (३) | उपसंपादक. (५)<br>(associate Editor) | रु. ५००-२५- ६५०. |
| (४) | संपादन सहाय्यक. (१२)<br>(scholar Assistant.) | रु. २५०-१५-४००. |

श्री. रूपवते यांची नेमणूक अ. नं. ३ मधील वेतनश्रेणीप्रमाणे केली जाणार असून सुरुवातीसच त्यांच्या मासिक वेतनात तीन वर्षांच्या वार्षिकवेतनवाढीच्या (INCREMENTS) रकमेचा समावेश केला जाईल.

मी ही नेमणूक ऑगस्ट १९६२ मध्येच करणार होतो; परंतु वाईस पावसाळा जास्त होता. दम्याचा कदाचित जास्त त्रास होईल, पहिल्याच खेपेस श्री. रुपवते यांना मन:स्ताप व्हावयास नको, म्हणून नेमणूक दोन महिने पुढे ढकलली.

(२) विश्वकोशाच्या विषयोपविषयांची तपशीलवार रूपरेषा या महिनाअखेर तयार होईल. त्याची प्रत मी आपणास पुढील महिन्यात पाठवीन व आक्टोबरच्या दुसऱ्या पंधरवड्यात आपल्याशी त्यासंबंधात विचारविनिमय करीन. विश्वकोशात येणारे प्रत्येक शीर्षक व त्याची पृष्ठसंख्या, पंक्तिसंख्या व शब्द-संख्या इतका तपशील पुरा झाल्यावरच विश्वकोशाच्या प्रत्यक्ष लेखनास सुरुवात होईल. काही प्रयोगादाखल लेखन १५ आक्टोबरनंतर सुरू होईल. विषयोपविषयांची समग्र रूपरेषा (The Outline of Topics and subtopics of Vishwakosha) प्रथम स्वीकृत झाल्यावर संपूर्ण-शीर्षकसंग्रह (The exhaustive list of Entries of Marathi Encyclopaedia) जानेवारी १९६३ पर्यंत तयार होईल. यानंतर विश्वकोशाचे सर्व भाग एकाच वेळी तयार होऊ लागतील. विश्वकोश कार्यालयातील संपादकमंडळाच्या बाहेरही स्वदेशातील व परदेशातील तज्ज्ञ-विद्वानांकडून लेखन - साहाय्य मिळवावयाचे ठरले आहे व त्यांची यादीही तयार होत आहे.

(३). माझे एक जुने परिचित सहकारी श्री. दे. गं. रसाळ यांचे मला आलेले पत्र सोबत जोडले आहे. हे हैदराबाद येथे दहा-बारा वर्षे होते. तेव्हा म्हणजे १९४०-५० च्या सुमारास

तेथील रॅडिकल गटाचे कार्य पाहत होते. त्यांनी प्रदेश विभागणीनंतर हैदराबाद सोडले. कार्यकर्त्यांना मनमिळाऊपणाने वागविण्याची चांगली हातोटी त्यांना आहे.

(४). श्री. स. का. पाटील यांची व माझी अलीकडे दोन तीन वेळा भेट झाली. त्याचे मनोगत आपणास माहीत आहेच,

कळावे, ही विनंती

सोबत: आपला,

एक पत्र. (स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

ooo

जा. क्र. सासंमं- १०६७-५८५

विश्वकोश कार्यालय, वाई,

(सातारा)

दिनांक २९-५-६७

**प्रिय श्री. पु.ल. देशपांडे**

यांस- सप्रेम नमस्कार

विनंती विशेष,

आपले दिनांक २४-५-६७ चे पत्र पावले, फार आभारी आहे. श्री. दि. के. बेडेकर प्रकरणाबद्दल आपण जी उपाय-योजना सुचविता, ती संपूर्ण चर्चा केल्यानंतर सुचविली असती तर बरे झाले असते. बेडेकर- प्रकरण हे साहित्य संस्कृती मंडळात चर्चेला काढायच्या अगोदर मंडळाच्या सदस्यांनी व्यक्तिश: माझ्याकडून म्हणजे - प्रमुख संपादकाकडून समजून घ्यावे अशी माझी अपेक्षा आहे. मंडळात त्याची चर्चा होऊ शकत नाही असे मला वाटते. सातारच्या न्यायालयाने मंडळाला कोठेही दोष दिलेला नाही. श्री. बेडेकरांना कामावरून कमी करताना काही कायदेशीर तंत्रात चूक झाली आहे, एवढेच न्यायालयाला म्हणावयाचे आहे. प्रथम दिवाणी न्यायालयाने श्री. बेडेकरांचा दावा खर्चासह फेटाळून लावला आहे. आता हे प्रशासनाचे कायद्याचे सल्लागार आवश्यक वाटल्यास मुंबईच्या वरिष्ठ न्यायालयाकडे पाठवितील.

२. सातारच्या न्यायालयाने निकालपत्रात म्हटले आहे की, श्री. बेडेकरांची पुन: नियुक्ती करणे माझ्या अधिकारात असते तरी मी तसे करू शकत नाही, कारण एकंदर इतिहास पाहता श्री. बेडेकर समाधानकारकपणे विश्वकोशाचे काम करू शकणार नाहीत.

३. दुसरे असे की, श्री. बेडेकरासंबंधी माझा अनुभव वाईट आहे. त्यामुळे मला तडजोडीचा मार्ग दिसत नाही व कोणी काढू शकेल असे वाटत नाही. श्री. बेडेकर वाईच्या विश्वकोश कार्यालयात आल्यापासून अखेरपर्यंत विरोध करण्यात गुंग झाले होते, ही गोष्ट त्यांनी त्यांच्या मित्रांना पाठविलेल्या स्वाक्षरीच्या पत्रातच नमूद आहे. यथावकाश ती मूळ पत्रे मी खाजगी रीतीने मंडळाच्या जिज्ञासू सदस्यांना जरूर दाखवीन. मी तडजोड केल्यास

ठेच लागूनही शहाणा न होणाऱ्या वेड्यात जमा होईन. माझ्या पायाला तिसऱ्यांदा प्लास्टर पडले आहे. जन्मात कधीतरी शहाणे व्हावयास पाहिजे की नको.

४. आपली विदेशयात्रा सपत्नीक होत आहे ही फार आनंदाची गोष्ट आहे.

शुभास्ते पंथान: संतु ।

कळावे, ही विनंती

आपला,

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

○○○

## प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
विश्वस्त व अध्यक्ष

फोन नं. ६ व २६
वाई (जि. सातारा)

ता. ३०/३/७६.

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण**

यांस

स.न.वि.वि.,

१५ फेब्रुवारीस वाईस आपण सांगितल्याप्रमाणे मी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री माननीय श्री. शंकरराव चव्हाण यांना भेटून पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांना मराठी विश्वकोश खंड १ ते ४ यांच्या प्रकाशनाच्या समारंभासंबंधी विनंती करणारे पत्र पाठविण्याची विनंती केली. त्याचप्रमाणे माननीय मुख्यमंत्री पंतप्रधानांना दि. २५ मार्च १९७६ ला पत्र पाठविले आहे. मी स्वत:ही पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांना विनंती पत्र पाठविले आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे. तरी आपण त्यांना वाईस विश्वकोश प्रकाशनाच्या समारंभाने निमंत्रण स्वीकारण्याची शिफारस कराल अशी आशा आहे. मराठी विश्वकोश खंड १ चे मुद्रण सहा महिन्यांपूर्वीच संपले असले तरी ८६ रंगीत चित्रपत्रांची छपाई कै. विष्णुपंतांच्या आजारामुळे दिरंगाईवर पडली होती. तो आता येत्या महिन्यात पूर्ण होईल व पहिले चारही खंड प्रकाशनास सिद्ध होतील.

कळावे, ही विनंती.

आपला स्नेहांकित,
(स्वाक्षरी)
लक्ष्मणशास्त्री जोशी

माननीय श्री. यशवंतराव चव्हाण,
**परराष्ट्र व्यवहारमंत्री, भारत सरकार,**
१ रेसकोर्ट रोड, नवी दिल्ली - ११.

ooo

# महाराष्ट्र शासन

कृपया तत्वर

जा. क्र. विनिम.१०८१/१२५०
महाराष्ट्र राज्य विश्वकोश मंडळ
एन्साहटमेंट, "डी" ब्लॉक,
आझाद मैदान, मुंबई ४००००१
दिनांक: १८ जानेवारी १९८३

**श्री. वा. न. मेंहजोगे,**
**साहाय्यक सचिव,**
**समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, पर्यटन**
**व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई २२**

विषय : मराठी विश्वकोश निर्मिती मंडळात विविध समित्या स्थापण्यासंबंधात तसेच मंडळावर सदस्य स्वीकृत करण्यासंबंधात अधिकृत करण्याबाबत.

स. न. वि.वि.,

उपर्युक्त विषयावरील शासन पत्र, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्र. विनिमं १०८२/६५९२/तांका, दिनांक ३०-१०-१९८२ च्या संदर्भात आपणांस कळवू इच्छितो की, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या कामकाजासाठी (१) स्थायी समिती (२) नकाशा खंड समिती स्थापण्याचे ठरले आहे. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीएलसी १०६०/के. दिनांक १२-११-६० मधील परिच्छेद २ नुसार विभाजनपूर्व साहित्य संस्कृती मंडळाच्या कामकाजासाठी मंडळाने स्थायी समिती, मराठी विश्वकोश समिती, भाषांतर समिती, विज्ञान समिती, प्रकाशन समिती अशा विविध समित्या स्थापन केल्या होत्या व विभाजनोत्तर साहित्य संस्कृती मंडळानेही आपली कार्ये पार पाहण्यासाठी सदर शासन निर्णयानुसार विविध समित्या नेमल्या आहेत. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीएससी १०८०/११६७/वीस, दिनांक २८-११-१९८० अन्वये भूतपूर्व साहित्य संस्कृती मंडळाचे विभाजन झाल्याने व नवनिर्मित मराठी विश्वकोश निर्मिती मंडळास वरील शासन निर्णय दिनांक १९-११-६० परिच्छेद २ नुसार मंडळाच्या

कामकाजासाठी समित्या स्थापण्याचा तसेच सदस्य स्वीकृत करण्याचे कोणतेही अधिकार नसल्याने मंडळ आजवर कोणतीही समिती नेमू शकले नाही. तेव्हा आपणांस विनंती की, मंडळाची कार्ये पार पाडण्यासाठी वरील शासन निर्णय दिनांक १९-११-६० अन्वये साहित्य संस्कृती मंडळास समित्या स्थापन करण्याचे व तसेच सदस्य स्वीकृत करण्याचे अधिकार याही मंडळास देऊन उपकृत करावे.

मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने मंडळाच्या प्रशासकीय, आर्थिक आदी तातडीच्या विषयांवर निर्णय घेण्यासाठी पुढील सदस्यांची 'स्थायी समिती' व विश्वकोश नकाशा खंड (खंड १२) च्या निर्मितीच्या बाबतीत सर्वांगीण विचार करण्यासाठी पुढील तज्ज्ञांची 'नकाशा खंड समिती' नियुक्त करण्याचे ठरले आहे.

**स्थायी समिती**

१) तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी (अध्यक्ष)

२) श्री. गो. वा बेडेकर, मुंबई — ३) मा. के. ज. पुरोहित, मुंबई

४) श्री. राजाभाऊ कुळकर्णी, पुणे — ५) प्रा. केशव मेश्राम

६) श्री. पं. रा. पाटील (सचिव)

**नकाशा खंड समिती**

१) तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी (अध्यक्ष)

| | |
|---|---|
| २) श्री. गो. वा बेडेकर, मुंबई | ३) श्री. राजाभाऊ कुळकर्णी, मुंबई |
| ४) डॉ. वं. धु. देशपांडे, पुणे | ५) डॉ. दि. मु. वाघ, पुणे |
| ६) डॉ. प्र. र. करमरकर, पुणे | ७) श्री. सुरेश बी. गरसोळे, पुणे |
| ८) प्रा. ज. ब. कुमठेकर, पुणे | ९) प्रा. वि. श्री. काळे, पुणे |
| १०) श्री. अ. श्री. पंडित, पुणे | ११) धी. चं. मु. पुरंदरे, पुणे |
| १२) श्री. अ. भि. चितळे, पुणे | १३) श्री. एम. एस. माविंकुर्वे, मुंबई |
| १४) श्री. गो. ना. कांबळे, पुणे | १५) श्री. पं रा. पाटील (सचिव) |

यासंबंधात आपणांस आणखी पुढील माहिती पुरविण्यात येत आहे :-

१) समितीची कालमर्यादा ही मंडळाच्या पुढील पुनर्रचनेपर्यंत असते.

२) समितीच्या सदस्यांना मंडळाच्या सदस्यांप्रमाने बैठक भत्तारूप रु. २०/- व प्रवासभत्ता देण्यात येतो.

३) समितीच्या बैठका मंडळाच्या कामकाजानुसार बोलाविण्यात येतात.

आजवर मंडळात वरील शासन निर्णयातील तरतुदीअभावी कोणतीही समिती नेमता आली नाही वा सदस्य स्वीकृत करता आले नाहीत. त्यामुळे कार्ये पार पाडताना मंडळाचे अत्यंत गैरसोय होत आहे. तेव्हा आपणांस विनंती की, शासन निर्णय, दिनांक १९-११-१९६० मधील परिच्छेद २ अन्वये साहित्य संस्कृती मंडळास जसे अधिकृत करण्यात आले

आहे तसेच अधिकार नवनिर्मित मराठी विश्वकोश निर्मिती मंडळासही सत्वर देऊन उपकृत करावे.

कळावे.

आपला

(स्वाक्षरी)

**(पं. रा. पाटील)**

सचिव,

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ

प्रत माहितीसाठी रवाना :

श्री. रा. पु. कोल्हटकर

अध्यक्षांचे स्वीय साहाय्यक,

विश्वकोश कार्यालय, वाई,

जि. सातारा

विच/१८-१

ooo

# महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
अध्यक्ष

संदर्भ क्रमांक: विनिमं, १०८/३/५३३. मुंबई
दिनांक: 8 FEB 1983

**माननीय प्रिय श्री. वसंतरावजी पाटील,**

स. न. वि.वि.,

महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्रीपदाची सूत्रे आपण नुकतीच हाती घेतली आहेत. मुख्यमंत्री म्हणून राज्याची धुरा हाती घेतल्यावर त्यात आपणास सुयश चिंतणारे माझे दिनांक ७-२-१९८३ चे पत्र मिळाले असेलच. आपल्यासमोर राज्याच्या अनेक जबाबदाऱ्या असताना महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या एका महत्त्वाच्या विषयाबाबत आपणास तसदी देत आहे. त्याबद्दल क्षमस्व.

साहित्य संस्कृती मंडळाचा सर्वांत महत्त्वाचा, महाराष्ट्र शासनाचा मानबिंदू ठरलेला व आता महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचा एकमेव वाङ्मयीन प्रकल्प म्हणजे मराठीतून सर्व विषय संग्राहक ज्ञानकोशाची म्हणजे मराठी विश्वकोशाची रचना व प्रकाशन होय. ख्यातनाम एन्सायक्लोपिडिया ब्रिटानिकाच्या धर्तीवर मराठी विश्वकोशाचे संपादन होत असून त्याचे प्रत्येकी ११०० ते १२०० पृष्ठांच्या २० अंकात प्रकाशन व्हावयाचे आहे. आता विश्वकोशाच्या संपादनाचे व मुद्रणाचे कार्य बऱ्याच प्रगत अवस्थेत असून मराठी विश्वकोशाचे पहिले ११ खंड छापून तयार आहेत. यापैकी पहिल्या पाच खंडाचे प्रकाशन आपण मुख्यमंत्री असताना भारताचे माजी पंतप्रधान मोरारजीभाई देसाई यांच्या हस्ते पुणे येथील टिळक स्मारक मंदिरात दिनांक २४-७-१९७७ ला करण्यात आले हे आपणास स्मरण असेलच. विश्वकोश खंड ६ व ७ चे प्रकाशन साहित्य अकादमी, नवी दिल्लीचे अध्यक्ष, डॉ. उमाशंकर जोशी यांच्या हस्ते दिनांक ९ मे १९७९ ला वाई येथे झाले आहे.

विश्वकोशाचे एकूण वाङ्मयीन व शैक्षणिक महत्त्व व त्याचे प्रकाशन म्हणजे महाराष्ट्राच्या प्रतिष्ठेचा मानबिंदू आहे, ही गोष्ट लक्षात घेऊन आता प्रकाशनात तयार असलेल्या विश्वकोशाच्या ८, ९, १० व ११ खंडाचे ही प्रकाशन भारताचे पंतप्रधान श्रीमती इंदिराजी गांधी यांच्या हस्ते होणे उचित होईल असे वाटते. तरी त्यांना आपण या बाबतीत मंडळाच्या व महाराष्ट्राच्या वतीने जरूर ती विनंती करावी. सोबत श्रीमती इंदिराजी गांधी यांना उद्देशून

लिहिण्याच्या पत्राचा नमुना जोडीत आहे. त्यांच्या सोयीची तारीख व वेळ मिळवून ती कृपया मला तत्वर कळविल्यास मी आपला अत्यंत आभारी होईन.

आपल्या माहितीसाठी येथे नमूद करू इच्छितो की, विश्वकोश खंडाचे प्रकाशन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या शुभहस्ते दिनांक १२ डिसेंबर १९७६ ला करण्याचे योजिले होते; परंतु राज्याच्या माजी राज्यपाल श्री. अली यावर जंग यांच्या दुःखद निधनाने सदर प्रकाशन समारंभ होऊ शकला नाही.

आपण जरूर ते सत्वर करालच.

आपला स्नेहांकित,

**(स्वाक्षरी)**

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

**मा. श्री. वसंतरावजी पाटील,**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय, मुंबई- ४०८ ०३२.

ooo

---

'एन्सा' हटमेंट 'डी' ब्लॉक, आझाद मैदान, मुंबई-४०० ००१.
दूरध्वनी क्र. :- कार्यालय : २६६६९८ निवास : ६७८०५१.

Dear Smt. Indiraji

You are probably aware that the Maharashtra State Board for Production of Marathi Vishwakosha has on the lines of the Encyclopaedia Britannica undertaken the compilation and publication of a general Encyclopaedia in Marathi in 20 volumee of 1200 pages each. The Board's project for the Marathi Encyclopaedia constitutes its most importent and the state's most prestigious work. In the main 17 volumes of the Vishwakosha, the most up to date knowledge and information on all subjects and branches of techonology as well as is collected and presented in the Devanagari alphabetical order, in the most concise and orderly form as is best suited to the needs of the average educated reader, and pertioulary the teachers and the university students. The work of the Vishwakosha is being carried on in the Vishwakosha Unit, at Wai (Dist. Satara) under the Chief Editorship of Tarkateertha Shri Laxmanshastri Joshi, the Chairman of the Board with the help and co-operation of some regular staff of about 50 persons and outside scholar contributors numbering about 1000/1200 draim from all the fields exparts in their respective subjects. The fields experts and the production of the Vishwakoshahas now reached a significant stage and further Four Volumes of Marathi Vishwakosha i.e. Vols. 8,9,10 & 11 are ready for publication. We earnestly desire that this important pulication should be released at your hands, as early as possible and the inaguration function should take place at Bombay, Pune or Wai as may be best suitable to your convenicese. I have therefore, to request you kindly to indicate the day and time convenient to you so that after knowing your convenience, other things would be arranged in time.

You may, also perhaps recall that the release of first five volumes of the Marathi Vishwakosha was arranged at your hands in Bombay on 12-12-1976; but the function had to be cancelled due to the sad demise of Ali Yavar Jung. the former Governor of the State.

I also add here that the foundation stone of the building erected for the Prajnya Pathashala Mandal. Wai (Dist. Satara) had been laid by you on 11-10-59 when you were the president of the Indian National Congress.

I sincerely hope that you will kindly accept this invitation to release the Vishwakosha Volumes at th earliest and indicate the day and time suitable to you for the purpose.

With kind regards.

youre Sincerely,

(V. B. Patil)

To,
Smt. Indraji Gandhi
Prime Minister of India,
Central Secretarial,
New Delhi.

❍❍❍

## महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी<br>अध्यक्ष

मराठी विश्वकोश कार्यालय,<br>वाई (जि. सातारा)

संदर्भ क्रमांक: विनिमं - १०८३-१५०२

दिनांक: ७ एप्रिल १९८३

विषय:- वाई येथील मराठी विश्वकोश कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्थेत भेट देण्याबाबत

**माननीय प्रिय डॉ. श्री. रामराव आदिक**

यांस- सप्रेम नमस्कार वि.वि

मी उपर्युक्त विषयावर मागे आपणास दिनांक २६ मे १९८१ रोजी एक पत्र लिहिले होते. माझ्या पत्राची दखल घेऊन आपण त्वरित कार्यवाही केलीत याबद्दल मी आपला आभारी आहे. आपण पुन्हा हे पत्र लिहून आपणास तसदी देत असल्याबद्दल क्षमा असावी.

विश्वकोश कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्थेने वाई येथे सर्व्हे नं. ७७-१ ही जागा दिनांक २ सप्टेंबर १९८० रोजी घरबांधणीसाठी खरेदी केली. या जागेवर नगरपालिकेने प्राथमिक शाळा व क्रीडांगण यांच्या उपयोगासाठी आरक्षण घातले होते, परंतु आपल्या पत्राला प्रतिसाद देऊन आणि आमच्या संस्थेच्या आडचणी लक्षात घेऊन संचालक भूविकास व नगररचना कार्यालय, पुणे यांनी सदरचे आरक्षण उठवावे, असा अभिप्राय दिला असून हे प्रकरण आपणास दिनांक १ फेब्रुवारी १९८३ रोजी पुढील कार्यवाही व आदेशाकरिता पाठविले आहे, तरी यासंदर्भात शक्य तितक्या लवकर आरक्षण उठविण्याचा आदेशासंबंधित खात्याकडे पाठवून उपकृत करावे, ही विनंती.

सदर गृहनिर्माण संस्थेमध्ये मी स्वतः एक क्रियाशील सभासद आहे म्हणून ही विनंती करीत आहे. दिवसेंदिवस वाढणाऱ्या बांधकाम साहित्याच्या महागाईमुळे आणि घरांच्या

टंचाईमुळे विश्वकोशातील संस्थेच्या सभासदांची कुचंबणा होत आहे. तरी आपण जातीने लक्ष घालून संबंधित अधिकाऱ्यांना आदेशासंबंधी कृपया योग्य त्या सूचना द्याव्यात, ही नम्र विनंती.

कळावे, ही विनंती.

आपला स्नेहांकित,

**(स्वाक्षरी)**

लक्ष्मणशास्त्री जोशी

सोबत:

गृहनिर्माण संस्थेचा विनंती अर्ज

प्रति,

**माननीय डॉ. रामराव आदिक,**

उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,

मुंबई- ४०००३२

ooo

विनिमं - १०८३-१६७१ १४ एप्रिल १९८३

विषय:- मराठी विश्वकोश कार्यालय, वाई.
भेट देण्याबाबत.

**माननीय प्रिय श्री. सुशीलकुमार शिंदे**

यांस- सप्रेम नमस्कार वि.वि

आज आपणास हे पत्र लिहून तसदी देत असल्याबद्दल क्षमा असावी.

विधानसभेच्या कामकाजातून या महिना अखेर मोकळे झाल्यानंतर आपणास सवड मिळेल असे वाटते. दिनांक ३१ मे १९८३ रोजी वाई येथील मराठी विश्वकोश कार्यालयास भेट द्यावी अशी माझी आग्रहाची विनंती आहे. त्यावेळी आपणास मराठी विश्वकोशाची योजना जवळून पाहता येईल.

याच तारखेस म्हणजे दिनांक ३१ मे १९८३ रोजी सायंकाळी ७ वाजता वाई येथे गेली ६७ वर्ष सातत्याने चालू असलेल्या वसंत व्याख्यानमालेचा समारोपही आपल्या हस्ते व्हावा अशी माझी आग्रहाची विनंती आहे. महाराष्ट्रात ज्या थोड्या वसंत व्याख्यानमाला सातत्याने चालू असतात त्यापैकी वाईची वसंत व्याख्यानमाला आहे. या व्याख्यानमालेत दरवर्षी राजकीय, सामाजिक व अन्य क्षेत्रातील मंडळीची एक महिनाभर व्याख्याने होत असतात. माझे हे आग्रहाचे निमंत्रण आपण स्वीकाराल असा मला विश्वास आहे. सोबत वसंत व्याख्यानमालेचा अहवाल पाठविला आहे.

कळावे.

आपला स्नेहांकित,
**(स्वाक्षरी)**
लक्ष्मणशास्त्री जोशी

**प्रति,**

**माननीय श्री. सुशीलकुमार शिंदे,**
अर्थ, नियोजन व सांस्कृतिक कार्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३३.

○○○

# महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
अध्यक्ष

मराठी विश्वकोश कार्यालय,
वाई ( जि. सातारा ), ४१२८०३.
दिनांक: १/६/१९८३.

संदर्भ क्रमांक: विनिमं - १०८३/२४००

विषय:- दै. 'नवशक्ती' मधील विश्वकोशासंबंधी लेख.
विश्वकोश कार्यालयाचा खुलासा.

**माननीय श्री. संपादक,**
दैनिक 'नवशक्ती'
११५, फ्री प्रेस जर्नल मार्ग,
नरिमन पॉईंट, मुंबई- ४०० ०२१.
स. न. वि.वि

आपल्या वृत्तपत्राच्या दिनांक १, ८ व १५ मे १९८३ या अंकातून श्री. बाळ सामंत यांनी मराठी विश्वकोशासंबंधीजी दोन परीक्षणे लिहिली आहे, त्यासंबंधी विश्वकोश कार्यालयाचा खुलासा सोबत प्रसिद्धीसाठी पाठवीत आहोत. कृपया तो कसलेही फेरफार व संक्षेप न करता जसाच्या तसा शक्य तितक्या लवकर प्रसिद्ध करावा, ही विनंती.

श्री सामंताच्या दोन्ही लेखातून अनेक मुद्रणदोष आढळून आले व त्यामुळे वाचकांची मोठीच अडचण होते. कृपया सोबतचे उत्तर छापताना मुद्रणदोष होणार नाहीत याची काळजी घ्यावी किंवा त्याची मुद्रिते आमच्याकडे पाठविल्यास, ती आम्ही तत्परतेने तपासून देऊ.

आपणास हे सोबतचे उत्तर जसेच्या तसे छापणे शक्य नसल्यास कृपया ते आमच्याकडे परत पाठवावे, ही विनंती.

कळावे.

आपला,
**(स्वाक्षरी)**
(लक्ष्मणशास्त्री जोशी)
प्रमुख संपादक
मराठी विश्वकोश वाई.

Issued

2 JUNE 1983

वृत्त माहितीकरिता रवाना-

सचिव,

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ,

मुंबई-१

❍❍❍

*('नवशक्ती' च्या १ मे व ८ मे १९८३ च्या अंकात श्री. बाळ सामंत यांनी मराठी विश्वकोशाच्या पहिल्या तीन खंडांवरील परीक्षण अनुक्रमे (१) ''तर्कतीर्थांच्या गळ्यातील रत्नमाला : विश्वकोशातील विलक्षण विद्रुप : पहिल्या तीन अंकांवर ओझरता दृष्टिक्षेप'' आणि (२) ''विश्वकोशातील विलक्षण विद्रुप : अनेकविध उणिवांनी भरलेले पहिले तीन अंक'' या मथळ्याखाली प्रसिद्ध केले आहेत. त्यास मराठी विश्वकोशाच्या कार्यालयाचे हे उत्तर.)*

'नवशक्ती'च्या वर विलेल्या दोन अंकांतून अधिक्षेप करणाऱ्या शीर्षकांखाली श्री. बाळ सामंत यांनी विश्वकोशाच्या पहिल्या तीन अंकांसंबंधी जो अभिप्राय व्यक्त केला आहे. त्याचा तपशीलवार खुलासा पुढे दिलेला आहे.

संदर्भ ग्रंथाबद्दल सामंतांची जी कल्पना आहे, ती कोणत्याही सर्वसंग्राहक (जनरल) विश्वकोशरचनेस गैरलागू ठरते. एखाद्या विषयावरील सगळेच्या सगळे उपलब्ध संदर्भग्रंथ कोणत्याच विश्वकोशात देणे शक्य नसते, योग्य नसते आणि कित्येक बाबतीत त्यांची गरजही नसते. एवढेच नव्हे, तर विशिष्ट विषयावरील विश्वकोशातही उदा. एन्सायक्लोपीडिया ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, एन्सायक्लोपीडिया ऑफ रिलिजन ॲन्ड एथिक्स इत्यादी- निवडक संदर्भग्रंथ देण्याची पद्धत आहे. ती निवड तो तो लेखक-संपादक स्वत:च्या निवडीच्या दृष्टिकोनाने करतो आणि हे स्वातंत्र्य लेखकांना द्यावेच लागते. कारण शेकडो लेखकांच्या सहकार्याने विश्वकोश निर्माण होऊ शकतो, अन्यथा नव्हे. मराठी विश्वकोश चर्चेच्या संदर्भात ज्ञानकोशकार डॉ. श्री. व्यं. केतकर यांनी एकट्याने ज्ञानकोश लिहिला, अशा तऱ्हेचा आभास मुद्दाम होऊन वारंवार उत्पन्न केला जातो; परंतु त्यांनीही अनेक लेखकांचे साहाय्य घेऊन तसेच संपादनार्थ व प्रकाशनार्थ लागणारा पैसा लिमिटेड कंपनी काढून ज्ञानकोश संपादित केला. ही गोष्ट त्यांनी दिलेल्या ज्ञानकोश इतिहासावरून दिसून येते. समग्र संदर्भग्रंथांची यादी त्या त्या विषयावरील संशोधनात्मक ग्रंथातच देणे शक्य आहे. पण म्हणून सामंतांना अभिप्रेत असलेले संदर्भग्रंथ लेखकाने दिले नाहीत म्हणजे ते त्याला माहीत नाहीत, असे कसे म्हणता येईल?

विश्वकोशात एखाद्या विषयाची किती माहिती यावयाची, हे सबंध विश्वकोशाची रचना करताना ठरलेले असते. त्यासाठी त्या त्या लेखाची व नोंदीची शब्दसंख्या निश्चित करून व अनेक विषयांची संक्षिप्त माहिती या रूपरेषात्मक माहिती देऊन, वाचकाला त्या त्या विषयाकडे वेधून घेण्याचे किंवा वळवण्याचे काम विश्वकोश करतो. कोणताही महत्त्वाचा

ज्ञानविषय हा व्यापक असतो. त्यावर पाचपन्नास पृष्ठांपासून शेकडो पृष्ठांपर्यंत लिहिलेले असते. आणि प्रसिद्धीही झालेली असते. अशा विषयांची माहिती १०-२० ओळींपासून ५-१० पृष्ठांपर्यंत विश्वकोशात देता येईल. नेपोलियनची नोंद लिहावयाची, तर हजारो साधनग्रंथ फ्रेंच ग्रंथालयात मिळतात. पण फ्रेंच, जर्मन, इंग्लिश भाषेतील कोणत्याही विश्वकोशात ५ ते २५ पृष्ठांइतका मजकूर त्यासंबंधी असतो. म्हणून त्यात पुष्कळ मजकूर गळतो. अशा प्रकारे तपशील गाळणे किंवा गळणे ही विश्वकोशात रितीशी सुसंगतच आहे.

विश्वकोशाच्या लेखकवर्गात सगळेच प्राध्यापक आहेत असे नाही. तसेच प्राध्यापक व त्यांचे ज्ञान याबद्दलची सामंतांची भूमिका विनाकारण अधिक्षेप करणारी व तुच्छताधारी आहे. आंतरराष्ट्रीय किर्तीचेही काही व्यासंगी प्राध्यापक विश्वकोशाच्या संपादन कार्यात सहभागी आहेत.

विश्वकोशात आलेल्या नोंदी एका साकल्यात्मक व पूर्वनियोजित अशा योजनेनुसारच घेतलेल्या असतात. बाळ सामंतांसारख्यांना त्यात काही व्यक्तीवर व विषयावर नोंदी असणे आवश्यक वाटले, तरी तशा नोंदी विश्वकोशात नाहीत. ही त्यातली उणीव म्हणता येणार नाही, कारण अशा विषयासंबंधीची माहिती विश्वकोशात अन्यत्र कमीअधिक प्रमाणात आलेलीच असते व तिचा निर्देश सूचीखंडात मिळतो. एखाद्या विषयाची अजिबात माहिती विश्वकोशात आली नाही, असे क्वचितच होते.

श्री. बाळ सामंत यांनी आपल्या दोन्ही लेखांत विश्वकोशातील पहिल्या तीन खंडातील नोंदींसंबंधी उपस्थित केलेल्या मुद्द्यांचा पुढे खुलासा देत आहोत.

**आत्मचरित्र :**

विश्वकोशातील 'आत्मचरित्र' ही नोंद मुख्यत: आत्मचरित्र या वाङ्मयप्रकाराच्या आकृतिबंधाचा परिचय करून देण्यासाठी योजलेली आहे. त्याच्या स्पष्टीकरणार्थ काही पश्चिमी आणि मराठी आत्मचरित्रांचे निर्देश प्रस्तुत नोंदीत करण्यात आलेले आहेत. शिवाय 'दैनंदिनी' व 'स्मरणिका' (Memoris) अशा स्वतंत्र नोंदी विश्वकोशात असून आत्मचरित्र या नोंदीसाठी त्यांचा ता निर्देश केला आहे. 'संस्मरणिका' या नोंदीत 'रमाबाई रानड्यांच्या आठवणी' या पुस्तकाचा निर्देश आहे. सामंतांनी उल्लेख केलेल्या मराठी आत्मचरित्रांचा व आठवणींचा निर्देश 'मराठी साहित्य' या नोंदीतील चरित्र व आत्मचरित्र या उपविषयाखाली समाविष्ट आहे. गणपतराव बोडसांचे 'माझी भूमिका' हे पुस्तक आत्मचरित्र या नोंदीत निर्दिष्ट केलेले आहे. 'मुखवट्याचे जग' हे पुस्तक निव्वळ समीक्षात्मक नाही, त्यात लेखकाच्या आठवण व अनुभवही आहेत. हे मूळ लेखकाच्याच निवेदनातून दिसून येते. ते निवेदन असे : 'भूमिकांचे विवेचन करीत असताना मला नाट्यसृष्टीत आलेले अनुभव मी दिलेले आहेत. विषयांतर होऊन ते अस्थानी आहेत असे वाचकांना वाटणार नाही, अशी आशा आहे.'

**काशिनाथ रघुनाथ मित्र :**

काशीनाथ रघुनाथ आजगावकर हे काशीनाथ रघुनाथ मित्र म्हणून प्रसिद्ध आहेत. व त्यांच्यावरील नोंद 'मित्र, काशीनाथ रघुनाथ' अशा शीर्षकाने विश्वकोशात समाविष्ट आहे.

**अण्णासाहेब किर्लोस्कर व लक्ष्मणराव किर्लोस्कर:**

या दोन्ही थोर व्यक्तींच्या बाबत आवश्यक ते संदर्भग्रंथ विश्वकोशात दिलेले आहेत. सामंतांनी नमूद केलेल्या या दोन्ही व्यक्तींसंबंधीच्या पुस्तकाचा पत्ता विश्वकोशाच्या संबंधित लेखकांना नाही, असे का म्हणावे ते कळत नाही; कारण विश्वकोशात सगळेच उपलब्ध संदर्भ देण्याची पद्धती नसते.

**बाबुराव अर्नाळकर:**

मराठी वाचकांस लोकप्रिय असलेल्या लोकांपैकी बाबुराव कर्नाळकर एक आहेत. ते स्वातंत्र्यसैनिक व स्वातंत्र्यसैनिकांचे संघटकही आहेत. सुजाण वाचकाला ही नोंद आवश्यक असल्याचे पटेल.

**आक्षिप्त वाङ्मय:**

ही नोंद आक्षिप्त वाङ्मय म्हणजे काय व तिच्यासंबंधीच्या कायदेशीर तरतुदी कोणत्या याविषयी योजलेल्या आहेत. मराठीतील आक्षिप्त वाङ्मय असे तिचे स्वरूप नाही; आक्षिप्त वाङ्मयासंबंधीचा कायदा असा तिचा विषय असल्याने, सामंतांचा अभिप्राय गैरलागू ठरतो.

**अश्लीलता :**

अश्लीलतेची संकल्पना स्पष्ट करणारी ही नोंद आहे नीती आणि कायदा या क्षेत्राशी कला साहित्यातील क्षेत्रातील अश्लीलतेची संबंध तात्त्विक पातळीवर स्पष्ट करणे, हा या नोंदीचा उद्देश आहे. अश्लील मानल्या गेलेल्या अनेक साहित्यकृतींची व कलाकृतींची उदाहरणे देऊन त्यांचे सविस्तर प्रतिपादन करण्याचा या नोंदीचा उद्देशच नाही.

**अरेबियन नाईट्स :**

अरेबियन नाईट्सवरील विश्वकोशातील नोंदीतील सगळीच माहिती चुकीची आहे असे सामंतांनी म्हटले आहे, पण यासंबंधीचे तपशील मात्र दिलेले नाहीत. विश्वकोशाच्या या नोंदीत अरेबियन नाईट्स या प्रसिद्ध कथांच्या अगदी प्राचीन स्वरूपासून अद्ययावत स्वरूपापर्यंतचा संक्षिप्त आढावा घेतलेला असून त्यासंबंधी विश्लेषणात्मक माहितीही दिलेली आहे. खुद्द सामंतांनी बर्टनच्या अनुवादासंबंधी मात्र एक चुकीचे विधान केले आहे: ते म्हणतात त्याप्रमाणे बर्टनच्या अनुवादाने बारा खंड व नंतरचे चार जोड खंड अशी विभागणी नसून पहिले १० खंड व नंतरचे ६ पुरवणी खंड अशी विभागणी आहे. या

जगप्रसिद्ध ग्रंथाच्या विविध भाषांतील सगळ्यात भाषांतरांची जंत्री विश्वकोशात देता येणे शक्य नाही आणि आवश्यकही नाही. ‘अरेबियन नाईट्स’सारख्या ग्रंथावरील नोंद प्रत्येक अभ्यासकाला आपापल्या पद्धतीने, वेगवेगळ्या रीतीने लिहिता येणे शक्य असते व हीच गोष्ट विश्वकोशातील या नोंदीलाही लागू आहे. ‘अरेबियन नाईट्स इंटरटेनमेंट’ हे नाव प्रथम जोनाथन स्कॉट याने दिले, हे सामंतांचे म्हणणे बरोबर आहे.

**अलंकार :**

विश्वकोशातील अलंकार या नोंदीतील कोणतीच चूक किंवा उणीव न दाखवता ही एक अत्यंत जुनी नोंद आहे, असे सामंतांनी म्हटले आहे. या नोंदीखाली आम्ही दिलेले संदर्भग्रंथ महत्त्वाचे आहेतच. सामंतांना झालेली तुच्छतावादी दृष्टिकोनाची बाधा त्यांच्या एतद्संबंधी सर्वच लेखनांत दिसते. सामंतांना माहीत असलेला ग्रंथ त्यात नाही, ही नोंदीची उणीव होऊ शकत नाही संदर्भ ग्रंथाबद्दलची निवड आणि मर्यादा यासंबंधी वर खुलासा आला आहेच.

**हरिभाऊ आपटे :**

सामंत ज्याला रेनॉल्ट्स म्हणतात तोच विश्वकोशातील नोंदीत ‘रेनल्डझ’ या नावाने निर्दिष्ट केलेला लेखक होय. ‘मिस्टरीज ऑफ कोर्ट ऑफ लंडन’ हे रेनल्डझच्या कादंबरीचे नाव लेखकाने नमूद केलेले असले तरी वि.भा. आंबेकर (हरिभाऊ विविध दर्शन, आवृ. १९६४, पृष्ठ १४) आणि कुसुमावती देशपांडे (‘मराठी कादंबरीचे पहिले शतक’ पृष्ठ ७४) ह्याच कादंबरीचा उल्लेख सुसंगतपणे ‘मिस्टरीज ऑफ ओल्ड लंडन’ असाच करतात. हरिभाऊ आपट्यांसंबंधीचे संदर्भग्रंथ निवडपूर्वक या नोंदीखाली दिले आहेत. सगळेच उपलब्ध संदर्भग्रंथ देणे विश्वकोशाच्या पद्धतीत आवश्यक नसते.

**ईश्वरचंद्र विद्यासागर :**

प्रस्तुत नोंदीत ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या महत्त्वाच्या पुस्तकासंबंधी माहिती दिलेली आहे. त्यांच्या ‘सरलवर्ण परिचय’ या पुस्तकाचा उल्लेख नोंदीच्या लेखक संपादकांना करावासा वाटला नाही.

**किल्ले :**

विश्वकोशातील ‘किल्ले’ ही नोंद मुख्यतः एक वास्तूरचनाप्रकार म्हणून योजलेली आहे. ‘भारतातील आणि महाराष्ट्रातील किल्ले’ असा तिचा विषय नाही. त्यामुळे सामंतांच्या या संदर्भातील अपेक्षा अस्थानी ठरतात. भारतातील व महाराष्ट्रातील महत्त्वाच्या पुष्कळ किल्ल्यावर विश्वकोशात स्वतंत्र नोंदी आहेत, तसेच विश्वकोशाच्या सूचीखंडात विश्वकोशात इतर आलेल्या किल्ल्यांवरील माहितीचा निर्देश येईल. सिडनी टॉय लेखकाच्या द ‘फोर्टीफाईड सिटीज ऑफ इंडिया’, (१९६५) या पुस्तकाचा निर्देश नोंदीखाली संदर्भ म्हणून

दिलेला आहे. याविषयी ग. ह. खरे, चिं. ग.गोगटे व वा.सी. बेंद्रे यांच्या किल्ल्यावरील मराठी ग्रंथाचे संदर्भ दिलेले आहेत. सामंतांनी सिडनी टॉय याचे 'द स्ट्रॉंगहोल्ड्ज ऑफ इंडिया' हे पुस्तक वाखाणून निर्दिष्ट केले आहे; तथापि विश्वकोशाच्या नोंदीत टॉयच्या त्यानंतरच्या १९६५ 'द फोर्टीफाईड सिटीज ऑफ इंडिया' या पुस्तकाचा संदर्भ दिलेला आहे. विशेषतः वास्तूरचनाप्रकार या दृष्टीने हे दुसरे पुस्तकच अधिक अद्यावत व महत्त्वाचे आहे. शिवाय या दुसऱ्या पुस्तकात पहिल्या पुस्तकात नसलेली अधिक माहितीही आहे.

### आर्चर व कोन्झे :

बौद्ध धर्मातत्त्वज्ञानावरील कोन्झे यांचे ग्रंथ बौद्ध धर्म तत्त्वज्ञान इत्यादींवरील संबंधित नोंदीत दिलेले आहे. तीच गोष्ट आर्चर या भारतीय चित्रकलेवरील भाष्यकराबद्दल म्हणता येईल. या दोघांवर स्वातंत्र्य नोंदी विश्वकोशात घेतलेल्या नाहीत. इंग्रजीतील बहुतेक सर्वविषयसंग्रह विश्वकोशातही या दोघांवर स्वातंत्र्य नोंदी नाहीत.

### क्रिस्तोफर इशरवुड :

यांच्यावरील नोंदीत 'भगवद्गीतेसारख्या ग्रंथाचे भाषांतर केले', असे म्हटले आहे लिहिण्याची एक धाटणी आहे व त्यामुळे अर्थाबद्दल संदिग्धता निर्माण होते, असे म्हणता येणार नाही.

### जारी, आल्फद :

या फ्रेंच नाटककारावर विश्वकोश स्वतंत्र्य नोंद (खंड ६ - पृ. ४३६). शिवाय फ्रेंच वाड्मयावरील लेखात (खंड १० वा - प्र. ११४.५) या नाटककारसंबंधी पुढील विवेचन आहे :

'नाट्यक्षेत्रात आल्फद जारी (१८७३-१९०७) ह्याला आगळे आणि महत्त्वाचे स्थान आहे. त्याने आपल्या 'युबु रॉई' (Ubu Roi) या उपरोधपूर्ण फार्समधून समाजातील प्रस्थापित संस्था, नैतिक मूल्ये संस्कृती यांच्यातील विसंगती दाखवून त्याची टर उडवली आहे. बूर्ज्वांच्या सत्तालालसेचे प्रतीक रूपाने केलेले हे चित्रण आहे. पारंपरिक टीकाकारांनी मात्र त्याच्या या नाटकावर टीकेची झोड उठविली. जारीने या नाटकासाठी वापरलेल्या अभिनव तंत्रातूनच पुढे 'ॲब्सर्ड थिएटर'ने प्रेरणा घेतली.'

हे विवेचन म्हणजे या नाटककराचा 'जाता जाता केलेला' निर्देश आहे. हा सामंतांचा अभिप्राय कितपत बरोबर आहे, हे वाचकांनीच ठरवावे.

### पाश्चात्त्य वाङ्मयसेवक :

सामंतांनी निर्देश केलेल्या आल्बेर्ती, राफेल, अॅलिसन, एडमंड, एमिल, किंग्जले एमिस; कांपाना (दीनो); कार्पेटानाकीस या साहित्यिकांवर ब्रिटानिका, चेंबर्स कोलिअर्स

आणि अमेरिकाना या चार पश्चिमी सर्वविषयग्राहक विश्वकोशांत स्वतंत्र नोंदी नाहीत. अलन नेल्सन यांच्यावर फक्त अमेरिकनाने नोंद घेतली आहे. या लेखकांपैकी दीनो कांपना याचा निर्देश इटालियन साहित्य (खंड - २ - पृ. ५०२) या नोंदीत त्याच्या संप्रदायाची निवडक वैशिष्ट्ये देऊन करण्यात आला आहे. 'एम्पसन विल्यम' या इंग्रज कवीवरील नोंद विश्वकोशाच्या तिसऱ्या खंडातच पृ. ४ वर आहे. विश्वकोशाच्या पहिल्या तीन खंडांसंबंधी अभिप्राय व्यक्त करणा-या सामंतांनी विश्वकोशातील वरील नोंदीसंबंधी निखालस दिशाभूल करणारी विधाने करावीत याचे सखेद आश्चर्य वाटते.

सामंत ज्याला 'इसनिन' म्हणतात, त्या रशियन लेखकावरील नोंद 'यित्सेत्यिन' अशी घेतलेली आहे. ती योग्य त्या पुढील खंडात प्रसिद्ध होईलच. ऑले फूर्ने (१८८६-१९१४) (नवशक्तीत याचा लेखन उल्लेख 'फॉर्निअर ॲलन' असा आलेला आहे.) यांच्यावर स्वतंत्र नोंद जरी नसली तरी त्याचा उल्लेख फ्रेंच साहित्य या व्याप्तिलेखात (खंड - १०, पृ. ११४२) आलेला आहे.

## आयसेन्स्तीन :

या प्रसिद्ध रशियन चित्रपट दिग्दर्शकावर विश्वकोशाच्या दुसऱ्या खंडातच (पृ. १४४) स्वतंत्र नोंद आहे. या नोंदीत 'द अलेक्झांडर नेव्हस्की (१९२८), तसेच इव्हान द टेरिबल (१९४५) या दोन चित्रपटांचा निर्देश आहे. शिवाय इतरही माहिती दिली आहे. नवशक्तीच्या लेखकाने वरील दोन्ही चित्रपटांचे वर्षनिर्देशही चुकीचे केले आहेत.

## रिचर्ड ॲटनबरो :

यावर ब्रिटानिका, अमेरिकाना, कोलिअर्स इत्यादी सर्वसंग्राहक पश्चिमी विश्वकोशातही स्वतंत्र नोंद नाही.

## पश्चिमी चित्रपट कलावंत :

टोनी कर्टिस, जॅकी कूगन, डेओरा केर, ॲथोनी ॲस्कविथ (मॅवस्नीथ नव्हे), यांच्यावरही ब्रिटानिका, अमेरिकाना या विश्वकोशात स्वतंत्र नोंदी नाहीत. विश्वकोशाच्या पाचव्या खंडामध्ये 'चित्रपट' अशी नोंद असून त्यात जगातील अनेक भाषांतील चित्रपटांचे संक्षिप्त आढावे घेतलेले आहेत. त्यांत निवडक चित्रपट, कलावंत, निर्माते, दिग्दर्शक, तंत्रज्ञ इत्यादींचे निर्देश आलेले आहेत.

सर लॉरेन्स ऑलिव्हिए यांच्यावर फक्त 'अमेरिकाना'त नोंद आहे. पण 'ब्रिटानिका'सारख्या इतर कोशांत मात्र नाही.

### शिल्पकार करमरकर :

विनायक पांडुरंग करमरकर ही नोंद विश्वकोशाच्या तिसऱ्या खंडात (पृ. ३२८) आहे. सामंतांना ही नोंद का दिसू नये? तसेच 'बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर' यांच्यावरील नोंद

विश्वकोशाच्या छापून झालेल्या ११ व्या खंडात (पृ. ५३७) आहे.

सामंतांनी नानासाहेब फाटक, के. नारायण काळे तसेच कवी काटदरे, कार्लेकर बंधू इत्यादींच्या नोंदी विश्वकोशात नाहीत, असे म्हटले आहे. परंतु या सर्वांचे निर्देश निगडित असलेल्या लेखांतून केलेले आहेत व ते विश्वकोशाच्या सूचिखंडात येतीलच. विश्वकोश म्हणजे केवळ चरित्रकोश किंवा वाङ्मयकोश असे नव्हे. उदा. खंड २ (पृ. ५०८ -५२२) मध्ये 'इतिहासलेखनपद्धती' अशी जी प्रदीर्घ नोंद आहे. त्या नोंदीत मराठीतील द. वि. आपटे यांचा निर्देश आलेला आहे आणि 'सर्कस' या पुढील खंडात यावयाच्या नोंदीत कार्लेकर बंधूंचा निर्देश समाविष्ट आहेच. अशा लेखांमध्ये त्या क्षेत्रातील इतरही अनेक व्यक्तीचे निर्देश व माहिती येईलच. सर्वांवरच स्वतंत्र नोंदी घेणे कोणत्याच विश्वकोशाच्या मर्यादेत बसू शकत नाही.

## आंबेडकर, भीमराव :

सामंतांनी विश्वकोशातील या नोंदीतील मूळचे विधान अर्धवटपणे उद्धृत केले आहे. मूळ विधान असे, "श्रेष्ठ कायदे पंडित व अस्पृश्यांचा तडफदार नेता म्हणून आंबेडकरांची स्मृती चिरंतन राहील." शिवाय या नोंदीतील सुरुवातीचे ओळखवजा विधान, 'एक थोर भारतीय पुढारी, अस्पृश्यांचे नेते व भारतीय सांवंधानाचे शिल्पकार' असे आहे. यावरून सामतांनी सहेतुकपणे दिशाभूल करण्यासाठी विश्वकोशातील मजकूर मोडतोड करून मांडल्याचे दिसून येईल.

## गणेश जनार्दन आगाशे :

विश्वकोशात 'मराठी साहित्य संमेलने' अशी नोंद आहे. त्यात गणेश जनार्दन आगाशे यांची माहिती येणारच.

## कामशास्त्र :

कामशास्त्र ही नोंद मुख्यतः भारतीय पारंपरिक कामशास्त्राचे स्वरूप थोडक्यात स्पष्ट करणारी आहे. कामशास्त्रावरील वात्स्यायनाच्या व इतरांच्या भाषांतरांचा निर्देश या नोंदीत करण्याची म्हणूनच आवश्यकता नाही. रिचर्ड बर्टन आणि र. धों. कर्वे याच्यावरील नोंदीत अनुक्रमे त्यांनी केलेल्या भाषांतराचा व लिहिलेल्या ग्रंथाचा निर्देश आला आहे. संदर्भातही काही भाषांतराचा निर्देश केला आहे. अरबी कामशास्त्रासारख्या इतर भागातील व प्रदेशातील कामशास्त्रविषयक ग्रंथांची माहिती देण्याचा येथे उद्देशच नाही.

त्याकरिता 'कोनार्क', 'खजुराहो' इत्यादींवर विश्वकोशात स्वतंत्र नोंदी आहेत. सामंतांनी हॅबेल; पर्सी ब्राऊन व रॉबिन्सन इत्यादींची नावे या संदर्भात घेतली आहेत. या सर्वाच्या विचारांचा व मतांचा परामर्श तपशिलाने या नोंदी घेता येणे शक्य नाही; तथापि नोंदीखालील संदर्भग्रंथातून जिज्ञासू वाचकाला त्यांचे विचार व मते जाणून घेता येतील.

**कला :**

या नोंदीसाठी २० निवडक संदर्भग्रंथांची जी यादी दिली आहे, ती पुरेशी आहे. संदर्भग्रंथांबाबत विश्वकोशीय दृष्टिकोन यापूर्वी केलेल्या खुलाशावरून स्पष्ट होईल.

**वनस्पतिशास्त्र प्राणिशास्त्र :**

विश्वकोशातील वनस्पतिशास्त्राचे लेख लिहितांना भारतीय व अन्य विद्वानांनी लिहिलेल्या विविध ग्रंथांचा आधार घेतलेला आहे. उदाहरणादाखल काही नावे येथे दिली आहेत : १) द वेल्थ ऑफ इंडिया (सी. एस. आय. आर.); २) गॅझेटीयर्स; ३) द फ्लोरा ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी थिओडार कुल ; ४) इंडियन मेडिसिन कीर्तिकर व बसू ५) मटेरिया मेडिका नाडकर्णी ६) फ्लोरा ऑफ ब्रिटिश इंडिया - जे. एन. हूकर; ७) ग्लॉसरी ऑफ इंडियन मेडिसिनल प्लॅंट्स - आर. एन. चोप्रा; ८) औषधी गुणादर्श - शंकर दाजीशास्त्री पदे ९) औषधीसंग्रह - बा. ग. देसाई, १०) भारतीय वनस्पतींचा इतिहास - चिं. ग. काशीकर इत्यादी.

**(अ) कडू - बाळकडू :**

रॅनन्क्युलेसी कुलातील हेलेबोरस नायगर या लॅटिन नावाने व ख्रिसमस रोझ या इंग्रजी नावाने ओळखण्यात येणारी वनस्पती मराठीत ‘बाळकडू’ या नावाने प्रसिद्ध आहे. विश्वकोशाच्या अकराव्या खंडात (पृ. १३६ - १३७) या वनस्पतीवर विस्तृत नोंद आहे. लॅटिन नावाचा उच्चार विविध प्रकारे होणे शक्य आहे.

**(आ) अनंत व तगर**

‘तगर’ (लॅ. टॅबर्निमोटॅना कॉरोनरिया) या वनस्पतीवर विश्वकोशाच्या सातव्या खंडात पृ. १२४ वर नोंद दिलेली आहे. प्रत्येक वनस्पती विविध स्थानिक नावांनी ओळखली जाते व त्यामुळे त्यातल्या त्यात मराठी सुपरिचित असलेल्या नावाने नोंद करण्याचे धोरण संपादक मंडळाने ठेवलेले आहे. वनस्पतीचे विविध औषधी उपयोगही प्रत्येक नोंदीत नमूद केले आहेत.

**(इ) ‘कामलता’**

या वनस्पतीचे पर्यायी नाव ‘गणेशपुष्प’ हे महाराष्ट्र स्टेट गॅझेटिअर - बॉटनी (सुधारित आवृत्ती, १९६१) यामध्ये पृष्ठ ५२६ वर दिलेले आहे. ‘सीतेचे केस’ व ‘गणेशवेल’ या पर्यायी नावांचा विश्वकोशाच्या सूचीमध्ये निर्देश येईलच.

**(ई) ‘कुकुमिस सटिव्हस’**

या वनस्पतीचे ‘काकडी’ हे नाव वरील गॅझेटिअरमध्ये पृष्ठ ११५ व ३१५ वर दिलेले आहे आणि ही वनस्पती भारतामध्ये सर्वत्र व जगातील सर्व उष्ण व उष्ण कटिबंधीय देशांत मोठ्या प्रमाणावर लागवडीत आहे, असा ‘वेल्थ ऑफ इंडिया, रॉ मटेरिअल्स, खंड २’, पृ ३९१ वर उल्लेख आहे आणि हीच नेहमीच्या वापरातील काकडी होय.

**(उ) कोकम (खंड ४) : अळशी (खंड१) तसेच कडू कवड (पृष्ठ ३ - पृष्ठ २३२)**

यांत ही वनस्पती त्वचारोग व महारोगावर अत्यंत गुणकारी आहे, असा उल्लेख आहे; हिंदनोकार्पस बायटियाना व हिंदनोकार्पस ललॉरिफोलिया ही त्याच वनस्पतीची समान अशी लॅटिन नावे आहेत, असा उल्लेख ग्लॉसरी ऑफ इंडियन मेडिसिनल प्लँट्स पृष्ठ १३५ वर आहे); निंब, कडू (खंड ८) ; कोशिंब (खंड ८), आपटा (खंड २), बोंबील (खंड ११) इत्यादी नोंदी छापून झालेल्या विश्वकोशाच्या त्या त्या खंडात असूनही सामंतांनी न पाहाताच त्यासंबंधी शेरे मारलेले दिसतात. कोणत्याही विश्वकोशामध्ये वनस्पतिविज्ञानातील अथवा अन्य विषयांतील सर्वच माहितीचा समावेश व्हावा, असा उद्देश नसतो. याकरिता त्या त्या विषयावर (उदा. प्राणिविज्ञान, अभियांत्रिकी, रसायनशास्त्र) स्वतंत्र विश्वकोशांची रचना केलेली आढळते. (उदा. कर्क ब्राथमर एन्सायक्लोपीडिया ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, द. मॉडर्न एन्सायक्लोपीडिया ऑफ बेबी अ‍ॅन्ड चाइल्ड केअर, द एन्सायक्लोपीडिया ऑफ सॅनिटरी इंजिनिअरिंग (फिटिंग अ‍ॅन्ड प्लंबिंग) सर्वसाधारण विश्वकोशात त्या त्या विषयाची तोंड ओळख व्हावी, एवढाच उद्देश असतो. ‘‘समग्र ग्रंथ पाहिल्याविना उगाच ठेवी जो दूषण....’’ अशा टीकाकारांपैकी हे ‘नवशक्ती’ चे टीकाकार होत, असे खेदाने म्हणावे लागते.

ooo



वाय १८५-१९

*(नवशक्ती : दि. १५-५-८३ च्या अंकात 'तर्कतीर्थांची विश्रब्ध शारदा' ह्या शीर्षकाने जो मजकूर डॉ. ज. वा. जोशी यांच्या नावे प्रसिद्ध झाला आहे, त्याबाबत विश्वकोश कार्यालयाचा खुलासा खालीलप्रमाणे -)*

डॉ. ज. वा. जोशी यांचे तर्कशास्त्रावरील लेख मराठी विश्वकोश कार्यालयाने बाजूला ठेवले आणि इतर विषयांमधून याच तर्कशास्त्रीय विषयांवर लेख लिहून घेतले. डॉ. ज. वा. जोशी यांच्या लेखांत फेरफार करून हे लेख लिहिलेले नाहीत, तर ते अगदी स्वतंत्रपणे लिहिले आहे.

मराठी विश्वकोशाचे तज्ज्ञ लेखकांकडून लिहून घेण्याच्या संबंधातले धोरण असे : एक तज्ज्ञ लेखकाने लिहिलेला लेख किंवा नोंद दुसऱ्या तज्ज्ञाकडून समीक्षित करून घेतली जाते. या समीक्षक तज्ज्ञाने जर समीक्षीलेला लेख किंवा नोंद पुनर्लिखित करून घेण्याची सूचना केली, तर त्याचा अर्थ असा समजला जातो की लेख किंवा नोंद असमाधानकारक आहे, त्यासाठी अनेक वेळा विश्वकोश कार्यालय निराळ्या तज्ज्ञांकडून त्याच विषयावरील लेख किंवा नोंद लिहून घेऊन आपली गरज भागविते. मूळ लेखकाला सूचना करून जर पुनर्लेखन नीट होईल अशी शक्यता वाटली, तर मूळ लेखकास सूचना करून पुनर्लेखन करून घेतले जाते. परंतु मूळ लेखकाला त्याचे लेखन अमान्य झाले, तरी लेखनाचा मोबदला आवर्जून दिला जातो. ज्या त्या तज्ज्ञाचा लेख किंवा नोंद का वगळली वा रद्द केली, याचे कारण न सांगण्याची प्रथा कार्यालयाने ठेवली आहे. कारणे सांगत बसण्यात काम वाढते, कटुताही निर्माण होते व वेळेचाही अपव्यय होतो. तज्ज्ञ लेखकाचा मान राखणे हे कर्तव्य समजले जाते.

ooo

विनिमं-१०८३/३०७५ २१/७/८२

प्रिय प्रा. रेगेसाहेब यांस-
स-न.वि.वि.

विषय :- प्रा.श्री. ह. दीक्षित यांची विश्वकोश कार्यालयास भेट

दिनांक १७ जुलै ८३ रोजी सायंकाळी प्रा. श्रीनिवास दीक्षित वाईत आले. दिनांक १८ जुलैला विश्वकोश कार्यालयात डॉ.ज. वा.जोशी, अमळनेर यांनी लिहिलेल्या तत्वज्ञानातील नोंदीसंबंधी संबंधित संपादकांशी चर्चा केली.

२. प्रा.दीक्षित यांनी या संदर्भात एक अहवाल सादर केला आहे. त्याची टंकलिखित प्रत या पत्रासोबत आपल्या अवलोकनासाठी/माहितीसाठी पाठविली आहे. तसेच डॉ. ज.वा. जोशी यांनी प्रा. श्रीनिवास दीक्षित यांना उद्देशून लिहिलेल्या दिनांक १३/७/१९८३ च्या पत्राची प्रतही सोबत पाठविली आहे. प्रा.दीक्षित कोल्हापूरहून आपणास पत्र लिहितीलच.

३. या संदर्भात प्रा. रा. ग. जाधव व श्री. भा. ग. सुर्वे यांच्याशी प्रा. दीक्षित यांनी चर्चा केली. श्री. शास्त्रीजी भारतात परत आल्यानंतर आपण उभयतांनी चर्चा करून पुढील कार्यवाही ठरवावी असे प्रा.रा.ग.जाधव यांचे मत आहे.

कळावे,

आपला नम्र
(स्वाक्षरी)
**राम कोल्हटकर**

प्रति,
प्रा. मे. पुं. रेगे
संचालक, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन,
कोथरूड, पुणे-४११०२९

ooo

महाराष्ट्र शासन

जा.क्र. विकोमं १०८३/२५८२,
महाराष्ट्र राज्य, मराठी विश्वकोश
निर्मिती मंडळ, एन्साहटमेंट, "डी"
ब्लॉक, आझाद मैदान, मुंबई ४००००१
दिनांक : 3 सप्टेंबर, १९८३

[मंडळाचे सर्व सदस्य]

विषय :- महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ स्थायी समितीची नियुक्ती

परिपत्रक :

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. वीएलसी १०८०/११६७/वीस, दिनांक २८ नोव्हेंबर १९८० अन्वये महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्र. विनिमं १०८२/६५८२/तेरा, दिनांक २५ जुलै, १९८३ च्या परिच्छेद १ मध्ये शासनाने दिलेल्या प्राधिकारान्वये व तसेच मंडळाने आपल्या दिनांक २७ एप्रिल १९८१ च्या बैठकीत ठरविल्याप्रमाणे कामकाजासाठी खाली दर्शविल्याप्रमाणे स्थायी समितीची नियुक्ती केली आहे. या समितीची कालमर्यादा मंडळाच्या पुनर्स्थापनेपर्यंत म्हणजेच दिनांक ३० नोव्हेंबर १९८३ पर्यंत राहील :-

स्थायी समिती

| | |
|---|---|
| १] तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी | अध्यक्ष |
| २] श्री. गो. वा. बेडेकर | सदस्य |
| ३] प्रा. के. ज. पुरोहित | सदस्य |
| ४] श्री. राजाभाऊ कुळकर्णी | सदस्य |
| ५] श्री. स. आ. सप्रे | सदस्य |
| ६] श्री; पां. रा. पाटील | सचिव |

स्वाक्षरी
[ पं. रा. पाटील ]
**सचिव,**

माहितीसाठी प्रत रवाना :

१] तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी, अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ

२] मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे सर्व सदस्य

३] उपसचिव, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

४] अधिदान व लेखाधिकारी, मुंबई

५] निवासी लेखा परीक्षाधिकारी, मुंबई

६] लेखापाल, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ

७] निवड फाईल

प्रत माहितीसाठी रवाना :
श्री. रा. पु. कोल्हटकर
अध्यक्षांचे स्वीय साहाय्यक,
विश्वकोश कार्यालय, वाई,
जि. सातारा

○○○

# महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या पुनर्रचनेबाबत

## महाराष्ट्र शासन

समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग

शासन निर्णय क्रमांक विनिमं - १०८३/७४५३२/दिआरएम.

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

दिनांक १ डिसेंबर १९८३

संदर्भ : (१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक वीएनसी - १०८०/११६७/ वीस, दिनांक २८-११-१९८०.

(२) शासन शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक वीएनसी - १०८०/११६७/ भाग २/वीस, दिनांक ३ फेब्रुवारी, १९८१.

(३) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक वीनिमं - १०८०/३१७७/ का. १३, दिनांक १-१२-१९८२.

(४) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक वीनिमं - १०८२/६५९२/तेरा, , दिनांक २५ जुलै, १९८३.

शासन निर्णय : शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीएलसी - १०८०/११६७/वीस, दिनांक २८-११-१९८० अन्वये महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाची स्थापना नव्याने करण्यात आली असून त्या मंडळाची मुदत दिनांक ३०-११-१९८३ ला संपत असल्याने सदर मंडळाची पुनर्रचना करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार शासन महाराष्ट्र मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाची मुदत दिनांक १-१२-१९८३ पासून पुढील तीन वर्षांसाठी वाढविण्यात परवानगी देत आहेत.

२. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या अध्यक्षस्थानी तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांना दरमहा रू. २००० (रू. दोन हजार फक्त) इतके मानधन मंजूर करण्यात येत आहे.

३. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळावर पुढील सदस्यांची तीन वर्षासाठी नियुक्ती करण्यात येत आहे :-

| | |
|---|---|
| १) तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी | सदस्य |
| २) श्री. गो. वा. बेडेकर | -''- |
| ३) श्री. देविसिंग चौहान | -''- |
| ४) प्रा. मे. पुं. रेगे | -''- |

| | |
|---|---|
| ५) प्रा. केशव मेश्राम | -''- |
| ६) ग्रेस उर्फ प्रा. माणिक गोडघाटे | -''- |
| ७) डॉ. जयंत नारळीकर | -''- |
| ८) डॉ. मा. स. गोरे | -''- |
| ९) डॉ. रा. गो. ताकवले | -''- |
| १०) डॉ. गोविंद गारे | -''- |
| ११) प्रा. गजमल माळी | -''- |
| १२) प्रा. श्रीराम पुजारी | -''- |
| १३) डॉ. बा. भा. इनामदार | -''- |
| १४) प्रा. वामनराव चोरघडे | -''- |
| १५) प्रा. एन. टी. पुंडे | -''- |
| १६) श्री. व. दि. कुलकर्णी | -''- |
| १७) श्री. बापूराव नाईक | -''- |
| १८) श्री. बा. द. सातोस्कर | -''- |
| १९) श्री. पं. रा. पाटील | सचिव |

४) महाराष्ट्र राज्य मराठी विश्वको निर्मिती मंडळावरील अशासकीय सदस्यांना मुंबई नागरी सेवा नियम, खंड २ मधील परिशिष्ट तेरा - अ (सेक्शन १) नियम १ (१) (ब) व शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक टीआरए १४७७/१०३०/सी/एसईआर -५. दिनांक २३-९-१९७७ मधील तरतुदीनुसार प्रवासभत्ता व दैनिकभत्ता देण्यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच त्या सदस्यांना दर प्रत्येक बैठकीस रू.२०/- (रू. वीस फक्त) इतका बैठक भत्ता देण्यात येत आहे.

५) महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे सचिव यांना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीएलसी १०८०/११६७/वीस, दिनांक २८/११/१९८० अन्वये विभागाध्यक्ष म्हणून घोषित करण्यात आलेले असल्याने ते मंडळाचे अधिकार व संवितरण तसेच अधिकारी तसेच नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहतील.

६) याबाबतीत होणारा खर्च २८७- कला व संस्कृती सी -सहा (२) (ए) मराठी विश्वकोश तयार करण्यासाठी राज्य मंडळ (२७८१०१८) या अर्थशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व चालू वित्तीय वर्षासाठी केलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

७) हा निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक सीआर २१०७/८३/इएक्सपी -११, दिनांक १-१२-१९८३ अनुसार काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**स्वाक्षरी**

**(भा. सु. अंभईकर)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत :

अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई/वाई, सातारा.

सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई

अधिकार व सेवा अधिकारी, महाराष्ट्र शासन, मुंबई

निवासी सेवा परीक्षा अधिकारी, मुंबई

महालेखापाल, महाराष्ट्र १, मुंबई.

जिल्हाधिकारी सातारा, जिल्हा सातारा.

कोषाधिकारी सातारा, जिल्हा सातारा.

उपकोषाधिकारी वाई, जि. सातारा

राज्यपालाचे सचिव, राजभवन, मुंबई

मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई

मंत्री व राज्यमंत्री यांची स्वीय सचिव व स्वीय सहाय्यक

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ मुंबई चे सर्व सदस्य

सचिव, महाराष्ट्र, लोकसेवा आयोग (पत्राने)

वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

सर्व मंत्रालयीन विभाग,

मुख्य संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,

निवड नस्ती

OOO

# महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी | वाई
अध्यक्ष | दिनांक : १०-११-१९८३

संदर्भ क्रमांक : विनिम-१०८३- ४६४२

विषय : महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ विश्वकोश कार्यालयास भेट.

**माननीय प्रिय श्री. सुशीलकुमारजी शिंदे,**

यास - सप्रेम नमस्कार, वि.वि.

मी अमेरिकेहून भारतात परत आल्यानंतर दिनांक ७ ऑक्टोबरला आपणास मंत्रालयात भेटलो. त्यावेळी मी आपणास वाई येथील मराठी विश्वकोश कार्यालयास भेट देण्यासंबंधी विनंती केली. आपण सवडीने वाईस जरूर येऊ असे त्यावेळी सांगितले.

आपण दि. १२ डिसेंबर, १९८३ रोजी वाई येथील विश्वकोश कार्यालयास भेट द्यावी असे मी या पत्राने सुख इच्छितो. या तारखेचा योगायोग असा की, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे गायक पंडित कुमार गंधर्व दि. १२ डिसेंबर १९८३ रोजी 'माझ्याकडे दिवसभर वाईस येत आहेत व त्यानंतर त्यांची वाईसे रात्री संगीत मैफलही होत आहे. दिनांक २८ नोव्हेंबर १९८३ ते १७ डिसेंबर १९८३ पर्यंत नागपूरला विधीमंडळाचे हिवाळी अधिवेशन आहे, याची मला कल्पना आहे. तरीसुद्धा आपण सवड काढून दिनांक १२ डिसेंबर, १९८३ व्या वाई येथील या सोहळयात जरूर सहभागी व्हावे अशी माझी नम्र प्रार्थना आहे. ही सर्व जबाबदारी माझे व आपले मित्र प्रा. रामभाऊ पुजारी यांनी घेतली आहे.

प्रा. रामभाऊ पुजारी व माझे स्वीय सचिव श्री. राम कोल्हटकर आज पुण्यास आपली भेट घेत आहेतच. प्रा. पुजारी आपणास सर्व तपशीलवार सांगतीलच.

कळावे.

आपला स्नेहांकित,
(स्वाक्षरी)
**लक्ष्मणशास्त्री जोशी**

**प्रति:**

**माननीय श्री. सुशीलकुमार शिंदे,**
अर्थ, नियोजन, सांस्कृतिक कार्य व पर्यटन मंत्री,
मंत्रालय, ३ रा मजला, मुंबई - ४०००३२.

OOO

वैयक्तिक

प्रेषक : तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी
वाई (जि.सातारा)
वाई-४१२८०३
दिनांक : १५ जानेवारी, १९९१

विषय :- महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मंडळाच्या पुनर्रचनेबाबत.

**माननीय प्रिय श्री. अनंतराव थोपटे,**

यांना - सप्रेम नमस्कार वि. वि.

आज आपणास हे पत्र लिहून तसदी देत आहे याबद्दल क्षमा असावी. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या पुनर्रचनेबाबत जा.क्र.अ.शा.प.क्र.मविको- १०९१-पुनर्रचना - ३४५९, दिनांक २५.११.९१ चे पत्र पाठविले आहे. प्रस्तुत पत्रासोबत महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाची पुनर्रचना करणेबाबतचा प्रस्तावही पाठविला होता.

या पत्राने आपणास विनंती करीत आहे की, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाची पुढील तीन वर्षासाठी पुनर्रचना करणेबाबतचा शासकीय आदेश लवकरात लवकर निघण्याच्या दृष्टीने आपण व्यक्तीशः लक्ष घातल्यास मी आपला अत्यंत आभारी होईन. आपण आवश्यक ते करालच.

कळावे.

आपला स्नेहांकित
(स्वाक्षरी)
**लक्ष्मणशास्त्री जोशी**

**प्रति**

**मा. ना. श्री. अनंतराव थोपटे,**
मंत्री, शिक्षण खाते,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

ooo

१

तात्काळ

मुमंस/स.स./४१८/९२/ट्क
मुख्यमंत्र्यांचे सचिवालय
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २/४/९२

प्रति,
पद्मविभूषण तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी,
ता. वाई, जि. सातारा.

विषय : विश्वकोश : लमाण अथवा बंजारा समाजाबाबत अधिकृत माहिती देण्याबाबत.

महोदय,

आपण तयार करीत असलेल्या विश्वकोशाच्या कामासंदर्भात आपल्या समोर विश्व बंजारा समाज सांस्कृतिक शोधपीठ, फुलउमरी, जि. अकोला या संस्थेकडून मा. मुख्यमंत्री यांना सादर करण्यात आलेली वरील विषयाबाबतची विनंती विचारार्थ सादर करण्यात येत आहे. सदर विश्व बंजारा समाज सांस्कृतिक शोधपीठाचे संस्थापक अधिष्ठाता पद्मश्री रामसिंग भानावत हे आहेत. त्यांची अशी विनंती आहे की, आपण तयार करीत असलेल्या "विश्वकोश"मध्ये भारतातील लमाण अथवा बंजारा समाजाची सर्वांगीण माहिती सदर शोधपीठाकडून दिली गेल्यास ती अचूक व अधिकृत असेल. त्या ह्या शोधपीठाची अशी विनंती आहे की, लमाण अथवा बंजारा समाजाबाबत माहिती त्यांच्याकडून घ्यावी. अथवा आपल्या विश्वकोश निर्माण समितीवर अखिल भारतीय बंजारा समाज सेवा संघाचा प्रतिनिधी घेण्यात यावा. शोधपीठाकडून आपणास करण्यात आलेल्या विनंतीवरील आपले अभिप्राय मा. मुख्यमंत्री यांच्या माहितीसाठी या कार्यालयाकडे कृपया पाठवावेत, अशी विनंती आहे.

आभार.

आपला विश्वासू,
स्वाक्षरी
(प्रभाकर मणचेकर)
**मुख्यमंत्र्यांचे सह सचिव**

ooo

## २

महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ

प्रशासकीय कार्यालय: सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, एन्साहटमेंट, आझाद मैदान, मुंबई- ४००००१ दूरध्वनी क्रमांक : २६२०६८८/२६२०९९९

उप कार्यालय : अध्यक्षांचे स्वीय सहायक, मराठी विश्वकोश कार्यालय, वाई - ४१२८०३ (जि. सातारा) दूरध्वनी क्रमांक : ५३/२६

जा.क्र.विनिमं १९९२/४८४ दिनांक : ६ एप्रिल १९९२

प्रति,
श्री. प्रभाकर मणचेकर,
मुख्यमंत्र्याचे सह सचिव,
मुख्यमंत्र्याचे सचिवालय,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

सप्रेम नमस्कार,

आपले दिनांक २/४/१९९२ चे जा.क्र. मुमंस/स. स./४१८/९२/ट.क. पत्र आताच हाती पडले. आभारी आहे. आपण बंजारा अथवा लमाण समाजाची सर्वांगीण माहिती मराठी विश्वकोशात देण्याविषयी इच्छा केली आहे. मराठी विश्वकोशातील खंड क्रमांक १० [पृष्ठे १२१५-१२१६] मध्ये "बंजारा" या शीर्षकाखाली वर्णानुक्रमाने बहुतेक सर्व माहिती देण्याचा प्रयत्न यापूर्वीच केला आहे. प्रस्तुत माहिती महाराष्ट्रातील आदिवासींवरील नामवंत संशोधक डॉ. गोंविंद गारे, डॉ. पु. र. सिरसाळकर आणि डॉ. म. बा. मांडके यांनी लिहिलेली आहे. मराठी विश्वकोश हा सर्व-विषय-संग्राहक असा ज्ञानकोश असल्यामुळे कोणत्याही विषयासाठी मुक्रर शब्दसंख्या ही पाळावीच लागते. तथापि आपण सुचविलेल्या विश्व बंजारा समाज सांस्कृतिक शोधपीठ या संस्थेचे सर्वतोपरी सहकार्य यापुढील आदिवासींवरील नोंदींच्या संदर्भात अवश्य घेता येईल.

मराठी विश्वकोश निर्मिती मंडळावर या शोधपीठाचा एखादा प्रतिनिधी घेण्याविषयी विनंतीवजा सूचना त्या शोधपीठाने केल्याचे आपण प्रस्तुत पत्रात नमूद केले आहे. मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या सदस्यांची नियुक्ती यापूर्वीच झाली असून माननीय ना. मुख्यमंत्री यांची तशी इच्छा असेल, तर तत्संबंधी मी त्यांच्याशी यथावकाश अवश्य बोलेन. कळावे

आपला स्नेहांकित,
स्वाक्षरी
**[ लक्ष्मणशास्त्री जोशी ]**

○○○

## ३

महाराष्ट्र शासन

क्रमांक : विनिमं-१०९३/(   /९३) सांका-३,
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०००३३
दिनांक : १२ जुलै, १९९३.

प्रति,
**सचिव,**
महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ,
एन्साहटमेंट, "डी "ब्लॉक, आझाद मैदान,
महापालिका मार्ग, मुंबई - १.

विषय : "बंजारा" व "बंजारी" याबाबत दुरुस्ती करण्याबाबत.
श्री. रामसिंग मानावत यांचे पत्र

उपरोक्त विषयासंदर्भातील श्री. रामसिंग मानावत यांनी मा. मुख्यमंत्री महोदयांना दिनांक ४-९-९२ रोजी लिहिलेल्या पत्राची प्रत सोबतच्या कागदपत्रांसह पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी आपणाकडे पाठविण्यात येत आहे.

या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनाकडे त्वरित पाठविण्याची व्यवस्था करावी.

सही/-

[ गि. ज. ताहाराबादकर ]
**कक्ष अधिकारी.**

॥ सत्य प्रत ॥

सचिव
महाराष्ट्र राज्य
मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ

विराव ३०७९३

# ४
# विश्व बंजारा समाज सांस्कृतिक शोधपीठ

रामसिंग मानावत
संस्थापक अधिष्ठाता

क्रमांक

स्थान : मुंबई.
दिनांक : ४ सप्टेंबर, १९९२-

**मुख्यमंत्री महोदय,**
महाराष्ट्र राज्य,
मुंबई-

विषय : 'बंजारा' जाणि 'बंजारी' याबाबत दुरुस्ती होण्याबाबत
संदर्भ : श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे दि. ६ एप्रिल, १९९२ चे पत्र

विषयांकित हेतूकडे आपले लक्ष वेधून घेत आहे. 'विश्वकोश खंड १० मधील पाने १२१५-१२१६ वरील मजकुराची झेरॉक्स प्रत सोबत जोडत आहे. ती पाहिल्यावर आपल्या ध्यानात येईल की, विश्वकोशात 'बंजारा' आणि 'बंजारी' या सांस्कृतिक दृष्ट्या अगदी निरनिराळ्या जाती असल्याचा उल्लेख आहे. दोन्ही जाती भिन्न असल्याचे स्पष्ट म्हटले असले तरी त्यात काही विसंगती राहून गेली आहे. बंजारा मौखिक साहित्यातील लोकगीते, गाणी व लोककथांशी हा मजकूर विसंगत असून बंजारा समाज सांस्कृतिक शोधपीठाने लिखित व संशोधन केलेल्या साहित्याशी देखील विसंगत आहे. ही विसंगती दुरुस्त करणे आवश्यक आहे. म्हणून सदरहू खंडाला पुरवणी खंड काढणे उचित वाटते. तथापि हे शक्य नसल्यास विश्वकोशाच्या आगामी खंडामध्ये याबाबत त्वरित दुरुस्ती करून घेणे आवश्यक आहे. असे समजते की, 'ब' आणि 'ल'वा वर्णाच्या नोंदी विश्वकोशाच्या खंड क्रमांक १५ मध्ये प्रकाशित होणार असून हा खंड डिसेंबर १९९२ पर्यंत छापून तयार होईल. अशा परिस्थितीत 'बंजारी' ही स्वतंत्र जात असल्याची नोंद तसेच 'लमाण' ही बंजारा जमातीचाच भाग असल्याची नोंद दुरुस्त स्वरूपात प्रकाशित होणे आवश्यक आहे. या खंडाची छपाई सुरू असल्याने आवश्यक ती सर्व माहिती विश्वकोश मंडळाने विचारात घ्यावी असे त्यांना कळविण्यात यावे बंजारा शोधपीठाचा एखादा तज्ज्ञ मंडळावर सभासद म्हणून नियुक्त करण्यात यावा. याबाबत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना चर्चेसाठी बोलावून घ्यावे. तसे त्यांनी श्री. प्रभाकर मणचेकर यांना दिनांक ६ एप्रिल १९९२ च्या पत्राद्वारे कळविलेले आहे.

दुसरे असे की, महाराष्ट्र शासनाच्या गॅझेटिअर कार्यालयाने परभणी जिल्ह्याचा सखोल अभ्यास करुन तसेच त्यांनी सर्वेक्षण करून परभणी जिल्हा गॅझेटिअरमध्ये बंजारा समाजाबाबत जी बहुतांशी वस्तुनिष्ठ माहिती प्रकाशित केली आहे त्याची प्रत. सोबत जोडत आहे. या कार्यालयातर्फे इतर गॅझेटिअर ग्रंथ सुधारून प्रसिद्ध होणार असल्याने वस्तुनिष्ठ माहिती त्यामध्ये देखील प्रकाशित होणे आवश्यक आहे. या बाबींबर आपले लक्ष वेधू इच्छितो.

तरी या प्रकरणी समक्ष लक्ष घालून तातडीने कार्यवाही करून घ्यावी.

सदीच्छा सहित...

आपला

सही/-

**(श्री. रामलिंग भानावत)**

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ

अध्यक्ष

तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी

सदस्य

श्री. गो. वा. बेडेकर

श्री. देवीसिंग चौहान

प्रा. मे. पुं. रेगे

डॉ. यु. म. पठाण

प्रा. केशव मेश्राम

प्रा. माणिक गोडघाटे

श्री. ब. र. आंबेकर

प्रा. के. ज. पुरोहित

प्रा. सय्यद नईमुद्दिन

डॉ. सुभाष भेंडे

श्री. स. आ. सप्रे

श्री. राजाभाऊ कुलकर्णी

श्री. वा. म. कुलकर्णी

सचिव

श्री. द. य. राजाध्यक्ष

विराव २९७९३

बंजारा

परभणी जिल्ह्यात जिंतूर, हिंगोली, कळमनुरी आणि परभणी तालुक्यात बंजारा लोकांची वस्ती मोठ्या मोठ्या प्रमाणावर आढळते. परतूर तालुक्यात त्याची संख्या फार मोठी होती. तथापि तो तालुका मे १९८१ पासून जालना जिल्ह्यात समाविष्ठ करण्यात आला आहे.

भारतात सर्वत्र आढळणारी ही एक भटकी जमात असून, या लोकांना लमाण, बंजारा, बंजारी, लमाण, लमाणी, लंबाटी, लंबाटा, लंबागोड, सुकलीर अशी अनेक नावे आहेत. आपापसात बोलताना ते स्वत:स 'गोर' म्हणून संबोधितात. संपूर्ण भारतामध्ये याची 'गोर बोली' किंवा 'लंबोडी बोली'त बरेच साम्य आढळते. मारवाडी व राजस्थानी भाषांमध्ये सुद्धा बंजारा बोलीतील शब्दांचा भरणा फार मोठ्या प्रमाणावर आहे. या समाजात एकूण २१ पोटजाती आहेत. त्यापैकी परभणी जिल्ह्यात गोरबंजारा, मथुरा बंजारा (लमाण किंमा लभाण) धाडी बंजारा, नाबी बंजारा, तनार बंजारा, ढालिया बंजारा, शिंगारिंगा बंजारा, व शिंगाउरा बंजारा अशा आठ पोटजाती आढळतात.

बंजारा लोकांची वस्ती महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, कर्नाटक, गुजरात, राजस्थान, हरियाणा, ओरिसा, पंजाब व हिमाचल प्रदेशात बऱ्याच प्रमाणावर आढळते.

संस्कृत भाषेतील 'वाणिज्य' (व्यापार) या शब्दावरून 'वनज' किंवा 'बनज' हा शब्द निघाला व त्यावरूनच ह्या लोकांना 'बंजारा' असे नाव मिळाले. परंतु येथे व्यापार करणे असा अर्थ अभिप्रेत नसून गुरांच्या पाठीवरती अन्नधान्य वाहून नेणारे असा अर्थ अभिप्रेत आहे. बंजाऱ्याची लमाणी ही एक पोटजात असून लांबच्या रस्त्याने लवण वाहून नेणारे हे लमाणी असा शब्द प्रयोग रूढ झाला. काहींच्या मते बंजारा राजपुताचे वंशज आहेत.*

बैलांच्या पाठीवर धान्य, नारळ, खजूर, मीठ इत्यादी माल लादून तो सर्वत्र पोचविणे हा यांचा परंपरागत धंदा होता. बंजारा लोकांच्या चालीरिती, जन्म, मृत्यू, विवाह, सणवार, पोशाख या सर्वांतून एक विशिष्ट तांडा संस्कृती दिसून येते. हे लोक टोळ्या टोळ्यांनी राहू लागल्यामुळे यांच्यात तांडा संस्कृती रूजली. बंजारा अथवा लमाणी हा आपल्या देशातील सर्वात मोठा जिप्सी अथवा रोमा समाज आहे. लदेणी म्हणजे लांबच्या मार्गाने किंवा रस्त्याने मालाची ने-आण करणारा व त्यात वाकबगार असलेला मानवी समाज त्यालाच पुढे लमाण असे नामाभिधान पडले. लदेणी व्यवसाय करता करता ते वनज (व्यापार) करू लागले म्हणून त्यांना बंजारा असे नाव पडले. मुळचे हे लोक रोममधील असावेत, असे काही संशोधक मानतात आणि व्यवसायामुळे ते जगभर विखुरले गेल्यामुळे काही ठिकाणी ते रोमा-जिप्सी म्हणून ओळखले जाऊ लागले. पश्चिम जर्मनीमध्ये गोटींगन येथे भरलेल्या तिसऱ्या 'रोमानो काँग्रेस' या जागतिक परिषदेचे निमंत्रण अखिल भारतीय बंजारा सेवा संघाला मिळाले. त्यावरून जिप्सी लोक व

भारतीय बंजारा यांची ऐतिहासिक संस्कृती समान आढळल्याचे दिसून येते.

हे लमाण मार्ग रोम, एकबाटका, काबूलमार्गे खैबर खिंडीतून जम्मू, मथुरामार्गे दक्षिण भारत व गंगेचे खोरे आणि कारताहून बोलन खिंडीमार्गे सिंधू नदीच्या पश्चिम काठाने दक्षिणेकडे कराची व समुद्रमार्गे पश्चिम भारतीय किनाऱ्यालगतच्या प्रदेश या मार्गांनी आलेले आहेत. समुद्रमार्गे हे भिवंडीपर्यंत आलेले होते. इ.स.पूर्व ६०० वर्षे ते ३५७ वर्षांच्या कालावधीत हे मार्ग पडले असावे.

बंजारा तांड्याच्या प्रमुखास नाईक म्हणतात. त्याला तांड्यातील सर्व जण कुटुंबप्रमुख मानतात. पूर्वी कधी कधी एका तांड्यात एक लाख बैल असत.

ऐतिहासिक पुराव्यावरून असे दिसते की, या लोकांनी इ. स. १३९६ ते १८९६ या प्रदीर्घ कालखंडात हा धंदा केला. इ. स. १३९३ पासून पुढे बारा वर्षे उत्तर भारतात फार मोठा दुष्काळ पडला होता. त्यावेळी या लोकांनी नेपाळ, चीन, तिबेट, ब्रह्मदेश व इराण या भागातून धान्य वाहून आणले व लोकांचे प्राण वाचविले. युद्धकाळातही त्यानी मोगल, मराठा व युरोपियन सैन्याला शस्त्रे, धान्य, कापड व आवश्यक वस्तू पुरविल्या. इंग्रजांच्या काळात दळणवळण व वाहतुकीच्या साधनात सुधारणा झाल्यामुळे याचा धंदा बसला व हे लोक शेती, पशुपालन व मजुरी हे व्यवसाय करू लागले. काही गुन्हेगारीकडे वळले. काहींच्या मते राजे शहाजीच्या काळापासून यांच्यातील काही लोक गुन्हेगारीकडे वळले. व्यवसाय करणारे स्थायी होऊ लागले.

सांप्रत त्यांच्यात सामाजिक स्तरीकरण नाही असा त्यांच्या जमातीमधील काही मातब्बरांचा दावा आहे. परंतु यांच्यात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य असे स्तर आढळतात. त्यापैकी ब्राह्मणांना मथुरिया, वैश्यांना लमाण, राजपुतांना गोरबंजारा व भाटांना चारण व धाडी अशी नावे आहेत. गोरबंजारा लोकांच्या राठोड, चव्हाण, पवार, जाधव, तुरी व वाणीत अशा सहा पोटजाती आहेत. परंपरेने विविध पोटजातींत मिश्रविवाह होत नाहीत.

**विधवा विवाह :**

मरण पावलेल्या मोठ्या भावाच्या पत्नीशी लहान भाऊ विवाह करू शकतो. विधवा विवाहास मोहतर म्हणतात. विधवांना मोहतर करावयाची परवानगी आहे. परंपरेनुसार तांडानायक किंवा जातपंचायतीची परवानगी घेणे आवश्यक आहे. विधुर विधवेशी मोहतर किंवा कुमारिकेशी लग्न करू शकतो. घटस्फोटात पंचांची परवानगी लागते. चारण पोटजातीत विधवांना फक्त दिराशीच मोहतर करणे अनुज्ञेय आहे.

**मृत्यू :**

बंजारामध्ये विवाहित मृतांना जाळतात व अविवाहितांना कसलाही विधी न करता पुरतात. अविवाहितांना मुंजा म्हणतात. विवाहिताचे थडगे बांधतात. प्रेत जाळल्यानंतर तिसऱ्या दिवशी रक्षा गोळा करून तेराव्या दिवशी नदीत विसर्जन करतात. तिसऱ्या दिवशी घरातील लोक जंगलात जेवण घेतात. त्याला 'दाढण' म्हणतात.

सण : बंजारा लोक हिंदू धर्माप्रमाणे सर्व सण साजरे करतात. परंतु होळी, दिवाळी व कुमारिकांची तीज हे सण विशेष उत्साहाने साजरे केले जातात. होळीला बंजारा लोकांमध्ये अनन्यसाधारण महत्त्व असून ती मोठ्या धुमधडाक्यात साजरी केले जाते. होळी खेळणाऱ्या युवकास 'गेरीया' व युवतीस 'गेरणी' असे म्हणतात. 'धूम मची घूमो मचाओ बंजारा' असली जीवनाच्या विविध शृंगारिक छटा दर्शविणारी गाणी ढोलाच्या तालात व बेहोषीत गायिली जातात. नृत्यात युवक-युवती प्रमाणेच प्रौढही भाग घेतात. हा जल्लोष व नाचगाणे पहाटेपर्यंत चालते व त्यावेळी होळी पेटवली जाते. दुसऱ्या दिवशी गेरणी-गेरया ह्यांची शृंगारिक लोकगीतांची जुगलबंदी होते. त्यातून ते आपली मनोभावना व्यक्त करतात. चौथा दिवस 'काग दोन' मानला जातो. व तो सुद्धा मोठ्या उत्साहाने साजरा करतात. शेवटच्या दिवशी तांड्यातील सर्वांना जमविलेल्या वर्गणीतून मांसाहारी सहभोजन करतात. त्यास 'गेर' असे म्हणतात. नृत्यास 'पायी घालेर' असे म्हणतात.

**दिवाळी**

हा सणसुद्धा बंजारा लोक आपल्या पद्धतीने साजरा करतात. दिवाळीला (अमावस्येला) श्राद्ध करून बोकडाचा बळी देऊन मांसाहारी भोजन करतात. अमावस्येला नायकाने दिवा लावल्यानंतर इतर दीप उजळतात. दुसऱ्या दिवशी गोड पक्वान्ने करतात.

सर्वच तांड्यांमध्ये कुमारिकांची तीज हा सण साजरा करत नाहीत. काही तांड्यांमध्ये हा सण नवरात्रीत साजरा करतात. या प्रसंगी टोपलीत काळ्या मातीमध्ये गहू पेरून उपवलेली रोपे मुली वेणीत लावतात. हा सण दहा दिवस साजरा करतात. त्यात भवानीची पूजा करतात.

**जातपंचायत :**

पूर्वी बंजारा मंडळीची जातपंचायत होती. अजूनही काही तांड्यामध्ये ती अस्तित्व आहे. तांडा नायकाशिवाय इतर चारपाच व्यक्ती जातपंचायतीमध्ये असतात. ते समाजातील तंट्यामध्ये न्यायनिवाडा देतात.

दिल्ली येथील रकाबगंज गुरूद्वारा बांधणारा लकिशा बंजारा, एक लाख बैलांचा, बडेगावमधील आजमशहा बंजारा, राजस्थानचा भीमसिंग बंजारा, जुन्या हैद्राबादचा 'जंगी आणि भंगी ना'. वऱ्हाडचा सेवा भाषा विठमुक्ता इत्यादी व्यक्ती बंजारा समाजातील आदरणीय व मान्यवर असून, त्याचे पोवाडे व गीते आजही गायीली जातात. मराठवाड्यातील ईश्वरसिंग महाराज व रोडा महाराज त्यांना पूजनीय आहेत. रोडा महाराज हे मूळचे कळमनुरी तालुक्यातील असून, समाजपरिवर्तन करणारे आधुनिक संत म्हणून त्याची ख्याती आहे. कळमनुरीत बंजाऱ्यांचा मोठा उत्सव भरतो. तेथे विभिन्न प्रांतातून बंजारा लोक येत असतात. बंजारा लोक अकोल्याचे सेवा माया महाराज, पुसद येथील बारा देवी, जगदंबा देवी, बालाजी, संत रामराव महाराज, पांडुरंग व इतर हिंदू देवताची पूजा करतात. सेवा माया महाराज व रोडा महाराज यांना बळीचा नैवेद्य अर्पण करीत नाहीत.

मधुरिया लोकांचे पांडे, दुबे, तिवारी, चौबे असे चार पोटभेद आहेत. मधुरिया लोक मौज

करतात व मांस खात नाहीत. जुन्या काळी भाट किंवा धाडी राजाश्रयाने राहत असत. बंजारी स्त्रिया व मुली यांच्या पाठराखणीसाठी भाटाना पाठविण्याची प्रथा होती. लग्नात डंक वाजविणे किंवा वाजंत्रीचे काम बंजारा ढाल्या करतात.

पळवून आणलेल्यांना किंवा विकत घेतलेल्यांना कोरीया किंवा जांगड असे म्हणत असत. बंजारा बोलीत त्यांना 'पाळगत' असेही म्हणत. जांगड म्हणजे मोठ्यांनी आपल्या लदेणीच्या व्यवसायासाठी पाळलेला.

**कुळ :**

परभणी जिल्ह्यात बंजारा लोकांची प्रामुख्याने पवार, चव्हाण, राठोड, तुरी व जाधव अशी कुळे आढळतात. ही कुळे म्हणजे त्यांच्यातील पोटजातीच होत.

**वेशभूषा :**

बंजारा लोक उंच, गोरे व काटक असतात. परंपरेने पुरुष धोतर किंवा चोळणा वर अंगरखा आणि डोक्याला लाल किंवा पांढरे पागोटे नेसतात. चोळण्यास ते 'गुडकी' किंवा 'गडकी जाग्मा', अंगरख्यास 'बारकशी' किंवा 'झगला', पागोट्यास 'पग', म्हाताऱ्या माणसांनी नेसावयाच्या धोतरास 'डोल्डा धोती', तरुणांनी नेसावयाच्या धोतरास 'केरमा धोती' व नवऱ्या मुलाने नेसावयाच्या वस्त्रास 'मोलिया' म्हणतात.

स्त्रिया लेंगा (लेहंगा) चोळी घालतात व वर पदर घेतात. विवाहित स्त्रिया माथ्यावर केस उंच बांधून त्यात कणीस खोचातात. केसातून एक चांदीची साखळी अडकवून ती कपाळावरून कानामागे लोंबत ठेवतात. पायात जोडवी व गळ्यात सरी घालतात. लेंग्यास 'केटिया' किंवा 'घागरा' व पाठ उघडी असणाऱ्या चोळीस 'काचळी' म्हणतात. त्यावर विणकाम करून कवड्या गुंफलेल्या असतात. काचळीला उरोजांवर डाव्या व उजव्या बाजूस लावलेल्या काचांना 'मंडाव' म्हणतात. ओढणीस 'छत्थ' किंवा 'टुकरी' म्हणतात. ओढणीस बांधलेल्या पिशवीस 'छेवतीया' म्हणतात. चोळीत बांधलेल्या झालरीसारख्या दोरीस 'दोरी' किंवा 'झालरी' आणि ओढणीस 'घुंगटी' म्हणतात. मुलगी सहा-सात वर्षाची झाली की, तिच्या ओढणीच्या दोन्ही टोकांना तांदूळ, कवड्या व सुपारी यांची एकेक पुरचुंडी बांधतात व ती खांद्यावरून एक पुढे व एक मागे अशी सोडतात. ही अविवाहीत मुलींची खूण आहे. लग्न झाल्यावर या पुरचुंड्या कमरेला बांधतात. त्या अंगावरून केव्हाही काढावयाच्या नसतात. चारण सौभाग्यवती स्त्रिया माथ्यावर सुमारे नऊ इंच लंबीचे शिंग किंवा काठी खोवून त्यावरून ओढणी घेतात. ह्यालाच 'घुंगटो' असेही म्हणतात. कपड्यांमध्ये बंजारा स्त्रिया व माणसांना लाल रंग अधिक प्रिय असतो. शहरात राहणाऱ्या महिला महाराष्ट्रीय पद्धतीचा पोशाख करू लागल्या आहेत.

**दागिने :**

बंजारा स्त्रियांना दागिन्यांचा फार मोठा शौक असतो. नखशिखांत त्या दागिन्यांनी मढलेल्या असतात. त्या दोन्ही हातात कोपरापर्यंत हस्तीदंती बांगड्या भरतात. लग्नानंतर दंडावर देखील

त्या हस्तीदंती बांगड्या घालतात. दंडावर बांगड्या भरण्याच्या विधीस 'चुडी तिवेर' म्हणतात. बोटांमध्ये विविध प्रकारच्या अंगठ्या घालतात. हाताच्या कोपरावर कपड्यांनी गुंफलेले किंवा पितळाचे 'कसबटवा' नावाचे दागिने घालतात. पतिच्या नावाने 'घुंगरी' नावाचा दागिना घालतात. यात दोन्ही गालांवर केसांच्या बटापासून लोंबणारे चांदीचे गोलाकार 'टोपली' असतात. अविवाहित मुली केसांच्या बटांना टोचल्या लावून त्या गालावर सोडतात. परंतु घुगऱ्या बांधत नाहीत. दोन्ही कानात 'कनिया' घालतात. वेगवेगळ्या माळा गळ्यात घालतात. गळ्यांतील माळांमध्ये मुख्यत्वे 'रुपियार' हार असतो. हा हार जुन्या रुपयांचा असतो. चांदीचा गोलाकार 'हातळी' हार इत्यादी अनेक दागिने व हार घालतात. पायात चांदीच्या पाटल्या घालतात. पाटल्या पितळेच्या असल्यास त्यांना 'वाकड्या' म्हणतात.

**अविवाहित :**

काचळीऐवजी पोलका घालतात. मुली घागरा नेसतात. परंतु घागऱ्याबरोबर पदरातून पायापर्यंत कवड्यांचा हार गुंफतात. त्याला 'सडक' म्हणतात. सडक हा दागिना फक्त अविवाहित मुलींसाठीच आहे. विवाहितांनी तो घालावयाचा नसतो. त्याशिवाय मुलींचे अनेक दागिने असतात.

पुरुषांच्या कमरेला बांधलेल्या करगोट्यात (चांदीचा किंवा धाग्याचा) 'कनादोरी' किंवा 'कनादोरो' असे म्हणतात. कानातील रिंगाना 'भारकी' व हातातील कड्यांना 'कलडा' किंवा 'गोखरू' असे म्हणतात.

**आहार :**

राबजीन गटातील पुरुष व स्त्रिया मांसाहार घेतात. बाकी इतर गटातील फक्त मांसाहार घेतात. परंतु स्त्रिया मांसाहार करीत नाहीत. मराठवाड्यातील बंजाऱ्यांचे अन्न साधारणत: इतर जातींच्या लोकांप्रमाणेच आहे.

**विवाह :**

बंजारा समाजातील विविध पोटजातीमध्ये विवाहपद्धती अल्पशा फरक सोडल्यास साधारणत: सारख्याच असतात. तांड्यात पूर्वी आपल्या मुलाचे अथवा मुलीचे लग्न करण्याचा त्याचे पालक मानस व्यक्त करीत असत. त्यास 'कानतलाई' असे म्हणत. तांड्यातील नायक/ कुटुंबप्रमुख या नात्याने मदत करीत असे. सोयरिकीची जबाबदारी आपल्या शिरावर घेत असे. वाङ्निश्चय झाल्यावर सामूहिकरित्या परस्परांना गूळ देतात. या विधीस 'गोळ खावर' म्हणतात. गोळ खावर झाल्यावर सगाई तुटत नाही. चांदणी रात्र बघून मुहूर्त ठरवितात. मुलगा मुलीकडे जातो. लग्नाला जाण्याच्या आधी तांड्यात दिल्या जाणाऱ्या 'प्रितीभोजनास' 'साडी ताणेर' असे म्हणतात. मुलगा लग्नात धोतर (मोलिया) सदरा (त्याला कट्यार) कमरपट्या व हातात बंग (कोथळी) असा पेहेराव करतो. त्याच्या सोबत जाणाऱ्या मानाच्या मित्रास 'लेरिया' किंवा 'लेऱ्या' म्हणतात. तांड्यातील कुमारिकांकडून गाणी म्हणत पाहुण्यांना प्यायला पाणी देतात.

वरपक्षाकडून कुमारिकांना प्रसाद वाटला जातो. त्यास 'कुलर' असे म्हणतात. वधू केवळ तिच्या पित्याची नव्हे तर सर्व तांड्याची कन्या समजली जाते. लग्नापर्यंत वरात व वरपक्षाकडील सर्वांना पाहुणचार दिला जातो. बंजारा समाजातीलच बडतीया वंशावळीतील लोकांकडून लग्न लावले जाते. यांनाच महाराष्ट्रात 'जाधव' असे म्हणतात.

बंजारा समाजातील विवाहविधीतील एक वैशिष्ट्य म्हणजे लग्नाआधी वधूस रोज संध्याकाळी रडण्याची (रोना) तालीम दिली जाते. त्यात आई, वडील, भाऊ, बहीण, मैत्रिणी आणि गावातील सभ्य स्त्री-पुरुष त्यांना विविध प्रकारे संबोधून रडणे शिकविले जाते. यालाच बंजारा बोलीत 'ठणको मोडर' किंवा 'डायलो' म्हटले जाते. त्याला भावनात्मक काव्य असते. वधू माहेरी येते त्या वेळच्या रडण्याच्या विधीस 'मलेर' म्हटले जाते. वरात संपूर्ण तांड्याचा जावई संबोधिले जाते. लग्नात 'दहेज' दिल्यावरसुद्धा होणारा संपूर्ण लग्नखर्च वरपक्षास सहन करावा लागतो. पूर्वपरंपरेनुसार विवाहविधी चार-पाच दिवस चालत असे. त्यापैकी शेवटच्या दिवशी वरपक्षाकडून दिल्या जाणाऱ्या मांसाहारी जेवणास 'गोठ' म्हणतात. गोठ झाल्यावर वधूस सजवून सजविलेल्या बैलावर बसवून तिची मिरवणूक काढतात. त्या प्रसंगी ती अतिशय भावनाविवश होऊन रडते. वडील मंडळी तिला आशीर्वाद देतात व त्यानंतर वरपक्षाकडीतल मंडळी वधूस आपल्या तांड्यात किंवा आपल्या गावी घेऊन जातात. सध्या एक किंवा दोन दिवसात लग्न आटोपले जाते. पूर्वी बालविवाह करीत असत. आता बालविवाहाची पद्धत बंद पडली आहे.

**संदर्भ :**

१) स्ट्रोल, आर. व्ही. : हिरा लाल, दि ट्राइब्ज अॅन्ड कास्ट्स ऑफ इ सेंट्रल प्रॉव्हिन्सेस ऑफ इंडिया, व्हॉल्युम, २ दिल्ली १९७५.

२) राठोड, मातीराज, बंजारा संस्कृती, औरंगाबाद १९७६. मांडके, म. बा, गारे, गोविंद, सिरताळकर, पु. र.

* अलीकडे या प्रथा लोप पावत आहेत. त्यांचे पालन अभावानेच जाणवते.

- जोशी, पं. महादेवशास्त्री, भारतीय संस्कृती कोश, खंड-६, पृ. २२

* रिपोर्ट ऑफ ऑल इंडिया बंजारा स्टडी टीम, १९६७, पृ. ८

ooo

**बंजारा :** संपूर्ण भारतात विखुरलेली परंतु काही राज्यांत अनुसूचित जमात व काही राज्यांत अनुसूची बाहेर असलेली भटकी जमात. लोकसंख्या १,९८,८८५ (१९७१) यांची वस्ती प्रामुख्याने आंध्रप्रदेश, ओरिसा, कर्नाटक, तमिळनाडू, पंजाब, बिहार, मध्यप्रदेश, महाराष्ट्र व हरयाणा या राज्यांत आढळते. बंजारा जमातीच्या अनेक शाखा-उपशाखा आहेत. प्रदेशपरत्वे या लोकांना बंजारी, लमाणी, लंबाडी, सुकलीर, लमाण, मथुरा लमाण, न्हावी, बंजारा. शिंगवाले बंजारा, चारण बंजारा, गोर बंजारा, कचलीवाले बंजारा यांसारखी विविध नावे आहेत. स्तलपरत्वे त्यांच्या चालीरीती, देवदेवता व अंत्यसंस्कार यातही काहीसा फरक आढळतो. महाराष्ट्रात त्यांना काही जिल्ह्यात बंजारी व इतरत्र बनजारा किंवा लमान म्हणतात. बनजारा विशेषत: मराठवाडा व विदर्भात आढळतात. महाराष्ट्रातील काही जिल्ह्यात आढळणारी बनजारी किंवा बंजारी ही जात बंजारा वा बनजारी जमातीहून सांस्कृतिकदृष्ट्या निराळी आहे. वाणिज्य किंवा वनज या शब्दावरून वंजारा किंवा वनजारा आणि लवण म्हणजे मीठ वाहणारे यापासून 'लमाणी' हे नाव त्यांना मिळाले असावे. त्यांच्या मूलस्थानाविषयी निश्चित माहिती मिळत नाही. परंतु ते स्वत:ला राजपूत कुळीतील राणा प्रतापाचे वंशज समजतात. राजस्थानातून औरंगजेबाच्या वेळी ते मुसलमानांबरोबर दक्षिणेत आले असावेत. त्यांच्यात अनेक उपजमातीचे लोक आहेत. बिहार व ओरिसा या राज्यांत त्यांना आदिवासी म्हणून मान्यता मिळाली नाही. इतरत्र त्यांना अनुसूचित जमातीत समाविष्ट केले आहे. तर महाराष्ट्र राज्यात त्यांना विमुक्त जातीचा दर्जा दिलेला आहे. आंध्रप्रदेशात ते सुगाळी, दिल्लीत शिरकिवन, राजस्थान व केरळाल गवरिया व गुजरातमध्ये चारण म्हणून ओळखले जातात. लोदी घराण्यातील सिकंदरशाह (कार. १४८९ - १५१७) याने १५०२ मध्ये धोलपूरवर स्वारी केली. तेव्हा बंजारांचा प्रथम उल्लेख केलेला आढळतो. एन. एफ. कंबलीज याने या जमातीसंबंधीचे संशोधन प्रथम प्रसिद्ध केले (१८९६). त्याच्या मते बंजारांच्या चार प्रमुख पोटजाती आहेत. चारण, मथुरिया, लमाण आणि धाडी. यापैकी चारण हे संख्येने जास्त आहेत. त्यांच्यात पुन्हा राठोड, परमार (पवार), चाहमान (चौहान) जाडोत (जाधव) किंवा मुखिया अशा चार कुळी आहेत.

किंचित गोरा वा सावळा वर्ण, उंच अंगकाठी, बळकट व काटक शरीर ही त्यांची काही शारीरिक वैशिष्ट्ये असून पुरुष धोतर किंवा चोळणा वापरतात. व अंगरखा घालतात आणि डोक्याला लाल पागोटे गुंडाळतात. स्त्रिया लाल घागरा व चोळी घालतात आणि काशिदा, कवड्यांनी वा आरशांच्या तुकड्यांनी सजविलेली भडक रंगाची ओढणी घेतात. स्त्रियांना दागिने व गोंदून घेण्याची हौस असून त्या हातात हस्तीदंती, शिंगाच्या किंवा पितळी बांगड्या आणि दंडात वाकी घालतात. व्यापार हा त्यांचा प्रमुख धंदा असला तरी रानडोंगरात सापडणारे मूल्यवान खडे, डिंक, मध इ. गोळा करून ते विकतात. विसाव्या शतकात त्यापैकी अनेक लोक शेती व मजुरी करू लागले आहेत. बंजारांच्या टोळ्या शहरातून मजुरीसाठी झोपडपट्ट्यांमध्ये स्थिरावत आहेत. यांच्यातील काहीजण ढाडी म्हणजेच भाट असून ते संगीताचे जाणकार आहेत.

पूर्वजांची स्तुतिपर गाणी गाऊन वर्षाअखेरीस ते चारणांच्या वस्तीवर करमणुकीसाठी जातात. त्याबद्दल पैशाच्या किंवा बैलांच्या स्वरूपात त्यांना मोबदला मिळतो. हे लोक झोपडीत अथवा स्वत:ची पाल किंवा पाली उभारून राहतात. काहींची घरे साधी असतात. बंजारा व हिंदी या दोन्ही भाषांचा प्रभाव असला, तरी राजस्थानी वळण जास्त आहे.

बंजाऱ्यांना सात पिढ्यांची नामवली माहीत असावी, असा दंडक आहे. त्याचे तांडे असतात. प्रत्येक तांड्याचा एक नायक असतो. हे पद परंपरेने चालते. नायकाच्या सल्ल्यानेच व्यापार चालतो. नायक हा तांड्याचा न्यायाधीशही असतो.

बंजाऱ्यात एकाच कुळीत विवाह होत नाहीत. विवाहविधी साधा असतो. वधूमूल्य रूढ असून देवर-विवाह व सेवा विवाह या पद्धती अधिमान्य आहेत व चारण व लमाण या पोटजातीत मुली वयात आल्यावर त्यांचा विवाह होतो, मात्र दक्षिणेतील मुलींचे विवाह लहाणपणीच होतात. विवाहविधीत पोटजातीनुसार फरक आढळतात. बंजाऱ्यांत भगताला विशेष महत्त्व असून तो औषधोपचार व जादुटोणा दोन्ही करतो. हे लोक जडप्राणवादी असून इतर देवदेवतांबरोबर गाय, बैल यांचीही पूजा करतात. मरीआई, शंकर, तुळजाभवानी, शिवभावया, मिठू भुकिया, बालाजी इ. त्यांची कुलदैवते असून यांशिवाय ते मरिअम्मा, महाकाली, शीतलादेवी, आसावरी, बंजारीदेवी, राम, मारूती इ. देवांनाही भजतात. बालाजीच्या नावाने ते आपल्या झोपड्यांसमोर झेंडे उभारतात व त्यांची पूजा करतात. ज्येष्ठ पौर्णिमा व दिवाळी या दिवशी जुने झेंडे काढून नवीन लावतात. दसरा, दिवाळी, होळी, गोकुळाष्टमी इ. सण ते प्रामुख्याने साजरे करतात. बंजाऱ्यांचा भूतपिशाच्यावर विश्वास आहे. पूर्वी मानव बळी देण्याची पद्धती त्यांच्यात प्रचलित असावी. शिव भावया हा साधू आणि मिठू भुकिया हा दरोडेखोर यांना त्यांच्या जाती-जमातीत फार मान आहे. नागास्वामी तसेच गुरु नानक यांना काहींनी गुरू मानले आहे. नागास्वामीची गीते या समाजात प्रसिद्ध आहेत. काहीजण महमदीन वंशाचे असले तरी सरस्वतीची पूजा करतात. तुर्किया व मुकेरीअसे दोन मुस्लीम गट त्यांच्यात असून त्यातील व्यक्ती वैदूचे काम करतात. बंजारा लोकांना नृत्य व संगीत यांची आवड असून नगारा, साप व मोर हे नृत्यप्रकार त्यांच्यात विशेष लोकप्रिय आहेत. एक टंगेरो व ऊडनो यांसारखी त्यांची काही नृत्ये उल्लेखनीय आहेत. बंजारांची लोकनृत्ये व लोककथा प्रसिद्ध असून भवानीला उद्देशून ते गाणी म्हणतात. बंजारात मृतांचे दहन करतात, मात्र अविवाहित मृतास पुरतात. अशौच तीन दिवस पाळतात. बाराव्या दिवशी आप्तेष्टांना जेवण घालतात. त्यांच्यात शुभ व अशुभ प्रत्येक कार्यात विधिपूर्वक प्रदर्शित रडणे असते.

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक बंजारी समाजाचे होते. त्यांनी या समाजाच्या कल्याणासाठी अनेक योजना राबविल्या आणि या समाजाच्या शैक्षणिक व आर्थिक उन्नती घडवून आणण्यासाठी प्रयत्न केला. तसेच श्री. रामसिंग धानावत हेही या समाजातील एक फार जुने आणि वयोवृद्ध कार्यकर्ते आहेत.

OOO

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींना कृती समितीचे अध्यक्ष
श्री. डी. जी. पाटील यांचे अनावृत पत्र

**माननीय तर्कतीर्थजी**

यांना सादर प्रणाम.

आपणास विदित आहे की, वाई व आसपासचा भाग हा ब्रह्मवृंदांचा आहे. त्या ठिकाणी छत्रपती शिवाजी राजाना शुद्र ठरविण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्याचे नेतृत्व पुणे व वाईच्या ब्राह्मणानी केले.

आपण वैदिक संस्कृतीचे गाढे अभ्यासक तसेच परिवर्तनवादी विषयांचे अग्रणी आहात असे संबोधण्यात येते. महाराष्ट्र राज्याचे शिल्पकार कै. यशवंतरावजी चव्हाण यांचे आपण मार्गदर्शक म्हणूनही ओळखले जाता.

आदरणीय यशवंतरावाचे प्रेरणेने भरघोस प्रशासकीय पाठिंब्याने आजपर्यंत आपण सर्व भौतिक सुखे भोगीत आहात असे म्हटल्यास वावगे होणार नाही. आपल्या तर्कशुद्धतेबाबत शंका निर्माण व्हावी अशा तऱ्हेचे लिखाण आपल्या विश्वकोशातून केल्याचे आढळून येते. उदाहरणार्थ खंड १२ वा. पा. नं. ७८२ वरील भोसले घराण्याच्या इतिवृत्तांची माहिती वाचून संताप झाला. ज्या ब्राह्मणांनी छत्रपती शिवाजी राजांच्या वैभवशाली स्वराज्याचा शेवट नाच, गाणी आणि मेजवान्या यांच्यासाठी पणाला लावले त्यांच्याच वंशजांनी मराठी विश्वकोश आपल्या देखरेखीखाली संपादन केला आहे. या खंडात छ. शिवाजी महाराजांच्या भोसले घराण्याचा वंशावळीचा तक्ता दिला आहे. सदर भोसले घराण्याचे संस्थापक शहाजी राजे, शिवाजी राजे तसेच त्यांच्या पराक्रमी वारसांचा जसे राजर्षी शाहू यांची त्रोटक माहिती देऊन साऱ्या जगाला त्यांच्या कर्तृत्वाविषयी अंधारात ठेवले आहे. विशेष म्हणजे या महापुरूषाचे फोटोही छापलेले नाही. आश्चर्याची बाब म्हणजे ज्यांचे कर्तृत्व आकाशाएवढे आहे त्या शाहूराजाचे वर्णन ४ ते ५ वाक्यात केले आहे. या उलट माजी मुख्यमंत्री बाबासो भोसले यांचा फोटो व सविस्तर वृत्तांत पा. नं. ७८७ ते ८८ वर अर्धे पान छापले आहे. तेव्हा हे आपल्या तर्कशुद्ध बुद्धीला शोभून दिसते का? असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

आणखी म्हणून या सर्व प्रकरणी पुणे विद्यापीठ नामांतर कृती समितीच्या वतीने हा सर्व भयानक प्रकार पूर्वनियोजित पद्धतीने केला आहे. म्हणून सदर कृतीचा निषेध म्हणून १२ व्या

खंडाची होळी करणेत येणार असून या खंडाचा प्रचार आणि प्रसार आम्ही राज्यात करणार आहोत.

या बाबतीत आपले म्हणणे काय आहे ते कळवावे ही विनंती तसेच कृती समितीस असे वाटते की हा खंड विश्वकोश नसून विषकुपी आहे.

आपला विनित,

स्वाक्षरी

**(श्री. डी. जी. पाटील)**

अध्यक्ष

श्री. राजर्षी शाहू छत्रपती विद्यापीठ पुणे

नामांतर कृती समिती, कोल्हापूर

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ
मराठी विश्वकोश कार्यालय, वाई, (जि. सातारा)
आवक क्र. २७७
दिनांक ४-४-९४

OOO

महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ

प्रशासकीय कार्यालय : सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, एन्साइटमेंट, आझाद मैदान, मुंबई ४०० ००१

दूरध्वनी क्रमांक : २६२०६९८/२६२०९९९

पर्याय : अध्यक्षांचे स्वीय सहायक, मराठी विश्वकोश कार्यालय, वाई ४१२८०३ ( जि सातारा)

दूरध्वनी क्रमांक ७००५३/७००२६

जा. क्र. : मानव्य/ ५०७ दिनांक : ६ एप्रिल, १९९४

**श्री. डी. जी. पाटील,**

यांस सप्रेम नमस्कार वि. वि.

तर्कतीर्थ, श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांना लिहिले आपले अनावृत पत्र मिळाले. प्रस्तुत पत्रात आपण तर्कतीर्थांच्या व्यक्तिगत जीवनावर जे शिंतोडे उडविलेले आहेत, ते अत्यंत निंद्य आहेत. अशा प्रकारची विधाने आपण मराठी विश्वकोशाच्या पहिल्या खंडाची प्रस्तावना न वाचताच आणि एकूण मराठी विश्वकोश कोणत्या धर्तीवर रचला जातो, याची साद्यंत माहिती न होता केलेली आहेत. या संदर्भात या पत्रासोबत आपणाकडे आपण 'राजर्षि शाहू महाराज यांची अत्यंत त्रुटित माहिती दिली आहे.' असे जे विधान केले आहे, त्याचा सविस्तर खुलासा करणारे निवेदन सोबत जोडले आहे. ते वाचून आपले समाधान होईल, असे वाटते.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे महाराष्ट्राला नव्हे, तर अखिल भारताला एक प्रकांड पंडित म्हणून ज्ञात आहेत. त्यांनी जीवनभर महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक चळवळीचा प्रसार-प्रचार केला; म्हणूनच कै. यशवंतराव चव्हाणांनी त्यांना गुरुस्थानी मानले आणि कोल्हापूरकरांनी त्यांचा राजर्षि छत्रपती शाहू पुरस्कार देऊन उचित सन्मान केला. एवढेच नव्हे तर, त्यांना या सामाजिक कार्याबददल रामशास्त्री प्रभुणे हा पुरस्कारही प्रथम देण्यात आला. अशा व्यक्तीकडून राजर्षि शाहू महाराजांविषयी मराठी विश्वकोशात त्रोटक माहिती दिली जाईल, अशी आपण कल्पना तरी कशी करता ? याविषयी कुठेही चौकशी न करता प्रस्तुत पत्रात एकांगी टीका करण्याचे धाडस आपल्या हातून होते तरी कसे, याचा खेद वाटतो. या बाबतीत आपण शिवाजी विद्यापीठातील इतिहास विभागातील एखाद्या प्राध्यापकाकडे जरी अगोदर चौकशी केली

असती, तरी याचा सविस्तर खुलासा झाला असता.

आपला,
(स्वाक्षरी)
वि. रा. गद्रे
प्रभारी विभाग संपादक,
मानव्यविद्या कक्षा.

प्रति,
मा. डी. जी. पाटील,
अध्यक्ष,
श्री राजर्षी शाहू छत्रपती विद्यापीठ, पुणे
नामांतर कृती समिती, कोल्हापूर

# निवेदन

## मराठी विश्वकोश आणि राजर्षी शाहू छत्रपती

शनिवार, दिनांक २ एप्रिल १९९४ च्या दैनिक "लोकसत्ता" वृत्तपत्रात कोल्हापूर शहरातील काही समाजधुरीणांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची मराठी विश्वकोशातील बाराव्या खंडात अत्यंत त्रोटक माहिती आलेली आहे, म्हणून राजर्षी शाहू महाराजांच्या शताब्दी राज्यसोहळ्याच्या निमित्ताने प्रस्तुत खंडाची निषेध म्हणून, होळी करण्याचा कार्यक्रम आयोजित केला आहे. राजर्षी शाहू महाराजांसारख्या महान व्यक्तीवर मराठी भाषेत प्रसिद्ध होणाऱ्या मराठी विश्वकोशात त्रोटक माहिती दिली जाईल, अशी कल्पना करणेसुद्धा मुळातच चुकीचे ठरेल. कारण राजर्षींचे सामाजिक चळवळीतील योगदान फार मोठे आहे आणि छत्रपती शाहू महाराजांचे आम्ही अनुयायी व भक्त आहोत. तेव्हा मराठी विश्वकोशातील इतर कोणत्याही लेखांचा संदर्भ न पाहता अशा प्रकारचे वरील विधान करणे विश्वकोशावर अन्यायकारक ठरेल.

मराठी विश्वकोशात "भोसले घराण्या"व्यतिरीक्त "कोल्हापूर संस्थानवर" स्वतंत्र लेख (खंड-४, पृष्ठ ३७१ - ३७२) असून "महाराष्ट्र राज्या वरील" लेखातही [खंड १२, पृष्ठ १५२२] राजर्षींची माहिती आलेली आहे. याशिवाय राजर्षी शाहू महाराजांवर मराठी विश्वकोशाच्या सोळाव्या खंडात वर्णक्रमाने शाहू छत्रपती [ कोल्हापूर] असा स्वतंत्र विस्तृत लेख चित्रासह येणार आहे. प्रस्तुत लेख मुद्रणप्रती स्वरूपात तयार असून शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विभागातील प्रा. डॉ. अरूण भोसले यांनी तो तपासून / समीक्षून दिलेला आहे आणि या खंडाच्या छपाईत लवकरच सुरूवात होणार आहे. या लेखात राजर्षींच्या चरित्राचा सर्वांगीण आढावा घेण्यात आलेला आहे.

मराठी विश्वकोशात साधारणतः सर्व लेख वर्णक्रमाने देण्याची ज्ञानकोशीय पद्धत वापरलेली आहे. व्यक्तींवरील चरित्रात्मक लेख देत असताना शक्यतो आडनावाने देण्याची पद्धत सर्वत्र अवलंबिण्यात येते, परंतु ज्या व्यक्ती मुख्यतः विशेषनावानेच प्रसिद्ध असतात, त्या व्यक्तींची माहिती मराठी विश्वकोशात त्या त्या नावाखाली दिलेली आहे. उदा. ताराबाई, राजाराम छत्रपती, शिवाजी छत्रपती, संभाजी छत्रपती, शाहू छत्रपती (कोल्हापूर), शाहू छत्रपती (सातारा). याचा खुलासा मराठी विश्वकोशाच्या प्रस्तावनेत दिलेला असून त्याचबरोबर त्या अन्य लेखांत अनुषंगाने त्या व्यक्तीची माहिती आलेली असते. तेथे त्या व्यक्तींच्या नावामागे बाणांकन दर्शविले असते. शिवाय ते शब्द इटॅलिक्समध्ये म्हणजेच तिरप्या लिपीत छापलेले असतात. याचा अर्थच मुळी असा आहे की, त्या व्यक्तीवर वर्णक्रमाने स्वतंत्र लेख मराठी

विश्वकोशात संबंधित खंडात अंतर्भूत केलेला आहे.

वर दिलेली विश्वकोशीय लेखांच्या रचनेची माहिती संबंधित व्यक्तींनी एखाद्या जाणकार व्यक्तीकडून अवगत करून घेतली असती तर अशा प्रकारचा गैरसमज वा घोटाळा उद्भवला व प्रसृत झाला नसता, असे वाटते.

स्थळ : वाई (स्वाक्षरी)

दि. २/४/१९९४ **लक्ष्मणशास्त्री जोशी**

(प्रमुख संपादक,
मराठी विश्वकोश)

OOO

१३.

# मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई पत्रव्यवहार

# मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय

१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४

जावक क्र. -६४८/९३-९४ दिनांक १०-१-१९९२

माननीय
तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
अध्यक्ष, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय,
वाई

स. न. वि. वि.

आपल्या मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या नव्या व जुन्या इमारतींना जोडणाऱ्या भिंतीला एक मोठा दरवाजा जाहे. संस्थेचे मध्यवर्ती कार्यालय पश्चिम टोकाला तर मराठी संशोधन मंडळ, इतिहात संशोधन मंडळ, सानेगुरुजी बालविकास मंडळ पूर्व टोकाला अशी परिस्थिती आहे. संस्थेचा सेवकवर्ग, पदाधिकारी, संस्थेच्या कामासाठी येणारे सभासद, वाचक, अभ्यासक या दरवाजाचा व त्यात जोडून असणाऱ्या मार्गिकेचा [पॅसेज] दिवसभर वापर करित असतात. आपल्या संस्थेच्या सुरेन्द्र गावस्कर सभागृहामध्ये होणाऱ्या समारंभाचे प्रमुख पाहुणे व वयस्कर मंडळींना याच दरवाजाने सभागृहामध्ये जाणे भाग पडते. कारण लिफ्टची सोय या दरवाजानेच आहे. यामुळे दरवाजा व त्याला जोडून असलेली मार्गिका [पॅसेज] ही जवळपास संस्थेच्या मुख्य दरवाज्याइतकीच महत्वाची आहे. सुरेन्द्र गावस्कर सभागृह व हा दरवाजा यामधील काही जागा विजय शिक्षण संस्थेच्या मूक बधीर विद्यालयास काही तात्पुरत्या काळासाठी काही वर्षापूर्वी दिली आहे. सदर विद्यालयाची विद्यार्थी संख्या वाढल्याने या दरवाज्यातून सभागृहाकडे व पलिकडील आपल्या संस्थेच्या इतर कार्यालयात जाण्याच्या रस्त्यावरही काही वेळा थोडे विद्यार्थी बसत असत व त्यांचे सामानही ठेवले जात असे, त्यामुळे जाण्या-येण्यात अडथळे होत असत. याबद्दल शाळा चालकाकडे विचारणा केली असता, आपले विद्यार्थी वाढलेत व वाढत आहेत, त्यामुळे आम्ही शासनाकडे जागा मागितली आहे. आम्हास लवकरच जागा मिळण्याची शक्यता आहे, असे सांगितले जात असे. त्यामुळे मुक बधीर विद्यार्थ्यांच्या बद्दलच्या आपुलकीमुळे व शिक्षणकार्याबद्दलच्या आस्थेमुळे आपल्या संस्थेच्या सर्व संबंधीतांनी गैरसोय सोसूनही सहकार्य चालू ठेवले होते. गेल्यावर्षी एका सभेच्या कार्यक्रमाचेवेळी सुरेन्द्र गावस्कर सभागृहामध्ये व समोरही काही दंगल झाली. त्यावेळी आपल्या संस्थेचे व मुकबधीर विद्यालयाच्याही मालमत्तेचे काही नुकसान झाले. त्यामुळे त्या दिलेल्या जागेला काही पार्टीशन

घालून दरवाजे लावून घेऊन त्यांच्या साहित्याचे संरक्षण करून घेण्याची सवलत दिली. आशी व्यवस्था झाल्यानंतरही संबंधीत दरवाज्यातून सभागृह व अन्य आमच्या कार्यालयात जाणाऱ्या मार्गिकेत त्यांचे काही सामान असायचे. त्याच सुमारास गेल्या वर्ष अखेर आपल्या इमारतीच्या दुरुस्तीचे काम सुरु झाले.

सुरेन्द्र गावस्कर सभागृहामध्ये कॉन्ट्रॅक्टरच्या लोकांची दिवसभर जा-ये असायची, त्यामुळे सभागृह व विद्यालय यामधील दरवाजा तात्पुरता बंद ठेवला होता. या काळात सभागृहाचे बुकिंगही फारसे होत नव्हते. दुरुस्ती व बुकिंग नाही या परिस्थितीमुळे विद्यालयाच्या जवळच्या मार्गिकेचा (पॅसेज) वापर कमी झाला होता. या काळात विद्यालयाच्या चालकांनी आम्हाला न कळविता समाईक किल्लीचे कुलूप बदलून नवे कुलूप लावले. नव्या कुलूपाची दूसरी किल्ली तरी द्यावी अगर पूर्वचे कुलूप लावावे अशी सूचना विद्यालयाच्या दैनंदिन व्यवस्थापकीय सेवकाना करण्यात आली. पण वरिष्ठ पदाधिकाऱ्यांना विचारतो या सबबीखाली सतत किल्ली देण्याची टाळाटाळ केली गेली. यामुळे गेली काही महिने संस्थेचे पदाधिकारी, सेवक, वाचक, सभासद, विश्वस्त सभागृहामध्ये येणारे ज्येष्ठ साहित्यिक यांची कुचंबणा होत आहे. सभागृह बुकींगवरही परिणाम होऊन संस्थेचे नुकसान होत आहे. ही सर्व परिस्थिती आपल्यासारख्या काही ज्येष्ठ पदाधिकारी व विश्वस्तासमोर मांडून त्यांच्यामार्फत विद्यालयाच्या वरिष्ठांशी त्यानी बोलणी करताच सहकार्याची भाषा करायची पण प्रत्यक्ष पत्रव्यवहारात मात्र काही अटीतटीची भाषा व कृती असहकाराची असा प्रकार चालू आहे.

अशा या परिस्थितीमुळे कार्यकारी मंडळ व पदाधिकाऱ्यांना काही कठोर निर्णय घ्यावे लागणार आहेत, याची आपणासारख्या जेष्ठांना माहिती असावी म्हणून हे विस्तृत पत्र पाठवित आहोत.

कळावे,

आपले नम्र,

| | |
|---|---|
| (स्वाक्षरी) | (स्वाक्षरी) |
| नरेन्द्र पाटील | के. पु. आपटे |
| कार्याध्यक्ष | प्रमुख कार्यवाह |

○○○

# मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय

१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४

जावक क्र. -६४९/९३-९४ दिनांक १०-१-१९९२

माननीय
गंगाधर गाडगीळ
उपाध्यक्ष
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय
५ अभंग, साहित्य सहवास
वांद्रे पूर्व - मुंबई - ५१
यांसी

स. न. वि. वि.

विषयी : मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे संदर्भ सेवा शुल्क

आपले दि. २०-८-९३ चे पत्राचे संदर्भ विद्यार्थ्यांसाठी सुरु करण्यात आलेल्या शुल्काचा फेरविचार करण्याबाबत श्री. कांबळी यांनी केलेल्या आवाहनाबाबत यांतील माहिती आपल्यांसमोर ठेवीत आहोत.

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाची आर्थिक परिस्थिती काय आहे ती आपण जाणताच. आमच्याकडे २०-२५ वर्षे सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना आपण केवळ रू. ८००-८५० वेतन देतो. कांही प्रसंगी ते वेतन वेळेवर देण्यासही पैसे नसतात. कांही निवृत्त सेवकांची ग्रॅज्युईटी सुमारे रू. ५०, ७१९-५५ आम्ही अद्याप देऊ शकलो नाही. संदर्भासाठी पुस्तक खरेदी व त्यांची देखभाल करण्यासाठी अत्यावश्यक साहित्य खरेदी करणे कठीण झाले आहे. श्री. कांबळी यांनी व अन्य काही एक दोन व्यक्तिंनी सरकारकडून व अन्य मार्गे निधी उभा करण्याच्या प्रयत्नाबाबत सूचना केल्या आहेत. सरकारी अनुदान वाढीसाठी आपणही काही प्रयत्न केले आहेत. त्यासाठी आपल्या कार्यालयातच राज्य शासनाच्या ग्रंथालय संचालकांची चर्चा झाली आहे. महानगरपालिकेकडे अनुदान मागणाऱ्या संस्थांची संख्या अलिकडे वाढल्याने जुन्या काही संस्थांची अनुदाने कमी झालीत त्यात आपली संस्थाही आहे. समाजाकडून निधी गोळा करण्याच्या दिशेने नवे कार्यकारी मंडळ क्रियाशील झाले आहे. पण त्याला गती येण्यात काही काळ जाणार आहे. संस्थेच्य मालमत्तेतून (इमारत) उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न सुरु केला आहे.

त्यालाही गती येण्यास काही काळ जावा लागेल. श्री. कांबळी यांच्यासारख्या एक दोन व्यक्तींचा अपवाद वगळल्यास फार मोठा सक्रिय अनुकूल प्रतिसाद संस्थेला मिळाला आहे. श्री. कांबळी यांच्या संस्थेलाही ग्रंथालयीन चळवळीचे अधिक प्रभावी व संशोधनकारक काम करणारे श्री. एस. के. पंडित यांनी सेवा शुल्काची सुरुवात पन्नास वर्षांपूर्वी सुरू होणे आवश्यक होते, असे मत वृत्तमाध्यमांतून प्रसिद्ध केले आहे. या सार्थ दैनिकानेही अनेकांचे मनोगत जाणून अनुकूल प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

जर आपल्या व अन्य पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने आम्ही सुरू केलेल्या प्रयत्नात भरघोस यश आले तरच ग्रंथसंग्रहालयाचे कार्य सुधारू शकणार आहे. जुन्या ग्रंथाचे आणि साहित्याचे जतन करण्याचे फार मोठ्या खर्चाचे काम हाती घेणे तातडीचे आहे. त्याचा खर्चही मोठा आहे. ग्रंथसंग्रहालयाचे चेंबूरचे एक जुने सभासद श्री. भागवत यांनी संस्थेचा लाभ घेणाऱ्या वाचक सभासदांनीच प्रत्यक्ष कामाला लागून निधी उभारून आपआपल्या शाखांचे प्रश्न सोडविले पाहिजेत, असे आवाहन वृत्तपत्रातून केले आहे.

आम्ही संदर्भ विभागाच्या वाचकांच्या प्रतिक्रिया तेथील नोंद पुस्तकात घेतल्या आहेत. एक दोन महिन्याचा अनुभव घेऊन त्या सूचनांतील महत्त्वाच्या व ग्राह्य सूचनांचा आपण जरूर विचार करू.

आपणास अपेक्षित असलेली माहिती वरील सर्व मुद्यात उपलब्ध होऊ शकेल, असा विश्वास वाटतो.

कळावे,

आपले नम्र,

| | |
|---|---|
| (स्वाक्षरी) | (स्वाक्षरी) |
| नरेन्द्र पाटील | के. पु. आपटे |
| कार्याध्यक्ष | प्रमुख कार्यवाह |

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय

टीप : सेवा शुल्क पंधरा दिवसाला रु. १०/- असे अत्यल्प ठेवण्यात आले आहे. त्यावर आलेल्या सूचनांवर काही कालानंतर विचार करणेचे ठरले आहे.

प्रत माहितीसाठी
माननीय
तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्रीजी जोशी

ooo

## महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ

एन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई ४००००१

कार्यालय, वाई ४१२८०३ (जि. सातारा)

दिनांक: 7 SEP 1993

**माननीय प्रिय श्री. शरदराव पवार.**

यांना सप्रेम नमस्कार विनंती विशेष.

विषय: मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाला मुख्यमंत्री निधीतून संमत झालेल्या अर्थसाहाय्यातील उर्वरित पंधरा लाख रुपयांचा धनादेश मिळण्याबाबत.

मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाला मुख्यमंत्री निधीतून पंचवीस लाख रुपयांचे अर्थसहाय्य मंजूर झाले असून त्यातील दहा लाख रुपये मिळाले आहेत. त्यातून इमारत दुरुस्तीचे काम पुरी झाली असून त्यासंबंधीचे विनियोग प्रमाणपत्र आपणाकडे संस्थेचे प्रमुख कार्यवाह यांनी दि. २०/८/९३ च्या पत्राने पाठविले आहे.

यासंदर्भात मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या कार्यवाहांनी आपणास पाठविलेल्या पत्रांच्या झेरॉक्स प्रति सोबत जोडलेल्या आहेत.

या संदर्भात मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाला मुख्यमंत्री निधीतून मंजूर झालेल्या रकमेपैकी उरलेल्या पंधरा लाख रुपयांचा धनादेश लवकरात लवकर मिळणेबाबत आवश्यक ती कार्यवाही केल्यास मी आपला आभारी होईल.

कळावे.

आपला स्नेहांकित

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

प्रति,

**मा. ना. श्री. शरदराव पवार,**

मुख्यमंत्री

महाराष्ट्र राज्य

मंत्रालय, मुंबई - ४०००३२.

○○○

रजिस्टर्ड पोस्टाने

क्रमांक : मुमंनि ११९३/०६३५८/९३
मंत्रालय, मुंबइ; ४०० ०३२
दिनांक : १४-१२-१९९३

विषय : मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अर्थसहाय्य.
प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई या संस्थेस अमृत महोत्सव
समारंभानिमित्त आयोजित करावयाच्या विविध प्रकल्पांसाठी.

प्रिय शास्त्रीजी

स. न.

१. आपल्या विनंतीचा विचार करून मी आपल्या संस्थेस उपरोक्त प्रयोजनाकरिता मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून रु. ४,००,०००/- (रुपये चार लक्ष फक्त) मंजूर केले आहेत.

२. सोबत आपल्या संस्थेच्या नाव काढलेला स्टेट बँकेवरील क्रमांक १६०३५६, दिनांक ६.१२.१९९३, रु. ४,००,०००/- चा धनादेश पाठवीत आहे. त्याचा विनियोग योग्य प्रयोजनाकरिता व्हावा. कृपया धनादेश मिळाल्याची पोहोच पावतीसह पाठवावी.

कळावे,

आपला,
स्वाक्षरी
**( शरद पवार )**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी,
अध्यक्ष, प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई
३१५, गंगापुरी, वाई ४१२ ८०३.

○○○

१४.

# किसन वीर महाविद्यालय, वाई
## पत्रव्यवहार

## पुणे विद्यापीठ

महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार,
कुलगुरू

गणेशखिंड, पुणे ७.
सौर आग्रहायण ६,१८८५
दिनांक २७ नोव्हेंबर, १९६३

॥ श्री ॥

**सप्रेम नमस्कार वि. वि.**

आपले पत्र पोहोचले. वाईच्या भेटीचे मला चांगले स्मरण आहे. आपले वाईचे कॉलेज मोकळ्या जागेवर, प्रशांत स्थळी झोपड्यात चाललेले मी पाहिले. शेजारीच आपण मोठी नवी जागा घेतलेली आपण दाखविली. तेथे इमारत होऊन त्यात कॉलेज जाईल. वाई हे एक जुने विद्याकेंद्र आहे. निरामय अभ्यासाला उत्तम ठिकाण आहे. प्राज्ञपाठशाळा आणि तिचे प्राणभूत संस्थापक केवलानंद स्वामी आणि त्यांचे शिष्य तर्कतीर्थ प्रभृती अलीकडील मंडळी आणि त्यापूर्वी भाऊशास्त्री प्रभृती अनेकांच्या विद्वत्तेमुळे वाईचे नांव गाजलेले आहे. बेताची संख्या आणि चांगले गुरु आणि साहित्य ग्रंथालय वगैरेंची उत्कृष्ट जोड मिळेल तसतसे वाईसारखी केंद्रे उत्कृष्ट विद्याकेंद्रे म्हणून सर्वमान्य होतील. विशेषतः वाङमय, इतिहास, शास्त्र, तत्त्वज्ञान या विषयांच्या अभ्यासाला वाई हे एका दृष्टीने आदर्श ठिकाण ठरेल, पुणे, कोल्हापूर वगैरेसारखी ठिकाणे वाईहून जवळ असल्याकारणाने आणि खर्चाच्या दृष्टीने आणि आरोग्याच्या दृष्टीने वाई अधिक आकर्षक ठरणारे असल्यामुळे आपले कॉलेज हे चांगले बाळसे धारण करील, आणि आपल्या कॉलेजातून चांगले विद्वान बाहेर पडतील अशी मला आशा आहे. मी नुकताच रशियाहून परत आलो आहे. आणि लगेच वाराणसीला जाऊन आलो, म्हणून मला यावेळी अधिक लिहिण्याला वेळ नाही याची क्षमा असावी. वाईचे कॉलेज करवीर विद्यापीठाला जरी जोडले गेले तरीही करवीर विद्यापीठाशी पुणे विद्यापीठ सर्व प्रकारे सहकार्य करील याविषयी माझी खात्री आहे.

कळावे, लो. अ. हे. वि.

आपला
(स्वाक्षरी)
**- दत्तो वामन पोतदार**

**('कृष्णाई' मार्च, १९६४ मधून १ व आर्ट्स कॉमर्स महाविद्यालय, वाई नियतकालिक)**

०००

## न. वि. गाडगीळ

४१९, शनवार, पुणे- २
टे. नं. ५६६९७
दि. ९ | १२ | ६३

वाई येथील आर्टस् अॅण्ड कॉमर्स कॉलेजला भेट देण्याचा योग ऑगस्ट १९६३ मध्यें आला. या महाविद्यालयात होत असलेले विद्यादान चांगल्या तऱ्हेने होत आहे, असे मला वाटते. विद्यालयाची वास्तू व भोवतालची परिस्थिती प्रसन्न व विद्यादानास अनुकूल अशी आहे. क्षणभर गुरुकुलाचे वातावरण तेथे अनुभवाला येते.

वाई म्हणजे दक्षिणेतील काशी असा तिचा लौकिक होता. वेदरत ब्राह्मण व संस्कृत पंडित यांची परंपरा अगदी परवा परवापर्यंत वाईस चालू होती. आधुनिक युगास अनुसरून आता इष्ट ते बदल होत आहेत व त्याचाच एक भाग म्हणजे हे महाविद्यालय आहे. आजच्या जगात विज्ञानाशिवाय समृद्धी नाही, व ज्ञानाशिवाय मानसिक समाधान नाही. म्हणून ज्ञान आणि विज्ञान या दोन्ही क्षेत्रात या विद्यालयाने काम करावे, व श्रद्धायुक्त प्रयत्नांनी करावे, आणि तशा प्रयत्नांची आज देशाला जरूरी आहे. आणि असे प्रयत्न या विद्यालयात होतील, अशी माझी खात्री आहे. होत असलेल्या कामाबद्दल संचालक, अध्यापक वर्ग व छात्रगण या सर्वांचे अभिनंदन करतो.

(स्वाक्षरी)

**- न. वि. गाडगीळ**

**('कृष्णाई' मार्च, १९६४ मधून -आर्टस व कॉमर्स महाविद्यालय वाई, नियतकालिक)**

OOO

## Minister of Defence

नवी दिल्ली<br>दि. २० डिसेंबर १९६३

माझे मित्र श्री. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी व आबासाहेब वीर यांच्या प्रयत्नाने सुरू झालेल्या वाईच्या महाविद्यालयास २९ आक्टोबर रोजी भेट देण्याची संधी मला मिळाली. या विभागात अशा तऱ्हेच्या महाविद्यालयाची गरज होती. ती गरज ही संस्था भरून काढीत आहे. दक्षिण काशी म्हणून विख्यात असलेल्या वाईसारख्या विद्येच्या केंद्र स्थानात या महाविद्यालयाची सुरुवात होऊन एक अपेक्षित कार्याची योग्य तीच पूर्ती झाली आहे. सुदैवाने तर्कतीर्थासारख्या विद्वानांचे साहचर्याने मार्गदर्शन या संस्थेस मिळाले आहे. त्यामुळे या संस्थेचे भवितव्य उज्ज्वल आहे यांत शंका नाहीं. प्राध्यापक वर्ग व लायब्ररी यांची योग्य ती व्यवस्था केलेली दिसली.

माझ्या संपूर्ण शुभेच्छा!

(स्वाक्षरी)<br>- यशवंतराव चव्हाण

**('कृष्णाई', मार्च, १९६४, आर्ट्स कॉमर्स महाविद्यालय, वाई, 'नियतकालिक')**

ooo

१५.

# मान्यवर पत्रव्यवहार :

## नामदार यशवंतराव चव्हाण

## DHARMAKOSHA MANDAL, WAI

LAXMAN SHASTRI JOSHI, Wai, Dist N. Satara
TARKATEERTHA, Date 1-1-59
Editor-in-Chief

40315847

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण,**

यांस, स. नमस्कार वि. वि

काल मी मुंबईहून येथें आलों; येथे आल्यावर कळले की, शिक्षणखात्याकडून श्री. ब्रह्मीभूत गुरुवर्य स्वामी केवलानंद सरस्वती यांच्या सांस्कृतिक स्मारकाकरितां एक लाख एकुणऐंशी हजार रुपये मंजूर झाल्याचे पत्र आले.

या संबंधांत आपल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त कशी करावी हेच मला समजत नाहीं; शब्द अपुरे पडतात. कारण माझ्यावर गुरूंचे कर्तव्य जें न फिटणारे ऋण आहे त्यासंबंधी प्राप्त होणारे एक कर्तव्य पार पाडण्यास आपले संपूर्ण साहाय्य झाले आहे. आपणाशिवाय एवढे अनुदान प्राप्त झाले नसतें.

खाजगी संस्थांना यंदाच मुंबई राज्याकडून मोठ्या रकमा मिळाल्या आहेत; या पूर्वी एवढ्या मोठ्या रकमा मिळाल्या नाहीत अशी माझी समजूत आहे. एका अर्थी खाजगी संस्थांच्या महत्वावर सरकारने या रीतीने शिक्कामोर्तब केले आहे.

या अनुदानाने प्राप्त होणारी जबाबदारी ही वाईची संस्था पार पाडील असा मला विश्वास आहे. या अनुदानाने जी इमारत उभारली जाईल तिच्यात भारतीय संस्कृतीच्या अध्ययनाचे व संशोधनाचें कार्य व्हावयाचे आहे. त्याचा प्रारंभ अगोदरच झाला आहे, इमारत नंतर होत आहे, यामुळे हे अनुदान उचित आहे याची आपणास खात्री होईल.

आपली गांठ नागपूरच्या काँग्रेस अधिवेशनांत पडेलच.

कळावे ही विनंती.

आपला
(स्वाक्षरी)
**लक्ष्मणशास्त्री जोशी**
**(मूळ पत्र स्वहस्ताक्षरातील)**

ooo

# PRAJNA PATHASHALA MANDAL, WAI.

Lakshmi Shastri Joshi
Tarkateerth,
President and Trustee

PHONE NO. 0
WAI (Dist.) SATARA

Ref, No.

Date. 2.2.62

**Confidential:**

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण,**

यास स.न. वि.वि

आज बारामतीचा दौरा पुरा करून अहमदनगरकडे जात आहे. पुणे जिल्ह्यातील तीन जागा म्हणजे पुरंदर, बारामती व दौंड यांच्याकडे अधिक लक्ष पुरविण्याची गरज दिसते. विशेषतः पुरंदरची परिस्थिती अधिक नाजूक वाटली. व दौंड येथील आपले कार्यकर्ते काय करतील याबद्दल भरवसा सांगता येत नाही.

२. हे पत्र मी ज्या कारणास्तव लिहीत आहे ते कारण असे - गेल्या ३१ तारखेस साहित्य व संस्कृती मंडळाची बैठक पुणे येथे झाली; त्यावेळी शिक्षण सचिव श्री. चिन्मुळगुंदसाहेब यांनी मला खाजगी रीतीने अशी विनंती केली की, त्यांच्याकरिता माझा आपणाशी असलेला जो मैत्रीचा संबंध आहे त्या नात्याने मी आपणास त्यांची खाजगी मागणी निवेदन करावी. ती त्यांना अत्यंत निकडीची वाटते. त्यांचे म्हणे मला पटलेही आहे.

मुंबईतील वॉर्डन रोडवरील गिरणीवाले आपटे यांच्या बंगल्याजवळील त्यांचे एक घर सरकारच्या ताब्यात आहे. ते श्री चिन्मुळगुंद यांना देण्याचे आश्वासन मुख्यसचिव श्री. मोने यांनी दिले आहे. परंतु ती जागा, येत्या दहा-पंधरा दिवसात सेवानिवृत्त होणारे रिझर्व्ह बँकेचे श्री. अय्यंगार यांना देण्याचे घाटत आहे. श्री. चिन्मुळगुंद यांची हल्लीची जागा त्यांना अत्यंत गैरसोयीची आहे. त्यांच्या पत्नी दम्याच्या विकाराने अतिशय आजारी असतात. त्या जागेत जिन्याचा चढउतार फार करावा लागतो; त्यामुळे जीव मेटाकुटीस येतो. तसेच जवळच्या हिंदुस्मशानांतील धुरही वाऱ्याने घरांत शिरून बेजार करतो. म्हणून ती जागा त्यांना अत्यंत गैरसोयीची आहे. गिरणीवाले आपट्यांच्या नव्या जागेत वरील प्रकारचा त्रास व अडचण नाही. त्या जागेची रंगरंगोटीह श्री. चिन्मुळगुंद यांनी स्वखर्चाने अगोदरच केली आहे. तरी त्यांची ही अडचण आपण दूर करावी अशी आग्रहाची विनंती आहे.

श्री. चिन्मुळगुंद आपणास भेटून विनंती करणार होते. परंतु आपण दौऱ्यावर व तेही

सरकारी दौऱ्यावर आणि हे काम त्वरित होणे जरूर म्हणून त्यांनी मला सांगितले. मी आपणांस टेलिफोनवरून सांगणार होतो. परंतु, बारामतीची टेलिफोन-लाईन नादुरूस्त होती व अगोदर आपण यवतमाळच्या दौऱ्यावर होतात. आताही तुफानी दौऱ्यात आहात. म्हणून टेलिफोनवर सांगणे जमणार नाही असे वाटून मी हे पत्र आपणांस लिहीत आहे. श्री. चिन्मुळगुंद यांच्या गेल्या वर्षाच्या सहवासात माझ्या मनावर त्यांच्या सौजन्याची, विनयाची व विद्वतेची फार छाप पडली. त्यांचे म्हणणे की, माझ्यासारख्या चव्हाणसाहेबांच्या नोकराची चव्हाणसाहेबांनी अडचण ध्यानात घ्यावी.

या निवडणुकीच्या दौऱ्यात असा अनुभव येत आहे कीं, जनता काँग्रेसकडे वळली आहे परंतु अनेक ठिकाणी म्हणजे पुणे जिल्हा व पुणे शहर या सारख्या ठिकाणी काँग्रेस - कार्यकर्त्यांतील आपापसातील वैरे वाढण्याचा धोका वाढला आहे. हे आपसातील दुहीचे कालकूट विष सहन करून धिमेपणाने जाण्याची ताकद असलेला नेता हे एक अपवादात्मक उदाहरण आहे. 'चणे खावे लोखंडाचे तेव्हां ब्रह्मपदीं नाचे' याऐवजी 'स्वराज्यपदीं नाचे' असा फरक करून तुकारामाचे वचन माझ्या जिव्हेवर कालपासून घोळत आहे.

कळावे ही विनंती.

आपला

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

ooo

# प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** फोन न. ६
विश्वस्त व अध्यक्ष वाई (जि. सातारा)

जा. क्र. २२१।६१.६२।५९ ता. २७-२-६२.

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण-**

यांस - स.न.वि.वि.

अखिल भारतीय निवडणुकीचे सत्र संपले. मी व्यक्तिश: महाराष्ट्रांतील नागपूरपासून सांगलीपर्यंतचे मुंबईसह ११ जिल्हे फिरलो. गेल्या पाच वर्षामध्ये मतदार वर्गात लक्षांत भरण्यासारखे स्थित्यंतर दिसून आले. जिल्ह्याची शहरे, तालुक्याची गांवे व काही महत्वाची खेडी अशा ठिकाणी माझ्या जाहीर सभा झाल्या. पुणे, मुंबई, मिरज, धुळे, नाशिक इत्यादी शहरांत ज्या पातळीवरून मी भाषणे केली ती पातळी विरार, श्रीरामपूर, राहुरी, सटाणा, नंदुरबार, भुसावळ, रावेर इत्यादी ठिकाणीही भाषणांत कायम राखली. हजार ते पांच हजार इतका जनसमूह बहुतेक ठिकाणी उपस्थित असे. तास ते दीडतास भाषण होई. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काँग्रेस, नियोजन, लोकशाही व समाजवाद यासंबंधी विद्यापीठीय स्तर न सोडता सोप्या भाषेत व संदर्भाकरितां कठीण पारिभाषिक शब्द वापरूनही भाषणे केली व ती सामान्य मतदाराला चांगली समजली असे तेथल्या तेथे आभार मानणाऱ्याच्या प्रशस्तिवरून व लोकांच्या सभेतील प्रतिक्रियेवरून कळून आले.

ध्येयवाद व वस्तुस्थिती यांची सांगड घालून तयार केलेला राष्ट्ररचनेचा कार्यक्रम घेऊन काँग्रेस राज्यसत्ता चालवीत आहे. भारतीय नियोजन हा पक्षीय कार्यक्रम नसून राष्ट्ररचनेच्या आंदोलनाचे बौध्दिक विवेचन आहे, त्यामुळे त्यांत एकांगीपणा राहिलेला नाही. विविध विरोधी विचारसरणींचा सत्यांश स्वीकारण्याची तयारी त्यांत आहे. त्यामुळे विरोधी पक्ष पर्यायी पक्ष म्हणून वाढण्याची अजून तरी शक्यता नाही. स्वातंत्र्यपूर्व काळांत अनेक विरोधी पक्ष अस्तित्वात आले व विलय पावले किंवा खुरटले. तशीच भविष्यकाळीही शक्यता आहे. व्यवहार्य व समाजाच्या सर्व थरांना व्यापणारा ध्येयवादी कार्यक्रम व तो अमलांत आणण्याचे सामर्थ्य जोपर्यंत काँग्रेसमध्ये आहे तोपर्यंत विरोधी पर्यायी पक्ष वाढणे कठीण आहे. छोटे छोटे पक्ष राहतील परंतु प्रवाही संघटना एकच राहील व ती म्हणजे काँग्रेस.

माझ्या या प्रतिपादनाची उलटी-सुलटी मीमांसा मी करीत आहे. वरील मीमांसा किंवा भविष्यवाद चुकीचाही ठरण्याचा संभव आहे. त्याची महत्वाची दोन कारणे होत. इतरही

कारणे असतील किंवा आहेत परंतु, ताबडतोब लक्षांत घेण्यासारखी म्हणजे सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या प्रयोगातील संभवनीय प्रमाद व राज्यपातळीवरील प्रशासनाचे दोष. यासंबंधी मला असे म्हणावयाचे आहे:-

१) काँग्रेस संघटनेच्या जबाबदाऱ्या या निवडणुकीनंतर अधिक वाढणार आहेत. उदा. सत्तेच्या विकेंद्रीकरणाची अंमलबजावणी किंवा जिल्हा मंडळाचा कारभार करण्यास पात्र अशी माणसे निवडण्याचे काम फार जोखमीचे आहे. नगरपालिकेच्या कारभारात शिरणारी काँग्रेस कार्यक्षमतेपासून फार घसरलेले आहे असे दिसते, जिल्हा मंडळे नगरपालिकेच्या काँग्रेसवाल्यांसारख्या व्यक्तींच्या हाती गेल्यास मूळ काँग्रेस संघटना जिल्हा मंडळाचे नियंत्रण करण्यास असमर्थ ठरून निरुपयोगी होण्याचा फार संभव आहे.

राज्यसत्तेच्या द्वाराने काँग्रेस संघटनेची कार्यक्षमता किती चुका झाल्या तरी अजून जनतेस पटत आहे असे या निवडणुका सिद्ध करीत आहेत. राज्यपातळीवरच्या या कार्यक्षमतेइतकी जरी जिल्हा मंडळाची कामात कार्यक्षमता दिसली तरी जिल्हा मंडळे यशस्वी झाली असे म्हणता येईल. राज्यपातळीवरील होणाऱ्या चुका फार ठळकपणे जनतेच्या लक्षात येत नाहीत कारण तेसुद्धा एक विशाल व गूढ विश्वास आहे. तसेच जिल्हा मंडळाच्या कारभाराची स्थिती राहणार नाही. त्यातील चुकांचा तपशील फार लवकर उघडकीस येण्याचे भय आहे म्हणून राज्य पातळीपेक्षाही जिल्हा पातळीवरील कार्यक्षमता एका अर्थी अधिक चांगली असण्याची गरज आहे.

२) प्रशासन किंवा नोकरशाहीचा कारभार या विषयावर हल्ली बराच असंतोष प्रकट होत आहे. काँग्रेसच्या वर्तुळाबाहेरील विद्वान लोक कारभाराच्या दोषांचे मोठ्या प्रमाणात आविष्करण करू लागले आहेत. उदा. डॉ. ध. रा. गाडगीळ यांनी नागपूर विद्यापीठात केलेले व केसरीत नुकतेच अनुवादिलेले भाषण होय.

'नवी पिढी नवे राज्य' अशी मंत्रिमंडळाची पुनर्घटना झाली तर राज्यकारभाराची बाजू अधिक निर्दोष व प्रभावी होऊ शकेल - १) प्रशासन यंत्रणेमध्ये हस्तक्षेप न करता यंत्रणेतर्फे होणाऱ्या कार्याची तपशीलवार दैनंदिन तपासणी व २) अंमलबजावणीचे निरंतर अध्ययन करून मार्गदर्शन या दोन गोष्टी करण्यास समर्थ अशा मंत्र्यांचा अधिक भरणा नव्या मंत्रिमंडळात दिसणे आवश्यक आहे किंवा मंत्र्यांचा आपापल्या खात्यातील सचिवांबरोबर धोरणानुसार अंमलबजावणीच्या मुद्यावर अधिक विचारविनिमय व संघटन होणे आवश्यक आहे. सचिव हा आज्ञाधारक खरा परंतु त्याला त्या आज्ञा त्याच्या बुद्धीला व विवेकाला पटतील असे मार्गदर्शन करण्याइतकी पात्रता मंत्र्यांच्या ठिकाणी पाहिजे. निदान केवळ स्थानमहात्म्याचा उपयोग मंत्री करीत नाहीत. असे सचिवास वाटणे आवश्यक आहे.

श्री. बाळासाहेब देसाई यांच्याशी माझे स्नेहसंबंध फार जुने आहेत. मनमोकळेपणाने माझी व त्यांची पुष्कळ चर्चा चालते. कारभारांतील विषयांबद्दलची चर्चा मी कधीच करीत नाहीं

परंतु काही गोष्टी अपरिहार्य वाटल्या म्हणून त्यांच्या निदर्शनास आणणारे एक खाजगी पत्र त्यांना मी पाठविले आहे. कारभारांतील विषयांसंबधीच असल्यामुळे त्याचा आपणाशीही अप्रत्यक्ष संबंध पोहोचतो. आपल्या कानावर या पत्रातील गोष्टी गेल्या असतील यात शंका नाही; कारण आपल्या सावधगिरीची चकित करणारी बारीक उदाहरणेही मला माहित आहेत. मी श्री. बाळासाहेब देसाई यांना लिहिलेल्या पत्राची प्रत आपल्या अवलोकनार्थ या पत्रासोबत पाठविले आहे.

कळावे. ही विनंती.

आपला,

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

सोबत:

एक पत्र

ooo

# प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** फोन नं. ६
विश्वस्त व अध्यक्ष वाई (जि. सातारा)

जा.क्र. २२०/६१.६२/५९ ता. २४-२-६२

**अवलोकनार्थ**

**माननीय श्री. बाळासाहेब देसाई,**

यांस - स.न.वि.वि.

पाटण तालुक्यात फारच उत्साही वातावरण मला दिसले. प्रचंड बहुमताने आपण निवडून येणार अशी हवा मी तेथे अनुभविली. प्रसन्न मनाने मी आपला निरोप घेतला.

मला आपल्याशी आपल्या खात्यांतील काही गोष्टीसंबंधाने बोलावयाचे होते. वस्तुत: माझ्यासारख्या खाजगी व्यक्तीने शासकीय व्यवहारासंबंधी न बोलणे हेच योग्य होय. म्हणून मी गेल्या आपल्या पांच वर्षाच्या कारकीर्दीत त्यासंबंधांत एकही अक्षर आपणांशी बोललो नाही. परंतु आता पुन: आपली नवी कारकीर्द सुरू होत आहे. मित्र या नात्याने आपणांस या प्रसंगी वारंवार कानावर आलेले सांगून टाकणे, हे माझे कर्तव्य होय म्हणून मी खालील मजकूर आल्या खात्यांतील अत्यंत महत्त्वाच्या प्रशासनीय उच्चपदांवरील व्यक्तींबद्दल लिहीत आहे. या लिहिण्याने माझ्यांकडून अतिक्रमण होत असल्यास क्षमा करावी.

(१) गेली दोन वर्ष महाराष्ट्र राज्यस्थापनेपासून व पूर्वीदेखील या प्रदेशराज्याच्या डायरेक्टर ऑफ टेक्निकल एज्युकेशन या पदांवर सध्या असलेल्या व्यक्तीच्या योग्यतेबद्दल टीका ऐकू येत आहे, ती अशी - महाराष्ट्र हिताच्या दृष्टीने टेक्निकल एज्युकेशन- क्षेत्रांत अपात्र व्यक्ती काम करीत आहे. मी त्या क्षेत्रांतील अनेक महत्वाच्या व्यक्तीकडून ही टीका ऐकली आहे. त्या क्षेत्रांतील अत्यंत तज्ज्ञ आप व्यक्तीकडून भिन्नभिन्न वेळी हेच वरील विधान वारंवार मी ऐकले आहे. महाराष्ट्र राज्य झाल्याबरोबर. ती व्यक्ती गुजराथेत जाईल तर बरे पण..

महाराष्ट्रांत नको असेही पुष्कळवेळा ऐकले. महाराष्ट्रांतील निदान चार कॉलेजच्या इंजिनिअरिंग प्रिन्सिपॉलांचे असेच मत माझ्या कानावर अनेकदा आले. मी तिकडे दुर्लक्ष करीत होतो. परंतु माझे एक स्नेही इंजिनियर श्री. नळदुर्गकर, माजी डेप्युटी डायरेक्टर हे सेवानिवृत

झाल्यानंतर पुणे सोडतांना मला समक्ष भेटून म्हणाले की, तुम्ही तुमच्या उच्चपदस्य मित्रांच्या कानावर ही गोष्ट घातली पाहिजे. मी त्यांना म्हटले की, ही गोष्ट आमच्या उच्चपदस्थ मित्रांच्या ध्यानांत आली असेलच. नसल्यास मी या क्षेत्रांतला अनभिज्ञ असल्यामुळे त्यासंबंधी काहीही बोलणे अयोग्य ठरेल. शिक्षणमंत्री व शिक्षणसचिव यांच्याहि लक्षांत ही गोष्ट आली नसेल तर मी म्हणेन यांतून कसलाही मार्ग निघणे शक्य नाही. याहि आमच्या चर्चेस एक वर्ष लोटले, नळदुर्गकारांसारखेच मत प्रिन्सिपॉल जुन्नरकर, भाण्डारकर इत्यादिकांचे दिसले, टेक्निकल एज्युकेशनच्या क्षेत्रांतील काही मंडळींनी मुंबईस माझी गांठ घेऊन सांगितले की व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिट्यूट या महाविद्यालयाच्या शिक्षणाचा दर्जा फार खालावला यांस कारण वरील व्यक्तीच होय. हे मुंबईतील महाविद्यालय पूर्वी नावाजलेले होते. परंतु पुष्कळसे चांगले मुंबईतील विद्यार्थीदेखील त्या महाविद्यालयाऐवजी सांगली, कराड, पुणे येथील इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये प्रवेश मिळविण्यास अडचणी सोसूनही तयार असतात हे मला माहीत आहे.

वरील व्यक्तीचा सेवानिवृतीचा महिना जवळ येऊन ठेपला आहे. अशावेळीं त्यांच्या नोकरीची मुदतवाढ झाल्यास फार टीका होईल असे दिसते म्हणून मी आपणांस हे मुद्दाम लिहीत आहे.

(२) मी नागपुर येथे निवडणूक प्रचाराकरिता गेलो होतो. येथे जे ऐकले त्याचे सार खालीलप्रमाणे आहे :

नागपूर विद्यापीठाच्या नुकत्याच झालेल्या कुलगुरू निवडणुकीच्या वेळी सरकारी नोकर असलेले पिन्सिपॉल वि. भि. कोलते यांना निवडणुकीचे उमेदवार म्हणून उभे राहण्यास महाराष्ट्र सरकारने परवानगी दिली. याबद्दल अत्यंत मूलगामी आक्षेप घेतला जात आहे, तो असा की, स्वायत विद्यापीठाला एक सरकारी खाते बनवून त्यांत विद्यापीठाची स्वायतता अप्रत्यक्षरीत्या नष्ट करण्याचा डाव महाराष्ट्र सरकारच्या शिक्षणखात्याने व महाराष्ट्र सरकारने या रीतीने म्हणजे खात्यांतल्या नोकराला नागपूर विद्यापीठाच्या मुख्य पदावर निवडून आणण्याच्या प्रयत्नाने रचला व तो हाणून पाडला गेला. या बाबतींत प्रत्यक्ष जबाबदार सध्यांचे डायरेक्टर ऑफ एज्युकेशन होत असा निर्देश केला जात आहे. आणि असेही म्हटले जात आहे की, - "Heads of the Departments should not be given extension" या नियमाला अपवाद गतवर्षी केला व यंदाही केला जाणार आहे. सरकारचे नियम मंत्री आपल्या लहरीप्रमाणे वाकवूं लागले आहेत अशी चर्चा पुणे, मुंबई, नागपूर येथे उच्च स्थानावरील अधिकारी-वर्गात जोरात सुरू आहे. व ही टीका बिनसरकारी सार्वजनिक महत्त्वाच्या व्यक्तिंच्याही गटांत पसरली आहे व त्यांतून अनेक दुष्ट हेतूंचाही आरोप होत आहे.

हे वरील सर्व मी लिहूं नये किंवा प्रत्यक्ष सांगूही नये व जे जे होईल ते ते उभे राहून पाहावे

असे मनांत आले असूनही केवळ मित्रमंडळी मंत्रीपदावर आहेत अशा स्थितीत काही न बोलणे हेही कदाचित अयोग्य ठरेल अशा संभ्रमावस्थेत मी हे आपणांस पत्र लिहिले आहे.

अतिक्रमाबद्दल पुनः क्षमा मागतो.

कळावे. ही विनंती.

आपला,

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

ooo

## प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** फोन न. ६
विश्वस्त व अध्यक्ष वाई (जि. सातारा)

जा. क्र. ३४३\६१६२\५९ ता. १३-३-६२.

**प्रिय श्री यशवंतराव चव्हाण**

यांस- स.न.वि.वि

आपणास फार काम आहे. त्यामुळे आपणांशी बोलण्यास स्वतंत्र वेळ मिळेल की नाही याबद्दल खात्री नव्हती म्हणून हे पत्र लिहिले आहे. समक्ष बोलताना थोड्या वेळात पुष्कळ गोष्टी मोकळेपणानें बोलता येतात, तसे लिहिण्याचे नसते. परंतु अपरिहार्य वाटले म्हणून लिहिले आहे.

१) महाराष्ट्राला जणूं काय ईश्वरी संकेत असावा अशा प्रकारचें राजकीय स्थान या तीन वर्षातील घडामोडींनी व विशेषतः अखेरच्या निवडणूक निकालाने प्राप्त झाले आहे. शिखरावर वस्तू फार वेळ टिकाव धरू शकत नाही असे म्हणतात. परंतु एका शिखरावरून अधिक वरच्या शिखरावर जाण्याचा प्रयत्न सुरू झाला तर मात्र वस्तू पहिल्या शिखरावरून खाली घसरत नाही.

महाराष्ट्र काँग्रेस हा भारतीय काँग्रेसचा आता बालेकिल्लाच बनत आहे. महाराष्ट्र काँग्रेसच्या या बालेकिल्ल्यातून तीन कर्तव्ये पार पडणे आवश्यक आहे. १) भारतातून फुटून पडण्याच्या दक्षिणेतील चळवळीला पायबंद अप्रत्यक्षपणे घालणे. २) दक्षिण व बंगालमधून आंतरराष्ट्रीय कम्युनिझमला हटविणे ३) उत्तरेतील जातीवादी व प्रतिगामी प्रवृत्तीचा तेजोभंग करणे.

डॉ. अबासाहेब खेडकर यांनी महाराष्ट्रात प्रदेश काँग्रेसला अविश्रांत काम करून संघटित चांगले रूप दिले. आता त्यांनी निर्माण केलेल्या या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र काँग्रेसने यापुढे अधिक उच्च स्तरावरील कार्यक्षमता दाखविणे शक्य आहे व आवश्यक आहे. कार्यकर्त्यांची वैचारिक किंवा बौद्धिक तयारी करण्याचे बाबतीत जी प्रयत्नशीलता अबासाहेब खेडकरनी यांनी दाखविली. ती अत्यंत अनपेक्षित होती. श्री. भाऊसाहेब नेवाळकरांच्या प्रचार प्रकाशन कार्यालयाला अबासाहेबांनी फार उत्साहाने पाठिंबा दिला. परंतु जिल्हा काँग्रेस वा तालुका काँग्रेस किंवा मंडळ काँग्रेस या संघटनेच्या शाखांनी पुष्कळ ठिकाणी तयार झालेल्या उत्कृष्ट प्रचार साहित्याची पोस्टाने आलेली पुडकी न फोडता किंवा न वाटता तशीच कोपऱ्यात पडू दिली असे वारंवार दिसून आले हे मात्र खेदास्पद झाले.

२) कोल्हापूर विद्यापीठाच्या यशस्वी प्रारंभ व संचलन याबाबतीत महाराष्ट्रात उलटे सुलटे पुष्कळ तर्कवितर्क सुरू आहेत. आपण मराठवाड्यातील स्थानिक राजकारणाच्या व राजकारणी मंडळाच्या तडाख्यात व गोंधळात मराठवाडा विद्यापीठ सापडू नये म्हणून जी दूरदर्शी दक्षता घेतली तसेच कोल्हापूर विद्यापीठाच्या बाबतीत घ्याल अशी अपेक्षा आहे.

मेजर जनरल थोरात किंवा प्राचार्य सुमंत मुरंजन (मुंबई) ही नावे व्हाईस-चॅन्स्लेर पदाकरिता सुचवावीशी वाटतात. श्री. थोरात यांच्यावर आपण दुसरी महत्वाची कामगिरी सोपविली आहे हे खरे, परंतु अत्यंत कटकटीच्या, परस्परविरोधी गटांनी कायम ठाण बांधून कोल्हापुर शहरात केवळ शैक्षणिक ध्येय व कार्य यावर एकाग्र मन झालेला कणखर माणुसच शिवाजी विद्यापीठाचा खंबीर पाया रचूं शकेल. मराठवाड्यापेक्षा निराळी, फारच गोंधळात टाकणारी अशी कोल्हापूरची परिस्थिति आहे. शिवाजी विद्यापीठ समितीचे अध्यक्ष हे सज्जन परंतु भोळे गृहस्थ आहे. तथे मोठ्या माणसाचे काही चालणार नाही. डॉ. पवार यांचे नांव घेतले जाते परंतु त्यांना ते जमेल असे त्याच्या अलीकडच्या कारकीर्दीवरून वाटत नाही. अशा कार्याची जबाबदारी झेपणारा पुण्यात एक उत्तम मनुष्य दिसतो म्हणजे प्रा. दि. धों. कर्वे. परंतु कोल्हापूरच्या परंपरेशी यांचे नांव जमणारे नाहीं. हा मुद्दा झाला विद्यापीठाचे धोरण मजबूत राखणाऱ्या जागेसंबंधी.

दुसरे असे की, प्रो-व्हाईस चॅन्सेलर किवा रेक्टर हे स्थान प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. काही मंडळी प्रा. गोवर्धन पारीख यांचे नांव घेतात. परंतु मुंबई विद्यापीठाची त्यांची जागा भरून काढील असा माणूस अजून दिसत नाहीं, काहीजण प्रा.ए.बी.शाह, मुंबई यांचे नांव व काहीजण डॉ. भास्करराव पाटील, सातारा यांचे नाव सुचवितात. डॉ. भास्करराव पाटील हे भौतिक विज्ञानाचे उत्तम पंडित आहेत. त्यांच्याकडे विद्यापीठाची विज्ञानशाळा सोपविणे अधिक चांगले. कारण दैनंदिन प्रशासनाचा पसारा संभाळताना विद्या मलीन होते, तेजस्वी राहत नाही.

३) गोमांतकामध्ये उद्योगपती चौगुले हे कॉलेज काढू इच्छितात. पुणे विद्यापीठाने त्यास मंजुरी दिली आहे. श्री. चौगुले तेथे एक मराठी दैनिक काढीत आहेत. त्याकरिता श्री.बा.द. सातोस्कर, मुंबई यांची संपादक म्हणून नेमणूक झाली. ते आपली गांठ घेणार होते. घेतली असेलच. मुंबई येथील काहीं मंडळांनी गोवा एज्युकेशन सोसायटी स्थापन करून मुंबई विद्यापीठाकडे कॉलेजची मागणी केली आहे. सध्या काही वर्ष दोन कॉलेज चालणार नाहीत. एकच कॉलेज सध्या चालू शकेल. मुंबईची गोवा एज्युकेशन सोसायटी श्री. चौगुले यांच्या कॉलेजइतके कार्यक्षम कॉलेज काढू शकेल अशी तिची स्थिती नाही. विशेषतः श्री. चौगुले हे महाराष्ट्रवादी असल्यामुळे त्यांचे हात बळकट करणे हे आवश्यक आहे. म्हणून गोवा एज्युकेशन सोसायटीची मागणी सध्या मान्य न झालेली बरी. शिक्षणखाते त्यांच्याकडे आता गेले आहे. त्यांच्याशी या गोष्टी मी बोलू शकत नाहीं म्हणून मी हे आपणास मुद्दाम

लिहिले आहे.

४) मुंबईच्या बेस्ट कंपनीचे डेप्युटी जनरल मॅनेजर इंजिनियर श्री. गो. वि. कर्वे यांनी मला प्रत्यक्ष भेटून आपल्या कानावर काही गोष्टी घालण्यास सांगितले. त्यातील काही मुद्दे असे - श्री. जोशी, जनरल मॅनेजर यांची सेवेची मुदत संपली असून त्यांच्या जागी महाराष्ट्र सरकार नवीन मनुष्याची नेमणूक करण्याची शक्यता आहे. मुंबईचे कलेक्टर श्री. अभ्यंकर आय. ए. एस. यांचे नाव ऐकू येते. श्री. अभ्यंकर हे श्री. कर्वे यांच्यापेक्षा लहान आहेत. त्यांचे वेतन कर्वे यांच्यापेक्षा हजार रुपयांनी कमी आहे. मुळ मुद्दा असा की बेस्ट कंपनींना गुंतागुंतीचा व्यवहार व कारभार समजून घेण्यातच त्यांची दीड-दोन वर्षे निघून जातील. श्री. जोशी यांच्यासारखा वयस्क आय.सी.एस. अधिकारी त्यांना अधिक बरा वाटेल. परंतु त्यांची मुख्य मागणी अशी आहे कीं, महाराष्ट्र सरकारने बेस्ट कंपनीला श्री. जोशी यांच्या जागी कोणी मनुष्य जर नेमला नाही तर मुंबई महापालिका श्री. कर्वे यांस श्री. जोशी यांच्या जागी नेमू शकेल. श्री. कर्वे यांची कार्यक्षमता व कामगार वर्गाशी असलेला स्नेहसंबंध लक्षात घेता त्यांची ही बढती अधिक उपयुक्त ठरेल असे मला वाटते. बेस्ट कंपनीच्या कार्यात इंजीनियरिंग चे कार्यही अत्यंत महत्त्वाचे असते.

५) महाराष्ट्र विधानपरिषदेच्या नेमणुका व निवडणुका व्हावयाचा आहेत. श्री. माधवराव बागल, श्री. अकर्ते यांच्यासारखी नुकत्याच झालेल्या निवडणुकीत उपयुक्त कामगिरी बजावलेल्या व्यक्ती व प्रा. महाजन (जळगाव) यांच्यासारखे अर्थशास्त्रासारख्या विषयातील तज्ज्ञ वाक्‌चतुर आणता आले तर चांगले होईल.

माझ्याकडे खालील व्यक्तीबद्दल महाराष्ट्रातील अनेक महत्त्वाच्या व्यक्तीकडून वारंवार शिफारिशी आल्या आहेत त्या म्हणजे:-

अ) श्री. ए. पी. कुलकर्णी, बी. ए. एल. एल. बी. (धुळे). सहकारी चळवळीत ३० वर्षे काम करीत असलेले गृहस्थ.

ब) सौ. यमुनाबाई हिर्लेकर, एम. ए. (मुंबई) यांनी इंग्रजीमध्ये पश्चिम जर्मनीची शिक्षणपद्धती व इतर विषयावर इंग्रजी व मराठी ग्रंथलेखनही चांगले केले आहे. मुंबईतील पांढरपेशा वर्गातील प्रसिद्ध महिला.

क) ॲडव्होकेट श्री. जगन्नाथराव अकर्ते (अमरावती). यांना प्रत्यक्ष विधानसभेच्या द्वारे निवडून द्यावे अशी त्यांची उत्कट प्रार्थना आहे. त्यांना पदवीधर मतदारसंघ वगैरेतर्फे निवडून येण्याची आशा कमी आहे.

ड) ॲडव्होकेट श्री. वांद्रे (खामगाव).

इ) सौ. कमलाबाई ठाकूर, बी.ए (अमरावती). यांचे पती श्री. टी. एस. ठाकूर (अमरावती) वकील आहेत. हे दोघेही पतीपत्नी फार जुने काँग्रेस कार्यकर्ते आहेत. सौ. कमलाबाई या चांगल्या सामाजिक कार्यकर्त्या असून गेली सात वर्षे त्या समाजकल्याणविभाग अमरावती,

जिल्हा या संस्थेच्या अध्यक्ष म्हणून काम करीत आहेत आबासाहेब खेडकर त्यांना ओळखतात.

(६) श्री. बा. रं. सुंठणकर (बेळगाव). यांचा आपला चांगलाच परिचय आहे. ते माझे जुने मित्र आहेत. त्यांच्या पत्राची प्रत सोबत आपल्या अवलोनार्थ पाठवीत आहे.

(७) मराठी साहित्य महामंडळ व महाराष्ट्र राज्य भाषा मंडळ यांनी आतां शुद्धलेखनासंबंधी काही एक निर्णय केला आहे. तो निर्णय अंमलांत आणून त्याप्रमाणे महाराष्ट्र सरकारने तो त्वरित कार्यान्वित, करण्यात पुढाकार घेणे आवश्यक आहे असे महामंडळाचे सदस्य काकुळतीने सांगत आहेत. या संबंधांत माझ्याकडे श्री. दि. के. बेडेकर, पुणे यांच्याकडून आलेल्या पत्राची प्रत व महामहोपाध्याय द.वा. पोतदार, कुलगुरू, पुणे विद्यापीठ यांनी भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य यांना लिहिलेल्या पत्राची प्रत आपल्या अवलोकनाकरीतां सोबत पाठवीत आहे.

कळावे. ही विनंती.

आपला,

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

सोबत:

वरीलप्रमाणे.

ooo

यशवंतराव चव्हाण

मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मुंबई

सी. एम./एस्.पी./४५/८

सचिवालय, मुंबई २२

दिनांक- १२ एप्रिल १९६२

**प्रिय लक्ष्मणशास्त्री जोशी यांस,**

**स.न.वि.वि**

आपलें दिनांक १२ मार्च चे पत्र मिळाले. माझ्या कार्याच्या वाढत्या व्यायामुळे आपणांस मोकळेपणाने बोलण्याचा योग फारसा येत नाही. तथापि मधून मधून पत्रद्वारे आपण आपले विचार मला कळण्याची जी तत्परता दाखविता, ती बद्दल मी आपला आभारी आहे. आपले पत्रलेखन मला प्रकट चिंतनासारखे वाटते. पत्र वाचतांना प्रत्यक्ष भेटीइतका जरी नसला तरी जवळ जवळ तशा प्रकारचा आनंद मला होतो. आपले पत्र विस्तृत असल्यामुळे सर्वच मुद्द्यांचा परामर्ष या पत्रांत घेणे मला शक्य नाहीं. तरी त्यांतील मुख्य मुख्य मुद्यासंबंधाने माझी प्रतिक्रिया अथवा माझे विचार या पत्राद्वारे मी आपणांस (आपल्या पत्रांतील परिच्छेदांच्या क्रमाने) कळवीत आहे.

(१) 'शिखरावरील वस्तू' चा दृष्टांत हृद्य वाटला. महाराष्ट्र काँग्रेसच्या घवघवीत यशामुळे तिच्यावर स्वाभाविकपणे येऊन पडलेली जबाबदारी, व भारतीय संघटनेच्या व्यापक भूमिकेवरून तिला पार पाडावयास लागणारी कर्तव्ये, यासंबंधीचे आपले विचार कळले. कार्यकर्त्यांची वैचारिक अथवा बौद्धिक तयारी करण्याचे अधिकाधिक प्रयत्न होणे अगत्याचे आहे, त्या आपल्या विचाराशी मी सहमत आहे. संघटनेच्या कित्येक शाखांनी आलेल्या प्रचार साहित्याचा उपयोग केला नसल्याचे जे आपण कळविलें, ते वाचून खेद झाला. खरोखर ही गोष्ट मोठ्या प्रमाणावर घडली असल्यास आश्चर्य करण्यासारखी आहे.

(२) होऊ घातलेल्या कोल्हापूर विद्यापीठाबाबतचे आपले विचार व तत्संबंधी दक्षता घेण्याबाबतची आपण केलेली सूचना कळली.

(३) गोमांतकांत श्री. चौगुले हे काढू इच्छित असलेले कॉलेज व गोवा एज्युकेशन सोसायटीने संकल्पिलेले कॉलेज या दोहोंबाबतच्या विनंत्यांना मान्यता मिळालेली आहे.

(४) व (५) मजकूर समजला. तत्संबंधींची आजची परिस्थिती आपणांस ज्ञात आहेच असे मी समजतों.

(६) श्री. बा. रं. सुंठणकर यांनी आपणांस पाठविलेल्या पत्राची प्रत पाहिली. श्री. सुंठणकर यांनी मला गेल्या महिन्यांत जे अभिनंदनपर पत्र पाठविले होते, त्यांत त्यांनी या प्रश्नाचा उल्लेख केला होता. सीमाप्रश्नासंबंधाने मी जागरूक असून तो घटनात्मक मार्गाने

समाधानकारकपणे सुटावा या बाबतीत मी प्रयत्नशील असल्याचे मी त्यांना उत्तरादाखल लिहिलेल्या पत्रांत कळविले आहे.

(७) मराठी शुद्धलेखनासंबंधीच्या प्रश्नाबाबत श्री. दि. के. बेडेकर यांनी आपणांस लिहिलेल्या पत्राची आपण पाठवलेली प्रत व महामहोपाध्याय द. वा. पोतदार यांनी भाषा संचालकांना लिहिलेल्या पत्राची प्रत हीं दोन्हीं पाहिली. भाषा संचालकांशी या बाबतीत मी चर्चा करणार आहे.

अगत्यपूर्वक लिहिल्याबद्दल पुन्हा एकवार आभार.

कळावे

आपला

(स्वाक्षरी)

**यशवंतराव चव्हाण**

**तर्कतीर्थ श्री लक्ष्मणशास्त्री जोशी**

वाई

ooo

## प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी | फोन नं. ६
विश्वस्त व अध्यक्ष | ता. ४-५-६२.
जा.क्र. ४०३/६१.६२/५९ | वाई (जि. सातारा)

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण -**

यांस - स.न.वि.वि.

सत्ताविकेन्द्रीकरणाचे हे पहिले पाऊल पडत आहे. हा पहिला टप्पा गाठत असतां सत्ताविकेन्द्रीकरणाचा आर्थिक पायाही रचला जाईलच. या आर्थिक पायाचा तपशील पंचवार्षीय नियोजनांच्याद्वारे सर्वसामान्य रूपाने निश्चित होतो. आर्थिक स्वयंपूर्णता हे उद्दिष्ट पुढे ठेवणे जरूर आहे. स्वयंपूर्ण ग्राम ही गांधीवादी कल्पना आहे; व ती आधुनिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यापक देवघेवीच्या काळाशी विसंगत ठरतें; हे जरी खरे असले तरी स्थानिक स्वयंपूर्णतेला अर्थशास्त्राची नवी कल्पना लागू करावी. ती अशी कीं, - त्या त्या स्थानिक क्षेत्रांत (AREA) वा स्थानिक विभागांत ज्या प्रकारच्या आर्थिक उत्पादनास नैसर्गिक व अन्य परिस्थिति पूर्ण अनुकूल असेल तेंच आर्थिक उत्पादन स्थानिक वाढत्या जीवनमानास पुरेसे मूल्य उत्पादन करणारे व्हावे. उदा. कापूस, ऊस, तंबाकू, द्राक्षे किंवा दुसरे काही जे जे उत्पन्न तेथे होत असेल ते ते वाढत्या जीवनमानास पुरेसे मूल्य देणारे व्हावे. स्थानिक आर्थिक स्वयंपूर्णता हा उद्देश अनेक जिल्ह्यांना अंमलात आणणे अशक्यप्रायही होईल. परंतु तो शक्य कोटीत आणणे ही गोष्ट देशाचा प्रदेशांचा व प्रदेशांतील सर्व विभागांचा समतोल विकास साधण्यास प्रेरक ठरेल. खेड्याकडून मध्यम गावाकडे व मध्यम गावाकडून मोठ्या शहराकडे लायक व कर्तबगार लोकांचा प्रवाह वाढत असून ग्रामीण विभागाची पिछेहाट व्यस्त प्रमाणांत चालूं आहे. तिचा वेग वाढू देता कामा नये यांस स्थानिक स्वयंपूर्णतेचे (आधुनिक अर्थाचं) ध्येय जिल्हामंडळांच्या व पंचायत समितींच्या पुढें ठेवणे जरूर आहे.

२. आर्थिक नियोजन असो, अथवा त्यापुढचे स्वयंपूर्णतेचे उद्दिष्ट असो त्याकरितां तपशीलवार समालोचन (SURVEY) गांववार व तालुकावार, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक इत्यादि सर्व बाजूंनी आकडेवारीने व जमातवारीने व्हावयास पाहिजे. नियोजन व समालोचन यांची सांगड सतत अबाधित ठेवणें आवश्यक आहे.

३. फार मोठ्या संख्येचे विकेन्द्रित लोकशाहीचे नेते मानधन किंवा वेतन घेऊन कामे करू लागणार. त्यांच्या कर्तबगारीच्या वाढीचें व परीक्षेचें जिल्हा मंडळे व पंचायत समित्या साधन ठरणार आहेत. प्रत्यक्ष कार्याचा उठाव हेच कर्तबगारीचे मोजमाप देणारे.

या मंडळींना व्यावहारिक (PRACTICAL) आणि तात्त्विक (THEORETICAL ) असें ज्ञान देण्याची कायम स्वरूपाची व्यवस्था होणे आवश्यक आहे. कर्म व ज्ञान यांची जोडी

(गीतारहस्याच्या परिभाषेप्रमाणे ज्ञानकर्मसमुच्चय) पक्ष्याच्या दोन पंखांप्रमाणे उपयोगी पडते. श्रीमती इंदिरा गांधी यांच्याकडून आपण उद्घोषित केलेली मानवसंस्कृति संस्था (INSTITUTE OF HUMAN CULTURE) ही संस्था कार्यवाहीत आणण्याची ही योग्य संधी आहे. या संस्थेच्या द्वारे समालोचन ( SURVEY ) आणि शिक्षण या दोन्हीं गोष्टी चालविता येतील. प्रा. ए. बी. शाह यांनी यासंबंधी तपशीलवार योजना केली आहे.

या मानवीसंस्कृति संस्थेच्या कार्याचें क्षेत्र मुंबई, पुणे, कोल्हापूर, नागपूर, औरंगाबाद वगैरे ठिकाणी चालू शकेल. परंतु लोक शिक्षणाकरिता शहरात आले म्हणजे त्याचे लक्ष अध्ययनाकडे कमी राहते म्हणून वाई, महाबळेश्वर यासारखेच ठिकाण शिक्षण व अध्ययन यास अधिक अनुकूल आहे. मात्र या ठिकाणी इमारत बांधावी लागेल. सध्या बरॅकवजा किंवा अधिक प्रतिष्ठित शब्दांत आश्रमशैलीच्या इमारती मोकळ्या नैसर्गिक परिसरात अल्पखर्चात होऊ शकतील. एका वेळी ५० पेक्षा अधिक विद्यार्थी असू नयेत. अधिक विद्यार्थ्यांमुळे विचारविनिमय तपशीलवार होणे अशक्य होते.

४. कोल्हापूर विद्यापीठाबद्दल मी मागे लिहिले होते. श्री. थोरात, श्री. मुरंजन, श्री. दि. धों. कर्वे ही नाव मी कुलगुरुपदाकरिता सुचविली होती. नवीन अधिक नावे डोळ्यासमोर येतात. राजस्थान पब्लिक सर्व्हिस कमिशनचे अध्यक्ष रँग्लर नारळीकर हे मुळचे कोल्हापूरचे. भारतातील उच्च श्रेणीतील विज्ञानवेत्ते. बाळासाहेब खर्डेकर उमद्या स्वभावाचे व शिक्षणक्षेत्रांत पुष्कळ वर्षे काम केलेले. कोल्हापूरच्या विशिष्ट परिस्थितींत त्यांच्या नेमणूकीने वातावरण ठीक राहण्यास मदत होण्याची शक्यता आहे. परंतु त्यांचा स्वभाव मऊ आहे. कार्यवाहीकरितां करड्या स्वभावाचा उपकुलगुरू (PRO VICE- CHANCELLOR ) पाहिजे.

महाराष्ट्र राज्यांतील तंत्रशिक्षणाचे संचालक (DIRECTER OF TECHNICAL EDUCATION) बदलून नवे त्वरित येणे जरूर आहे. या क्षेत्रांत सध्याच्या व्यक्तीमुळे प्रगति फार मंद गतीने झाली आहे असे या क्षेत्रातले महत्त्वाचे तज्ज्ञ गेली अनेक वर्षे बोलत आहेत.

६. पुणे येथील असून रुग्णालयांतील काही शाखाप्रमुख सर्जन एकमेकांच्या व स्वतःच्या हाताखालच्यांच्या विरुद्ध कारवाया करतात. नुकतीच अशी एक घटना घडली. हे रुग्णालय महाराष्ट्राची फार जुनी व मान्यतेस पावलेली संस्था आहे. या संस्थेकडे आपण अधिक लक्ष देत असालच.

कळावे. ही विनंती.

आपला,
(स्वाक्षरी)
**लक्ष्मणशास्त्री जोशी**

मान. श्री. यशवंतराव चव्हाण,
मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य,
मुंबई - ६.

○○○

यशवंतराव चव्हाण
मुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य, मुंबई

दिनांक २२ मे, १९६२

स.न.वि.वि.

आपले दिनांक ९ मे चे पत्र मिळाले. सत्ताकेंद्रीकरणाच्या अनुषंगाने जे विचार आपण व्यक्त केले, ते समजले. जिल्हा मंडळे व पंचायत समित्या यामध्ये प्रत्यक्ष कार्य करण्याऱ्या लोकनियुक्त प्रतिनिधींना व्यावहारिक आणि तात्विक असे ज्ञान देण्याची कायम स्वरुपाची व्यवस्था होणे आवश्यक आहे, हे मला मान्य आहे. कर्म व ज्ञान यांना पक्ष्यांच्या दोन पंखांची उपमा आपण दिली ती सुंदर व समर्पक वाटली. मानव संस्कृती संस्थेची कल्पना चांगली आहे असे मला वाटते. तंत्र शिक्षणाच्या संचालकाचे जागी योग्य त्या व्यक्तीची जी योजना करण्यात येत आहे. पुणे येथील ससून हॉस्पिटलशी संबंधित अर्थमंत्री श्री. बर्वे हे जातीने लक्ष घालीत आहेत.

कळावे

आपला,
(स्वाक्षरी)
**यशवंतराव चव्हाण**

तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी,
अध्यक्ष, प्राज्ञपाठशाळा मंडळ,
वाई (जि. सातारा)

○○○

## प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** फोन नं. ६
विश्वस्त व अध्यक्ष वाई (जि. सातारा)

जा.क्र. ३६३/६२.६३/५९ ता. १५-४-६२.

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण -**

यांस- स.न.वि.वि

सगळ्याच महाराष्ट्रात नवीन जिल्हा परिषदांच्या निर्मितीबद्दल जोरात वाटाघाटी सुरू आहेत. हीच गोष्ट आपल्या सातारा जिल्ह्यासही लागू आहे.

राजकीय ध्येयावाद म्हणजे लोकशाही समाजवाद त्यांत अनेक वर्षे मुरला आहे. अशा सुशिक्षित व्यक्तीच्याच कर्तबगारीने जिल्हा परिषदा यशस्वी होऊ शकतील. अशा आपल्या जिल्ह्यातील व्यक्तींमध्ये श्री. विठ्ठलराव जगताप यांचे नाव महत्त्वाचे ठरते हे आपणांस मी सांगावयास नको. श्री. विठ्ठलराव जगताप यांचे नाव योग्य आहे असे किसन वीर यांचेही मत आहे. ते आपणाशी त्यासंबंधी समक्ष बोलणार होते.

वाई येथील सध्याचे पोलीस सब-इन्स्पेक्टर श्री. एम. आर. खलवट्टेकर यांची या भागातील कामगिरी व कारकिर्दी येथील नागरिकांच्या मनात अत्यंत पटणारी अशी झाली आहे. अनेक वर्षांनी खूप प्रसिद्ध व समाजकंटक गुन्हेगार त्यांनी वठणीवर आणले आहेत. त्यांच्यासंबंधी अधिक चौकशी करता असे समजते की, शिराळ्या पेट्यात असताना तेथील फार महत्वाचे कुप्रसिद्ध गुन्हेगार श्री. दादू पाटील व श्री. शंकर पाटील यांना त्यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून ताब्यात घेतले व त्या भागातील सार्वजनिक संकट नाहीसे केले. त्याबद्दल त्या भागातील लोकांनी ५०० रु. चे पारितोषिक दिले. ''राष्ट्रपतींचे पोलीसपदक'' यांना मिळावे म्हणून गेल्या वर्षी शिफारस पोलीस खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केली आहे असे चौकशी केली असतां कळले.

आपण या संबंधात स्वतः लक्ष घालावे असे वाटते.

कळावे. ही विनंती.

आपला,
(स्वाक्षरी)
**लक्ष्मणशास्त्री जोशी**

श्री. यशवंतराव चव्हाण,
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

○○○



वाय १८५-२३

# प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** फोन नं. ६
विश्वस्त व अध्यक्ष वाई (जि. सातारा)

जा.क्र. ४५३ -६२-६३-५९. ता. ४-६-१९६२

(सोमवार)

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण यांस-**

स.न.वि.वि.

१) काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांच्या स्तरांमध्ये असलेल्या दोन गटांत सध्या अंतस्थ रस्सीखेच किंवा सत्तास्पर्धा बळावली आहे असे म्हणतात. या दोन गटांना उजवा गट व डावा गट असेंही म्हटले जाते. पंडित जवाहरलाल नेहरूंची प्रकृती मुळापासून ढासळूं लागली आहे. त्यामुळे या सत्तास्पर्धेच्या हालचालींना स्पष्ट स्वरूप येत चालले आहे असेही म्हणतात.

ध्येयवादाच्या दृष्टीने काँग्रेसमध्ये तरी डावा-उजवा अशी पक्की विरोधी तटबंदी निर्माण होण्यासारखी वैचारिक परिस्थिती आणि नियोजन कालखंडात राहिलेली नाही. लोकशाही समाजवाद असे ध्येयसूत्र सामान्यपणे तथाकथित उजवे व डावे मान्य करून नियोजनाचा कार्यक्रम आखित आहे व त्याची अंमलबजावणी करीत आहेत. सामाजिक समतोलपणा बिघडून सामाजिक संघर्ष विकोपास नेण्याइतका डावा व उजवा यांच्या विरोधी काँग्रेसमध्ये नाही. याचे कारण लोकशाही तंत्र व लोकशाही शक्तींचा दबाव पुरोगामी कार्यक्रमाला उपयोगी पडत आहेत, अशी काँग्रेसची मूलभूत श्रद्धा आहे. त्यामुळे ध्येयवादविषयक संघर्ष विकोपास जाऊ शकत नाहीत. डावा ध्येयवाद उजव्याच्या कोंडीत सापडून अगतिक झालेला नाही, म्हणून डाव्या व उजव्या विचारसरणीमध्ये तडजोड किंवा समन्वय आपोआप घडतो. म्हणून अंतर्गत सत्तास्पर्धेला ध्येयवादविषयक सबळ कारणे नाहीत. सत्तामिलाप हेच बहुदा त्या वाढत्या स्पर्धेला महत्त्वाचे कारण संभवते.

उजवा भांडवलशाही गट व डावा कम्युनिस्ट सहयोगी लोकांचा गट (मेनन गट) यांच्यापैकी कोणती बाजू अधिक पसंत करावी असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. उजवी हुकूमशाही की डावी हुकूमशाही असा पेंच या प्रश्नाने सूचित केला जात आहे. परंतु असे दोनच पर्याय शिल्लक आहेत, अशी अगतिक संकटमय परिस्थितीत सध्याचे भारतीय राजकारण सापडले आहे असे कसे म्हणता येईल? नेहरूंनंतर ही स्थिती येईल व नेहरू हे

किती दिवसांचे सोबती आहेत हे सांगता येत नाही, असे बोलले जात आहे.

केवळ एका नेत्याच्या वैयक्तिक जीवनाच्या कण्यावर कॉंग्रेस संघटनेचे भवितव्य अवलंबित आहे, असे यामधील गृहीतकृत्य आहे. वैयक्तिक एखाद्या महान व्यक्तीच्या जीवनावरच एखादे देशव्यापी भवितव्य अवलंबून असते असें मानण्यानें भारत हे राष्ट्र किंवा हा समाज स्वत:च्या भवितव्याचे नियंत्रण करणारे व्यक्तीनिरपेक्ष नैतिक साधन किंवा संघटना अजून निर्माण करण्याइतका प्रौढ व प्रगत झाला नाहीं, असें म्हणावे लागेल. विशिष्ट व्यक्तीच्या क्षणभंगुर जीवनावर राज्याचे व राष्ट्राचे भवितव्य अवलंबून राहणे हे काहीं चांगले लक्षण नव्हे.

फूट पडण्याचे कॉंग्रेसवर हे तिसऱ्यांदा संकट येत आहे. लो. टिळकांच्या वेळीं सुरत कॉंग्रेसच्या प्रसंगी हे संकट पहिल्यांदा आले परंतु त्यानंतर कॉंग्रेस अधिक सामर्थ्यशील झाली. कारण अधिक विशाल ध्येयवादाला कॉंग्रेसनें आत्मसात केले. विरोधी गट बाजूला पडला व नामशेष झाला. असहकारितेच्या चळवळीनंतर गांधीयुगात फेर ना फेर माजवून शकले होण्याचा प्रसंग आला. परंतु फेर ना फेर वादाला अजिबात बगल देणारी नवी विशाल आंदोलने गांधींनी उभारली व कॉंग्रेस देशव्यापी आंदोलन बनले. आता पुन: नेहरूंच्यानंतर काय ? उजवी हुकूमशाही की डावी हुकुमशाही ? या प्रश्नाला अजिबात बगल देऊन आणि वरिष्ठ पातळीवरील गटबाजीला व क्षुद्र सत्तास्पर्धेच्या बाजूला फेकून कॉंग्रेसला नवे रूप, अधिक व्यापक व शक्तिशाली रूप कसे येईल हा प्रश्न सुटला पाहिजे. लोकशाही समाजवाद या ध्येयसूत्राला अधिक मजबूत बनवील असा कार्यक्रम संघराज्याच्या व प्रादेशिक राज्यांच्या पातळीवर अंमलांत आणण्यात गुंतली पाहिजे.

२) आपणांस माहीतच आहे की, वाई येथे दे. भ. श्री. किसन वीर, श्री. विठ्ठलराव जगताप इत्यादिकांच्या पुढाकाराने महाविद्यालय चालू करण्याचा प्रयत्न सुरू आहे. या महाविद्यालयाच्या संबंधात धडपड करण्यात तीन महिने गेले. पुणे विद्यापीठाने संमती दिली. त्यानंतर वाई महाबळेश्वर रस्त्यावर सोनजाईच्या पायथ्याशीं असलेली कै. डॉ. गोखले यांची सुमारे १३ एकर सपाट जमीन खरेदी केली. या जमिनीवर असलेल्या बरॅकवजा इमारतीचा कॉलेजकरिता तात्पुरता उपयोग करावयाचे ठरले आहे. त्याप्रमाणे त्यात दुरुस्त्याही केल्या. प्राध्यापक व प्राचार्य (Principal) दोन-तीन दिवसात निवडले जातील. त्याकरिता शंभरपेक्षा पेक्षा अधिक अर्ज आले आहेत. चांगले प्राध्यापक कसे मिळतील अशी चिंता इतर ठिकाणी असलेली पाहिली. आपल्याकडे कॉलेज निघणार कळल्यापासूनच चांगले अर्ज येऊ लागले. आता इतक्या अर्जातून निवड कशी करावी, हा प्रश्न सोडवायचा आहे. तो प्रश्न कठीण नाही. परंतु सर्व प्रश्न अडणार तो वित्तविधेयकासंबंधी. त्याकरितां धडपड सुरू आहे.

३) या कॉलेजच्या उद्घाटनाकरिता जूनच्या अखेरच्या आठवड्यात आपण सवड काढावी अशी उत्कट प्रार्थना आहे. कॉलेज तारीख २० जूनला सुरू होणार. तेव्हापासून जूनअखेरपर्यंत केव्हाही सवड काढावी. ८ दिवस अगोदर कळविले तरी चालेल.

कळावे. ही विनंती.

आपला,

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

**माननीय श्री. यशवंतराव चव्हाण,**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य,
मुंबई ६.

ooo

## प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी — फोन नं. ६
विश्वस्त व अध्यक्ष — वाई (जि. सातारा)

जा.प्र. ५६/६२-६३/५९... — ता. २५-८-६२
शनिवार.

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण,**

यांस - स.न.वि.वि.

गोमांतकात २५ वर्षांपूर्वी गेलो होतो. त्यावेळची आठवण काढणारे पुष्कळच लोक भेटले. मला याचे आश्चर्य वाटले. त्यानंतर पुन: गेल्या १७ तारखेस तेथे गोवा शेतकरी परिषदेच्या उद्धाटनाकरिता गेलो. गोव्यातील अनेक महत्त्वाच्या नागरिकांशी सांस्कृतिक व राजकीय निमितांनी माझा स्नेहसंबंध निर्माण झालेला आहे. तेथील अझाद गोमांतक दलातील अनेक देशभक्त रॉयवादी आहेत. त्यांनी फार आग्रह केल्यामुळे मी हे परिषदेचे आमंत्रण स्वीकारले. या निमिताने जुन्या झालेल्या संबंधांना उजळा मिळाला.

श्री. विश्वनाथ लवंदे, श्री. रघुनाथ देशपांडे (कराड) व श्री. दयानंद बांदोडकर यांच्या आग्रहामुळे शेतकरी परिषदेचे निमंत्रण स्वीकारले. श्री. रघुनाथ देशपांडे यांनी तेथे आर्थिक कार्यक्रमाला महत्त्व दिल्यामुळे हे शेतकरी आंदोलन चांगले नावारूपास येऊ लागले आहे. तेथे जाईपर्यंत मला वरील मंडळींच्या पत्रांनी मिळणाऱ्या माहितीवरून तेथे इतकी जागृति झाली असावी हे पटेना. परंतु प्रत्यक्ष पाहिल्यावर समाधान झाले. भर पावसात ६-७ हजार शेतकरी सर्व तालुक्यातून जमा झाले व त्यांनी ८ तासपर्यंत कार्यक्रमात भाग घेतला.

तेथील सर्व समस्याचे सार व परिस्थितीचे दिग्दर्शन पुढीलप्रमाणे सांगता येते -

(१) तेथील समाज व संस्कृती हिंदू व ख्रिश्चन जमातीमध्ये जवळजवळ सारख्या प्रमाणात विभागली गेली आहे. ५२ टक्के हिंदू, ४२ टक्के ख्रिश्चन व ६ टक्के इतर अशी लोकसंख्येची अंदाजी विभागणी आहे. हिंदू व ख्रिश्चन या दोन्ही जमातीत सलोखा दीर्घकाळपर्यंत नांदत आहे. ख्रिश्चन जमातीत अजून जुना जातिभेद जिवंत राहिला आहे. परंतु जमातवाद किंवा जातिवाद याला तीव्र रूप अजून तरी मुळीच आले नाही.

हिंदुधर्म व ख्रिश्चन धर्म यांच्यातील सांस्कृतिक तेजस्वी जीवनाचा जोम मंदिर व चर्च या संस्थांच्या मध्ये प्रतिबिंबित झालेला पाहावयास मिळतो.

(२) आता नुकताच तेथे मराठी विरुध्द कोकणी असा वाद रंगू लागला आहे. या वादाच्या मुळाशी राजकीय हेतुसुद्धा दिसून येतो. श्री. काका कालेलकरांचे अनुयायी विशेषतः राजकीय

हेतूने प्रेरित झालेले आहेत. तेथील अस्थायी समितीचे सदस्य विशेषत: श्री. पुरुषोत्तम काकोडकर हे राजकीय हेतूने प्रेरित होऊन महाराष्ट्रापासून विलग राहण्याकरिता कोकणीला शिक्षण व राज्यभाषेचे रूप देऊ पाहतात.

परंतु तेथील हिंदु पांढरपेशा शिक्षित वर्ग मोठ्या बहुसंख्येने मराठी भाषेला प्राधान्य देत आहेत. शतकानुशतके म्हणजे गेली ४५० वर्षे ज्ञानदेव, तुकाराम, श्रीधर, महीपती, गडकरी, कोल्हटकर इत्यादिकांच्या मराठी साहित्याला, नाटकाला व संस्कृतीला शिक्षित व अशिक्षित अशा दोघांनी जिवंत ठेवले आहे. तेथील उत्सव व जत्रा या प्रसंगी प्रतिवर्षी ७-८ शे मराठी नाटकप्रयोग उल्हासाने अशिक्षित ही  सामान्यजन करीत असतात. ख्रिश्चन समाजातील सुशिक्षितांवर मात्र पोर्तुगीज भाषा व साहित्य यांची खोल छाप आहे.

गोव्यातील हिंदू व ख्रिश्चन यांचा अनेक शतके मुंबईशी निकटचा संबंध आहे. सात लाख गोवेकरांच्यापैकी दीड लाख गोवेकर मुंबईत राहतात. मुंबईतील हिंदू व ख्रिश्चन गोवेकर महाराष्ट्राचाच गोवे हा भाग आहे, या गोष्टीला बहुसंख्येने पाठिंबा देत आहेत. या बाबतीत मुंबईतील कॅथलिक (गोवेकर) अधिक सावधगिरीने सांभाळला पाहिजे.

(३) गोव्यातील शेतकरी समाज व शेतकी यांचा परस्परसंबंध महाराष्ट्रापेक्षा व अन्य प्रांतापेक्षाही बराचसा वेगळा आहे. शेतीचे (१. कोमोनदारी २. देवस्थानी ३. खाजगी जमिनदारी वा भाटकर) असे तीन भाग आहेत. शेवटचे दोन प्रकार अल्पसंख्य आहेत. कोमोनदारी जमीन मोठ्या प्रमाणात आहे. कोमोनदारी म्हणजे सामाजिक मालकीची जमीन. ही मालकी गावातील थोड्या वरिष्ठ घराण्यांकडे वंशपरंपरेने चालत आलेली आहे. तिचे ऐतिहासिक मूळ, ''जमीन ही सर्व समाजाच्या मालकीची असते, खाजगी वैयक्तिक मालकीची नसते?'' या प्राचीन भारतीय प्रथेतून अवनत रूपात गोमांतकात राहिली आहे. प्रत्यक्ष कसणारे सर्वसामान्य शेतकरी यांच्या हाती जमिनीची मालकी नाही. त्यांना कूळ म्हणून काही हक्कही नाही. शेतीचे सुमारे ७० टक्के उत्पादन कसणाऱ्या शेतकऱ्याच्या हातातून कायदेशीर रीतीने हिसकले जाते. कसणाऱ्या शेतकऱ्याचे राहते घर कोमोनदारीच्या जमिनीवर असते. लिलाव करून जमीन कसणाऱ्याच्या हातातून केव्हाही काढता येते व अधिकात अधिक खंड भरणाऱ्याला दिली जाते. देवस्थानी जमीन हिंदु देवळे व ख्रिश्चन चर्च यांच्या वहिवाटदाराकडे असते. प्रत्यक्ष कसणाऱ्या शेतकऱ्याची मालकी असलेली जमीन एकंदरीत २० टक्यापेक्षा अधिक नाही. शेतकऱ्यांमध्ये हिंदू व ख्रिश्चन अशा दोन्हीही धर्माने शेतकरी जवळजवळ सारख्या संख्येचे आहेत.

सहकारी शेतीचा सुंदर व निर्विवाद प्रयोग करण्यास गोमांतक हे चांगले क्षेत्र आहे. त्याकरिता नवीन कायदा करावयास पाहिजे व संशोधन-समिती नेमून त्वरित गतीने नवीन कायदा निर्माण केला पाहिजे नाहीतर गोमांतकाचे केरळ लवकर बनेल.

(४) राजकीयदृष्ट्या तेथे महाराष्ट्रवादी व गोमांतकवादी असे दोनच पक्ष आहेत. कोकणी

की मराठी या वादाशी याचा संबंध आहे. म्हैसूरवादी तेथे कोणीही नाही. गोमांतकवाद्यांच्या पाठीशी तेथील काही व्यापारी व खाणीवाले असावेत अशी शंका येते. मराठीचे व मुंबईचे आकर्षण ही गोष्ट महाराष्ट्रवाद्यांच्या बाजूला सामर्थ्य देणारी आहे. शेत कसणाऱ्या शेतकऱ्याच्या बाजुचा कुळकायदा व्हावा अशी चळवळ करणारे शेतकरी परिषदेचे कार्यकर्ते बहुतेक महाराष्ट्रवादी आहेत. त्यात ख्रिश्चन कार्यकर्तेही आहेत. हे कार्यकर्ते सध्या भाषा-वादात भाग घेऊ इच्छित नाहीत परंतु त्यांचा कल महाराष्ट्र व मराठी यांच्याकडे आहे.

कळावे. ही विनंती.

आपला,
(स्वाक्षरी)
**लक्ष्मणशास्त्री जोशी**

ooo

# प्राज्ञपाठशाळा मंडळ वाई.

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** वाई. जि. उ. सातारा

अध्यक्ष ता. २०-१०-६२.

क्र. १११/६२.६३/५९

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण**

यांस- स.न.वि.वि.

(१) श्री. देशभक्त काका कालेलकर हे गेल्या ३ तारखेस मुंबईस आले होते. तेव्हा त्यांनी मला टेलिफोनवरून विचारले की, "मी माझे कार्यालय व निवासस्थान मुंबईत आणू इच्छितो, श्री. माडखोलकर यांनी लिहिले आहे की गोमांतक - महाराष्ट्र संबंधी माझे जे विचार लेखनिबध्द करून त्या लेखावर तिघांच्या स्वाक्षऱ्या झाल्या. ते विचार अस्पष्ट व संदिग्ध आहेत. त्यात महाराष्ट्र व गोमांतक याचे एकत्व ठासून स्वीकृत केलेले नाही. याचा अर्थ असा की माडखोलकरांना संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातील आवेश पाहिजे आहे. मला तो आवेश व तो मार्ग मान्य नाही. आणि श्री. मुख्यमंत्री चव्हाण याचेही श्री. माडखोलकरांसारखे मत असल्यास मी श्री. चव्हाणसाहेबांची मदत मुंबईतील कार्याकरिता स्वीकारणे योग्य होणार नाही." श्री. काका कालेलकरांच्या या म्हणण्यावर मी टेलिफोनवरून असे उत्तर दिले की, "त्या लेखी मसुद्यातील हृदय परिवर्तनाचा सिद्धान्त मला तरी मान्य आहे. कोणत्याही जनसमुदायावर कोणत्याही राज्यात राहण्याची सक्ती किंवा जबरदस्ती करू नये असे माझे मत आहे. उदाहरणार्थं स्कॉटलंडच्या जनतेला ब्रिटनच्या एकछत्री राज्याखाली राहावयाचे नसेल तर एकभाषिकतेच्या तत्त्वावर त्याच्यावरही जबरदस्ती करणे अयोग्य ठरेल. अशा इतक्या मर्यादेपर्यंत माझे विचार जातात. श्री. चव्हाणसाहेबांशी तुमचे मतभेद आहेत असे गृहीत धरले तरी त्यांनी तुम्हास जे आश्वासन दिले आहे. त्यांत ते मतभेद आडवे येऊ देणार नाहीत असे मला वाटते. तुमच्या गोमांतकासंबंधाच्या विचाराचा त्यांनी दिलेल्या मदतीच्या आश्वासनाशी संबंध नाही."

श्री. काका कालेलकर व श्री. माडखोलकर यांच्याबद्दलची 'महाराष्ट्र टाइम्स' मधील बातमी आल्यानंतर जी एक कडक वृत्तपत्र- टीकेची लाट येऊन गेली तिच्यामुळे मराठी कोकणी संबंधाच्या प्रयत्नात पुष्कळच अडथळे उत्पन्न झाले. सामोपचारास अनुकूल असे वातावरण राहिले नाही. श्री. नवरे, श्री. बेडेकर व मी अशा तिघांनी त्यानंतर जे प्रयत्न केले त्यात कसलीही प्रगती होऊ शकली नाही. गोमांतकात मराठी हीच शिक्षणभाषा चालली पाहिजे, कोकणी नव्हे, असा आग्रह श्री. काकासाहेब गाडगीळ व अन्य मराठी साहित्य

महामंडळाचे अनेक प्रमुख साहित्यिक सोडण्यास तयार नाहीत. मडगाव येथील सारस्वतांच्या नेतृत्वाखाली वाललेल्या तिन्ही संस्था व गोमांतक साहित्य समेलनाचे कार्यकर्तेही वरील आग्रह सोडण्यास तयार नाहीत. यावरून सातारच्या मराठी साहित्य समेलनाचे यासंबंधातील धोरण काय राहील याचा नीट कयास करता येतो.

(२) राष्ट्रपती श्री. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची येत्या नोव्हेंबर १७ तारखेस संध्याकाळी ४-१५ ते ५-२० पर्यंत प्राज्ञपाठशाळेस ग्रंथप्रकाशन समारंभानिमित भेट आहे. आपण स्वत: त्यांच्याबरोबर उपस्थित राहावे. अशी आमची सर्वांची फार इच्छा आहे. ती आपण सफल करालच. सौ. वेणूताईंनाही हे आग्रहाचे निमंत्रण आहे.

विश्वकोश कार्यालयाचे काम आता नीट मार्गावर येऊ लागले आहे. विश्वकोश विषयांच्या याद्या तपशीलवार तयार होत आहेत. या याद्या प्रथम इंग्लिशमध्ये तयार झाल्यावर मराठीतील तर्जुमा नंतर तयार होईल. ही विश्वकोश रूपरेषा (SCHEMATA) राष्ट्रपतींना अगोदर पाठवून त्यांचीसुध्दा विश्वकोश कार्यालयास भेट या प्रसंगीच व्हावी. अशी इच्छा आहे. परंतु आतापर्यंत जो राष्ट्रपतींच्या कार्यक्रमाचा तपशील ठरला आहे त्यात विश्वकोश कार्यालयाचा मुद्दा घातलेला नाही; परंतु त्यात ४-२० ते ४-४० ही २० मिनिटे चहाकरिता ठरलेली आहेत. त्यात विश्वकोशाबद्दल आपण राष्ट्रपतींशी चर्चा करू शकू. तरी याबद्दल आपले काय म्हणणे आहे ते कळल्यास बरे होईल.

विश्वकोशाच्या रुपरेषेचे कागद आपणाकडे दिवाळीनंतर मला पाठविता येतील, अगोदरच पाठविणार होतो परंतु काही कारणास्तव उशीर होत आहे.

कळावे. ही विनंती.

आपला,

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

रापुको.

००० 

# प्राज्ञपाठशाळा मंडळ (रजि.) वाई.

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**
विश्वस्त व अध्यक्ष

संदर्भ क्र. .

महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळ,
सचिवालय (विस्तार भवन), मुंबई
१५ नोव्हेंबर १९६३

**प्रिय यशवंतराव चव्हाण,**

यांस

स.न.वि.वि.

गोवा काँग्रेसचा प्रश्न श्री. नेवाळकर व श्री. धारिया यांनी अखेरीस शक्य तितक्या चांगल्या रीतीने हाताळलेला दिसतो. मध्यंतरीच्या काळातील काँग्रेस राष्ट्रवादी गटाचा असंतोष योग्य होता. तो असंतोष व खळबळ आता बरीचशी शांत झालेली आहे. श्री. पुरुषोत्तम काकोडकर हे १९४२ च्या आंदोलनातील श्री. नेवाळकर यांचे सहकारी होत. त्यामुळे नेवाळकरांनी गोवा पेचप्रसंगात हात घातलेला ते सहन करू शकेल. नेवाळकरांच्या म्हणण्याप्रमाणे काकोडकर यांच्या महत्त्वाचा दोष म्हणजे लोकशाही पद्धतीने संघटना न चालविता किंवा संघटनेला विश्वासात न घेता अरेरावी पद्धतीने स्वतः निर्णय घेण्याची सवय आहे. परंतु काकोडकर महाराष्ट्रवादी सदस्यांच्या प्रभावाखाली येऊ शकतील.

२. गोवा काँग्रेसचा पेचप्रसंग जरी सुटलेला असला तरी महाराष्ट्रवादी गोवेकर तीन गटात विभागले गेले आहेत. ते म्हणजे काँग्रेस, बांदोडकर गट व प्रजासमाजवादी गट हे होत. त्यामुळे काँग्रेसचे बहुमत झाले तरी महाराष्ट्रवाद बहुमत विधान सभेत होईल असे नेवाळकर-धारियाना वाटत असेल तरी ते कितपत खरे आहे याबद्दल शंका वाटते.

३. मी गेल्या वर्षी जातीने स्वतः गोमांतकांत सार्वजनिक रूपाने गेलो असता असे परखड विधान केले की, ''दिल्ली येथील केंद्रीय नेते महाराष्ट्राच्या प्रश्नाकडे नेल्सनच्या (आंधळया) डोळयाने पाहतात.'' या विधानाची जाणीव श्री. के. के. शहा इत्यादी केंद्रीय नेत्यांना महाराष्ट्रवादी नसलेल्या गोवा काँग्रेसजनांनी करून दिली असे कळते. राजकारणातील माझा दृष्टिकोन किंवा आपला दृष्टिकोन मोठ्या प्रमाणात मिळता जुळता असतो असे मानतात. ही मी माझ्या मोठ्या भाग्याची गोष्ट मानतो. परंतु आपण राजकारणाच्या राष्ट्रीय आघाडीवर किंबहुना अलीकडे एका अर्थाने आंतरराष्ट्रीय आघाडीवर उभे आहात त्यामुळे

वरील समजुतीचा गैर परिणाम होऊ नये या दृष्टीने मी खूप सावधगिरी बाळगतो. इतके असूनही कित्येक वेळा अंतकरणाचा निर्णय प्रामाणिकपणे, शुद्ध भावनेने राष्ट्रहितावर लक्ष ठेवून बोलून दाखविणे अपरिहार्य कर्तव्य ठरते. आपण माझा तोल गेला असे वाटल्यास तशी सूचना करावी अशी माझी आंतरिक अपेक्षा असते. ‘‘राष्ट्र प्रथम व महाराष्ट्र दुय्यम’’ ह्या सिद्धांतावर माझी आपल्याप्रमाणेच श्रद्धा आहे हे सांगणे नकोच.

४. आपण गोमांतक निर्वचनाच्या आंदोलनास चार-पाच दिवस देणार आहात असे कळते. देणे जरुरी आहे. काँग्रेस निवडून आणण्याची जबाबदारी इकडच्या भागात आपणावर जास्त आहे असे समजले जाते व ते योग्य आहे.

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

ooo

# प्राज्ञपाठशाळा मंडळ (रजि.) वाई.

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** फोन. नं. ६ व २६
विश्वस्त व अध्यक्ष वाई (जि. सातारा)

संदर्भ क्र. २१५/६३.६४/५९ ता. १२-१२-६३

प्रिय श्री यशवंतराव चव्हाण
यांस स. न. वि. वि.

गोव्याचे राजकारण केन्द्रवर्ती श्रेष्ठींना जसे झेपले नाही तसेच प्रांतिकच्या संबंधित प्रतिनिधींनाही झेपले नाही, याचे कारण ते राजकारण समजले नाही. काँग्रेस श्रेष्ठींना त्या राजकारणाचे सत्यस्वरूप समजले असावे; पण समजलेले स्वरूप त्यांना इष्ट नसावे, कारण ते सत्यस्वरूप महाराष्ट्रवादी होते. ख्रिश्चन प्रतिनिधी अभावितपणे किंवा भावितपणे (Sub-Consciously or Consciously) पोर्तुगीज सत्तेकडे कललेले असल्यामुळे पंधरा ऑगस्टला त्यांच्या घरात ते अंधार ठेवतात. त्या दिवशी हिंदुच्या घरात दिवाळी असते. अराष्ट्रीय ख्रिश्चन विजयी झाले तरी चालतील व काँग्रेस पराभूत झाली तरी चालेल परंतु राष्ट्रीय महाराष्ट्रवादी पराभूत झाला पाहिजे अशी बेलगाम भावना गोव्याच्या राजकारणाचे सूत्रे प्रत्यक्ष हलविणाऱ्या ए.आय्.सी. च्या प्रतिनिधींची होती अशी शंका मराठी वृत्तपत्रांनी काही आठवड्यांपूर्वी प्रकट केली ती या संदर्भात ध्यानात घेणे जरुरी आहे.

गोव्याच्या राजकारणाचे सत्यस्वरूप या निर्वाचनापूर्वी लक्षात आणण्याकरिता खालील तीन मुद्दे महाराष्ट्र काँग्रेसच्या संबंधित प्रतिनिधींनी ध्यानात घेतले नाहीत. मी सविनयपणे त्यांच्या निदर्शनास आणण्याचा प्रयत्न केला होता.

१. गोमांतक काँग्रेसमध्ये कमीतकमी तीन चतुर्थांश बहुमत महाराष्ट्रवादी असल्यामुळे महाराष्ट्रवादी काँग्रेसजनांना त्या प्रमाणात उमेदवार म्हणून निवडणे जरुर होते.

२. श्री. दयानंद बांदोडकर यांचा संपूर्ण कल काँग्रेसकडे असल्यामुळे व ही गोष्ट गेली कित्येक वर्षे ते बोलून दाखवीत असल्यामुळे महाराष्ट्रवादी गोमांतक गटातर्फे, पहिला मुद्दा ध्यानात घेतला असता तर, ते स्वतंत्र निवडणूक घेण्यास फारसे तयार नव्हते. प्रजासमाजवादी पक्षांशी त्यांनी केलेली तडजोड नाखुषीची होती.

३. स्वतंत्र गोवावादी काँग्रेसजन हे जनतेपासून अलग पडलेले; तरी त्यांच्याच हाती जबरदस्तीने काँग्रेसची सूत्रे ठेवलेली; काँग्रेसबाहेरचा स्वतंत्र गोवावादी ख्रिश्चन गट अराष्ट्रीय असल्यामुळे त्यांचा स्वतंत्र गोवावादी काँग्रेसजनांना पाठिंबा मिळणे अशक्य; ही वस्तुस्थिती

किती विलक्षण होती.

गोवा राजकारणासंबंधात मी आपणाशी गेली दोन वर्षे पत्रव्यवहार करीत आहे व अनेक वेळा चर्चाही केली आहे. वरील तीन मुद्द्याचे संदर्भ माझ्या मागील पत्रव्यवहारात (उदा. दिनांक २७-९-६३ चे पत्र पुन: पहावे) प्रसंगत: आले आहेत.

गोव्याची परिस्थिती काँग्रेसश्रेष्ठी अजूनही एवढ्या मोठ्या पराभवानंतरही सुधारू शकतील व काँग्रेसला सत्तास्थानी स्थापू शकतील. परंतु सत्तेला सत्याचे अधिष्ठान लागते हा विचार प्रभावी झाला पाहिजे. राष्ट्रीय जनमताला काँग्रेसमध्ये स्थान द्यावे व त्याकरिता महाराष्ट्रवादी गटालाच महत्त्व द्यावे. महाराष्ट्रवादी गटाशिवाय गोमंतकात काँग्रेसला राष्ट्रीय आधार मिळणे शक्य नाही.

अराष्ट्रीय ख्रिश्चन मताला आळविण्याचा प्रयत्न म्हणजे ख्रिश्चन पाकिस्तानला ओंजारण्याचा प्रयत्न करणे होय. राष्ट्रीयता व महाराष्ट्रीयता एकरूप आहे हे महान सत्य काँग्रेसश्रेष्ठींच्या गळी उतरविण्याचे महान कार्य करणे आपणासच शक्य झाले तर होईल. श्री. दयानंद बांदोडकर यांचा ट्रंक टेलिफोन नुकताच अर्ध्या तासापूर्वी म्हणजे सकाळी ९ वाजता मला मिळाला. मी मुंबईस त्यांच्याशी चर्चा करण्याकरिता आता दुपारी जात आहे.

या पत्राची भाषा अत्यंत स्पष्ट असल्याबद्दल आपण क्षमा करावी.

दिल्ली येथे जागतिक ओरिएंटल काँग्रेसचे २६ वे अधिवेशन येत्या जानेवारीच्या ४ ते १० पर्यंत भरणार आहे. २५ वे अधिवेशन मास्कोस भरले होते. या अधिवेशनात मी दिल्लीस येणार आहे.

साहित्य व संस्कृती मंडळातर्फे प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथांचा प्रकाशन समारंभ महाराष्ट्र मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गृहमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली वाई येथे २ जानेवारी १९६४ रोजी ठरविला आहे. आपणास निमंत्रण येईलच यातील महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे कै. म. गो. रानडे यांच्या "Rise of the Maratha Power" या इंग्लिश ग्रंथाचे प्रा. न. र. फाटककृत भाषांतर.

कळावे.

आपला,

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

ooo

## प्राज्ञपाठशाळा मंडळ (रजि.) वाई.

फोन. नं. ६ व २६
वाई (जि. सातारा)
ता. १८-८-६५

मुंबई-

**प्रिय यशवंतराव चव्हाण यांस -**

या विश्वाच्या अपरिहार्य नियमास अनुसरून आपल्या मातोश्रींनी हे विश्व सोडले. त्या अमरत्वास पोचल्या. फुलाचा उद्धार करणारा पुत्र अमरत्वास नेतो, असे धर्मशास्त्र म्हणते. प्राणापेक्षा अधिक अशारीतीने त्यांनी आपले लालन पालन केले. त्यामुळे असामान्य कर्तृत्वशक्ती आपणात आली. त्याची स्मृती आपणास नेहमीच शांत व प्रसन्न ठेवो.

सदैव आपला,
(स्वाक्षरी)
**लक्ष्मणशास्त्री जोशी**

**(मूळपत्र स्वहस्ताक्षरात आहे.)**

# प्राज्ञपाठशाळा मंडळ (रजि.) वाई.

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** वाई.(जि.सातारा)
विश्वस्त व अध्यक्ष ता. १३-१२-६६

संदर्भ क्र. ५९०/६६-६७/

**प्रिय श्री यशवंतराव चव्हाण,**

यांस- सप्रेम नमस्कार वि.वि.

आपण २८-२९ डिसेंबरच्या शिबिराकरिता महाबळेश्वरला येणार आहात व ३० डिसेंबरला प्रतापगडला जाणार आहात असे वृत्तपत्रांवरुन आज कळले. या तीन दिवसांच्या अवधीत आपण व मुख्यमंत्री यांनी विश्वकोश कार्यालयास भेट द्यावी अशी मी विनंती करतो. त्याकरिता आपण दोन तासांचा अवधी विश्वकोश कार्य व तत्संबंधी निरीक्षणाकरिता राखून ठेवावा. आपण महाबळेश्वरच्या शिबिरांच्या दोन दिवसांच्या अवधीत सवड काढीत असल्यास वाईस दुपारच्या भोजनास येथे यावे. व भोजनोतर चर्चा करून व आपणास महाबळेश्वरला परत जाता येईल.

आपण मला यासंबंधी आपला निर्णय तारीख २० डिसेंबरपर्यंत कळविल्यास बरे होईल. कारण साहित्य संस्कृति मंडळाने विश्वकोश निरीक्षक उपसमिति नेमली आहे. डॉ. रा. ना. दांडेकर, श्री. गो. वा. बेडेकर (माजी सचिव, महाराष्ट्र शासन) व श्री. बापूराव नाईक हे तिघे या उपसमितीचे सदस्य आहेत. यांनाही आपल्या आगमनाची मी आगाऊ सूचना देऊन वाईस उपस्थित राहण्याचे निमंत्रण देऊ शकेन.

कळावे ही विनंती.

आपला,
(स्वाक्षरी)
**लक्ष्मणशास्त्री जोशी**

○○○

## प्राज्ञपाठशाळा मंडळ (रजि.) वाई.

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** फोन क्र. ६ व २६.
विश्वस्त व अध्यक्ष वाई (जि. सातारा)

संदर्भ क्र. ३२६/६७-६८. ता. २२-१०-६७

**खाजगी**

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण,**

यांस- सप्रेम नमस्कार वि.वि

आपणांस दिनांक १९ रोजी चर्चेकरिता फारच थोडा वेळ होता म्हणून मनातले विचार मनातच राहिले.

१. सीमा प्रश्न हा महाराष्ट्राच्या राजकारणाचा मुख्य प्रश्न ठरत आहे. विशेषतः बरेच महाराष्ट्रीय काँग्रेसवाले तसे मानत आहेत. हे एक भारताच्या व महाराष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टीने मोठे दुर्दैव होय असे वाटते. महाराष्ट्राचे राजकारण म्हणजेच भारताचे राजकारण असा व्यापक अर्थ महाराष्ट्रातल्या कांग्रेसवाल्यांना पटलेला दिसत नाही. तसा पटला तर व्यक्तिशः आपले नेतृत्व महाराष्ट्राला परमेश्वर जोपर्यंत लाभू देईल तेवढ्या अवधीत महाराष्ट्र भारताच्या राजकारणी यशाचा मागदर्शक उज्वल दीप ठरेल. (महाराष्ट्रात मोठी अव्यक्त शक्ती आहे. ही शक्ती व्यक्त होण्यास महाराष्ट्रीय कांग्रेसजनांना आधुनिक राजकीय व सामाजिक तत्त्वज्ञानाचे शिक्षण मिळण्याची गरज आहे.

२. सीमा - प्रश्न प्रखर झाले आहेत याचे कारण सीमावासी जनतेला प्रादेशिक राज्यांकडून भाषिक व सांस्कृतिक जीवनाचे आश्वासन मिळू शकत नाही, हे होय. मराठी मनुष्याला कानडी राज्य आपल्या बांधवांचेच राज्य आहे असा समरसतेचा अनुभव मिळाला असता तर मराठी जनता इतकी प्रक्षुब्ध झालीच नसती. गेल्या आठ वर्षात मी माझ्या कानडी मित्रांतर्फे कानडी राज्यकर्त्यांना म्हणजे अनेक कानडी मंत्र्यांना भेटण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांनी प्रत्येक वेळी भेट घेण्याचे टाळले. माझे विचार त्यांना माहीत असल्यामुळेच टाळले. मुसलमान किंवा ख्रिश्चनधर्मीय ज्याप्रमाणे अन्यधर्मीयांना बाटविण्याचे उद्दिष्ट कधी सोडत नाहीत, तशीच या लोकांची मनःस्थिति आहे. शिवसेनेसारख्या चळवळी अशाच मनस्थितीच्या द्योतक आहेत. वस्तुतः पंचवीस वर्षानंतर हे प्रश्न क्षुल्लक वाटू लागतील. अर्थात भारताची प्रगती निश्चितपणाने होणार हे गृहीतकृत्य जमेस धरले तर.

३. सध्या चालू असलेल्या सीमा आंदोलनाचे राजकारण आपल्यासारखे ध्येयवादी परंतु व्यवहारी नेते नीटपणे हाताळू शकतील अशी मला आशा आहे. परंतु एवढ्याने मूलभूत प्रश्नाची उकल होणार नाही. अशासारखे भयंकर प्रश्न निराळ्या मुद्यातून निर्माण होऊन

भेडसावत राहतील हे ध्यानात घेणे जरूर आहे. पक्षाच्या कार्यकर्त्यांचे राजकीय, शिक्षण हा त्यावरील एक उपाय होय. मी अलीकडे प्राचीन भारतीय राज्यशास्त्राचे राजकीय तथा सामाजिक इतिहासाचे अध्ययन करीत आहे. त्यावरून असा निष्कर्ष निघतो की, गांधी येईपर्यंत गेल्या बाराशे वर्षात राजकीय व सामाजिकदृष्ट्या भारताची परागती सुरू होती. त्यास मुख्य कारण ब्राह्मणी विचारनिष्ठ व म्हणूनच जातिनिष्ठ बनलेली भारतीय समाजरचना होय. या रचनेचा वैचारिक पाया ब्राह्मणांनी वेदकाली घालण्यास, प्रारंभ केला. प्लेटो व ॲरिस्टॉटलसारख्या ग्रीक तत्त्ववेत्यांनी आधुनिक जगाच्या अत्यंत प्रगत अशा सामाजिक व राजकीय विचारांचा पाया घातल्यामुळे आधुनिक प्रगत जग निर्माण होऊ शकले. या नव्या राजकीय व सामाजिक तत्त्वज्ञानाच्या अत्यंत उथळ असा स्वीकार आपण सर्वांनी केलेला आहे. त्यामुळे आपल्या विचारांना गंभीरता व व्यापकता आलेली नाही. आपल्या देशातील राजकीय पक्षांना नव्या मूलगामी विचारांची बैठक देणे जरूर आहे. ही गरज विद्यापीठाकडून पुरविली जाणार नाही.

४. साहित्य व संस्कृति मंडळाचे अध्यक्षपद मी सोडू नये असे आपण मला लिहिले आहे. मलाही सोडण्याची इच्छा नाही. परंतु प्रशासनयंत्रणा इतकी खराब आहे की, तिला आर्थिक मागणीशी फारसा संबंध नसलेल्या मागण्याही मान्य होत नाहीत. माझ्या मागण्या लक्षात न घेणे हे शासनयंत्रणेच्या खराबीचे एक मुख्य गमक आहे. माओत्से तुंगने पहिल्या तीन वर्षात शासनयंत्रणेतील खराबी नष्ट करण्याकरिता सव्वा लाख लोकांची कत्तल केली आहे. येथे कत्तलीची जरूर नाही. माझ्या मागण्यांमध्ये ज्या गोष्टींचा आर्थिक प्रश्नाशी विशेष संबंध नाही अशा दोन मागण्या आहेत. एक म्हणजे मी अनुभवाने निवडलेला सहायक सचिव श्री. द. य. राजाध्यक्ष यांना मंडळाचे 'सचिव' करणे आणि दुसरी म्हणजे सामान्य प्रशासनाच्या ज्या उपसचिव बाईंच्या हातात माझी शाखा अनेक वर्षे आहे. त्यांच्या हातातून माझी शाखा काढून घेणे. उपसचिवांनी आपल्या हाती असलेल्या शाखेकडे इतक्या उपेक्षेने पाहणे हे शासनयंत्रणेच्या पध्दतीत कसे बसते हे मला समजू शकत नाही.

मी आपणास वरील प्रकारचा मजकूर लिहून फार तसदी देत आहे. आपल्या जबाबदाऱ्या अत्यंत कठीण आहेत व त्या अत्यंत शिताफीने पार पाडीत आहात हे पाहून मला फार आनंद होतो. साहित्य संस्कृती मंडळाची बाब साधी आहे.

कळावे, ही विनंती.

आपला,<br>
(स्वाक्षरी)<br>
**लक्ष्मणशास्त्री जोशी**

**माननीय श्री. यशवंतराव चव्हाण,**<br>
(गृहमंत्री, भारतसरकार, नवी दिल्ली,)

०००

## प्राज्ञपाठशाळा मंडळ (रजि.) वाई.

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** फोन क्र. ६ व २६.
विश्वस्त व अध्यक्ष वाई (जि. सातारा)

संदर्भ क्र. ३९४/६८-६९/ ता. ३०.१०.६८

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण,**

यांस- सप्रेम नमस्कार वि.वि

माझे कलकत्याचे मित्र श्री. के. के. सिन्हा यांचे पत्र आपणास मिळाले असेलच व आपण योग्य ती कार्यवाही करालच याबद्दलही मला शंका नाही. मानवेन्द्रनाथ रॉय यांच्या पोलीस दप्तरी असलेल्या (१९१४ सालापुर्वीच्या) फोटोची एक एक प्रत माझ्याकडे आली. ते फोटो लहान आकाराचे असल्यामुळे ब्लॉक मेकरकडून मोठे करून घेतले. मोठ्या आकाराच्या फोटोच्या प्रती आपल्या अवलोकनार्थ स्वतंत्र रजि. पोस्टाने पाठविले आहेत. श्री. सिन्हांकडे सुद्धा प्रत्येकी तीन प्रती पाठविल्या आहेत. श्री. समरेन रॉय हे चरित्र लिहीत आहेत. त्यांचा पत्ता हरवल्यामुळे फोटोच्या प्रती आता श्री. सिन्हातर्फे पाठविल्या आहेत.

मी दिल्ली येथे नोव्हेंबरच्या १५ तारखेस येत असून तीन दिवस तिथे राहणार आहे. आपणाकडेच उतरण्याचा मानस आहे. त्यावेळी आपणाशी महाराष्ट्रसंबंधाच्या काही नवीन उपस्थित झालेल्या गंभीर प्रश्नासंबंधी समक्ष चर्चा करावयाची आहे. ती यापुढील मुक्कामातच दिल्ली येथे व्हावी अशी अपेक्षा आहे.

कळावे, ही विनंती.

आपला
(स्वाक्षरी)
**लक्ष्मणशास्त्री जोशी**

# प्राज्ञपाठशाळा मंडळ (रजि.) वाई.

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** फोन क्र. ६ व २६.
विश्वस्त व अध्यक्ष वाई (जि. सातारा)

संदर्भ क्र. ता. २३.३.६९

**खाजगी-पत्र**

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण,**

यांस- सप्रेम नमस्कार वि.वि

धोम धरण समारंभाकरिता दिनांक ३० मार्च रोजी वाईच्या कृष्णा खोऱ्यात आपले आगमन होणार असे वृत्तपत्रावरून कळते. तरी आपण दिनांक ३० रोजी वेळात वेळ काढून विश्वकोश कार्यालयास भेट द्यावी व शक्य असल्यास भोजनास किंवा निदान चहापानास तरी माझ्याकडे यावे अशी आग्रहाची विनंती आहे.

२. आपणाबरोबर महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक व पाटबंधारे मंत्री श्री. शंकरराव चव्हाण हेही येत आहेत. त्यांना मी आमंत्रण दिले आहे. मुख्यमंत्र्यांनी येण्याचे अभिवचन देऊनही ते अभिवचन पुरे केले नाही याचीही आठवण मी त्यांना दिली आहे. याबाबतीत मी भावनाविवश नसलो तरी राज्याच्या मुख्यमंत्र्याने आपल्या वैयक्तिक जबाबदारीच्या क्षेत्रातील कार्याकडे इतका कानाडोळा करावा याचा अर्थ समजत नाही.

कळावे, ही विनंती.

आपला,
(स्वाक्षरी)
**लक्ष्मणशास्त्री जोशी**

**माननीय श्री. यशवंतराव चव्हाण,**
गृहमंत्री, भारत सरकार, दिल्ली.

○○○

## प्राज्ञपाठशाळा मंडळ (रजि.) वाई.

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** फोन न. ६ व २६.
विश्वस्त व अध्यक्ष वाई
(जि. सातारा)

संदर्भ क्र. १०३२/६९-७०/ ता.२१-८-६९.

**खाजगी**

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण,**

यांस- सप्रेम नमस्कार वि.वि

कालपर्यंत काँग्रेस विनाशाच्या कड्यावर उभी होती. आता तिचा कडेलोट झालेला आहे! अशा स्थितीत ती जिवंत राहील काय, संपूर्ण जीवन जगेल काय, की हातपाय मोडलेल्या स्थितीतच क्रमाक्रमाने झिजत जाणार, असा प्रश्न सर्वच हितचिंतकांच्या समोर उभा राहिला आहे. ही झाली अलंकारिक भाषा.

इंदिराजींनी काँग्रेसच्या कार्यक्रमात मौलिक पुरोगामी बदल करावयाचा आहे असे मानूनच विचार करावयास पाहिजे. केवळ सत्तास्पर्धा किंवा त्याची वैयक्तिक राक्षसी महत्त्वकांक्षा धरून विचार करण्यात काय अर्थ? ती असेलच. मूलगामी (Radical) परिवर्तनाची काँग्रेसला गरज आहे ही गोष्ट मात्र या गेल्या चार वर्षातल्या व विशेषतः नुकत्याच घडलेल्या ऐतिहासिक घटनावरून सिद्ध होते. श्री. मुरारजीभाई देसाई यांच्या बाबतीतील इंदिराजींनी वर्तन चुकीचे असले तरी त्यातही खूप अर्थ भरलेला आहे हे विसरून चालणार नाही. श्री. मुरारजीभाई देसाई हे देशभक्त असले तरी खाजगी भांडवलशाहीचे प्रतीक व प्रतिनिधी आहेत. इतरही अनेक काँग्रेस नेते तसेच आहेत. म्हणून इंदिराजींना साथ देऊन मौलिक परिवर्तनाचा मार्ग व कार्यक्रमाचा मार्ग तपशीलवार निश्चित करून पावले टाकली पाहिजेत. इंदिराजी आपणाशी कशा वागतात यावर हे काहीसे अवलंबून असले तरी त्यांना सहकार्य देणे आवश्यक आहे हे तत्त्वत: सिद्ध होते. प्रत्यक्ष व्यवहार अडचणीचा, हे खरे.

माझे अनेक विद्वान मित्र माझा वरील दृष्टिकोन मान्य करीत नाहीत. पंधरा दिवसांपूर्वीच प्रा. गोवर्धनदास पारीख व श्री. अ.भि शाह यांच्यापाशी माझे वरील विचार बोलून दाखविले. तेव्हा ते माझ्यावर फार रागावले. श्री. व. भ. कर्णिक पहिल्यांदा इंदिराजींच्या वर्तनामुळे चिडले. आता सोविएटायझेशन सुरू झाले, असे ते म्हणाले. परंतु नंतर ते माझ्यासारखेच बोलावयास लागले. कर्णिकांचा श्री. गिरींबद्दल चांगला अनुभव नाही. त्यांच्याशी त्यांचा पुष्कळ मार्गे वारंवार संबंध आला, त्यामुळे त्याचे तसे मत बनले. श्री. गिरी भंपक आहेत

असे ते तेव्हा म्हणाले. आता श्री. गिरी राष्ट्रपती झाले त्यामुळे हे असे बोलणे आता अयोग्य होय. श्री. गिरीच बहुतेक निवडून येतील असे मी गेले पंधरा दिवस म्हणत होतो. तीन दिवसापूर्वी मी श्री. अ. भि. शाह यांना असाच अंदाज टेलिफोनवरून सांगितला. तेव्हा ते फारच अस्वस्थ झाले आणि मला म्हणाले; 'Shastriji, you are dated' शास्त्रीजी, तुमचा विचार शिळा झाला आहे. आता कोणाचा विचार शिळा व कोणाचा ताजा या चर्चेत अर्थ नाही.

मला खरी चिंता किंवा व्यथा म्हणता, ती अशी आहे की, काँग्रेसचे कसे पुनरूज्जीवन होईल, म्हणजे कसा कायापालट होईल, हा प्रश्न आपण म्हणजे यशवंतराव चव्हाण कसा सोडवू पाहणार हा आहे. तथाकथित सिंडिकेटरबरोबर राहून की इंदिराजींना बरोबर घेऊन? सिंडिकेटमधील बरीच मंडळी जीर्ण-मतवादी दिसतात. त्यातील काही व्यक्ती मला प्रत्यक्ष माहीत नाहीत, सिंडिकेटच्या एकंदर धोरणावरील इंदिराजींची टीका यथार्थ आहे. त्यातील काही व्यक्ती सिंदबादच्या म्हाताऱ्याप्रमाणे काँग्रेसच्या मानगुटीस बसल्या आहेत.

मी प्रत्यक्ष राजकीय क्षेत्रातून बाहेर पडल्यासारखाच झालो आहे, आपण त्या क्षेत्रातील निर्णायक केंद्रामध्ये विराजमान झालेले आहात, असा दोघांमध्ये मौलिक फरक आहे. त्यामुळे या क्षेत्रातील माझे ज्ञान उथळ आहे, आपले खोल आहे. आपण प्रत्यक्ष पेचप्रसंगात सापडलेले आहात, मी तीरावर उभा राहून बघत आहे. आपण एकी घडवून आणण्याचा प्रयत्न करीत आहात. अंतिम स्वार्थत्यागाची पाळीही आपल्यावर येईल. परंतु अंतिम स्वार्थत्यागाने काही चांगले घडणार असेल तर तोही स्वस्तचं पडेल अशी माझी भावना आहे. इंदिराजी आपणास कराडला कायम पाठविणार आहेत असे लोक बोलतात. कराडचा त्यामुळे भाग्योदय होईल असे मला वाटते. राजकारण सत्तेत राहूनच चालविता येते असे मानण्याचे कारण नाही. स्वार्थत्यागाच्या योगाने आपले आध्यात्मिक तेज अधिक उज्ज्वल होईल. कामराज-योजनेत बाहेर फेकलेल्या मंडळीसारखी स्थिती होणार नाही हे खास.

कळावे ही विनंती.

आपला,

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

**माननीय श्री. यशवंतराव चव्हाण,**
गृहमंत्री, भारत सरकार, नवी दिल्ली.

○○○

Laxman Shastri Joshi

Marathi Vishwakosha Office
WAI (Dist. Satara)

Bef No. 32/73 74

Date: 2.6.73

**Dear Mr. Yashwantrao**

Shri J. G. Bodhe of Bombay is known to me intimately for his outstanding work in the field of engineering, education, social and cultural. Shri J.G. Bodhe is an eminent Civil Engineer and Architect.. He is internationally known for his contribution to bridge construction, design on industrial projects, overhead and underground reservoirs, roads etc. He is a member of the executive council of the Federation Internationale de la Precontrainte (FIP) and had presided over as Vice-President at the sixth international congress of FIP held at Prague in June 1970. He was the President of Institution of Engineers (India), - most immenient, active and known body of engineers' in India-for consecutive years.

Shri J. G. Bodhe is very closely associated with the technical education and academic field. He is a dean of faculty of technology and fellow of the Senate of Bombay University; Member of the Court of University, Poona, fellow of the Senate of M. S. University, Baroda and Member of Various Other Engineering Colleges and Polytechnics Committees.

Shri J. G. Bodhe take very active part in cultural and social programmes. He is a Vice-President of the Maharashtra Chamber of Commerce, Vice-Chairman of the Asiatic Society Ltd., Justice of the Peace and an Honorary Presidency Magistrate. He has written several technical papers and contributed to the International publications. He was recipient of Gold Medal and memorial prise for his best papers.

Shri J. G. Bodhe has been taking active and leading part in the Engineering, Technical education, Social, Cultural, and in any national calamities like' famine, earthquake, unemployment, war etc.

In recognition of his valuable services to the country, he is appointed as the "Sheriff of Bombay" by the Maharashtra State Government - which is an unique honour to an Engineer of his immenence this year.

In view of the invaluable services that Shri J. G. Bodhe is rendering to the community, society and the nation in this present stage of development, It would be a kind gesture if he is awarded the title of "PADMA BHUSAN" by the President of India in recognisation and appreciation of his voluminous work and contribution to the country.

I earnestly request you to recommend Shri J. G. Bodhe to the President for the award of "PADMA BHUSAN" in the next coming list.

With kind regards,

Yours Sincerely,
(Signature)
LAXMANSHASTRI JOSHI

**Hon'ble Shri Yashwantrao B. Chavan,**
Minister for Finance,
Govt. of India,
1 Race Course Road,
New Delhi - 11

❍❍❍

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** **मराठी विश्वकोश कार्यालय,**
वाई (जि. सातारा)

संदर्भ क्रमांक: दिनांक: १३ जुलै १९७३

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण**

यांस सप्रेम नमस्कार वि.वि.

मी १५ जुलैला पहाटेस एअर इंडियाने पॅरिसला जात आहे . तेथे दिनांक १६ ते २२ पर्यन्त 'कांग्रेस ऑफ इंटरनॅशनल ओरिएंटॅलिस्ट' चे अधिवेशन आहे . भारत सरकारच्या शिक्षण खात्यातर्फे जाणाऱ्या प्रतिनिधीपैकी मी एक आहे. दोन महिन्यापूर्वी अगोदरच वाचावयाचा निबंध पॅरिसला पाठविला आहे. आपल्या अवलोकनार्थ तो निबंध सोबत पाठविला आहे. कळावे, ही विनंती .

आपला स्नेहांकित,

आपला स्नेहांकित,
(स्वाक्षरी)
लक्ष्मणशास्त्री जोशी

**माननीय श्री. यशवंतराव चव्हाण,**
अर्थमंत्री, भारत सरकार,
१ रेस कोर्ट रोड, नवी दिल्लो- ११.

 OOO

# खाजगी

६ ऑगस्ट, १९७३
मुंबई

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण** यांस

सप्रेम नमस्कार वि.वि.

रशियन टाईपरायटरचे काम आपण केले त्याबद्दल मी अत्यंत आभारी आहे. त्याबाबतीत श्री. डोंगरे यांची चांगली मदत झाली.

मी हे पत्र अत्यंत खाजगी कामाकरिता लिहीत आहे. माझा मुलगा चि. मधू हा सन १९५९ पासून अमेरिकेत आहे. धातु विद्या विषयाची येल विद्यापीठाची डॉक्टरेट पदवी घेऊन तो तेथेच गेली दहा वर्षे आय. बी. एम्. या गणकयंत्र निर्माण करणाऱ्या जगातील सर्वात मोठ्या कंपनीत संशोधन व विकास विभागात उच्चपदावर काम करीत आहे. त्याला दोन मुलगे व दोन मुली असून तो सहकुटुंब तेथे कायम रहिवाशी म्हणून राहात आहे. त्याचे चालू वय ४३ आहे. तो दोन तीन वर्षाने एकदा भारतास भेट देतो. सूनही केव्हा केव्हा येते. १५ दिवसांपूर्वी येथे तो पुनः आला असून दि. २ सप्टेंबरला परत जाणार आहे. 'इंटिग्रल इलेक्ट्रॉनिक' हा त्याचा संशोधनाचा मुख्य विषय आहे व या कंपनीला अत्यंत फायदेशीर असे गणकयंत्राचे काही भाग व एक मूलभूत घटक निर्माण करुन महत्त्वाचे यश संपादन केले आहे.

मी त्याला 'तू भारतास परत का येत नाहीस?' असा प्रश्न पूर्वी कधीही विचारला नाही. कोठेही असा पण सुखी असा म्हणजे झालं, असा माझा दृष्टिकोण असल्यामुळे मी असा प्रश्न विचारला नाही. या पाळीस मात्र विचारला. कारण असे ध्यानात आले की, आता हे कुटुंब अमेरिकेत कायम राहणार. त्याच्या संशोधनाचा व अनुभवाचा महाराष्ट्रास व भारतास शक्य तर उपयोग व्हावा असा वरील प्रश्न विचारण्याचा माझा हेतू होता. त्याने माझ्याशी दिलखुलास सविस्तर चर्चा केली. या चर्चेवरून असे वाटले की, आपणही त्याच्याशी या संबंधात चर्चा केल्यास त्यातून काही निष्पन्न होऊ शकेल असे मला वाटते. संशोधन विकास विभागाच्या क्षेत्रात आय. बी. एम्. मध्ये जी उच्चतम पदे आहेत त्यातील एका पदावर तो सध्या काम करीत असतो. त्याने तेथे घरही विकत घेतले आहे.

आपण ऑगस्ट अखेरपर्यन्त महाराष्ट्रात येणार असल्यास चि. मधुच्या भेटीसाठी सुमारे अर्धातास वेळ राखून ठेवाल अशी आशा आहे व त्याप्रमाणे वाईस आगाऊ पत्र यावे ही विनंती.

कळावे.

आपला स्नेहांकित,

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

**माननीय श्री. यशवंतराव चव्हाण,**
अर्थमंत्री, भारत सरकार, नवी दिल्ली - ११.

○○○

# खाजगी

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** **मराठी विश्वकोश कार्यालय,**
वाई (जि. सातारा )

संदर्भ क्रमांक: सासंमं/ संकीर्ण-/ १६६९ दिनांक : १४-६-७४

**प्रिय श्री यशवंतराव चव्हाण**

यांस- सप्रेम नमस्कार वि.वि.

आपण नुकतेच आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या बैठकीसाठी वॉशिंग्टनला गेला आहात असे कळले. तेथून ता. १७ रोजी भारतास परत येऊन ता. २२ रोजी मॉस्कोला व पुढे प्रागला जाणार असे समजते.

गेल्या वर्षी जुलै महिन्यात मी आपणांस एक पत्र लिहिले होते. त्यांत श्री. नरेन्द्र सिंदकर यांच्याविषयी उल्लेख केला होता. हे गृहस्थ मॉस्को नभोवाणीच्या मराठी विभागाचे प्रमुख आहेत. श्री. सिंदकर दीड वर्षापूर्वी मुंबईस आले असताना मुंबईच्या मराठी साहित्य संघाने त्यांना खास निमंत्रण देऊन त्यांचे एक व्याख्यान आयोजित केले होते. साहित्य संघामार्फत जे रशियन भाषेचे मराठी माध्यमातून वर्ग चालविले जातात. त्याची मोठी गरज म्हणजे रशियन टाईपरायटरची. त्यांनी टाईपरायटर स्वतःच खरेदी करून संघास भेट म्हणून दिला. त्यावेळी हा टाईपरायटर शैक्षणिक व साहित्यिक कार्याकरिता असल्यामुळे विनाजकात याची सोडवणूक करण्याकरिता मी आपणांस पूर्वी लिहिले होते. आपल्याच मदतीमुळे तो टाईपरायटर साहित्य संघास विनाजकात मिळाला, याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे.

श्री. सिंदकरांचा पिंड मूळचा साहित्यिकाचाच. अनेक थोर लेखकांशी त्यांची जानपहचान व पत्रव्यवहार चालू आहे. तसे ते एक लोकप्रिय गृहस्थ आहेत. मॉस्कोतील महाराष्ट्र मंडळाच्या बैठकी त्यांच्या घरीच भरत असतात. मॉस्कोतील महाराष्ट्रीय दिवाळी, दसरा इत्यादी हिंदू सण साजरे करण्याकरिता त्यांच्याकडेच जमतात. त्यांनी लिहिलेल्या ''क्रेमलिनच्या बुरुजावरुन'' या पुस्तकाचे नुकतेच प्रकाशन झाले. आपल्या अवलोकनार्थ या पुस्तकाची प्रत स्वतंत्ररीत्या पाठविली आहे. सोविएत सामान्य नागरिकाचे कलाप्रेमी जीवन, रशियन साहित्य व संस्कृती, तेथील मानवाची निसर्गाशी जवळीक या सर्वावर नव्याने प्रकाश टाकणारे असे हे एक पहिलेच पुस्तक आहे. भारत-सोविएत मैत्रीला दृढता आणण्याच्या दृष्टीने श्री. सिंदकरांनी बरेच विधायक कार्य केले आहे. तसेच 'नोबेल

पारितोषिक' मिळविणारे शोलख व यांच्या कादंबरीच्या "डॉन संथ वहातच आहे" या भाषांतराचे काम साहित्य- संस्कृती मंडळातर्फे श्री. सिंदकर करीत आहेत.

श्री. सिंदकरांची मुख्य अडचण म्हणजे त्यांच्या चिरंजीवांच्या शिक्षणाची आपणांस माहीत असेलच की जे भारतीय परदेशात राहतात (इंग्लंड अमेरिका सोडून ) त्यांची विशेषतः त्यांच्या मुलांच्या अभ्यासाची बऱ्याच वेळा गैरसोय होते. मुख्य अडचण भाषेची. त्यावर मात करून सुध्दा आवड असलेल्या विषयांच्या अभ्यासक्रमास ॲडमिशन मिळणे सुलभ नसते. चि. मंगेश (श्री. सिंदकरांचा चिरंजीव) याचेही असेच झाले. याचा सर्व अभ्यासक्रम रशियन भाषेतून झाला. गेल्या वर्षी शालान्त परीक्षा पास झाला. वास्तविक भाषा व वाङ्मय या विषयात त्याला गोडी. परंतु, पदार्थविज्ञान विषयात मास्को स्टेट युनिव्हर्सिटीमध्ये प्रवेश मिळाला. म्हणून त्याची प्रगती खुंटली. विषय बदलून घेण्याकरिता श्री. सिंदकरांनी मास्को विद्यापीठात किंवा पॅट्रीस लुमुंबा विद्यापीठात मास्कोतील दूतावासामार्फत प्रयत्न केले व मास्को विद्यापीठाच्या उपकुलगुरूंना भेटले. परंतु काहीच घडलेले नाही. चि. मंगेश सिंदकर याची वैयक्तिक माहिती सोबत जोडली आहे.

विषय (Faculty) बदलण्याकरिता दुसरा अर्ज करून नव्याने दिल्लीतील केंद्रीय मंत्रालयामार्फत अर्ज पाठवावा असे सांगण्यात येत आहे. परंतु ह्या चक्रव्यूहातून पार पडण्याची वेळही टळून गेली आहे व होतकरू विद्यार्थ्याचे दोन वर्षाचे नुकसान होत आहे. वास्तविक विषय बदलून देणे ही सोविएत शिक्षण मंत्रालयाच्या कक्षेतील बाब आहे म्हणून माझी अशी विनंती आहे की, आपण जेव्हा मास्कोत असाल तेव्हा संबंधित अशा सोव्हिएत अधिकाऱ्याशी शब्द खर्च केलात तर ही गोष्ट सहज घडून येण्यासारखी आहे. सध्या सोविएत, रशिया व भारत यांचे सांस्कृतिक संबंध वरच्या पातळीवरचे असल्यामुळे विषयाच्या बदलीस त्यांचे शिक्षणखाते मान्यता देईल कारण यात नव्याने प्रवेश घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

श्री. सिंदकर मास्कोत आपली भेट घेतीलच असे मी गृहीत धरून चालतो.

कळावे.

आपला स्नेहांकित,

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

**माननीय श्री. यशवंतराव चव्हाण,**

अर्थमंत्री, भारत सरकार,

१ रेसकोर्स रोड,

नवी दिल्ली- ११

ooo

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

**मराठी विश्वकोश कार्यालय,**
वाई (जि. सातारा )
दिनांक : २५.१०.७३.

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण यांस**

सप्रेम नमस्कार वि.वि.

वाई येथील जनता शिक्षण संस्थेच्या कला व वाणिज्य महाविद्यालयातील काही विद्यार्थी दिल्लीस सहलीसाठी येत असून, त्यावेळी त्यांना आपले दर्शन घेण्याची इच्छा आहे. तरी या विद्यार्थांना आपण मुलाखत द्यावी अशी विनंती आहे.

विद्यार्थ्यांची यादी आपल्या अवलोकनाकरिता सोबत जोडलेली आहे. हे सर्व विद्यार्थी या महाविद्यालयात एम्.कॉम.चे शिक्षण घेत आहेत.

कळावे ही विनंती.

आपला स्नेहांकित,
(स्वाक्षरी)
**लक्ष्मणशास्त्री जोशी**

**माननीय श्री. यशवंतराव चव्हाण,**
अर्थमंत्री, भारत सरकार,
१ रेसकोर्स रोड, नवी दिल्ली - ११.

OOO

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** **मराठी विश्वकोश कार्यालय,**

वाई (जि. सातारा )

संदर्भ क्रमांक : दिनांक : २ एप्रिल, १९७४

**सौ. वेणूताई यांस**

सप्रेम नमस्कार वि.वि.

आम्ही दोघे आपला निरोप घेऊन दिनांक २९ ला संध्याकाळी मुंबईस पोचलो. नंतर पुण्यास एक दिवस मुक्काम करून वाईस आलो.

आता यांची प्रकृती ठीक झाली आहे. श्री. यशवंतराव व विशेषत: तुम्ही वेळेवर विशेष काळजी घेतल्यामुळे इतक्या लवकर यांना आराम पडला. आता वय झाले आहे. अशा स्थितीत आपणासारख्या मित्र मंडळींकडून अमोल मदत मिळते ही आम्ही मोठ्या भाग्याची गोष्ट समजतो. कळावे, ही विनंती.

आपली स्नेहांकित,

(स्वाक्षरी)

**(सौ. सत्यवती जोशी)**

**सौ. वेणूताई चव्हाण,**

१ रेसकोर्स, नवी दिल्ली - ११

**(मूळ पत्र स्वहस्ताक्षरातील आहे.)**

ooo

२९-८-१९७४

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण,**

यांस स.न.वि.वि. -

मी ३० जूनपासून ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात 'यूरिन ट्रैक इन्फैक्शन' ने आजारी होतो. ऑगस्टचा पहिला आठवडा पुण्याच्या के. इ. एम्. हॉस्पिटलमध्ये उपचार घेतला व बरा झालो. किडनी-स्टोनची पूर्वी दोनदा शस्त्रक्रिया झाली होती. त्यातून अनेक वर्षांनी उद्भवलेल्या दोषामुळे आताचे इन्फैक्शन उद्भवले. वाईच्या डॉक्टरांनी सल्ला दिल्यामुळे पुण्यास जावे लागले. आता पूर्ववत बरा झालो असून नित्याचे काम पाहू लागलो आहे. रोज सकाळी मेणवलीपर्यंत हिंडून येतो.

२. माझे कलकत्याचे मित्र श्री. धरित्रीनाथ गांगुली व त्यांची पत्नी सौ. शोभा गांगुली यांचा कमवलेल्या कातड्यांचा आंतरराष्ट्रीय व्यापार आहे. त्यासंबंधी उत्पन्न झालेल्या करविषयक अडचणीचे विवरण देणारे पत्र त्यांनी मला नुकतेच पाठविले आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे. आपल्याशी चर्चा करण्याकरिता मी दिल्लीस यावे असा त्यांनी आग्रह धरला आहे. परंतु हा विषय केंद्रीय शासनाचे धोरण व कायदे यांच्या चौकटीतून तपासण्याचा असल्यामुळे मला त्यासंबंधी विशेष कल्पना नाही. अशा स्थितीत आपण स्वत: लक्ष घालून योग्य ते ठरवालच. श्री. गांगुली यांना मुलाखत देऊन त्यांची बाजू ऐकून घेणे आवश्यक असल्यास तसे श्री. गांगुलींना कळविल्यास बरे होईल.

३. आखाडचे श्री.शामराव शिंदे यांचा मुलगा चि. अनिल 'कृषिविज्ञान' विषय घेऊन बी. एस्सी. झाला आहे. आपणास माहीत आहेच की श्री. शिंदे आखाडचे मूळचे इनामदार. इनाम गेले तरी त्यांची शेती भरपूर आहे व ते स्वत:च कसतात.

चि. अनिल शिंदे यांच्या कृषिविषयक अर्थशास्त्राच्या कल्पना चांगल्या आहेत. भारत सरकारच्या कृषिसेवा केंद्र योजनेनुसार उद्योजक म्हणून प्रवेश मिळण्याकरिता मुख्य अभियंता महाराष्ट्र कृषी विकास महामंडळ मर्यादित, ट्रॅक्टर सेवा केंद्र एम्. आय्. डी. सी. औद्यौगिक वसाहत, चिंचवड, पुणे-१९ यांचेकडे अर्ज केला आहे. त्याप्रमाणे मुलाखतही नुकतीच झाली. तरी या मुलाला या योजनेत संधी मिळाल्यास तो चांगली कामगिरी बजावील अशी माझी अपेक्षा आहे. मी या मुलाची श्री. अण्णासाहेब शिंदे व श्री. शंकरराव चव्हाण यांच्याकडे पत्राद्वारे शिफारस केली आहे.

महाराष्ट्रात काही केंद्रे चालू व्हावयाची आहेत. तरी यासंबंधी काही करणे शक्य असल्यास करावे.

कळावे.

आपला, स्नेहांकित

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

**माननीय श्री. यशवंतराव चव्हाण,**
अर्थमंत्री, भारत सरकार,
नवी दिल्ली.

ooo

# प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**
अध्यक्ष व विश्वस्त

फोन नं ६ व २६.
वाई (जि. सातारा )

तारीख: ३ सप्टेंबर, १९७४

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण यांस -**

सप्रेम नमस्कार वि.वि.

कलकत्याचे माझे स्नेही श्री. धरित्रीनाथ गांगुली यांच्यासंबंधीचे माझे दिनांक २९.८.७४ चे पत्र आपणास मिळाले असेलच. या संदर्भात श्री. गांगुली यांच्याकडून आपणास व मला आलेली पत्रे सोबत पाठवीत आहे.

कळावे, ही विनंती.

आपला स्नेहांकित,
(स्वाक्षरी)
**लक्ष्मणशास्त्री जोशी**

**माननीय श्री. यशवंतराव चव्हाण,**
अर्थमंत्री, भारत सरकार,
१, रेसकोर्स रोड,
नवी दिल्ली- ११०

ooo



वाय १८५-२५

# प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**
अध्यक्ष व विश्वस्त

फोन नं ६ व २६.
वाई (जि. सातारा)
तारीख: २५.२.७५.

**खाजगी**

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण यांना**

सप्रेम नमस्कार वि.वि.

माझे मुंबईचे स्नेही व प्रार्थना समाज मुंबई या संस्थेचे अध्यक्ष श्री. ग. ल. चंदावरकर यांचे आपणास असलेले पत्र सोबत पाठविले आहे. प्रार्थना समाजाचा व माझा गेली ५० वर्षे निकटचा संबंध आहे. पंढरपूर येथील वा. बा. नवरंगे बालकाश्रम शताब्दी महोत्सवाचा समारंभ आपल्या शुभहस्ते व्हावा अशी त्यांची इच्छा आहे. आपणास मार्च १९७५ महिन्यात पंढरपूर येथे येण्यास जी तारीख सोयीची असेल ती त्यांना मान्य आहे. तरी कृपया श्री. चंदावरकर यांच्या सोबतच्या निमंत्रणाचा विचार करावा.

आणखी एक खाजगी कामासाठी पुढे लिहितो, माझे मुंबईचे निकटचे स्नेही व व्ही. जी. टी. आय. मधील ऑटोमोबाईल इंजिनिअरिंगचे कक्ष प्रमुख प्रा. ज. ना. हाटे यांच्या चिरंजीवांनी एअर इंडियाच्या संचालकांकडे नोकरीकरिता अर्ज केला आहे. श्री. हाटे यांच्या चिरंजीवांचा एअर क्रॉफ्ट टेक्निशिअन म्हणून गेली १० वर्षाचा अनुभव आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे. तरी या संबंधी काही करणे शक्य असल्यास अवश्य करावे अशी विनंती आहे. प्रा. हाटे मराठी विश्वकोशात गेली ५-६ वर्षे त्यांच्या विषयाचे लेखन संपादनादी काम करीत आहेत.

कळावे.

आपला,
(स्वाक्षरी)
**लक्ष्मणशास्त्री जोशी**

प्रति

**माननीय मा. श्री. यशवंतराव चव्हाण,**
परराष्ट्र मंत्री, भारत सरकार,
१ रेस कोर्ट, नवी दिल्ली - ११.

ooo

## प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** फोन नं ६ व २६.
अध्यक्ष व विश्वस्त वाई (जि. सातारा )

तारीख: १ सप्टेंबर,१९७५

**खाजगी**

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण यांस-**

सप्रेम नमस्कार वि.वि

माझे मित्र श्री. मुकुंद शंकर दातार सैन्याच्या वैद्यकीय विभागात सिमला येथील सैनिकी रुग्णालयात नायब सुभेदार (आर्मी नं. ६७९६७१६) या हुद्यावर आहेत. जुलै १९७५ मध्ये त्यांची लष्करातील कमिशन प्राप्त करण्यासंबंधी लेखी पूर्व परीक्षा व तोंडी मुलाखतही झाली. मुलाखत व पूर्व परीक्षा चांगली होऊन ते उत्तम प्रकारे उत्तीर्णही झाले. श्री. दातार यांनी आर्मी मेडिकल कोअर मधील कायम व तात्पुरत्या सर्व्हिस (नॉन टेक्नीकल) कमिशन करिता अर्ज भरले आहेत, याच अर्जांच्या अंतिम परीक्षा व मुलाखती येत्या नोव्हेंबर व डिसेंबर, १९७५ मध्ये सर्व्हिसेस सिलेक्शन सेंटर्स (S.S.B.) तर्फे होतील. हे प्रकरण संरक्षण मंत्रालय विभागातील असल्याने याबाबत आपणास लक्ष घालणे शक्य आहे की नाही हे मला माहीत नाही. असल्यास प्रयत्न कराल अशी आशा आहे.

आपला स्नेहांकित,

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

प्रति :

**माननीय श्री. यशवंतराव चव्हाण,**
परराष्ट्र मंत्री, भारत सरकार,
१ रेसकोर्स, नवी दिल्ली - ११

ooo

## PRAJNA PATHASHALA MANDAL, WAI

**LAXMAN SHASTRI JOSHI** Phone No. 6 & 26
President & Trustee WAI (Dist. Satara)

Date : 23-3-76

**माननीय प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण**

यांना सप्रेम नमस्कार वि. वि.

'पद्मभूषण' सन्मान स्वीकारण्याचा समारंभ नवी दिल्ली येथे ३ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आला आहे. या समारंभाला व त्याच्या रंगीत तालमीसाठी दि. २ एप्रिलला होणाऱ्या कार्यक्रमासाठी मी सपत्नीक उपस्थित राहणार आहे. आम्ही उभयता दि. २ एप्रिलला मुंबईहुन सकाळी ६.३० वाजता सुटणाऱ्या विमानाने दिल्लीला येत आहोत. आपणाकडे उतरणार आहे. दि. ४ व ५ एप्रिलला माझी दोन व्याख्याने श्री. मा. कु. केळकर यांनी दिल्ली येथे आयोजित केली आहेत. आपणास याची कल्पना असेलच. दि. ६ एप्रिलला सकाळी ६.२० ला सुटणाऱ्या विमानाने मुंबईस निघणार आहे. दि. २ ते ५ एप्रिलपर्यंत आपण दिल्लीस असाल अशी आशा आहे.

लंडन येथील भारतीय दूतावासात पूर्वी काम करीत असलेले व आता सेवानिवृत्त झालेले श्री. व्ही. एम. ताराबादकर यांच्यासंबंधीचे कागदपत्र सोबत जोडले आहेत. ते सेवानिवृत्त होऊन जवळजवळ तीन वर्षे झाली. परंतु अद्याप त्यांना निवृत्तीवेतन, भविष्यनिर्वाह निधी व इतर सवलती अजूनही मिळाल्या नाहीत. याच संदर्भात १५ फेब्रुवारीला आपण महाविद्यालयाच्या समारंभास वाईस जात असताना सौ. ताराबादकर त्यांच्या यजमानाच्या कामानिमित्त आपणास समारंभाच्या ठिकाणी भेटल्या होत्या. आपल्या सूचनेनुसार त्यांनी आपणास दिल्लीला तपशीलवार पत्र लिहिले आहेच. तरी या प्रकरणी आपण लक्ष घालून कार्यवाही केल्यास बरे होईल.

कळावे.

आपला स्नेहांकित,
(स्वाक्षरी)
**लक्ष्मणशास्त्री जोशी**

**माननीय श्री यशवंतराव चव्हाण,**
परराष्ट्र व्यवहार मंत्री, भारत सरकार,
१ रेसकोर्स रोड,
नवी दिल्ली- ११

ooo

## प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**
अध्यक्ष व विश्वस्त

फोन नं. ६ व २६
वाई (जि. सातारा )
तारीख ३०/३/७६

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण**

यांस स.न.वि.वि.

१५ फेब्रुवारीस वाईस आपण सांगितल्याप्रमाणे मी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री माननीय श्री. शंकरराव चव्हाण यांना भेटून पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांना मराठी विश्वकोश खंड १ ते ४ यांच्या प्रकाशनाच्या समारंभासंबंधी विनंती करणारे पत्र पाठविण्याची विनंती केली. त्याप्रमाणे माननीय मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधानांना दि. २५ मार्च १९७६ ला पत्र पाठविले आहे. मी स्वतःही पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांना विनंती पत्र पाठविले आहे त्याची प्रत सोबत जोडली आहे. तरी आपण त्यांना वाईस विश्वकोश प्रकाशनाच्या समारंभाचे निमंत्रण स्वीकारण्याची शिफारस कराल अशी आशा आहे. मराठी विश्वकोश खंड १ चे मुद्रण सहा महिन्यापूर्वीच संपले असले तरी ८६ रंगीत चित्रपत्रांची छपाई कै. विष्णुपंतांच्या आजारामुळे दिरंगाईवर पडली होती. तो आता येत्या महिन्यात पूर्ण होईल व पहिले चारही खंड प्रकाशनास सिध्द होतील.

कळावे, ही विनंती.

आपला स्नेहांकित,
(स्वाक्षरी)
**(लक्ष्मणशास्त्री जोशी)**

**माननीय श्री. यशवंतराव चव्हाण,**
परराष्ट्र व्यवहार मंत्री, भारत सरकार,
१ रेसकोर्स रोड, नवी दिल्ली - ११.

OOO

## प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** फोन नं. ६ व २६
अध्यक्ष व विश्वस्त वाई (जि. सातारा )

४८४।७७-७८/ तारीख: ७-२-१९७७

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण**

यांस सप्रेम नमस्कार वि. वि.

दिनांक ४-२-७७ ला मी मुंबईहून लिहिलेले पत्र मिळाले असेलच. मी त्यात आपणास 'किसन वीर नगरा'त भेटेन असे लिहिले आहे. परंतु त्याच दिवशी मी रेठरे (ता. कराड) येथे अगोदरच ठरल्याप्रमाणे कार्यक्रमास जात आहे. म्हणून आपली भेट त्या दिवशी घेणे जमणार नाही. परंतु दिनांक १४ फेब्रुवारीला आपण सातारा येथे आहात. तेथे आपली भेट घेण्याचा प्रयत्न करीन.

कळावे, ही विनंती.

आपला स्नेहांकित,
(स्वाक्षरी)
**लक्ष्मणशास्त्री जोशी**

**माननीय श्री. यशवंतराव चव्हाण,**
परराष्ट्र मंत्री,
१, रेसकोर्स रोड,
नवी दिल्ली

OOO

लो. टिळक स्मारक संस्था वाई संचालित

वसंत व्याख्यानमाला, वाई

## हीरक महोत्सव–१९७८

क्रमांक- १४०/७८ दिनांक- १०-४-७८

**माननीय श्री. यशवंतराव चव्हाण**

यांस- सप्रेम नमस्कार वि. वि.

विषय : वसंत व्याख्यानमाला, वाई हीरक महोत्सव

वाई वसंत व्याख्यानमालेला साठ वर्षे पूर्ण झाली आहेत. शंभर वर्षांपूर्वी न्या. रानडे यांच्या प्रेरणेने महाराष्ट्रात वसंत व्याख्यानमाला ह्या मुक्त विद्यापीठाची सुरवात झाली. पुणे येथील वसंत व्याख्यानमालेने शताब्दी महोत्सव साजरा केलेला आहे. पुण्यानंतर सातत्याने अखंड साठ वर्षे चालू राहिलेली वाईची वसंत व्याख्यानमाला ही एकमेव आहे. ती आज वाईचे एक भूषण बनली असून वाई व भोवतालचा परिसर यात सांस्कृतिक वातावरण तयार करण्यात तिचा मोठा वाटा आहे. आजवर वाईने महाराष्ट्राला प्रथम श्रेणीचे विद्वान आणि समाजसेवक दिलेले आहेत. महाराष्ट्राला नवे विचार देण्याचे कार्य वाईची वसंत व्याख्यानमाला करीत आलेली आहे.

वाईच्या वसंत व्याख्यानमालेत प्रत्येक वर्षी मे महिन्यात अखंडपणे एकतीस व्याख्याने होत असतात. नामवंत वक्ते व योजनाबद्ध कार्यक्रम यामुळे तिला महाराष्ट्रात एक प्रकारची प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.

हीरक महोत्सवाच्या निमित्ताने या सबंध वर्षात आणि नित्याप्रमाणे येत्या मे महिन्यात अखंड ज्ञानसत्र चालू ठेवण्याचा मालेच्या कार्यकर्त्यांचा इरादा आहे. त्यासाठी व्याख्यानमालेची उपयुक्तता व ज्ञानप्रसारातील तिचे महत्त्व जाणणाऱ्या सर्वांनी या हीरक महोत्सवाच्या यशासाठी भरघोस साहाय्य करण्याची आवश्यकता आहे. वाईच्या वसंत व्याख्यानमालेच्या हीरक महोत्सवांसाठी कृपया आपला शुभसंदेश पाठवावा आणि कार्यकर्त्यांचा उत्साह वृध्दिंगत करावा; अशी नम्र विनंती आहे.

कळावे, लोभ असावा ही विनंती.

आपला स्नेहांकित,

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

अध्यक्ष, वसंत व्याख्यानमाला, वाई (सातारा)

**माननीय श्री. यशवंतराव चव्हाण,**

१, रेसकोर्स रोड, नवी दिल्ली

OOO

**MAHARASHTRA STATE BOARD FOR LITERATURE AND CULTURE**

**LAXMANSHASTRI JOSHI**

Chairman

Ref. No Date १७ सप्टेंबर, १९७९

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण यांस,**

स.न.वि.वि.

आपली व माझी कराड येथे भेट झाली तेव्हा सद्य:परिस्थितीबद्दल बोलायचा एक मुद्दा राहून गेला. महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती फारशी काळजी करण्यासारखी नाही ही गोष्ट खरी. अडचणी आहेत. परंतु अनुलंघ्य नाहीत असे वाटते. महाराष्ट्र हे आपल्या राजकारणाचे अधिष्ठान आहे. मुख्यमंत्री शरद पवारांचे मंत्रीमंडळ स्थिर राहाणे ही या दृष्टीने महत्त्वाची गरज आहे. हे मंत्रीमंडळ टिकले तर मध्यावधी लोकसभेची निवडणुक अधिक चांगल्या तऱ्हेने पार पडू शकेल.

यापुढे भाषिक प्रदेश राज्ये अधिक बळकट आणि अधिक स्वावलंबी झाली तरच या राष्ट्रातील लोकशाही स्थिरावण्याची शक्यता आहे. समाज जेवढा लहान तेवढी लोकशाही अधिक मूलगामी व दृढ होण्याची शक्यता वाढते. असा जगातील प्राचीन गणराज्यापासून व नगरराज्यांपासून ते आधुनिक लोकशाही राज्यांपर्यंतचा इतिहास सांगत आहे. युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका ही २०० वर्षापूर्वी स्वतंत्र झाली, तेव्हा नागरिकांच्या जाणीवेने भरलेले नागरिकांचे आत्मे होते. त्यामुळे जॉर्ज वॉशिंग्टन मोठा विजयी वीर झाला तरी त्याला एकाधिकारशाही निर्माण करता आली नाही. फ्रेंच राज्यक्रांती प्रेषित रूसो यांनी लहानलहान समाजच लोकशाहीचे खरे अधिष्ठान होय असे म्हटले आहे.

आपल्यावर महाराष्ट्रामध्ये लोकशाहीचे अधिष्ठान बळकट करण्याची जवाबदारी महाराष्ट्राच्या ऐतिहासिक शक्तीने टाकलेली आहे. यात आपले स्थान घेऊ शकेल अशी कोणीही व्यक्ती गेल्या ५० वर्षात महाराष्ट्रात निर्माण झाली नाही. यात अडचण एवढीच आहे की, आपण केंद्रात जाऊन बसलात त्यामुळे सतत संपर्क ठेवणे कठीण झाले आहे. श्री.शरद पवार यांच्यावर व इतर आपल्या विश्वासाच्या स्थानिक कार्यकर्त्यांवर अवलंबूनच आपणांवर इतिहासाने सोपविलेली ही सर्वश्रेष्ठ नैतिक जबाबदारी फलद्रूप करण्याची शक्यता आहे. सेनापती बापटांनी म्हटल्याप्रमाणे "महाराष्ट्र मेले तर राष्ट्र मेले" म्हणून महाराष्ट्रातील लोकशाही जर वाचवू शकलात तर महाराष्ट्राला आणि भारताला मोठ्या भवितव्याकडे

प्रवास करता येईल.

श्री. शरद पवार यांच्या पुरोगामी लोकशाही दलामध्ये जनता पक्षाचा विभाग मोठा आहे म्हणून त्यातील जनसंघ हा जातीयवादी म्हणून मनाला अस्वस्थ करू शकतो. परंतु महाराष्ट्रात जनसंघ काय किंवा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ काय यांना फार मर्यादित प्रमाणात स्थान आहे. विशेषतः राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जन्मस्थान महाराष्ट्र (नागपूर) असूनही इतक्या वर्षांमध्ये तो बहुजन समाजामध्ये आपली मुळे रोवू शकला नाही. म्हणून जनसंघाबद्दलचा संशयी दृष्टिकोन हा यथार्थ असला तरी त्याला तितकेसे महत्त्व देण्याचे कारण नाही.

खरा प्रश्न पुलोद कसा टिकवायचा हाच आहे.

कळावे, ही विनंती.

आपला स्नेहांकित,

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

**माननीय श्री. यशवंतराव चव्हाण,**

उपपंतप्रधान,

भारत सरकार,

१, रेसकोर्स रोड,

नवी दिल्ली - ११० ०११.

ooo

**PRAJNAPATHASHALA MANDAL ( Regd.), WAI.**

**LAXMANSHASTRI JOSHI** Phone No. 6
Tarkateertha WAI (Dist. Satara)
President & Trustee Date ९ जाने. १९८०.

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण,**

यांस - स.न.वि.वि.

या मध्यावधी निवडणुकीतून काही अत्यंत अनपेक्षित अशी ऐतिहासिक परिस्थिती निर्माण झाली आहे. परंतु गेल्या तीन-चार महिन्यात आपल्या ज्या अनेक गाठी भेटी झाल्या त्यावरून आपण या सगळ्या घडामोडींचे शांत रीतीने अवलोकन करीत आहात हे माझ्या वारंवार लक्षात आले. यातून आपणास स्वतःला मार्ग सापडू शकेल की नाही हे मला माहीत नाही. परंतु आपली जी मन:स्थिती पाहतो ती फारच प्रशंसनीय आहे.

आपण शत्रू निर्माण केले नाहीत, निर्माण होणार नाही, त्याकरिता विवेकबुद्धीने वागत राहिलात. औचित्य व अनौचित्य काय या संबंधाने सावधगिरीने विचार करीत राहिलात. तरी शत्रू निर्माण झालेच आहेत. आपला संयम विलक्षण आहे. त्यातूनच मार्ग सापडेल.

शत्रू, मित्र, मानसपुत्र इत्यादी मूल्यवाचक पदे राजकारणात केवळ सापेक्षच रीतीने वास्तववादी असतात. शत्रू मित्र होतो, मित्र शत्रू होतो; मानसपुत्र उलटतो. हे सगळेच गृहीत धरावे लागते. परंतु काही तात्त्विक निष्ठा याची शाश्वत मूल्य निरपवाद व स्थिर असतात.

आपण काँग्रेसनिष्ठा हे निरपवाद मानले आहे पण आता खरी काँग्रेस हाच प्रश्न उत्पन्न झाला आहे असे मला वाटते. खरी काँग्रेस जर नाही सापडली तर काय करणार ? मला वाटते इंदिरा हे उपपद गेले तर खरी काँग्रेस वास्तव स्वरूपात अस्तित्वात आहे असे मानावे लागेल. त्या बाबतीत मनात आढी ठेवून वागणे सत्याला धरून होणार नाही. निष्कारण वैरी आडवे येण्याचा संभाव आहे, एवढीच अडचण त्यात दिसते.

पुलोद शासनाचा पाया भराभर ढासळू लागला आहे. सौ. प्रतिभा पाटील यांची जी आज मुलाखत प्रसिद्ध झाली आहे त्यावरून हे सहज लक्षात येते. म्हणून ज्याचे नष्टचर्य निश्चित

जवळ आहेत त्याला जगविण्याचा खटाटोप व्यर्थ ठरेल. आपली सार्वजनिक प्रतिक्रिया काहीच आली नाही हे एका अर्थी फारच चांगले झाले.

कळावे, ही विनंती,

आपला स्नेहांकित

(स्वाक्षरी)

**(लक्ष्मणशास्त्री जोशी)**

प्रति :

**माननीय श्री. यशवंतराव चव्हाण,**

१ रेस कोर्ट रोड, नवी दिल्ली - ११.

○○○

Prajna Pathashala Mandal's

## DHARMAKOSHA MANDAL, WAI

**LAXMANSHASTRI JOSHI**
Tarkateertha
Chief Editor

Telephone No. 20 & 53
WAI (Dist, Satara)
Pin Code No. 412803
Date. १०/११/१९८०

Ref. No. ३२८/८०-८१

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण**

यांस - सप्रेम नमस्कार.

कै. किसन वीर यांच्या मासिक श्राध्दानिमित्त एक अपवाद सोडल्यास, प्रत्येक महिन्याच्या २७ तारखेस पंचायत समितीच्या सभागृहात अनेक ख्यातनाम वक्त्यांची किसन वीरांच्या स्मृतीस साजेशा विषयावर व्याख्यानमाला गुंफण्यात आली. विषय व वक्ते यांची यादी सोबत जोडली आहे. शेवटच्या मासिक श्राध्दाच्या दिवशी म्हणजे वार्षिक श्राध्दाच्या दिवशी दि. २७ डिसेंबरला आपण या मालेतील अखेरचे व्याख्यानपुष्प गुंफावे अशी सर्व कार्यकर्त्यांची इच्छा आहे. विषय आपण निवडावा. श्री. नानासाहेब गोरे यांच्या भाषणाला श्रोत्यांची जास्तीत जास्त उपस्थिती होती. भारतीय लोकशाहीला कठीण दिवस आले आहेत. अध्यक्षीय पध्दतीने भारताची लोकशाही टिकण्याची शक्यता कमी आहे असा श्री. नानासाहेब गोरे यांनी आपल्या भाषणात निष्कर्ष काढला. नेहमीप्रमाणे त्यांचे भाषण रेखीव व मुद्देसूद होते. त्याबरोबरच परिणामकारकही होते.

वाईचा नागरिक श्रोतृवर्ग गेली साठ-सत्तर वर्षे प्रतिवर्षी होणाऱ्या विविध व्याख्यानमालांच्या कार्यक्रमामुळे विचक्षण बनला आहे, हे आपणास सांगणे नको. आपल्या संमतीची वाट पाहात आहोत.

कळावे, ही विनंती.

आपला स्नेहांकित,
(स्वाक्षरी)
**(लक्ष्मणशास्त्री जोशी)**

ooo

Prajna Pathashala Mandal's

# DHARMAKOSHA MANDAL, WAI

**LAXMANSHASTRI JOSHI**
Tarkateertha
Chief Editor

Telephone No. 20 & 53
WAI (Dist, Satara)
Pin Code No. 412803

Ref. No.

Date. ४-१२-१९८०.

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण,**

यांस - सप्रेम नमस्कार वि. वि.

आपले पत्र मिळाले. कै. किसन वीर यांच्या वार्षिक श्राध्ददिनी म्हणजे दिनांक २७ डिसेंबर, १९८० रोजी पुण्यतिथीस होणाऱ्या वाईतील समारंभाचे अध्यक्ष म्हणून आपणच यावे असे येथे सर्व कार्यकर्त्यांचे मत आहे. एखादा बाहेरचा आणखी एक वक्ता बोलाविण्याचे ठरविले आहे. एका विशिष्ट विषयावरच आपण बोलावे असा कोणाचाही आग्रह नाही. सद्य:स्थितीचे सिंहावलोकन आपणाकडून अपेक्षित आहे. आपण दोघे काही वेळ बसून त्या दिवशी चर्चा करू शकू. आपण दुपारच्या भोजनास माझ्याकडे यावे.

देशाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक अशा सर्व आघाडयांवर अस्वास्थ्य, गोंधळ व विग्रह सुरू आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर जेव्हा जेव्हा संकटे उभी राहिली तेव्हा या विकासाच्या प्रसूतिवेदना आहेत असे पंडित नेहरू म्हणत. परंतु विकासापेक्षा संकटेच अधिक वाढीस लागली आहेत. जनतेचा आत्मविश्वास नष्ट झाला आहे. कोणीतरी एक उद्धार करणारा मिळावा म्हणून जनता शोध घेत आहे. या शोधण्याच्याच प्रक्रियेत इंदिराजींना पुन: प्रचंड बहुमत मिळाले. इंदिराजी या जनतेच्या आत्मविश्वासाचे प्रतीक बनू शकल्या नाहीत, ही सगळयात मोठी चिंताजनक बाब आहे. त्यामुळे प्रतिक्रांतीची प्रक्रिया मोठ्या वेगाने सुरू झाली आहे. काँग्रेसशिवाय कोणताही पर्याय शिल्लक नाही. परंतु काँग्रेस आतून पूर्णपणे विस्कळीत व केवळ एका खांबावर कशीबशी टिकून आहे. तात्पर्य, परिस्थिती निराशाजनक आहे.

कळावे.

आपला स्नेहांकित,
(स्वाक्षरी)
**लक्ष्मणशास्त्री जोशी**

**माननीय श्री. यशवंतराव चव्हाण,**
१ - रेसकोर्ट रोड, नवी दिल्ली - ११

ooo

**Yashwantrrao Chavan**

1 RACE COURSE ROAD.
NEW DELHI 110011
December 06, 1980.

**Dear Shri Laxmanshastri Ji,**

Let me at the outset ask for your pardon for writing to you in English as I have no Marathi typist at hand today. I wanted to reply promptly and hence this letter in English.

I have received your letter of 4th December and am accepting the programme as suggested for 27th December. I have a programme of Namdeo Samaj the same day in the morning at Karad and after that function, I will leave Karad at 11.30 hrs to reach your place by 1.15 p.m. I accept your invitation for lunch.

Keep some spare time for our general discussion. I will leave Wai after the function in the evening.

Hope you are keeping well ?

With best wishes,

Yours sincerely,
(Signature)
**(Y.B. Chavan)**

**Shri Laxmanshastri Joshi,**
Tarkateertha, Chief Editor,
Wai,
District Satara.

❍❍❍

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

वाई (जि. सातारा) - ४१२ ८०३
दिनांक: ३ ऑगस्ट १९८१

**प्रिय श्री यशवंतराव चव्हाण यांस-**

सप्रेम नमस्कार वि. वि

मी गेल्या ३० जुलैला जर्मनीहून भारतात परतलो. वाईस आल्यावर आपले पत्र पाहिले. त्याची प्रत मला जर्मनीतच मिळाली होती. आमदार श्री. पी.बी. साळुंखे यांनी 'जोतिनिबंध' पुन्हा मुद्रित करण्यास माझी संमती आहे व तसे मी श्री. साळुंखे यांना कळवीत आहे.

१. आपला इंदिरा काँग्रेस प्रवेश लांबलेला दिसतो. आपल्या प्रवेशाच्या संकल्पावरच्या प्रतिकूल प्रतिक्रिया मी येथून जर्मनीस जाण्यापूर्वीच सुरू झाल्या होत्या. आता हा प्रवेश लांबल्याबद्दल म्हणजे प्रवेश न मिळाल्याबद्दल अनेकांचे मत अधिक प्रतिकूल झाले आहे. जे अनुकूल होते तेही विषण्ण झाले आहेत. अनेक महत्त्वाच्या व्यक्ती खाजगी रीतीने माझ्यावरही फार जोराची टीका करीत आहेत. मी फार चुकीचा सल्ला देऊन प्रमाद केला आहे असेही म्हणतात. अनेक मित्रांना असे वाटते की, महाराष्ट्राला एक फार चांगला समंजस, धोरणी, चिंतनशील, विवेकी, राजकारणी, मुत्सद्दी यशवंतरावांच्या रूपात योगायोगाने लाभला होता; परंतु या नव्या इंदिरा काँग्रेस प्रवेशाच्या संकल्पामुळे आणि विशेषत: इंदिराजींनी प्रवेश न देता अपमानित केल्यामुळे या महाराष्ट्राच्या सुपुत्राचे महान यश कलंकित झाले आहे.

२. यश आणि अपयश, मान आणि अपमान या द्वंद्वांना विशेष महत्त्व नाही. त्यांना महत्त्व आहे ते केवळ आपल्या स्वत:च्या आचरणाचे व कृतीचे मूल्यमापन करण्याकरिता. हा दृष्टिकोण मला भगवद्गीतेपासून मिळाला आहे. कारण भगवद्गीता ही राजनीतीशास्त्रातून निघालेली परमार्थ नीती होय. राजनीती शास्त्राचे अधिष्ठान असलेली परमार्थ नीती त्यात सांगितली आहे. ख्रिस्ताने म्हटले आहे. "दार ठोठवा म्हणजे उघडेल." यावर माझे म्हणणे असे की "दारापर्यंत जावे. दार ठोठवावे. नाही उघडले तर उघड्यावर बसावे." महाराष्ट्राची हवा समशीतोष्ण असल्यामुळे उघड्यावर बसले तरी हरकत नाही.

३. राजकारणाच्या दृष्टीने पाहिले असता असे दिसते की, भारतीय लोकशाहीने आतापर्यंत बेबंदशाही किंवा हुकूमशाही किंवा अधिकारशाही टाळली आहे आणि याचे श्रेय गेल्या दीडशे वर्षांच्या भारतीयांच्या राजकीय इतिहासाला आहे. दादाभाईंपासून नेहरूपर्यंतच्या नेतृत्वामध्ये लोकशाही जीवनमूल्याचे संदेश प्रकट झाले आहेत. इंदिराजीदेखील या परंपरेशी निष्ठेने वागण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु परिस्थितीच्या शक्ती इतक्या विलक्षण

व जबरदस्त आहेत की, त्यामुळे ही महान लोकशाही टिकवून धरणे हे त्यांना दिवसेंदिवस अधिकाधिक कठीण होणार आहे. अधिकारशाही, हुकूमशाही किंवा लष्करशाही हे भारताचे दुदैवच ठरेल. हे दुर्दैव टाळता येण्याची शक्ती भारतीय माणसाला आहे की नाही याची अग्निपरीक्षा होण्याची वेळ येऊनच ठेपली आहे.

४. आजच्यासारख्या परिस्थितीत आपल्यासारख्या अनुभवी, मुरब्बी व्यक्तीचे सहकार्य हे फार मोलाचे ठरेल याची इंदिराजींना जाणीव असावयास पाहिजे तशी ती जाणीव आहे की नाही हे नजीकचा कालच ठरवील. तरुणांना संधी द्यावी, हेही योग्य होय. परंतु 'तारुण्य' हे शहाणपणाचे मूल्यमापक नव्हे. तरुणाला संधी देताना फार काळजी घ्यावी लागेल. ज्ञानवृद्धत्व हेच खरे शहाणपणाचे मूल्यमापक ठरते. ज्ञान म्हणजे अनुभवजन्य प्रज्ञा.

कळावे.

आपला स्नेहांकित,

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

○○○

संदर्भ क्र. २८९/८१-८२/ ३०/८/१९८१

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण,** यांस-

सप्रेम नमस्कार वि.वि.

बऱ्याच दिवसात आपणासंबंधित काही वार्ता वाचण्यास आली नाही. पण परिस्थिती विलक्षण पद्धतीने बदलत आहे. आपणास पंतप्रधान श्रीमती इंदिराबाईंनी पक्षात त्वरित घेतले नाही हे आपल्या पथ्यावर पडेल अशी माझी पहिल्यापासूनच भावना आहे.

२. श्रीमती इंदिराजींनी आपणास कॉंग्रेस (आय) पक्षात घेण्यास आळमटळम केली हे कळाल्याबरोबर मला क्षणभर खेद आला. पण तुकारामाची आठवण झाली. दुष्काळात सर्वच बाजूने बरबाद झाल्यावर ''भले केले देवा'' असे उद्गार त्यांनी काढले.

३. मी दिनांक २० ऑगस्टला औरंगाबाद येथे डॉ. सौ. कुमुद गोसावी या विदुषीच्या 'एकनाथाचे स्फुट लेखन' या ग्रंथाच्या विमोचनाकरिता गेलो होतो. तेव्हा अनेक राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रातल्या व्यक्ती भेटल्या. फार मोठा समारंभ झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी मराठवाडा दैनिकाचे संपादक श्री. अनंतराव भालेराव यांच्याकडे चहाकरिता गेलो होतो. प्रसंगप्रसंगाने चर्चा निरनिराळ्या विषयांना स्पर्श करीत गेलो. त्यात आपल्याबद्दलचा विषय निघाला. श्री. अनंतराव भालेराव हे एक बाणेदार स्वतंत्र विचाराचे व सद्भावनेचे गृहस्थ आहेत. विशेषतः त्यांच्या ठिकाणी आपणाबद्दल चांगली सद्भावना आहे. ते म्हणाले ''महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात एकच चांगला मराठा उदयाला आला. सर्वांना, सर्व वर्गाना बरोबर घेऊन जाणारा आणि आवडणारा; परंतु त्याने इंदिरा कॉंग्रेसमध्ये पुन्हा प्रवेशाची खटपट करून महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील उत्कृष्ट स्थान गमावले, त्यामुळे आमची मने विषण्ण झाली. इतर मराठ्यांच्या बाबतीत आम्हाला कधीही अपेक्षा नव्हती. श्री. यशवंतरावांसारखा पुढील १०-१५ वर्षात कोणी येईल अशी अपेक्षाही नाही.''

मी लगेच हा विषय बदलला.

मी दिल्लीस या महिन्यात येणार होतो. परंतु बेत रहित झाला आहे. आपण पुढील महिन्यात इकडे येणार आहात तेव्हा भेट होईलच.

कळावे, ही विनंती.

आपला स्नेहांकित,

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

प्रति:

**माननीय खासदार श्री. यशवंतराव चव्हाण**

१ रेसकोर्स रोड, नवी दिल्ली - ११० ०११.

ooo

**यशवंतराव चव्हाण**

१, रेसकोर्स रोड,
नवी दिल्ली - ११००११
दिनांक- २ सप्टेंबर १९८१

**प्रिय शास्त्रीजी,**

तुमची दोन्ही पत्रे मिळाली. ती मी आनंदाने वाचली. राजकीय निर्णयांचे परिणाम दूरगामी असतात. मला कसलीही घाई झालेली नाही. आजच्या पक्ष राजकारणाच्या विश्लेषणाने मी घेतलेला निर्णय बरोबर आहे असे मला वाटते. आणि तुम्ही म्हणता ते बरोबर आहे की दार उघडत नाही तोपर्यंत उघड्यावर बसावे. माझ्या मनाची ही तयारी करूनच मी हा निर्णय घेतला आहे. श्री. भालेरावांचा माझ्याबद्दलचा सद्भाव मला माहित आहे. परंतु त्यांच्या हिन्दुस्थानच्या राजकीय परिस्थितीच्या निदानाचे शहाणपण आजपर्यंत माझ्या अनुभवास आले नाही, तुमच्या पत्रात दाखविलेल्या सद्भावाबद्दल मी आभारी आहे.

मी येत्या १०,११ तारखेस मुंबईत आहे. आपण मुंबईस असला तर जरूर भेटू. सप्टेंबर महिन्यात शक्य झाले नाही तर मी पुढील महिन्यात कराडला जाणार आहे. त्यावेळी आपण भेटू. आपल्याशी चर्चा केली म्हणजे बरे वाटते.

अधून मधून लिहीत जा.

कळावे.

आपला
(स्वाक्षरी)
**यशवंतराव चव्हाण**

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी,**
वाई जि. सातारा

ooo

## महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ.

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जांशी**

अध्यक्ष मुंबई

संदर्भ क्रमांक : दिनांक ६ जुलै १९८३.

**माननीय प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण,**

यांस सप्रेम नमस्कार.

गेली तीन-चार वर्षे आपले सार्वजनिक आणि राजकीय जीवनाचे पर्व हे अनेक संकटांनी ग्रासले आहे. या चालू वर्षात तर आपणांस कौटुंबिक असह्य आघात सहन करावे लागले आहेत. त्यामुळे आपल्या राजकीय जीवनाबद्दल अत्यंत आस्था असलेली मंडळी म्हणू लागली आहेत की, आपण यापुढे निवृत्ती मार्गी बनणार. मनाने अंतरंगात निवृत्त आणि प्रत्यक्ष बाह्यजीवनात प्रवृत राहण्याची कला साधणे हेच खरे परमार्थाचे साधन होय. आपले आतापर्यंत सार्वजनिक आणि खाजगी जीवन ज्यांना माहीत आहे असे अनेक महाराष्ट्रीय आपणाबद्दल खूप आशावंत आहेत.

मी दिनांक ७ जुलैला पहाटे एअर इंडियाच्या विमानाने माझा मुलगा डॉ. मधुकर जोशी यांच्याकडे अमेरिकेत जात आहे. दोन्ही डोळ्यात मोतीबिंदू झाले आहेत. त्याची शस्त्रक्रिया तेथे करून घेणार आहे. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात भारतात परत येईन.

कळावे, ही विनंती.

आपला स्नेहांकित,

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

**माननीय खासदार श्री. यशवंतराव चव्हाण.**

१, रेसकोर्स रोड,

नवी दिल्ली, ११००११.

C/o Dr. Madhukar L. Joshi,

9th Walden Woods,

Star Route, ESSEX JUNCTION

VI - 05452 U.S.A.

○○○

## प्राज्ञपाठशाळा मंडळ [रजि.] वाई (जि. सातारा)

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** — वाई- ४१२८०३.
अध्यक्ष व विश्वस्त — (जि. सातारा)

संदर्भ क्र. २८५/८३.८४/ — दिनांक २९/१०/१९८३

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण**

यांस- सप्रेम नमस्कार वि. वि.

आपली मुंबई येथे दिनांक २० ऑक्टोबर १९८३ रोजी भेट झाली. वाई येथील प्रसिध्द समाजसेवक व जुने काँग्रेस कार्यकर्ते श्री. महमदमिया दारूवाले यांचा ७५ वा वाढदिवस म्हणजे "अमृतोत्सवी" वाढदिवस आपल्या अध्यक्षतेखाली साजरा व्हावा अशी येथील कार्यकर्त्यांची इच्छा आहे. आपणास जानेवारी १९८४ अखेरपर्यंत सवड मिळणार नाही, असे आपण सांगितले. तरी येत्या फेब्रुवारी १९८४ मध्ये वेळात वेळ काढून वाईस येऊन शुभेच्छा द्याव्यात. आपल्या पत्रोत्तराची आम्ही वाट पाहात आहोत.

कळावे, ही विनंती.

आपला स्नेहांकित,
(स्वाक्षरी)
**लक्ष्मणशास्त्री जोशी**

प्रति,

**माननीय खासदार श्री. यशवंतराव चव्हाण,**
१ रेसकोर्स रोड,
नवी दिल्ली- ११००११.

ooo

## महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जांशी**

अध्यक्ष वाई

संदर्भ क्रमांक : विनिर्म-१०८३-९७८४ दिनांक : १९-११-१९८३

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण,**

यांस - सप्रेम नमस्कार

आपले दि. २-११-८३ चे पत्र पावले. श्री. महमदमिया दारुवाले अमृत महोत्सव समितीच्या मंडळींना आपले पत्र पाहून आनंद झाला. समितीने या अमृतोत्सवाची तारीख रविवार ५ फेब्रुवारी १९८४ निश्चित केली आहे. समारंभाची वेळ सायंकाळी ५ वाजता राहील. समारंभ उरकल्यावर आपले रात्री भोजन माझ्याकडे होईल.

कळावे,

आपला स्नेहांकित,

(स्वाक्षरी)

**(लक्ष्मणशास्त्री जोशी)**

प्रति:

**माननीय श्री. यशवंतराव चव्हाण,**

१ रेसकोर्स रोड,

नवी दिल्ली - ११००११.

ooo

# प्राज्ञपाठशाळा मंडळ [रजि.] वाई (जि. सातारा)

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** वाई - ४१२
अध्यक्ष व विश्वस्त (जि. सातारा)

संदर्भ क्र. १५-८४-८५ दिनांक. २१/४/१९८४

**माननीय प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण,**

यास-सप्रेम नमस्कार वि.वि.

वाई येथे दिनांक २६ व २७ मे १९८४ या दोन दिवसात ‘सर्वधर्मसमभाव’ या विषयावर परिसंवाद प्राज्ञपाठशाळा मंडळ व शिवाजी विद्यापीठ या दोन संस्थांच्या संयुक्त पुरस्काराने निश्चित केला आहे. या परिसंवादात सुमारे १५ ते २० तज्ञ व्यक्ती भाग घेणार आहेत. मुख्यत: सर्वश्री सत्यरंजन साठे, फादर लेदर्ले, शौकत छगला, शमुन लोखंडवाला, डॉ. आयरन, बिंदुमाधव जोशी, श्री. ग. माजगावकर, बेन्नूर, फकीर महंमद (हकीम), श्रीनिवास दीक्षित, शांताराम गरूड, महंमद दलवाई, डॉ. नरेंद्र दाभोलकर, वसंतराव पळशीकर या व्यक्तींचा या परिसंवादात सहभाग आहे.

आपण स्वत: या परिसंवादामध्ये दोन्ही दिवस उपस्थित राहून या परिसंवादाचा उपसंहार करावा अशी सर्व संघटकांची विनंती आहे. निदान दिनांक २७ मे १९८४ ला तिसऱ्या सत्रास उपस्थित राहून परिसंवादाचा उपसंहार करावा. परिसंवादात भाग घेणाऱ्यांपैकी काही व्यक्तींना इंग्लिशमध्ये आपले विचार मांडण्यास संमती दिली आहे. सोबत परिसंवादाची कल्पना देण्याकरिता पत्रक जोडले आहे.

कृपया पत्रोत्तर यावे, ही विनंती.

कळावे.

आपला स्नेहांकित,
(स्वाक्षरी)
**लक्ष्मणशास्त्री जोशी**

प्रति,

**माननीय खासदार श्री. यशवंतराव चव्हाण,**
१ रेसकोर्स रोड,
नवी दिल्ली- ११००११.

ooo

## प्राज्ञपाठशाळा मंडळ [रजि.] वाई (जि. सातारा)

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** वाई - ८१-८०

अध्यक्ष व विश्वस्त (जि. सातारा)

संदर्भ क्र. … दिनांक. ३१/८/१९८४

**माननीय प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण,**

यास-सप्रेम नमस्कार वि.वि.

आपले दिनांक २६ ऑगस्ट १९८४ चे श्री. राम कोल्हटकर यांना लिहिलेले पत्र पावले. आभारी आहे.

२. वाई येथे दिनांक २३ सप्टेंबर १९८४ ला धरून 'सर्वधर्मसमभावा'च्या संदर्भातील चर्चासत्र आयोजित करण्यात अडचणी आहेत. कारण या सत्रात भाग घेणारे जे अन्य विद्वान आहेत त्यांच्यापैकी काहींना वर निर्दिष्ट केलेल्या समयी उपस्थित राहणे जमणार नाही. तरी हे सत्र आम्ही १५ नोव्हेंबर नंतर आपल्या सवडीने आपणास अनुकूल अशा समयी आयोजित करू इच्छितो. कृपया आपण १५ नोव्हेंबर नंतरची सोयीची तारीख व वेळ कळवावी. शक्यतो शनिवार-रविवार असावा.

कळावे.

आपला स्नेहांकित,

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

प्रति,

**माननीय खासदार श्री. यशवंतराव चव्हाण,**

१ रेसकोर्स रोड,

नवी दिल्ली- ११००११.

○○○

**यशवंतराव चव्हाण**

१, रेसकोर्स रोड
नवी दिल्ली-११
दि १-४-८३

**प्रिय श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी**

यांस -

स.न.वि.वि.

तुमचे दिनांक १० मार्चचे पुण्याच्या पत्त्यावर पाठविलेले पत्र मी परवा पुण्यात गेलो तेव्हा मला मिळाले.

माझा पुतण्या डॉ. विक्रम चव्हाण यांच्या निधनानिमित्त आपण या दुःख संवेदना पाठविल्या आणि अगत्याने त्याच्या दशक्रियेला हजर राहिला त्यामुळे माझे दुःख काहीसे हलके झाले. माझ्या कौटुंबिक जीवनामध्ये हा मुलगा म्हणजे माझा एक मोठा आनंद होता. आपल्या उद्योगामध्ये नेहमी गर्क असणारा, असा हा माझा आनंद आकस्मात माझ्यापासून नियतीने दूर नेला. तुम्ही म्हणता ते खरे आहे इलाज काहीच नाही. माझे हे दुःख सहजा सहजी हलके होणार नाही. पण मनाला समजावतो आहे. आपल्या पत्रामुळे बरे वाटले.

आपला स्नेहांकित,
(स्वाक्षरी)
**यशवंतराव चव्हाण**

**श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी,**
मु. पो. वाई, जि. सातारा

ooo

**यशवंतराव चव्हाण**

१, रेसकोर्स रोड,
नवी दिल्ली - ११००११
दिनांक २१ जुलै १९८३

**प्रिय शास्त्रीजी,**

तुमचे दिनांक ६ जुलैचे पत्र तुम्ही अमेरिकेस गेल्यानंतर माझ्या हाती आले. त्याच्या आधी तुम्हांस पत्र लिहावे असे सारखे वाटत होते परंतु लिहिण्यास मन धजत नव्हते. माझ्या जीवनातील या नव्या संकटात तुम्ही मला खूप धीर दिलात. प्रत्यक्ष भेटून, सकाळमध्ये लेख लिहून आणि अस्थी विसर्जनाच्यादिवशी कराडला येऊन तुम्ही जो जिव्हाळा व्यक्त केलात तो मी कधीच विसरणार नाही. कराडच्या प्रीतीसंगमावर जमलेल्या जमावापुढे तुम्हीं केलेले भाषण तुमच्या मनाची थोरवी व्यक्त करते. सौ. वेणूबाईंच्या गुणांची इतकी समजदार मांडणी फार थोड्यांना करता आली असती. या सर्व गोष्टींबद्दल मनापासून आभार मानण्यासाठी हे लांब पत्र तुम्ही अमेरिकेस असतानाही लिहीत आहे. सौ. वेणुबाईंच्या वियोगाच्या शोकात मी अजूनही आहे. यातून बाहेर पडता आले नाही. तुम्ही या अनुभवातून गेला आहात. तुमच्या मनाचा समतोल मोठा म्हणून यातून तुम्ही लवकर बाहेर पडला. मला अजून जमत नाही. काय करावे कळत नाही.

प्रकृती काळजी घ्या. परत आल्यावर भेटू.

आपल्या चिरंजीवांना, नातवांना सप्रेम आशीर्वाद.

कळावे.
आपला,
सही /-
**यशवंतराव चव्हाण**

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**
एसेस जंक्शन
सत्यप्रत -

○○○

**यशवंतराव चव्हाण**

१. रेसकोर्स रोड,
नवी दिल्ली - ११००११
दिनांक- 2 नोव्हेंबर 1983

**प्रिय शास्त्रीजी,**

तुमचे दिनांक 29 ऑक्टोबरचे पत्र मिळाले. मुंबईस आपले बोलणे झाल्याप्रमाणे श्री. महमदमिया दारुवाले यांच्या अमृत महोत्सव समारंभासाठी आपण फेब्रुवारी महिन्यातील पहिल्या आठवड्यातील तारीख ठरवून मला कळवावी मी मोठ्या आनंदाने येईन.

आपण कुशल असाल अशी आशा आहे.

कळावे

आपला
(स्वाक्षरी)
**यशवंतराव चव्हाण**

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**
वाई

ooo

दिनांक- २६ एप्रिल १९८४

**प्रिय तर्कतीर्थ शास्त्रीजी,**

स.न.वि.वि.

आपले दिनांक २१ एप्रिलचे निमंत्रण मिळाले. परिसंवादाचा विषय उत्तम आहे, येण्याचा मोह आहे परंतु नेमक्या या दोन तारखांना मी इतर कार्यक्रम घेऊन चुकलो आहे. २६ मे रोजी मी मुंबईत आहे व २७ तारखेस इचलकरंजीस जायचे आहे. २० ते १ जून पर्यंत जवळ जवळ ८, १० दिवस मी सातारा जिल्ह्यात आहे. इतक्या उत्तम कार्यक्रमासाठी मला येता येत नाही याचे मला दु:ख आहे. परिसंवादासाठी नामांकित मंडळी येत आहेत हे स्वागतार्ह आहे. निमंत्रणाबद्दल आभार.

कळावे

आपला,

(स्वाक्षरी)

**यशवंतराव चव्हाण**

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

वाई

ooo

# महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ

दिनांक- २६ एप्रिल १९८४

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**
अध्यक्ष

दूरध्वनी क्र. २६-५६
मराठी विश्वकोश कार्यालय
वाई (जि. सातारा)
पि. को. नं. ४१२ ८०१
दिनांक २०.१२.१९७८

संदर्भ क्र. सासंमं - १०७८-५५५८

प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण
यांना सप्रेम नमस्कार

मी दिनांक १६.१२.७८ ला दुपारी मुंबईहून आपणाशी फोनवर बोललो. त्या वेळी ब्रह्मीभूत स्वामी केवलानंद सरस्वती यांच्या जन्म शताब्दीचा सोहळा, धर्मकोशाच्या एका खंडाचे प्रकाशन व साहित्य संस्कृति मंडळाच्या मराठी वाङ्मय कोशाच्या पहिल्या खंडाचे व मंडळाच्या अन्य ग्रंथाचे प्रकाशन जानेवारी, १९७९ च्या शेवटच्या सप्ताहात माननीय खासदार डॉ. करणसिंग व आपणास जो दिवस वाईस येण्यास सोयीचा असेल तो निश्चित करावा अशी विनंती केली होती. मी फोनवर सांगितल्याप्रमाणे डॉ. करणसिंग यांना माझे रीतसर निमंत्रणपत्र रवाना केले आहे. त्याची प्रत आपल्या अवलोकनासाठी सोबत पाठविली आहे. कृपया आपण यासंबंधी लवकर निर्णय घेऊन मला कळविल्यास फार बरे होईल. मी दिनांक २५ ते ३० डिसेंबर, १९७८ च्या आपल्या महाराष्ट्र भेटीत गाठ घेण्याचा प्रयत्न करीत आहेच.

कळावे.

आपला स्नेहांकित
स्वाक्षरी
**लक्ष्मणशास्त्री जोशी**

प्रती : **माननीय खा. श्री. यशवंतराव चव्हाण,**
नवी दिल्ली - ११० ००१

○○○

# १६.

# विविध मान्यवरांशी पत्रव्यवहार

*

## प्राज्ञपाठशाळा मंडळ (रजि.) वाई

तारीख २०-११-१९५२

प्रिय श्री. बाबूराव चव्हाण,

यांस स. न. वि. वि.

आपण उद्या १२ वाजता दुपारी प्राज्ञपाठशाळेत भोजनास यावे अशी विनंती आहे. आपली प्रकृती चांगली आहे हे कळून फार आनंद झाला. भोजनाचे आमंत्रण जरूर स्वीकारावे.

आपला स्नेहांकित

स्वाक्षरी

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

(मूळ पत्र स्वहस्ताक्षरातील)

ooo

**श्री**

पुणे

ता. २१-३-१९६०

प्रिय श्री. प्रा. पारीख साहेब

यांस स. न. वि. वि.

एक गोष्ट सांगायची राहिली. प्रा. रा. श्री. जोग हे मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून निवडून आले आहेत. त्यांच्या साहित्यिक समालोचक कर्तृत्वावर एक लेख 'नवभारत' मासिकाकरिता १० एप्रिलपर्यंत यावा, अशी मी प्रा. ग. प्र. प्रधान यांच्याकडे मागितला आहे.

क. ही. वि.

आपला

स्वाक्षरी

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

(मूळ पत्र स्वहस्ताक्षरातील)

**पोस्ट कार्ड POST CARD**

**केवल पता ADDRESS ONLY**

**Professor G. D. Parikh**
**276 Telong Road**
**Malinga**
**Bombay 19**

○○○

मातृ सेवा संघ

सिलवर्डी, नागपूर
ता. ३१/११/१९६८

सप्रेम नमस्कार वि. वि.

मी जरी वर निराळा पत्ता दिला आहे तरी नेहमीच्या पत्त्यावर पत्र आले तरी हरकत नाही. मी अलीकडे माझ्या बहिणीकडे रहात आहे.

काल नारायणशास्त्री द्रवीड आले होते व नवीन एक लेख त्यांनी लिहिलेला मला आणून दाखविला. लेख ठीक वाटतो व अशा प्रकारच्या वादविवादास स्थळ मिळावे, अशी माझ्या मनाची प्रवृत्ती आहे. सामान्य वाचकास गंभीर विषयावर खोल विचार वाचण्याची सहिष्णुता क्वचितच असते. ती वादविवादाने थोडीशी वाचनीय होते. त्यांनी काल मला सांगितले की मर्ढेकरांच्या कवितेबद्दल व एकंदर सौंदर्यसमीक्षेवर ते आठदहा दिवसांत दुसरा लेख लिहून पाठवितील. मी त्यांस अधिकांत अधिक ३००० शब्दांत लिहावेत असे सांगितले आहे. दर महिन्यास एक लेख आपण लिहू शकू असे म्हणत आहेत. गंभीर विषयाचे वाचन करण्याची त्यांना सवय आहे व उत्तेजन देण्यासारखे गृहस्थ आहेत. ३३/३४ वर्षाचे आहेत.

डिसेंबरमध्ये श्री. लक्ष्मणशास्त्री भेटले. त्यांनी मला सांगितले की मी ह्यापुढे धर्मकोश मंडळ व नवभारत यांकडे सर्वस्वी लक्ष देणार आहे. असे झाल्यास नवभारताची उत्तरोत्तर प्रगतीच होत राहील ह्याबद्दल मला खात्री आहे.

आपला,
(स्वाक्षरी)
**हरिकृष्ण मोहनी**
(मूळ पत्र स्वहस्ताक्षरातील)
(नवभारत पत्रव्यवहार)

○○○



वाय १८५-२७

**PRAJNA PATHASHALA MANDAL, WAI.**

**Laxman Shastri Joshi** PHONE NO

Tarkateerths, WAI (Dist). Satara

President & Trustee

Ref. No. Date २८-६-६१.

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण यांस**

स.न.वि.वि

कराडचा मंगल समारंभ उरकल्यानंतर दुसऱ्या दिवशी वाईस आलो. येथे आल्याबरोबर सोलापूरहून ट्रंक टेलिफोन सोलापूरचे स्नेही भाई ए. के. भोसले यांचा आला की, ते मला महत्त्वाच्या कामाकारितां वाईस भेटीकरितां येत आहेत. ते आज येथे आले व म्हणाले की, मुंबईस चला; श्री. यशवंतरावांची भेट घ्यावयाची आहे.

मी त्यांना म्हटले की, प्रत्यक्ष भेट व पत्रद्वारे निवेदन दोन्ही गोष्टी श्री. यशवंतराव सारख्याच समजतात. विशेषतः पत्रद्वारे निवेदन करण्यात वेळेची बचतही होते.

भाई भोसले यांचे म्हणणे असें डिस्ट्रिक्ट गव्हर्मेंट फ्लीडर म्हणून ३ वर्षांपूर्वी श्री. पी. एस. शहा यांची नेमणूक केली होती. आता पुन: नेमणुकीची वेळ आली आहे. श्री. पी. एस. शहांचीच नेमणूक पुन्हा झाली तर फार उत्तम होईल. त्यांची ३ वर्षातील कामाची पद्धती निर्दोष ठरली आहे, हे आपणास ही मान्य होईल.

मी दोन महिन्यांपूर्वी सोलापूरला गेलो असता मला श्री. शहा यांच्या बद्दलचे मत एकंदरीत चांगले दिसले.

क. ही. वि.

आपला,

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

(मूळ पत्र स्वहस्ताक्षरातील)

ooo

फोन नं. ६.२६

**प्राज्ञपाठशाला मंडळ (रजि.) वाई**

संदर्भ क्र.

वाई (जि. सातारा)
तारीख २९-३-१९६५

श्री माननीय पु. ल देशपांडे
यांस स.न.वि.वि

आपणास 'महाराष्ट्र रामायण' नामक नवकाव्य वाचण्याची शिफारस करण्याकरिता हे पत्र लिहीत आहे. वाल्मिकीप्रणित रामायणातील कथांचा अगदी निराळा अन्वयार्थ यामध्ये लावला आहे. प्रयत्न मोठा आहे. उपेक्षेने हे परिश्रम दुर्लक्षित होऊ नये. म्हणूनच आपणासारख्या विचक्षणांच्या दृष्टीखालून हे काव्य जावे, या दृष्टीने मी कवीस आपणाकडे पाठवीत आहे.

कळावे ही विनंती

आपला ,
(स्वाक्षरी)
**लक्ष्मणशास्त्री जोशी**
(मूळ पत्र स्वहस्ताक्षरातील)

ooo

**राम शेवाळकर**
प्राचार्य
लो. टिळक महाविद्यालय नवी

**'माऊली'**
टिळक नगर, नवी
( जि. यवतमाळ)
पिन ४४५३०४

स. न. वि. वि.

विदर्भ साहित्य संघाच्या अध्यक्षीय निवडणुकीत मिळालेल्या यशाबद्दल माझे मनापासून अभिनंदन करणारे अगत्यपूर्वक पाठवलेले आपले तार / पत्र मिळाले आणि आनंद द्विगुणित झाला. आपल्याबद्दलचा स्नेह आणि सद्भाव किती व्यापक आहे. याची सुखद प्रचिती आली. आपला हा सद्भाव हेच माझे पाथेय आहे. ते पाठीशी असेपर्यन्त आभार कसे मानावेत ?

लेखनावर प्रेम करणाऱ्या सर्वांची साहित्य संघाबद्दलची आपुलकी वाढावी, साहित्यातील सर्व प्रवाहांना सहभागी व गतिमान करण्यात साहित्य संघाला यश लाभावे, वाङ्मयीन उपक्रमांच्या रूपाने विदर्भात सर्वत्र साहित्य संघाचे सचेतन अस्तित्व जाणवत राहावे, साहित्य संघ अधिक लोकाभिमुख व्हावा व त्याला विदर्भातील सांस्कृतिक चळवळींचे विश्वसनीय आधारस्थान ही आपली भूमिका चोखपणे बजावता यावी यासाठी आपल्यासारख्या सुजाण हितचिंतकाच्या सक्रिय सदिच्छांची आवश्यकता पडेल. त्याबद्दलचा विश्वास बाळगण्याची मला परवानगी द्यावी.

आपल्या उत्स्फूर्त अभिनंदनाने हा ईसार मिळालेलाच आहे. त्याबद्दल कृतज्ञ आहे.

२३ मार्च १९८३
भगतसिंग स्मृतिदिन

स्नेहांकित,
स्वाक्षरी
**(राम शेवाळकर)**

ता. क. दि. २२ ला नागपूरला विश्वकोश मंडळाची बैठक असल्याचे कळले.

 OOO

श्री. पु. ल देशपांडे

रूपाली,
७७७, शिवाजीनगर,
पुणे- ४११ ००४
*फोन ५४६२८
दिनांक १६/०८/७६

**श्री. रा. ग. जाधव यांस**

सा. न. वि. वि. फोनवर आपल्याला सांगितल्याप्रमाणे टागोरांवरील टीपेचे टंकलिखित परत पाठवत आहे. शास्त्रीजींनी केलेले एडिटिंग योग्यच होते; पण तरीही त्यातला काही मजकूर गाळू नये असे वाटले. तो ठेवला आहे. असा मजकूर अर्थातच फार थोडा आहे. तेव्हा तो न गाळता छापावा ही विनंती. हे फायनल एडिटिंग लक्षात यावे. म्हणून ते हिरव्या शाईने लिहिले आहे.

आपल्या कडून रजिस्टर आले त्या दिवसापासूनच श्री. देशपांडे आजारी आहेत. आजच ताप आला आहे, पण अद्याप बरे वाटलेले नाही. छपाई राहू नये म्हणून स्वलिखित टिपेचा मजकूर त्यांच्या सल्ल्याने दुरुस्त करून लवकर पाठवत आहे. आपण कळविलेली इतर माहिती ते स्वत: त्यांना बरे वाटताच पाठवून देतील.

कळावे,

आपली नम्र,
(स्वाक्षरी)
**सुनीता देशपांडे**
(मूळ पत्र स्वहस्ताक्षरातील)

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ
मराठी विश्वकोश कार्यालय,
वाई (सातारा)
आवक क्र. २७५०
दिनांक: १७ AUG 1976

ooo

## रा. ज. देशमुख यांना पत्र

*(सशस्त्र लढा तीव्र होत असतानाच ३० जानेवारी १९४८ रोजी महात्मा गांधींची हत्या झाली. त्या हत्येच्या कटाचा शोध घेताना बडगे पोलिसांच्या हाती सापडला. तो माफीचा साक्षीदार झाला. त्याच्या जबानीवरून पुण्यात झडत्या घेण्यात आल्या. बाबासाहेब, देशमुख, 'कॉंटिनेंटल' चे कुलकर्णी यांना पकडण्यात आले, तुरुंगात डांबण्यात आले. बडगेकडून त्यांनी शस्त्रे खरेदी करण्यात आली होती ही बाब त्यांच्या अटकेस कारणीभूत झाली.*

*देशमुख आणि कुलकर्णी यांचा प्रकाशन व्यवसाय त्यांच्या गैरहजेरीत 'श्री विद्या प्रकाशन' चे मधुकाका कुलकर्णी व मुद्रक राजाभाऊ माटे यांनी सांभाळला. देशमुखही येरवड्याच्या तुरुंगामधून आपल्या संबंधितांशी पत्राने संपर्क साधत.*

*अशाच त्यांच्या एका पत्राचे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्याकडून उत्तर आले (७. ५.४८) )*

'आपले पत्र पावले. तुम्ही जेलमध्ये आहात हे वाचून आश्चर्य वाटले. कशाकरिता जेलमध्ये गेला आहात, याचीही माहिती मला नाही. परंतु साधारण अनुमान करण्यास आवश्यक ती माहिती आहे. एकदा सुटला असताना भेट झाली होती. श्री. ज्योतिबा फुले यांचे चरित्र दुसऱ्या कोणासही देणार नाही. आपल्या दोघांच्या विचारविनिमयाने ते छापून प्रकाशित केले जाईल. माझे मित्र श्री. चव्हाण यांस आपले बोलणे माहीत नव्हते, म्हणून त्यांनी निराळी हकीकत प्रसिद्ध केली व त्यातही चरित्र सामग्री मिळविण्याचा उद्देश मुख्य होता. येत्या आठवड्यात अधिक सामग्री मिळविण्याकरता मी पुण्यास जात आहे. ता. १५ ते २१ मे पर्यंत तेथे आहे. श्री. जेधे मोरे येथे (वाई) माझ्याकडे नुकतेच येऊन गेले. ते निराळा पक्ष काढीत आहेत. जेधे यांचा उद्देश सरळ ब्राह्मणेतर पक्ष काढावयाचाच दिसतो. नाव तेवढे निराळे राहील. त्यांच्या बऱ्याच तक्रारी महत्त्वाच्या आहेत आणि काही रास्तही आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील ब्राह्मणी वृत्तीचे डोळे उघडण्यास मदतच होईल. जाळपोळीनेही डोळे फारसे उघडले आहेत; असे नाही. परंतु डोळे लवकर उघडल्यास महाराष्ट्रातील यादवी टाळता येईल. फुले चरित्राचा उद्देश यादवी टाळण्याचा आहे. असो.

*(तर्कतीर्थांचे हे फुल्यांचे चरित्र तद्वतच देशमुखांनी आगामी प्रकाशने म्हणून जाहिरात*

*केलेली. त्यांची 'धर्म आणि समाज', 'महात्मा गांधी', 'हिंदुधर्माची समीक्षा' ही पुस्तकेही 'देशमुखांच्या' प्रकाशन संस्थेतर्फे प्रकाशित होण्याचा, योग जुळून आला नाही.)*

**('प्रकाशक रा. ज. देशमुख', संपा. सदानंद भटकळ, मुकुंदराव किर्लोस्कर जया दडकर प्रकाशक - रा.ज. देशमुख स्मृति-समिती, २७३, शनिवार पेठ, पुणे - ४११०३०. - किंमत ३००/- रुपये, प्रथमावृत्ती, पृ. २५-२६)**

❍❍❍

# प्राज्ञपाठशाळा मंडळ (रजि.) वाई

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

अध्यक्ष

संदर्भ क्र. ता. ९.४.१९६९

**खाजगी**

**प्रिय श्री. वसंतरावदादा पाटील,**

यांस सप्रेम नमस्कार वि.वि.

एका गैरसमज निर्माण करणाऱ्या परिस्थितीत मला आपणास लिहावे लागत आहे याबद्दल वाईट वाटते. ज्या व्यक्तीबद्दल माझ्या मनात प्रेमाची व आदराची भावना नेहमीच वसत आहे त्या व्यक्तीला म्हणजे आपणाला खुलासेवजा पत्र लिहावे लागत आहे. आपला व माझा निकटचा संबंध का येऊ शकला नाही याबद्दल मला नेहमीच खंत वाटत होती. परंतु त्या खंतीमध्ये पुनः विनाकारण गैरसमजाची भर पडली. खाजगी चर्चा करतांना आपण जे बोलतो त्याचा नेमका विपर्यास ऐकणारा करू शकतो. तसेच माझे मित्र श्री. रघुनाथराव पाटील यांच्याबाबतीत घडले आहे. माझ्या बोलण्यात त्यांनी वाजवीपेक्षा अधिक अर्थ पाहिला एवढेच मला म्हणावयाचे आहे. श्री. यशवंतराव चव्हाण यांना पाठविलेल्या सोबतच्या पत्रात मी सर्व खुलासा केला आहे. आपण जरूर या परिस्थितीची दखल घ्याल अशी आशा आहे.

कळावे.

आपला,

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

ooo

# प्राज्ञपाठशाळा मंडळ (रजि.) वाई

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** फोन नं. ६ व २६
विश्वस्त व अध्यक्ष वाई (जि. सातारा)

संदर्भ क्र. दि. ९.४.६९

**खाजगी**

**प्रिय श्री. यशवंतराव चव्हाण यांस -**

सप्रेम नमस्कार वि.वि.

आज सकाळी उठल्याबरोबर पुण्याहून एका मित्राचा टेलिफोन आला. त्यांनी मला एकदम खडसावण्यास सुरुवात केली.

ते म्हणाले "तुम्ही नेत्यांबद्दल बेजबाबदारपणे कोठेही काहीही बोलता."

मी त्यावर म्हणालो "असे बेजबाबदार बोलणे मी कोणाशीही नेत्यांबद्दल वा अन्य कोणाही माणसाबद्दल गेल्या बारा वर्षात केलेले मला आठवत नाही." मी लगेच पुढे म्हणालो "ही काय भानगड आहे, जर कोणा नेत्याबद्दल मी चूकून बोललो असेन तर त्याचे मनःपूर्वक प्रायश्चित घेईन आणि बोललो नसलो तरी त्यांचा गैरसमज झाला म्हणूनही प्रायश्चित्त घेईन."

तो मित्र म्हणाला "तुम्ही वसंतराव दादांचे नेतृत्व धुळीस मिळाले आहे असे काही कोणापाशी तरी नुकतेच बोलला आहात."

त्यांवर मी त्यांना उत्तर दिले की, ''असे बोलणे माझ्या कल्पनेबाहेर आहे. उलट श्री. वसंतरावदादांचे नेतृत्व हे मी अत्यंत बहुमोल समजतो व त्या नेतृत्वाला नुकत्याच झालेल्या घटनेने काही वरवर कमीपणा आलेला दिसला तरी तो तात्पुरता ठरेल. मी चार महिन्यांपूर्वी दिल्लीला साहेबांकडे असतांना साहेबांना म्हणालो होतो की, वसंतरावदादांचे निकटचे अनेक मित्र असे म्हणतात की, 'वसंतरावदादांनी पुष्कळ कामांची जबाबदारी घेतली आहे. त्यांनी काही कामे इतर नव्या नेत्यांकडे सोपविली पाहिजेत', माझे व वसंतरावदादांचे निकटचे खुल्या दिलाचे संबंध असते तर मी त्यांना यासंबंधी काही सूचना केल्या असत्या."

तेव्हा साहेब म्हणाले की, "वसंतरावदादांचा आणि तुमच्या मित्रांचा संबंध अधिक स्नेहाचा होईल याबद्दल प्रयत्न केला पाहिजे."

तेव्हा मी साहेबांना उत्तर दिले की, "माझा तसा प्रयत्न नेहमीच असतो पण माझ्या शक्तीला मर्यादा आहेत."

हे. मी बोलल्यावर पुण्याचे मित्र म्हणाले "तुमची वसंतरावदादांबद्दलची चर्चा नुकतीच कोणत्या मित्राबरोबर झाली व तुम्ही काय बोलतात ते स्पष्ट सांगा."

मी पुणे एस. टी. स्टॅण्डवर आठवड्यापूर्वी बसची वाट पाहात होतो. तेवढ्यात कराडचे श्री. रघुनाथराव पाटील भेटले. त्यांना मी सामोरा गेलो. थोडी इतर बातचीत झाल्यावर मी म्हटले की, ''तरुण पिढी जुन्या नेत्यांना स्वस्थ बसू देणार नाही म्हणून स्वत:हून पदत्याग करणे व योग्य तरुणांना निवडून नेतृत्व पदावर स्थापून मार्गदर्शन करणे हाच आता मार्ग अधिक यशस्वी होईल, वसंतरावदादांनी अगोदरच असा निर्णय घेतला असता तर चांगले झाले असते.''

यावर रघुनाथराव म्हणाले "अशाने कामे कशी होणार"?

मी उतरलो, ''कामे करवून घ्यावीत व मोठ्या नेत्यांनी लहान नेते योग्यता पाहून पुढे आणावे व स्वतः मागे राहावे याशिवाय आता यापुढे काँग्रेसचे भवितव्य सुधारण्याला दुसरा मार्ग नाही."

रघुनाथराव म्हणाले, "मंत्री पुष्कळ वर्षे स्थानाला चिकटून आहेत त्याचे काय ?"

मी म्हणालो, "माझ्या म्हणण्यात सर्व अर्थ आला." यानंतर आम्ही दोघे आपापल्या वाटेने चालायला लागलो.

या पत्राची प्रत मी श्री. वसंतरावदादांकडे पाठवीत आहे.

कळावे ही विनंती.

आपला,

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

**माननीय श्री. यशवंतराव चव्हाण,**
गृहमंत्री, भारत सरकार,
नवी दिल्ली - ११.

ooo

ता. ९-२-१९७८

**प्रिय श्री. पन्नालाल यांस**

सप्रेम नमस्कार वि. वि.

तुम्हास बार्शी निर्वाचन क्षेत्रात बहुमत मिळाले नाही याबद्दल मला वाईट वाटले परंतु आश्चर्य वाटले नाही. अजून भारतात सर्वत्र संकुचित जातिवादी प्रवृत्ती तीव्र आहेत विशिष्ट राजकीय हवाच असली तर ही प्रवृत्ती दबते, परंतु तात्पुरतीच. किंवा एखादा अल्पसंख्य जाती-जमातीचा कार्यकर्ता आपल्या निर्वाचनक्षेत्रात दीर्घकाल समाजसेवा करीत असला अथवा सत्तेच्या स्थानाचे पाठबळ मिळाले असता स्थानिक जनतेचे विधायक स्वरूपात आर्थिक प्रश्न नेटाने सोडवीत राहिला तर तोही विजयी होतो. (उदा. कोरेगाव तालुक्यातील श्री. शंकरराव जगताप हे सातारा जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष यांनी नेटाने ४-५ वर्षे स्थानिक प्रश्न सोडविण्यात सर्व वेळ खर्च केला व ते या निवडणुकीत विजयी झाले.) यालाही एक महत्त्वाचा अपवाद दिसला; सातारा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष चांगले कार्यकर्ते श्री. बाबूराव घोरपडे यांचा श्री. राजे अभयसिंह भोसले यांनी चांगला पराभव केला कारण छत्रपती.

आज वृत्तपत्रात वाचले की, तुम्ही जनता पक्षाचा एक क्रांतिकारक कार्यक्रम आखून अमलात आणू इच्छित आहात. फारच चांगली कल्पना. या कार्यक्रमाच्या संदर्भात मला असे म्हणायचे आहे -

१. प्रथम हाती आले ते चांगले पक्के करावे. ज्या सागरपट्टीच्या जिल्ह्यामध्ये वा अन्यत्र जनता पक्ष विजयी झाला ते जिल्हे अधिक जागृत, मजबूत करावे. ग्रामपंचायती, पंचायत समिती, जिल्हा परिषदा यांना आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय कार्यक्रम देऊन तेथील स्थानिक कार्यकर्त्यांना वैचारिक क्रांतीचे शिक्षण देणे आवश्यक आहे.

२. कोणताही कार्यक्रम सर्वेक्षण तपशीलवार करून त्याच्या आधारावर रचावा.

३. घेराव, बंद, संप, सत्याग्रह इत्यादी उपाय हे निरुपाय होईल. म्हणजे उघड मोठे अन्याय दिसतील तेथेच योजणे योग्य.

४. विधानसभा व विधान परिषद येथे सहकार्य व विरोध या दोन्ही प्रवृत्तींचा समतोल राखणे. आवश्यक गदारोळ शक्यतो टाळणे, दूरदर्शीपणाचे लक्षण ठरेल.

५. सत्तेवर असणाऱ्या पक्षापेक्षा विरोधी पक्षात राहणारे निकोप लोकशाही प्रवृत्ती अधिक चांगल्या रीतीने रुजवू शकतात, लोकशाही प्रथा निर्माण करू शकतात.

६. केंद्रीय जनता पक्षाच्या नव्या व्यापक धोरणामध्ये फार मौलिक तत्त्वे गृहीत धरलेली आहेत; त्यांना अनुसरूनच कार्यक्रम असावा. कुंतीचे महाभारतातील एक वचन महात्मा गांधीच्या प्रार्थनेमध्ये म्हणत असत -

विपदो नैव विपदः संपदो नैव संपद: ।
विपद्विस्मरणं विष्णोः संपन्नारायणस्मृति: ॥

आपत्ती आपत्ती नव्हेत व संपत्ती - म्ह. यश, समृद्धी - समृद्धी नव्हेत. विष्णूचे विस्मरण विपत्ती व विष्णूचे स्मरण संपत्ती होय.

या ठिकाणी विष्णूच्या ठिकाणी 'उच्च ध्येय' वा 'क्रांतीचा मार्ग' असा अर्थ घ्यावा.

७. श्री. जयप्रकाश नारायणांच्या समग्रक्रांतीचा ध्यास घेण्यानेच यशाचा मार्ग मिळू शकेल.

८. लेनिन म्हणतो - "क्रांती ही मागणी नोंदून घडत नसते." तिची तिथी अगोदर ठरत नसते. हे ध्यानात असेलच.

आपला स्नेहांकित,
(स्वाक्षरी)
**लक्ष्मणशास्त्री जोशी**

प्रति,

श्री. पन्नालाल सुराणा,

असू, परांडा, जि. उस्मानाबाद

**(संदर्भ : 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : व्यक्तित्व, कार्य आणि विचार',**
संपा. वसंत पळशीकर, प्रका. प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई,
प्रथमावृत्ती- फेब्रुवारी, १९९६, किंमत - २००/-रू, पृष्ठे - १६४,
पत्र संदर्भ पृष्ठे - ६५-६६)

ООО

दि ५-५-१९७८

**आदरणीय तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांस,**

सविनय प्रणाम.

बाबासाहेब आंबेडकर यांच्या महाड समता संग्रामाच्या संदर्भात आपला एक विशेषत्वाने उल्लेख आला आहे. म्हणून आपणास हे पत्र लिहिण्याचे धाडस करीत आहे.

१५ एप्रिल १९७८ ला परभणी येथील शासकीय महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलन प्रसंगी प्रा. नरहर कुरुंदकर यांनी अशी माहिती पुरविली की, १९२७ साली महाडला मनुस्मृती जाळल्यानंतर बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण झाले. ते भाषण संपल्यावर आपण जळालेल्या मनुस्मृतीची राख घेऊन बाबासाहेबांच्या कपाळाला लावली. हे काय म्हणून त्यांनी आपणास त्याचा अर्थ विचारला, तेव्हा आपण असे म्हणालात की, शत्रू मेला तरी त्याच्या उत्तरक्रियेला जावे. मृत्यूनंतर वैर संपत असते. त्यावर स्वत: चेही असेच मत असल्याचे बाबासाहेबांनी सांगितले. पण आपण असे म्हणालात की, हे मत आपले स्वत: चे नसून एका ग्रंथातील वाक्य आहे. तो ग्रंथ कोणता म्हणून बाबासाहेबांनी प्रश्न केला. तेव्हा त्याचे उत्तर, 'मनुस्मृती' म्हणून आपण दिल्याचे प्रा. कुरुंदकर यांनी सांगितले.

ही माहिती मला तरी अत्यंत नवीन आहे. कारण याचा उल्लेख माझ्या वाचनातून कुठेच आला नाही. मी बाबासाहेबाच्या 'बहिष्कृत भारता'तील अग्रलेखांचे संपादन केले आहे. त्यानिमित्ताने जे वाचन केले त्यातही असा उल्लेख कुठे निदर्शनास आला नाही.

महाड समता संग्रामाच्या संदर्भात मी एका पुस्तकाची योजना पूर्ण केली आहे. त्या दृष्टीने मला उपरोक्त उल्लेख अत्यंत मोलाचा वाटतो व म्हणूनच मला त्यासंबंधी सविस्तर माहिती आपणाकडून कळू शकली तर मी स्वत: ला धन्य समजेन.

प्रा. कुरुंदकरांच्या ह्या माहितीचे हे वृत्त औरंगाबादहून प्रसिद्ध होणाऱ्या 'अजिंठा' ह्या दैनिक वृत्तपत्राच्या मंगळवार दि १०-४-१९७८ च्या अंकात आलेले आहे.

तरी कृपया आपण ह्या संदर्भात अधिक माहिती पुरवाल अशी आशा व्यक्त करतो.

वस्तुतः आपल्यासारख्या ज्ञानमहर्षीला ह्या क्षुल्लक कारणासाठी तसदी देत आहे म्हणून माझी मलाच लज्जा वाटत आहे परंतु केवळ आपणच याचा अधिक खुलासा करू शकाल म्हणून हे पत्र लिहिण्याचे धाडस करीत आहे कळावे.

आपला नम्र

(स्वाक्षरी)

**रत्नाकर गणवीर**

**(संदर्भ : 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : व्यक्तित्व, कार्य आणि विचार',**
संपा. वसंत पळशीकर, प्रका. प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई,
प्रथमावृत्ती- फेब्रुवारी, १९९६, किंमत - २००/-रू, पृष्ठे - १६४,
पत्र संदर्भ पृष्ठे - ६६-६७)

○○○

दि १५.५.७८

**श्री रत्नाकर गणवीर यांस**

सप्रेम नमस्कार वि. वि

आपले दि ५-५-१९७८ चे पत्र पावले आभारी आहे.

प्राचार्य श्री. नरहर कुरुंदकर यानी दिलेली 'मनुस्मृती' जाळण्याच्या समारंभाची माझ्या संदर्भातील माहिती चुकीची नसली तरी तिचा तपशील निराळा आहे तो असा -

डॉ. बाबासाहेबांनी मनुस्मृती जाळल्यावर मी त्यांना मुंबईस भेटलो. त्यांना म्हटले की, मनुस्मृती आपण जाळली तेथील रक्षा मी बरोबर आणली आहे. ती आपल्या व माझ्या कपाळास मी लावतो. बाबासाहेबानी म्हटले की, जरूर लावा. मी रक्षा लावल्यावर त्यांनी विचारले की, मनुस्मृतीबद्दल तुमचे मत काय आहे? त्यावर मी सविस्तरपणे बोललो. मी म्हटले की, "मनुस्मृती हा ग्रंथ प्राचीन भारतीय समाजाच्या सामाजिक व धार्मिक जीवनाचा आदर्श दाखवितो. ती समाजरचना विषमतेच्या व पिळवणुकीच्या तत्त्वावर आधारलेली होती. म्हणून समतेचे नैतिक उच्च मूल्य ध्यानात धरून आज जी भारतीय समाजाची रचना करावयाची आहे. त्यास मनुस्मृतीचा विरोध आहे. म्हणून मनुस्मृती जाळणे हे लाक्षणिक अर्थाने योग्य आहे. परंतु भारतीय प्राचीन समाजाच्या धार्मिक, सामाजिक, आर्थिक जीवनाचा इतिहास समजण्याचे ते एक उत्कृष्ट साधन आहे. म्हणून त्याची उपयुक्तता कायम मानली पाहिजे." या माझ्या म्हणण्यावर बाबासाहेब म्हणाले की, "या बाबतीत तुमच्यामध्ये व माझ्यामध्ये मतभेद असण्याचे कारण नाही; परंतु माझ्या विद्यालयीन शिक्षणात संस्कृत हा विषय नव्हता त्यामुळे मी इंग्लिशमधील विद्वानांनी लिहिलेली धर्मग्रंथांची भाषांतरे व विवरणे वाचतो. मनुस्मृती मला मुळातून वाचता आली असती तर बरे झाले असते." त्यावर मी म्हटले की, "मनुस्मृतीत न जळणारी अशी काही तत्त्वे आहेतच. इतिहासामध्ये जुन्या जगातील पुष्कळसे बाद करण्यासारखे भाग असतात. परंतु काही अबाधित असेही राहते." यावर बाबासाहेब म्हणाले की "मी मनुस्मृती वाचलेली असली तरी अशा अबाधित विचारांकडे लक्ष गेले नाही." त्यावर त्यांना मी मनुस्मृतीतील सुखदु:खांची व्याख्या सांगणारा

श्लोक म्हणून दाखविला. त्यांना तो एकदम आवडला. नंतर मी मनुस्मृतीतील अंतर्विरोध दाखवून दिले. ही चर्चा पुष्कळ वेळ चालली व चहा घेऊन मी परतलो.

कळावे

आपला,

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

**(संदर्भ : 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : व्यक्तित्व, कार्य आणि विचार',**
संपा. वसंत पळशीकर, प्रका. प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई,
प्रथमावृत्ती- फेब्रुवारी, १९९६, किंमत - २००/-रु, पृष्ठे - १६४,
पत्र संदर्भ पृष्ठ - ६७)

OOO

# मराठी विश्वकोश कार्यालय, वाई (सातारा)

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** — दूरध्वनी क्र. ५३
अध्यक्ष — वाई (जि. सातारा )
पि. को. नं. ४१२८०३

संदर्भ क्र. सासमें ५४२७ — दिनांक : ६.११.७९.

**प्रिय श्री. पु. ल. देशपांडे,**

यांस - सप्रेम नमस्कार वि.वि.

आपली षष्ट्यब्दपूर्ति महाराष्ट्रभर उत्साहाने साजरी होत आहे. रसिकाचे केवढे मोठे जग आपणाकडे आकर्षित झालेले आहे हे पाहून फार समाधान वाटले. आपण 'महाराष्ट्र टाइम्स' ला स्वतःसंबंधी काही लिहिण्यासंबंधी नकार दिला हे वाचून कालिदासाच्या "बलवदपि शिक्षितानात्मन्यप्रत्ययं चेतः!" या उक्तीची आठवण झाली. कलाकाराला स्वतःचे बळ नीट कळत नसते परंतु त्याचे बळ रसिकाला खूप जाणवते. अशांपैकीच मी एक आहे.

आपणास व सौ. सुनीताबाईंना दीर्घायुष्य लाभो अशी शुभकामना याप्रसंगी व्यक्त करतो.

आपला स्नेहांकित,

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

प्रति :

**श्री. पु. ल. देशपांडे,**
७७७, रुपाली, शिवाजीनगर,
पुणे-४११ ००४.

OOO

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**
दि. ३.२.१९८२

**स. न. वि. वि.**

आपला दोन दिवसांचा सहवास फार आवडला. चाळीस वर्षांपूर्वी पाहिलेली वणी फार बदललेली दिसली. जनमानसात खूप फरक पडलेला लक्षात आला. आपण व आपल्या पत्नी यांच्या सौजन्याचा अनुभव आला. हे एकंदरीत अविस्मरणीय असेच म्हणता येईल.

आपले महाविद्यालय पाहिले. परिसर फार उत्तम आहे. ग्रंथालय संपन्न केले आहे. ग्रंथालय ही निरंतर वाढणारी संस्था असते. वणीसारख्या तालुक्याच्या ठिकाणी एवढे मोठे ग्रंथालय आहे. अशातऱ्हेचा ग्रंथालयाचा तालुका महाराष्ट्रात क्वचित असेल. वाई हे असेच ग्रंथालयाच्या दृष्टीने अपवादभूत स्थान आहे. आपण वाईस भेट द्यावी अशी मला उत्कट वासना उत्पन्न झाली आहे. तरी वासना लवकरच सफल होईल अशी अपेक्षा बाळगतो.

श्री. ढुमे वकील, प्रा. रमाकांत देशपांडे, प्रा. तांबोळी व समाजसेवक श्री. दादासाहेब हूड या सर्व परिचितांना माझा नमस्कार कळवावा ही विनंती. कळावे.

आपला स्नेहांकित,
(स्वाक्षरी)
**लक्ष्मणशास्त्री जोशी**

प्रति,
प्राचार्य राम शेवाळकर,
लोकमान्य टिळक महाविद्यालय,
वणी, जि. यवतमाळ.

**(पत्रसंवाद १३, संपादक - सौ. शोभा उबगडे, प्रकाशक - साहित्य प्रसार केंद्र, सीताबर्डी, नागपूर - ४४००१२, प्रथमावृत्ती - १९ नोव्हेंबर, २००५, मूल्य - रू. १००/-, पृ. ७७-७८)**

ooo

## महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी अध्यक्ष

मराठी विश्वकोश कार्यालय, वाई (जि. सातारा)

दि. २५ मार्च १९८३

**स.न.वि.वि.**

आपली विदर्भ साहित्य संघाच्या ''अध्यक्ष'' पदी बिनविरोध सर्वानुमते निवड झाली असे वाचण्यात आले. खूप आनंद झाला, कारण बिनविरोध निवड झाली हे होय. मी गेल्या जानेवारीत नागपूर येथे विदर्भ साहित्य संघाच्या हीरक महोत्सवास गेलो होतो. तेव्हा पुढील अध्यक्ष कोण याची चर्चा चाललेली ऐकली. त्यात आपलेच नाव विशेषेकरून घेतले जात होते. फार महत्वाकांक्षी कार्यक्रम घेऊन त्याची अंमलबजावणी करण्यात मोठी शक्ती वाया घालवू नये. सुटसुटीत असा जनमनोरंजनाचा आणि जनता शिक्षणाचा कला, साहित्यविषयक कार्यक्रम वारंवार घेतला तर विदर्भ व विशेषतः नागपूर येथील सामान्य जन व विशेष सुशिक्षित वर्ग आपणास मनःपूर्वक धन्यवाद देईल. आपल्या आयुष्यात ही ''अध्यक्ष''पद प्राप्ती सुवर्णसंधी आहे.

''अध्यक्ष'' पद प्राप्तीबद्दल मनःपूर्वक अभिनंदन.

कळावे, ही विनंती.

आपला स्नेहांकित

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

प्रति,

प्राचार्य राम शेवाळकर,

अध्यक्ष, विदर्भ साहित्य संघ,

नागपूर.

**(पत्रसंवाद - संपादक - सौ. शोभा उबगडे, प्रकाशक- साहित्य प्रसार केंद्र, सीताबर्डी, नागपूर - ४४००१२, प्रथमावृत्ती - १९ नोव्हेंबर, २००५, मूल्य - १०० रूपये, पृ. ७८-७९)**

○○○

## महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ.

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

अध्यक्ष वाई

संदर्भ क्रमांक : विनिर्म-१०८३/४४५० दिनांक : २९/१०/१९८३

**श्री बाबा व. सौ. साधनाताई आमटे**

यांस-सप्रेम नमस्कार वि.वि.

"आनंदवन" सोडताना आपली भेट घेतली आणि निघालो. "आनंदवना" बद्दल अनेक वर्षे वाचत होतो, ऐकत होतो. परंतु या प्रत्यक्ष भेटीत वाचले आणि ऐकले यापेक्षा अगदी निराळा अतिशय संपन्न व विचारास फार महत्वाची माहिती देणारा असा प्रत्यय आला. आपण अपंग मनुष्याला अव्यंग मनुष्याइतकेच मानसिक आणि आर्थिक सामर्थ्य येते ही गोष्ट सप्रयोग सिध्द केली आहे ; त्याचप्रमाणे आर्थिकदृष्ट्या ढासळलेली खेडी आणि यावे पुन: ऊर्जितावस्थेत कशी आणता येतील याचाही उत्कृष्ट नमुना [मॉडेल] "आनंदवना" च्या रूपाने उभा केला आहे. एकप्रकारे अनपेक्षित व कल्पनेनेही अभावित असे सामान्य जनांचे नवे सदृढ व निरामय विश्व कसे असावे याचेही दर्शन मन:चक्षुला आपल्या या "आनंदवना"च्या उदाहरणाने होते.

आपले आतिथ्य विशेष प्रकारचे होते. आणि आपले चिरंजीव डॉ. विकास यांनी "आनंदवना"चा अभ्यास कसा करावा याचे चांगले मार्गदर्शन आम्हास केले आहे.

कळावे, ही विनंती.

आपला स्नेहांकित,

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

○○○

## **महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ.**

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

अध्यक्ष वाई

विनिमं- १०९४/१७५ दिनांक: ७/२/९४

**प्रिय डॉ. श्रीराम कामत,**

यांस-सप्रेम नमस्कार, वि. वि.

दिनांक २८, २९ व ३० जानेवारी, १९९४ रोजी पणजी येथे भरलेल्या ६७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य समेलनासाठी आम्ही उपस्थित राहिलो असता पणजी येथील वास्तव्यात आपण दिलेल्या मोलाच्या सहकार्याबददल आपला आभारी आहे. असाच आपल्या सहकार्याचा पुन्हा लाभ होईल अशी आशा आहे.

आपला स्नेहांकित,

(स्वाक्षरी)

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

प्रति,

**डॉ. श्रीराम पांडुरंग कामत,**

विश्वचरित्र संशोधन केंद्र, गोवा,

१, मणेरकर फ्लॅट्स,

कविवर्य बा. भ. बोरकर मार्ग,

पर्वरी-गोवा- ४०३ ५२१.

ooo

# १७.
# संकीर्ण पत्रव्यवहार

विनिमं - ११८२/२९१४ ५/६/१९८२

**मा. ना. प्रा. एस. एस. आय. असीर,**
स्वागताध्यक्ष, अखिल भारतीय दलित साहित्य संमेलन,
जिल्हा परिषद कंपौन्ड,
अहमदनगर - ४१४ ००१

विषय : पारितोषिक योजना १९८२ अहवाल

उपर्युक्त विषयावरील आपले दिनांक १७/५/१९८२ चे पत्र मला मिळाले. दलित साहित्य संमेलनात दिनांक ४ जून १९८२ रोजी मी उपस्थित राहाणार होतो. परंतु प्रवासातील काही अडचणींमुळे मी पुण्याहून नगरला पोचू शकलो नाही.

२. दलित साहित्यिकांच्या उत्कृष्ट साहित्यकृतींना पारितोषिके देण्याच्या निवड समितीवर मी एक सदस्य म्हणून आहे. माझा यासंबंधीचा अहवाल सोबत पाठविला आहे. कृपया अहवाल मिळाल्यानंतर कळवावे, ही विनंती.

कळावे.

आपला स्नेहांकित,
(स्वाक्षरी)
**लक्ष्मणशास्त्री जोशी**

१) श्री. बाबूराव बागुल : दलित साहित्य : आजचे क्रांतिविज्ञान १९८१

प्रस्तुत ग्रंथात दलित साहित्याची तात्विक भूमिका, त्यामागील सामाजिक क्रांतीची प्रवृत्ती व त्या दृष्टीने केलेली पारंपारिक भारतीय संस्कृतीची मीमांसा यासारखे महत्त्वाचे विषय प्रभावीपणे हाताळलेले आहेत.

२) श्री. नामदेव ढसाळ - तुझी इयत्ता कंची - १९८१

प्रतिभावंत दलित कवी श्री. ढसाळ यांचा का ‘गोलपिठा’ नंतरचा तेजस्वी काव्यग्रंथ. दलित काव्याची शिखरे ठरावीत, असे हे दोन्ही काव्यग्रंथ आहेत.

३) प्रा. रा. ग. जाधव - निळी पहाट : १९७८- दु. आ. १९७९

दलित साहित्य चळवळीशी प्रथमपासून निगडित असलेल्या प्रा. जाधवांचा हा ग्रंथ दलित साहित्यावरील एक प्रमाणभूत व सर्वमान्य ग्रंथ मानला जातो. एक वर्षातच या

वैचारिक ग्रंथाची दुसरी आवृत्ती निघाली. हे त्याचे गमक होय. या नव्या साहित्यप्रवाचा नवेपणा नेमका हेरून व सम्यक समतोल व सखोल अशा ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि वाङ्मयीन दृष्टीचा समतोल राखऊन केलेली यातील मीमांसा मराठीत अनन्यसाधारण आहे. श्री. जाधव हे स्वत: दलित नाहीत; पण महाराष्ट्रात समाजमनस्क व समाजदक्ष अशा समतोल विवेकवादाची जी उदारमतवादी परंपरा गेल्या शतकापासून चालत आली, त्या परंपरेतच जाधवांचे हे ग्रंथकार्य शोभणारे आहे. या ग्रंथाचा गौरव महाराष्ट्राच्या या अभिमानास्पद परंपरेचा गौरव ठरेल.

हा ग्रंथ प्राज्ञपाठशाळेने (१ली आवृत्ती) प्रकाशित केला होता.

या ग्रंथाला महाराष्ट्र साहित्य परिषदेचेही पारितोषिक देण्यात आले होते. दलित साहित्यावरील दुसरा मौलिक ग्रंथ नागपुरच्या अमेय प्रकाशनातर्फे जून १९८२ मध्ये प्रकाशित होत आहे.

प्रा. जाधव यांच्या साहित्य आणि सामाजिक संदर्भ (१९७५) व आनंदाचा डोह(१९७६ संत तुकारामांच्या अभंगावरील सृजनशील समीक्षा) या ग्रंथांना राज्यशासनाची उत्कृष्ट समीक्षा ग्रंथांची पारितोषिके मिळाली आहेत.

प्रा. जाधव हे पीएच.डी.प्रंबधाचे एक परीक्षक असून शिवाजी विद्यापीठातील प्रा. निर्मळे यांचा 'दलितांची नियतकालिके' (१८५० ते १९५०) या प्रबंधाचे परीक्षक म्हणून त्यांनी काम केले आहे.

प्रा. जाधवांचे एकूण दहा समीक्षा ग्रंथ आजवर प्रसिद्ध झाले असून ललित मासिकाच्या 'आजचे टीकाकार' या मालेत त्यांची मुलाखत यापूर्वीच (१९७८) प्रसिद्ध झाली.

वाई (स्वाक्षरी)

दिनांक - २/६/१९८२ **लक्ष्मणशास्त्री जोशी**

ooo

MAHARASHTRA STATE MARATHI VISHWAKOSHA NIRMITI MANDAL

**LAXMANSHASTRI JOSHI**
*CHAIRMAN* Wai

Ref. No. VNM 9982/5096 Date 13-10-1982

Dear Dr. Syed Asad Ali,

Received your letter No. Edit/Ma/Trans-Semi/82/1839 dated 7th October 1982 and tharks for the same.

I am very much happy to know that the National Book Trust is taking seriously the problem of translation. Unless the problem is squarely faced and difficult issues involved in it are analised in depth. The western modern thought can be rendered in our regional national languages. The modernization of our languages is dependent upon the proper translation skill that can be developed only by the good translation method and style.

I accept your kind invitation to preside over two day swminar on "The Problems and Importance of Translation" to be held at Pune on 6th and 7th Dec. 1982. I would also weite a paper on the subject "Translations of the Classics into Marathi".

With best regards,

Yours sincerely,
Signature
**(LAXMANSHASTRI JOSHI)**

**Dr. Syed Asad Ali,**
Jt. Director (Publishing)
National Book Trust, India,
A 5 Green Park,
NEW DELHI - 100 016.

Marathi Vishwakosha Office, Wai (Dist. Satara) 412 803.
Tel. No. Office : 53 Residence : 26

ooo

**GOD IS LOVE**

**PRARTHANA SAMAJ POONA**

*441, Budhwar, Poona 2.*

१७ मार्च १९८२

माननीय तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी,

यांसी कृ. सा. न. वि. वि.

पुणे प्रार्थना समाजाचा वार्षिक उत्सव शुक्रवार दि. ९ एप्रिल ते रविवार दि. १८ एप्रिल १९८२. असा एकूण दहा दिवस साजरा करण्याचे योजिले आहे.

या उत्सवामध्ये आपण एक व्याख्यान द्यावे अशी मी पुणे प्रार्थना समाजातर्फे आपणांस विनंती करीत आहे. व्याख्यानाचा विषय ''विश्वधर्म'' हा किंवा अशाच प्रकारचा आपल्या सूचनेनुसार ठेवावा अशी इच्छा आहे.

पुणे प्रार्थना समाजावर पूर्वीपासून आपला लोभ आहेच. येथील उत्सवात अनेकदा भाग होऊन आपण तो वेळोवेळी व्यक्तही केला आहे. हे सर्व स्मरूनच आपणांस मी ही विनंती करीत आहे.

आपल्या सवडीनुसार गुरूवार दि. १५ एप्रिल अगर शुक्रवार दि. १६ एप्रिल १९८२ यापैकी कोणताही एक दिवस आपण निश्चित करून आम्हांस कळवा. व्याख्यानाची वेळ सायंकाळी ६.३० वाजता व स्थळ पुणे प्रार्थना समाजाचे हरिमंदीर हे ठेवण्यात येईल. व्याख्यानाची कालमर्यादा एका तासाची असावी.

आपण ही विनंती मान्य कराल अशी मी आशा करतो.

आपला ,

(स्वाक्षरी)

**अभय शर्मा.**

ooo

अरुण कांबळे
त्रिकाल, ३०८/६८३३
पंतनगर, घाटकोपर (पूर्व)
मुंबई ४०००७५
दि. ३० ऑक्टो. १९८२

माननीय तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी,

स. न. वि. वि.

दि. २९ ऑक्टो. रोजी साहित्य संघात मी व दिनकर साक्रीकर यांनी सांगितल्याप्रमाणे दि. ४ नोव्हे. रोजी मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर येथे सायं. ६ वाजता 'रामायणातील संस्कृती संघर्ष' या माझ्या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून येण्याचे आपण मान्य केल्याबद्दल मन:पूर्वक आभारी आहे.

(स्वाक्षरी)
**अरुण कांबळे**

ooo

कोल्हापूर
१६-४-८३

पूज्य तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
यांना सादर प्रणाम

अनपेक्षितपणे हे पत्र आपल्यास लिहीत असल्याबद्दल सर्वप्रथम आपली माफी मागतो.

शिवाजी विद्यापीठात आपली व्याख्याने ऐकली. आपण विश्वकोश लिहीत आहात. असे काम करणे हे महान व्यक्तीचे कार्य आहे, मोठे व कष्टाचे काम आहे.

या निमित्ताने मला आपणांस सुचवावेसे वाटते की फेब्रु. १९८४ मध्ये श्रीधर व्यंकटेश केतकर, मराठीतून ज्ञानकोश लिहिणारे महाराष्ट्रीय थोर पुरुष यांच्या जन्मास १०० वर्षे पुरी होतील. मी त्यांचा कोणीही नातेवाईक किंवा संबंधी नाही. पण त्या काळात त्यांनी जे महान कार्य प्रतिकूल परिस्थितीत केले त्याचे महत्त्व आजही आहे. या निमित्ताने काही कार्य (शताब्दी निमित्त) सुरू असेलही, पण मला त्याची माहिती नाही.

तरी श्री. केतकर यांची जन्मशताब्दी साजरी करून कार्याची माहिती सर्व मराठी जनतेस, सामान्यांस होण्यासाठी आपण लेख, व्याख्याने किंवा इतर प्रकारे कार्यरत व्हावे असे वाटते. यासाठी आपल्यासारखीच तोलामोलाची व्यक्ती लागेल. हे माझे वैयक्तिक विचार आहेत. तरी आपणास शक्य झाल्यास हे काम होईल अशी आशा आहे.

आ. नम्र
स्वाक्षरी
**T.K.Shinde**

ता. क.

मला श्री. केतकर यांच्या कार्याबद्दल प्रेम असल्याने हे पत्र लिहिले आहे. तसदीबद्दल क्षमा अपेक्षितो.

**श्री. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**
विश्वकोश कार्यालय, वाई, जिल्हा सातारा

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ
मराठी विश्वकोश कार्यालय,
वाई (सातारा)
आवक क्र. १४७९ दिनांक: 20 APR 2020

○○○

११-६-८३

प्रिय डॉ. राजमाचीकर

यांस - सप्रेम नमस्कार वि. वि.

विषय : श्री. शास्त्रीजींवरील लघुपट

उपर्युक्त विषयावरील आपले ७ जून १९८३ चे पत्र श्री. शास्त्रीजींना मिळाले. आपल्या पत्राबद्दल श्री. शास्त्रीजी अत्यंत आभारी आहेत.

आपल्या पत्रातील आशय कळला. श्री. शास्त्रीजींना आपला उपक्रम मान्य आहे. मी हे पत्र लिहिण्यापूर्वी आज सकाळी श्री. माधवराव गडकरी यांच्याशी अन्य कामानिमित्त बोललो. त्यांनाही आपले पत्र आल्याचे सांगितले.

श्री. शास्त्रीजी दिनांक १६ जून १९८३ रोजी दुपारी मुंबईस येत आहेत. दिनांक २० जून १९८३ पर्यंत त्यांचा मुंबईस मुक्काम आहे. या मुदतीत श्री. शास्त्रीजींसह आपण मुंबईत अवश्य भेटू. श्री. माधवराव गडकरी यावेळी उपस्थित राहतील. आज सकाळी फोनवर मी याची कल्पना त्यांना दिलेली आहे. कृपया आपणही त्यांच्याशी संपर्क साधावा. श्री. शास्त्रीजी जुलै १९८३ च्या पहिल्या आठवड्यात त्यांच्या चिरंजीवांकडे - डॉ. मधुकर जोशी यांच्याकडे अमेरिकेस जात आहेत. सप्टेंबर १९८३ च्या पहिल्या आठवड्यात ते भारतात परत येतील.

मी मुंबईत आल्यानंतर आपणास फोन करीनच.

कळावे, ही विनंती.

आपला स्नेहांकित

स्वाक्षरी

**(राम कोल्हटकर)**

अध्यक्षांचे स्वीय साहायक

प्रति,

**१. डॉ. सतीश राजमाचीकर,**

२/६, गुरुदेव, प्रभादेवी, सी फेस,

मुंबई - ४०००२५.

**प्रत माहितीकरिता रवाना -**

**२. श्री. माधवराव गडकरी,**

जे- १५, नवप्रभात, को-ऑपरेटिव्ह हौ. सो.

हनुमान रोड, विलेपार्ले, मुंबई - ५७.

ooo

**MAHARASHTRA STATE MARATHI VISHWAKOSHA NIRMITI MANDAL**

**laxmanshastri Joshi** — **Marathi Vishwakosha Office**

*CHAIRMAN* — *Wai (Dist. Satara) 412 803*

*Ref. No. विनिमं - १०८३/ ३८०५* — *Date :* १० सप्टेंबर १९८३,
गणेश चतुर्थी,
सायं. ४ वा.

ती. श्री. अबा,

यांचे सेवेशी - कृ. सा. न. वि. वि.

दिनांक ७ सप्टेंबरला मुंबई कार्यालयातून मी तुमच्याशी फोनवर बोललो. त्यापूर्वी दिनांक २ सप्टेंबरला वाईहून पहाटे फोनवर बोललो. वाईहून बोलणे स्पष्ट येत नव्हते. दिनांक २४ सप्टेंबरला येथील डॉक्टरांकडे पुन: जावयाचे आहे असे तुम्ही सांगितले. त्यामुळे तुमचे भारतात सप्टेंबर १९८३ अखेर येणे होईल असे वाटते. मात्र इकडे घाईने येण्याचे कारण नाही.

२. सौ. सुमनकडील सर्व ठीक आहे. सौ. सुमनने माहीम येथील जागेच्या संदर्भात अपील दाखल केले. सौ. मालूबरोबर चि. अशोक खांडकरच्या सहीकरिता काही शेअर्स सर्टिफिकेट पाठविली होती. ती सर्टिफिकेटस् त्याने सह्या करून अद्याप पाठविली नसल्यास त्वरित पाठविण्यास सांगावे. मुदत संपत आली आहे. ४-५ दिवसांपूर्वी चि. अशोक खांडकरचा सौ. सुमनला फोन आला होता. त्यावेळी कागद पाठवीत आहे असे तो सौ. सुमनला म्हणाला.

मी. दिनांक ६ ते ८ सप्टेंबर १९८३ ला मुंबईस होतो. त्या वेळी सर्वश्री बाबासाहेब कर्णिक, माधवराव गडकरी, मोहन पाटील, डॉ. इनामदार व प्रा. केशवराव पुरोहित यांच्या भेटीगाठी झाल्या सर्वांना तुमच्या मोतीबिंदुच्या शस्त्रक्रियेसंबंधी सांगितले. सर्वांनी तुम्हास नमस्कार सांगितले आहेत. प्रा. केशवराव पुरोहित यांनी तुम्हास श्री. मधुकरच्या पत्त्यावर पत्र लिहिले आहे. डॉ. सौ. अमिता दातार, चि. राम, डॉ. अण्णासाहेब दातार यांनाही प्रकृतीसंबंधी भेटून समक्ष सांगितले.

आज स्वतंत्रपणे येथील निरनिराळ्या विषयावरील वृत्तपत्रीय कात्रणांचे एक पाकीट रवाना केले आहे. माझी मागील पत्रे व कात्रणांची पाकीटे मिळाल्याचे तुम्ही फोनवर मला सांगितले.

३. **प्राज्ञपाठशाळा मंडळ** :

शनिवार दिनांक ३ सप्टेंबरला इंडियन इंस्टिट्यूट ऑफ एज्युकेशन, पुणे येथे संचालक

मंडळाची बैठक घेतली. ही बैठक प्रा. मे. पुं. रेगे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. बैठकीस श्री. बापूसाहेब बोंद्रे, श्री. तांबेशास्त्री, प्रा. देवदत्त दाभोळकर, ॲड. अशोक भट, डॉ. लोखंडवाला हे सदस्य व आम्ही उपस्थित होतो. बैठकीत धर्मकोश संपादकीय कार्याचा आढावा. 'नवभारत मासिक'', प्राज्ञप्रेस, हातकागद कारखाना व सन १९८२-८३ चे हिशोब यावर चर्चा झाली. यानंतरची बैठक शारदोत्सवात गुरुवार दिनांक १३ ऑक्टोबर १९८३ रोजी घेण्याचे ठरले. या बैठकीपूर्वी पूर्ण केंद्रासाठी नियुक्त केलेल्या स्थानिक समितीचीही बैठक घेतली.

दिनांक ३ सप्टेंबर १९८३ रोजी श्री. नारायण मराठे यांचे कलकत्त्याहून पत्र आले. दिनांक १५ सप्टेंबरच्या सुमारास ते वाईस कामाकरिता येत आहेत.

४. **नवभारत मासिक**

'नवभारत' मासिकाच्या नोव्हेंबर - डिसेंबर १९८३ हा जोडअंक 'दिवाळी विशेषांक' म्हणून प्रसिद्ध करीत आहोत. या अंकात १)पंजाब समस्या, २) श्रीलंका आणि भारत, ३) केंद्र-राज्य संबंध, ४) आराम समस्या, ५) मंडल आयोगाच्या शिफारशी, ६) औद्योगिक अशांतता, ७) हिंसाचार, ८) भ्रष्टाचार, ९) स्त्रियांवरील अत्याचार, १०) सामाजिक मानसिक दुरावा या विषयांवर लेख मागविले जात आहेत. तुमचाही एक लेख गृहीत धरला आहे.

दिनांक ६,७ सप्टेंबरला मी मुंबईस होतो. 'नवभारत'च्या दिवाळी अंकासाठी जाहिराती मिळविण्याकरिता प्रयत्न केला. पाच-सहा हजाराच्या जाहिराती मिळाली. दिनांक १४ सप्टेंबरला पुन: मुंबईस जाऊन अधिक प्रयत्न करणार आहोत.

५. **शारदोत्सव** :

संस्थेचा यंदाचा शारदोत्सव गुरुवार दिनांक १३ ऑक्टोबर १९८३ ते शनिवार दिनांक १५ ऑक्टोबर १९८३ पर्यंत व्हावयाचा आहे. दि. १६ ऑक्टोबरला दसरा आहे.

शारदोत्सवातील व्याख्यानाकरिता अनुक्रमे डॉ. रा. चिं. ढेरे, प्रा. स. शि. भावे, श्री. रमेश मंत्री यांना पत्रे पाठविली आहेत. डॉ. रा. चिं. ढेरे व प्रा. स. शि. भावे यांची संमती आली आहे.

६. **मराठी विश्वकोश** :

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाची अडून पडलेली प्रकरणे मार्गी लागली आहेत. थकित प्रकरण यादीपैकी काहीच प्रकरणे शिल्लक राहिली आहेत.

१. मंडळावर नवीन स्वीकृत सदस्य घेणे व समित्या निर्माण करण्यास शासनाने दिनांक २४ जुलै १९८३ रोजी आदेश दिले. त्यानुसार मंडळाच्या दिनांक २१ एप्रिल १९८१ च्या बैठकीतील ठरावानुसार नेमलेल्या स्थायी समितीबाबत मंडळाच्या सचिवांच्या (श्री. पं. रा. पाटील) स्वाक्षरीने दिनांक ३ सप्टें. ८३ रोजी रीतसर परिपत्रक काढले. यात पुढील

सदस्यांचा समावेश आहे.

| | |
|---|---|
| १. तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी | अध्यक्ष |
| २. श्री. गो. वा. बेडेकर | सदस्य |
| ३. प्रा. के. ज. पुरोहित | सदस्य |
| ४. श्री. राजाभाऊ कुलकर्णी | सदस्य |
| ५. श्री. स. आ. सप्रे | सदस्य |
| ६. श्री. पं. रा. पाटील | सचिव |

२) या स्थायी समितीची पहिली बैठक दिनांक २७ सप्टेंबरला मुंबईस घेत आहोत. खंड क्र. १२ व १३ ला लागणाऱ्या बायबल व आर्ट पेपर खरेदी करावयाचा आहे. टेंडर्स मागविली आहेत. बैठकीच्या निर्णयानुसार योग्य त्या विक्रेत्याकडून कागद खरेदीची कार्यवाही होईल.

३) श्री. पाटील यांचे सचिव म्हणून अद्याप आदेश झालेले नाहीत.

४) मंडळाची पुढील बैठक दिनांक २४ ऑक्टोबरला गोव्यात घेत आहोत.

५) तुमच्या शासकीय वाहनाचा रीतसर प्रस्ताव सांस्कृतिक विभागाकडून अर्थ खात्याकडे पाठविला आहे.

७. **राजकीय परिस्थिती** :

महाराष्ट्रातील राजकारणात विशेष घडामोडी नाहीत. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) पक्षाची राज्यस्तरीय कार्यकारिणी अद्याप जाहीर झालेली नाही. या विषयासंबंधी पक्षातील निरनिराळ्या गटात हालचाली सुरू आहेत. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व प्रदेशाध्यक्ष यांच्यात बोलणी सुरू आहेत. प्रदेशाध्यक्ष प्रा. एन.एम. कांबळे लवकरच काँग्रेस श्रेष्ठींना यादी सादर करतील. दिनांक १५ सप्टेंबर १९८३ पर्यंत नावे जाहीर होती. माजी मुख्यमंत्री बॅ. बाबासाहेब भोसले, श्री. बाबूराव काळे (मराठवाडा), माजी मंत्री श्री. त्र्यं. गो. देशमुख (नागपूर) इ. चा असंतुष्ट गट ''तिसरी शक्ती'' म्हणून संबोधला जाऊ लागला आहे. कार्यकारिणी बनविण्याच्या संदर्भात त्यांचे मतभेद दिसतात.

आसाम व पंजाब प्रश्नासंबंधी विशेष प्रगती नाही. गेल्या आठवड्यात राष्ट्रीय स्तरावरील चार विरोधी पक्षांची आघाडी स्थापन झाली आहे. यामध्ये काँग्रेस (एस.), लोकशाही काँग्रेस (बहुगुणा), जनता पक्ष व राष्ट्रीय काँग्रेस या पक्षांचा समावेश आहे.

८. **पर्जन्यमान** :

१ सप्टेंबर १९८३ नंतर पर्जन्यवृष्टीत फरक पडला. मध्यम स्वरूपाचा कमी अधिक पाऊस चालू आहे. महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण आता कमी झाले आहे. सर्वत्र पाऊस चांगला झाला. खरीप पिके उत्तम येतील. पूर ओसरू लागले आहेत. मुंबईचा पाऊस कमी झाला. मात्र दरवर्षीपेक्षा यंदा पावसाने सरासरी ओलांडली. सणासुदीचे दिवस सुरू आहेत. जीवनावश्यक वस्तुंचे भाव भडकले आहेत. त्याकरिता विरोधी पक्षांतर्फे मोर्चे, निदर्शने सुरू आहेत.

९. **संकीर्ण विषय** :

१. 'मनुस्मृती :काही विचार'' या ग्रंथावरील दै. केसरीच्या दिनांक २१/८/१९८३ व २८/८/१९८३ च्या अंकातील दोन्ही कात्रणे तुम्हास मिळाली असतीलच. काहींनी त्यावरील चांगल्या प्रतिक्रिया पत्राने कळविल्या आहेत.

२. दिनांक २४ ऑगस्ट १९८३ ला महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळातर्फे डॉ. रा. चिं. ढेरे यांना ''गौरववृत्ती'' दिली. माननीय श्री. यशवंतराव चव्हाण प्रमुख पाहुणे होते. माननीय श्री. सुशीलकुमार शिंदे अध्यक्ष होते. डॉ. ढेरे यांचे सत्कारास उत्तरादाखल जे भाषण झाले ते फारच मार्मिक व उच्चपातळीचे झाले होते. त्यांच्याच भाषणाने समारंभ वरच्या पातळीवर जाऊन पोचला. श्री. यशवंतराव चव्हाण यांनी तर डॉ. ढेरे यांच्या भाषणाचे फारच कौतुक केले. या समारंभाच्या वेळी मी श्री. यशवंतराव चव्हाण यांना भेटलो. तुमच्या प्रकृतीबद्दल त्यांनी आस्थेने चौकशी केली.

३. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे कुलगुरू म्हणून प्रा. भोगीशयन, सोलापूर यांची शासनाने नियुक्ती केली. दिनांक २० सप्टेंबर १९८३ पर्यंत डॉ. रा. कृ. कणबरकर हे कुलगुरू आहेत. प्रा. भोगीशयन यांनी आत्तापर्यंत अनेकवेळा हंगामी कुलगुरू म्हणून काम पाहिलेले आहे.

४. चि. वासुदेवचे पत्र तुम्हास मिळाले असावे. ''रेनेट'' (चीजकरिता लागणारी वस्तू) संबंधी त्याने पत्रात सविस्तर कळविले आहे. येताना तुम्ही ते आणालच.

५. अमेरिकेतील ख्यातनाम पत्रकार श्री. सॅम्युएल हर्श यांनी नुकताच एक ग्रंथ प्रकाशित केला आहे. डॉ. हेन्री किसिंजर यांच्या कारकिर्दीच्या संदर्भात हा ग्रंथ आहे. ग्रंथाचे नाव 'प्राइस ऑफ पॉवर' असे असावे. येताना हा ग्रंथ मिळाल्यास आणावा. श्री. मधुकाका कुलकर्णी यांना तो पाहिजे.

६. श्री. बापूसाहेब बोंद्रे दिनांक ७ सप्टेंबरला अमेरिकेस गेले आहेत. 'ॲम्स्टरडॅम' येथे आहेत. २४ सप्टेंबरला भारतात परत येतील. तुम्हाला ते श्री. मधुकर किंवा सौ. मालुकडे फोन करतील.

चि. वासुदेवने तुम्हाला लिहिलेले पत्र या पत्रासोबतच पाठवीत आहे.

बाकी इकडील सर्व ठीक.

श्री. मधुकर, सौ. इंदू यांना सा. न. मुलांना आशीर्वाद.

कळावे.

तुमचा नम्र,

स्वाक्षरी,

**(राम कोल्हटकर).**

000

क्र. राशैवतंसं./निर्मिती/९३-९४/६५७
राज्य शैक्षणिक व तंत्रज्ञान संस्था,
आगरकर मार्ग, पुणे; - ४११ ००४.
दिनांक : २३-९-९३

प्रति,
**तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी**
मराठी विश्वकोश
शासकीय मुद्रणालय, वाई - ४१२८०३
जिल्हा : सातारा

विषय : ''बालचित्रवाणी'' या संस्थेसाठी
तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांची मुलाखत घेणेबाबत

मा. महोदय,

''बालचित्रवाणी' ही संस्था लहान मुलांसाठी आणि शिक्षकांसाठी दूरदर्शनवरील शैक्षणिक कार्यक्रम तयार करते. या कार्यक्रमांचे प्रक्षेपण रविवार खेरीज दररोज सकाळी १०.०० ते १०.४५ या वेळात असते.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींची मुलाखत तसेच मराठी विश्वकोश निर्मितीच्या कार्यपद्धतीवर आधारित एक कार्यक्रम करावयाचा आहे. तरी त्यासाठी आपली मान्यता मिळावी ही विनंती. चित्रीकरणासाठी आम्ही दि. २७.९.९३ रोजी वाई येथे येणार आहोत याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू
स्वाक्षरी
**(गौरी तावरे)**
निर्माती

○○○

**THE WORLD BIOGRAPHICAL RESEARCH CENTER, GOA**

(VISHVA CHARITRA SANSHODHAN KENDRA, GOA)

FOUNDED ON 16TH SEPT. 1977 REGD, UNDER INDIAN TUST ACT, 1882

REGD. OFFICE

1. MANERKAR FLATS, POET B. B. BORIKAR ROAD, ALTO-PORVORIM-GOA 403 521

PROJECT UNDERTAKEN : THE ENCYCLOPAEDIA OF WORLD BIOGRAPHY

‘विश्वचरित्र कोश’

**LATE PADNASHREE B. B. BORKAR** **REF.NO.**

*FOUNDER PRESIDENT* *Date :* १० फेब्रुवारी १९९४

**DR. (PROF) DADASHIV GANESH DEO**

*PRESIDENT*

गु. तर्कतीर्थ शास्त्रीबुवा यांस,

आम्हा सगळयांचे सा. न. वि. वि.,

आपले क्र. विनिमं १०९७/१७५, दिनांक ७.२. १९९४ चे कृपापत्र आताच मिळाले. अभारी आहे.

दिनांक २८, २९ व ३० जानेवारी, १९९४ रोजी पणजी येथे भरलेल्या ६७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी आपण उपस्थित राहिला असता पणजी येथील आपल्या वास्तव्यात मी दिलेल्या मोलाच्या सहकार्याबद्दल आपण आभार मानून मला लाजवावयास नको होते. गोव्यात आपले असंख्य स्नेही, चाहते मंडळी असताना आपण प्रथम माझी आठवण केली, हा मी आपला मोठेपणा समजतो आणि माझे परम भाग्य! अशीच आपली लहान-मोठी सेवा करण्याची आज्ञा व्हावी. हे आपणास नम्र मागणे.

कळावे, आशीर्वाद द्यावेत, ही प्रार्थना.

आपला कृपाभिलाषी

स्वाक्षरी

**श्रीराम पांडुरंग कामत**

ooo

Phone: 336932

**BHANDARKAR ORIENTAL RESEARCH INSTITUTE**

POONA 411004 (Indis)

**A. M. Ghatage**
Hon. Secretary & Gen. Editor,
Prakrit Dictionary Project

Ref. No. 160/94-95
Date: April 4, 1994

To
Pt. Tarkatirth Laxman Shastri Joshi,
Prajna Patha Shala Mandal,
Wai-412 803 (Dt. Satara)

Dear Sir,

The proof of the Regulating Council for the year 1993-94 is sent herewith for your approval. Kindly return the same at your early convenience.

With regards,

Yours sincerely,
Signature
(A.M.Ghatage)
Hon. Secretary,

Encl. As. above.

❍❍❍

**Report of the Regulating Council for the year 1993-94**

From
Tarkatirtha Dr. Laxmanshastri Joshi,
Chairman, Regulating Council,
Bhandarkar Oriental Research Institute,
Poona 4

To
The President,
Bhandarkar Oriental Research Institute,
Poona 4
Sir,

I have the honour to submit the following report on the working of the Regulating Council for the year 1993-94.

1. The Reports of the Executive Board and of the several Departments of the Institute, which accompany this Report, contain a detailed account of the activities of the Institute during the year.

2. Three meetings of the Regulating Council were held during the year.

3. The Institute mourns the loss, during the year under report, of the following distinguished persons who were connected with the Institute in different ways:

Dr. M. D. Balasubrahmanyam, Prof. G. V. Devasthali (Members of the Regulating Council of the Institute), Shri G. G. Arole, Shri K. L. Munot, Prof. Jagannath Agrawal, Prof. D. B. Devadhar, Dr. V. P. Mahajan, Dr. K. C. Dvivedi, Shri Amarendra Gadgil, Shri S. T. Kenghe (Life-Members), and Dr. (Smt.) Tarabai Limaye (Donor).

4. The publication activity of the Institute was fairly satisfactory during the year under report. As many as 2461 pages were printed for the Publication Department.

The Institute issued during the year the following publications

(1) A Comprehensive and Critical Dictionary of Prakrit Languages, Vol. I, Fascicule I.

(2) Mahabharata - Cultural Index, Vol. I, Fascicule I.

(3) Annals (Amrutamahotsava Volume)

(4) Nirukta (by Rajavade), Vol. I (Reprint')

(5) Vedic Bibliography, Vol. V

(6) Des. Cat. of MSS., Vol. 34 (Kalpasutras - B: Grhya and other works)

(7) The Ramayana: Its Origin and Growth

5. In concluding this brief report, I have to record my thanks to all the members of the Regulating Council, and particularly to Shri M. R. Yardi, Chairman of the Executive Board, and Prof. Prof. A. M. Ghatage, Honorary Secretary of the Institute, for their cordial co-operation in the work of the Institute.

Yours sincerely,

**Laxmanshastri Joshi**

Chairman,

Regulating Council

❍❍❍

१८.

# कौटुंबिक पत्रव्यवहार

मंगळवार, ८ डिसेंबर १९८१

**चि. मधुस सप्रेम आशीर्वाद**

तुझे १६-११-८१ चे विस्तृत (१५ पानी) पत्र ८ दिवसापूर्वी मिळाले. चि. लक्ष्मीचे २७ नोव्हेंबर १९८१ बर्लिंटनहून पाठविलेले परंतु मालू आत्याच्या घरी लिहिलेले पत्र पावले. तिचे पत्र म्हणजे तिच्या स्वच्छ मनाचा आरसा. ते पत्र वाचताना ती माझ्यापाशी बसून बोलत आहे, असे वाटले. तिने या पत्रात तिच्या पुढील अध्ययनाच्या विषयाचा निर्देश केला आहे. ती Bilingual Speech Therapist बनू इच्छिते. म्हणजे काय? मला काही कळले नाही. चि. सौ. मालतीचे पत्र पावले ते दोघे येत आहेत. आनंद!

सांख्यकारिकेच्या सबंधी उत्पन्न झालेल्या प्रश्नाचे उत्तर : (अ) त्रैगुण्य पदार्थ (Substance) आहे त्रैगुण्य = त्रिगुण = प्रकृती. सांख्यदर्शनातील एक पारिभाषिक शब्द 'गुण' हा आहे. संस्कृतमध्ये हा अनेकार्थी वा नामार्थी आहे. (दोरा, दोरी, सूत, सूत्र, गोडी, झाडाची उंची, माणसाचा शहाणपणा इ.) गुणाकार या अंकगणितातील गुण म्हणजे भर पडल्यावरची वाढ, गुण व दोष या द्वंद्वातील गुण म्हणजे चांगला पदार्थ-धर्म, इ.इ.

सांख्यशास्त्रातील प्रकृती हा विश्वाचा मूळ पदार्थ; त्याचे तीन घटकपदार्थ म्हणजे त्रिगुण सत्त्व, रजस् व तमस्, या तीन दोऱ्यांनी विश्वविस्तार झाला आहे. असे आलंकारिक भाषेत सांगता येते. हे रंगीत दोरे ... पांढरा (सत्त्व), तांबडा (रजस्), काळा (तमस्), असेही आलंकारिक भाषेत बोलता येते. हे दोरे एकमेकापासून कधीच अलग करता येत नाहीत अलग होऊ शकत नाहीत. गुणधर्म (Quality) आणि पदार्थ (Substance) यांचाही संबंध तादात्म्य (एकात्मकता) हा आहे.

(ब) सांख्यदर्शनातील गुण म्हणजे (मूळ) प्रकृतीचा मुख्य घटक. ते घटक तीन. त्रैगुण्य शब्द भाववाचक दिसत असला तरी येथे भावप्रत्ययाला धर्म भाव असा अर्थ नाही त्रिगुण म्हणजेच त्रैगुण्य.

Living चे मथळे वाचले. मी तटस्थ! तू म्हणतोस बाह्य वर्तनात तटस्थ; पण मनात शांतपणे जवळच्या जिवलगासंबधी चर्चा चालतेच. मी मनाशी आतल्या आत बोलत राहतो. दिवाळीत राम पुण्याहून आला होता. १०-१२ दिवस येथे राहून नासिकला अशोक (बाळक्या) कडे गेला. वासुदेवशी गोड बोलून पाहिजे ते घ्यावे हे त्याला कळत नाही. वासुदेव नात्याने वडील आहे, याची जाणीव व तज्जन्य भावना रामच्या वर्तनात दिसत नाही. लक्ष्मी वासुदेवला आवडली. ती सर्वांनाच आवडावी इतकी गोड आहे; शीलासुद्धा

तशीच. सतीवर तिने संमोहन विद्येचा प्रयोग केला व तो यशस्वी झाला. विजयला तर या मुद्यावर अपयश शक्य नाही!

वार्धक्यावरील तुझी माहिती ठीक वाटली. परंतु आयुष्य हे फार गहन सत्य आहे. ख्रिस्ताला देहान्त शासन सुनावणारा पायलेट म्हणाला, "सत्य काय आहे?" उत्तराची वाट न पाहता निघून गेला. त्याला सत्याची जिज्ञासा नव्हती, चाड नव्हती म्हणून त्याने उत्तराची अपेक्षा केली नाही. तो थांबला असता तर त्याला क्रूसावरच सत्याचा साक्षात्कार झाला असता!

जीवन हे अंतिम मूल्य आहे. आई-बापापासून निरोगी व अव्यंग काया लाभावी; आरोग्याचे नियम पाळावे. पृष्ठवंशाच्या दोन टोकाना (जीभ व उपस्थेंद्रिय (लिंग)) सांभाळावे म्हणजेच मिताहार, विहार असावे. या दोन टोकांना विवेकाने संभाळण्यात यश ज्याला येते तो मानसिक व शारीरिक जीवन विवेकयुक्त होऊन जगतो. हे त्या यशाच्या पोटात अन्तर्भूत आहे. श्वासशक्ती सारणीसंबंधी अधिक चौकशी करून पुढील पत्री लिहीन. त्यासबंधी माझीच तपासणी करून घेतली पाहिजे.

'डीएनए' वरील माझ्या आक्षेपाचे तुझ्या पत्रातील उत्तर मला समजले. कारण तशाच तऱ्हेचे उत्तर माझ्या मनात डोकावत होते. त्याला पक्कपणा आला. विजय त्याच विषयाचे अध्ययन करीत आहे. त्यामुळे त्याच्याशीही अधिक चर्चा करता येईल. कार्यवाद तू चांगला मांडला आहे, परंतु आतिसंक्षिप्त रीतीने.

सौ इंदू व तू रोज दोन मैल पळता. सावकाश चाल, द्रुत चाल व पलायन यापैकी द्रुतचालीचा मध्यममार्ग तू अनुसरावा. बुद्ध म्हणतो "वैदिक हे संभोगप्रधान वृत्तीचे, जैन हे उलट कायक्लेशरूप तपश्चर्येचा ध्यास घेणारे, मध्यमा प्रतिपद (मधल्या मार्गाचा)."

चि. सौ. इंदू व शीला यास आशीर्वाद.

**अबा**

ooo

दि १२ जून १९९०

**प्रिय चि. वासुदेव,**

अनेक आशीर्वाद वि.

तुझे पत्र ३० मेचे ११ जूनला पोचले. ठीक वाटले. चि. राम भेटून गेला. त्याची बायको चि. सौ. मोनिका वाईला येईल. चि. सौ. मंगल तिचे स्वागत नीट करीलच. तिला व तिच्या नातेवाईकांना मानाने वागवाल यात शंका नाही.

येथे माझे ठीक चालले आहे. वाचनाला विविध साहित्य मिळते. चि. मधुकरशी रोज बातचीत व चर्चा होते. त्यामुळे वेळ जातो. तिकडे कार्याचा पसारा; त्यामुळे तिकडची ओढ सारखी असते. माझे सार्वजनिक जीवन त्यामुळे तिकडच्या (भारतात घडणाऱ्या) घटनांची माहिती येथे मिळत नाही, म्हणून उत्कंठा लागते. म्हणून तू आवश्यक व अपरिहार्य अशी हकिकत संकलित करून पाठवावी. प्रा. श्री. मे. पुं. रेगे यांच्या सहकार्याची चांगली कदर करावी. त्यांचे व्यक्तिमत्त्व ही आपली मोठी अमोलप्रद बाजू आहे. 'नवभारत' मासिकाकरिता मी हिंदुत्वासंबंधी लिहिणार होतो. येथे आवश्यक ती ग्रंथसंपत्ती नसल्यामुळे प्रमाणाधिष्ठित विवरण करणे कठीण आहे.

तू मुंबईस जात नाहीस असे दिसते. जावे. चि. सुमनशी सतत संपर्क ठेवावा. हे निकटचे नातलग म्हणजेच या पृथ्वीवरचे जीवन सुरक्षित राहण्याची हमी होय. नुसता पैसा नव्हे. मानवी संबंधाची कदर मुख्य करावी.

कळावे.

**अबा**

ooo

शुक्रवार, २४-१-१९९२

**चि. सौ. मालतीस**

अनेक आशीर्वाद वि.

तुझे ११ जानेवारीचे पत्र पावले. माझे ठीक चालले आहे. तू म्हणतेस त्याप्रमाणे पहाटेस उत्साह असतो. प्रात: स्नान केल्यावर सहलीस जातो. १ ।। मैल जाऊन न बसता परत फिरतो. त्यामुळे प्रकृतीस आराम राहतो. संध्याकाळी खातपीत नाही, पाणी तेवढे पितो.

दिवसा झोपत नाही. त्यामुळे रात्री १० नंतर झोप आपोआप लागते. ४ ।। -५ ला जागा होतो. हे लिहितो कारण प्रकृतिस्वास्थ्याकरिता नियम पाळावे लागतात. या वृद्धापकाळी नियम मोडून भागत नाही. सध्या थंडी आहे. वाईत उन्हाळ्यात अशक्तपणा वाटू लागतो. दुपारी ५-६ तास उन्हाळा अस्वस्थ करतो. परंतु एप्रिल-मे हे दोन महिने सोडले तर वाई हे ठिकाण सुसह्य वाटते.

चि. मधुकर येऊन गेला. पुन्हा यावर्षाअखेर येईल. तसे सांगून गेला. तुम्ही मंडळी आला की मन अधिक प्रसन्न होते. परंतु एकंदर माझा परिवार अमेरिकन झाला, मी मात्र भारतीयच राहिलो. कारण माझं कार्यक्षेत्र भारत. ती कार्ये जन्मभर वाईस चालणार, म्हणून तुमच्या जवळ राहणे शक्य असले तरी परवडणारे नाही. असेच लिहीत जा, तुझ्या पत्रात चांगला खुलासा असतो. असो, चि. मुरलीधरपंतांस आशीर्वाद.

तुमचे

**अबा**

ooo

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**
अध्यक्ष

**मराठी विश्वकोश कार्यालय,**
वाई (जि. सातारा )
दिनांक : २ एप्रिल १९७४
५३३५

**सौ. वेणूताई यांस -**

सप्रेम नमस्कार वि. वि.

आम्ही दोघे आपला निरोप घेऊन दिनांक २९ ला संध्याकाळी मुंबईस पोचलो. नंतर पुण्यास एक दिवस मुक्काम करून वाईस आलो.

आता यांची प्रकृती ठीक झाली आहे. श्री. यशवंतराव व विशेषत: तुम्ही वेळेवर विशेष काळजी घेतल्यामुळे इतक्या लवकर यांना आराम पडला. आता वय झाले आहे. अशा स्थितीत आपणासारख्या मित्र मंडळींकडून अमोल मदत मिळते, ही आम्ही मोठ्या भाग्याची गोष्ट समजतो.

कळावे, ही विनंती.

आपली स्नेहांकित,
(स्वाक्षरी)
**सौ. सत्यवती जोशी**

**सौ. वेणूताई चव्हाण,**
१, रेसकोर्स, नवी दिल्ली-११

OOO

१९.

# श्रद्धांजली पत्रे

D. B. KARNIK
द्वा. भ. कर्णिक
-88/1530,
ADARSHA NAGAR, WORLI,
BOMBAY-400025.
PHONE : 4220304

२७-५-९४

**चि. वासुदेव यांस**

स. न. वि. वि.

सकाळीच शास्त्रीजींच्या निधनाची वार्ता कळली. काय वाटते ते सांगता येणार नाही. इतका त्यांच्याबद्दल माझ्या अंत:करणात जिव्हाळा होता. रॉय, एलन, निर्मलाबाई, सत्यवतीबाई, व्ही. बी. आणि डॉक्टर अनंतराव यांच्यानंतर आक्रांत झाला तो शास्त्रीजींच्या निधनाचा. आणखी एक प्रियजन लुप्त झाला आहे. तसे अश्रूसुद्धा गोठून गेले. एक जिव्हाळयाचा ऋणानुबंध मिटला.

पण अंतरीची ओढ तुझ्याकडे आणि आता पुढे काय? मी विचार करीत नाही. माझे एवढेच सांगणे आहे की तुझ्या भवितव्याबद्दलचे विचार मी सोडणार नाही. तुझे भवितव्य अबाधित राहो. हीच सदिच्छा.

(स्वाक्षरी)

**भाऊसाहेब**

(मूळ पत्र स्वहस्ताक्षरातील)

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ
मराठी विश्वकोश कार्यालय,
वाई (सातारा)
आवक क्र. ४९६
दिनांक: ३१/५/९४

ooo

PHONE : 449087
B. R. Bhagwat
दि. २८ मे १९९४

श्री. विश्वस्त व
श्री. कार्यकारी संपादक,
मराठी विश्वकोश मंडळ,
वाई (जि. सातारा)

परमपूज्य लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या निधनाचे वृत्त काल दूरदर्शनवरून अचानक कळाले आणि क्षणभर गलबलल्या सारखे झाले.

कै. शास्त्रीजींच्या प्रचंड साहित्य सेवेमुळे महाराष्ट्र त्यांचा सतत ऋणी राहील. व्यक्तिशः लिहायचे तर वाईत प्रा. अ. के. भागवत यांचेकडे आमचा मुक्काम असताना आम्हाला त्यांच्या अगदी घरगुती पाहुणचाराचा लाभ झाला होता. त्याची आठवण आज प्रकर्षाने होत आहे.

कै. शास्त्रीबोवांचे चिरंजीव वासुदेवराव आणि कुटुंबीय मंडळी - (यांत आत्मीयतेमुळे आपणही सर्व अंतर्भूत आहात) यांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. वाईत निर्माण झालेली ही पोकळी परमेश्वर कशी भरून काढणार आहे, हे त्याचे त्याला ठाऊक!

आपला,
(स्वाक्षरी)
**श्री. भा. रा. भागवत**

BALMITRA 32, ANAND NAGAR, HINGNE-KHURD, VITHALWADI, PUNE- 411051

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ
मराठी विश्वकोश कार्यालय,
वाई (सातारा)
आवक क्र. ४७९
दिनांक: ३०/५/९४

(मूळ पत्र स्वहस्ताक्षरातील)

ooo

**प्रा. संभाजी कदम**
१२|७ श्रीरंग सहनिवास
आग्रा मार्ग, ठाणे.
३१ मे, १९९४

प्रिय श्री. वि. रा. गद्रे,
प्रभारी संपादक,
मानव्य विद्या, विश्वकोश, वाई.

**स. न. वि. वि.**

आपले २८ मार्चचे पत्र एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात मिळाले होते. त्यासोबत समीक्षण, पुनर्लेखसनासाठी पाठविलेल्या नोंदींचा विचार करून लवकरच पत्र पाठविणार होतो. तेवढ्यात १४ एप्रिलपासून ज्योत्स्नाबाई आजारी पडल्या. गॅस्ट्रो डिहायड्रेशन. हॉस्पिटलमध्ये सलायनवर ठेवावे लागले. त्यातून पूर्वपदावर येईतोवर त्यांना एक ते सव्वा महिना गेला. तेवढ्यात चि. शर्दूलला आणि मला तापाचा जोरदार तडाखा. त्यातच आमच्या इमारतीच्या गच्चीची दुरुस्ती, ठोकाठोकी, वातावरणात सिमेंटची धूळ वगैरे. गेले चार महिने मला प्रकृतीच्या बारीक कटकटी होत्याच. या चार महिन्यांत कोणालाच पत्र लिहिले नाही. तुम्हाला हे पहिले पत्र. अंग दुखणे, कणकण वगैरे अजून चालू असूनही लिहीत आहे.

''शिल्पकला'' हा व्याप्तिलेख मी लिहावा असे वाटत असेल तर मी तो लिहितो. मात्र फार घाई करू नये. वीस वर्षांपूर्वी लिहून ठेवलेल्या एका कादंबरीचे पुनर्संस्करण गेली दीडदोन वर्षे हळूहळू करीत आहे. आताच्या लेखनाची अंतिम प्रत करीत आहे. त्यात फार व्यत्यय न येता इतर कामे केली तर चालेल. पण व्यत्यय आला तर मात्र मानसिक ताण पडेल. अगदी नाइलाज झाला म्हणून हे येथे लिहावे लागले.

आपण समीक्षेसाठी पाठविलेल्या 'मूर्तिकला भारतीय, मूर्तिकला : पौर्वात्य'' या नोंदी नजरेखालून घातल्या. त्याविषयी सूचना क्रमवार लिहून पाठविल्या तर चालतील का? दुरुस्तीसाठी मी प्रत्यक्ष हात घालायचा तर सगळेच पुनर्लेखन केल्यासारखे होईल.

***

गेले चार पाच दिवस हे पत्र लिहिण्याचा विचार करीत होतो. तेवढ्यात शास्त्रीजींची दु:खद बातमी आली. तापातून नुकताच उठलो असताना जोत्स्नाबाईंनी सकाळी बातमी सांगितली. ''माझा आधार गेला'' ही माझी भावना तेव्हापासून जाणवते आहे. त्यांच्याशी तसा सातत्याने पत्रव्यवहार नसला तरी सतत बौद्धिक आधार वाटायचा. मी जे. जे. स्कूलचा अधिष्ठाता असताना तर त्यांच्याकडून व्यवस्थापकीय बाबतीत मला अनेकदा मोलाचा

सल्ला मिळाला होता. तो आधार आता गेल्याचे दु:ख कायम राहणार आहे.

शास्त्रीजींच्या आप्तनातलगांपैकी कोणाशीही माझी ओळख नाही. म्हणून हा मजकूर या पत्रात लिहावा लागतो आहे. आपण त्यांच्या चिरंजिवांना दाखवावा.

शास्त्रीजींच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त मी त्यांचे एक व्यक्तिचित्रण (श्री. बापूराम नाईक यांच्या कलानगरातील घरी शास्त्रीजींना प्रत्यक्ष बसवून) केले आणि ते शास्त्रीजींच्याकडेच ठेवावयास दिले आहे. त्याला फ्रेम करायची राहून गेली होती. ते तैलचित्र आता कशा परिस्थितीत असेल कल्पना नाही. तैलचित्र फार काळजीपूर्वक सांभाळावे लागते. मी अधिष्ठाता पदाच्या मुलाखतीसाठी गेलो. (PSC) त्या वेळी माझी एक महत्त्वाची कलाकृती म्हणून मी ते तेथे नेऊन दाखविले होते. तेवढ्यासाठी शास्त्रीजींनी ते इकडे पाठविले होते. विश्वकोश खंडाच्या (पहिल्या) प्रकाशन सोहळयाच्या समारंभ प्रसंगी मी ते पुण्याला नेऊन त्याच्याकडे परत दिले होते.

हे तैलचित्र माझ्याकडे पाठवून दिल्यास, त्यावरील धूळ वगैरे रीतसर स्वच्छ करून मी ते परत देईन. मग त्यांच्या आप्तांनी त्यासाठी मुंबईच्या केमोल्ड फ्रेम मेकरकडून चांगली फ्रेम करून घ्यावी. माझी ही एक महत्त्वाची कलाकृती त्यांच्या संग्रही आहे. त्यांनी त्या कृतीची काळजीपूर्वक देखभाल केल्यास, माझी काळजी मिटेल. अशा काही महत्त्वाच्या कलाकृतींच्या रूपानेच कलावंत त्याच्या हयातीनंतरही शिल्लक रहात असतो.

***

आपण हा भाग संबंधितांना दाखवाल अशी खात्री आहे. त्यांनी पत्र पाठविल्यास व पेंटिंग पाठविल्यास माझ्याकडून जे करणे शक्य आहे ते मी करीन. बाकीचे त्यांनी करावे. पेंटिंग त्यांनी व्यक्तिश: (सवडीनुसार) आणल्यास अधिक बरे. म्हणजे ते सुरक्षित येईल.

कळावे.

पत्र पाठवावे.

(स्वाक्षरी)

**प्रा. संभाजी कदम**

(मूळ पत्र स्वहस्ताक्षरातील)

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ
मराठी विश्वकोश कार्यालय,
वाई (सातारा)
आवक क्र. ६२६
दिनांक: ६/६/९४

ooo

**SUHAS BAHULKAR Artist**
6/74 Shivanand Society, PlayGround Gross Road, Vile- parle (East)
Bombay 400 057

Phone - Resi
6115530

दि. १५ जून, १९९४.

**मा. वासुदेवशास्त्री जोशी,**

नुकतीच आपले वडील व प्रकांड पंडित तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या निधनाची वार्ता वृत्तपत्रे वाचताना कळली. गेले काही दिवस मी बाहेरगावी होतो व तेथून परतल्यावर वर्तमानपत्रे बघताना ही दुःखद वार्ता कळली.

दोन वर्षांपूर्वी मी आपल्या वाड्यातील विश्वकोशाच्या अभ्यागत निवासात राहात असताना त्यांचे रोज सकाळी ते फिरायला जाण्यासाठी निघतानाचे दर्शन डोळ्यांसमोर उभे राहिले. मला वाटते ६.३० च्या दरम्यान ते न चुकता फिरायला निघताना दिसायचे. मी त्या वेळी चित्र काढण्यासाठी निघण्यापूर्वी करायच्या तयारीत गुंतलेलो असायचो. त्यानंतर त्यांची आपल्या घरात माझी चित्र बघण्याच्या निमित्ताने झालेली भेट व चर्चा हा तर मला माझ्या आयुष्यातला एक अविस्मरणीय अनुभवच वाटतो. जुना काळ, वाईतले वाडे, या शतकाच्या सुरुवातीचे जीवन सध्या प्रेस आहे ती वास्तू तिचा इतिहास, तिला आग लागून जळण्यापूर्वीची स्थिती, वैभव व सौंदर्य हे त्यांच्या तोंडून ऐकताना थरारून उठलो. माझ्या चित्रांचे त्यांनी केलेले रसग्रहण, आस्वाद हाही मोठाच आनंददायक अनुभव होता.

त्यापूर्वीही आपला जे. जे. स्कूल ऑफ आर्टच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष असताना त्यांना नेण्याची कामगिरी माझ्यावर सोपवली होती. एकूणच तो सर्व काळ त्यांच्या सहवासात काढताना आपण भाग्यवान असल्याचे पदोपदी जाणवत होते आणि त्यापूर्वी १९८८ मध्ये त्यांचे भारताच्या नाट्यशास्त्रावरचे व्यवस्थापन म्हणजे मी शिकत असतानाच्या माझ्या शैक्षणिक कालखंडातला एक जिवंत अनुभव आहे, अजूनही विसरता न येणारा.

मी व माझे कुटुंबीय आपल्या दुःखात सहभागी आहोत.

स्नेहांकित
(स्वाक्षरी)
**सुहास बहुलकर**
(मूळ पत्र स्वहस्ताक्षरातील)

ooo

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग

ममझा |४१२|९४
संदर्भ क्र.
दिनांक १/६/९४

**श्री. वासुदेवराव जोशी**
यांस,
स.न.वि.वि.

ज्ञानमहर्षी लक्ष्मणशास्त्री यांच्या निधनाने ज्ञानाच्या क्षेत्रात निर्माण झालेली पोकळी कधीही न भरून निघणारी आहे. त्यांचा ज्या व्यक्तीशी संबंध आला असेल, ती व्यक्ती त्यांच्या विचाराने हमखास प्रभावितच झाली. प्राचीन ज्ञानातून आधुनिक ज्ञानापर्यंतचा सर्वांगीण अभ्यास करत असतानाच ज्या जटिल साहित्याला त्यांनी सामान्यांपर्यंत पोहचविण्याचे कार्य केले, ते विरळ आहे. अशी महान व्यक्ती आमच्यातून गेली, त्याबद्दल शब्दाने दु:ख व्यक्त करणे कठीण आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो व त्यांचे अपूर्ण कार्य पूर्ण करण्याची शक्ती आपणास देवो.

आपली,
**(स्वाक्षरी)**
**(प्रभा राव)**

प्रति,
**श्री. वासुदेवराव जोशी**
ता. वाई,
जिल्हा सातारा.

०००

संचालक

**राज्य मराठी विकास संस्था**
(महाराष्ट्र शासन पुरस्कृत)
एलफिन्स्टन तांत्रिक विद्यालय
३, महानगरपालिका मार्ग
धोबीतलाव, मुंबई ४०० ००१
दूरभाष : २६६ ५७६१ (कार्यालय)
४०९६३८८ (निवास)

संकीर्ण /१९१/रामविस/९४

दि २.६.९४

**प्रा.मे. पुं. रेगे यांस,**

सादर सप्रेम नमस्कार

आदरणीय श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या आकस्मिक निधनाची वार्ता ऐकून वाईट वाटले. त्यांचे वयोवृद्धत्व दिसत होते, तरीही त्यांच्या मानसिक-बौद्धिक शक्ती चांगल्या प्रकारे काम देत होत्या. त्यामुळे इतक्यातच त्यांचा वियोग स्वीकारावयास आपल्या मनाची तयारी नव्हती.

तुम्ही तर त्याच्या फार निकटच होता. तुमच्या वियोग दु:खात व्यक्तिश: मी आणि रा.म.वि. संस्था अन्तःकरणापासून सहभागी आहोत. आता तुमच्यावरील कामाच्या जबाबदाऱ्या अधिकच वाढलेल्या आहेत. कै. लक्ष्मणशास्त्री यांचा मोठेपणा ओळखून तुम्ही ज्या रीतीने त्यांना सहकार्य करीत राहिलात, ती फारच मोलाची गोष्ट होती. तथापि तुम्ही त्या ठिकाणी आहात, ही अनेक दृष्टींनी मोठीच दिलासा देणारी गोष्ट आहे. आपल्या कामांमध्ये रा.म.वि. संस्था नेहमीच सहकार्य करील

रा.म.वि. संस्थेचे उद्घाटन १ मे १९९२ रोजी कै. लक्ष्मणशास्त्री जोशी यांनीच केले होते.

कळावे,

आपली,
(स्वाक्षरी)
**(डॉ. सरोजिनी वैद्य)**
संचालक

०००

## लोकहितवादी मंडळ

दिनांक :- ४/६/९४

**डॉ. मधुकरराव जोशी**
वाई
जिल्हा - सातारा

स.न.वि.वि.

तर्कतीर्थाच्या अचानक निधनामुळे धक्काच बसला. लोकहितवादी मंडळाच्या कार्यात त्याचे मार्गदर्शन वेळोवेळी लाभले होते.

दिनांक २८ मे ९४ रोजी नाशिकला सांस्कृतिक धोरण या विषयावरील लेख परिसंवाद झाला. यावेळी त्यांची आठवण तीव्रतेने झाली. या दिवशी त्यांना समस्त नाशिककरांनी श्रद्धांजली वाहिली.

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. य. दि. फडके यांनी सर्वांच्यावतीने प्रथम संवेदना व्यक्त केली. त्यानंतर आदरणीय श्री. तात्यासाहेब शिरवाडकर यांनी दिलेल्या ठरावाचे डॉ. फडके यांनी वाचन केले. त्यानंतर उपस्थितांनी श्रद्धांजली वाहिली.

इश्वर तर्कतीर्थाच्या आत्म्यास सद्गती देवो ही प्रार्थना.

कळावे,

आपला स्नेहांकित,
(स्वाक्षरी)
**(दिलीप ताळवेकर)**
सरचिटणीस

ooo

सोबत :- संवेदना

# लोकहितवादी मंडळ

सर्कल कंपाऊड, नाशिक, ४२२००१ दूरध्वनी ८१०४९,७५०५३

## संवेदना

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी गेले म्हणजे महाराष्ट्रातील पांडित्याचा आणि विव्दत्तेचा सूर्य मावळला. गेली ५०-६० वर्षे महाराष्ट्राच्या वैचारिक आणि सांस्कृतिक विचारांवर त्यांनी जबरदस्त ठसा उमटविला होता. पौर्वात्य आणि पाश्चिमात्य तत्वज्ञान यांचा सुंदर संगम त्यांच्या विचारात झालेला आहे. पारंपारिक पध्दतीने धर्मशास्त्रांचे सर्वांगीण शिक्षण घेऊन सुध्दा ते वृत्तीने आणि विचाराने अतिशय प्रागतिक किंबहुना क्रांतिकारक होते. महाराष्ट्रातील सर्व विचारवंताना तर्कतिर्थांचा फार मोठा आधार होता. विश्वकोशासारखे प्रचंड काम त्यांनी हाती घेतले व तडीला नेले. ज्ञानविज्ञान अखंड साधना हे त्यांच्या जीवनाचे उद्दिष्ट होते. सर्वार्थानी ज्ञानक्षेत्रातील महर्षी हे पद त्यांना शोभण्यासारखे असून, त्यांच्या बाबतीत सार्थ होते. त्यांच्या वैचारिक ऋणातून महाराष्ट्र कधीही मुक्त होणार नाही. त्यांच्या स्मृतींना आम्ही नम्रपणाने अभिवादन करतो.

**मधुकरराव चौधरी**

विधान भवन

अध्यक्ष मुंबई ४०० ०३२

महाराष्ट्र विधानसभा नागपूर ४४० ०१

दिनांक : १८ जून १९९४

**प्रिय श्री. मधुकर व वासुदेव जोशी यांना,**

सप्रेम नमस्कार,

तर्कतीर्थांचे साधारणपणे तीन आठवड्यापूर्वी दुःखद निधन झाले. त्या आधीपासूनच मी प्रकृती अस्वास्थ्यामुळे अंथरुणाला खिळून होतो. त्यामुळे वेळीच आपल्याला सांत्वनपर पत्र पाठवू शकलो नाही, याबद्दल प्रथम दिलगिरी व्यक्त करतो.

वेदांचे प्रकांड पंडित, मराठी विश्वकोशाचे तसेच धर्मकोशाचे संपादक, संस्कृत वाङ्मयाचे गाढे अभ्यासक, थोर तत्त्वज्ञानी, विचारवंत आणि ९३ वर्षांचे वयोमान असूनही आधुनिक विज्ञानाची कास धरणारे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्रीजींचे निधन झाल्याचे वृत्त मला बरेच उशिरा समजले. तरीही ऐकून मनात चर्रर झाले.

तर्कतीर्थांच्या निधनाने ब्रिटानिका एनसायक्लोपीडियासारखा चालता बोलता ज्ञानकोश नाहीसा झाला आहे. महाराष्ट्राचे वैचारिक आणि सांस्कृतिक क्षेत्र त्यामुळे अगदी पोरके झाल्यासारखे वाटते. भारतीय तत्त्वज्ञानाच्या विद्वतेचा सूर्यच जणू महाराष्ट्रातून मावळला आहे.

गेल्या साठ वर्षांपासून शास्त्रीजींच्या वैचारिकतेचा पगडा महाराष्ट्राच्या शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रावर प्रभावीपणे घडल्याचे जाणवते. पौर्वात्य व पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा अनोखा मिलाफ त्यांच्या विचारात जाणवायचा. पारंपारिक पध्दतीने धर्मशास्त्राचे सर्वांगीण शिक्षण घेऊनही वृत्तीने व विचाराने अतिशय प्रागतिक असलेले शास्त्रीजी हे एक अजब रसायन होते.

अशा ज्ञानसूर्याचे आपण सुपुत्र. आपल्यावर तर आकाश कोसळल्यासारखे झाले असेल. शास्त्रीजींसारख्या ज्ञानयोग्याचा आपल्याला सहवास लाभल्याने आत्म्याला मरण नसते हे आपल्याला वेगळे सांगायला नको. आपल्या कुटुंबीयांच्या दुःखात मी माझ्या कुटुंबीयांसह

सहभागी आहे. शास्त्रीजींच्या आत्म्याला सद्गती मिळेलच याबद्दल माझ्या मनात तीळमात्र शंका नाही. कारण त्यांनी केवळ समाज प्रबोधनाच्या महान कार्याचा जीवनभर अंगीकार केला होता.

भावी काळात वाईकडे येणे झाल्यास मी आपल्याकडे जरूर येईन.

आपला,

(स्वाक्षरी)

**(मधुकरराव चौधरी)**

**श्री. मधुकर / वासुदेव लक्ष्मणशास्त्री जोशी;**

प्राज्ञपाठशाळा, वाई,

जिल्हा सातारा.

ooo

01-444 9520 (India)

**Dr. V. M. Tarkunde**
M.B.B.S., F.R.C.R.
39, Fortis Green
London N29JL
25.7.94

**To,**

All members of Shastri Jis family,

This is to expresses my sicere condolence to all of you at the suddnly passing away of Tarktirth Lakshman Shastri Joshi.

To many like me Shastriji, his intelligence, his knowledge of philosophis was equal to that of Com. M. N. Roy. As for Eastern Culture of Philosophy, he was unique.

I visited wai only once, but I still remembere the place and his smiling wife give us the bast Maharashtrian meal with such hospitality and warmth. Please, accept my sincere sympathy. The loss is universal.

Scinessry,

**Indu Tarkunde**

❍❍❍

## INDIAN RADICAL HUMANIST ASSOCIATION

276, Telang Road. Matunga, Bombay 400 019

Tel.: 414 17 02

Date: 11 June 1994

These meetings of the Board of Trustees of the Indian Renaissance Institute and Executive Council of IRHA held at Bombay on June 11-12, 1994 record their deep sense of grief and loss at the sudden passing away of Tarkateerth Laxman Shastri Joshi on May 27, 1994.

Shastriji was one of the founder Life Trustees of IRI founded by M.N.Roy in 1946. He was an ideal man of the Indian Renaissance. His life was fully devoted to carrying out the principal objectives of the IRI such as rescuing the positive contributions of ancient Indian thought and learning, revalvating the old values in the light of modern knowledge and spreading the spirit of Enlightenment Humanism and of Search for Truth.

Shastriji dedicated his entire life to the study and learning of the history of Eastern and Western Cultures and Philosophies, in evolving the principles and values of New Humanism and in conveying the same to the humble people of India without living in an ivory tower. Roy used to describe him as the Renaissance man of India. He is rightly Described as a walking encyclopaedia, a Dnyanyogi as well as a karmayogi without parallel.

The meeting of the Trustees conveys heart felt condolences to the sons; daughter and other relatives of shastriji.

Signature

**(N.A. Rane)**

❍❍❍

**प्रतापराव भोसले,**
खासदार
अध्यक्ष

स्थापना- १९६२
फोन- कार्यालय- ३०१३०

## जनता शिक्षण संस्था, वाई.

( जि. सातारा )

Registered under the Societies Registration Act, 1860. R. No. BOM. / 85 / SATARA & under the Public Trust Act, 1950. R. No F / 70 SATARA

जावक क्रमांक: दिनांक :

कृष्णाकाठचे ज्ञानमहर्षी, धर्मशास्त्र पारंगत संस्कृतचे प्रकांड पंडित, वेदांताचे गाढे अभ्यासक, समाज प्रबोधन प्रवर्तक, पाश्चात्य व पौर्वात्य संस्कृतीचे समन्वय साधणारे पदमविभूषण तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे आमच्या जनता शिक्षण संस्थेचे संस्थापक, त्यांचे शुक्रवार दिनांक २७ मे, १९९४ रोजी दुःखद निधन झाले. चालता बोलता विश्वकोश ज्ञानकोश काळाच्या पडद्याआड गेला.

वाईमध्ये उच्च शिक्षणाची सोय व्हावी, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मधील उच्च शिक्षण परवडणारे नसल्याने त्यांच्यासाठी त्यांनी १९६२ मध्ये प्रज्ञा पाठशाळा मंडळाच्या वतीने कला व वाणिज्य महाविद्यालयाची स्थापना अतिशय प्रतिकूल परिस्थितीत केली. त्यांच्यासारखे ज्ञानोपासक, संस्थापक लाभल्यामुळे महाविद्यालयास विद्याव्यासंगी प्राध्यापकवर्ग लाभला व महाविद्यालयाचा उत्तरोत्तर विकास होत राहिला.

१९६७ मध्ये महाविद्यालय जनता शिक्षण संस्थेस सुपुर्द करण्यात आले. तेव्हापासून आजतागायत त्यांचे संस्थेशी असलेले ऋणानुबंध हे अतुट राहिले. गेल्या तीन दशकात महाविद्यालयाची नेत्रदीपक प्रगती होत राहिली त्यात शास्त्रीजींचा सिहांचा वाटा होता. महाविद्यालयाच्या छोट्या, मोठ्या कार्यक्रमाना ते अगत्यपूर्वक उपस्थित राहून आम्हाला कार्यप्रवृत्त करीत असत.

शास्त्रीजींच्या अक्षय अशा विचारधारणाचा बहुमोल खजिना त्यांच्या ग्रंथसंपदेतून, व्याख्यानातून आम्हाला लाभला. त्यांच्या विचारांचा, नवीन प्रणालींचा, तत्त्वांचा आमच्यावर कळतनकळत प्रभाव पडला. त्यांनी आम्हाला शिस्त शिकविली, संयमाची शिकवण दिली. आपल्यापेक्षा लहान व्यक्तींचासुध्दा आदर करायला त्यांनी आम्हाला शिकविले. त्यांच्या विचारधनाचा प्रचार आणि प्रसार करून समाजप्रबोधनाचे त्यांचे कार्य यथाशक्ती पुढे चालविणे हीच त्यांना खरी श्रध्दांजली ठरेल.

आपण सारे एका परिवारातील सदस्य आबांच्या निधनाने आपल्याला झालेल्या दु:खात आम्ही जनता शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी व सेवक सहभागी आहोत. त्यांच्या पवित्र स्मृतीस नम्र अभिवादन.

(स्वाक्षरी)
सचिव, जनता शिक्षण संस्था
वाई (जि. सातारा)

ooo

## प्राज्ञपाठशाळा मंडळ

अध्यक्ष

**मे. पुं. रेगे**

चिटणीस संदर्भ क्र.

सीताराम रायकर दिनांक : १३ मे २०००

**प्रिय डॉ. इंदुमती पारीख,**

स. न. वि. वि.

शास्त्रीजींच्या पुण्यतिथीच्या दिवशी - २७ मे २००० रोजी - त्यांच्या स्मरणार्थ वाई येथे सभा आयोजित करण्यात आली आहे. मा. श्री. शरच्चंद्र पवार आणि महाराष्ट्राचे मुख्य मंत्री मा. नामदार श्री. विलासराव देशमुख हे प्रमुख अतिथी असतील. महाराष्ट्राचे वित्तमंत्री नामदार जयंतराव पाटील, सांस्कृतिक कार्यमंत्री नामदार रामकृष्ण मोरे आणि सातारा जिल्ह्याचे संपर्क मंत्री नामदार अजितराव पवार हेही अतिथी असतील. तथा सकाळी १० ते ११-३० ह्या कालावधीत होईल. आपण ह्या सभेला उपस्थित रहावे असे आग्रहाचे आमंत्रण करतो.

हे शास्त्रीजींच्या जन्मशताब्दीचे वर्ष आहे. ह्या वर्षीच्या कार्यक्रमांच्या शुभारंभ ह्या सभेने होईल.

शास्त्रीजींच्या स्मारकाची योजना आपल्याकडे पाठविण्यात येत आहे. ह्या वर्षी पुढीप्रमाणे कार्यक्रम योजिलेला आहेत.

१. आधुनिकतेची घडण (Fashioning of Modernity) चर्चासत्र

२. तुकाराम - पुनर्दृष्टिक्षेप - चर्चासत्र

३. Dharmakosa & the Tradition of Dharmasastra : All-India seminar

४. महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेचे वार्षिक अधिवेशन [त्या परिषदेचे शास्त्रीजींनी २० वर्षापूर्वी उद्घाटन केले होते.]

५. Globalisation & New Humanism - All-India Seminar.

आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून दर महिन्याला शास्त्रीजींच्या कार्याच्या एका अंगावर व्याख्यान प्रसारित होईल.

२७ मे च्या सभेला उपस्थित राहणे आपल्याला शक्य नसल्यात आपला संदेश पाठवावा, अशी विनंती आहे.

कळावे हे विज्ञापना.

आपला,

(स्वाक्षरी)

**(मे. पुं. रेगे)**

ooo

# समारोप

# समारोप

शास्त्रीजी खऱ्याखुऱ्या अर्थाने भारतीय आणि आधुनिक भारतीय प्रबोधनाचे चालते -बोलते व कर्ते प्रतीक होते. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर "मी आधुनिक भारताच्या व महाराष्ट्राच्या सामाजिक व धार्मिक सांस्कृतिक व राजकीय आंदोलनाशी एकरूप झालो होतो." म्हणजेच जीवनाचे त्यांनी कप्पे पाडले नव्हते, तर जीवनाकडे पहाण्याचा, समजण्याचा त्यांचा दृष्टिकोन समग्रलक्षी- (Integrated) होता. म्हणूनच त्यांना मानवेंद्रनाथ रॉय 'Man of Indian Renaissonce' म्हणत. रॉय यांचे ते जवळचे स्नेही तर होतेच, पण त्यांचे बरोबर १९४६ साली Indian Renaissonce Institute स्थापन करण्यामध्ये शास्त्रीजींचा पुढाकार होता. ते संस्थेचे संस्थापक विश्वस्त होते. आणि संस्थेच्या उद्देशाचा जीवनभर पाठपुराव करणारे ते एक 'Tourch Bearers' होते. या संस्थेच्या उद्देशात सुरुवातीलाच म्हटले आहे की, "With the tourch of Enlightenment in our hand, we shall retrace Indian history to discover the permanent intellectual and cultural values created in the past. Ours is the search for truth, it is not limited by time and space, which is cosmopolition as well as eternal Armed with modern scientific knowledge. We shall be more qualified to discover and appreciate what is true and imperishable in Indian tradition"

शास्त्रीजीचा हा शोध सतत चालू होता म्हणूनच ऐतिहासिक व शास्त्रीय दृष्टिकोनातून त्यांनी वैदिक संस्कृतीचा अभ्यास केला व 'वैदिक संस्कृतीचा विकास' हा अमोल ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ इंग्रजीत लिहिला असता तर ते जगातील मोठ्या विद्वानांचे पंक्तीत बसले असते. या ग्रंथाचे भाषांतर होणे जरूर आहे. ते सोपे नाही. त्यासाठी ऐतिहासिक व शास्त्रीय दृष्टिकोन असलेल्या विद्वानांची एक टीम तयार करावी लागेल. पण माझ्या दृष्टीने हे कार्य हाती घेतलेच पाहिजे. कदाचित हे कार्य प्राज्ञपाठशाळा व Indian Renaissonce Institute या दोघाच्या सहकार्याने होऊ शकेल.

शास्त्रीजींचा प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास वयाच्या १४ व्या वर्षी ते पिंपळनेरहून वाईला प्राज्ञपाठशाळेत आले तेव्हाच सुरू झाला. स्वामीजींनी त्यांना शिकविण्यास सुरुवात केली आणि थोडेच दिवसात त्यांच्या असामान्य बुद्धिमत्तेची त्यांना जाणीव झाली. पुढील शिक्षणाकरता त्यांनी शास्त्रीजींना बनारस व कलकत्याला पाठवले. प्राज्ञपाठशाळेतच त्याची विनोबाजींशी गाठ पडली व त्यांचे इंग्रजी शिक्षण सुरू झाले व थोडेच दिवसात पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा अभ्यास ही सुरू झाला. या अभ्यासाने शास्त्रीजीमधील विवेकनिष्ठा व शास्त्रीय

दृष्टिकोन दृढ होण्यास मदत झाली व त्यांचे वैचारिक जीवन समृद्ध झाले. तत्त्वज्ञानाबरोबरच जगात झपाट्याने वाढणाऱ्या वैज्ञानिक ज्ञानावर शास्त्रीजींनी सतत नजर ठेवली. "उच्च शास्त्रज्ञांच्या मनास निश्चय व शंका याचे द्वंद्व सतत अस्वस्थ करीत असते. सत्य सापडले तरी त्याचा अपुरेपणा या द्वंद्वामुळे ध्यानात येतो व त्यामुळे ज्ञानाची प्रगती चालूच राहते." हीच गोष्ट शास्त्रीजींच्या मनात होत राहिली व त्यामुळे त्यांची ज्ञानलालसा कधीच पुरी झाली नाही. "विज्ञान व तंत्रज्ञान यांची इतकी वाढ आतापर्यंत झालेली आहे तरी जगातील बहुजन समाज असून बंधनात का राहिला आहे." याचे उत्तर शास्त्रीजी शोधत राहत. याचे उत्तर राज्यसंस्थेचे प्राबल्य व वैज्ञानिकांचे दुर्बल्य हे होय. धर्मसंस्थेच्या बंधनातून मुक्त झालेला वैज्ञानिक व तंत्रज्ञ हा अलीकडे या विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात अधिकच प्रबल झालेल्या राज्यसत्तेच्या बंधनात सापडला आहे. त्यातच हा बहुजन समाज या बंदिवासाचा प्रतिकार करण्यास उत्सुक नाही, कारण त्याला स्वातंत्र्याचे मूल्य मान्य नाही! स्वातंत्र्य काय असते हे त्याला समजले नाही. त्याचा अनुभवही पिढ्यान्‌पिढ्या घेतलेला नाही. "स्वातंत्र्य व स्वत:ची जबाबदारी या दोन्ही एकत्र असतात. स्वातंत्र्य म्हणजे कर्तृत्वाची अनिर्बंध संधी व स्वतःच्या योगक्षेमाची जबाबदारी स्वत:वरच, अशा प्रकारचे स्वातंत्र्य बहुतेक माणसे नाकारतात. स्वातंत्र्याचे भय वाटते, कारण आत्मविश्वास गमावलेला असतो. मी म्हणेन बहुतेक वेळा तो कमावलेला नसतो.

याचबरोबर आजचा भारतीय समाज धर्मसत्तेच्याही आहारी जात आहे याची जाणीव त्यांना होती. म्हणून शास्त्रीजी म्हणतात, "आधुनिक सुशिक्षित मनुष्याने मानवजातीच्या परस्पर विद्वेषाचे व संग्रामाचे महत्त्वाचे कारण ही धर्मसंस्था त्या सबंधी आग्रहाची भूमिका संपूर्ण टाकली पाहिजे. सर्व धर्माची समानता म्हणजे सर्व धर्म मानवाने मनाने निर्मिले आहेत एवढेच सर्व धर्मांमध्ये एक मूलतत्त्व शोधण्याचा प्रयत्न करू नये!" आजच्या माणसाने हे लक्षात घेणे जरुरीचे आहे.

शास्त्रीजी हे एक परिपूर्ण मानव होते. राजकारण व समाजकारणात त्यांनी भरपूर योगदान केले. ते साहित्यिक होते. याचा पुरावा त्यांची साहित्य संमेलनाची भाषणे वाचली म्हणजे मिळतो. त्यांचे महाबळेश्वर साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्ष पदावरून केलेले भाषण म्हणजे गद्यकाव्य म्हणावे लागेल. त्यांनी म्हटलेले वेद उत्तम संगीतासारखेच वाटत तर त्यांनी अनेकांना चित्रकला, शिल्पकला कशा Appreciate कराव्या हे शिकवले आहे. संगीताचे ते भोक्ते होते, याचा अनेकांना अनुभव आहे. शास्त्रीजी सर्व थरांतील माणसात मिसळत. त्यांचेबरोबर जेवणखाण घेत. पण त्यांची वृत्ती आनंदी जीवन खरेखुरे उपभोगण्याची होती. वैदिक ऋषीप्रमाणेच त्यांना हे जग सुंदर दिसत होते. त्यांचा संसार सतीकाकूंनी सुंदर, सुसंस्कृत व सुदृढ बनवला होता. सतत हसतमुख असलेली सुजाण, कर्तव्यदक्ष व हुशार गृहिणी शास्त्रीजींना लाभली होती. म्हणूनच या जगातील रम्य जीवन स्वर्गप्राप्तीचे त्यांनी

साधन मानले. ‘कवींच्या प्रतिभावाणीत व पंडितांच्या विचारात सर्व देवता समाविष्ट करणारा परम स्वर्ग’ शास्त्रीजींना इथेच दिसला. म्हणून त्यांनी तो सतीकाकूंच्या सहवासात हसत खेळत उपभोगला. ‘आपण ज्या जगात रहातो, तेच शक्य कोटीतील व सर्वांत चांगले जग आहे’, असे शास्त्रीजींनी मानले.

त्यांनी आपल्यासाठी भरपूर विचारधन ठेवले आहे. त्याचे सर्व जनतेत वितरण होणे आज जरूर आहे. ते कार्य आपणा सर्वांचे आहे. ज्यांना शक्य आहे त्यांनी त्यात भरही घालणे जरूर आहे व शास्त्रीजींनी दिलेला वारसा आपण पुढे चालवला पाहिजे. ही खरी त्यांना आदरांजली होईल.

अज्ञात

❍❍❍

# परिशिष्टे

परिशिष्ट - १

# ऋणनिर्देश

*'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय' प्रकल्पासाठी आवश्यक संदर्भ, माहिती, मार्गदर्शन, साधने, संपर्कसूत्र इ. चे साहाय्य करून खालील व्यक्ती व संस्थांनी मोलाचे सहकार्य केले. याशिवाय अनवधानाने नोंद घ्यावयाची राहिलेल्या इतरांचेही मी स्मरण करतो आणि सर्वांप्रती विनम्र कृतज्ञता व्यक्त करतो.*

* मा. शरद पवार, अध्यक्ष, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.
* मा. राम नाईक, माजी राज्यपाल, उत्तर प्रदेश, लखनऊ.
* मा. मंत्री, शिक्षण मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
* मा. सचिव, शिक्षण मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
* मा. बाबा भांड, माजी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई. आणि संचालक, संस्थापक, साकेत प्रकाशन प्रा.लि., औरंगाबाद.
* मा. डॉ. सदानंद मोरे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
* मा. डॉ. सौ. मीनाक्षी पाटील, सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
* प्रा. डॉ. अशोक चौसाळकर, संपादक, समाज प्रबोधन पत्रिका, कोल्हापूर.
* प्रा. डॉ. अरुंधती खंडकर, सिंगापूर.
* मा. वासुदेव जोशी, वाई, जि सातारा.
* मा. दिलीप करंबेळकर, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.
* मा. संजय कृष्णाजी पाटील, माजी सचिव, (अ.का.) महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.
* मा. प्रा. डॉ, राजा दीक्षित, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.

* डॉ. शामकांत देवरे, सहा. सचिव, मराठी विश्वकोश कार्यालय, वाई.
* श्री. रवीन्द्र घोडराज, विद्याव्यासंगी सहायक, मराठी विश्वकोश कार्यालय, वाई.
* श्री. सरोजकुमार मिठारी, विद्याव्यासंगी सहायक मराठी विश्वकोश कार्यालय, वाई.
* डॉ. जगतानंद भटकर, विद्याव्यासंगी सहायक, मराठी विश्वकोश कार्यालय, वाई.
* मा. अध्यक्ष, लोकमान्य ग्रंथालय, वाई.
* मा. शरद साठे (भा. प्र. से.), सचिव, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.
* श्री. मोहनराव डकरे, सचिव, प्रादेशिक केंद्र, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, कऱ्हाड.
* मा. अध्यक्ष, प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई, जि सातारा.
* श्री. अनिल जोशी, सचिव, प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई, जि. सातारा.
* मा. ग्रंथपाल, मराठी विश्वकोश ग्रंथालय, वाई, जि सातारा.
* मा. अध्यक्ष, करवीरनगर वाचन मंदिर, कोल्हापूर.
* मा. ग्रंथपाल, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
* मा. खासदार प्रा संजय मंडलिक, कोल्हापूर.
* श्री. दत्ता क्षीरसागर, संचालक, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संचालनालय, पुणे.
* मा. अध्यक्ष, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, पुणे.
* मा. प्रा. डॉ. प्रसाद जोशीं, कुलगुरू, डेक्कन कॉलेज विद्यापीठ, पुणे.
* श्री. गोपाळ अवटी, संचालक, आकाशवाणी केंद्र, पुणे.
* श्री. श्रीराम पवार, समूह संपादक, सकाळ वृत्तपत्र समूह, पुणे.
* श्री. सम्राट फडणीस, संपादक, दैनिक सकाळ, पुणे.
* श्री. माधव गोखले, उपसंपादक, दैनिक सकाळ, पुणे.
* मा. स्वप्नील पोरे, संपादक, दैनिक केसरी, पुणे.
* प्रा. डॉ. प्रकाश कांबळे, महावीर विद्यालय, कोल्हापूर.
* श्री. शाम जोशी, ग्रंथसखा वाचनालय, बदलापूर.
* प्रा. डॉ. सौ. आशाताई गुर्जर, पुणे.
* डॉ. एच व्ही देशपांडे, माजी प्राचार्य, आजरा महाविद्यालय, आजरा, जि कोल्हापूर.
* डॉ. दिनकरराव पाटील, प्राचार्य, भोगावती महाविद्यालय, कुरुकली, ता करवीर, जि. कोल्हापूर.
* सौ. मनीषा शेणाई, ग्रंथपाल, करवीर नगर वाचन मंदिर, कोल्हापूर.
* प्रा. डॉ. पंडित टापरे, वाई जि. सातारा.
* श्री. रमेश रा. चव्हाण, रा. ना. चव्हाण प्रतिष्ठान, वाई, जि सातारा.
* प्रा. डॉ. रणधीर शिंदे, मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
* प्रा. डॉ. शिवाजी मोटेगावकर, राज्यशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

* मान. विनोद शिरसाठ, संपादक, साप्ताहिक साधना, पुणे.
* श्री. सुदाम सानप, महाराष्ट्र ज्ञानमंडळ, पुणे.
* श्री. समीर दिलावर शेख, साधना साप्ताहिक, पुणे.
* डॉ. राजेंद्र प्रभुणे, वाई, जि सातारा.
* श्री. भालचंद्र मोने, प्राज्ञपाठशाळा मंडळ वाई, जि सातारा.
* प्रा. सागर कांबळे, न्यू कॉलेज, कोल्हापूर .
* डॉ. आर. डी. पोतदार, अध्यक्ष, सेंटर फॉर दि स्टडी ऑफ सोशल चेंज, वांद्रे मुंबई .
* प्रा. डॉ. प्रदीप देवी, सार्वजनिक वाचनालय, नाशिक.
* प्रा. मिलिंद जोशी, कार्याध्यक्ष, म.सा. प., पुणे.
* मा. ग्रंथपाल, पुणे मराठी ग्रंथसंग्रहालय, पुणे.
* मा. ग्रंथपाल, डॉ. भांडारकर प्राच्यविद्या संस्था, पुणे.
* मा. ग्रंथपाल डेक्कन कॉलेज विद्यापीठ, पुणे.
* मा. ग्रंथपाल, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई.
* श्री. सुरेश रासकर व सौ. दिप्ती रासकर, मुंबई.
* डॉ. अशोक वेणीमाधवशास्त्री जोशी, अमेरिका.
* श्री. व. सौ. डॉ. शुभदा अरविंद पटवर्धन, मुंबई.
* प्रा. डॉ. व्यंकटेश कोटबागे, बेळगाव.
* श्री. विजय एकशिंगे व श्री संजय कळके, कोल्हापूर,
* श्री. श्रीकांत भागवत, मौज प्रकाशन गृह, मुंबई.
* डॉ. सौ. मोनिका गजेंद्रगडकर, संपादक, मौज प्रकाशन गृह, मुंबई.
* श्री. मिलिंद जोशी, व्यवस्थापक, मौज प्रकाशन गृह, मुंबई.
* Hon. Maxion Barlet, Bibliotheque de France, Paris.
* मा. ग्रंथपाल श्रीमंत गंगामाई वाचन मंदिर, आजरा जि. कोल्हापूर.
* मान.- संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, (मुंबई)
* प्रा. डॉ. रघुनाथ कडाकणे, प्रमुख, इंग्रजी विभाग, राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर
* प्रा. डॉ. कृष्णा पाटील, अधिव्याख्याता, दूर शिक्षण विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
* सर्व कर्मचारी, सहयोगी, साकेत प्रकाशन प्रा .लि., औरंगाबाद
* श्री. अमेय जोशी, अक्षर दालन, कोल्हापूर
* सौ. / श्री. तनुजा व निहाल शिपूरकर, भारती मुद्रणालय, कोल्हापूर.
* श्री. गौरीश सोनार, कोरिएंडर ग्राफिक्स, कोल्हापूर.
* श्री. अशोक पाटील, छायाचित्र विकासक, कोल्हापूर.
* श्री. विश्वनाथ यादव, दैनिक लोकमत, कोल्हापूर

* श्री. विवेक जोशी, दैनिक तरुण भारत, कोल्हापूर
* श्री. भरत बुटाले, उपसंपादक, दैनिक लोकमत, कोल्हापूर.
* सौ. वीणा पाटील, अक्षर दालन, कोल्हापूर.
* श्री. राजेश दुबे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
* श्री. महेश मोधे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
* सौ. यशवंती अरुण शिंदे, कोल्हापूर.
* सौ. शुभांगी मोहन भगत, विश्ववेद ग्राफिक्स, कोल्हापूर.

❍❍❍

## परिशिष्ट - 2

परिचय

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

(२७ जानेवारी, १९०१ - २७ मे, १९९४)

महाराष्ट्रातील एक थोर विचारवंत, संस्कृत पंडित व मराठी विश्वकोशाचे प्रमुख संपादक, धुळे जिल्ह्यातील पिंपळनेर येथे जन्म. वडिलांचे नाव बाळाजी आणि आईचे चंद्रभागा. त्यांचे वडीलबंधू वेणीमाधवशास्त्री आयुर्वेदाचार्य म्हणून पुढे प्रसिद्धीस आले. लक्ष्मणशास्त्री वयाच्या चौदाव्या वर्षी वाईच्या प्राज्ञपाठशाळेत दाखल झाले. तेथे केवलानंद सरस्वती यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी न्याय-वेदांतादी प्राचीन शास्त्रांचे अध्ययन केले. १९२३ मध्ये कलकत्त्याच्या शासकीय संस्कृत महाविद्यालयातून 'तर्कतीर्थ' ही पदवी त्यांनी संपादन केली. इंग्लिश भाषा व आधुनिक पश्चिमी ज्ञानविज्ञाने यांचा स्वप्रयत्नाने त्यांनी सखोल व्यासंग केला. १९२७ मध्ये मुल्हेरच्या (नाशिक जिल्हा) पंडित घराण्यातील सत्यवती यांच्याशी त्यांचा विवाह झाला. त्यांना दोन मुले व दोन मुली असून, त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव मधुकर हे अमेरिकेत गणकयंत्रनिर्मिती करणाऱ्या 'इंटरनॅशनल बिझनेस मशिन्स' या उद्योग संस्थेत संशोधन व्यवस्थापक या पदावर होते. वाई येथेच राहून शास्त्रीजींनी प्राज्ञपाठशाळेचे व मराठी विश्वकोशाचे कार्य आणि आपला व्यासंग अखंडपणे चालू ठेवला होता.

प्राज्ञपाठशाळेचे वातावरण सनातनी पढीक पांडित्याचे नव्हते; ते पुरोगामी/चिकित्सेचे व राष्ट्रीय स्वरूपाचे होते. परिणामतः राष्ट्रीय व सामाजिक आंदोलनांत भाग घेण्याची प्रेरणा या वातावरणातून शास्त्रीजींना लाभली. म. गांधींच्या अस्पृश्यता निवारण कार्यास शास्त्रीजींनी हिंदू धर्मशास्त्राचे पूरक भाष्य तयार करून दिले. १९३० ते १९३२ साली कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतल्याने त्यांना प्रत्येक वेळी ६-६ महिन्यांचा कारावासही तीनदा भोगावा लागला. १९३६ नंतर मानवेंद्रनाथ रॉय यांच्या रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टीचे ते क्रियाशील सदस्य झाले. १९४८ मध्ये हा पक्ष विसर्जित होईपर्यंत ते त्याचे सदस्य होते. १९४० पर्यंत व पुन्हा स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेस पक्षाशी ते एक विचारवंत भाष्यकर म्हणून निगडित होते.

तर्कतीर्थांच्या नेतृत्वाने प्राज्ञपाठशाळेला एका व्यापक सांस्कृतिक कार्यकेंद्राचे स्वरूप

लाभले. वाईमध्ये हरिजन विद्यार्थ्यांचे वसतिगृह, हातबनावटीचा कागद कारखाना, अद्ययावत मुद्रणालय इ. उपक्रम त्यांनी यशस्वीपणे अमलात आणले. वाईच्या महाविद्यालयाचेही ते संस्थापक-सदस्य होते. प्राज्ञ पाठशाळेतर्फे धर्मकोशाच्या संपादनाचे मौलिक कार्य त्यांनी हाती घेतले. या कोशाचे २५ खंड प्रसिद्ध झाले असून, त्यांत कुटुंबसंस्था, हिंदू संस्कार, जाती, विवाह, मालमत्ता त्याचप्रमाणे हिंदू धर्मविधी, नीतिशास्त्र व तत्त्वज्ञान इ. विषयांसंबंधी प्राचीन शास्त्रांतील ग्रांथिक माहिती व्यवस्थितपणे संकलित केलेली आहे. पहिल्या १९ खंडांचे संपादन तर्कतीर्थांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे सुरुवातीपासून म्हणजे १९६० पासून ते १९८० पर्यंत शास्त्रीजी अध्यक्ष होते. मंडळातर्फे भाषा-साहित्यविषयक अनेक योजना कार्यान्वित झालेल्या आहेत. त्यांपैकी प्रमुख प्रकल्प वीस खंडीय मराठी विश्वकोषाचा आहे. प्राचीन-अर्वाचीन सर्व ज्ञानविज्ञाने मराठीतून विशद करण्याचे हे मौलिक कार्य शास्त्रीजींच्या मार्गदर्शनाखाली चालू होते.

शास्त्रीजींनी व्याख्याने, परिषदा इ. निमित्ताने भारतभर प्रवास केला. अमेरिका, ब्रह्मदेश, रशिया तसेच युरोपीय, आशियाई आणि आफ्रिकी देशांनाही त्यांनी भारताच्या प्रतिनिधी मंडळाचे सदस्य म्हणून किंवा स्वतंत्रपणे निमंत्रित म्हणूनही भेटी दिल्या आहेत (१९५१). कुकुरमुंडे येथील सनातन धर्मपरिषद (१९२५) व वाराणसीचे अखिल भारतीय संस्कृत पंडितांचे संमेलन (१९२९) यांत भाग घेऊन शास्त्रीजींनी धर्मसुधारणेचे सभाष्य समर्थन केले. भारतीय संविधान संहितेचे संस्कृत भाषांतरही त्यांनी केले. हिंदी राष्ट्रभाषेच्या प्रचारकार्याशीही त्यांचा जवळचा संबंध आहे. दिल्ली येथील मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते (१९५४). याखेरीज अनेक विभागीय व प्रादेशिक मराठी साहित्य संमेलनांची अध्यक्षपदेही त्यांनी भूषविली.

शास्त्रीजींची ग्रंथसंपदा मोजकी; पण मौलिक आहे. शुद्धिसर्वस्त्रम् (१९३४), आनंदमीमांसा (१९३८), हिंदू धर्माची समीक्षा (नागपूर विद्यापीठात रा. ब. परांजपे व्याख्यानमालेत दिलेली तीन व्याख्याने, १९४१), जडवाद (१९४१), ज्योतिनिबंध (म. फुल्यांचे चरित्र आणि कार्य १९४७), वैदिक संस्कृतीचा विकास (१९५१, द्वितीय आवृत्ती १९७४), आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा व रससिद्धांत (१९७३) हे त्यांचे ग्रंथ मान्यता पावले आहेत. राजवाडे लेखसंग्रह (१९६४) आणि लो. टिळक लेखसंग्रह (१९६९) हे त्यांनी संपादिले आहेत. हिंदू धर्माची समीक्षा ऐतिहासिक व समाजशास्त्रीय पद्धतीने त्यांनी केली आहे. 'धर्मसमीक्षा हीच सर्व प्रकारच्या समीक्षेची जननी आहे' या कार्ल मार्क्सच्या तत्त्वाचा पुरस्कार त्यांनी या ग्रंथात केला आहे. आधुनिक काळात सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने पारंपरिक धर्ममूल्ये कितपत उपयुक्त आहेत, याची मूलगामी चिकित्सा या ग्रंथात केलेली आढळते. या प्रबंधाचे इंग्रजी भाषांतर गोवर्धन पारीख यांनी 'ए क्रिटिक ऑफ हिंदुइझम' या नावाने प्रसिद्ध केले

आहे (१९४८). 'वैदिक संस्कृतीचा विकास' हा एक प्रचंड प्रबंध आहे. मुळात पुणे विद्यापीठात श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे, इचलकरंजी-व्याख्यानमालेत दिलेली ही सहा व्याख्याने होत (१९४९). त्यांत वेदकालीन संस्कृती, इतिहास, पुराणे व रामायणाची संस्कृती, बौद्ध आणि जैन धर्माचे कार्य आणि आधुनिक भारतातील सांस्कृतिक आंदोलन या विषयांचा सखोल आणि ऐतिहासिक दृष्टीने घेतलेला परामर्श आहे. भारतातील वैदिक संस्कृती ही परिवर्तनक्षम आहे. आधुनिक विज्ञानदृष्टी व मानवतावाद यांच्या निकोप संवर्धनाचे तिच्यात आंतरिक सामर्थ्य आहे व म्हणून आधुनिक क्रांतियुग आणि वैदिक संस्कृतीतील मूलभूत अध्यात्मयोग यांची सांगड घातली पाहिजे, हा या ग्रंथाचा निष्कर्ष आहे. सर्वोत्कृष्ट भारतीय ग्रंथांना साहित्य अकादमी १९५५ पासून पुरस्कार देते. असा पुरस्कार लाभलेला हा पहिला मराठी ग्रंथ.

इतिहासाचार्य राजवाडे आणि लो. टिळक यांचे नमुनेदार लेखसंग्रह संपादित करून शास्त्रीजींनी त्यांना अभ्यासपूर्ण व अत्यंत विचारप्रवर्तक प्रस्तावना लिहिल्या आहेत. आधुनिक मराठी साहित्य व त्याची समीक्षा, संस्कृतातील रससिद्धांत, मराठी संतांचे कार्य यासंबंधीही त्यांनी अनेक लेखांतून नवा दृष्टिकोन मांडलेला आहे. रा. ग. जाधव यांनी शास्त्रीजींच्या निवडक लेखांचा संग्रह 'विचारशिल्प' या नावाने संपादित केला आहे (१९७५). गांधीयुगातील एक नमुनेदार कर्मयोगी विचारवंत या नात्याने त्यांच्या विचारकार्याची मीमांसा संपादकाने या लेखसंग्रहाच्या प्रस्तावनेत केली आहे.

महाराष्ट्रात बुद्धिवादी विचारवंतांची एक थोर परंपरा आहे. बाळशास्त्री म. जांभेकर, लोकहितवादी, फुले, न्या. रानडे, गो. ग. आगरकर, लो. टिळक, वि. दा. सावरकर, महर्षी शिंदे इ. विचारवंतांच्या परंपरेतच शास्त्रीजींचे कार्य मोडते. प्राचीन आचार्यपरंपरेची निःस्वार्थ लोकशिक्षणाची निष्ठा, तर्कशुद्ध दृष्टिकोन, पूर्व-पश्चिमी ज्ञान-विज्ञानांचा प्रचंड व्यासंग, स्पष्ट आणि निःस्पृह विचारप्रतिपादन व सामाजिक आणि राष्ट्रीय उद्धाराची कळकळ हे या परंपरेचे विशेष होत.

छोट्या शाळा-मंडळांपासून राष्ट्रीय संस्था-संघटनांपर्यंत सर्वप्रकारच्या व्यासपीठांवर दिलेली विचारप्रवर्तक भाषणे हा शास्त्रीजींच्या सामाजिक सेवाव्रताचाच एक अविभाज्य भाग होय. अशी कितीतरी मौलिक विचारांची भाषणे ग्रंथरूपात संग्रहित झालेली नव्हती. उदा. पुण्याच्या गोखले अर्थशास्त्र संस्थेत १९५३ साली भारतीय राष्ट्रीयत्वावर दिलेले भाषण किंवा पॅरिसच्या आंतरराष्ट्रीय प्राच्यविद्या परिषदेत १९७३ साली वाचलेला 'द कॉस्मिक स्टेट अँड कलेक्टिव्ह किंगशिप ऑफ वेदिक गॉडस्' हा शोधनिबंध. शास्त्रीजींनी शेकडो व्याख्यानांच्या रूपाने व लेखनद्वारा केलेले विचारकार्य प्रकाशात आल्यास हा महाराष्ट्राचा एक बहुमोल असा ठेवा मानला जाईल. १९७५ साली त्यांनी पंचाहत्तराव्या वर्षात पदार्पण केले. त्यानिमित्त स्थापन झालेल्या अमृत महोत्सव समितीने त्यांच्या समग्र लेखनाचे खंड

प्रसिद्ध करण्याची योजना आखली होती. पैकी एक लेखसंग्रह प्रकाशित झाला आहे. याच वर्षी मुंबई विद्यापीठाने एलएल्.डी. ही सन्माननीय पदवी देऊन त्यांच्या विद्वत्तेचा यथोचित गौरव केला. 'संस्कृत पंडित' म्हणून १९७३ मध्ये, 'पद्मभूषण' म्हणून १९७६ मध्ये, तर 'पद्मविभूषण' म्हणून १९९२ मध्ये भारत सरकारने त्यांना गौरविले. त्यांचा मृत्यू २७ मे १९९४ रोजी महाबळेश्वर येथे झाला. त्यांची अनेक चरित्रे व ग्रंथांची भाषांतरे उपलब्ध आहेत. तसेच त्यांच्या पश्चात त्यांची काही भाषणे संपादित करून प्रकाशित झाली आहेत.

**(मराठी विश्वकोश खंड-६, पृ. ६०७, ६०८)**

(**टीप :** वरील परिचय अद्यतन करून सुधारित संदर्भ म्हणून इथे देण्यात आला आहे.)

ooo

## परिशिष्ट - ३

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : साहित्य संपदा व संदर्भ ग्रंथ सूची

### तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : साहित्य संपदा

**१) आनंदमीमांसा**
मराठी प्रबंध
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई/पुस्तकमाला, पुष्प ६वे
मुद्रक - आर्य संस्कृती मुद्रणालय, चिमणबाग, टिळक रस्ता, पुणे.
प्रथमावृत्ती - १९२८ (शके १८५०) मूल्य ६ आणे / पृष्ठे - ७०

**२) शुद्धिसर्वस्वम्**
संस्कृत प्रबंध
प्रकाशक - लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई.
मुद्रक - आर्य संस्कृती मुद्रणालय, चिमणबाग, टिळक रस्ता, पुणे.
प्रथमावृत्ती - १९२८ (शके १८५०), मूल्य ८ आणे / पृष्ठे - ३७

**३) भारतीयधर्मेतिहासतत्त्वम्**
संस्कृत निबंध
प्रकाशक - लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई.
मुद्रक - कर्नाटक प्रेस, ३/८, ए, ठाकूरद्वार, मुंबई.
प्रथमावृत्ती - १९३३ / पृष्ठे - १६

**४) जडवाद अर्थात् अनीश्वरवाद**
मराठी प्रबंध
प्रकाशक - य. गो. जोशी प्रकाशन, ६२३ / १५, सदाशिव पेठ, पुणे.
वादविवेचन माला, संपादक, श्री. पां. वा. गाडगीळ.
मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, ३१५, गंगापुरी, वाई (जि. सातारा.)

प्रथमावृत्ती - २० ऑक्टोबर १९४१ / किं. सव्वा रुपया / पृष्ठे - १०३

५) **हिंदुधर्माची समीक्षा**

भाषणसंग्रह

श्री. श्रीधर गणेश परांजपे स्मारक व्याख्यानमाला, नागपूर विद्यापीठ, नागपूर (१९४०), प्रकाशन प्रथम आवृत्ती, ऑक्टोबर १९४१

प्रकाशक - प्राज्ञशाळा मंडळ, वाई

द्वितीय आवृत्ती, १ मे १९४२ / मूल्य २ रुपये / पृष्ठे - १४०

६) **ज्योति - निबंध**

भाषण / प्रस्तावना - रा. ना. चव्हाण

मुद्रक व प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

प्रथमावृत्ती - १९४७, मूल्य १२ आणे, पृष्ठे - ३५

७) **वैदिक संस्कृतीचा विकास**

भाषणसंग्रह

श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे, इचलकरंजी व्याख्यानमाला (१९४९) पुणे विद्यापीठ, पुणे

प्राज्ञपाठशाळा मंडळ ग्रंथमाला

प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, ३१५, गंगापुरी, वाई, जि. सातारा

प्रथमावृत्ती - आश्विन शुद्ध ६, शके १८७३ (१९५१), मूल्य ६ रुपये / पृष्ठे - २८६

८) **भारतस्य संविधानम्**

भारतीय राज्यघटना (१९५२) - संस्कृत भाषांतर.

प्रकाशक - प्रकाशन विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली

मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, वाई

प्रथमावृत्ती - १९५२ / मूल्य २ रुपये किंवा ३ शिलिंग. पृष्ठे - २९५

९) **राजवाडे - लेखसंग्रह**

लेखसंग्रह

प्रकाशक - साहित्य अकादमीतर्फे पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

मुद्रक - संगम प्रेस प्रा. लि., ३८३, नारायण पेठ, पुणे - २

प्रथमावृत्ती १९५८/मूल्य १२ रुपये / पृष्ठे - २९४

**१०) लोकमान्य टिळक लेखसंग्रह**

लेखसंग्रह

प्रकाशक - साहित्य अकादमी, नवी दिल्ली

मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, वाई

प्रथमावृत्ती - १ ऑगस्ट, १९६९ / मूल्य - १२ रुपये / पृष्ठे - ४५९.

**11) Descriptive Catalogue of Sanskrit Manuscripts.**

(Prajna Pathashala Mandal Collection) - (Part I)

Catalogue of Sanskrit Manuscripts.

Edited by - Laxmanshastri Joshi

Printed at - The Prajna Press, 31s, Gangapuri, Wai.

First Edition - 1 st June 1970, Pages - 717 / Price - 50/-

**12) Descriptive Catalogue of Sanskrit, Manuscripts - (Part II )**

(Prajna Pathashala Mandal Collection) - (Part I)

Catalogue of Sanskrit Manuscripts.

Edited by - Laxmanshastri Joshi

Printed at - The Prajna Press, 31s, Gangapuri, Wai.

First Edition - 1 st June 1970, Pages - 720-1361 / Price - 50/-

**१३) आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा आणि रससिद्धांत**

भाषणसंग्रह

व्हीनस प्रकाशन, रौप्यमहोत्सव व्याख्यानमाला पुष्प ८ वे, १९७२

प्रकाशन - व्हीनस प्रकाशन, 'तपश्चर्या', ३८१ - क, शनिवार पेठ, पुणे - ३०

मुद्रक - किर्लोस्कर प्रेस, वीर सावरकरनगर, पुणे - ९

पहिली आवृत्ती - सप्टेंबर १९७२ / मूल्य ६ रुपये / पृष्ठे - ११८

**१४) सर्वधर्मसमीक्षा**

भाषणसंग्रह

सेनापती बापट व्याख्यानमाला, मुंबई विद्यापीठ, मुंबई - (१९७६-७७)

प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

मुद्रक - गजानन प्रिंटिंग सर्व्हिसेस, कसबा पेठ, पुणे - १

प्रथमावृत्ती - १९८४ / रु.९५/- / पृष्ठे - ८८

**१५) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लेखसंग्रह (खंड - १ )**

लेखसंग्रह (संकीर्ण)
प्रकाशक - श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे - ३
मुद्रक - इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस,
४२, जी. डी. आंबेकर मार्ग, मुंबई - ३१
प्रथमावृत्ती - २० ऑगस्ट १९८२ / मूल्य-५५५/- / पृष्ठे - ५९०

**१६) शिखांचा पंथ व इतिहास**

भाषणसंग्रह
कै. सदाशिव बागाईतकर स्मृतिमाला, १९८४
प्रकाशक - गोपाळ मोकाशी, १७६, सदाशिव पेठ, पुणे - ३०
मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, ३१५, गंगापुरी, वाई, जि. सातारा
प्रथमावृत्ती - ५ डिसेंबर १९८४ / किंमत - ७ रुपये / पृष्ठे - ६०

**१७) ज्योतिचरित्र**

चरित्र
प्रकाशक - नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, ए-५, ग्रीन पार्क, नवी दिल्ली - १
मुद्रक -
प्रथमावृत्ती - शके-१९१४ (१९९२) / किं. ३० रु. / पृष्ठे - १०७

## तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : संपादन कार्य

**१८) धर्मकोश (खंड १ ते ५) (१९३७ ते १९८८)**

व्यवहारकाण्डम् (भाग १ ते ३)
उपनिषदकाण्डम् (भाग १ ते ४ )
संस्कारकाण्डम् (भाग १ ते ६ )
राजनीतिकाण्डम् (भाग १ ते ६ )
वर्णाश्रमधर्मकाण्डम् (भाग - १)

**१९) मराठी विश्वकोश (खंड १ ते १५) (१९६५ ते १९९४)**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई (१९६५ - १९८०)
महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई (१९८०-१९९४)

**२०) श्री स्वामी केवलानंद अभिनंदन ग्रंथ (१९५२) (अमृत महोत्सव )**

प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई (श्री गुरू स्वामी केवलानंद सत्कार समिती)
प्रकाशन - मार्गशीर्ष शुद्ध ४ शके-१८७४ / पृष्ठे - २७२

**२१) श्री ब्रह्मीभूत केवलानंद सरस्वती स्मारक मंदिर समारोह पुण्यस्मरण पुस्तिका**
प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई
प्रकाशन - १३ डिसेंबर, १९६० / मूल्य १ रु. / पृष्ठे - २५

**२२) श्री यशवंतराव चव्हाण अभिनंदन ग्रंथ**
प्रकाशक - श्री यशवंतराव चव्हाण जन्मदिन सत्कार समिती महाल, नागपूर
(अठ्ठेचाळिसावा जन्मदिन सोहळा सत्कार समारंभ ग्रंथ )
मुद्रक - मौज प्रिंटिंग ब्युरो, खटाववाडी, मुंबई - ४
प्रकाशन - २१ फाल्गुन, १८८२/१२ मार्च १९६१ / पृष्ठे - १००.

**२३) मराठी विश्वकोश : परिचय ग्रंथ**
प्रकाशक - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
मुद्रक - मौज प्रकाशन ब्युरो, खटाववाडी, मुंबई - ४
प्रकाशन - २ एप्रिल १९६५ (गुढीपाडवा) / पृष्ठे - १२१

**२४) मराठी कुमार विश्वकोश : परिचय ग्रंथ**
प्रकाशक - महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई
मुद्रक - शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे - १
प्रथमावृत्ती - २००३ / मूल्य-रु.१५०/- / पृष्ठे - २५८

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या साहित्याची भाषांतरे**

**25 ) A critique of Hinduism**
By tarkteerth Laxmanshastri Joshi
Translated by G. D. Parikh
Publisher - Modern Age Publication Navasari Chembers,
Outram Road, Fort, Bombay-1
Printer - N. E. Chinwalla, Manager,
British India Press, Mazagaon, Bombay
First Edition - Market, 1948 / Price.Rs.5/- / Pages-131

**26) हिंदू धर्म की समीक्षा**
मूल लेखक - तर्कतीर्थ पं. लक्ष्मणशास्त्री जोशी
अनुवादकर्ता - नथूराम प्रेमी
प्रकाशक - नथूराम प्रेमी, हेमचंद्र मोदी पुस्तकालय,
हिराबाग, गिरगाँव, बम्बई -4
पहली बार - दिसंबर 1948 / पृष्ठ संख्या - 172

**27) जडवाद और अनीश्वरवाद**

मूल लेखक - तर्कतीर्थ पं. लक्ष्मणशास्त्री जोशी
अनुवादकर्ता - सत्यदेव विद्यालंकार
प्रकाशक - नथुराम प्रेमी, हेमचंद्र मोदी पुस्तकालय, हिराबाग, गिरगाँव, बम्बई - 4
मुद्रक - न्यू भारत प्रिंटिंग प्रेस, 6, केलेवाडी, बम्बई - 4
पहली बार - मार्च 1950 / पृष्ठ संख्या - 112

**28) वैदिक संस्कृति का विकास**

मूल लेखक - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
अनुवादकर्ता - मोरेश्वर दिनकर पराडकर
प्रकाशक - साहित्य अकादमी, नई दिल्ली - 110001
प्रथम संस्करण - 1957. / पृष्ठ संख्या - 360.
मूल्य 200 रु.

**29) राजवाडे लेखसंग्रह**

मूल संपादक - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
अनुवादक - वसंत देव
प्रकाशक - साहित्य अकादमी की ओर से शिवलाल अग्रवाल एण्ड कंपनी (प्रा.) लि., आगरा
मुद्रक - युनिवर्सल आर्ट प्रेस, आगरा
प्रथम संस्करण - 1964 / मूल्य 12 रु. 50 पै. / पृष्ठ संख्या - 224.

**30) Jotirao Phule**

Tarkteerth Laxmanshastri Joshi
Translator - Daya Agrawal
Publisher - National Book Trust, India
First Edition - 1996 / Price - Rs. 75/- / Pages - 94

**31) Critique of Hinduism And Other Religions**

Tarkteerth Laxmanshastri Joshi.
Translated by Suman Oak.
Publisher - Popular Prakashan, 35, C,
Pandit Madan Mohan Malviya Marg, Popular Press Building, Tardeo, Bombay - 400 034 First Published - 1996 / pages - 205

**32) Development of Indian Culture : Vedas to Gandhi**

Tarkteerth Laxmanshatri Joshi

Translated by - S. R. Nene

Published by - Lok Vangmay Griha, Bupesh Gupta Bhuwan, 85, Sayani Road, Prabhadevi, Mumbai - 400 025

Printed by - New Age Printing Press, Mumbai - 2

First Edition - 2001/ Price - 200 Rs. / Pages - 555

**33) Spiritual Materialism**

Tarkteerth Laxmanshastri Joshi

Translated by - Arundhati Khandkar

Publisher - Lokvangmay Griha, Mumbai - 2

Printer - New Age Printing Press, Mumbai - First Edition - November 2004 / Price - 250 Rs. / Pages - 171

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या साहित्याचे संपादित ग्रंथ**

**३४) विचारशिल्प**

निबंधसंग्रह/संपादक - प्रा. रा. ग. जाधव

प्रकाशक - कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे - ३

मुद्रक - महाराष्ट्र मुद्रणशाळा छापखाना, १७८६, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

प्रथमावृत्ती - १९७५ / किंमत ५० रु. / पृष्ठे - १४८

**३५) आद्य शंकराचार्य - जीवन आणि विचार**

भाषणसंग्रह/संपादक - डॉ. अरुंधती खंडकर

प्रकाशक - श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे

मुद्रक - इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी. डी. आंबेडकर मार्ग, मुंबई - ३१

प्रथमावृत्ती - २७ मे १९९७ / किं. ८० रु. / पृ. - ९५

**३६) साहित्याचे तर्कशास्त्र**

साहित्यिक भाषणांचा संग्रह

संपादक - सीताराम रायकर, द. दि. पुंडे, पंडित हापरे.

प्रकाशन - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई.

प्रथमावृत्ती - २०१२ / मूल्य-७५० रु. / पृष्ठे - ४३७

## संदर्भ सूची


१. **श्री सोमनाथ तीर्थ**

लेखक - त्र्यंबक रघुनाथ ( गौतमबुवा) पाठक

प्रकाशक - श्री यशवंतराव महाराज मंदिर, पिंपळनेर (धुळे)

मुद्रक - श्री गजानन छापखाना, कराड, उत्तर सातारा

प्रथमावृत्ती - जुलै १९५९ / किंमत ५ रु. / पृष्ठे - १७२

२. **नवभारत मासिक / तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी विशेषांक**

फेब्रुवारी-मार्च, १९८१

प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई / किं. ५ रु. / पृष्ठे - ९५

३. **प्रज्ञांजली (तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी गौरव ग्रंथ)**

प्रकाशक - श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे - ३

मुद्रक - कल्पना मुद्रणालय, शिव-पार्वती, टिळक रोड, पुणे

प्रथमावृत्ती - २० जानेवारी १९८५ / किं. १२५ रु. / पृष्ठे - ३४७

४. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (चरित्र)**

लेखिका - सौ. मालती देशपांडे

प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, वाई

प्रथमावृत्ती - जानेवारी, १९९२ / किं. ५० रु. / पृष्ठे - ७५

५. **प्रज्ञानंद : अमृत महोत्सव स्मरणिका**

संपादक मंडळ - वसंतराव बोराटे (निमंत्रक) व अन्य

प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, वाई

प्रकाशन - २५ जानेवारी १९९४ / पृष्ठे - ९८

६. **शास्त्रीजी (चरित्र)**

लेखक - रा. ग. जाधव

प्रकाशक - प्रतिमा प्रकाशन, १३५९, सदाशिव पेठ, पुणे

मुद्रक - सुहास मुद्रणालय, २२, बुधवार पेठ, पुणे - २

प्रथमावृत्ती - २४ ऑगस्ट १९९४ / किं. ७० रु. / पृष्ठे - १५६

**७. तर्कतीर्थ : एक प्रज्ञाप्रवाह (चरित्र)**

लेखिका - अरुंधती खंडकर

प्रकाशक - श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे

मुद्रक - इंडिया प्रिंटिंग वर्क्स, आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई

प्रथमावृत्ती - २७ मार्च १९९५ / किंमत - २७० रु. / पृष्ठे - २६०

**८. तर्कतीर्थायन (गीत चरित्र)**

कवी - गोविंद नरहर कुलकर्णी

प्रकाशक - गो. न. कुलकर्णी, 'दवबिंदू', वाई

मुद्रक - प्रतिमा प्रिंटर्स, १९१०, रविवार पेठ, वाई

प्रकाशन - १ एप्रिल १९९५ / पृष्ठे - ५०

**९. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : व्यक्तित्व, कार्य आणि विचार**

संपादन - वसंत पळशीकर

प्रकाशन - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

मुद्रण - मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे- ४११०३०

प्रथमावृत्ती - फेब्रुवारी १९९६ / किं. २०० रु./ पृष्ठे - १६४

**१०. प्राज्ञपाठशाळा व तिची परंपरा**

संपादक - लक्ष्मणशास्त्री जोशी, के. ल. दप्तरी, मे. पुं. रेगे

प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

मुद्रक - मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे - ४११०३०

प्रथमावृत्ती - ऑगस्ट, १९९६ / किं. २५ रु. / पृष्ठे - २३८

**११. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या बृहत् चरित्राची साधने**

लेखक - अशोक भट

प्रकाशक - लोकमान्य टिळक स्मारक संस्था, मधली आळी,

मुद्रक - विजय मुद्रणालय, धर्मपुरी, वाई

प्रकाशन - १३ ऑक्टोबर १९९९ / विनामूल्य / पृष्ठे - ४२

**१२. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी जन्मशताब्दी विशेषांक**

कार्यकारी संपादक - यशवंत कळमकर

प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, ३१५, गंगापुरी, वाई

मुद्रक - मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे - ४११०३०

प्रथमावृत्ती - २७ जानेवारी २००१ / मूल्य - २०० रु. / पृष्ठे - ८४

**१३. संवाद : तर्कतीर्थांशी (मुलाखत संग्रह)**
लेखक - अनिल जोशी
प्रकाशक - श्री यशोदा प्रकाशन, कृष्णा, पत्रकारनगर, पुणे
मुद्रक - मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे- ४११०३०
प्रथमावृत्ती - २६ मे २००१ / किं-१५० रु. / पृष्ठे - १५८

**१४. महाराष्ट्राचे शिल्पकार : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (चरित्र)**
लेखिका - डॉ. अरुंधती खंडकर.
प्रकाशक - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
मुद्रक - स्नेहेश प्रिंटर्स, धनराज मिल आवार, लोअर परळ, मुंबई
प्रथमावृत्ती - एप्रिल २००३/ किं.४० रु./ पृष्ठे - ८४

**१५. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : परंपरा, प्रबोधन व परिवर्तन**
रा. ना. चव्हाण / संपादन - रमेश चव्हाण
प्रकाशक - रमेश चव्हाण, ७ अ / ६, पश्चिमा नगरी, कोथरूड, पुणे
मुद्रक - एस. जयकुमार ऑफसेट प्रा. लि., संगम प्रेस समोर, कोथरूड, पुणे
प्रथमावृत्ती - जुलै, २०१० / किं. २५० रु. / पृष्ठे - २६४

**१६. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (चरित्र) (महाराष्ट्र चरित्र - ग्रंथमाला)**
अरुंधती खंडकर
प्रकाशक - श्री. गंधर्व - वेद प्रकाशन, १२८६, सदाशिव पेठ, पुणे
मुद्रक - एक्सेल प्रिंटिंग अँड पॅकेजिंग, १३१/५, एरंडवणे, पुणे
प्रथमावृत्ती - नोव्हेंबर २०१० / किं. - १८०रु. / पृष्ठे - १७८

**१७. प्राज्ञप्रबोध (प्राज्ञपाठशाळा मंडळ शताब्दी ग्रंथ)**
संपादक - श्री. मा. भावे
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई
मुद्रक - सन प्रिंटर्स, गणपती आळी, वाई
प्रथमावृत्ती - डिसेंबर २०१६ / किं. २५० रु. / पृष्ठे - २४७

**१८. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : आठवणी आणि विचार**
लेखक - अनिल जोशी
प्रकाशक - श्री यशोदा प्रकाशन, 'कृष्णा', पत्रकारनगर, पुणे - ४११०१
मुद्रक - के. सागर ग्राफिक्स अँड प्रिंटर्स, वाई
प्रथमावृत्ती - ९ मार्च २०१९ / किं.-२०० रु. / पृष्ठे - १७१

**१९. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या विचारांचा तात्त्विक अभ्यास**
संशोधिका - स्वाती बापूराव भोंगळे / • मार्गदर्शक - डॉ. सदानंद मोरे
संशोधन प्रबंध, तत्त्वज्ञान विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
जुलै २०१९, पृष्ठे- ३१७

**20. Swimming Upstream (Biography)**
Author - Arundhati C. Khandkar/Ashok C. Khandkar
Publisher - Oxford University Press, India.
Printer - Nutech Print Services, New Delhi
First Edition - 2019 / Price-Rs.-1,195/- / Pages - 193

**२१. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : सर्वंकष आकलन**
लेखक / संपादक : डॉ. सुनीलकुमार लवटे
प्रकाशक - अक्षरदालन, २१४१ बी वॉर्ड, मंगळवार पेठ, कोल्हापूर - ४१६ ०१२
प्रथमावृत्ती - २७ जानेवारी, २०२३, पृष्ठे- ३२६, किं. ५०० रु.

ooo

परिचय

# डॉ. सुनीलकुमार लवटे

(जन्म ११ एप्रिल, १९५०, पंढरपूर)

जन्म ११ एप्रिल, १९५० ला वा.बा. नवरंगे बालकाश्रम, पंढरपूर येथे. बालपण व इयत्ता ३ री पर्यंतचं प्राथमिक शिक्षण तेथेच. नंतर चौथी ते पदवी शिक्षण डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन बालगृह (रिमांड होम), कोल्हापूरमधून. सन १९६७ ला शालान्त परीक्षा उत्तीर्ण. उच्चशिक्षणार्थ श्री मौनी विद्यापीठ, गारगोटीच्या 'कर्मवीर हिरे ग्रामभारती'मध्ये प्रवेश. तिथे सन १९६७ ते १९७१ या काळात 'डिप्लोमा इन रूरल सर्व्हिसेस (एज्युकेशन)' ही बी.ए.,बी.एड. समकक्ष पदविका प्रथम श्रेणीत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होऊन भारतीय ग्रामभारतीत सर्वप्रथम. त्याप्रीत्यर्थ भारत सरकारचा 'रोल ऑफ ऑनर', 'बेस्ट सोशल वर्कर', 'सर्टिफिकेट ऑफ मेरिट' संपादनाची 'हॅट्-ट्रिक'.

पदवी संपादनानंतर 'आंतरभारती शिक्षण मंडळ'च्या विविध शाळांमधून विविध विषयांचे सन १९७१ ते १९७९ या काळात अध्यापन. समांतरपणे शिक्षण संघटना कार्य. एम.ए., पीएच.डी. (हिंदी) शिक्षणाची पूर्तता. सन १९७९ ते २०१० या काळात हिंदी अधिव्याख्याता व सन २००५ ते २०१० या काळात प्राचार्य म्हणून महावीर महाविद्यालय, कोल्हापूर येथे अध्यापन, संशोधन, प्रशासन, मार्गदर्शन कार्य. सन १९८० ते २०१० या काळात समांतरपणे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या हिंदी अधिविभागात एम.ए., एम.फिल., पीएच.डी. स्तरावर अध्यापन, संशोधन व मार्गदर्शन कार्य.

सन १९८० पासून आजतागायत अनाथ, निराधार, बालगुन्हेगार, बंदी बांधव, वेश्या, कुमारी माता, परित्यक्ता, वृद्ध इ. च्या संगोपन, संरक्षण, शिक्षण, सुसंस्कार, पुनर्वसन कार्याशी निगडित वंचित विकास कार्यास समर्पित. अशा संस्थांचं राज्यशासननियुक्त अध्यक्षपद कार्य, 'समाज-सेवा' त्रैमासिक संपादन. या संबंधीच्या राज्यस्तरीय, राष्ट्रीय वंचित विकास, मानवाधिकार कार्य संदर्भातील राज्यस्तरीय, राष्ट्रीय धोरण निर्धारण व योजना विकास कार्य याचाच भाग म्हणून भारतीय शिष्टमंडळातून युरोप, आशिया, आफ्रिका खंडांतील १६

देशांचे अभ्यास दौरे. (१९९० ते २०११)

महाविद्यालयीन जीवनापासून लेखन, वाचनात रुची. मराठी-हिंदीत समांतर लेखन, भाषांतर, समीक्षा, संशोधन, संपादन कार्य. आजवर शंभराहून अधिक ग्रंथ प्रकाशित. ग्रंथांना आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यस्तरीय शासन व अन्य संस्थांचे पुरस्कार. त्यात उत्तर प्रदेश सरकारच्या हिंदी संस्थान, लखनऊचा 'सौहार्द सन्मान' (रुपये दोन लक्ष, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह), महाराष्ट्र सरकारच्या राज्य हिंदी अकादमीचा 'जीवन गौरव महाराष्ट्र भारती सन्मान' (रुपये एक लक्ष, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह), राष्ट्रभाषा प्रचार/प्रसार कार्याचा 'अनंत गोपाळ शेवडे पुरस्कार', (रु. पन्नास हजार, सन्मानपत्र); 'खाली जमीन, वर आकाश' आत्मकथेस महाराष्ट्र फाउंडेशन, अमेरिकेचा 'अपारंपरिक ग्रंथ पुरस्कार', महाराष्ट्र शासनाचा 'लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार.' या आत्मकथेचे विविध आकाशवाणी केंद्रांवरून अभिवाचन प्रक्षेपण, विविध भाषांत अनुवाद, अनेक विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात पाठ्यपुस्तक म्हणून अंतर्भाव व संशोधन.

वि.स. खांडेकर समग्र अप्रकाशित, असंकलित साहित्याचे संपादन. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय संपादन. डॉ. नरेंद्र दाभोळकर समग्र वाङ्मय हिंदी भाषांतर आणि महाराजा सयाजीराव गायकवाड समग्र वाङ्मय हिंदी भाषांतर प्रकल्पाचे प्रधान संपादक. वि.स. खांडेकर स्मृतिसंग्रहालय, शिवाजी विद्यालय कोल्हापूर व शिरोडे; यशवंतराव चव्हाण स्मृतिसंग्रहालय, महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे स्मृतिसंग्रहालय, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी येथे निर्मिती.


विविध सामाजिक, शैक्षणिक, सामाजिक कार्याची नोंद घेऊन 'कोल्हापूर भूषण', 'नागरी सत्कार', 'सुधारककार' गोपाळ गणेश आगरकर राज्यस्तरीय पुरस्कार, अंनिस डॉ. भीमराव कुलकर्णी साहित्यिक कार्यकर्ता पुरस्कार (मसाप), विविध सीमाभाग, पश्चिम महाराष्ट्र येथे आयोजित साहित्य संमेलनांचे अध्यक्षपद. रेडिओ, दूरदर्शन, व्याख्यानमाला, आभासी संवाद इत्यादी माध्यमांतून अनेक मुलाखती, व्याख्याने, मार्गदर्शन, समुपदेशन कार्य.

वरील कार्य, पुरस्कार, लेखन, मानधन इत्यादी पोटी आजवर प्राप्त सर्व रक्कम समाज संकल्पित धन मानून विविध व्यक्ती, सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक संस्थांना देणगी म्हणून समर्पित.

OOO

वाय १८५-११०० पु.-आर ८-८.२०२४

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर



५/३७/८३/

प्राज्ञपाठशाळामंडळ (रजि०) वाई

फोन नं. { ६ / २६

६-५

वाई (जि. सातारा)

तारीख १२-६-६५


मुंबई -

प्रिय यशवंतराव चव्हाण यांस —

या विश्वाच्या अपरिहार्य नियमास अनुसरून आपल्या मातुःश्रींनी हे विश्व सोडले. त्या अमरत्वास पोचल्या. कुलाचा उद्धार करणारा पुत्र अमरत्वास नेतो, असे धर्मशास्त्र म्हणते. प्रजापेक्षा अधिक अशा रीतीने त्यांनी आपले लालन पालन केले; त्यामुळे असामान्य कर्तृत्वशक्ती आपणात आली - त्यांची स्मृति आपणास नेहमीच शांत व प्रसन्न ठेवो.

सदैव आपला

लक्ष्मणशास्त्री जोशी



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई